# ''नाशिक जिल्ह्यातील शहरी महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणाचे अध्ययन''

**(विशेष संदर्भ : मालेगाव व नाशिक शहरातील स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून होणाऱ्या महिला सबलीकरणाचे तुलनात्मक अध्ययन)**

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या

तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत अर्थशास्त्र विषयातील

**विद्यावाचस्पती (पीएच. डी.)** पदवीसाठी सादर करण्यात आलेला प्रबंध


संशोधक

**श्री. सोनवणे ज्ञानेश्वर नामदेव**

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. टी. जी. गिते**

संशोधन केंद्र

अर्थशास्त्र विभाग,

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ**

गुलटेकडी, पुणे - ४११०३७


**एप्रिल २०१३**

# प्रतिज्ञापत्र

मी, **सोनवणे ज्ञानेश्वर नामदेव**, प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, ''**नाशिक जिल्ह्यातील शहरी महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणाचे अध्ययन**'' **(विशेष संदर्भ : मालेगाव व नाशिक शहरातील स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून होणाऱ्या महिला सबलीकरणाचे तुलनात्मक अध्ययन)** हा शोधप्रबंध मी स्वत: माझे मार्गदर्शक **प्रा. डॉ. टी. जी. गिते** यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे. या प्रबंधातील सर्व माहिती मी निवडलेल्या विषयावर आधारलेल्या मूळ संदर्भग्रंथातून संकलित केली असून, त्याचा योग्य तो उल्लेख योग्य त्या ठिकाणी केलेला आहे. सदर माहितीचा उपयोग या प्रबंधाव्यतिरिक्त इतर कोठेही केलेला नाही. तसेच हा शोधप्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठात किंवा संशोधन संस्थांमध्ये सादर करण्यात आलेला नाही.

ठिकाण : पुणे

संशोधक

दिनांक : २५/०४/२०१३ **सोनवणे ज्ञानेश्वर नामदेव**

# प्रमाणपत्र

प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते की, **सोनवणे ज्ञानेश्वर नामदेव** यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीकरिता ''**नाशिक जिल्ह्यातील शहरी महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणाचे अध्ययन**'' **(विशेष संदर्भ : मालेगाव व नाशिक शहरातील स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून होणाऱ्या महिला सबलीकरणाचे तुलनात्मक अध्ययन)** या विषयावर सादर केलेला शोधप्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे. हा शोधप्रबंध तयार करण्यासाठी वापरलेल्या संदर्भ ग्रंथांचा योग्य तो निर्देश या अहवालात करण्यात आलेला आहे. हा शोधप्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठामध्ये सादर करण्यात आलेला नाही.

ठिकाण : पुणे

मार्गदर्शक

दिनांक : २५/०४/२०१३

**प्रा. डॉ. टी. जी. गिते**

# ऋणनिर्देश

''**नाशिक जिल्ह्यातील शहरी महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणाचे अध्ययन**'' या विषयावरील संशोधन कार्य पुर्ण होण्यामागे अनेक व्यक्ती व संस्थांचे अनमोल सहकार्य व मार्गदर्शन लाभलेले आहे. त्याबद्दल सर्वांचे ऋण व्यक्त करणे हे माझे कर्तव्य आहे.

अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती पदवीसाठी संशोधन करण्याची संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल टिळक महाराष्ट्र विद्यापीठ प्रशासनाचे तात्त्वीक आणि सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे अधिष्ठाता **डॉ. विजय कारेकर, अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रविण जाधव, प्रा. डॉ. ज्योति पाटील** यांचे मन:पुर्वक आभार मानतो.

अध्यापन आणि संशोधनाच्या कार्यात सतत व्यस्त असणारे, ज्यांच्या प्रोत्साहन आणि मार्गदर्शनामुळेच प्रस्तुत संशोधन कार्य पुर्ण करणे शक्य झालेले आहे. असे माझे मार्गदर्शक **डॉ. टी. जी. गिते** यांचे ऋण सदैव माझ्या स्मरणात रहाणारे आहे.

माझ्या सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांस उच्च शिक्षणासाठी आणि त्यांनतर प्राध्यापकी पेशांतर्गत सेवा करण्याची संधी उपलब्ध करून देणारी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्था आणि संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचे ऋण न विसरता येण्यासारखे आहे. संस्थेचे जनरल सेक्रेटरी आदरणीय समाजश्री प्रशांतदादा हिरे यांच्या प्रोत्साहनात्मक भुमिकेमुळे आणि संस्थेचे समन्वयक आ. डॉ. अपुर्व हिरे यांच्या परवानगीमुळे संशोधन करण्यास प्रोत्साहन मिळाले. म्हणून त्यांच्याप्रती आदरभाव व्यक्त करतो.

महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विविध महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे, प्राचार्य डॉ. डी. एफ. शिरूडे, प्राचार्य डॉ. आर. के. देवरे, प्राचार्य डॉ. बी. एस्. यादव, प्रा. डॉ. एस. एन्. निकम, प्राचार्या डॉ. उज्ज्वला देवरे, उपप्राचार्य डॉ. आर. एस. देवरे या सर्वांचे प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे संशोधनासाठी प्रेरणा लाभली त्याबद्दल सर्वांचा मनस्वी आभारी आहे.

ज्यांच्या मार्गदर्शनामुळेच अर्थशास्त्र विषयातील प्राध्यापक होण्याची संधी मिळाली असे पथदर्शक डॉ. बी. एम्. डोळे, ज्यांच्यामुळे संशोधन कार्यात रूची निर्माण झाली असे डॉ. एस. एन्. कुलकर्णी, डॉ. डी. आर. बच्छाव, संशोधन काळात सतत प्रोत्साहन देणारे प्रा. डॉ. अनिल भावसार, प्रा. डॉ. डी. व्ही. ठाकोर, प्रा. अे. एम्. ठाकरे यांचे मन:पुर्वक आभार मानतो.

कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय नामपुर आणि महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय, मालेगाव कॅम्प ही माझी श्रद्धास्थाने आहेत. या महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे प्रा. एम्. डी. भामरे, प्रा. एस. आर. मोरे, प्रा. डॉ. आर. एम्. शिरसाठ,

प्रा. एम. व्ही. हिरे, प्रा. डॉ. एस. पी. देवरे, प्रा. आर. के. जाधव, प्रा. डॉ. आर. बी. धांडे, डॉ. वाडेकर, डॉ. अरूण पाटील, प्रा. यु. के. कुडासे, प्रा. एस. व्ही. चव्हाण, प्रा. डॉ. चंद्रशेखर निकम, डॉ. यु. पी. सुर्यवंशी, प्रा. अे. एम्. बिरारी, प्रा. डी. के. कन्नोर संस्थेच्या इतर महाविद्यालयातील प्रा. बी. व्ही. सोनवणे, प्रा. श्रीमती आर. एन्. सावंत, प्रा. बी. एम. सोनवणे, प्रा. एस. डी. बाविस्कर, प्रा. अनिल पवार, प्रा. देवेंद्र सावळे, प्रा. जितेंद्र पगार, प्रा. मिलिंद अहिरे, आदी गुरूतुल्य व मित्रवत सहकार्याचे आभार मानतो.

ग्रंथालय हे समाजाच्या वैचारिक समृध्दीचे माध्यम असते. प्रस्तुत संशोधनासाठी संदर्भ साहित्याची उपलब्धता करुन देण्यात पुणे येथील गोखले इन्टिट्युट, टिळक विद्यापीठाचे ग्रंथपाल, पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठाचे वाणिज्य शाखेचे व अर्थशास्थ विभागाचे ग्रंथालय, मसगा महाविद्यालयाचे ग्रंथालयाचे ग्रंथपाल आणि ग्रंथसेवक यांचे सहकार्य अनमोल स्वरुपाचे आहे. त्यामुळे या सर्वांप्रती ऋण व्यक्त करतो.

शहरी भागातील महिलांच्या दारिद्र्य निर्मुलनात आणि सबलीकरणात मध्यस्थांची व मार्गदर्शकांची भुमिका बजावणाऱ्या सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचे अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. सुवर्णजयंती शहरी योजनेचे नाशिक जिल्हा प्रकल्प अधिकारी, मालेगाव महानगरपालिकेतील योजनेचे प्रकल्प अधिकारी मा. श्री. रोहीत कन्नोर, नाशिक महानगरपालिकेतील प्रकल्प अधिकारी मा.सौ. प्रेमा कदम, दोन्ही शहरातील सर्व समुह संघटीका व ज्यांनी अनुसुची भरुन घेतांना सहकार्य दिले अशा स्वयंसहाय्यता गटाच्या सर्व अध्यक्षा यांचे शतश: आभार मानतो.

कर्मवादावर निस्सीम श्रध्दा असणारे मातोश्री व पिताश्री 'नादनाम' यांच्या संस्कारांमुळेच प्रामाणिक प्रयत्न करुन संशोधनाचे कार्य पुर्ण करु शकलो. त्याबद्दल त्यांचा आजन्म ऋणी आहे. तसेच कुटुंबियात माझी पत्नी सौ. सुवर्णा, कन्या कांचन आणि चिरंजीव हर्ष यांनी तडजोड करुन सहकार्य केले. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

प्रस्तुत संशोधनाच्या प्रबंधाची सुबकपणे अक्षर जुळवणी करणारे समीर कॉपीअर्सचे संचालक श्री. समीर राजोपाध्ये यांचे मी मन:पुर्वक आभार मानतो.

**सोनवणे ज्ञानेश्वर नामदेव**

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | शिर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रतिज्ञापत्र | i |
| | प्रमाणपत्र | ii |
| | ऋणनिर्देश | iii |
| | अनुक्रमणिका | v |
| | सारणी सूची | vi |
| | आलेख सूची | ix |
| | छायाचित्र सूची | x |
| | नकाशा सूची | x |
| १. | प्रस्तावना | १ - ४७ |
| २. | संशोधन प्रणाली | ४८ - ६६ |
| ३. | संदर्भ साहित्याचा आढावा | ६७ - १०९ |
| ४. | नाशिक जिल्ह्याचे आर्थिक व सामाजिक अध्ययन | ११० - १४१ |
| ५. | महिला स्वयंसहाय्यता गट आणि महिला सबलीकरण | १४२ - २०९ |
| ६. | नाशिक जिल्ह्यातील शहरी महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणाचे तुलनात्मक अध्ययन | २१० - २८८ |
| ७. | निष्कर्ष व शिफारशी | २८९ - ३२० |
| | संदर्भ सूची | ३२१ - ३२६ |
| | परिशिष्टे | ३२७ - ३४२ |

# सारणी सूची


| सारणी क्र. | शिर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | भारतातील स्वयंसहाय्यता गटाची प्रगती | १५ |
| २. | बँक निहाय सुक्ष्मवित्त स्थिती | १७ |
| ३. | महिला स्वयंसहाय्यता गट बँक जोडणी स्थिती | १८ |
| ४. | सुक्ष्मवित्त संस्थांना बँक कर्जाची उपलब्धता स्थिती | १९ |
| ५. | स्वयंसहाय्यता गट चळवळीत सहभागी स्वयंसेवी संस्थांची प्रगती | २० |
| ६. | स्वयंसहाय्यता गटाची विभागीय प्रगती | २४ |
| ७. | सर्वसाधारण आणि स्वयंसहाय्यता गटांची निष्क्रीय मालमत्ता स्थिती | २६ |
| ८. | महाराष्ट्र राज्यातील स्वयंसहाय्यता गटांची बँक जोडणी प्रगती | २८ |
| ९. | बचत व कर्ज– बँक जोडणी स्थिती | ३० |
| १०. | शहरी महिला स्वयंसहाय्यता कार्यक्रम | ३४ |
| ११. | नाशिक जिल्ह्यातील शहरी स्वयंसहाय्यता गट प्रगती | ३६ |
| १२. | दारिद्र्य रेषेखालील कुटूंबे व लोकसंख्या | ३६ |
| १३. | नाशिक शहर : समाज विकास संस्थांची स्थिती | ३९ |
| १४. | नाशिक शहर : महिला व बालके विकास गट स्थिती | ४१ |
| १५. | मालेगाव शहर : समाज विकास संस्थांची स्थिती | ४२ |
| १६. | महिला व बालके विकास गटांची वाटचाल | ४३ |
| १७. | नमुना निवडीचा आकृतीबंध | ५३ |
| १७. | नाशिक जिल्ह्याचे स्थान व क्षेत्रफळ | ११३ |

| सारणी क्र. | शिर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १८. | नाशिक जिल्हा प्रशासकीय रचना | ११५ |
| १९. | ग्रामीण – शहरी लोकसंख्या व वृध्दीदर | ११९ |
| २०. | स्त्री– पुरुष प्रमाण | १२० |
| २१. | नाशिक जिल्हा : साक्षरता प्रमाण | १२२ |
| २२. | नाशिक जिल्ह्यातील सामाजिक रचना | १२४ |
| २३. | नाशिक जिल्ह्यातील बालमृत्यू प्रमाण | १३० |
| २४. | नाशिक जिल्ह्यातील उद्योग स्थिती | १३३ |
| २५. | महिला सबलीकरण प्रयत्नांचा प्रभाव | १६१ |
| २६. | स्वयंसहाय्यता गटांचे सामाजिक वर्गीकरण | २१४ |
| २७. | गटाचे आर्युमान | २१५ |
| २८. | महिला सभासद संख्येनुसार गटांचे वर्गीकरण | २१६ |
| २९. | स्वयंसहाय्यता गट अध्यक्षांची शैक्षणिक पात्रता | २१७ |
| ३०. | सभासद महिलांचे सरासरी आर्युमान | २१९ |
| ३१. | कुटुंबातील व्यक्तींची संख्या | २२० |
| ३२. | सभासदांची उत्पन्न साधने | २२२ |
| ३३. | गटात सहभागी  होण्याचे उद्देश | २२३ |
| ३४. | दरमहा प्रतिसदस्य बचत स्थिती | २२६ |
| ३५. | बचतीचे स्वरूप | २२८ |
| ३६. | महिलांच्या बचत सवयीतील वाढ व बदल | २२९ |
| ३७. | गटांतर्गत कर्ज व्यवहार | २३२ |
| ३८. | व्यवसाय उपक्रमाचे वर्गीकरण | २३३ |
| ३९. | गटांची भांडवल स्थिती | २३५ |

| सारणी क्र. | शिर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ४०. | बाह्य कर्ज व अनुदान उपलब्धता स्थिती | २३७ |
| ४१. | गटांना मिळणाऱ्या कर्जाचे वर्गीकरण | २३८ |
| ४२. | कर्ज उपलब्धतेचे स्वरूप | २४० |
| ४३. | कर्ज परतफेड स्थिती | २४२ |
| ४४. | विक्री व्यवस्थेचे स्वरुप | २४५ |
| ४५. | स्वयंसहाय्यता गट सदस्यांना मिळणारा दरमहा नफा | २४६ |
| ४६. | स्वयंसहाय्यता गटांची व्यवहार स्थिती | २५० |
| ४७. | व्यावसायिक महिलांना प्रशिक्षण उपलब्धता | २५३ |
| ४८. | रोजगार निर्मिती स्वरुप | २५५ |
| ४९. | आर्थिक गरजांच्या पुर्ततेची स्थिती | २५७ |
| ५०. | बिगर आर्थिक घटकांची पुर्तता स्थिती | २६१ |
| ५१. | महिला सदस्य गतिमानता | २६७ |
| ५२. | कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत सहभाग | २६९ |
| ५३. | स्वयंसहाय्यता गट सदस्यांचा सामाजिक सहभाग | २७३ |
| ५४. | कौटुंबिक व सामाजिक बदलाची स्थिती | २७७ |
| ५५. | शिक्षण आणि स्वयंसहाय्यता गटांची व्यवहार स्थिती | २८१ |
| ५६. | अध्यक्षांचे आर्युमान आणि गट व्यवहारस्थिती | २८२ |
| ५७. | गटाचे आर्युमान आणि गट व्यवहारस्थिती | २८३ |
| ५८. | गटाचे आकारमान आणि व्यवहार विषयक स्थिती | २८४ |
| ५९. | गटाचे स्वरुप आणि व्यवहार स्थिती | २८६ |

# आलेख सूची


| आलेख क्र. | शिर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | कर्जफेड स्थिती | २५ |
| २. | नाशिक जिल्हयाची लोकसंख्या | ११७ |
| ३. | स्त्री– पुरुष प्रमाण | १२० |
| ४. | नाशिक जिल्हा : साक्षरता प्रमाण | १२२ |
| ५. | नाशिक आणि मालेगाव शहर स्वयंसहाय्यता गट – प्रगती | २१२ |
| ६. | दरमहा प्रतिसदस्य बचत स्थिती | २२६ |
| ७. | बचतीचे स्वरुप | २२८ |
| ८. | गटांना मिळणाऱ्या कर्जाचे वर्गीकरण | २३८ |
| ९. | कर्ज परतफेड स्थिती | २४२ |
| १०. | स्वयंसहाय्यता गट सदस्यांना मिळणारा दरमहा नफा | २४६ |
| ११. | स्वयंसहाय्यता गटांची व्यवहार स्थिती | २५१ |
| १२. | आर्थिक गरजांच्या पुर्ततेची स्थिती | २५८ |
| १३. | कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत सहभाग | २७० |
| १४. | स्वयंसहाय्यता गट सदस्यांचा सामाजिक सहभाग | २७४ |
| १५. | कौटुंबिक व सामाजिक बदलाची स्थिती | २७७ |

# छायाचित्र सूची


| छायाचित्र क्र. | शिर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | छायाचित्र क्र. १ | ५६ |
| २. | छायाचित्र क्र. २ | ५७ |
| ३. | छायाचित्र क्र. ३ | ५८ |


# नकाशा सूची


| नकाशा क्र. | शिर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | संशोधन क्षेत्र | ११२ |

## प्रकरण १

# प्रस्तावना

### १.१ प्रस्तावना

सामाजिक न्याय व समानतेसाठी स्त्री-पुरूष समानता ही पूर्व अट असते. सामाजिक व आर्थिक परिवर्तन होताना स्त्री-पुरूष या सर्वांना समान संधी मिळणे आवश्यक असते. मात्र दारिद्र्य आणि महिलांचा हिन दर्जा या जागतिक पातळीवर कमी अधिक प्रमाणात सर्वच देशात आढळून येणाऱ्या दोन प्रमुख समस्या आहेत. सुस्थितीपासून ढळढळीतपणे वंचित असणे म्हणजे दारिद्र्य होय (जागतिक विकास अहवाल २०००–२००१). एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मुल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे गरिबी होय (अमर्त्यसेन).[१] जगातील एकूण ६०० कोटी लोकसंख्येपैकी १३० कोटी लोकसंख्या दारिद्र्यात जीवन जगत आहे (युनो १९९५) म्हणजे सुमारे १/५ लोक आर्थिक, सामाजिक, राजकिय दृष्ट्या सुस्थितीपासून मोठ्या प्रमाणात वंचित आहेत. भारतात एकूण लोकसंख्येपैकी ३५% लोकसंख्या दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहेत त्यामुळे दारिद्र्याची समस्या अधिक विदारक आहे. एकूण दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येत महिलांचे प्रमाण ७०% इतके अधिक आहे.[२]

दारिद्र्य हे तीन पैलुशी घनिष्टपणे संबंधीत असते. (१) उत्पन्न साधनांच्या अभावामुळे उत्पन्न कमतरता निर्माण होणे, गरजांच्या तुलनेत पैशांची उपलब्धता कमी होवून वस्तु वंचितता निर्माण होते त्यास चलनी दारिद्र्य म्हणतात. (२) पैशाच्या कमतरतेतून निवास, पाणी, वीज, शिक्षण, आरोग्य विषयक भौतिक गरजांच्या उपलब्धतेची वंचितता निर्माण होते त्यास भौतिक दारिद्र्य म्हणतात. (३) शौचालय, स्वच्छ पर्यावरण, शांततायुक्त वातावरण, माहिती अशा बाबी उपलब्ध करुन घेण्याची सौदाशक्ती कमी असते. निर्णय क्षमता व निर्णयात सहभाग क्षमता कमी असते त्यास क्षमतेचे दारिद्र्य म्हणतात. या तिन्ही प्रकारात मुले आणि महिला अधिक प्रमाणात प्रभावीत होत असतात.[३]

डॉ. विद्युत भागवत यांच्यामते लिंग हा शरिर व जैविक स्वरुपाचा भाग

असुन तो निसर्गदत्त आहे. मात्र मुल जन्माला आले की, त्याचे स्त्री आणि पुरुष असे दोन भाग करुन स्त्री– पुरुषाचे वर्तन, कार्य, भूमिका यात भिन्नता निर्माण होणे यास लिंगभाव म्हटले जाते. (स्त्री नाजूक तर पुरुष बलवान, स्त्री दुर्बल तर पुरुष धैर्यवान, स्त्री कमी उंच तर पुरुष अधिक उंच, घराच्या आत स्त्री तर घराच्या बाहेर पुरुष अशी भावना म्हणजे लिंगभाव) 'लिंगभाव' हा सामाजिक, सांस्कृतिक रचनेचा भाग असतो. मात्र पुरुष प्रधान समाज व्यवस्थेत स्त्री– पुरुष समानता उत्तरोत्तर नष्ट करुन पुरुष श्रेष्ठत्व आणि स्त्रियांचे गौणत्व अधिकधिक वाढत गेले. स्त्री– पुरुष विषमता अत्यंत तीव्र होऊन स्त्रीयांच्या वाट्याला दुय्यम भूमिका, आत्यंतिक शोषण व अन्याय्य वागणूक आली. संस्कृती निर्मिती भेदांमुळे स्त्रियांना विकास प्रवाहापासून जाणीवपुर्वक दूर ठेवण्यात आले.[४] भारतात कुटूंबसंख्या, धर्मसंस्था, आर्थिक व कायदेशीर रचना, प्रसार माध्यमे यासारख्या विविध घटकांमुळे स्त्रियांचे पुनरुत्पादन अधिकार, श्रमशक्ती, लैंगिकता, उत्पादन साधने पुरुषप्रधान संस्कृतीत पुरुषांच्या नियंत्रणाखाली आहेत. स्त्री– पुरुष विषमतेची ही किंमत प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांना मोजावी लागत आहे. कुटुंब व्यवस्थेत दुय्यम वागणूक दिली जाते. आर्थिक, सामाजिक बाबतीत दुर्बलतेच्या दृष्टचक्रात पिढ्यान्– पिढ्या अडकून पडलेली स्त्री माणूस म्हणून असणाऱ्या स्थान निर्देशांकात मागे पडलेली आहे. महिलांना जगात कुठेही पुरुषांइतकी संधी नाही.[५] सहिष्णुतावादी म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या भारतीय संस्कृतीत सुद्धा स्त्रीयांचे दुय्यमत्व ठळकपणे निदर्शनास येते. त्यामुळे भारतात महिलांचा सहभाग निर्देशांक युनोच्या २००१ अहवालानुसार १४६ देशात १०५ क्रमांक तर स्त्री सामर्थ्य निर्देशांक नुसार ११६ देशात १०१ क्रमांक आहे.[६]

वैदिक काळात भारतीय समाज व्यवस्थेत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने संपत्ती, शिक्षण, राजकारण व धर्म इ. बाबतीत समान अधिकार होते. मात्र उत्तर वैदिक काळात स्त्रियांचा शैक्षणिक स्तर कमी झाला. धर्मशास्त्र काळात ११ व्या शतकापर्यंत स्त्रीयांच्या भूमिकेत आमुलाग्र बदल झाले. तर मध्यमयुगीन काळात १८ व्या शतकापर्यंत स्त्रियांच्या स्थान व भूमिकेत कमालीची घसरण झाली. १८

व्या शतकाच्या मध्यानंतर औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली. उत्पादन तंत्रात व यंत्रात आमुलाग्र बदल होऊन शहरीकरणाचे प्रमाण वाढले. ग्रामीण भागात इंग्रजांनी जमिनदारी पध्दती सुरु केल्यामुळे उदरनिर्वाहासाठी शहराकडे श्रमिकांचे स्थलांतर मोठ्याप्रमाणात होऊन शहरांचे स्वरुप झपाट्याने विस्तारत गेले. स्थलांतरीतांना पुरेसे उत्पन्न न मिळाल्यामुळे झोपडपट्यांचे, गलिच्छ वस्तीचे व दारिद्र्यचे प्रमाण सतत वाढत राहिले. या झोपडपट्टीतील लोकांचे सामाजिक आरोग्य आणि नितीमत्ता खालावते. व्यसनाधिनता, गुन्हेगारी, अनैतिक व अवैध व्यवहारांना आसरा मिळतो. परिणामी शहरी भागातील महिला आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या अत्यंत हालाखीचे जीवन जगत असतात.[७]

स्त्रियांची आर्थिक, सामजिक व राजकीय स्थिती खालावत असतांना त्यांच्या सबलीकरणासाठी विविध पातळीवर प्रयत्न करण्यात आले. प्रामुख्याने १८ व्या शतकापासून सामाजिक व १९ व्या शतकापासून आर्थिक सबलीकरणासाठी निमशासकीय व शासकीय पातळीवर प्रयत्न करण्यात आले. मार्च १९९५ मध्ये कोपनहेगन येथील जागतिक शिखर परिषदेत महिला व दुर्बल आणि उपेक्षित घटकांना सुक्ष्म वित्त पुरवठा करण्यावर भर देण्यात आला. १९९६ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या दुसऱ्या परिषदेत दारिद्र्य निर्मुलन हे एक महत्त्वाचे धोरण मानुन हे वर्ष दारिद्र्य निर्मुलनाचे आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून जाहीर करण्यात आले. तर १९९७ ते २००६ हे दशक 'दारिद्र्य निर्मुलनाचे आंतरराष्ट्रीय दशक' म्हणून घोषित करण्यात आले. दारिद्र्य निर्मुलनात, सुक्ष्मवित्ताचे महत्त्व ओळखून २००५ हे वर्ष 'सुक्ष्मवित्त वर्ष' म्हणून घोषित करण्यात आले.[८]

भारतात १९५१ नंतर स्त्री– पुरुष समानतेसाठी घटनात्मक प्रयत्न करण्यात आले. समाजवादी समाज रचनेंतर्गत दारिद्र्य निर्मुलनासाठी अनेक योजना राबविण्यात आल्या. प्राधान्य क्षेत्रास व गरजु व्यक्तींना पतपुरवठा करण्यासाठी सहकारी बँकांची स्थापना, बँकांचे राष्ट्रीयकरण करुन बँक व बिगर बँक वित्त संस्थाचे जाळे निर्माण करण्यात आले. मात्र मुल्यमापन पातळीवर निराशा पदरी आली. बँक व्यवहाराच्या परंपरागत तंत्रास छेद देवून गरिबांना सुक्ष्मवित्त

व्यवहारात थेट सहभागी करुन घेण्याचा उर्ध्वगामी दृष्टीकोन अलिकडील काळात स्वीकारण्यात आला.[६] स्वयंसहाय्यता गट हे सुक्ष्म वित्त व्यवहाराचे माध्यम म्हणून स्विकारण्यात आले.

भारतात मागील दोन दशकापासून भिन्न योजनांच्या माध्यमातून वेगवेगळ्या प्रतिमानांतर्गत स्वयंसहाय्यता गट स्थापन केले जात आहेत. स्वयंसहाय्यता गट महिला सबलीकरणाबाबत योगदान देत आहेत. हे वेगवेगळ्या पातळीवरील संशोधनातून सिद्ध झालेले आहे. मात्र दोन शहरातील स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून होणाऱ्या महिला सबलीकरणाचे अध्ययन हे नाविन्यपुर्ण व नवीन ज्ञानात भर टाकणारे ठरु शकते, असा दृष्टीकोन समोर ठेवून प्रस्तुत अध्ययन करण्यात आले. अध्ययन विषयाशी संबंधित प्रस्तुत प्रकरणात स्वयंसहाय्यता गटांचा उगम, उत्क्रांती व प्रगतीविषयक बाबींची मांडणी करण्यात आलेली आहे.

## १.२ स्वयंसहाय्यता गट : उगम व उत्क्रांती

जगामध्ये स्वयंसहाय्यता बचत गटाची चळवळ लघुवित्त बचत गट, शेजार गट, स्वयंसहाय्यता गट, महिला बचत गट अशा वेगवेगळ्या संकल्पनेतून साकारत आहे. या संकल्पनेच्या मुळाशी महिला सबलीकरण असुन जगभर ही चळवळ जोमाने फोफावत आहे.

### १.२.१ जागतिक स्तरावरील उत्क्रांती

मनुष्यप्राणी जीवन जगतांना दोन प्रकारची जीवन पद्धती अंगीकारत असतो. (१) परावलंबी जीवन पद्धती (२) स्वावलंबी जीवन पद्धती. जोपर्यंत मनुष्यामध्ये शारिरीक बौद्धीक व मानसिक क्षमता विकसीत होत नाहीत तो पर्यंत तो आश्रीत, परावलंबी असतो. मात्र प्रत्येकात एक नैसर्गिक प्रेरणा असते ती स्वावलंबी जीवन जगण्याची त्यामुळे जेव्हा व्यक्ती स्वत:च्या गरजा स्व प्रयत्नाने पुर्ण करण्याचा प्रयत्न करते. त्यास स्वयंसहाय्यता असे म्हटले जाते. आणि गरजा

भागवितांना व्यक्तीची शक्ती कमी पडते तेव्हा विशिष्ठ हेतुने अनेक व्यक्ती एकत्र येऊन प्रयत्न करतात. त्यास 'गट' म्हणुन संबोधले जाते. फक्त काही काळासाठी एकत्र आलेल्या व्यक्तींचा समुह म्हणजे गट नव्हे कारण अशा व्यक्तींच्या एकत्रीकरणामागे खास उद्देश नसतो. एकमेकांनी हेतुपुरस्कर ठरवून एकत्र आलेले नसतात. तर 'गट' म्हणजे....

- जेव्हा व्यक्ती एका समान उद्देशाने एकत्र येवून कार्य करतात.
- एकत्र येणाऱ्या व्यक्तींना आपण एक सभासद असल्याची जाणीव असुन स्वत:चे कर्तव्य व हक्क यांची माहिती असते.
- एकत्र येणाऱ्या व्यक्तींचे नेतृत्व करणारी एक व्यक्ती निश्चित केलेली असते.
- सर्व सभासद सामुहिक कृती करतात.
- एकत्र काम करण्याची एकच पध्दती व नियम ठरविले जातात त्याची माहिती सर्वसाधारणपणे सर्व व्यक्तींना असते.
- एकत्र आलेल्या व्यक्तींमध्ये नियमितपणे संवाद होत असतो. समस्या जाणुन त्यावर उपाय शोधण्यासाठी चर्चा घडवून आणली जाते.
- एकत्र येणाऱ्या व्यक्तींची संख्या ही वाजवी प्रमाणात असुन स्वत:च्या व एकत्र येणाऱ्या सर्वांच्या गरजा पुर्तीवर भर दिला जातो.
- म्हणजे पाच किंवा पाचपेक्षा अधिक संख्येने व्यक्ती नियमितपणे एकत्र येऊन आपापसात चर्चा करीत असतील तर त्यास गट म्हणून संबोधले जाते.

'गट' हे एक व्यक्तींचे संघटन असते. गटामुळे व्यक्तींची क्षमता एकत्र होऊन समुह शक्ती तयार होते. त्यामुळे आव्हाने पेलण्याची क्षमता वाढते. त्याद्वारे व्यक्तीला स्वत:चे व सर्वांचे सबलीकरण घडवून आणता येते अशा गटांची लक्षणे.

- एकता – सर्व सभासदांमध्ये एकतेची भावना निर्माण होते.
- स्वातंत्र्य – सर्व सभासदांना त्यांच्या भावना व कल्पना मांडण्याचे

स्वातंत्र्य मिळते.

- लोकशाहीपध्दती – निर्णय प्रक्रियेत सर्व सभासदांच्या मताला समान किंमत असते. सर्वांच्या मतांचा आदर राखला जातो.
- समानता – सर्व सभासद हे समान असतात, भेदाभेद नसतो.
- जबाबदारी – सर्व सभासद हे प्रत्येक गोष्टीतील महत्त्व ओळखून जबाबदारीने वागतात. सर्वांची सारखीच जबाबदारी असते.

जगप्रसिद्ध तत्त्ववेत्ता ॲरिस्टॉटलच्या मते 'माणुस हा मुलत: समाजप्रिय प्राणी आहे'.[१०] त्यामुळे तो गटा–गटाने रहाणे, एकत्रित कामे करणे पसंत करतो. त्यामुळे गट ही संकल्पना मानवी उत्क्रांतीपासुन अस्तित्वात आहे. मात्र गटाचा उद्देश मर्यादीत स्वरूपाचा व वेगवेगळ्या भौगोलिक प्रदेशात वेगवेगळा असु शकतो. पुर्व पाषाण काळात माणुस प्राण्यांपासुन स्वत:चे संरक्षण करण्याच्या हेतुने वाजवी संख्येने एकत्र येऊन कार्य करू लागले त्यावेळी 'गट' ही संकल्पना प्राथमिक स्वरूपात रूजली असावी असा अंदाज आहे. त्यानंतर उत्तर पाषाण काळात (इ.स. १०००० पुर्व) शेतीचा शोध लागल्यानंतर शेतीच्या मशागतीसाठी माणसे समुहाने एकत्र राहणे पसंद करीत होते.[११] नंतरच्या काळात वेगवेगळ्या उद्देशाने वेगवेगळे गट स्थापन करण्यात येऊ लागले. मात्र आर्थिक गरजा पुर्ण करण्याच्या उद्देशाने १८ व्या शतकात गटास प्राधान्य देण्यात आले.

युरोप खंडातील आर्यलँडमध्ये १७२० च्या सुमारास व्यक्ती व व्यक्तींच्या समुहाला लहान– लहान रक्कमांची कर्ज देण्याची पध्दत अस्तित्वात होती. १७७८ मध्ये हॅम्बर्ग येथ फस्ट थ्रिप्ट सोसायटी ची स्थापना करण्यात येऊन त्यामाध्यमातून गटांच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न झाला. त्यानंतरच्या काळात फारसा प्रतिसाद मिळाला नाही.[१२]

गटाच्या माध्यमातून 'सामुहिक शक्ती' द्वारे गरजांची पुर्तता करता येते. या वैचारिकतेतून १९३५ च्या सुमारास जपानमध्ये मद्यपानाच्या आहारी गेलेल्या व्यक्तींपैकी काही व्यक्तींनी मद्यपानापासून परावृत्त होण्यासाठी एकत्र येऊन गट

स्थापन केलेले होते. १९५५ मध्ये जपानमधील काही व्यक्तींनी खुल्या समाज व्यवस्थेचा आनंद उपभोगण्यासाठी द पीक ऑफ सर्कल मुव्हमेंट साठी स्वयंसहाय्यता गट स्थापन केलेले होते. १९६० च्या दशकात विकसीत देशांमध्ये नागरी हक्क प्राप्त करुन घेण्यासाठी 'समुह शक्ती' बाबत जागृतता निर्माण करण्यासाठी स्वयंसहाय्यता गट चवळीचा उपयोग करुन घेतला. १९७० च्या सुरुवातीला जर्मनीत वैयक्तीक हितसंबंध साध्य करण्यासाठी समान परिस्थितीतील व समान विचाराचे लोक एकत्र येऊन लहान– लहान स्वरुपाचे स्वयं सहाय्यता गट निर्माण करीत होते. १९७५ च्या सुमारास अनेक देशामध्ये कल्याणकारी राज्य संकल्पने अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ मिळविण्यासाठी स्वयंसहाय्यता गट स्थापन केले जात होते. थोडक्यात अशा सर्व व्यवहारांवरुन गटाच्या माध्यमातून स्वत:च्या व गटातील सर्व सदस्यांच्या आर्थिक व आर्थिकेतर गरजा भागविता येतात हे सर्वत्र प्रचलित झालेले होते.[१३]

गरिब व्यक्तीकडे तारण देण्याची क्षमता नसते त्यामुळे परंपरागत पध्दतीने बँक व्यवसाय करणाऱ्या वित्तसंस्था त्यांना कर्ज देत नव्हत्या. यावर उपाय म्हणून थायलँडमध्ये १९६६ पासून द बँक फॉर ॲग्रीकल्चर ॲण्ड ॲग्रीकल्चर को.ऑप. ही संस्था शेतकरी कुटूंबांना एकत्र आल्यानंतर सामुहिक दायित्वाच्या तत्वावर वित्त पुरवठा करीत होती.[१४]

खऱ्या अर्थाने जगभरात बचत गट किंवा स्वयंसहाय्यता गट ही संकल्पना १९७६ पासून डॉ. मोहंमद युनूस यांनी रुजविली. 'प्रत्येक व्यक्ती' ही आत्म उध्दारासाठीच जन्माला आलेली असते. प्रामुख्याने गरिब व्यक्तीला, विशेषत: महिलांना संधी उपलब्ध करुन दिल्यास त्यांचे आर्थिक, सामाजिक, राजकीय, सबलीकरण घडवून आणता येते. त्यासाठी 'स्वयंसहाय्यता गट' हे माध्यम उपयुक्त ठरते अशी विचारसरणी प्रत्यक्षात उतरविली म्हणून त्यांना स्वयंसहाय्यता गट संकल्पनेचा जनक म्हणून संबोधले जाते. मात्र येथपर्यंत पोहोचण्याचा मार्ग सहज सोपा नव्हता. १९४० मध्ये पुर्वबंगालमध्ये सामान्य कुटूंबात जन्मलेल्या मोहंमद युनुस यांनी अमेरिकेतील मिडल टेनेंसी स्टेट युनिर्व्हसिटीत सहाय्यक व्याख्याता

पदाची नोकरी स्विकारली. मात्र सभोवतालची गरिबी व गरिबांची दयनीय परिस्थिती याची जाणीव होऊ लागल्यानंतर डिसेंबर १९७४ मध्ये नोकरीचा राजीनामा देऊन बांग्लादेशात परतले व चितगांव विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचा प्रमुख म्हणून रुजू झाले. याच कालावधीत १९७४–७५ मध्ये बांग्लादेशात मोठा दुष्काळ पडला. या दुष्काळाच्या परिस्थितीत गरिबांच्या आर्थिक परिस्थितीत कमालीची घट झाली. जगण्यासाठी सावकारांकडून अवास्तव दराने कर्ज घ्यावे लागत होते. कर्जाचे व्याज फेडण्यामुळे परिस्थिती अजूनच खालावत होती. अशा गरिबांसाठी काहीतरी केले पाहिजे ही भावना प्रबळ होऊ लागली. जोब्रा गावात सावकारी कर्जाची झळ पोहोचलेल्या लोकांची यादी बनवितांना ४२ लोकांनी सावकाराकडून एकूण ८५६ टका (२७ डॉलर्स) कर्ज घेतले होते परंतु हे कर्ज फेडण्याची क्षमता त्यांच्यात नव्हती. परिसरातील बँकाकडे कर्ज मागण्याचे प्रयत्न केले. परंतु तारण नसल्यामुळे बँकांनी कर्ज देण्याचे नाकारले. तेव्हा मोहंमद युनुस यांनी स्वत:चे २७ डॉलर्स देऊन ४२ लोकांना कर्ज मुक्त केले. अशा लोकांच्या सबलीकरणासाठी प्रयत्न केले पाहिजे अशा विचारात असतांना जोब्रा गावाची मोलकरीण तेथील आठवडा बाजारात असणाऱ्या एका गटाची सभासद होती. बाजारातील वेगवेगळे गट पैशाची आपापसात देवाण–घेवाण (भिशी पध्दतीने) करत होते. हे गट केवळ विश्वासावर आधारीत व्यवहार करित होते, डॉ. मोहम्मद युनूस यांनी या व्यवहाराचा अभ्यास करून हे समूह बांग्लादेशातील कृषी बँकेशी जोडण्याची संकल्पना मांडली मात्र शासनाकडून प्रतिसाद न मिळाल्याने १९७९–८० मध्ये ग्रामीण बँक नावाने बँकेची स्थापना केली. १९८२ मध्ये शासनाने बँकेस कायदेशीर मान्यता दिल्याने जगातील पहिली लघुपतपुरवठा बँक म्हणून कार्यरत झाली. या बँकेचा प्रतिनिधी आठवडे बाजारात जावून लोकांची बचत गोळा करण्याचे व त्यांना कर्जपुरवठा करण्याचे काम करीत असे. त्यासाठी आठवडे बाजारात व्यवहार करणाऱ्या लोकांना संघटीत करुन स्वयंसहाय्यता गटांच्या निर्मितीस चालना दिली. आजपर्यंत ग्रामीण बँकेने ७० लाखाहून अधिक प्रामुख्याने गरीब महिलांना स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून थेट सुक्ष्मवित्ताचा पुरवठा

केलेला आहे. स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून ६ अब्ज अमेरिकन डॉलर्सचे कर्ज देऊन महिला, भिकारी अशा ६४ टक्के लोकांना दारिद्र्य मुक्त केलेले आहे. तसेच जगातील ३१ देशातील १३८ संस्थांना पतपुरवठा व मार्गदर्शन व प्रशिक्षण देत आहे.[१५] डॉ. मोहंमद युनुस यांचे 'स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून लघु पतपुरवठा' हे 'गरिबी निर्मूलनाचे ग्रामीण प्रतिमान' जगभरातील १३० पेक्षा अधिक देशांनी स्विकारलेले आहे. स्वयंसहाय्यता गट – बँक जोडणी ही संकल्पना ॲसियन पॅसेफिक रुरल ॲण्ड ॲग्रीकल्चर क्रेडीट असोसिएशन ने विकसित करुन ग्रामीण एजन्सी फॉर टेक्नीकल को–ऑपरेशन ने १९८६ मध्ये चिनमधील नाजिंग येथे त्यावर कार्यशाळा घेतली आणि इंडोनेशिया, फिलीपाईन्स, थायलंड आणि भारतात कृती प्रकल्प लागू केला.[१६]

### १.२.२ भारतातील उत्क्रांती

भारतात ऋग्वेद काळापासून इ.स. पुर्व १७०० ते ११०० मंडळ म्हणजे समुह ही कल्पना अस्तित्वात आहे.[१७] तसेच फार पुर्वीपासून 'भिस्सी' हे बचतीच्या माध्यमातून आर्थिक गरजा भागविणारे गट (बचत गटाशी साधर्म्य असणारे गट) सर्वत्र आहेत. भिस्सी या प्रकरणात केवळ एकमेकांवरील विश्वासाच्या तारणावर १० ते २० व्यक्ती एकत्र येऊन ठराविक बचत करतात व आर्थिक गरजा भागविण्यासाठी लहान–लहान रक्कमांची देवाण– घेवाण करीत असतात.

**भिशीचे प्रकार :** भिशीचे साधारणत: तीन प्रकार प्रचलित आहेत.

१) **चिठ्ठी भिशी :** प्रत्येक सभासदाच्या नावाने चिठ्ठी तयार करुन सर्व सभासदांच्या चिठ्या टाकल्या जातात. त्यापैकी एक चिठ्ठी त्रयस्थ व्यक्तीकडून उचलली जाते. ज्याचे चिठ्ठीत नाव असेल अशा व्यक्तीला रक्कम दिली जाते. पुढच्या भिशीच्या वेळी ज्याचा नंबर लागला त्याच्या नावाची चिठ्ठी टाकली जात नाही.

२) **बॉस भिशी :** साधारणत: ५ ते २५ सभासद एकत्र येऊन त्यापैकी भिशी चालविण्यासाठी बॉस म्हणून नेमणूक करतात. ज्याची बॉस

म्हणून नेमणूक झाली. त्या व्यक्तीने प्रत्येक सभासदाकडून वर्गणी जमा करुन ड्रॉ काढायचा असतो.

३) **लिलाव भिशी :** प्रत्येक सभासदाने जमा केलेल्या वर्गणीची प्रत्येक महिन्याला बोली लावली जाते. ज्या सभासदांना पैशाची गरज आहे असे सभासद बोली लावतात. ज्याने जास्त बोली लावली. त्या सभासदास बोली रक्कम वजा करुन उर्वरित रक्कम दिली जाते. पुढील ड्रॉच्या वेळी भिशी घेतलेल्या सभासदास बोली बोलता येत नाही.

अशा प्रकारे भिशी हा बचतीच्या माध्यमातून गरजा भागविणारा गट असतो.मात्र या प्रकारात फसवणूक होणे, पैसे बुडण्याचे प्रमाण अधिक असणे, कोणताही कायदेशीर आधार नसणे यासारखे दोष आहेत.[१८]

महाराष्ट्र राज्याच्या अमरावती जिल्ह्यात १९४७ मध्ये फक्त २५ पैसे बचत करुन एकमेकांना सहाय्य करणारे बचत गट अन्नपुर्णा महिला मंडळाच्या वतीने स्थापन केलेले होते. १९७४ मध्ये गुजरात राज्यातील अहमदाबाद येथे इलाबेन भट या महिलेच्या पुढाकारातून सेल्फ एम्पलॉईड वुमेन्स असोसिएशन (सेवा) ही संस्था स्थापन करण्यात आली. या संस्थेने गरिब स्त्रियांना एकत्र करुन त्यांना बचतीच्या सवयी लावून लहान– लहान प्रमाणात कर्ज देण्याचे कार्य केलेले आढळून येते. दक्षिणेकडील राज्यात सधन आणि धन फाऊंडेशनच्या माध्यमातून स्वयंसहाय्यता गटांच्या स्थापनेला प्रोत्साहन देवून आर्थिक सबलीकरणावर भर देण्यात आला. मात्र १९८८ मध्ये स्थापन झालेल्या महाराष्ट्रातील चैतन्य ग्रामीण महिला बाल युवक संस्थेने पुणे जिल्ह्यात महिलांचे स्वयंसहाय्यता गट स्थापन करुन आर्थिक व सामाजिक सबलीकरणासाठी प्रयत्न केलेत.

१९८२-८३ मध्ये भारत सरकारने ग्रामीण भागात महिला व बालके विकास कार्यक्रम २५ व्यक्तींच्या गटाच्या माध्यमातून राबविण्यास सुरूवात केली.[१९]

तसेच १९८८ पासून केरळ राज्यात 'श्रेयस' फाऊंडेशन च्या वतीने स्वयंसहाय्यता गटांची स्थापना करण्यात येत आहे. मात्र शासकीय पातळीवर १९८७–८८ पासून प्रयत्न झालेले दिसून येतात. १९८७–८८ मध्ये भारत सरकारने नाबार्ड या इम्प्लीमेंटींग एजन्सीच्या माध्यमातून सुक्ष्मवित्त पुरवठा करण्याचे 'बचत गट' हे माध्यम होऊ शकते का? याचा शोध घेण्याचा हेतुने कृषी मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव व ऑसियन पॅसिफीक रुरल ॲण्ड ॲग्रीकल्चरल क्रेडीट असोसिएशन  या संस्थेच्या काही सदस्यांचा एक अभ्यासगट (टास्कफोर्स) नियुक्त केला. ११ राज्यातील ४३ स्वयंसेवी संस्थेतील स्वयंसहाय्यता गटांचा अभ्यास करुन अहवाल देण्यासाठी हा गट नियुक्त करण्यात आला होता. १९८७–८८ मध्येच नाबार्डने 'मायराडा' या स्वयंसेवी संस्थेला 'बचत गटांची बचत व कर्ज व्यवस्थापन' या विषयावर संशोधन प्रकल्पाची जबाबदारी सोपविली.[२०] तज्ञ गटांचा अहवाल व 'मायराडा' संशोधन प्रकल्पाचे यश या आधारावर नाबार्ड ने २६ फेब्रुवारी १९९२ मध्ये 'बचत गट व बँक जोडणी' हा मार्गदर्शक प्रकल्प ५०० स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून राबविण्यास सुरुवात केली. त्यासाठी १९९१ मध्ये रिझर्व बँक ऑफ इंडियाने व्यापारी बँकांना व ४ जाने. १९९३ मध्ये सहकारी व ग्रामीण बँकांना बचत गट व बँक जोडणी प्रकल्पात सहभागी होण्याचे आदेश एका परिपत्रकाद्वारे निर्गमीत केले.[२१]

९ डिसेंबर १९९१ मध्ये स्वयंसहाय्यता गट बँक जोडणी कार्यक्रमांतर्गत भारतात कर्नाटक राज्यातील कोलार जिल्ह्यात वैश्य बँकेच्या बंगारपेट शाखेने व्यंकटेश्वर महिला संघाच्या स्वयंसहाय्यता गटाला लघुवित्त पुरवठा सर्वप्रथम केला, तर ३० जाने. १९९२ मध्ये कार्पोरेशन बँकेच्या अंदरसोनपेट शाखेने सरस्वती महिला संघाच्या बिद्यगुरुजु येथील स्वयंसहाय्यता गटाच्या महिलांना प्रशिक्षण नाबार्डच्या मार्गदर्शनाद्वारे देण्यात आले.[२२]

१९९२–९३ मध्ये स्वयंसहाय्यता गट बँक जोडणी कार्यक्रमांतर्गत कर्नाटक राज्यात ११५ स्वयंसहाय्यता गटाची बँक जोडणी करण्यात आलेली होती. ४ आक्टोबर १९९३ स्वयंसहाय्यता गटाच्या नावाने बँकेत बचत खाते उघडण्यास

रिझर्व बँकेने परवानगी दिली.

स्वयंसहाय्यता गट बँक जोडणी प्रकल्पाची व्यापकता वाढविण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने १ ऑक्टो. १९९६ ला क्षेत्रिय ग्रामीण बँकांची स्वयंसहाय्यता गटांशी जोडणी करण्याचे आदेश परिपत्रकाद्वारे निर्गमित केले. ७ आक्टोबर १९९६ ला सहकारी बँकांशी स्वयंसहाय्यता गटाच्या जोडणीस परवानगी मिळाली.[२३]

१९९६ मध्ये युनिसेफ च्या सहकार्याने दक्षिण आशिया दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम प्रायोगिक तत्त्वावर आंध्रप्रदेशाच्या तीन जिल्ह्यात सुरू करून स्वयं सहाय्यता गटांच्या माध्यमातून दारिद्र्य निमुर्लनावर भर देण्यात आला.[२४]

ग्रामीण व शहरी भागातील गरिब व्यक्तींच्या प्रामुख्याने महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणासाठी दोन महत्त्वपुर्ण योजना सुरु करण्यात आलेल्या आहेत. १ डिसेंबर १९९७ पासून शहरी भागासाठी 'सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना, तर ग्रामीण भागासाठी १ एप्रिल १९९९ पासून 'सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना सुरु करण्यात आली.[२५]

१९९३–९४ पासून विवेकानंद स्मृती समिती या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून अंदमान- निकोबार मध्ये सहकारी बँक व स्वयंसहाय्यता गट यांची जोडणी झालेली होती. १ एप्रिल १९९५ ला नाबार्ड आणि स्विस एजन्सी फॉर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या संयुक्त प्रयत्नाने पत आणि वित्त सेवा फंड उभारण्यात आला. अधिक व्यापकता वाढविण्यासाठी २000 मध्ये मध्यवर्ती सहकारी बँकांना सहभागी करुन घेण्यात आले. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक– बँक जोडणी प्रकल्प हा कार्यक्रम कर्नाटक राज्यात हसन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकच्या माध्यमातून राबविण्यात सुरुवात करण्यात आली. तसेच ग्रामीण भागात स्वयंसहाय्यता गट– पोस्ट ऑफीस जोडणी कार्यक्रम तामिळनाडूच्या ५ जिल्ह्यात मार्च २००४ पासून राबविण्यात येत आहे. झिरो बॅलन्सवर २३४४ स्वयंसहाय्यता गटांचे बचत खाते उघडण्यात येवून १६८ गटांना ४०.०२ लाख रुपयांचे सुक्ष्म कर्ज पुरविण्यात आलेले आहे. ३१ मार्च २००४ मध्ये १ दशलक्ष स्वयंसहाय्यता गटांची

बँक जोडणी पुर्ण झालेली आहे.[२६]

२००४–०५ मध्ये नाबार्डच्या माध्यमातून लघुउद्योजक प्रोत्साहन संस्था नऊ राज्यात सुरु करण्यात आलेल्या आहेत. तसेच मार्च २००६ मध्ये नाबार्डच्या माध्यमातून पश्चिम बंगालमध्ये मालदा व उत्तर डिंगरपूर जिल्ह्यात लघुउद्योजक विकास कार्यक्रम ग्रामीण भागात उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने सुरु करण्यात आलेला आहे.[२७]

## १.३ स्वयंसहाय्यता गट : प्रगती

१९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्याच्या पार्श्वभूमीवर दारिद्र्य, बेरोजगारी, विषमता, संरचनेचा अभाव, लोकसंख्येचा निकृष्ट दर्जा या प्रमुख समस्यांसह अनेक समस्या सोडविण्याचे आव्हान होते. तत्कालीन समस्या सोडवून जलद विकास साध्य करण्यासाठी १९५१ पासून आर्थिक नियोजनाचा मार्ग स्विकारण्यात आला. नियोजनाच्या माध्यमातून संसाधनाच्या वाटणीतील, उत्पन्न व संपत्तीतील विषमता दूर करुन समानता प्रस्थापित करणे दारिद्र्य निर्मूलन व बेरोजगारी कमी करणे, मानवी संसाधन सामुग्रीची उत्पादकता व गुणवत्ता वाढविणे ही प्रमुख उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समाजवादी समाजरचने अंतर्गत प्रयत्न करण्यात आले. खाली झिरपण्याचा विकास दृष्टीकोन आधार मानण्यात आला. मोठ्या उद्योगांबरोबर लघुउद्योगांना, श्रीमंतांबरोबर गरिबांना पुरुषांबरोबर महिलांना अप्रत्यक्षपणे व आपोआप लाभ मिळतील अशी आशा होती. तसेच समान लाभ मिळवून देण्यासाठी रोजगार योजना, अनुदानाधारित योजना, अन्नपुरवठा योजना, राखीव कोटा इत्यादींची व्यवस्था करण्यात आली. वित्तीय व्यवहारात सहभागी करुन घेण्यासाठी १९०४ च्या सहकारी कायद्यानुसार सहकारी पतसंस्थांची स्थापना करण्यात आली. १९६९ मध्ये व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. क्षेत्रिय ग्रामीण बँकांची स्थापना करण्यात आली. देशात बँकांचे मोठे जाळे निर्माण झाले. त्यामुळे ३५.५ टक्के कुटुंबांपर्यंत बँकींग सुविधा पोहोचविण्यात यश मिळाले. मात्र ज्या कुटूंबांकडे 'पत' नाही, तारण नाही, बँक

व्यवहाराचा पुर्व इतिहास नाही अशा ६४.५ टक्के कुटूंबांना बँकींग सुविधा मिळवून देणे शक्य झाले नाही. प्रामुख्याने पुरुषांपेक्षा महिला अधिक दुर्लक्षित असुन फक्त ९ टक्के महिलांचे बँक खाते आहे.[२८] हिंदू कुटुंबांपेक्षा मुस्लीम कुटूंबांना बँक सुविधा अत्यंत अल्प प्रमाणात उपलब्ध आहे. नॅशनल कमिशन ऑन मायनॉरिटीजच्या अहवालानुसार फक्त ५ टक्के मुस्लिमानांच कर्ज आणि ॲडव्हानसेस सुविधा मिळत आहेत. त्यामुळे अल्पसंख्याकांच्या विकासात अडथळे निर्माण झालेले आहेत.[२९]

नियोजन काळात उद्योग–व्यवसायांची संख्या वाढीबरोबर आपोआप रोजगार निर्मिती होऊन बेरोजगारी कमी होईल, अशी अपेक्षा होती. मात्र एकाबाजुला उद्योग व्यवसायांची संख्या वाढुनही एकूण काम करणाऱ्या व्यक्तींपैकी १४.४ टक्के व्यक्तींना संघटीत क्षेत्रात काम मिळते. त्यात महिलांचे प्रमाण फक्त ७ टक्के आहे. राष्ट्रीय व दरडोई उत्पन्नात वाढ होऊनही वेगवेगळ्या शासकीय व संस्थात्मक अहवालानुसार (जागतिक बँक - ३४.९ टक्के, सरकारी अंदाज- ३६.९ टक्के, संशोधन संस्था- ३६ टक्के, सुरजित भल्ला- २५ टक्के) भारतातील दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण १/४ ते १/३ या दरम्यान टिकून आहे. तर एकूण दारिद्र्यात महिलांमध्ये असणाऱ्या दारिद्र्याचे प्रमाण हे ७० टक्के पेक्षा अधिक आहे. परिणामी संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालानुसार दारिद्र्य समस्येच्या बाबतीत भारत ९० विकसनशील देशात ५५ व्या क्रमांकावर आहे. महबुल उल–हक यांनी युनोच्या माध्यमातून प्रचलित केलेल्या मानवी विकास अहवालानुसार (१९९८) १६२ देशात भारताचा क्रमांक ११५ वा आहे. याचा अर्थ उत्पन्न साधने, उत्पन्न व संपत्तीच्या अभावी भारतातील बहुसंख्य लोकांना निकृष्ट जीवन जगावे लागत आहे.[३०] थोडक्यात वरुन खाली झिरपण्याचा सिद्धांत विकासाचे लाभ सर्वदूर दुर्बलांपर्यंत प्रामुख्याने महिलांपर्यंत पोहोचविण्यात अपयशी ठरलेला आहे म्हणून नवीन व्युहरचना, दृष्टीकोन स्विकारण्याची गरज निर्माण झाली. १९७६ पासुन बांग्लादेशातील ग्रामीण ट्रस्टने आणि भारतात १९९२ पासून 'नाबार्ड'ने उर्ध्वगामी विकास दृष्टीकोनाचा अवलंब केलेला आहे.

''आर्थिक दृष्ट्या निम्न किंवा खालच्या स्तरात असणाऱ्या बहुसंख्य

व्यक्तींना दीर्घकालीन उत्पन्न वृद्धीसाठी थेट वित्तीय सेवा पुरवून त्यांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणणे, त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सामिल करणे आणि त्या माध्यमातून समाजाचा, देशाचा विकास घडवून आणणे म्हणजे उर्ध्वगामी विकास होय.''[३१]

१९८० च्या दशकात आर्थिकदृष्ट्या दुर्बलांच्या दारिद्र्य निर्मुलनाचे व सक्षमीकरणाचे '**प्रभावी साधन**' म्हणून 'सुक्ष्मवित्त, किंवा लघु वित्तास असणारे महत्त्व अधोरेखीत करण्यात आले आणि दुर्बलांना सुक्ष्मवित्त व्यवहारात सहभागी करुन त्यांना थेट बँकींग व्यवहारांशी जोडण्याचे अत्यंत '**प्रभावी माध्यम**' म्हणून स्वयंसहाय्यता गटांच्या निर्मितीस चालना देण्यात आली.[३२]

### १.३.१ भारतातील स्वयंसहाय्यता गटांची संख्यात्मक प्रगती

समाजातील आर्थिकदृष्ट्या गरीब, दुर्बल प्रामुख्याने दरिद्री, अपंग, विधवा, अनाथ महिलांनी स्थापना केलेल्या स्वयंसहाय्यता गटांना सुक्ष्मवित्ताच्या सुविधा उपलब्ध करुन त्यांच्या दारिद्र्य निर्मुलन आणि सक्षमीकरणासाठी स्वयंसहाय्यता गट– बँक जोडणी प्रकल्प नाबार्डच्या माध्यमातून सुरु करण्यात आला. गेल्या दोन दशकात स्वयंसहाय्यता गट बँक जोडणीची प्रगती संख्यात्मक दृष्ट्या जगात सर्वात अधिक आहे.

**सारणी क्र. १ : भारतातील स्वयंसहाय्यता गटाची प्रगती**

| वर्ष | स्वयंसहाय्यता गट संख्या | बँक कर्ज (कोटी) |
|---|---|---|
| १९९२-९३ ते १९९८-९९ | ३२९९५ | ५७१.00 |
| १९९९ - २००० | ११५७७५ | १९३०.00 |
| २००० - २००१ | २६३८२५ | ४८०९.00 |
| २००१ - २००२ | ४६१४७८ | १०२६३.00 |
| २००२ - २००३ | ७१७३६० | २०४८७.00 |
| २००३ - २००४ | १०७९०९१ | ३९०८७.00 |
| २००४ - २००५ | १६१८४५६ | ६८९८५.00 |
| २००५ - २००६ | २२३८६५ | ११३९७.५० |
| २००६ - २००७ | २६९४५०५ | १२३६६.९० |
| २००७ - २००८ | ३६२५९४१ | १६९९९.९० |
| २००८ - २००९ | १६०९५८६ | १२२५३.५१ |
| २००९ - २०१० | ४२२४३३८ | २२६७९.८४ |

**स्त्रोत :** मायक्रो फायनान्स वर्ल्ड, जाने.- मार्च, २०१०, पृ. क्र. ११.

वरील सारणीत दर्शविण्यात आलेली स्वयंसहाय्यता गट बँक जोडणीची प्रगती पाहून 'फोर्ब्जने' ''भारतातील बचत गटांच्या गंगेला सलाम'' अशा मथळ्याखाली दखल घेतलेली आहे.[३३] नवीन आर्थिक धोरणाचा स्विकार केल्यानंतर १८ वर्षात स्वयंसहाय्यता गटांच्या संख्येत व त्यांना देण्यात आलेल्या 'सुक्ष्मवित्त' मध्ये उल्लेखनीयरित्या वाढ झालेली आहे.

१९९२–९३ मध्ये प्रायोगिक तत्वावर स्थापन झालेल्या गटांची संख्या फक्त ५00 होती. १९९९–२000 मध्ये स्वयंसहाय्यता गटांची संख्या १ लाखाचे उद्दिष्ट्ये ओलांडून ११५७७५ पर्यंत २00३–0४ मध्ये १0 लाखाचे उद्दिष्टे ओलांडून १0७९0९१ पर्यंत २00६–0७ मध्ये २५ लाखाचे उद्दिष्ट्ये ओलांडून २६९४४५0५ पर्यंत व २00९–१0 मध्ये ४0 लाखाचे उद्दिष्ट्ये ओलांडून ४२२४३३८ पर्यंत वाढली. या स्वयंसहाय्यता गटांना बँकाकडून पुरविण्यात येणाऱ्या सुक्ष्म कर्जाचे प्रमाणसुद्धा ५७१ कोटी रु. वरुन २२६७९८४ कोटी रुपयांपर्यंत वाढले. एकूण स्वयंसहाय्यता गटांमध्ये २२.३ टक्के सभासद हे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतरमागासवर्गीय आहेत. तसेच एकूण सभासदांमध्ये ६0 टक्के पेक्षा अधिक सभासद हे दारिद्य रेषेखालील कुटूंबातील आहेत. या सदस्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्नवाढ गटात सहभागी झाल्यामुळे ६.१ टक्क्याने वाढत आहेत. तर वार्षिक खर्चातील वाढ अन्न व बिगर अन्न घटकांवर अनुक्रमे ५.१ टक्के व ५.४ टक्के इतकी आहे.

### १.३.२ बँक निहाय प्रगती

स्वयंसहाय्यता गटांची बँकेशी जोडणी झाल्यानंतर सुक्ष्म वित्त व्यवहारास सुरुवात होते. सुक्ष्मवित्त व्यवहारांच्या माध्यमातून आर्थिक सबलीकरण व त्या आधारे सामाजिक सबलीकरण घडून येण्यास मदत होते. या दृष्टीकोनातून रिझर्व बँकेच्या आदेशान्वये स्वयंसहाय्यता गटांची व्यापारी बँका, क्षत्रिय ग्रामीण बँका व सहकारी बँका यांच्याशी जोडणी केली जात आहे.

**सारणी क्र. २ : बँक निहाय सुक्ष्मवित्त स्थिती (मार्च २००९ अखेर)**

| तपशिल | व्यापारी बँक | क्षेत्रिय ग्रामीण बँक | सहकारी बँक | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. स्वयंसहाय्यता गट (संख्या) | ३५४९५०९ | १६२६५८८ | ९४५०५०.०० | ६१२११४७ |
| २. बचत (कोटी रू.) | २७७२.९९ | १९८९.७० | ७८२.८८ | ५५४५.५७ |
| ३. स्वयंसहाय्यता गट (संख्या) | २८८१३७४ | ९७७८३४ | ४१५१३० | ४२२४३३८ |
| ४. बचत (कोटी रू.) | १६१४९.४३ | ५२२४.४२ | १३०६.०० | २२६७९.८५ |

**स्त्रोत :** मायक्रो फायनान्स वर्ल्ड, जाने.- मार्च, २०१०, पृ. क्र. ११.

स्वयंसहाय्यता गट चळवळीत व्यापारी, क्षत्रिय ग्रामीण व सहकारी बँकांचा सहभाग महत्त्वपुर्ण आहे. यात व्यापारी बँकांचा सहभाग सर्वाधिक आहे. कारण सर्वात अधिक स्वयंसहाय्यता गटांची या बँकांशी जोडणी होऊन बचत व कर्ज हे वित्त व्यवहार अधिक आहेत. एकूण बचत करणाऱ्या गटांपैकी ५८ टक्के गट व एकूण कर्ज वाटप झालेल्या गटांपैकी ६७ टक्के गटांची व्यापारी बँकांशी जोडणी झालेली आहे. तसेच स्वयंसहयता गटांकडून झालेल्या एकूण बचतीत ५० टक्के बचत केवळ व्यापारी बँकेत असून कर्ज पुरवठ्यात ७१.२ टक्के कर्ज व्यापारी बँकांकडून देण्यात आलेले आहे. याचा अर्थ व्यापारी बँकांनी स्वयंसहाय्यता गटांवर अधिक विश्वास दर्शविला आहे. क्षत्रिय ग्रामीण बँका गट जोडणीत दुसऱ्या क्रमांकावर आहेत. ठळकपणे निदर्शनास येणारी बाब म्हणजे या बँकांशी जोडलेले गट २५.५९ टक्के असतांना एकूण बचतीपैकी ३५.८८ टक्के बचत झालेली आहे. म्हणजे क्षत्रिय ग्रामीण बँकांनी ग्रामीण भागात बचतीच्या सवयीला अधिक प्रमाणात चालना दिलेली मात्र त्यामानाने कर्ज पुरवठ्याचे प्रमाण (२३.३ टक्के) कमी आहे आणि सहकारी बँकांनी बचतीच्या तुलनेत सुक्ष्म कर्ज देण्याचे प्रमाण अत्यंत कमी ठेवलेले आहे.[३४]

### १.३.३ महिला स्वयसंहाय्यता गटांची स्थिती

भारतात स्वयंसहाय्यता गट– बँक जोडणी प्रतिमानांतर्गत स्वयंसहाय्यता गटांना बँकेच्या आर्थिक व्यवहाराशी जोडले जाते. बँकेत गटाच्या नावाने बचत खाते उघडून ‘आधी बचत नंतर कर्ज’ या तत्वाने गटास कर्ज उपलब्ध होते. एकूण

स्वयंसहाय्यता गटांमध्ये महिला स्वयंसहाय्यता गटांची स्थिती दर्शविणारी सारणी पुढीलप्रमाणे

**सारणी क्र. ३ : महिला स्वयंसहाय्यता गट बँक जोडणी स्थिती (मार्च २००९ अखेर)**

**(रक्कम कोटी रुपये)**

| तपशिल | एकूण स्वयंसहाय्यता गट | | महिला स्वयंसहाय्यता गट | | एकूणात महिला प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | |
| बचतीच्या माध्यमातून स्वयंसहाय्यता गट बँक जोडणी | ६१२११४८ | ५५४५.६२ | ४८६३९२१ | ४४३४.०३ | ७९.५ |
| कर्जाच्या माध्यमातून स्वयंसहाय्यता गट बँक जोडणी | ४२२४३३८ | २२६७९.८४ | ३२७७३५५ | १८५८३.५४ | ७७.६ |

**स्त्रोत :** http://www.indiamicrofinance.com/wp.content.

भारतातील स्वयंसहाय्यता गटांची बचतीच्या माध्यमातून बँकेशी जोडणी होऊन बँकेच्या व्यवहार कक्षेत आलेल्या गटांची संख्या ६१.२१ लाख आहे. या गटांच्या बचत खात्यावर ५५४५.६२ कोटी रुपये रक्कम जमा झालेली आहे. या एकूणात महिला गटांचे प्रमाण ७९.५ टक्के आहे. तसेच बचतीच्या आधारावर आणि सामुदायिक दायित्वाच्या आधारावर संपुर्ण भारतात ४२.२४ लाख स्वयंसहाय्यता गटांना २२६७९.८४ कोटी रुपयांचे सुक्ष्म कर्ज उपलब्ध झालेले आहे. या एकूणात महिला स्वयंसहाय्यता गटांचे प्रमाण ७७.०६ टक्के आहे. त्यामुळे बचत व कर्ज या सुक्ष्मवित्त व्यवहारांच्या माध्यमातून वर्षानुवर्षे दुर्लक्षित असलेल्या महिला बँक व्यवहाराच्या मुख्य प्रवाहात सामिल झालेल्या आहेत. ही स्थिती महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणास अंतिमत: देशाच्या विकासाच्या दृष्टीने आश्वासक आहे.

### १.३.४ सुक्ष्मवित्त संस्थांना सुक्ष्म कर्ज उपलब्धता

सुक्ष्मवित्त क्षेत्रात सुक्ष्मवित्त संस्थांची एक वित्तीय मध्यस्थ म्हणून असणारी भूमिका अत्यंत महत्त्वपुर्ण आहे. गैरसरकारी संस्था १९६० च्या सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट आणि १९८० चा इंडियन ट्रस्ट ॲक्ट नुसार नोंदणी करुन

सुक्ष्मवित्त संस्था म्हणून स्थापना केली जाते. तसेच सहकारी सुक्ष्मवित्त संस्थांची स्टेट को ऑपरेटिव्ह सोसायटी ॲक्ट, किंवा म्युच्युअली ॲडेड को ऑपरेटिव्ह सोसायटी ॲक्ट किंवा मल्टी स्टेट को–ऑप सोसायटी कायदा २००२ नुसार नोंदणी किंवा मल्टी स्टेट को–ऑप सोसायटी कायदा २००२ नुसार नोंदणी केली जाते. बिगर बँक वित्तीय सुक्ष्मवित्त संस्था ची कंपनी ॲक्ट १९५६ च्या २५ व्या कलमान्वये रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार स्थापना केली जाते. या सर्व संस्थांना १८ फेब्रुवारी २००० च्या अध्यादेशाद्वारे सुक्ष्मवित्त व्यवहार करण्यास व्यापारी बँका, क्षेत्रीय ग्रामीण बँका, सहकारी बँका, लघु उद्योग विकास बँक यांना आदेश निर्गमीत करण्यात आले.[३५] या सर्व बँकांनी सुक्ष्मवित्त संस्थांना केलेल्या वित्त पुरवठ्याची प्रगती (२००९–२०१० अखेर)

**सारणी क्र. ४ : सुक्ष्मवित्त संस्थांना बँक कर्जाची उपलब्धता स्थिती**

| बँक प्रकार | सुक्ष्म वित्त संस्था संख्या | कर्ज उपलब्ध स्थिती | कर्ज परतफेड प्रमाण |
|---|---|---|---|
| सार्वजनिक, खासगी व विदेशी बँका | १४०७ | १००९५.३२ | ८० - १०० |
| क्षेत्रीय ग्रामीण बँका | १०३ | ५२.२२ | १०० |
| सहकारी बँका | ०३ | ००.०७ | ९० |
| लघुउद्योग विकास बँक | १४६ | ३८०.२० | एन. ए. |

**स्त्रोत :** एम.एफ.आय. बँक लिंकेज प्रोग्राम, २००८-०९, पृ. क्र. १६.

### १.३.५ सहभागी स्वयंसेवी संस्था

गटस्थापना, गटाची वाटचाल याबाबत स्वयंसेवी संस्था महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. स्वयंसहाय्यता गटाच्या चळवळीचा प्रसार, वाढ व विस्तार हा सर्वत्र स्वयंसेवी संस्थांमुळे झाला आहे. शासकीय यंत्रणेपेक्षा स्वयंसेवी संस्थांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. कारण या संस्था गावाची निवड करणे, कुटूंबाची निवड, सर्व्हे करणे, महिलांना बचतगटाविषयी प्रशिक्षण, बाजारपेठ उपलब्धता, महिला प्रश्नांची मांडणी शासकीय पातळीवर करून प्रश्न सोडवणूक करतात. त्याचप्रमाणे निम्नस्तरावरील महिलांच्या शिक्षण, आरोग्य, कौटुंबिक छळ अशा प्रश्नांची सोडवणूक बचत गटाच्या माध्यमातून करतात. त्याचप्रमाणे बचतगट व बँका

यामधील दुवा म्हणून बचतगटाचे मूल्यांकन करुन त्यांना कर्ज उपलब्ध करुन देतात. तसेच गटाचे खाते उघडून बँका गटाची कर्जफेडीची जबाबदारी घेतात. या महत्त्वपूर्ण कार्यामुळे स्वयंसहाय्यता गटाची चळवळ ग्राम,निमशहर व शहरी भागापर्यंत पोहोचली.

व्यापारी बँका स्वयंसहाय्यता गटांनी कर्ज वाटप करताना स्वयंसेवी संस्थांची मदत घेतल्याशिवाय कर्जवाटप करत नाही. कारण गटाची स्थापना व संगोपन या संस्था करतात. त्यामुळे बँका स्वयंसेवी संस्थांच्या मार्फत कर्जपुरवठा करतात. तसेच काही स्वयंसेवी संस्था बचतगटाच्या फेडरेशन स्थापन करुन कर्जपुरवठा करतात. म्हणून स्वयंसहाय्यता गटाच्या चळवळीची नाळ ही स्वयंसेवी संस्थांशी जोडलेली आहे. स्वयंसेवी संस्थांना आर्थिक पाठबळ मिळाले, म्हणून शासनाने अशा संस्थांना स्वयंसहाय्यता गटाच्या कार्यासाठी अनुदानाची तरतूद केलेली आहे. या संस्थांना दारिद्र्य रेषेखालील बचत गटांच्या सर्वांगीण विकासासाठी अनुदान दिले जाते. हे अनुदान टप्प्याटप्प्याने दिले जाते. त्यामुळे स्वयंसेवी संस्था कार्यक्षमपणे बचत गटाचे कार्य करतात.

भारतामध्ये स्वयंसहाय्यता बचत गटाच्या चळवळीत स्वयंसेवी संस्थांची प्रगती किंवा योगदान पुढील सारणीवरुन स्पष्ट होते.

**सारणी क्र. ५ : स्वयंसहाय्यता गट चळवळीत सहभागी स्वयंसेवी संस्थांची प्रगती**
**(रक्कम दशलक्ष)**

| वर्ष | अनुदान प्राप्त स्वयंसेवी संस्था | अनुदान मंजूर रक्कम |
|---|---|---|
| २००२ - ०३ | २४३ | ३६.५० |
| २००३ - ०४ | २२१ | ४७.३९ |
| २००४ - ०५ | ३१७ | ४२.६६ |
| २००५ - ०६ | ३३७ | ६२.७० |

**स्त्रोत :** नाबार्ड रीपोर्ट, २००६, पृ. क्र. १९.

वरील आकडेवारीवरुन स्पष्ट होते की, भारतात स्वयंसेवी संस्था बचत गटाचे कार्य करीत असल्यामुळे त्यांच्या अनुदान प्राप्त संस्था संस्थेत तसेच रकमेत वाढ होत आहे. स्वयंसेवी संस्था अनुदानाच्या अभिलाषामुळे स्वयंसहाय्यता गट निर्मितीची संख्या वाढवित आहेत.

### १.३.६ शेतकरी क्लब

भारतामध्ये स्वयंसहाय्यता गटाच्या चळवळीमध्ये शेतकरी क्लब समाविष्ट झाले आहेत. नाबार्डने शेतकरी क्लबच्या माध्यमातून स्वयंसहाय्यता गट स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे. शेतकरी क्लबने मार्च २००६ अखेरपर्यंत १२,६५९ स्व.ब. गटाची स्थापना करुन ६.५०९ दशलक्ष रु. कर्ज प्राप्त करुन दिले आहे. याचाच अर्थ असा की, स्व. ब. गटाच्या चळवळीचा सर्वत्र क्षेत्रात जोमाने प्रसार होत आहे. या शेतकरी क्लबच्या माध्यमातून शेतकरी व शेतमजूर महिलांचे सबलीकरण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

### १.३.७ मुस्लिम वित्तीय संस्था

पैसा हा नफा मिळविण्याचे साधन नाही तर मानव्याच्या पार्श्वभूमीवर दुसऱ्या व्यक्तीस मदत करणे, सुरक्षितपणे पैसा सांभाळणे, स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी उद्योग व्यवसायात पैसा गुंतवणूक करुन वाढावा मिळविणेचे साधन मानून इस्लामीक बँकींगची स्थापना करण्यात आलेली आहे. या बँकींग वित्त व्यवहारात दोन प्रकारच्या ठेवी स्विकारल्या जातात. (१) चालू व बचत खाते– ह्या खात्यावरील ठेवीस फक्त सुरक्षितता प्रदान केली जाते. (२) गुंतवणूक खाते– ठेवीदारांचा पैसा प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करुन होणाऱ्या नफा व तोट्यानुसार ठेवीदारास परतावा देणे. तर इस्लामीक बँकींगमध्ये इस्लामीक कायदा आधार असून रिबा म्हणजे व्याज घेण्यास सक्त मनाई आहे. तसेच पैसा गुंतवणूक करतांना अल्कोहोल, जुगार व अवैध व्यवसायात गुंतवणूक करु नये. म्हणजे कर्ज हे 'बिगर व्याजी' तत्वावर देणे. तसेच नफा– तोटा सहभाग तत्वावर आधारित असते.

इंटरनॅशनल असोएिशन ऑफ इस्लामिक बँकर्सच्या (१९९७) अहवालानुसार जगभरामध्ये १६६ इस्लामीक बँक आणि वित्तीय संस्था असुन त्यांच्याकडे असणारे भांडवल ७३६५.०१ दशलक्ष एकूण ठेवी ११२५८९.८ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सच्या आहेत.

या प्रकारच्या संस्थांचे व्यवहार हे 'व्याज रहित' आणि 'नफा–तोटा सहभाग' तत्वावर आधारित असून परंपरागत बँकींग व्यवसायापेक्षा पुर्णत: वेगळे आहे. नफा मिळविणे हे या संस्थांचे ध्येय नसल्यामुळे विस्तार क्षमतेवर मर्यादा पडलेल्या आहेत. व्याजाऐवजी या संस्थांकडून व्यवस्थापन खर्च नावाने रक्कम घेतली जाते. फंडातील रकमेचा आकार कमी असल्यामुळे गुंतवणूकीसाठी रक्कम कमी मिळते. सर्व गरजुपर्यंत पोहोचलेल्या नाहीत. एका सर्वेक्षणानुसार ८० टक्के मुस्लीम नफा वा तोटा तत्वावर ठेवी ठेवण्यास व ६७ टक्के गुंतवणूकीसाठी कर्ज घेण्यास उत्सुक आहेत. मात्र इस्लामीक फायनान्स इन्टिट्युटचा त्या प्रमाणात विस्तार झालेला नाही.[३६] सच्चर समितीच्या अहवालानुसार राष्ट्रीयकृत बँकांमध्ये फक्त ७.५ टक्के मुस्लीम व्यक्तींचे खाते आहेत. आणि ०.५ टक्के मुस्लीम व्यक्तींनाच कर्ज व अग्रीमे उपबल्ध झालेले असून २.२ टक्के मुस्लीमांना या बँकांमध्ये रोजगार मिळालेला आहे. परंपरागत बँक व्यवसायात 'व्याज' हा मुस्लीम समुदायाच्या बँक जोडणीतील मोठा अडथळा आहे म्हणून बिगर व्याज तत्वावर आधारित बँकांची स्थापना व विस्तार वाढवून मुस्लीम समुदायास बँक व्यवहाराच्या मुख्य प्रवाहात आणण्याची गरज आहे.[३७]

भारतीय रिझर्व्ह बँकेने १९९७ च्या रिझर्व्ह बँक डायरेक्टीव्हस अंतर्गत बँकेत्तर वित्तीय संस्था म्हणून इस्लामीक फायनान्स इन्टिट्युटला परवानगी दिलेली आहे. एप्रिल १९९९ मध्ये दुरुस्ती करुन या संस्थांना बँकेतर वित्तीय संस्था कायद्यांतर्गत नोंदणी बंधनकारक करुन २ कोटी रुपयांचे स्वत:चे भांडवल असणे, विशिष्ट मर्यादेत राखीव निधी ठेवणे, शासकीय कर्जरोखे मध्ये गुंतवणूक करणे, उत्पन्न वृद्धी, मालमत्ता वर्गीकरण, निष्क्रीय मालमत्ता दर्शविणे आणि पतमापन सक्तीचे करण्यात आलेले आहे. परिणाम स्वरुप भारतातील जम्मू–काश्मीर, बिहार, झारखंड, आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश, छत्तीसगड, ओरिसा, दिल्ली, उत्तरांचल या १० राज्यांमध्ये १९९७ नंतर बिगर व्याज सहकारी सोसायटी ची स्थापना करण्यात येत आहे. तसेच साधना व एस.के.एस., सेवा, स्पंदन या संस्थाचा सहभाग आहे.[३८]

अशा सर्व पार्श्वभूमीवर मुस्लीम समुदायातील ५० टक्के महिलांचा दुर्लक्षित भाग महिला स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून बँक व्यवहाराशी संथपणे परंतु आश्वासक पध्दतीने जोडला जात आहे. वाडीनाले सरोज (२००४) यांच्या अध्ययनावरुन गटात सहभागापूर्वी फक्त ०.३ टक्के मुस्लीम महिलांना बँक कर्जाच्या सुविधा मिळत होत्या. गटात सहभागामुळे लघुकर्जाच्या सुविधा उपलब्ध होऊ लागल्या. सहभागापूर्वी ६ टक्के महिला पडदा पध्दतीला आर्थिक व्यवहारातील अडथळा आणि ७८ टक्के महिला व्याजास अयोग्य मानत होत्या. परंतु गट सहभागानंतर जागृतता वाढून ४४ टक्के महिला पडदा पध्दतीला अडथळा आणि फक्त २२ टक्के महिला 'व्याज' हा अडथळा मानत आहेत. म्हणजे वर्षानुवर्ष दुर्लक्षित असणाऱ्या महिलांना 'स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून उत्पन्न साधन मिळून सबलीकरणाचे साधन उपलब्ध होते. याचा 'प्रदर्शन परिणाम' म्हणून (गल्ली, मोहल्ल्यातील काही महिलांनी गटात सहभाग घेऊन परंपरागत व्यवस्थेस छेद देत व्यवसाय करुन उत्पन्न मिळवित आहेत हे पाहुन इतरही महिलांना प्रेरणा मिळते, कालांतराने बहुसंख्य करतात म्हणून सर्वच दुर्बल महिलांचा सहभाग वाढतो.) मुस्लीम महिलांचा सहभाग वाढीस लागलेला आहे.[३९] नाशिक जिल्ह्यातील मालेगाव शहरात एकूण स्वयंसहाय्यता गटांपैकी ८२ टक्के गट हे मुस्लीम महिलांचे असुन (सुमारे ३५०० मुस्लीम कुटूंबातील मुस्लीम महिलांचा सहभाग) इतर समुदायाच्या महिलांपेक्षा अधिक सक्षम पध्दतीने गटांचे व्यवहार करीत आहेत. मात्र दारिद्र्य रेषेखालील एकूण कुटूंबापैकी गटात सामिल होणाऱ्या मुस्लीम समुदायातील कुटूंबाचे प्रमाण कमी आहे. म्हणून अधिक प्रबोधनाची गरज आहे. शिवाय धार्मिक कट्टरता असणाऱ्या मुस्लीम कुटूंबासाठी बिगर व्याज आधारित इस्लामीक बँक संस्थांना स्वयंसहाय्यता गट चळवळीशी जोडणे गरजेचे आहे.

### १.३.८ विभागीय प्रगती

भारत हा एक खंडप्राय देश असून भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक विविधता मोठ्या प्रमाणात आढळून येते. म्हणून प्रशासकीय दृष्टीने भारतात सहा

विभाग पाडण्यात आलेले आहे. त्यात उत्तर, उत्तर– पुर्व, पुर्व, मध्य, पश्चिम व दक्षिण असे सहा विभाग आहेत. या प्रत्येक विभागात स्वयंसहाय्यता गट स्थापन करण्यात आलेले आहेत. त्यांच्या प्रगतीचा विभाग (क्षेत्र) निहाय आढावा.

**सारणी क्र. ६ : स्वयंसहाय्यता गटांची विभागीय प्रगती (मार्च अखेर)**

| विभाग | २००१ | टक्केवारी | २००९ | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. उत्तर विभाग | ९०१२ | ३.४१ | १६५५११ | ३.९२ |
| २. उत्तर-पुर्व | ४७७ | ०.१८ | ११७८१२ | २.७९ |
| ३. पुर्व विभाग | २२२५२ | ८.४३ | ९३३४८९ | २२.१० |
| ४. मध्य विभाग | २८८८१ | १०.९४ | ३३२११६ | ७.८७ |
| ५. पश्चिम विभाग | १५५४३ | ५.९० | ३९३४९९ | ९.३२ |
| ६. दक्षिण विभाग | १८७६९० | ७१.१४ | २२८०९११ | ५४.०० |
| **एकूण** | **२६३८२५** | **१००.००** | **४२२४३३८** | **१००.००** |


**स्त्रोतः** मायक्रो फायनान्स वर्ल्ड, जाने– मार्च २०१०, पृ.क्र. ११

वरील सारणीत देशातील सहा विभागाच्या स्वयंसहाय्यता गट प्रगतीचा आढावा घेतांना ठळकपणे लक्षात येणारी बाब म्हणजे दक्षिण विभाग हा प्रथम क्रमांकावर आहे. भारतात स्वयंसहाय्यता गट चळवळीस दक्षिण विभागातील कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू या राज्यांमधून सुरूवात झाली. या विभागातील गटांची शेकडा प्रगती ७१.१५% वरून ५४% पर्यंत कमी झाली असली तरी संख्यात्मक प्रगती मात्र १८७६९० वरून २२८०९११ पर्यंत वाढलेली आहे. या विभागातील आंध्रप्रदेशमध्ये ८५५४६० गट व तामिळनाडूत २८०४४५ गट कार्यरत आहेत. पुर्व विभाग हा भारतात दुसऱ्या क्रमांकावर असुन या विभागातील गटांचे प्रमाण ८.४३% वरून २२.११% पर्यंत वाढलेले आहे. पश्चिम विभाग तिसऱ्या क्रमांकावर असुन या विभागात महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात २३४३६९ गट स्थापन झाली आहे. उत्तर व प्रामुख्याने उत्तर-पुर्व म्हणजे ईशान्य भारतातील राज्यात मात्र स्वयंसहाय्यता गटांची प्रगती ही अपेक्षेपेक्षा कमी आहे. थोडक्यात स्वयंसहाय्यता गटांच्या विभागीय प्रगतीत चढ उतार असून विषमता आहे. निकड असणाऱ्या उत्तर-पुर्व विभागात अपेक्षित प्रगती झालेली नाही.

### १.३.९ कर्ज परतफेड विषयक स्थिती

'सुरक्षितता' हे बँक व्यवहाराचे एक प्रमुख 'तत्व' मानले जाते. बँकेने दिलेल्या कर्जाची वेळेवर व पुर्णपणे परतफेड हे सुरक्षिततेच्या तत्वात अंतर्भूत असते. कर्ज सुरक्षिततेसाठी कर्ज मागणाऱ्या व्यक्तीची पत व तारणाचे मुल्य आणि कर्जदाराचा बँक व्यवहाराचा इतिहास विचारात घेतला जातो. या परंपरागत विचारधारेस छेद देवून स्वयंसहाय्यता गटात सहभागी झालेल्या सभासदांकडे तारण देण्याची क्षमता नसतांना, कर्ज व्यवहाराचा पुर्व इतिहास नसतांना ज्या बँकांनी सामुहिक दायित्वाचा तारणावर विश्वास दाखवून गटास कर्ज पुरवठा केला. त्या बँकांच्या कर्जाची परतफेड ही आश्चर्यकारक प्रमाणात झालेली आहे.

**आलेख क्र. १ : कर्जफेड स्थिती (शेकडा प्रमाण)**




आलेख क्र. १ नुसार, राष्ट्रीयकृत व्यापारी बँका, क्षेत्रीय ग्रामीण बँका आणि सहकारी बँका यांनी परंपरागत व्यवहारांसाठी दिलेल्या एकूण कर्जाच्या परतफेडीचे प्रमाण सुरक्षिततेच्या तत्वाचा पुर्ण अवलंब करुन सुद्धा तुलनात्मक दृष्ट्या कमी असल्याचे दिसून येते. उलट केवळ दुर्बल घटकांच्या स्वयंसहाय्यता गटांना विश्वासाच्या आधारावर दिलेल्या कर्जाच्या परतफेडीचे प्रमाण तीनही प्रकारच्या

बँकांमध्ये अधिक आहे. परंपरागत एकूण व्यवहारात कर्ज परत फेडीचे सरासरी प्रमाण ६६ ते ७४.२९ टक्के आहे. तर स्वयंसहाय्यता गटांच्या कर्ज परतफेडीचे प्रमाण ८६ ते ९० टक्के आहे. यावरुन गरीब व्यक्ती कर्ज परत फेडण्यास अधिक लायक आहे. ह्या डॉ. युनुस यांच्या विधानाची सत्यता निदर्शनास येते.

### १.३.१० निव्वळ निष्क्रीय मालमत्ता स्थिती

वित्त संस्थांकडे असणारे भांडवल खेळते असणे किंवा क्रियाशील असणे लाभदायक असते. मात्र कर्ज देतांना कर्ज दात्याच्या कर्जफेड क्षमतेचा चुकीचा अंदाज, क्षमतेपेक्षा अधिक कर्ज पुरवठा, कमी लाभतेच्या व्यवसायांसाठी, उपक्रमांसाठी कर्ज पुरवठा अशा कारणांचा परिणाम म्हणून वित्त संस्थांची थकबाकी वाढत जाते. भांडवल अडकून पडते म्हणून त्यास निष्क्रीय मालमत्ता म्हटले जाते.

बँकनिहाय सर्व प्रकारच्या व्यवहारातील निष्क्रीय मालमत्ता आणि स्वयंसहाय्यता गटांच्या व्यवहारामुळे निर्माण झालेली निष्क्रीय मालमत्ता यांची तुलनात्मक स्थिती पुढीलप्रमाणे.

**सारणी क्र. ७ : सर्वसाधारण आणि स्वयंसहाय्यता गटांची निष्क्रीय मालमत्ता स्थिती**

**(मार्च २००६ अखेर)**

| बँक प्रकार | सर्वसाधारण सर्व व्यवहाराची स्थिती शेकडा प्रमाण | स्वयंसहाय्यता गटाच्या व्यवहाराची स्थिती शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १. राष्ट्रीयकृत बँका | २.६५ | ०.९३ |
| २. क्षेत्रीय ग्रामीण बँका | ८.७० | २.३२ |
| ३. सहकारी बँका | १८.८५ | २.१५ |
| **एकूण** | **१०.०६** | **१.८०** |

**स्त्रोत :** नाबार्ड रीपोर्ट, २००६, पृ. क्र. २०.

वरील सारणीवरुन (१) निव्वळ निष्क्रीय निधीचे प्रमाण सर्वसाधारण सर्व प्रकारच्या बँक व्यवहारात अधिक आहे. (२) निष्क्रीय निधीचे प्रमाण सहकारी बँक कर्ज व्यवहारात सर्वाधिक १८.४४ टक्के इतके अधिक आहे. (३) सर्व प्रकारच्या बँकींग व्यवहारात कर्जावरील निष्क्रीय निधीचे प्रमाण सरासरी १०.६ टक्के इतके आहे. म्हणजे बँकांचा १० टक्के निधी निष्क्रीय आहे. (४) उलट स्वयंसहाय्यता

गटांना दिलेल्या कर्जावरील निष्क्रीय निधीचे प्रमाण २ टक्के पेक्षा सुद्धा कमी म्हणजे १.८० टक्के इतके कमी आहे. याचा अर्थ स्वयंसहाय्यता गटांना दिलेल्या कर्जाचा वापर कार्यक्षम होऊन कर्जाची परतफेड प्रमाण अधिक आहे. त्यामुळे स्वयंसहाय्यता गटांकडील थकबाकी प्रमाण अत्यंत नगण्य असल्याचे निदर्शनास येते.

## १.४ महाराष्ट्र राज्यातील प्रगती

महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी विचारांचे राज्य असून महिला धोरणाचे मार्गदर्शक ठरलेले राज्य आहे. महाराष्ट्र हे महिला धोरणाचा सर्वप्रथम पुरस्कार करणारे राज्य आहे. त्यामुळे स्वयंसहाय्यता गटांच्या स्थापनेला प्राधान्य देण्यात आलेले आहे. महाराष्ट्र राज्यात स्वयंसहाय्यता गटांची संकल्पना नवीन नाही. १९४७ मध्ये अमरावती जिल्ह्यात सासु-सुनांनी एकत्र येवून २५ पैसे बचतीचे गट सुरु केले होते. १९७० च्या सुमारास इलाबेन भट यांनी महिला व सुक्ष्मवित्त पुरवठा या विषयाची मांडणी केली होती. तसेच १९८४ मध्ये गडचिरोली जिल्ह्यात वडसा तालुक्यात बचतगट स्थापन झालेले होते. तसेच चैतन्य संस्था, अन्नपुर्णा महामंडळ, ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामती, मानवलोक संस्था यासारख्या स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून स्वयंसहाय्यता गटाच्या आर्थिक संकल्पनेला सामाजिक उपक्रमांची जोड दिल्यामुळे निलिमा मिस्त्रा यांना मॅगेसेस सारखा पुरस्कार मिळाला. १९९४ मध्ये महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा प्रकल्पांतर्गत महिला विकासास हेतु पुरस्कर चालना देण्यात येवून स्वयंसहाय्यता गट स्थापनेस प्राधान्य देण्यात आले. परंतु १९९७ पासुन शहरी भागात व १९९९ पासुन ग्रामीण भागात स्वयंसहाय्यता गट चळवळीस प्रामुख्याने गती मिळाली.[४०] त्याचे फलीत म्हणून महाराष्ट्रात स्वयंसहाय्यता गटांची सद्यस्थिती पुढील प्रमाणे.....

## सारणी क्र. ८ : महाराष्ट्र राज्यातील स्वयंसहाय्यता गटांची बँक जोडणी प्रगती

(कर्ज कोटी रुपयांत)

| अ. नं. | विभाग व जिल्हा | मार्च २००२ | | मार्च २००९ | |
|---|---|---|---|---|---|
| | | गट संख्या | कर्ज | गट संख्या | कर्ज |
| १. | **कोकण** | | | | |
| | १. ठाणे | ५३ | १.२० | ९९४९ | ८१८१ |
| | २. रायगड | १४२ | १.६३ | ७६६७ | ७००३ |
| | ३. रत्नागिरी | १५६ | ३.५८ | ७४८३ | ५२१८ |
| | ४. सिंधुदुर्ग | ६७ | २.५३ | ६४३५ | ४२५५ |
| | **एकूण** | **४१८** | **८.९४** | **३१५३४** | **२४६५७** |
| | **टक्केवारी** | **४.९५** | **२.९३** | **१३.३३** | **१२.७०** |
| २. | **नाशिक** | | | | |
| | १. नगर | ५३ | ३.६७ | ९५४७ | ७१८५ |
| | २. धुळे | १२३ | ५.८८ | ३७७५ | २७७० |
| | ३. जळगांव | २१७ | ११.३९ | ८४२४ | ५८९६ |
| | ४. नंदुरबार | ५६ | १.३२ | ५६१९ | ५५२७ |
| | ५. नाशिक | २२१ | ७.३३ | ७५६६ | ६१७८ |
| | **एकूण** | **६७०** | **२९.५८** | **३४९३१** | **२७५५६** |
| | **टक्केवारी** | **७.९३** | **१०.६०** | **१४.७६** | **१४.१८** |
| ३. | **पुणे** | | | | |
| | १. पुणे | २२२ | ११.८० | ९१०७ | ८०१७ |
| | २. सातारा | ११६ | ५.९७ | ६२०३ | ५१९५ |
| | ३. सांगली | १२८ | २.५३ | ६२०४ | ६०२० |
| | ४. कोल्हापूर | ३४६ | ८.१९ | ११०८० | १०३३६ |
| | ५. सोलापूर | ३०५ | १२.६७ | १४५६० | १२५६६ |
| | **एकूण** | **१११९** | **४१.१६** | **४७१५४** | **४२१३४** |
| | **टक्केवारी** | **१३.२५** | **१४.९८** | **१९.९४** | **२१.७०** |
| ४. | **औरंगाबाद** | | | | |
| | १. औरंगाबाद | ४९९ | २०.०५ | ६०३५ | ४८४८ |
| | २. जालना | ११५ | ३.४३ | ४०६९ | ३२५८ |
| | ३. परभणी | २९ | ०.४१ | ४०६० | ३५०० |
| | ४. बीड | १४८ | ४.१५ | ७१४२ | ५८९० |
| | ५. उस्मानाबाद | २०८ | १.७१ | ५८३१ | ४१६८ |
| | ६. लातूर | २९ | ०.५२ | ६४३२ | ५६७९ |
| | ७. हिंगोली | ०७ | ०.२८ | ४२६२ | २९४० |
| | **एकूण** | **१५३६** | **४०.१५** | **४५८०७** | **३६८१०** |
| | **टक्केवारी** | **१८.५०** | **१५.६२** | **१९.३६** | **१८.९६** |

| अ. नं. | विभाग जिल्हा | मार्च २००२ | | मार्च २००९ | |
|---|---|---|---|---|---|
| | | गट संख्या | कर्ज | गट संख्या | कर्ज |
| ५. | **अमरावती** | | | | |
| | १. बुलढाणा | ५७ | २.२१ | ९६८५ | ५३५८ |
| | २. अमरावती | २८५ | १७.१२ | ११८८३ | १०२५२ |
| | ३. अकोला | ८४७ | १८.०९ | ६४८३ | ५२६५ |
| | ४. यवतमाळ | ६१४ | १८.२५ | ४६८६ | ४५५० |
| | ५. वाशिम | २३० | २.२९ | ४५८७ | ३७४३ |
| | **एकूण** | **२०२७** | **६३.९६** | **३७३२४** | **२९१६८** |
| | **टक्केवारी** | **२४.००** | **२३.००** | **१५.७८** | **१५.०१** |
| ६. | **नागपूर** | | | | |
| | १. नागपूर | १४२ | ३.७८ | ७५५३ | ५८९३ |
| | २. भंडारा | ३७२ | १२.५३ | ७०१२ | ६३७० |
| | ३. गडचिरोली | ३३९ | ११.३८ | ४२१७ | ३८५७ |
| | ४. चंद्रपुर | १४२४ | ५७.६३ | ७३४७ | ६२३८ |
| | ५. गोंदीया | १०१ | २.८५ | ८३७७ | ७०९९ |
| | ६. वर्धा | २७० | २.७२ | ५२९५ | ४४३४ |
| | **एकूण** | **२६४९** | **९०८९** | **३९८०१** | **३३८९१** |
| | **टक्केवारी** | **३१.३७** | **३२.८७** | **१६.८३** | **१७.४५** |
| | **एकूण (१ ते ६)** | **८४४६** | **२७४.००** | **२३६५५१** | **१९४२१६** |
| | **टक्केवारी** | **१००** | **१००** | **१००** | **१००** |

**स्त्रोत :** * योजना, मार्च २००८, पृ. क्र. ३३.

** http:ll rural.nic.in/sgsy/repdis/disphysical rep 0708 ASP

महाराष्ट्र राज्यातील २००२ ते २००९ या कालावधीत स्वयंसहाय्यता गटांच्या संख्येत व गटांना मिळणाऱ्या कर्ज उपलब्धतेत वाढ झालेली आहे. २००२ मध्ये ८४४६ गटांची बँक जोडणी झालेली होती. त्यात २००९ अखेर २३६५५१ पर्यंत वाढ झाली. तसेच कर्ज उपलब्धते बाबतही या कालखंडात २७४ कोटी रूपये वरून १९४२१६ कोटी रूपये इतक्या मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. स्वयंसहाय्यता गट व कर्ज उपलब्धता यात अनुक्रमे २८.७४ व ७०८.८१ पटीने वाढ झालेली निदर्शनास येते. २००२ मध्ये महाराष्ट्रात स्वयंसहाय्यता गट स्थापनेत नागपुर विभाग व त्याअंतर्गत चंद्रपुर जिल्हा प्रथम क्रमांकावर होता अमरावती व औरंगाबाद विभाग अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर होते. मात्र २००९ अखेर पुणे विभाग प्रथम क्रमांकावर असुन सोलापुर व कोल्हापूर जिल्हे अनुक्रमे प्रथम व दुसऱ्या क्रमांकावर आहेत. औरंगाबाद व नागपुर विभाग दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर आहेत.

### १.४.१ महाराष्ट्र राज्य : स्वयंसहाय्यता गटांची बचत व कर्ज बँक जोडणी

महाराष्ट्र राज्यात सुक्ष्मवित्त व्यवहाराचे माध्यम म्हणून स्वयंसहाय्यता गट भूमिका पार पाडत आहेत. स्वयंसहाय्यता गटांची राष्ट्रीयकृत व्यापारी बँका, क्षेत्रीय ग्रामीण बँका व सहकारी बँकांशी बचत व कर्ज माध्यमातून जोडणी झालेली आहे.

**सारणी क्र. ९ : बचत व कर्ज– बँक जोडणी स्थिती**

**(मार्च २०१०, रक्कम लक्ष रुपये)**

| बँक | एकूण बचत | | एकूण कर्ज | |
|---|---|---|---|---|
| | गटसंख्या | रक्कम | गटसंख्या | रक्कम |
| राष्ट्रीयकृत व्यापारी बँका | ४१०८६४ | २९४२८.५६ | २७२०१० | ९२५६०.८३ |
| क्षेत्रीय ग्रामीण बँका | ९१७६२ | ७०२.८२ | २९८४२ | ११३२९.७४ |
| सहकारी बँका | २६८०६९ | २६६९५.६४ | ८३२७३ | १६४४०.४२ |
| **एकूण** | **७७०६९५** | **५६८२८.०२** | **३८४७६५** | **१२०३३०.९९** |

**स्त्रोत :** स्टेटस ऑफ मायक्रो फायनान्स इन इंडिया, २००९-१०, पृ. क्र. ८.

भारतात बचतीच्या माध्यमातून बँकेशीजोडणी झालेल्या एकूण गटांपैकी महाराष्ट्र राज्यात १२.६० टक्के गटांची जोडणी झालेली आहे. तर कर्जाच्या माध्यमातून जोडणी झालेल्या गटांचे प्रमाण ९.११ टक्के आहे. महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीयकृत व्यापारी बँकांशी सर्वात अधिक (५३.३१ टक्के) गटांची बचतीच्या माध्यमातून जोडणी झालेली आहे. तर कर्जाच्या माध्यमातून जोडणी प्रमाण (७०.७० टक्के) पर्यंत अधिक आहे. एकूण बचत करणाऱ्या गटांपैकी कर्ज उपलब्धता झालेल्या गटांचे प्रमाण सुद्धा राष्ट्रीयकृत बँकेचे सर्वाधिक आहे. क्षेत्रीय ग्रामीण बँका व सहकारी बँका यांचे गट जोडणी प्रमाण कमी आहे. शिवाय एकूण बचत करणाऱ्या गटांमध्ये कर्ज उपबल्धता झालेल्या गटांचे प्रमाण सुद्धा कमी आहे.

## १.५ शहरी स्वयंसहायता गट– बँक जोडणी

भारत हा खेड्यांचा देश असून भारतीय अर्थव्यवस्था ही 'शेतीप्रधान' आहे. नियोजन काळात शेती क्षेत्रातील उत्पादकता व उत्पादन वाढले, शेती व ग्रामीण भागात संरचनात्मक बदल झाले. मात्र जमिनधारणा सुधारणा व शाश्वत आदाने उपलब्धता या बाबतीत अपेक्षित बदल झाले नाहीत. तसेच शेती आधारित

व्यवसायांना ग्रामीण भागातच फारशी चालना मिळाली नाही. त्यामुळे २/३ शेती ही निसर्गावरील ‘जुगार’ ठरलेली आहे. परिणामी ग्रामीण लोकांच्या उत्पन्नात अपेक्षित वाढ झाली नाही, बहुसंख्य लोकांच्या उदरनिर्वाहाची पुर्तता करण्यात यश मिळाले नाही म्हणून रोजगाराच्या शोधात ग्रामीण भागातून शहरीभागात होणाऱ्या स्थलांतराचे प्रमाण वाढले. १९९१ ते २००१ या कालावधीत ग्रामीण ते शहरी भागात स्थलांतरीत होणाऱ्या व्यक्तींची संख्या ही २० दशलक्ष इतकी होती.[४१] तसेच मुलांचे शिक्षण, शहरातील झगमगाट, शॉपिंग मॉल्स, मल्टीप्लेक्स, श्रीमंतांचे ऐशआराम जीवन, स्वतंत्र जीवनपध्दती या सर्वांच्या आकर्षणातून शहरात स्थलांतरीतांचे प्रमाण वाढून शहरांचे प्रमाण व आकारमान वाढलेले आहे. १९९१ ते २००१ या कालावधीत शहरी लोकसंख्येचे प्रमाण १७.१ टक्के वरुन २७.७८ टक्के (२८५ दशलक्ष) पर्यंत वाढलेले आहे. महाराष्ट्र राज्यात हे प्रमाण ४२.४० टक्के इतके अधिक आहे. शहरी लोकसंख्येत मुस्लीम लोकसंख्येचे प्रमाण १६.९० टक्के आहे.[४२]

वाढत्या शहरीकरणामुळे शहरात वास्तव्य करणाऱ्या लोकसंख्येला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. कार्यकारी लोकसंख्येपैकी ३२.२३ टक्के लोकांनाच रोजगार मिळतो. त्यामुळे बेरोजगारीची समस्या निर्माण होते. एकूण कामकरी महिलांपैकी ८५.६ टक्के महिला असंघटीत क्षेत्रात काम करतात. फक्त ५% महिलांनाच संघटीत क्षेत्रात कायम, पगारावर काम मिळते. कामासाठी मिळणारी मजुरी कमी असते. करारानुसार ६३ टक्के पुरुष व ७९ टक्के महिला श्रमिकांना तात्पुर्त वेतन मिळते. एकूण रोजगारात २५ टक्के पुरुषांना व ६७ टक्के महिलांना घरगुती स्वरुपाचे कमी वेतनावर काम करावे लागते. त्यामुळे सुंदरम (२००१) यांच्या अध्ययनानुसार काम करणाऱ्या व्यक्तींपैकी ३१ टक्के व्यक्ती दारिद्र्य रेषेखाली व महिलांमध्ये हे प्रमाण ३५ टक्के इतके अधिक आहे.[४३]

- उन्नी आणि राणी (२००१) यांच्या अध्ययनावरुन ६५ शहरी लोकांना भांडवलाची उपलब्धता होत नाही. त्यात महिलांचे प्रमाण ७७ टक्के इतके अधिक आहे. कारण बँक सुविधा फक्त ३५.५ टक्के लोकसंख्येलाच उपलब्ध झालेल्या आहेत.[४४]

- रोजगार अभाव कमी वेतन, वित्तीय सुविधांचा अभाव यामुळे (दरमहा ४५१ रु. पेक्षा कमी उत्पन्न) २००१ एकूण शहरी लोकसंख्येत ३१ टक्के लोकसंख्या (ग्रामीण २५ टक्के) दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहेत. तर शहरी मुस्लीमांमध्ये ३५.७ टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत. [४५]

- शहरी दारिद्र्यमुळे २००१ च्या जनगणनेनुसार २४.७१ दशलक्ष व्यक्तींना घरांची उपलब्धता झालेली नाही. त्यात महाराष्ट्र राज्यात ३.७२ दशलक्ष लोकांचा समावेश आहे. हे प्रमाण देशात सर्वाधिक आहे. तर ५४ टक्के व्यक्तींना शुद्ध पाण्याच्या सुविधा व ८९ टक्के व्यक्तींकडे खासगी शौचालय व्यवस्था नाही. [४६]

- दांडेकर व रथ यांच्यामते दारिद्र्य हे झोपडपट्टी निर्माण होण्याचे सर्वात प्रमुख कारण असते. या दृष्टीने २००१ च्या जनगननेनुसार २६ राज्यातील शहरांमध्ये ५१,६८८ झोपड्यांमध्ये वास्तव्य असून त्यापैकी ५०.६ टक्के झोपडपट्या ह्या घोषित असून उर्वरित झोपडपट्यां ह्या अघोषीत (अनधिकृत) आहेत. त्यात मानवी जीवन अत्यंत दुषीत आहे. शहरी झोपडपट्टीत ४०.३ दशलक्ष पेक्षा अधिक व्यक्ती वास्तव्य करीत आहेत.

- पंडीत नेहरू यांच्यामते झोपडपट्या ह्या मानवाच्या अध:पतनाला कारणीभूत आहेत. तर डॉ. राधाकमल मुखर्जींच्या मते ''गलिच्छ वस्त्यांमध्ये राहणाऱ्या लाखो लोकांना पशुप्रमाणे जीवन जगावे लागते.'' शंकर सहाय्य आणि श्रीवास्तव यांच्या अध्ययनाद्वारे ''गुन्हेगारी, बालगुन्हे वेश्यावृत्ती, मद्यपान यांचा शहरातील झोपडपट्यांशी सापेक्ष संबंध असतो.

- शहरी भागात दारिद्र्य आणि झोपडपट्टीतील गुंडगिरी, अवैध व्यवसाय, व्यसनाधिनता, गुन्हेगारीचे प्रमाण अधिक असल्यामुळे महिलांचे जीवन अत्यंत 'हिणकस' असते. सेनगुप्ता (१९९६) यांच्यामते महिलांचे

असक्षमीकरण हे हिंसाचाराचे प्रमुख कारण असते. नैतिक अध:पतनामुळे कुटूंब विघटनाचे प्रमाण अधिक होऊन घटस्फोट, काडीमोड, सोडचिठ्ठी व वेश्या व्यवसाय यांचे प्रमाण वाढलेले असते.[४७]

- नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हेनुसार शहरी भागातील हिंदू व मुस्लीम लोकसंख्येत तुलनात्मक हिंदूंचे प्रमाण (ग्रामीण ८३.९६ टक्के, शहरी ७६.३५ टक्के) कमी आहे. तर मुस्लिमांचे प्रमाण शहरीभागात (ग्रामीण १०.५३ टक्के, शहरी १६.९० टक्के) तुलनेने अधिक आहे. साक्षरता प्रमाणहिंदू ७५.५ टक्के व मुस्लीम ६० टक्के, कामात सहभागाचा दर हिंदू ४०.४ टक्के तर मुस्लिमांमध्ये ३१.३ टक्के इतका कमी आहे. त्यामुळे मुस्लीम समाजात दारिद्रयाचे प्रमाण अधिक आहे.[४८]
- शहरी भागातील दारिद्र्य निर्मुलनासाठी १९७० मध्ये हाऊसिंग ॲण्ड अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड (हुडको) ची शासनाच्या वतीने स्वायत्त महामंडळ म्हणून स्थापना करण्यात आली. झोपडपट्टींचे प्रमाण कमी करणेसाठी गृहनिर्माण करणे हा प्रमुख उद्देश आहे. तसेच १९८९ मध्ये नेहरु रोजगार योजना सुरु करुन त्याअंतर्गत शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना त्यांचे अंगी असलेल्या कौशल्याच्या आधारे लघुउद्योजक स्थापन करणेसाठी शहरी लघुउद्योजक योजना शहरी भागातील बेरोजगार व्यक्तींना रोजगाराच्या माध्यमातून वेतन पुरविण्यासाठी आणि आर्थिक व सामाजिकदृष्ट्या उपयुक्त मालमत्ता निर्माण करणेसाठी शहरी वेतन रोजगार योजना आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना निवारा आणि गृह सुधारण्यासाठी आर्थिक सहाय्य पुरविण्याच्या हेतूने निवारा आणि गृह सुधार योजना या तीन योजना राबविण्यात येत होत्या.[४९]

सातव्या पंचवार्षिक योजनेत शहरी पायाभूत सेवा कार्यक्रम शहरी दारिद्र्य निवारणासाठी सुरु करण्यात आला. या कार्यक्रमातील सहभागी व्यक्ती यांचा अनुभव आणि राष्ट्रीय शहरीकरण आयोग यांच्या शिफारशीवरुन १९९१ मध्ये

शहरी गरिबांसाठी पायाभूत सुविधा हा कार्यक्रम राबविण्यास सुरुवात झाली. लहान शहरांमधील दारिद्र्याची समस्येची तीव्रता लक्षात घेवून १५ ऑगस्ट १९९४ ला पंतप्रधान एकात्मिक शहरी दारिद्र्य निवारण कार्यक्रम सुरु करुन १९९५ पासून दुसऱ्या स्तरातील शहरांसाठीही लागू करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत शहरातील गृह सुधारसाठी वित्तीय सहाव्य करणे, पाणी पुरवठा, शौचालय, घन कचरा विल्हेवाट, सांडपाणी इ. सारख्या आवश्यक सुविधा पुरविण्यासाठी समाज व महिलांच्या सक्षमीकरणासाठी समाज विकास संस्था निर्माण करुन त्यांच्या माध्यमातून गरिबांना लाभ पोहोचविणे हे प्रमुख उद्देश होते. मात्र मुल्यमापन पातळीवर अपेक्षित यश न मिळाल्याने हाशिम समितीच्या शिफारशी वरुन सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना सुरु करण्यात आली.[५०]

### १.५.१ सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना

डिसेंबर १९९७ पासून दारिद्र्य रेषेखालील लोकांचे राहणीमान उंचावण्यासाठी त्यांना उपजिविकेचे साधन उपलब्ध करुन देणे. सामुहिक सबलीकरणातून महिला सक्षमीकरण व महिला उद्योगातून सामुहिक दारिद्र्य निर्मुलन करणेच्या उद्देशातून ही योजना सुरु करण्यात आली. या योजनेंतर्गत (१) शहरी स्वयंरोजगार कार्यक्रम (२) शहरी महिला स्वयंसहाय्यता कार्यक्रम (३) शहरी गरिबांसाठी रोजगार व प्रशिक्षण (४) शहरी मजुरी रोजगार कार्यक्रम (५) सामाजिक संरचना विकास यंत्रणा या पाच प्रमुख घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यापैकी शहरी महिला स्वयंसहाय्यता कार्यक्रम महत्त्वपुर्ण आहे.

**सारणी क्र. १० : शहरी महिला स्वयंसहाय्यता कार्यक्रम**

| तपशिल | २००७ | २०१० |
|---|---|---|
| १. वैयक्तीक लघु उद्योजक | ८४२६६३ | ११२१८४१ |
| २. महिला लघु उद्योजक | २३७१०० | ४३४२६४ |
| **एकूण लघु उद्योजक** | **१०७९७६३** | **१५५६१०५** |

**स्त्रोत :** I:\13082012/ untitled Document mht.

शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना वैयक्तीक, सामुहिक पातळीवर लघु उद्योग, महिला स्वयंसहाय्यता गट स्थापन करुन उत्पन्न निर्मितीला चालना देता यावी आणि या माध्यमातून दारिद्र्य निर्मुलन घडवून आणणे अपेक्षित आहे.

१९९७ ते २००७ पर्यंत या कालावधीत वैयक्तीक पातळीवर ८४२६६३ लघु उद्योजकांना सहाय्य करण्यात आले. महिलांचे दारिद्र्य निर्मुलन होऊन महिला सबलीकरणासाठी स्वयंसहाय्यता गट महिला व बालके विकास गट अंतर्गत २३७१०० महिला उद्योजकांना सहाय्य झालेले आहे. प्रस्तुत अध्ययन हे महिला स्वयंसहाय्यता गट किंवा स्वयंरोजगारी गटांच्या अध्ययनाशीच संबंधीत आहे. २०१० अखेर शहरी स्वयंसहाय्यता गटाच्या स्थापनेत ४३४२६४ पर्यंत वाढ झालेली आहे.

## १.६ नाशिक जिल्ह्यातील प्रगती

नाशिक जिल्हा हा महाराष्ट्र राज्यातील एक कृषी प्रधान व औद्योगिक दृष्ट्या प्रगत जिल्हा मानला जातो. या जिल्ह्यात १९९७ पासुन स्वयंसहाय्यता गट चळवळीस सुरूवात झाली. मार्च २००२ अखेर शहरी व ग्रामीण भागात स्थापन झालेल्या स्वयंसहाय्यता गटांची एकूण संख्या २२१ होती त्यापैकी १९८ स्वयंसहाय्यता गट हे महिलांचे होते. त्यात मार्च २००६ अखेर ४८०३ होती त्यापैकी ३०१८ गट हे महिलांचे होते. २०१० अखेर एकूण स्वयंसहाय्यता गट संख्या ६१७८ पर्यंत वाढली त्यात ९०% गट हे महिलांचे आहेत.

### १.६.१ शहरी स्वयंसहाय्यता गट प्रगती

नाशिक जिल्ह्याच्या शहरीभागातील नगरपालिका व महानगरपालिका अंतर्गत सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत स्थापन होणाऱ्या महिला स्वयंसहाय्यता गटांची प्रगती....

**सारणी क्र.११ : नाशिक जिल्ह्यातील शहरी स्वयंसहाय्यता गट प्रगती (मार्च अखेर)**

| म.न.पा / न. पा. नाव | स्वयंसहाय्यता गट संख्या | |
|---|---|---|
| | २००६ | २०१० |
| १. नाशिक | ५९० | २२४८ |
| २. मालेगाव | ३७६ | १०७७ |
| ३. मनमाड | ३५ | १४५ |
| ४. नांदगांव | ५० | ७२ |
| ५. येवला | ३६ | ८२ |
| ६. सिन्नर | ६३ | ८४ |
| ७. सटाणा | ३५ | ५१ |
| ८. इगतपुरी | ०९ | ५४ |
| ९. त्र्यंबकेश्वर | ०३ | ३५ |
| १०. भगूर | ०२ | ३४ |
| **एकूण** | **११९९** | **३८८२** |

**स्त्रोत:** नाशिक जिल्हा प्रकल्प अधिकारी, घटक निहाय जिल्हा गोषवारा,२०१०, पृ. क्र. ३.

नाशिक जिल्ह्याच्या महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात असणाऱ्या महिला स्वयंसहाय्यता गटाच्या संख्येत २००६ ते २०१० या कालावधीत ११९९ वरुन ३८८२ पर्यंत वाढ झालेली आहे. नाशिक महानगरपालिकेच्या क्षेत्रात सर्वाधिक गट संख्या असून मालेगाव महानगरपालिका क्षेत्रात दुसऱ्या क्रमांकाचे गट आहेत. भगूर नगरपालिकेअंतर्गत सर्वात कमी गट संख्या आहे.

**सारणी क्र.१२ : दारिद्र्य रेषेखालील कुटूंब व लोकसंख्या (मार्च २०१०)**

| महानगरपालिका / नगरपालिका | बीपीएल कुटुंबे | बीपीएल लोकसंख्या | फिरता निधीप्राप्त गट | डवाका गट |
|---|---|---|---|---|
| १. नाशिक | ३८७३८ | १८१९११ | ८३१ | १०२५ |
| २. मालेगाव | ३५८५२ | २५०९६४ | ३०७ | ४७९ |
| ३. मनमाड | ४०३५ | १९१२६ | ४६ | ६१ |
| ४. नांदगांव | १६०९ | १०४२८ | २८ | ३६ |
| ५. येवला | १८९६ | ७९६० | १८ | २४ |
| ६. सिन्नर | १७७८ | एनए | २५ | ३३ |
| ७. सटाणा | १८७८ | ८८९२ | ३२ | ३० |
| ८. इगतपुरी | ८१९ | ४०२२ | १७ | २१ |
| ९. त्र्यंबकेश्वर | ६९६ | ३४२० | ०९ | २२ |
| १०. भगूर | ४४९ | २०३१ | १० | १२ |
| **एकूण** | **८७७४०** | **४८८७५४** | **१३२३** | **१७४३** |

**स्त्रोत :** जिल्हा प्रकल्प अधिकारी नाशिक, अहवाल, २०१०, पृ. क्र. ६.

नाशिक जिल्ह्यातील शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांची संख्या ८७७४० असून या कुटूंबामधील एकूण लोकसंख्येचे प्रमाण ४८८७५४ इतके आहे. त्यापैकी ७०% महिला दारिद्र्य रेषेखाली आहेत. शहरी भागात नासिक शहरात दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे सर्वाधिक ३८,७३८ असे असून दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींची संख्या १,८१,८९१ आहे. मात्र मालेगाव शहरात सर्वाधिक लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली आहे याचे कारण मालेगाव शहरात मुस्लीम समाजाचे बीपीएल अंतर्गत प्रमाण अधिक असून त्यांच्या कुटूंबाचा आकार मोठा असतो म्हणून मालेगाव शहरात ३५८५२ कुटूंबात २५०९६४ लोक वास्तव्य करीत आहेत. नाशिक आणि मालेगाव या दोन्ही शहरात जिल्ह्यातील एकूण शहरी दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येपैकी (४३२८५५) ८८.५ टक्के लोकसंख्या व एकूण कुटुंबापैकी (७४५९३) ८५% कुटुंबे आहेत. त्यामुळे दारिद्र्य निर्मुलनासाठी स्वयंरोजगारी गट व फिरता निधी वाटप झालेल्या गटांची संख्या याच दोन शहरात अधिक आहे. त्यामुळेच प्रस्तुत अध्ययनासाठी नाशिक व मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातील शहरी महिला स्वयंसहाय्यता गटांची निवड करण्यात आलेली आहे.

### १.६.२ नाशिक शहरातील स्वयंसहाय्यता गट बँक जोडणी

नाशिक शहरात नाशिक महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात फेब्रुवारी १९९९ पासुन सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या माध्यमातून महिला स्वयंसहाय्यता गटांची स्थापना करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत नाशिक शहरात पंचवटी समाज विकास संस्थेच्या माध्यमातून २ फेब्रुवारी १९९९ रोजी ''समता महिला बचतगट'' रजनी चिमाजी रूपवते (समुह संघटीका) यांच्या मार्गदर्शनातुन स्थापन करण्यात आला. या गटाच्या माध्यमातून महिला स्वबलीकरण चळवळीस सुरूवात झाली. नाशिक जिल्ह्यात सर्वाधीक महिला स्वयंसहाय्यता गट हे नाशिक शहरात स्थापन झालेले आहेत.

**अ) समाज विकास संस्था :** ७४ व्या घटनादुरुस्ती (१९९२) मधील १२ व्या कलमानुसार आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कार्यक्रमात

दारिद्र्य निवारणाचा अंतर्भाव केल्यामुळे दारिद्र्य निवारण्यासाठी धोरणात्मक चौकटीची निकड निर्माण झाली. त्याअंतर्गत शहरी भागातील विकासात्मक संरचनेत समाज विकास संस्था मध्यस्थ म्हणून कार्यरत आहे. प्रामुख्याने शहरी भागातील दारिद्र्य निर्मुलन आणि त्यांचे सबलीकरण घडवून आणतांना किमान २ हजार कुटूंबांसाठी एक समाज विकास संस्था कार्य करीत असते आणि किमान २०० कुटूंबासाठी एक शेजार समुह समिती कार्यरत असते.

समुहांच्या विशेषत: स्त्रिया व बालकांच्या गरजां संदर्भात प्रतिनिधीत्व करणे, विधी, विविध खाती, अधिकरणे यांच्यासमवेत परस्पर सुसंवाद साधून व संबंध प्रस्थापित करुन गरजांच्या पूर्तीतेसाठी कार्यारंभ करणे, विशेष प्रशिक्षणाची आवश्यकता शोधणे व त्याचे आयोजन करणे, आर्थिक व निवारा सुधारणा कामांसाठी लाभार्थी शोधण्यासाठी समुहाचे सर्व्हेक्षण करण्यास मदत करणे, समुहाच्या योजनांसाठी प्रस्ताव तयार करणे, शहर किंवा क्षेत्रीय स्तरावर समुहाकडून साधन सामुग्री उभारण्यास चालना देणे, दारिद्र्य निर्मुलन कक्षाशी समन्वय साधून बँकेला लाभार्थींकडून विहित वेळेत कर्जाची परतफेड केली जाण्यास मदत करणे, नागरी दारिद्र्य निर्मुलन कक्ष स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याशी सल्लामसलत करुन अल्प उत्पन्न गटाच्या क्षेत्रात वस्ती साधनसामुग्री तयार करणे हे समाज विकास संस्थेची कार्ये आहेत.

नाशिक शहरात नऊ समाजविकास संस्था स्थापन झालेल्या असुन ३८७३८ दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाना स्वयंसहाय्यता गट स्थापना व गट संवर्धनात महत्त्वपूर्ण योगदान देत आहे.

**सारणी क्र. १३ : नाशिक शहर - समाज विकास संस्थांची स्थिती**

| दारिद्रय रेषेखालील कुटुंब (संख्या) | शेजार समिती (संख्या) | समाज विकास संस्था (संख्या) | समाज विकास संस्थेची नावे |
|---|---|---|---|
| ६५८८ | ३३ | १ | नारी शक्ती विकास संस्था |
| ४०३६ | २० | १ | नवसंजीवनी विकास संस्था |
| ४४६२ | २२ | १ | पंचवटी समाज विकास संस्था |
| ३७१४ | १९ | १ | गायत्री समाज विकास संस्था |
| ३५९७ | १८ | १ | गोदावरी समाज विकास संस्था |
| ४२३६ | २१ | १ | गौतमी समाज विकास संस्था |
| २०३० | १० | १ | सुविधा समाज विकास संस्था |
| ३३३० | १७ | १ | लक्ष्य समाज विकास संस्था |
| ६७४५ | ३४ | १ | सिडको समाज विकास संस्था |
| **३८७३८** | **१९४** | **९** | |

**स्रोत :** नाशिक महापालिका, वार्षिक अहवाल, सुवर्ण जयंती विभाग, अहवाल २००१ पृ. क्र. १.

नाशिक शहरात असणाऱ्या एकूण ९ संस्थांमध्ये पंचवटी समाज विकास संस्था ही सर्वात प्रथम स्थापन झालेली आहे. सिडको समाज विकास संस्था सर्वात मोठी संस्था असून ६७४५ दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांसाठी कार्य करीत आहे. तर नारी शक्ती ही समाज विकास संस्था दुसऱ्या क्रमांकावर आहे. सुविधा समाज विकास संस्था सर्वात लहान असून २०३० कुटूंबांना सेवा प्रदान करीत आहे.

**ब) महिला व बालके विकास गट** : सुवर्ण जयंती शहरी रोजगार अंतर्गत स्थापन होणाऱ्या महिला स्वयंसहाय्यता गटांच्या विकास प्रक्रियेत ४ अवस्थांचा समावेश होतो. समाज विकास संस्थेच्या माध्यमातून समुह संघटीकांच्या द्वारे दारिद्र्य रेषेखालील महिलांना विशिष्ट संख्येत एकत्र (१० ते २० महिला) करुन त्यांच्या समस्या, हक्क, कर्तव्य याबाबत सुरुवातीच्या ६ महिन्यात फक्त चर्चा घडवून आणली जाते. महिलांची मानसिकता बदलविणे, मानसिकता घडविण्याच्या प्रक्रियेवर भर देणाऱ्या समुहास स्वयंसहाय्यता गट म्हटले जाते. ही गटाची प्राथमिक अवस्था असते. स्वयंसहाय्यासाठी मन व्यवहारात सक्षम (मनाची तयारी) झालेल्या महिलांच्या समुहास नाव देवून गटाची आचारसंहिता बनविली जाते. गटांच्या नावाने बँकेत बचत खाते उघडून गटांची बचतीसाठी बँकेशी जोडणी

केली जाते. अशा गटांना महिला बचत गट किंवा काटकसर गट म्हटले जाते या अवस्थेत सुरुवातीच्या मन व्यवहारास धनव्यवहाराची जोड दिली जाते. अशा पध्दतीने एक वर्ष आर्युमान असणाऱ्या गटांना प्रतिसदस्य १००० रुपये प्रमाणे शासनाकडून अंतर्गत व्यवहारासाठी फिरता निधी पुरविला जातो. अशा गटांना 'अल्प पत गट' म्हटले जाते आणि साधारणत: १८ महिने आर्युमान असणाऱ्या ज्या गटांमध्ये अंतर्गत कर्जाच्या देवाण घेवाणीचे व्यवहार सुरळीतपणे पार पडतात, गटातील महिला एकजीव होवून वैयक्तीक किंवा सामुहिक पातळीवर स्वयं व्यवसाय करण्यासाठी सक्षम होतात अशा गटांना 'शहरातील महिला व बालके विकास गट किंवा स्वयंरोजगारी गट' म्हटले जाते. कारण या अवस्थेत कुटूंबातील महिला व बालके यांच्या विकासासाठी मिळणाऱ्या उत्पन्नाचा अधिक उपयोग करणे अपेक्षित असते. या अवस्थेतील गट हे महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणाचे माध्यम ठरतात. मात्र गट कोणत्याही अवस्थेत असला तरी त्यास स्वयंसहाय्यता गट किंवा बचत गट या नांवाने ओळखले जाते.

नाशिक शहर हे औद्योगिक दृष्ट्या एक प्रगत शहर म्हणून ओळखले जाते. मात्र बहुसंख्य व्यक्तींना प्रामुख्याने महिलांना औद्योगिकीकरणाचा लाभ मिळाला नाही. अशा दारिद्र्य रेषेखालील महिलांना स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातुन स्वयंरोजगारासाठी संधी उपलब्ध करून दिली जाते. स्वयंसहाय्यता गटाला स्वत:चा व्यवसाय स्थापन करून उद्योजकता कौशल्य, उत्पन्न, नफा वाढविता येतो. या दृष्टीने नाशिक शहरात कार्यरत असणाऱ्या महिला स्वयंसहाय्यता गटांची स्थिती लक्षात घेणे गरजेचे आहे.

**सारणी क्र. १४ : नाशिक शहर : महिला व बालके विकास गटांची वाटचाल**

| वर्ष | महिला गट संख्या | सभासद संख्या | एकूण पत पुरवठा (रूपये) |
|---|---|---|---|
| २००० - २००१ | ०७ | ७९ | ४००००० |
| २००१ - २००२ | ७० | ७८० | २५५४९०० |
| २००२ - २००३ | १०२ | ११०३ | ४८५४७०० |
| २००३ - २००४ | ७० | ७७८ | ३१५०२८० |
| २००४ - २००५ | ९३ | ९९० | ४६५०८५० |
| २००५ - २००६ | ७१ | ९९८ | ४३४७१५० |
| २००६ - २००७ | ५५ | ५७२ | ४१९७८३६ |
| २००७ - २००८ | १७७ | १९४५ | १४५५८५९८ |
| २००८ - २००९ | १८६ | २०५५ | १७६६४२०० |
| २००९ - २०१० | १९४ | २१४८ | १३१७४००० |
| **एकूण** | **१०२५** | **११४४८** | **६९५५२५१४** |

**स्रोत :** नाशिक महानगरपालिका, सुवर्ण जयंती विभाग, वार्षिक अहवाल, २०००–१०, पृ.क्र. ७.

नाशिक महानगरपालिकेच्या कक्षेत दारिद्र्यरेषेखालील महिलांमध्ये उद्योजकतेची बीजे रूजवुन त्यांना स्वावलंबी बनविण्याच्या हेतुन २०००–०१ पासुन स्थापन होणाऱ्या स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातुन प्रयत्न केले जात आहेत. २०००–०१ ते २००९–१० या दहा वर्षात स्वयंरोजगारी गटांची संख्या ०७ वरून १०२५ पर्यंत वाढलेली आहे. प्रामुख्याने २००१–०२ या वर्षापासुन या गटांच्या स्थापनेला अधिक गती मिळाली. त्यामुळे नमुद केलेल्या दहा वर्षात प्रत्येक कुटूंबातील एक महिला या प्रमाणे ११४४८ कुटूंबातील महिलांना ६,९५,५२,५१४ रूपयाचे अर्थसहाय्य बँकांकडून प्राप्त झालेले आहे. म्हणजे वैयक्तीक पत नसणाऱ्या महिलांना समुहाच्या पत आधारावर कोट्यावधी रूपयाचे कर्ज मिळालेले आहे. याचा अर्थ बँक व समाजाच्या पातळीवर महिलांची पत वृद्धीगंत झालेली आहे. कारण प्रत्येक गटाला सरासरी ६७,८५६.११ रूपयाचे सुक्ष्मवित्त प्राप्त झालेले आहे.

### १.६.३ मालेगाव शहरातील महिला स्वयंसहाय्यता गट– बँक जोडणी

मालेगाव शहरात मालेगाव महानगरपालिकेच्या अंतर्गत सुवर्ण जयंती शहरी रोजगार विभागाची स्थापना डिसेंबर १९९७ मध्ये करण्यात आली. या विभागाच्या वतीने सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत

मालेगाव शहरात २१ डिसेंबर १९९७ रोजी समुह संघटीका शबाना शेख यांच्या मार्गदर्शनाखाली 'इंदिरा गांधी महिला बचत गट' या नावाने स्थापन करण्यात आला. हा बचतगट मालेगाव शहरातील महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणाचा पहिला साक्षीदार ठरला. त्यानंतर मात्र स्वयंसहाय्यता गट स्थापनेच्या सर्व प्रक्रियेला गती मिळून प्रगतीचा आलेख चढत्या स्वरुपाचा आहे.

**अ) समाज विकास संस्था :** शहरातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील व्यक्तींना प्रामुख्याने स्त्रियांना रोजगार व त्या माध्यमातून अर्थाजन मिळवून देण्याच्या उद्देशाने सहाय्य करणाऱ्या समाज विकास संस्थांची स्थापना करण्यात येते. मालेगाव शहरात नऊ समाज विकास संख्या कार्यरत आहेत.

**सारणी क्र. १५ : मालेगाव शहर - समाज विकास संस्थांची स्थिती**

| दारिद्र्य रेषेखालील कुटुंब (संख्या) | शेजार समिती (संख्या) | समाज विकास संस्था | समाज विकास संस्थेची नावे |
|---|---|---|---|
| ३९८३ | ०६ | १ | नम्रता समाज विकास संस्था |
| ३९८३ | ०५ | १ | संगम समाज विकास संस्था |
| ३९८५ | ०८ | १ | एकता समाज विकास संस्था |
| ३९८५ | ०८ | १ | सहारा समाज विकास संस्था |
| ३९८३ | ०८ | १ | अमन समाज विकास संस्था |
| ३९८२ | ०७ | १ | रौनक समाज विकास संस्था |
| ३९८५ | ०९ | १ | साहिल समाज विकास संस्था |
| ३९८३ | ०८ | १ | मिलन समाज विकास संस्था |
| ३९८३ | ०७ | १ | मोती समाज विकास संस्था |
| **३५८५२** | **६६** | **९** | **एकूण** |

**स्त्रोत :** मालेगाव महानगरपालिका सुवर्ण जयंती विभाग वार्षिक अहवाल. पृ.क्र. २

मालेगाव शहरात असणाऱ्या नऊ विकास समाज विकास संस्थांपैकी एकता, सहारा आणि साहिल या समाज विकास संस्था सर्वात मोठ्या संस्था असून प्रत्येकी ३९८५ दारिद्र्य रेषेखालील कुटूंबासाठी कार्य करीत आहेत. तर संगम, अमन, मिलन व मोती या समाज विकास संस्था दुसऱ्या क्रमांकाच्या संस्था आहे. रौनक समाज विकास संस्था सर्वात लहान संस्था आहे. यासर्व समाज विकास संस्था शहरातील ३५८५२ दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांना स्वयंसहाय्यता गट स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. शहरात ६६ शेजार समित्या स्थापन झालेल्या आहेत.

**ब) महिला व बालके विकास गट :** ज्या महिला स्वयंसहाय्यता गटांचे स्वयंरोजगारी गटांत रुपांतर होते अशा गटातील महिलांना दिर्घकालीन उत्पन्न निर्मितीसाठी वैयक्तीक किंवा सामुहिकपणे स्वयंव्यवसाय स्थापन करता येतो. त्यामुळे स्वयंसहाय्यता गटाची ही अवस्था महिलांच्या आर्थिक सबलीकरणास सहाय्यक ठरणारी असते. या दृष्टीने मालेगाव शहरातील स्वयंसहाय्यता गटांची स्थिती.

**सारणी क्र. १६ : महिला व बालके विकास गटांची वाटचाल**

| वर्ष | महिला गट संख्या | सभासद संख्या | एकूण पत पुरवठा (रूपये) |
|---|---|---|---|
| २००० - २००१ | - | - | - |
| २००१ - २००२ | ०१ | १० | ६०००० |
| २००२ - २००३ | ०५ | ५२ | ३३०००० |
| २००३ - २००४ | ०६ | ६८ | ३७२००० |
| २००४ - २००५ | ४४ | ४७८ | २७५०४८० |
| २००५ - २००६ | ५३ | ५८८ | ४४८५७५० |
| २००६ - २००७ | ३० | ३४२ | ५५१६६६० |
| २००७ - २००८ | ९१ | ९९५ | ८५८४००० |
| २००८ - २००९ | ९७ | १०४२ | ९७२९००० |
| २००९ - २०१० | १५२ | १६९१ | १३५२४००० |
| **एकूण** | **४७९** | **५२६६** | **४५३५१४१०** |

**स्त्रोत :** मालेगाव महानगरपालिका, सुवर्णजयंती विभाग वार्षिक अहवाल १९९७ ते २०१०, पृ.क्र.३.

मालेगाव शहरात स्वयंरोजगारी गटांच्या निर्मितीस २००१–०२ पासून सुरुवात झालेली आहे. परंतु खऱ्या अर्थाने २००४–०५ पासून स्वयं व्यवसायाची गटांच्या प्रगतीस चालना मिळाली. २००९–१० अखेर शहरात ४७९ गट स्वत:च्या व्यवसाय कार्यरत असून त्याचा लाभ शहरातील ५२६६ दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांना मिळत आहे. बँकांच्या लेखी ज्या महिलांनी पत 'शुन्य' होती. त्याच बँकांनी ४५३.५१ दशलक्ष रुपयाचे सुक्ष्म वित्त पुरवठा केलेला आहे. महिलांच्या आर्थिक सबलीकरणास सहाय्य ठरत आहे.

**क) नाशिक व मालेगाव शहरातील महिला स्वयंसहाय्यता गट–तुलनात्मक स्थिती :**नाशिक आणि मालेगाव शहरातील स्वयंसहाय्यता गटांच्या अनुषंगाने तुलनात्मक विचार केला असता.

१) नाशिक आणि मालेगाव या दोन्ही शहरात दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाची संख्या नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक असून नाशिक शहरात ३८,७३८ कुटूंबे तर मालेगाव शहरात ३५,८५२ कुटूंबे दारिद्र्य रेषेखाली आहेत म्हणजे नाशिक शहरात दारिद्र्य रेषेखालील कुटूंबे मालेगाव शहरापेक्षा अधिक आहेत.

२) नाशिक शहरात दारिद्र्य रेषेखालील कुटूंबात वास्तव्य करणाऱ्या दरिद्री व्यक्तींची संख्या १,८१,८९१ असून मालेगाव शहरात दरिद्री व्यक्तींची संख्या २,५०,९६४ इतकी आहे. या दोन्ही शहरात एकूण दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींपैकी ८८.५ टक्के लोक वास्तव्य करतात. मालेगाव शहरात हे प्रमाण नाशिक शहरापेक्षा अधिक आहे.

३) नाशिक शहरात २०००–०१ पासून महिला स्वयंसहाय्यता गट स्थापनेस सुरुवात झाली तर मालेगाव शहरात २००१–०२ पासून सुरुवात झाली.

४) मार्च २०१० अखेर नाशिक व मालेगाव शहर मिळून एकूण १५०४ महिला स्वयंसहाय्यता गटांची स्थापना झालेली आहे. या गटांच्या माध्यमातून दोन्ही शहरात १६,७१४ दारिद्र्य रेषेखालील महिला लघु कर्ज प्राप्तीद्वारे बँक व्यवहारांच्या मुख्य प्रवाहात आलेल्या आहेत.

५) मार्च २०१० अखेर नाशिक या हिंदू बहुल शहरात १०२५ महिला स्वयंसहाय्यता गट स्थापन होऊन ३८,७३८ दारिद्र्य रेषेखालील कुटूंबापैकी ११,४४८ कुटूंबातील महिलांची लघु कर्जाची माध्यमातून बँकेशी जोडणी झालेली आहे. बँक जोडणी प्रमाण २९.६० टक्के इतके आहे. तर मालेगाव या मुस्लिम बहुल शहरात ४७९ महिला स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून ३५,८५२ दारिद्र्य रेषेखालील कुटूंबापैकी ५,२६६ कुटूंबांची लघुकर्ज माध्यमातून बँकेशी जोडणी झालेली आहे. हे बँक जोडणी प्रमाण फक्त १४.७० टक्के आहे. म्हणजे मालेगाव शहरात दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींची प्रामुख्याने महिलांची

संख्या अधिक असूनही नाशिक शहराच्या तुलनेत बँक जोडणीचे प्रमाण मोठ्या फरकाने कमी आहे.

६) महिला स्वयंसहाय्यता गट – बँक जोडणीचे प्रमाण नाशिक शहरात मालेगाव शहराच्या तुलनेत अधिक आहे. म्हणजे महिला स्वयंसहाय्यता गटांच्या संख्यात्मक वाढ मालेगाव शहरात कमी आहे.

अशा पार्श्वभूमीवर नाशिक आणि मालेगाव शहरातील महिला स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून होणाऱ्या महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरण कितपत घडून येत आहे. दोन्ही शहरात सबलीकरणाबाबत तफावत आहे काय? सबलीकरणावर प्रभाव पाडणारे घटक कोणते? आणि प्रभावी सबलीकरणाबाबत शिफारशी सुचविण्याच्या हेतुने प्रस्तुत अध्ययन हाती घेण्यात आले होते.

## संदर्भ


[१] महाजन मुकूंद, जुन २०१० ''भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास'', निराली प्रकाशन, पुणे, पृ.क्र. १.३

[२] गुप्ता कमलेशकुमार, २००५ ''महिला सशक्तीकरण'' बुक एनक्लेव्ह, जयपूर, पृ.क्र. १३५

[३] http://www.urbanpovertyalleviation.Data Bing.

[४] पाटील शोभा, २००७, ''स्त्रीवादी विचार आणि समिक्षेचा मागोवा'' स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, पृ.क्र. २३ ते ३१

[५] धोंडगे अश्विनी, २००३, ''स्त्री-पुरुष'' दीपराज प्रकाशन, पुणे. पृ.क्र. १३४

[६] Ministry of Finance & Dept of Economic Affairs : Govt of India, Economic Survey 2009-10, Oxford University Press. P.No. 273.

[७] जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, १९७६, ''मराठी विश्वकोष'', खंड– ४, मुंबई, पृ.क्र. ८७७

[८] मुलाणी एम.यु., २००८ ''अल्पबचत नियोजन'' (बचत गट), डायमंड पब्लिकेशन, पुणे– ३०, पृ.क्र. ०५.

[९] PDF Trickle down economics, wikipedia the free encyclopedia & Trickle up effects wikipadia the free encyclopedia.

[१०] Sahay Sushma, 1998 "Women And Empowerment: Approaches And Strategies", Discovery Publishing House, New Delhi. P.No.73 to 75.

[११] Simple.wikipedia.org/wiki/Stone_age

[१२] Lazar Daniel, 2009, "Microfiance : Performance Evaluation and Enterprise Development," Allied Publisher Pvt. Ltd. Chennai. P.No. 1 to 2

[१३] The History Microsoft Office word Document, Research Paper entitled "The History concepts and Theories of SHGs" from an international prespective, by Tomofumi oka. P.No. 1 to 2.

[१४] Journal of Commerce & Management through, July- 2010, P.No. 288 & 289.

[१५] गोडबोले गोविंद, २००९ ''बचत गटांच्या माध्यमातून गरिबीमुक्त विश्वाची निर्मिती'' साकेत प्रकाशन प्रा.लि. पुणे. पृ.क्र. ६० ते ६५.

[१६] Microfinance world, Jan.- Mar., 2010, The Indian Express Limited, Mumbai P.No. 15.

[१७] http:/www.en.wikipedia.org or Rigveda-wikipadia the free encyclopedia.

[१८] असोशिएशन ऑफ इकॉनॉमिस्टस, ''अर्थवाहिनी'', भारतातील स्वयंसहाय्यता गट : पार्श्वभूमी व वाटचाल, लेख सानप आणि लाटे, पृ.क्र. १०४ ते १०५.

[१९] PDF Adobe Acrobat 7.0 Document, SHG Maharashtra, P.No. 03.

[२०] PDF Adobe Acrobat, india%20SHGs%20full%206, Dr. Deshmukh Joy, "Women SHG's in Andhra Pradesh. P.No. 08

[२१] Ibid 16, P. No. 13

[२२] Ibid 15, P.No. 13

[२३] Ibid 16, P.No. 14.

[२४] Deo Malvika, 2009, "Microfiance : Performance Evaluation and Enterpriese Development", Pondichery University P.No. 3 to 6.

[२५] http://www.planningcommission.nic.in

[२६] PDF. SHGs keystone paper, Reddy C.S., 2005, Self Help Group: A Keystone of Microfiance in India Women empowerment & social security, P.No. 14 to 16.

[२७] PDF. Progress under Microfinance highlights. P.No. 10.

[२८] Journal of Commerce and Management Through. April 2010, Microfinance A tool- by Mangala A Subadra, P.No. 170.

[२९] http://www.indianmuslim.in

[३०] जोशी प्रभाकर, २००२, ''भारताचा आर्थिक ताळेबंद : नव्या शतकातील आव्हाने'', ग्रंथाली प्रकाशन, दादर मुंबई– ०२८, पृ.क्र. २४ ते २८.

[३१] http://www.globalenvision.org.

[३२] Kanani G.P.,2011, "Microfinance:Global Scenario", vital Publication, Jaipur, P.N.02

[३३] दैनिक सकाळ, नाशिक आवृत्ती, 'गरिबीला भुतकाळात गाडा', १८ नोव्हेंबर २००७, पृ.क्र. ०३.

[३४] National Council of Applied Economic Research, Final Report- 2009.

[३५] Status of microfinance in India-2008-09, NABARD Report.

[३६] Mahmad Hussain, 2011, "Islamic Banking And Finance" P.No. 159 to 164.

[३७] Ibid 36, P.No. 159.

[३८] Ibid 32, P. No. 107.

[३९] PDF Adobe Acrobat Document Research Report. 1998-2008. Waddiale, slum women empowered by saving credit programme, P. No. 109.

[४०] नियोजन मंडळ, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, योजना, मार्च २००८, पृ.क्र. ३१

[४१] http://www.im4change.org/law.

[४२] http://www.wateraid.org/india.

[४३] Bing: Estimated male and female. http://www.indiaseminor.com.

[४४] http://www.531jeemolunniandumarani.

[४५] Bing: Poor Population in India 2001.

[४६] Housing for urban poor. Indian current Affairs. http://www.indiacurrentaffairs.org

[४७] मुगडे वि.स., २०००, ''पुणे शहरातील झोपडपट्टीवासियांची सामाजिक व आर्थिक पाहणी'' पीएच.डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे - ३७.

[४८] http://www.planningcommission.nic.in/plans.

[४९] Ibid 39, P. No. 115.

[५०] http://www.planningcommission.nic.in.

प्रकरण २

# संशोधन प्रणाली

## २.१ प्रस्तावना

हजारो वर्षांपासून मानव हा सतत नवीन ज्ञान मिळवण्यासाठी व जुन्या ज्ञानाचे परिक्षण करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. ज्या गोष्टीबद्दल तो अनभिज्ञ असतो अशा गोष्टींविषयी ज्ञान मिळविण्यासाठी व त्यातील सत्य शोधण्यासाठी एका विशिष्ट पध्दतीचा वापर करीत असतो त्यास संशोधन प्रणाली / पध्दती म्हटले जाते. प्रामुख्याने संशोधनात वैज्ञानिक पध्दतीचा वापर केला जातो. कारण तथ्यांचे क्रमबध्द निरीक्षण, वर्गीकरण आणि निर्वाचन करुन निष्कर्ष मांडणे हे वैज्ञानिक पध्दतीद्वारेच शक्य असते. त्यामुळे सामाजिक संशोधनात या पध्दतीचा वापर केला जातो. ''सामाजिक घटना आणि समस्या याबाबत नवीन ज्ञान प्राप्तीसाठी करण्यात येणाऱ्या व्यवस्थित संशोधनास सामाजिक संशोधन म्हणतात.''[१]

संशोधन विषयाच्या अनुषंगाने  नासिक जिल्ह्याच्या नासिक व मालेगाव शहरातील महिलांचे आर्थिक व सामाजिक सबलीकरणाचे तुलनात्मक अध्ययन करण्यात आलेले आहे. प्रस्तुत संशोधन हे नमुना सर्वेक्षणावर आधारित आहे. त्यासाठी नासिक व मालेगाव शहरातील महिला स्वयंसहाय्यता गटांची नमुना म्हणून निवड करुन तथ्य संकलीत करण्यात आलेले आहे. तथ्य संकलीत करतांना प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. मिळालेल्या तथ्यांचे वर्गीकरण करुन संख्याशास्त्रीय विश्लेषणासाठी तालिकाकरण करण्यात आले. संख्याशास्त्रीय माहितीचे विश्लेषण करुन निष्कर्ष व उपाययोजना मांडण्यात आलेल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणात संशोधनासाठी निवडलेल्या विषयाचे महत्त्व संशोधनात उपयोगात आणलेल्या व्याख्या, संशोधनामागील उद्दिष्ट्ये, संशोधनासाठी गृहित मानलेल्या परिकल्पना, संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या माहितीचे संकलन,

माहिती संकलनासाठी उपयोगात आणलेल्या माहिती संकलनाचे स्त्रोत, संकलित माहितीचे विश्लेषण, प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती व संशोधन करतांना आढळून आलेल्या अडचणी या बाबींची मांडणी करण्यात आलेली आहे. तसेच अध्ययन विषयाचा आकृतीबंध प्रकरण निहाय मांडलेला आहे.

## २.२ संशोधन विषय निवड

''नाशिक जिल्ह्यातील शहरी महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणाचे अध्ययन'' (विशेष संदर्भ– मालेगाव व नासिक शहरातील स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून होणाऱ्या महिला सबलीकरणाचे तुलनात्मक अध्ययन'') .

गरिबांचे विशेषत: गरिब महिलांचे अस्तित्व मान्य करुन त्यांना सक्षम होण्याचा आणि निकोप जीवन जगण्याचा हक्क आहे. लघुवित्त हे त्या ध्येयाकडे जाण्याचे साधन आणि स्वयंसहाय्यता गट हे ध्येय साध्य करण्याचे माध्यम असल्याचे डॉ. मोहम्मद युनूस यांनी बांगला देशात टोकाची गरिबी असणाऱ्या लाखो महिलांना गरिबी मुक्त करुन सिद्ध केलेले आहे.[२] गरिबीच्या ऐतिहासिक सातत्यास छेद देवून त्यांच्या सबलीकरणासाठी भारतासह जगभरातील अनेक देशात स्वयंसहाय्यता गट हे माध्यम स्विकारण्यात आलेले आहे. नाशिक जिल्ह्याच्या नाशिक व मालेगाव शहरात सुद्धा महिला स्वयंसहाय्यता गट स्थापन करण्यात येत आहेत. या दोन्ही शहरातील स्वयंसहाय्यता गट महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणात कितपत यशस्वी झालेले आहेत याचे अध्ययन करणे नाशिक जिल्हा ही कर्मभूमी असल्यामुळे आणि मालेगाव ही जन्मभूमी असल्याने आवश्यक वाटले. तसेच यापुर्वी शहरी स्वयंसहाय्यता गटांच्या संबंधात संशोधन करण्यात आले नाही. त्यामुळे हे संशोधन यापुढील संशोधनास उपयुक्त ठरु शकेल असा विश्वास असल्यामुळे प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली.

## २.३ संशोधन विषयाचे महत्त्व

महाराष्ट्र राज्यातील नाशिक व मालेगाव हे वेगळी पार्श्वभूमी असणारी वैशिष्ट्यपुर्ण शहरे आहेत. मालेगाव शहर हे मुस्लिम बहुल शहर असुन सामाजिक व आर्थिक विकासावर जात, धर्म व धार्मिकता यांचा प्रभाव अधिक आहे. त्यामुळे शहरात धर्मावर आधारित हिंदू– मुस्लीम जातीय दंगली, असुरक्षिततेमुळे उद्योग व्यवसायांचा अभाव, बेरोजगारीचे वाढते प्रमाण, झोपडपट्टीचे वाढते प्रमाण, गुन्हेगार प्रवृत्तीचे प्राबल्य अशा समस्यांमुळे दारिद्र्याचे प्रमाण अधिक आहे. नाशिक शहर हे रामायण काळापासून धार्मिक वारसा लाभलेले हिंदू बहुल शहर आहे. औद्योगिकरणाचे प्रमाण अधिक असूनही झोपडपट्टीत राहणाऱ्या दारिद्र्य रेषेखालील महिलांचे प्रमाण अधिक आहे. प्रामुख्याने या दोन्ही शहरातील महिलांची सामाजिक व आर्थिक स्थिती अत्यंत दयनीय आहे. तसेच नाशिक जिल्ह्याच्या शहरी भागात नाशिक आणि मालेगाव या दोन शहरातच महिला स्वयंसहाय्यता गटांची संख्यात्मक प्रगती अधिक आहे. जिल्ह्याच्या इतर शहरांमध्ये महिला स्वयंसहाय्यता गटांची प्रगती अध्ययनासाठी अपुरी ठरणारी आहे. शिवाय नासिक जिल्ह्यात नासिक आणि मालेगाव या दोन शहरासाठीच महानगरपालिका आहेत त्यामुळे या दोन शहरातील महानगरपालिका क्षेत्रात स्थापन झालेल्या महिला स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून होणाऱ्या महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणाचे अध्ययन उपयुक्त ठरणारे आहे. भारतात स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून होणाऱ्या महिला सबलीकरणाबाबत अनेक संशोधकांनी अध्ययन करुन निष्कर्ष मांडलेले आहेत. मात्र झालेली अध्ययने ही ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता गटांच्या संदर्भात आहेत. शहरी भागातील स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून होणाऱ्या महिला सबलीकरणाच्या अध्ययनाकडे दुर्लक्ष झालेले आहे. तसेच महिला सबलीकरणाबाबत आतापर्यंत झालेल्या संशोधनात दोन शहरातील महिलांच्या सबलीकरणाचे तुलनात्मक अध्ययन झालेले आढळून आलेले नाही. नाशिक व मालेगाव या दोन्ही शहरातील महिलांच्या रुढी– परंपरा, वैचारिकता, कौटुंबिक स्थिती, सामाजिक वातावरण,

धार्मिकता यात भिन्नता असल्यामुळे आर्थिक व सामाजिक सबलीकरणात असणारी तफावत सबलीकरणावर प्रभाव पाडणारे घटक, सबलीकरणात अडथळे ठरणारे घटक, याचे अध्ययन करुन सबलीकरण चळवळीस अधिक गती मिळण्यासाठी उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत.

## २.४ संशोधनाची उद्दिष्ट्ये

सामाजिक संशोधनाचा उद्देश हा ज्ञानाची प्राप्ती करणे, विद्यमान सिध्दांताचे परीक्षण करणे किंवा दोन चलातील सहसंबंध वेगळ्या पार्श्वभूमीवर स्पष्ट करणेचा असतो. संशोधनाची उद्दिष्टे ही संशोधकाचे संशोधन विषयक कार्य सुनियंत्रीत पध्दतीने करण्यासाठी दिशा निर्देशक म्हणून कार्य करतात. प्रस्तुत संशोधनाद्वारे महिलांचे सबलीकरण व स्वयंसहाय्यता गट यांच्यातील सहसंबंध स्पष्ट करण्याची प्रमुख उद्दिष्ट्ये ......

१. स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून होणाऱ्या महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सबलीकरणाचा शोध घेणे.
२. महिला सबलीकरणाबाबत दोन शहरातील गटवार कामगिरीची तुलना करणे.
३. महिलांच्या सबलीकरणावर प्रभाव टाकणाऱ्या घटकांचा शोध घेणे.
४. महिलांच्या सबलीकरणाबाबत असणाऱ्या समस्या शोधून काढणे.
५. महिलांच्या प्रभावी सबलीकरणासाठी उपाययोजना सुचविणे.

## २.५ संशोधन परिकल्पना

वैज्ञानिक पध्दतीने कोणत्याही विषयाचे अध्ययन करण्यासाठी संशोधकास त्या विषयाचे पुर्वज्ञान आणि अनुभव असणे आवश्यक असते. संशोधन करतांना पुर्वज्ञान व अनुभव हा संशोधनात वस्तुनिष्ठता आणण्यासाठी उपयुक्त ठरतो. पुर्वज्ञान व अनुभवाच्या आधारे परिकल्पना किंवा गृहितके मानले जातात. ''दोन किंवा अधिक चलांच्या कार्यकारण संबंधाचे परिक्षण योग्य विधान म्हणजे

संशोधन परिकल्पना होय''[३] सामाजिक संशोधनात एखाद्या घटनेच्या दोन किंवा दोनापेक्षा अधिक चलांमध्ये आढळणाऱ्या सह संबंधाबाबत संशोधनकर्ता जे अनुमान काढतो ती संशोधनाची परिकल्पना असते. प्रस्तुत संशोधनासाठी (स्वयंसहाय्यता गट माध्यम आणि महिला सबलीकरण साध्य) संशोधकाने पुढील परिकल्पना विचारात घेतलेल्या आहेत.

१. स्वयंसहाय्यातून स्वत:चे व गटाचे उत्पन्न वाढविता येते.
२. स्वयंसहाय्यता गटातील सहभागामुळे हक्क प्राप्तीची क्षमता वाढते.
३. स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक व सामाजिक सबलीकरण घडून येते.

## २.६ संशोधनविषयक तथ्य संकलन

कोणत्याही संशोधनासाठी संशोधकाला प्रथम तथ्यांचे संकलन करावे लागते. तथ्य संकलनातून मिळालेल्या माहितीच्या व आकडेवारीच्या सहाय्याने उद्दीष्टांचे विश्लेषन करून परिकल्पनांचे परिक्षण करता येते. प्रस्तुत संशोधनासाठी तथ्य संकलीत करण्यासाठी संशोधकाने पुढील पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

### २.६.१ नमुना निवड

प्रस्तूत संशोधन हे सर्वेक्षण पद्धतीशी संबंधीत असल्यामुळे संपुर्ण अध्ययन विषयाचे समष्टी सर्वेक्षण करणे अशक्य होते. सदर संशोधन नियोजित कालावधीत पूर्ण करता यावे यासाठी नमुना सर्वेक्षण करण्याचे निश्चित केले.

अध्ययन विषयाशी संबंधीत नाशिक जिल्ह्यात दहा शहरांपैकी नाशिक व मालेगाव शहर हे सर्वात मोठे व विकसनशील आणि दारिद्रय व धार्मिकतेचा पगडा अधिक असणारी शहरे आहेत. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत या दोन्ही शहरात महिलांचे दारिद्र्य व सबलीकरणाशी संबंधीत असणारे महिला स्वयंहाय्यता गट स्थापन झालेले आहे. नाशिक जिल्ह्याच्या एकूण दहा शहरांपैकी नाशिक व मालेगाव शहरात जिल्ह्यातील एकूण शहरी गटांपैकी ८८.५८% गट

कार्यरत आहेत त्यामुळे नाशिक व मालेगाव शहरातील महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणाचे अध्ययन करण्यासाठी २२६ महिला स्वयंसहाय्यता गटांची नमुना सर्वेक्षणासाठी निवड करण्यात आलेली आहे.

### २.६.२ नमुना निवडीचा आकृतीबंध

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र असणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील एकूण दहा शहरात ३८८१ महिला स्वयंसहाय्यता गट स्थापन झालेले आहेत. त्यापैकी नाशिक शहरात २२४८ व मालेगाव शहरात १०७७ महिला स्वयंसहाय्यता गट आहेत. मात्र महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणाचे अध्ययन करण्यासाठी ज्या महिला स्वयंसहाय्यता गटांचे महिला व बालके विकास गटात रूपांतर झालेले आहे. याच गटांना महिला स्वयंरोजगारी गट असेही म्हटले जाते. खऱ्या अर्थाने आर्थिक व सामाजिक सबलीकरणासाठी सहाय्यक ठरणारी अवस्था असते म्हणून या गटांना स्वयंसहाय्यता गट म्हणून संबोधले जाते. अशाच गटांची अध्ययनासाठी निवड करण्यात आली आहे. नाशिक शहरात असे एकूण १०२५ व मालेगाव शहरात ४७९ गट आहेत. त्यापैकी नमुना निवड करण्यात आलेल्या गटांची संख्या सारणीत दर्शविल्याप्रमाणे आहे.

**सारणी क्र. १७ : नमुना निवडीचा आकृतीबंध**

| अ. नं. | तपशिल | एकूण गट संख्या | नमुना निवड गट संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक जिल्हा (२+३) | १५०४ | २२६ | १५ |
| २ | नाशिक शहर | १०२५ | १५४ | १५ |
| ३ | मालेगाव शहर | ४७९ | ७२ | १५ |

**स्त्रोत :** नाशिक व मालेगाव शहर, मनपा अहवाल (मार्च २०१०)

नाशिक जिल्ह्यातील नाशिक व मालेगाव ह्या दोन्ही शहर मिळून एकूण १५०४ महिला स्वयंसहाय्यता गट स्थापन झालेले आहेत. एकूण गटांपैकी १५ टक्के म्हणजे २२६ गटांची नमुना म्हणुन निवड करण्यात आलेली आहे. नाशिक शहरातुन

१०२५ गटांपैकी १५४ व मालेगाव शहरातून ४७९ गटांपैकी ७२ महिला स्वयंसहाय्यता गटांची निवड करण्यात आलेली आहे.

### २.६.३ नमुना निवडीचा प्रकार

समग्रातील एककांना नमुन्यामध्ये निवडून येण्याची संभाव्यता आहे किंवा नाही या आधारावर नमुना निवड पध्दतीचे संभाव्यता नमुना निवड व गैरसंभाव्यता नमुना निवड असे दोन प्रमुख प्रकार पडतात. या दोन प्रमुख प्रकारांचे अनेक उपप्रकार पडतात.

नाशिक व मालेगाव शहरात १९९७ पासुन महिला स्वयंसहाय्यता गट स्थापन होण्यास सुरूवात झाली आहे. मात्र २०००–२००१ नंतर महिला स्वयंरोजगारी गटांना चालना मिळाली. त्यामुळे अध्ययनासाठी नमुना निवड करतांना २०००–०१ ते २००९–१० या कालावधीत स्थापन झालेल्या महिला स्वयंरोजगारी गटांची सर्वेक्षणासाठी निवड करण्यात आली.

प्रस्तुत अध्ययनासाठी संभाव्यता नमुना निवड पध्दतीअंतर्गत असणाऱ्या तीन उपप्रकारांपैकी साधा यादृच्छिक नमुना निवड तंत्राचा वापर करण्यात आला. कोणत्याही कारणाशिवाय किंवा हेतुशिवाय साध्या यादृच्छिक नमुना निवडीमध्ये समग्रातील प्रत्येक एककाला नमुन्यात सहभागी होण्याची समान व वैयक्तीक संधी असते. संशोधकाला आपल्या इच्छेनुसार नमुना निवड करता येत नाही. तसेच ही पक्षपात विरहीत पध्दती असते.[४] साधा यादृच्छिक नमुना निवडीसाठी असणाऱ्या भिन्न पध्दतीपैकी लॉटरी पध्दतीने नमुना निवड करण्यात आलेली आहे.

नाशिक शहरातील एकूण १०२५ व मालेगाव शहरातील ४७९ महिला स्वयंसहाय्यता गटांना अनुक्रमांक देण्यात आले. नाशिक शहरातील १०२५ गटांसाठी १०२५ चिठ्या तयार करून प्रत्येक चिठ्ठीवर गटाचा अनुक्रमांक नमुद करण्यात आला. सर्व चिठ्ठ्यांची घडी तयार करून एका स्टिलच्या डब्यात सर्व चिठ्ठ्या एकत्र करण्यात आल्या. संशोधकाने डोळे बंद करून डब्यात एकत्र असलेल्या चिठ्यांमधुन लकी ड्रॉ पद्धतीने १५४ चिठ्ठ्या काढून घेतल्या चिठ्ठ्यांवर

अनुक्रमांक असलेल्या गटांची नमुना सर्वेक्षणासाठी निवड करण्यात आली. मालेगाव शहरातील ४७९ महिला स्वयंसहाय्यता गटांना अनुक्रमांक देवुन वरील लकी ड्रॉ पद्धतीने ७२ महिला स्वयंरोजगारी गटांची नमुना निवड करण्यात आली. ड्रॉ पद्धतीने नमुना निवड करताना सर्व गटांना नमुना निवडतांना समान संधी मिळावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवण्यात आला आहे.

### २.६.४ तथ्य संकलनाचे स्त्रोत

''तथ्य एक अनुभव सिद्ध संकल्पनीय निरीक्षण आहे.''[५] तथ्य हा संशोधनाचा आत्मा असतो. कारण तथ्य हे ज्ञानेद्रियाच्या सहाय्याने एक अनुभव सिद्ध अवलोकन असते. संशोधन विषयाला पुरक ठरतील, महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सबलीकरणाची वास्तवस्थिती दर्शवतील अशी तथ्य संकलीत करतांना पुढील तथ्य संकलन स्त्रोतांचा उपयोग करून घेण्यात आलेला आहे.

**अ) प्राथमिक स्त्रोत**

संशोधनकर्ता जेव्हा स्वत: अध्ययन क्षेत्रात जाऊन प्रतिसादकर्त्याकडून प्रश्नावली, अनुसुची, मुलाखत, निरीक्षण याद्वारे जी तथ्ये संकलन करतो त्यास प्राथमिक तथ्ये म्हणतात.

प्राथमिक तथ्ये ही अधिक वस्तुनिष्ठ असतात म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी पुढील स्त्रोतांचा उपयोग प्राथमिक माहिती संकलनासाठी केला आहे.

**१) अनुसूची**

अनुसूची हे अशा प्रश्नांच्या समुहाचे नांव आहे की, जे मुलाखतकर्ता द्वारा दुसऱ्या व्यक्तीला प्रत्यक्ष विचारुन स्वत: भरतो.[६] – गुड आणि हॅट

**छायाचित्र क्र. १**



स्वयंसहाय्यता गटाच्या अध्यक्षांना प्रश्न विचारून अनुसूची भरून घेताना संशोधक.
दि. २७ फेब्रुवारी २०११

नमुना म्हणून निवडण्यात आलेल्या २२६ महिला स्वयंसहाय्यता गटांच्या अध्यक्षांकडून प्रत्येकी एक या प्रमाणे २२६ अनुसूची संशोधकाने स्वत: प्रतिसाद कर्त्या महिलांना प्रश्न विचारुन भरुन घेतलेल्या आहेत. अनुसूची हे साधन निवडण्यामागील कारण म्हणजे मालेगाव व नाशिक शहरात भाषेची विविधता आहे. शिवाय दाट लोकवस्ती व महिलांच्या नावातील साम्य आणि निरक्षरता अशा अडचणींमुळे प्रश्नावली ऐवजी अनुसूची या प्रकाराचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**२) मुलाखत**

''साधारणत: दोन किंवा अधिक व्यक्तींमधील संवाद किंवा मौखीक प्रतिसाद म्हणजे मुलाखत''[७] – हॅटर आणि लिंडमन

मुलाखत हे मानसशास्त्रीय दृष्टीने अध्ययन करण्याचे उत्कृष्ठ साधन आहे. मुलाखतीमुळे भिन्न प्रकारची अतिरिक्त माहिती मिळविण्यास मदत होते. त्याचबरोबर प्रत्यक्ष निरिक्षणाची संधी मिळते.

संशोधकाने नाशिक व मालेगाव महानगरपालिकेच्या सुवर्ण जयंती कक्षाचे समन्वयक, तसेच नाशिक व मालेगाव शहरातील समाज विकास संस्थांच्या १८ समूह संघटीका यांच्या मुलाखती घेऊन तथ्य संकलित केलेले आहे.

**छायाचित्र क्र. २**



समुह संघटिकांची मुलाखत घेताना संशोधक, दि. १९ मार्च २०११

### ३) निरीक्षण

घटनांमधील पारस्पारिक संबंध किंवा कार्यकारणभाव जाणून घेण्यासाठी घटनांचे केलेले यथार्थ अवलोकन म्हणजे निरीक्षण होय''[८] – ऑक्सफर्ड शब्दकोश

निरिक्षणामुळे सामुहिक व्यवहारांचे अध्ययन केले जाते. संशोधकाने नाशिक व मालेगाव शहरातील महिला स्वयंसहाय्यता गटांच्या मासिक बैठकांना व हळदी–कुंकू, महिला दिन या सारख्या कार्यक्रमांना उपस्थित राहून तटस्थपणे निरीक्षण करुन नोंदी घेतलेल्या आहेत.

छायाचित्र क्र. ३



महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी निरीक्षण करताना संशोधक, दि. ८ मार्च २०११

### ब) दुय्यम स्त्रोत

प्रकाशित किंवा अप्रकाशित माहिती ज्या विविध स्त्रोता द्वारे संकलित केली जाते अशा माहितीला दुय्यम माहिती तर अशी माहिती संकलनाच्या स्त्रोतास दुय्यम स्त्रोत म्हणतात. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने पुढील दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केला आहे.

१. प्रस्तुत अध्ययनाशी संबंधीत असणाऱ्या सुर्वण जयंती शहरी रोजगार योजनेची रूपरेषा समजून घेण्यासाठी शासनाच्या माध्यमातून निर्गमित केलेल्या माहिती पत्रकांचा उपयोग करून घेण्यात आला.[९]

२. नाशिक व मालेगाव महानगरपालिकेच्या सुवर्ण जयंती कक्षाकडून प्रकाशित झालेले २000ते २००९ चे वार्षिक अहवाल जिल्हा प्रकल्प अधिकारी कार्यालय अहवाल स्वयंसहाय्यता गटांच्या वाटचालीचा आढावा घेण्यासाठी या वार्षिक अहवालांचा उपयोग करुन घेतलेला आहे.[१०]

३. नाशिक व मालेगाव शहरातील नमुना निवड झालेल्या २२६ महिला स्वयंसहाय्यता गटांच्या व्यवहारांची नोंदवही, बँक पासबुक यांचा गटातील महिलांची लघुवित्त विषयक देवाण– घेवाण तपासण्यासाठी उपयोग करुन घेतला आहे.

४. स्वयंसहाय्यता गटांच्या कार्यपध्दतीवरील माहिती पुस्तके– सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या कार्यपध्दतीचा संपुर्ण तपशिल मिळविण्यासाठी उपयोग करुन घेतलेला आहे. परिशिष्ट 'अ' मध्ये नमुद करण्यात आलेले आहेत.

५. महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय मालेगाव कॅम्प (नाशिक), टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथालय, धनंजयराव गाडगीळ ग्रंथालय (गोखले इंन्स्टीट्युट), जयकर ग्रंथालय आणि वाणिज्य व अर्थशास्त्र विभाग ग्रंथालय, पुणे विद्यापीठ अशा विविध ठिकाणाहुन माहिती संकलित केली आहे.

६. संशोधन करत असतांना संशोधक हा वेगवेगळ्या माहितीचे स्त्रोत शोधून त्यांचा उपयोग संशोधनासाठी वस्तूनिष्ठ पद्धतीने करीत असतो. प्रकाशित दुय्यम स्त्रोतांमध्ये संदर्भग्रंथ हे महत्वपूर्ण ठरतात. संदर्भग्रंथाद्वारे वेगवेगळ्या प्रकारची माहिती उपलब्ध होते. यासर्व माहितीचा उपयोग संशोधकास संशोधनाच्या कार्यामध्ये होत असतो. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने वेगवेगळ्या संदर्भ ग्रंथांचा उपयोग केला असून संदर्भ ग्रंथांची यादी संशोधन प्रबंधाच्या शेवटी संदर्भ ग्रंथ सुची मध्ये दिलेली आहे.

७. प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधीत असणाऱ्या विविध पैलूंवर अनेक संशोधकांनी पीएच्.डी. पदवीसाठी वेगवेगळ्या विद्यापीठात सादर केलेल्या संशोधन प्रबंधांचा, शासकीय पातळीवरून व सामाजिक संस्थांकडून अध्ययनकरून प्रसिद्ध झालेल्या संशोधन अहवालांचा, स्वानुभवातून आणि अभ्यासातून लिहिलेले शोध निबंध, लेख यांचा

संदर्भ साहित्याचा आढावा या प्रकरणात उपयोग करून घेण्यात आलेला आहे.

८. संशोधन कार्यासाठी उपयुक्त माहिती देणारी मासिके, साप्ताहीके, वृत्तपत्रे, वेगवेगळे शासकीय (नाबार्ड आणि अर्बन मिनीस्ट्री) व खाजगी संकेत स्थळे या सारख्या स्त्रोतातून उपलब्ध करून घेतलेली आहेत. सदर माहितीचा संशोधनकामी यथोचित उपयोग केला आहे.[११]

## २.७ तथ्य विश्लेषण

संशोधन करतांना वस्तुनिष्ठता ही अत्यंत महत्वाची असते. संशोधनाचे उद्दिष्टे आणि गृहितके यांचा विचार करून संशोधकास संशोधनासाठी माहितीचे संकलन करणे आवश्यक असते. ही माहिती वेगवेगळ्या स्त्रोतांच्या सहाय्याने संकलित केली जाते. प्रस्तुत संशोधनासाठी नाशिक जिल्ह्याच्या नाशिक व मालेगाव शहरातील महिला स्वयंसहाय्यता गटांच्या संदर्भात आवश्यक असणाऱ्या माहितीचे प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांच्या सहाय्याने संकलन करण्यात आले. संकलित माहितीचे वेगवेगळ्या वैशिष्ट्यांनुसार वर्गीकरण करण्यात येवुन तालीकाकरण करण्यात आले. तालीकेत तथ्यांची संख्यात्मक मांडणी करतांना नाशिक व मालेगाव दोन्ही शहर मिळुन एकूण नाशिक जिल्हा संख्या व त्याचे शेकडा प्रमाण त्यानंतर नाशिक शहरातील संख्या व शेकडा प्रमाण आणि मालेगाव शहरातील संख्या व शेकडा प्रमाण अशी मांडणी केलेली आहे. तालीकेतील संख्यात्मक तथ्यांचे विश्लेषण करतांना नाशिक जिल्ह्यातील महिला स्वयंसहाय्यता गटाबाबत विश्लषेण करून नाशिक व मालेगाव शहरातील गटांबाबत तुलनात्मक विश्लेषण करण्यात आलेले आहे. त्या आधारे अर्थान्वेषण आणि निष्कर्ष, अडचणी, शिफारशी देण्यात आलेल्या आहेत. शेवटी भावी संशोधनास दिशा व संशोधनासाठी उपयोग करून घेतलेल्या माहिती स्त्रोताचा समावेश असलेली संदर्भसुची देण्यात आलेली आहे.

## २.८ संशोधनाची व्याप्ती

स्वयंसहाय्यता गट ही दारिद्र्य निर्मुलनाची चळवळ बांग्लादेशातून भारतात सर्वत्र रुजलेली असली तरी माझ्या संशोधनाचे कार्यक्षेत्र हे महाराष्ट्रातील नाशिक जिल्हा असून संशोधनाची व्याप्ती नाशिक जिल्ह्यातील नाशिक व मालेगाव शहरातील फक्त महिला स्वयंसहाय्यता गटांच्या अध्ययनाशी संबंधीत आहे. असे असले तरी या संशोधनाचे निष्कर्ष सर्व शहरी महिला स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून होणाऱ्या सबलीकरणाचे प्रतिनिधीत्व करणारे आहेत.

शहरी स्वयंसहाय्यता गटांची स्थापना १९९७ पासून सुरु आहे. मात्र नाशिक व मालेगाव शहरात २०००–२००१ पासून खऱ्या अर्थाने स्वयंसहाय्यता गटांच्या स्थापनेस सुरुवात झाली. म्हणून प्रस्तुत संशोधन हे २०००–२००१ ते २००९–२०१० या दहा वर्षाच्या कालखंडाशी निगडीत आहे.

## २.९ संशोधनाची मर्यादा

प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने तथ्ये संकलन करतांना काही अडचणी निर्माण झाल्या त्यापुढील प्रमाणे आहेत.

१. संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या विषयाशी संबंधीत संपुर्ण विश्व किंवा समग्राचे वेळ, पैसा, श्रम या दृष्टीने अध्ययन करणे शक्य नाही.

२. प्रतिसाद कर्त्या लाभार्थी महिलांकडून सत्य माहिती दडविण्याचा प्रयत्न होतो, असे निदर्शनास आले उदा. उत्पन्नकर्त्या व्यक्तींची संख्या, व्यवसाय इत्यादी.

३. संशोधन कर्त्याविषयी पूर्वग्रह दुषितपणा असतो. खरी माहिती दिली तर शासनाकडे पाठविली जाईल. त्यामुळे दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांना मिळणाऱ्या लाभापासून वंचित रहावे लागेल असा ग्रह असतो. माहिती मिळविण्याचा हेतू कथन करून व विश्वास संपादन करून माहिती मिळविण्यात आली.

४. गटांना हिशोबासाठी विशिष्ट नमुन्यात रेकॉर्ड पुरविण्यात आलेले नाही. त्यामुळे हिशोबाच्या नोंदीमध्ये त्रुटी व विविधता आढळून आली. प्रतिसाद कर्त्या महिलांकडे असलेली कागदपत्रे व नोंदींचा संदर्भ घेऊन माहिती मिळविण्यात आली.

५. बँकेकडून वेळोवेळी पासबुक भरुन देण्यात येत नाही. त्यामुळे बँक कर्जफेडीच्या नोंदी पासबुकावर नसतात. अशा वेळी पासबुक भरून आणल्यानंतर पुन्हा उर्वरित आवश्यक माहिती मिळविण्यात आली.

६. प्रतिसादकर्त्या महिलांच्या नावांमध्ये साम्य असल्यामुळे प्रत्यक्ष भेट घेण्यासाठी मोहल्यात पुन्हा–पुन्हा आणि वेगवेगळ्या ठिकाणी नावे विचारावी लागली. तसेच मुस्लिम वस्तीत अनोळखी व्यक्तीकडून महिलेचे नाव विचारल्यानंतर अनेक अडचणींना सामोरे जावे लागले.

७. प्रतिसादकर्त्या महिलांचा दिनक्रम व्यस्त असतो अशा वेळी अनुसूची भरून घेतांना वेळेचे समायोजन करतांना अडचणी निर्माण झाल्या.

८. प्रतिसादकर्त्या महिलांकडून प्रामुख्याने मुस्लिम महिलांकडून अनुसूची भरून घेतांना मुलाखत घेते वेळी भाषेची अडचण निर्माण झाली.

अशा प्रकारे तथ्य संकलनास मर्यादा पडल्या तरी या मर्यादांवर मात करुन मिळणारी माहिती शक्यतो पूर्वग्रहमुक्त व निर्दोष कशी राहील यासाठी संशोधकाकडून प्रयत्न करण्यात आला. तसेच या संशोधनाचे निष्कर्ष वस्तुस्थितीशी निगडीत असतील या दृष्टीने संशोधकाने तटस्थ भूमिकेतून अध्ययन केले आहे.

## २.१० अध्ययन विषयाचा आकृतीबंध

प्रस्तुत अध्ययन विषयाच्या संशोधन प्रबंधांसाठी सात प्रकरणांचा आकृतीबंध तयार केलेला आहे.

- प्रकरण क्रमांक एकमध्ये '**प्रस्तावना**' शिर्षकांतर्गत स्वयंसहाय्यता गटांची ऐतिहासिक पार्श्वभूमी मांडण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात स्वयंसहाय्यता गटांची जागतिक पातळीवरील उत्क्रांती, भारतातील उत्क्रांती, स्वयंसहाय्यता गटांची भारतातील प्रगती, विभागीय प्रगती, महाराष्ट्र राज्य, नाशिक जिल्ह्यातील प्रगतीचा परामर्श मांडण्यात आलेला आहे.
- प्रकरण क्रमांक दोन मध्ये संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या '**संशोधन प्रणाली**'ची मांडणी करण्यात आलेली आहे. संशोधन विषयाची निवड, संशोधन विषयाचे महत्व, संशोधनाचे उद्दिष्ट्ये, परिकल्पना, तथ्य संकलन व साधने, तथ्ये विश्लेषण, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा आणि संशोधन विषयाचा आकृतबंध यांची मांडणी प्रस्तुत प्रकरणात केलेली आहे.
- प्रकरण क्रमांक तीन मध्ये '**संदर्भ साहित्याचा आढावा**' मांडण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधीत पुर्व संशोधन अध्ययनांचा परामर्श घेतांना पीएच्.डी. संशोधन, जागतिक पातळीवर विविध देशांशी संबंधीत अध्ययने, भारत व भारताच्या विविध राज्यातील अध्ययन, ग्रामीण व शहरी भागाशी निगडीत तुलनात्मक अध्ययन, महाराष्ट्र राज्याच्या वेगवेगळ्या भागाशी निगडीत अध्ययन शहरी भागातील महिलांच्या सबलीकरणाचे अध्ययन विचारात घेऊन आढावा मांडण्यात आलेला आहे.
- प्रकरण क्रमांक चार मध्ये '**नाशिक जिल्ह्याचे सामाजिक व आर्थिक अध्ययन**' मांडण्यात आलेले आहे. नाशिक जिल्हा आणि नाशिक जिल्ह्यातील नाशिक व मालेगाव शहर यांचे एकत्रीत सामाजिक व आर्थिक अध्ययन मांडलेले आहे. भौगोलिक स्थान व क्षेत्रफळ, प्रशासकीय रचना, लोकसंख्या व सामाजिक वर्गीकरण व स्त्री पुरूष

प्रमाण, साक्षरता प्रमाण, सामाजिक व सांस्कृतिक स्थिती, आर्थिक स्थिती इत्यादी बाबींचा तपशिल देण्यात आलेला आहे.

- प्रकरण क्रमांक पाच मध्ये **'महिला स्वयंसहाय्यता गट आणि महिला सबलीकरण'** विषयक माहितीची मांडणी करण्यात आलेले आहे. स्वयंसहाय्यता गटाचा अर्थ, उद्देश, वैशिष्ट्ये, गटांचे वर्गीकरण, गटांचे प्रतिमान, प्रस्तुत अध्ययन ज्या महिला स्वयंसहाय्यता गटाच्या संदर्भात आहे. त्या सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेची कार्यपद्धती, अंमलबजावणी यंत्रणा विषयक माहिती मांडण्यात आलेली आहे. महिला सबलीकरण विषयक आणि सुक्ष्म वित्त विषयक व बाबींची माहिती मांडण्यात आलेली आहे.
- प्रकरण क्रमांक सहा प्राथमिक तथ्य संकलनावर आधारीत आहे. या प्रकरणात **'नाशिक व मालेगाव शहरातील महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणाचे तुलनात्मक विश्लेषण'** करण्यात आलेले आहे. नाशिक व मालेगाव शहरातुन प्राथमिक स्त्रोतांच्या माध्यमातून मिळालेल्या माहितीचे विश्लषेण केलेले आहे. स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून होणाऱ्या सुक्ष्म वित्त व्यवहारामुळे महिलांचे घडून येणारे आर्थिक सबलीकरण आणि गटातील सहभागामुळे होणाऱ्या आर्थिक सबलीकरणामुळे घडुन येणारे सामाजिक सबलीकरण यांचे सारणी मध्ये दर्शविलेल्या संख्यात्मक माहितीचे तुलनात्मक अध्ययन मांडलेले आहे. तसेच महिला सबलीकरणावर प्रभाव पाडणाऱ्या घटकांचा आढावा मांडलेला आहे.
- प्रकरण क्रमांक सात मध्ये **'निष्कर्ष व शिफारशी'** अंतर्गत प्रस्तुत संशोधनासाठी मांडलेल्या परिकल्पनांची तपासणी करून मिळालेल्या निष्कर्षांची मांडणी करण्यात आलेली आहे. महिला सबलीकरण प्रक्रियेतील समस्या आणि महिलांच्या प्रभावी सबलीकरणासाठी

सुचविण्यात आलेल्या शिफारशी तसेच भावी संशोधनासाठी दिशा मिळण्याच्या अनुषंगाने विषय सुचविण्यात आलेले आहेत.

## संदर्भ

[१] आगलावे प्रदिप, २००० ''संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे'', विद्या प्रकाशन, नागपूर, पृष्ठ. क्र. १७

[२] गोडबोले गोविंद, २००९, ''बचत गटांच्या माध्यमातून गरिबीमुक्त विश्वाची निर्मिती'', साकेत प्रकाशन, पुणे, पृ.क्र. ६८, ६९.

[३] पुर्वोक्त १, पृ.क्र. १२१

[४] कुलकर्णी अनिल, २००९ 'व्यावसायिक संशोधन पध्दती', सक्सेस पब्लिकेशन, पुणे पृ.क्र.५४ व ५५.

[५] घाटोळे रा.ना., २००८, ''समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती'', श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर– १०. पृ.क्र. ६७.

[६] पुर्वोक्त ४, पृ.क्र.५७

[७] पुर्वोक्त ५, पृ. क्र. १०२.

[८] पुर्वोक्त १, पृ.क्र.२१५

[९] विभागीय नागरी पर्यावरण संशोधन केंद्र, नागरी दारिद्र्य निवारण्यासाठी कार्यक्रम : एक मार्गदर्शक पुस्तिका, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना

[१०] नाशिक व मालेगाव महानगरपालिका, सुवर्ण जयंती शहरी रोजगार विभाग अहवाल– २०००–०१ ते २००९–१०

[११] http://www.nabard.com

**प्रकरण ३**

# संदर्भ साहित्याचा आढावा

## ३.१ प्रस्तावना

स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून होणारे सुक्ष्म वित्त व्यवहार हे दुर्बल घटकांच्या प्रामुख्याने महिलांच्या सबलीकरणाचे प्रभावी माध्यम ठरत आहे. त्यामुळे संपुर्ण जग आणि भारतात वेगवेगळ्या ठिकाणी. वेगवेगळ्या पार्श्वभूमीवरील महिला व पुरुष, ग्रामीण व शहरी संदर्भात सबलीकरणाचे अध्ययन होणे अपेक्षित आहे. त्या दृष्टीने अनेक संशोधकांनी भिन्न दृष्टीकोनातून संशोधन करुन निष्कर्ष मांडणे क्रमप्राप्त ठरते. सामाजिक संशोधन हे समाजाशी निगडीत असणाऱ्या घटकांशी, घटनांशी व त्यांच्या चांगल्या वाईट प्रभावाशी सुद्धा निगडीत असते. बदल हा मानवी व समाज जीवनाच्या अविभाज्य भाग असल्यामुळे स्थळ, काळ व परिस्थिती सापेक्ष संशोधन करुन वेगळे निष्कर्ष मिळणे अपेक्षित असते.

अध्ययन विषयाशी संबंधीत प्रकाशित अप्रकाशित साहित्याच्या अभ्यासामुळे पुर्व संशोधने लक्षात येतात. निश्चित केलेल्या संशोधन क्षेत्रात काय माहिती आहे आणि काय माहिती करुन घेणे गरजेचे आहे याची जाणीव होते. संशोधन समस्येचे विविध पैलू प्रकाशात येतात. त्यामुळे पूर्वीच्या संशोधनापेक्षा हाती घ्यावयाचे आपले संशोधन कोणत्या बाबतीत वेगळे असेन या बाबत निश्चितता करता येते. प्रस्तुत अध्ययनासाठी संशोधकाने घेतलेल्या संदर्भ साहित्याचा आढावा मांडून संशोधनाची दिशा स्पष्ट केलेली आहे.

## ३.२ पुर्व संशोधन अभ्यासाचा परामर्श

प्रस्तुत अभ्यास विषयाच्या अनुषंगाने अभ्यासकाने पुर्व संशोधन साधनांची माहिती घेतली असून त्याचा परामर्श येथे मांडला आहे.

### ३.२.१ महिला सबलीकरणाची आवश्यकता – संदर्भ साहित्य

१) शारिरीक, लैंगीक व भावनिक हिंसाचार हा महिलांच्या समाजातील दुय्यम स्थानाचे प्रतिक आहे. पुरुष, स्त्री, सहकारी यांच्या माध्यमातून महिलांवर अत्याचार होत असतात. महिला सबलीकरणात महिला हिंसाचाराचा सुद्धा विचार केला जातो. सेन गुप्ता (१९९६), यांच्या मते महिलांचे अक्षमीकरण हे हिंसाचाराचे एक कारण असते. अमेरिकेतील वेगवेगळ्या राज्यात महिलांचा सामाजिक दर्जा व हिंसा यांचा संबंध अभ्यासतांना ही महिला हिंसेचा दर जेथे महिलांची स्थिती खालावलेली आहे. तेथे अधिक आहे. व्ही. शेफर्ड (२००१) च्या पाहणी नुसार मालमत्ता किंवा आर्थिक संसाधनांचा मालकी हक्क नसणाऱ्या महिलांच्या बाबत हिंसेचे प्रमाण अधिक आहे. कॅम्पबेल (२००३) यांनी जांबीया, पेरू, इजिप्त, कंबोडीया, हैती, आणि भारतातील सर्वेक्षण करून केलेल्या संशोधनावरून महिला बाबतच्या हिंसाचाराचे प्रमाण आणि महिला सबलीकरण यांचा विरूद्ध संबंध असतो.[१]

२) स्त्रीयांचे सबलीकरण करणे हे आजच्या काळाची गरज आहे. (अहलुवालिया २०००) त्यामुळे कुटूंब नियोजनाबाबत त्यांना स्वत:चे मत राहील. स्वत:ची आर्थिक परिस्थिती कशीही असली तरी प्रत्येक आई आपल्या मुलांची आर्थिक स्थिती चांगली असावी अशी आशा करते म्हणजे भावी पिढीच्या भवितव्यासाठी महिला सबलीकरणाची गरज आहे.[२]

३) राष्ट्रीय महिला सबलीकरण धोरणानुसार महिला सबलीकरणासाठी 'लिंगभाव तपासणी' होणे आवश्यक आहे. (एस.एस.एफ.–२००१) च्या अध्ययनाचा प्रमुख उद्देश हा जिल्हा पातळीवरून लिंगभाव समानता तपासणीस प्रोत्साहान देण्याचा आहे. बंगलोर (शहरी) व तुमकुर (ग्रामीण) भागातील ५००० महिलांच्या सर्वक्षणाकडून महिलांचा कामातील सहभाग दर बंगलोर मध्ये फक्त १६% तर तुमकूर विभागात पुरूषांना कामासाठी

प्रतितास ३१ रू व स्त्रीयांना २२ रू मजुरी मिळते. बंगलोर शहरातील महिलांचे बचत व उत्पन्नावर तुमकूर पेक्षा अधिक कंट्रोल आहे. ज्या कुटूंबामध्ये महिलांकडून पुरेसे अर्थाजन होत नाही. अशा कुटूंबामध्ये महिलांना आर्थिक विवंचनेस सामोरे जावे लागते. यावर उपाय म्हणुन व्यावसासिक सिद्धता व्यवस्थापन व तांत्रिक स्थितीच्या पलिकडे गेली पाहिजे. व त्यामध्ये स्वयंसहाय्यता गटांचा सहभाग आवश्यक आहे.[३]

४) स्त्री पुरूष समानतेसाठी विज्ञान व तांत्रिक शिक्षण क्षेत्रातील काम करतांना वातावरण महिलांना अनुकूल असणे अत्यावश्यक आहे. मात्र ४0% महिलांच्या मतानुसार (गुप्ता २00३)काम करतांना स्त्री-पुरूष समानता नसुन स्त्रीयांना दुय्यम वागणूक दिली जाते. महाविद्यालयांमध्ये महिलांना समान वागविले जात नाही. स्वतंत्र स्वच्छता गृहे पुरेशी नसतात. आणि त्यांची योग्य प्रकारे स्वच्छता ठेवली जात नाही.[४]

५) स्त्री -पुरूष समानतेसाठी आवश्यक घटकांची उपलब्धता करून देण्यासाठी शासनाने अंदाजपत्रकात भरीव वाढ करणे गरजेचे आहे. मात्र भारतात केंद्रीय अंदाज पत्रकातील महिला सबलीकरणासाठी केलेल्या तरतुदीत १९९५-९६ ते २00१-२00२ या कालावधीत ३.८९% वरून २.0२% पर्यंत घट झालेली आहे. नॅशनल कमिशन फॉर वुमेन (२00४) त्यात वाढ करून महिलांना घरे, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, स्वच्छता गृहे, सांडपाणी सामाजिक सुरक्षितता प्रदान करता येणे आवश्यक आहे.[५]

६) भारतीय सार्वजनिक प्रशासन संस्था (आयआयपीए – २00४) यांनी कौटुंबिक पातळीवर स्त्री-पुरूष यांच्यातील निर्णय प्रक्रियेतील सौदाशक्तीचे दिल्ली मध्ये २00१ महिलांचे सर्वेक्षण करून ६४% कुटूंबामध्ये एकत्र सहभोजन न करता स्त्रीया पुरूषांच्या नंतर भोजन करतात, ७५% स्त्री-

पुरूष हे मुलांना विशेष गरज मानुन जन्म देतात. ६५% पुरूष व ८०% महिलांना गर्भधारणेच्या काळात मुलगा होण्याची अपेक्षा असल्याचे प्रकर्षाने जाणवते. म्हणून महानगरामध्ये सुद्धा स्त्री-पुरूष समानतेबाबत विशेष जनजागृतीची गरज आहे. प्रामुख्याने स्त्रीयांमध्ये याबाबत साक्षरतेची गरज आहे.[६]

७) सुक्ष्म वित्त (ओटेरा – १९९९) हि कमी उत्पन्न असणाऱ्या गरिब आणि स्वयंरोजगार करणाऱ्या अत्यंत गरिब लोकांसाठी वित्तीय सेवांची एक सुविधा आहे. या वित्तीय सेवा (लिड्ज वुड १९९९) मध्ये सामान्यपणे बचत, कर्जपुरवठा आणि सफाई ठेका, पोषण आहार पुरविणे सारख्या पतसेवेचा सुद्धा समावेश होतो. सुक्ष्म वित्ताचा एक गुण म्हणजे औपचारिक वित्तीय क्षेत्रातील संस्था कडून (बँकांकडून) ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागातील ज्या गरिब व्यक्तींना वित्तीय सुविधांच्या बाबत दुर्लक्षित केले जाते त्या व्यक्तींना बचत, कर्ज, वीमा, वेतन सेवा सारख्या उपलब्ध करुन दिल्या जातात.[७]

८) रॉबिन्सन (२००१) च्या मते विकासाच्या क्षेत्रात सुक्ष्म कर्ज व सुक्ष्म वित्त या नवीन संज्ञा १९७० मध्ये प्रथम वापरण्यात आल्या किंवा सर्वप्रथम वलयांकीत झाल्या. तत्पुर्वी १९५० ने १९७० पर्यंत ग्रामीण व शहरी भागात वित्तीय सेवांचा पुरवठा दानशूर व्यक्ती आणि शासनाकडून प्रामुख्याने अनुदानांच्या आधारावर केला जात होता. मात्र वित्तीय सेवा पुरवितांना ग्रामीण व शहरी भागातील सर्व गरिब कुटूंबांपर्यंत सेवा पोहोचत नसणे, थकबाकीचे प्रमाण अधिक तसेच अधिक तोटा अशा उणीवा निर्माण झालेल्या होत्या म्हणून गरिबांच्या विकासासाठी सुक्ष्म वित्ताची जोड देणे उपयुक्त ठरणे अपेक्षित आहे.[८]

९) तसेच मायक्रो फायनान्सास प्रोग्राम हा गरीब व्यक्तीच्या – मायराडा – २००२, सिबल आणि दवे – २००२, क्रिस्टन आणि कुन्न – २००२, स्वाईन – २००६, प्रामुख्याने गरिब असक्षम महिलांच्या सक्षमीकरणाचे एक उत्तम साधन म्हणून उदयास आलेले आहे.[९]

१०) महिला ह्या पुरूषांपेक्षा मिळणाऱ्या उत्पन्नाचा अधिक चांगला उपयोग करीत असतात. त्यामुळे कुटूंब व समाजाच्या विकासाला अधिक चालना मिळते (युएनसीडीपी) झांजीबार, टान्झानिया देशात ५५% महिला स्व उत्पन्नाचा वापर कौटुंबिक गरजा भागाविण्यासाठी, १८% मुलांच्या शिक्षणासाठी, १५% आरोग्य व कपडे इ. साठी करीत असतात. लॅटीन अमेरिकेत पुरूषांपेक्षा महिला (चांट – लंडन) अधिक योग्य प्रकारे उत्पन्नाचा विनियोग करतात, (डी ला रोचा) ६७.५% महिला उत्पन्नाचा वापर कौटुंबिक गरजांच्या पुर्ततेसाठी करतात. म्हणुन महिलांना पुरूषांच्या बरोबरीने वित्तीय संसाधने उपलब्ध होणे हे मानवी हक्काशी निगडीत आहे. कारण वित्तीय संसाधनांची उपलब्धता प्रणाली ही महिलांमधील दारिद्र्य निर्मुलन व मानवी हक्क प्राप्तीचे एक महत्त्वाचे साधन मानण्यात आलेले आहे.[१०]

११) सुक्ष्म वित्त हे स्वयंरोजगारासाठी आणि प्रामुख्याने महिलांमध्ये स्वयंसिद्ध सुरक्षितता वाढीसाठी तसेच आत्मविश्वास व कौटुंबिक दर्जा उंचावण्यासाठी संधी उपलब्ध करुन देत आहे. (युनो – २००६) सुक्ष्म वित्त हे कमी व्याजदरावर उपलब्ध होवून समान व लहान हप्त्याने परतफेड करता येते. त्यामुळे थकीत कर्जाचा धोका नसतो.[११]

१२) पाटील शरद (२००७) यांनी गरिबीमुक्त विश्वाची निर्मिती या ग्रंथात, स्त्री–पुरुष, बालकांचा विचार श्रम करणाऱ्या वस्तुंऐवजी भिन्न क्षमता आणि

गरजा असलेला मानवी प्राणी असा विचार होणे गरजेचे आहे. म्हणून माझ्या निरिक्षणाद्वारे (डॉ. युनुस) पुरुषांपेक्षा गरिब स्त्रीलाच पत पुरवठा करणे कुटूंबासाठी फायद्याचे आहे. कारण पतपुरवठ्याचा वापर पुरुष स्वत:साठी खर्च करतात तर स्त्रिया सर्व कुटुंबासाठी विशेषत: मुलांसाठी करतात. पर्यायाने सर्व समाजाचाच लाभ होतो.[१२]

१३) गोडबोले (२००९) यांनी गरिबीमुक्त विश्वाची निर्मिती या ग्रंथात, समाजाने नाकारलेल्या लोकसंख्येचे आर्थिक चक्र लघु पत पुरवठा फिरवितो असे माझे ठाम मत आहे. (मोहंमद युनुस) म्हणून ग्रामीण बँकेच्या माध्यमातून आम्ही आर्थिक भेदभावाला आव्हान देऊन गरिबातील गरीब लोकांना 'पत' देण्याचे धाडस केले. आपल्या जीवनात पैशालाही न शिवलेल्या अनाथ स्त्रियांचा आम्ही समावेश केला. आम्ही नियम धुडकावले. पावलोपावली प्रत्येकजण आमच्यावर ओरडले. तुम्ही- तुमचा पैसा वाया घालवत आहात. तुम्ही दिलेले कर्ज कधीच परत मिळणार नाही. तुमची व्यवस्था आता फायदेशीर ठरत असली तरी तिचा कोणत्याही क्षणी स्फोट होऊन ती नष्ट होईल. मात्र गरिब व्यक्तींवरील आमचा विश्वास सार्थ ठरला कारण बांगलादेशात ७० लाख लोकांना लघु पतपुरवठा केल्यामुळे ६४% लाभार्थींनी दारिद्र्य रेषा ओलांडली आहे. त्यांच्या जीवनात आर्थिक स्वावलंबन प्राप्त आलेले आहे.[१३]

१४) डॉ. रथ (२०१०) यांनी उद्योजकता आणि स्थैर्य यामधील सुक्ष्म वित्ताची भूमीका या शिर्षकांतर्गत मांडलेले मत, विकास आणि सामाजिक प्रभाव या संज्ञांना अनुसरुन जगातील सर्व विकसनशील देशात सुक्ष्मवित्त उद्योग हा लघु साहसी उपक्रमींच्या आयुष्याची गुणवत्ता वाढविण्यात मोलाची भर घालू शकतो. सुक्ष्मवित्त उद्योगाच्या माध्यमातून सुक्ष्म उद्योजकांच्या शाश्वत

प्रगतीतून २१ व्या शतकात दारिद्र्य निर्मुलनावर प्रभावी उपाय ठरु शकतो. तसेच शाश्वत भविष्याची निर्मिती होऊ शकते.[१४]

१५) डॉ. गीते (२०११) यांच्या रिर्सच् लिंक मधील लेखात मांडलेले विचार, दारिद्र्य आणि शांतता यांचा निकटचा संबंध असतो. दारिद्र्यामुळे लोक मुलभूत गरजा व मुलभूत हक्क यापासून वंचीत असतात. त्यामुळे दारिद्र्याची परिणती नैराश्यात होऊन लोक अविचारी कृती करण्यास प्रवृत्त होतात. त्यातून दैववाद, धार्मिक मुलतत्ववाद, वांशिक, द्वेष यांना खतपाणी मिळून दहशतवाद व हिंसाचारास उत्तेजन मिळते. त्यातून जागतिक शांतता नष्ट होते म्हणून दारिद्र्य निर्मुलन व त्यासाठी 'लघुवित्त' धोरणात्मक उपाय ठरु शकतात.[१५]

### ३.२.२ जागतिक स्तरावरील पुर्व अध्ययनांचा परामर्श

१) बुकले (१९९७) यांनी दक्षिण आफ्रीकेतील केनिया, मालदीव, घाना येथील मायक्रोफायनान्स च्या समस्या व उपाय विषयक संशोधन करून, गरिबांच्या भविष्यनिर्मितीसाठी मायक्रो एन्टरप्राईज निर्माण करणे व त्यासाठी मायक्रोफायनान्स सुविधांची कमतरता दुर करणे आवश्यक आहे.[१६]

२) भट आणि टँग (१९९८) यांनी 'समूह पातळीवरील सुक्ष्म पतपुरवठयातील व्यवहार खर्चाची समस्या' या विषयावर अध्ययन करून, सुक्ष्म कर्ज पुरवण्याबाबत जगभरातील मायक्रोफायनान्स संस्थांना 'व्यवहार खर्च' अधिक असणे ही एक समस्या भेडसावत आहे. त्यामुळे गरिबांना सुक्ष्म कर्ज देतांना व्याजदर कमी करताना अडचणी येत आहेत.सामूहिक दायित्वावर गटासाठी कर्ज, सामूहिक दायित्वासह वैयक्तिक कर्ज, वैयक्तिक

दायित्वासह वैयक्तिक कर्ज  या तीन प्रकारांसाठी सुक्ष्म कर्ज देतांना व्यवहार खर्चाची समस्या भेडसावत आहे.[१७]

३) मिचेल (१९९९) पेरू देशातील शहरी भागातील गरिब महिला गटांच्या माध्यमातुन होणाऱ्या मायक्रोफायनान्स मुळे उत्पादक व पुर्नउत्पादक व्यवसायाकडे वळलेल्या आहेत.  मायक्रो फायनान्समुळे शहरी महिलांना लघु साहसी उपक्रमी होण्यासाठी अधिक सक्षमपणे स्वत्वाची जाणिव करून देण्याचा पर्याय गरीब महिलांना उपलब्ध झालेला आहे.[१८]

४) डिला के. परेरा (२००२) यांनी  'शरीर विक्रय करणाऱ्या महिलांसाठी सुक्ष्म वित्त' ह्या नैरोबी केनिया मध्ये राबविल्या जाणाऱ्या प्रकल्पाचे अध्ययन केले. या अध्ययनावरून सुक्ष्म वित्ताच्या माध्यमातून शरीर विक्रय करणाऱ्या महिला दारिद्र्य मुक्त होत आहेत हे जाणून घेण्याच्या हेतून संशोधन हाती घेतले. सेक्स वर्क्स म्हणुन काम करणाऱ्या महिलांना लहान व्यवसाय करण्यासाठी मायक्रोफायनान्स सेवा पुरविल्या जातात. त्यामुळे ९०% महिलांमध्ये मुलांच्या संगोपनाबाबत सकारात्मक बदल होत आहेत. तर ६०% महिलांनी सेक्स वर्क्सचे काम सोडुन स्वत:चा उत्पन्न निर्मिती व्यवसाय सुरू केलेला आहे.[१९]

५) शॉ (२००४) यांनी श्रीलंकेतील लघु साहसी उपक्रम आणि दारिद्र्य निर्मुलन या विषयावर अध्ययन करुन, लघु साहसी उपक्रम हे श्रीलंकेतील दक्षिण – पुर्व भागातील भौगोलिक, सामाजिक व वित्तीय अडथळ्यांमध्ये अडकलेले आहेत. त्यामुळे शासन व सुक्ष्मवित्त संस्थांनी वित्तीय व बिगरविक्रीय घटकांमध्ये अधिक लक्ष घालणे गरजेचे आहे, असे मत मांडले.[२०]

६) मोनिका आणि मालाबोला(२००४) यांनी मायक्रोफायनान्सचा प्रभाव याविषयी झालेल्या अध्ययनांचा आढावा घेऊन प्रभावाचे तीन प्रकारात वर्गीकरण केले.

- मायक्रोफायनान्सचा गरिब ते अतिगरिब व्यक्तींच्या प्रामुख्याने महिलांच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर सकारात्मक प्रभाव झालेला आहे. जसे उत्पन्न वाढ व स्थिरता उत्पन्नातील असमानता कमी, रोजगार व अन्न आणि आरोग्य सुविधांमध्ये वाढ, मुलांची शाळेतील उपस्थिती, सामाजिक संबंध आणि महिला सबलीकरणात वाढ झाली.
- मायक्रो फायनान्सचा गरिबांवर व त्यांच्याशी निगडीत बाबींवर विपरीत परिणाम/ प्रभाव पडत आहे. महिलांचे शोषण, दारिद्र्य पातळी स्थिर, उत्पन्न बदलातील अस्थिरता कामाचा वाढता भार, उच्च व्याजदर, अवलंबीत्वात वाढ, स्थानिक आर्थिक व सामाजिक विकासात अडथळे इ. बाबतीत नकारात्मक प्रभाव पडत आहे.
- मायक्रो फायनान्स चा मिश्र प्रभाव पडत आहे. गरिबांना सहाय्य होत आहे मात्र अतिगरिबांना लाभ होत नाही. अधिक उत्तम पद्धतीने पैशाचा व्यवहार करण्यात मदत होत आहे. मात्र प्रत्यक्षपणे व वाजवी प्रमाणात उत्पन्नात सबलीकरणात वाढ होतांना आढळून येत नाही. (हुसेन – २०१०, रहेमान – १९९८), मायक्रोफायनान्सच्या माध्यमातुन उपलब्ध होणारा पैसा लघु व्यवसाय निर्मितीच्या माध्यमातुन रोजगार निर्मितीसाठी अधिक प्रमाणात वापरला जात आहे. वैयक्तिक वापराऐवजी गटाच्या माध्यमातुन मायक्रोफायनान्स चा शिक्षण, आरोग्य व उत्पन्न निर्मितीसाठी अधिक योग्य वापर होतांना आढळुन येत आहे.[२१]

७) एलिजाबेथ ड्युन (२००५) यांनी बोस्नीया व हर्जेगोव्हनिया या देशात सुक्ष्म वित्ताचे अध्ययन केलेले आहे. बँक फॉर रिकन्सस्ट्रक्शन अण्ड डेव्हलपमेंट (ईबीआरडी) ने गरिबांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणात सुक्ष्म

वित्त महत्त्वपुर्ण भूमिका पार पाडू शकते. या उद्देशाने सुक्ष्म वित्ताचे व्यवहार करणाऱ्या संस्थांच्या स्थापनेत व नियंत्रणात मदत करीत आहे. ईबीआरडीच्या माध्यमातून हर्जेगोव्हीना, अल्बनिया, अर्मेनिया, अझरबैजान, बेलारुस, बोस्नीया, बल्गेरिया, जॉर्जीया, कझाकीस्थान, कोसोवा, मेसेडोनिया, मालदीव, मंगोलीया, रुमानिया, रशिया, सैबेरिया, तजाकीस्थान, युक्रेन, उझेबिकास्तान या देशात सुक्ष्म वित्त पुरवण्याचे प्रकल्प स्थापन करण्यात आलेले आहेत. तसेच आफ्रिका, विशेषत्वाने सब–सहारा विभाग, आशिया, युरोप, पुर्व युरोप, मध्य पुर्व आणि लॅटीन अमेरिकेत अनेक सुक्ष्म वित्त संस्थांची स्थापना केलेली आहे. सुक्ष्म वित्ताचा लाभ मिळविणाऱ्या व्यक्तींचे दरडोई उत्पन्न सुक्ष्म वित्ताचा लाभ न मिळणाऱ्या व्यक्तीपेक्षा २००२ मध्ये ११०० के.एम. ने अधिक होते. (दारिद्र्य रेषेचे उत्पन्न २२०० के. एम.) गृहीत धरण्यात आलेले होते. थोडक्यात सुक्ष्मवित्त लाभार्थींच्या उत्पन्नात उल्लेखनीय वाढ घडवून आणण्यात सहाय्यक ठरत आहे. परंतु लाखो लोकांना दारिद्र्य रेषेच्या वर आणण्यात पुरेसे होऊ शकलेले नाही.[२२]

८) जोसेफ (२००५) केनियामध्ये विना व्याज कर्ज या इस्लामीक बॅकींग तत्वानुसार बँकांमध्ये बचत खाते सुरु करुन असंख्य भाजीपाला विक्रेते, मोटार व टॅक्सी चालक, हॉकर्स, न्हावी आणि कलाकार यांनी स्वत:चे व्यवसाय सुरु करुन सन्मानाचे जीवन जगत आहे.[२३]

९) मकिरिंग सेव्हरिंग पिटर (२००६) यांनी टान्झानियामधील लघुवित्त सेवांचा सहासी उपक्रमांवरील प्रभाव जाणून घेण्यासाठी अध्ययन केले. टान्झानिया या देशात ३८ दशलक्ष लोकसंख्येपैकी ३६ कोटी लोक दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहेत. अशा लोकांना दारिद्र्य मुक्त करण्यासाठी अनेक वित्तीय सेवा पुरविण्यात येत आहेत. मात्र लघु साहसी उपक्रमांना पुरविण्यात

येणाऱ्या औपचारिक सेवा अत्यंत प्रभावीत आहेत. अशा पार्श्वभूमीवर सुक्ष्म वित्त हे गरिबांच्या मध्ये व्यावसाविक साहस वाढविण्यासाठी अत्यंत उपयुक्त साधन ठरत आहे. मात्र शिक्षण व व्यवसाय मार्गदर्शन आणि संबंधीत माहिती ह्या सेवा व्यवसाय उभारणी व त्याच्या वृद्धीचे अत्यंत महत्त्वाचे पायाभूत घटक आहेत. त्यासाठी सुक्ष्मवित्त संस्था 'बहुआयामी प्रभाव' करण्यास सक्षम ठरत आहेत. त्या माध्यमातून अधिक नफा अधिक चांगल्या वस्तु व सेवा आणि रोजगार पुरविण्यासाठी गरिबांसाठी एक माध्यम आहे.[२४]

१०) मॅकिन्से आणि कंपनी (२००७) ख्रिश्चन समुदायानंतर मुस्लीम हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा समुदाय आहे. मुस्लीम लोकांचे अर्थ व्यवहार हे ईस्लामीक लॉ च्या आधारावर होत असतात. कर्ज घेणे – देणे व्यवहारात 'रिबा' म्हणजे व्याज घेण्यास सक्त मनाई असते. त्यामुळे अर्थव्यवहार हे 'विना व्याज' असतात. जगभरात १८० इस्लामी बँका व १२० इस्लामीक बिगर बँक वित्तीय संस्था मायक्रो फायनान्सचे व्यवहार करीत असुन त्यांचे भांडवल ३०० कोटी अमेरिकन डॉलर इतके आहे. जकार्ता, जेधा, जॉर्डन, डेन्मार्क, लग्झंबर, स्वित्झर्लंड, जर्मनी, ब्रिटन, अमेरिका, भारत, अरब राष्ट्र, पाकिस्तान इ. सारख्या ५० पेक्षा अधिक देशात.  विना व्याज बँक व्यवसाय मुस्लीम लोकांच्या मायक्रो फायनान्स विषयक गरजा भागविण्यात व आर्थिक उन्नतीसाठी योगदान देत आहे.[२५]

११) व्हिक्टर ॲन्थोनी लिगोरे (२००८) आनंदीपणा हे वैयक्तीक जीवनाचे व एकूण राष्ट्रीय आनंदीपणा (जीएनएच) हे सामाजिक जीवनाचे 'भुतान' मध्ये एक महत्त्वपुर्ण लक्ष  मानण्यात आलेले आहे. चांगले शासन, संस्कृती संवर्धन, पर्यावरण संवर्धन आणि आर्थिक विकास हे स्थुल राष्ट्रीय आनंदाचे प्रमुख चार स्तंभ आहेत. त्यामुळे भुतानमध्ये जीएनएच साठी सुक्ष्म वित्त

सहाय्यक ठरत आहे. संस्कृती संवर्धन व पर्यावरण रक्षण हे चांगल्या शासन व्यवस्थेसाठी उपयुक्त ठरतात.[२६]

१२) कनानी गौतम, बांगलादेशात मायक्रो फायनान्स सर्व्हिसेसमुळे (बांग्लादेश रुरल ॲडव्हॉन्समेंट कमिटी) लाभार्थी कुटुंबाचा खर्च ३८% नी वाढला तर वित्तसाधने ११२% नी वाढले. ग्रामीण बँकेच्या सभासदांचे उत्पन्न बिगर सभासदांपेक्षा ४३% नी अधिक आहे.

- एल. साल्वाडोर मध्ये फि न्का च्या ग्राहकांचे साप्ताहिक उत्पन्न सरासरी १४५% नी वाढलेले आहे.
- घाना मध्ये बिगर लाभार्थीपेक्षा लाभार्थीचे उत्पन्न ५0% नी वाढले असून ८0% लाभार्थी भुकमुक्त झालेले आहेस.
- इंडोनेशिया मध्ये बँक रकैत इंडोनेशियाच्या ग्राहकांचे उत्पन्न ११२% नी वाढले असून ७0% कुटुंबे दारिद्र्य मुक्त झालेले आहेत.
- मायक्रो फायनान्स मुळे व्हीएतनाम मध्ये मुलांना मिळणाऱ्या अन्नाच्या तुटीत १/३ घट झालेली आहे.
- भारतात 'श्री' च्या ग्राहकांपैकी ५0% ग्राहक गरिबीमुक्त झालेले आहेत.[२७]

१३) डॉ. कुंदन (२00७) यांनी संपदा मासिकात महिला बचत गटांच्या माध्यमातून.... या शिर्षकांतर्गत विचार मांडले. फाटक्या – तुटक्या आयुष्याला ठिगळ घालत असतांना एखादा तुकडा बचत करावा आणि त्याच्या व्यक्तीगत व सामुदायिक व व्यक्तीगत वापर करावा या भावनेतून बचत गटाची संकल्पना जन्माला आहे. आज याच बचत गटांच्या माध्यमातून महाउर्जा निर्माण होऊ शकते हे गल्लीपासून दिल्लीपर्यंत आणि अगदी युनो पर्यंत सिद्ध केले आहे. हे बचत गट उद्याच्या उर्जेची ठिकाणे आहेत. परिवर्तनाची पहाट याच बचत गटांच्या उर्जेतून मिळणार आहे.[२८]

### ३.२.३ भारतातील पुर्व अध्ययनांचा परामर्श

१) पुहाझेंदी (१९९९) यांनी महिला सबलीकरण आणि भविष्यकालिन संभाव्यता याबाबत स्वयंसहाय्यता गटांच्या कार्यपद्धतीचे विश्लेषण केलेले आहे. अध्ययन कर्त्याच्या निरीक्षणावरुन, तामिळनाडूमध्ये स्वयंसहाय्यता गट हे सुक्ष्मवित्त प्रणालीच्या आधारे सहभागी महिलांच्या सामाजिक जीवनात सकारात्मक बदल घडवून आणीत आहेत. म्हणजेच महिलांचे सामाजिक सबलीकरण घडवून आणीत आहेत.[२९]

२) करमरकर के. जी. (१९९९) यांनी ग्रामीण पत आणि स्वयं सहाय्यता गट: भारतातील सुक्ष्मवित्त गरज आणि संकल्पना या विषयावर अध्ययन करतांना ओरीसातील दुर्गम भागातील गरीब मुख्यत: गरिब महिलांसाठी कर्जाची आवश्यकता, कर्जाची उपलब्धता आणि कर्ज उपलब्धतेतील समस्या या बाबींवर भर दिलेला आहे. दुर्गम भागातील गरिबांच्या लघु उद्योजकांच्या गरजा भागवून त्यांचे दारिद्र्य कमी करण्यात परंपरागत कर्ज पुरवठा व्यवस्था अपयशी ठरलेली आहे. त्यामुळे सुक्ष्म पत पुरवठा करण्यासाठी स्वयंसहाय्यता गटांची व्यवस्था उपयुक्त ठरु शकते.[३०]

३) पुहाझेंडी आणि सत्यसाई (२०००) यांनी स्वयंसहाय्यता गट बँक जोडणीनंतर सभासदांच्या राहणीमानाचे चिकित्सक अध्ययन केले. अध्ययनासाठी ११ राज्यातील २२३ स्वयंसहाय्यता गटांच्या ५६० सभासदांची नमुना निवड केली. प्रस्तुत अध्ययनाद्वारे सभासद महिलांमध्ये आत्मविश्वास व संभाषण आणि जागृतता वृद्धींगत झाल्याचे निदर्शनास आले.[३१]

४) मायराडा (२०००) अहवालानुसार, कर्नाटक राज्यातील डावान्ग्रे जिल्ह्यातील श्रीशक्ती स्वयं सहाय्यता, आदिशक्ती महिला संघांच्या अंतर्गत स्थापन

झालेल्या महिला स्वयंसहाय्यता गटांनी मद्यपान, हुंडा, बालविवाह या अयोग्य सामाजिक प्रथांविरुद्ध आवाज उठविला. श्रीशक्ती स्वयंसहाय्यता समूहाच्या वेष्टी अध्ययन (२००३) करण्यात आले. या अध्ययनानुसार, स्वजलधारा प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक लोक सहभाग निधी म्हणून गटातील महिलांनी ११००० रु. भरुन राबविला व पाण्याची समस्या सोडवून सामाजिक सहभाग दर्शविला.[३२]

५) रोहना हॉवर्थ (२०००) १९९५ पासून इंदिरा महिला योजना राबविली जाते. क्रेडिट ॲण्ड मायक्रो एंटरप्राईज डेव्हलपमेंट आणि डिपार्टमेंट ऑफ वुमेन ॲण्ड चाईल्ड डेव्हलपमेंट, गर्व्हमेंट ऑफ इंडिया, डिपार्टमेंट ऑफ इंटरनॅशनल डेव्हलमेंट, गर्व्हमेंट ऑफ युनायटेड किंगडम यांच्या संयुक्त विद्यमाने राबविला जातो. महिला स्वयंसहाय्यता गट स्थापनेस प्रोत्साहन व प्रशिक्षण देण्यामुळे अनेक ठिकाणी महिला स्वयंसहाय्यता गटांच्या यशोगाथा निर्माण झालेल्या आहेत. कर्नाटकातील बिजापूर जिल्ह्यात संगीत – ज्योती स्वयंसहाय्यता गटाच्या २० महिलांनी शिवणक्लास प्रशिक्षण केंद्र निर्माण करुन इतरांना प्रशिक्षण देणे, मंदिर बांधणे....इ. सारखी कार्य केलेली आहेत.[३३]

६) सुन्दरी एस. आणि गिथा एन. (२०००) यांनी ‘संस्थात्मक कर्जपुरवठा व लिंगभेदाचा गरिब आणि लघुउद्योजकांवर होणारा परिणाम याविषयी अध्ययन केले. समाज आणि संस्थांमध्ये लिंगभेदाचा प्रभाव पत पध्दतीवर दिसून येतो. त्यामध्ये अलिकडील काळात घट होत आहे. मात्र स्त्रियांची उत्पादन व कौशल्य मिळाल्यानंतर होऊ शकते. शिवाय पतमानांकन वाढविणे व बाजारविषयक दृष्टीकोन अवलंबवणे आवश्यक आहे.[३४]

७) कुरुश्रेष्ठ लक्ष्मी (२०००) यांनी 'सुक्ष्मवित्त : ग्रामीण गरिब महिलांसाठी नविन विकास संरचना या संशोधनपर लेखात भांडवलाची कमतरता हा ग्रामीण भागातील महिलांच्या विकासातील मुख्य अडथळा आहे. कर्ज मिळविण्याच्या कर्ज मंजुरी पध्दतीतील गुंतागुंतीची प्रक्रिया मारक ठरणारी आहे. म्हणून त्यांना सोप्या मार्गाने कर्ज उपलब्ध करुन दिल्यास कर्जाचा योग्य पध्दतीने वापर करणे शक्य होईल.[३५]

८) दधिची सी. एल. (२००१) यांनी 'ओरिएन्टल बँकेच्या माध्यमातून स्थापन झालेल्या स्वयंसहाय्यता गटांचे दारिद्र्य निर्मुलनातील योगदानाचे मुल्यमापन' या विषयावर चिकित्सक अध्ययन मांडलेले आहे. दधिची यांच्या मते ओरिएन्टल बँकेने ज्या गटांना लघुवित्तपुरवठा केला त्या गटांची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे. सुव्यवस्थितपणे लघुवित्ताचा केलेला वापर मोठ्या प्रमाणावर पुरक ठरतो आणि गटातील सभासद महिलांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी मदत करतो.[३६]

९) माल्कम हार्पर (२००२) यांनी सादर केलेल्या शोध निबंधात मांडलेले निष्कर्ष, ओरिसा राज्याच्या धनेकनल जिल्ह्यातील गोविंदपूर गावात एकात्मिक ग्रामीण हरिजन व आदिवासी विकास केंद्र या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या महिला स्वयंसहाय्यता गटांनी अंगूल युनायटेड मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज घेवून काजू लागवड व प्रक्रिया करण्याचे व्यवसाय सुरु केलेले आहेत.[३७]

१०) जया एस्. आनंद (२००२) यांनी शोध निबंधाद्वारे केरळ या राज्यात ९८% स्वयंसहाय्यता गट हे महिलांचे आहेत. अशा स्वयंसहाय्यता गट आणि शेजार समूहाची वेगवेगळ्या माध्यमांद्वारे स्थापना करून स्थिरतेसाठी प्रयत्न केले जात आहेत असे असतांना स्वयंसहाय्यता गट आणि बिगर

स्वयंसहाय्यता गट च्या यश आणि अपयशात कोणते घटक कारणीभूत आहेत याचा शोध घेणे या उद्देशातून  अध्ययन केले. अंतर्गत व बाह्य असे दोन्ही घटक प्रभाव पाडत असतात, शिक्षित व नियमितपणा आणि गतिशिल गट प्रमुख असावा, गटप्रमुखात स्थिरता व सभासदांचा एकजिनसीपणा, लोकशाही व पारदर्शकता, सहकार, एकता, एकमत इत्यादी घटकांचा प्रभाव पडतो.[३८]

११) मल्होत्रा अंजू (२००२) यांनी ''महिला सबलीकरणाचे मापन एक आंतरराष्ट्रीय विकासातील घटक/ चल या शिर्षकांतर्गत 'दारिद्र्य आणि लिंगभाव' या विषयावर जागतिक बँकेने आयोजित केलेल्या चर्चासत्रात जुन २००२ मध्ये पेपर सादर केला. महिला सबलीकरणातील विभिन्न दृष्टीकोनाचे चिकीत्सक अध्ययन आणि महिला सबलीकरण वृद्धींगत करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या धोरणांचे व कार्यक्रमांचे परिक्षण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.[३९]

१२) रितू के., कुशाव्ह आर. के., श्रीवास्तव अे. के. (२००३) यांनी संयुक्तपणे ''कानपुर देहात जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता गटांचा सामाजिक – आर्थिक प्रभाव'' या मथळ्याखाली योजना मासिकात प्रस्तुत अध्ययन मांडलेले आहे. अध्ययनासाठी २५ स्वयंसहाय्यता गटांची नमुना निवड करण्यात आली शिवाय गटात सामिल नसलेले २५ व्यक्ती नमुना म्हणून घेऊन दोहोंचे अध्ययन मांडण्यात आले. अध्ययनाचा प्रमुख निष्कर्ष म्हणजे सामाजिक व आर्थिक प्रगती आणि स्वयंसहाय्यता गटांचा जवळचा संबंध आहे. गटातील सहभागामुळे सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुधारते.[४०]

१३) दास सबीयासची (२००३) यांनी कुरुक्षेत्र जर्नलमध्ये 'स्वयंसहाय्यता गट आणि सुक्ष्म पत' याविषयी विचार मांडतांना, सुक्ष्मवित्त संस्थांमुळे गरिबांना

सुक्ष्मकर्जाची उपलब्धता होऊन त्यांच्या विकासासाठी पुरक ठरत आहे. तसेच स्वयंसहाय्यता गटांची वाढ असे निर्देशीत करते की, सर्वसामान्य व गरिब व्यक्तीसुद्धा त्यांच्यातील लघु उद्योजकता सुधारु शकतात. स्वत:जवळ असणारी पुंजी आणि सुक्ष्मपत यांच्या सहाय्याने आर्थिक विकास साध्य करु शकतात.[४१]

१४) ग्रामीण महिला विकास आणि सबलीकरण कार्यक्रम भारतातील ९ राज्यात १७५८७ महिला स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातुन २४०२३६ महिलांसाठी राबविला जात आहे. जागतीक बँकेने (जानेवारी २००३) एक अभ्यासगट या कार्यक्रमाच्या मुल्यमापनासाठी पाठवला होता. त्यांच्या अहवालानुसार गुजरात मधील भुकंपग्रस्त भागात मदत, हरियाणात लिंगभाव समानता, उत्तर प्रदेशात गरिबमहिलांसाठी विविध प्रकारच्या सेवा या कार्यक्रमाच्या माध्यमातुन पुरविल्या जात आहेत.[४२]

१५) भारतात महिलांच्या सबलीकरणासाठी विविध माध्यमातून मायक्रोफायनान्स केला जातो आहे. मायक्रोफायनान्स करणाऱ्या योजनांचे अध्ययन (आयसीपीआरडी – २००३) करून अधिक प्रमाणात मायक्रोफायनान्स इन्स्टिटयुशन्स गरिबातील गरिबापर्यंत सेवा पोहचविण्यात यशस्वी ठरलेल्या नाहीत. त्यामुळे प्रजोत्पादन, कौटूंबिक व्यवस्थापन व मायक्रो क्रेडीट प्रोग्राम असा तिहेरी ताण पडतो. म्हणुन गरिब महिलांनी गटात सहभागी होऊन हा ताण हलका करण्यासाठी प्रेरित व्हावे.[४३]

१६) सिन्हा अर्चना (२००४) यांनी ''महिला सबलीकरणासाठी सुक्ष्म वित्त एक घटक'' या विषयावर कुरुक्षेत्र मध्ये आर्टीकल दिलेले आहे. सिन्हा यांच्यामते, सुक्ष्म वित्तपुरवठा क्षमतेचा अभ्यास करण्यासाठी सुक्ष्म अध्ययनाची गरज आहे. सुक्ष्म वित्तपुरवठा गरिबी हटविण्यासाठी मार्गदर्शक

ठरु शकतो. मात्र लघुवित्तपुरवठा करतांना त्यात किती लवचिकता असावी. हे खरे आव्हान आहे. कारण कमी उत्पन्न असणाऱ्यांना वेगवेगळ्या कारणांसाठी कर्जाची गरज असते, अशावेळी वेगवेगळ्या कारणांसाठी कर्जाची सोय होणे गरजेचे आहे.[४४]

१७) शेख मोहंमद (२००४) यांनी महिला उद्योजकांच्या यशस्वीतेसाठी महिला स्वयंसहाय्यता गट ''संकेत स्थळावर प्रसिद्ध केलेल्या लेखात विचार मांडतांना, कोफी अन्नान यांच्या मताचा आधार घेऊन सांगितले की, गरिबी हटविण्यासाठी आणि एकसारखा विकास साध्य करण्यासाठी लिंगभेद नष्ट करणे गरजेचे आहे. परंतु भारतात त्याचा अभाव आहे. परंपरागत लिंगभेद विषयक विषमता कमी करण्यासाठी स्वयंसहाय्यता गट हे एक प्रभावी माध्यम ठरत आहे.[४५]

१८) डॉ. देशमुख जॉय (२००४) यांनी महिला सबलीकरणावर प्रभाव पाडणाऱ्या घटकांसंबंधी अध्ययन मांडलेले आहे. स्वयंसहायता गटांच्या माध्यमातून सभासदांना आर्थिक क्षेत्रात संधी उपलब्ध होत आहेत. स्वयंसहाय्यता गटांची सुक्ष्म वित्त व्यवहारासाठी बँकांशी जोडणी झाल्यापासून बचत, कर्जप्राप्ती, व्यावसायिक कौशल्य व उत्पन्न, मुलांचे शिक्षण व आरोग्य यावरील खर्च करण्याच्या क्षमतेत वाढ झालेली आहे. तसेच शासन व जनता यांच्यात जबाबदारी व पारदर्शकता यामध्ये वाढ घडून येण्यास मदत होते. महिला सबलीकरणाची अधिक संभाव्यता ही शिक्षण, आरोग्य निवारा आणि संरचना यासारख्या पुरक घटकांवर अवलंबून असल्याचे आढळून आले.[४६]

१९) रेड्डी (२००५) स्वयसहायता गटांचा प्रभाव प्रामुख्याने सामाजिक सौदार्ह सामाजिक शांतता व सामाजिक न्याय याबाबत विशेष नोंद करण्यासारखा

आहे. सामाजिक सौदार्ह म्हणजे एका किंवा भिन्न समाजाच्या व्यक्तींमध्ये एकता व समानता निर्माण होणे स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून एक किंवा भिन्न समाजाच्या व्यक्ती एकत्र येवून समान व एकतेच्या भावनेने कार्यरत असतात. त्यामुळे शेकडो वर्षापासून सामाजिक विषमतेची असलेली दरी कमी होण्यास मदत होत आहे.[४७]

२०) डॉ. रेड्डी (२००५) यांनी तयार केलेल्या अहवालानुसार 'स्वयंसहाय्यता गट भारतातील सुक्ष्मवित्त एक मैलाचा दगड– सामाजिक सुरक्षितता आणि महिला सबलीकरण' स्वयंसहाय्यता गटांचे सुक्ष्म वित्ताच्या माध्यमातून चालणाऱ्या कार्याचा प्रभाव.... सामाजिक शांतता व सौदार्ह्य भिन्न सामाजिक स्तर किंवा गटातील लोकांमध्ये समता व एकतेचे सहसंबंध स्वयंसहाय्यता गटातील सहभागामध्ये प्रस्थापित होतात. स्वत:च्या व गटाच्या उत्कर्षासाठी एकत्र आलेले सभासद जातीच्या भिंत्ती ओलांडून एकात्मतेने एकत्र राहतात त्यामुळे शेकडो वर्षांपासून जाती व वर्णभेद हळूहळू कमी होत असल्याचे आढळून येते.

सामाजिक न्याय स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून सभासदांना आपल्या हक्कांची जाणीव जागृती निर्माण होण्यास प्रामुख्याने महिलांना त्यांच्या हक्क अधिकारांची जाणीव निर्माण होण्यास मदत होत आहे. परिस्थितीनुसार सकारात्मक व नकारात्मक पैलूंचा विचार करुन स्वत:च्या व गटाच्या माध्यमातून आपले हक्क प्राप्त करण्याची क्षमता निर्माण होण्यास मदत होत आहे. त्यातून महिलांना कौटुंबिक व सामाजिक पातळीवर अधिक 'स्पेस' मिळत आहे.[४८]

२१) जोशी मिनाक्षी (२००५) यांनी उत्तरांचल मधील पुरी, नैनिताल, उद्यमसिंग नगर जिल्ह्यातील ४९६ स्वयंसहाय्यता गटातील ६२०० महिलांची पाणलोट

प्रकल्पाशी असलेल्या जोडणीचे चिकित्सक अध्ययन केले. स्वयंसहाय्यता गटातील महिलांनी पाणी पुरवठा तलाव-पाटचाऱ्या व बायोगॅस आणि फळबागा यांची निर्मिती करण्यात यशस्वी योगदान दिलेले आहे. या प्रकल्पात काम करणाऱ्या महिलांमध्ये स्वत:ची जबाबदारी व हक्क याबाबत जागृतता निर्माण झालेली आढळून आली. पंचायत राज संस्थामधुन होणाऱ्या निर्णय प्रक्रियेत व निर्णयात दबावतंत्र आणि श्रमदान, रोजगार विषयक कामात अधिक सहभाग नोंदविला जात आहे.[४९]

२२) डॉ. जयरामन् (२००५) तामिळनाडूतील मच्छिमार स्वयंसहाय्यता गटांच्या योगदानाचे अध्ययन करतांना ७२५ गटांचे सर्वेक्षण करण्यात आले. मच्छिमार महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणासह उच्च रहाणीमान प्राप्तीबाबत स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातुन होणारा पतपुरवठा कसे योगदान देत आहेत याबाबत निष्कर्ष मांडले. प्रस्तुत अध्ययनातून ९६% गट हे ख्रिश्चन व ४% गट हे हिंदू (अनु. जाती–जमाती) महिलांचे असुन ८६% महिला बँक व्यवहारात सहभाग घेतात ७५% महिला कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत सहभाग नोंदवितात, ६८% महिला साप्ताहीक व ३२% महिला दर महिना बचत करतात, ४१% महिलांनी उत्पन्न निर्मितीच्या व्यवसायासाठी कर्ज घेतलेले असुन १४% गट हे परंपरागत व्यवसायात व २३ गट हे नविन व्यवसायात गुंतलेले आहे. या माध्यमातुन समुद्र किनाऱ्यावर रहाणाऱ्या गरीब महिलांपर्यंत बँक व्यवहार पोहचलेले असुन नफा देणारे व्यवसाय करून उत्पन्न व राहणीमानात वाढ घडवुन आणण्यात मदत मिळत आहे.[५०]

२३) नायर मनोहर आणि गिरीजा (२००५) यांनी संयुक्तपणे ''सुक्ष्मवित्त : दारिद्र्य निर्मुलन आणि महिला सबलीकरणासाठी नवीन विकास संरचना'' या अध्ययनाद्वारे असे निदर्शनास आणुन दिले की, 'गरिबी हटाव' कार्यक्रम

संघटीत पतपुरवठ्याच्या माध्यमातून यशस्वी झाले नाहीत म्हणून ही दरी भरुन काढण्यासाठी, खालच्या स्तरापर्यंत वित्तपुरवठा करण्याची नाबार्डची स्वयंसहाय्यता गट–बँक जोडणी योजना उपयुक्त ठरलेली आहे.[५१]

२४) डॉ. रथ (२००६) ओरिसा शासनास सादर केलेल्या अहवालाचा प्रमुख निष्कर्ष, ओरिसा मधील के. बी. के. जिल्ह्यातील महिला स्वयंसहाय्यता गटामुळे मागास व दुर्गम प्रदेशातील गरिबांचे रोजगारासाठी व उत्पन्नासाठी होणारे स्थलांतर स्वयंसहाय्यता गटांच्या उत्पन्न व रोजगार निर्मितीच्या लघु व्यवसायांमुळे कमी होण्यास मदत होत आहे.[५२]

२५) सिंग. एस. के. (२००६) यांनी नियोजन मंडळ, भारत सरकार यांच्यावतीने उत्तर प्रदेश आणि उत्तरांचल राज्यातील अनुसूचित जातींच्या महिलांच्या सबलीकरणाचे अध्ययन पूर्ण केले. प्रस्तुत अध्ययनात शास्वत विकासासाठी आर्थिक व सामाजिक सबलीकरण हे साधन आहे. प्रामुख्याने महिलांच्या विकासासाठी महिला सबलीकरण अत्यावश्यक असुन स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातुन समाजातील नाकारलेल्या वर्गातील म्हणजे अनुसूचीत जातीतील महिलांचे सबलीकरण घडुन येत आहे.[५३]

२६) पाण्डेयन साऊंदर एम. (२००६) यांनी स्वयंसहाय्यता गटाच्या भरभराटीचा तसेच सुक्ष्म वित्त पुरवठ्याचा उद्योजकतेवर झालेला परिणाम अभ्यासला त्यांच्यामते जरी स्वयंसहाय्यता गटांच्या विकासाचा दर चांगला व अपेक्षित असला तरी स्थान व राज्यपरत्वे मोठी भिन्नता आहे.[५४]

२७) अलॉईस पी. फर्नांडीस (२००७) यांनी सादर केलेल्या शोध निबंधात शेती विकासासाठी आंतरराष्ट्रीय निधीने प्रत्येक महिला स्वयंसहाय्यता गटासाठी

८ ते १० हजार रुपये खर्च केले. त्यानंतर तामिळनाडूत १९९८ मध्ये २८५००० स्वयंसहाय्यता गट राज्य शासन व स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून स्थापन झाले. महाराष्ट्रात १९९४ मध्ये महिला आर्थिक विकास महामंडळाच्यावतीने महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रम १२ जिल्ह्यातील ९०६ खेड्यात राबविण्यात आला. परिणामी महिला सबलीकरणास चालना मिळाली.[५५]

२८) शिवल बी. आर. (२००८) यांनी केरळ राज्यातील कदंबश्री या संस्थेच्या अंतर्गत स्थापन झालेल्या महिला गटांचा सामाजिक शांततेशी असणारा सहसंबंध शोधून काढण्यासाठी अध्ययन केले. कंबश्रीच्या माध्यमातून स्थापन करण्यात आलेले स्वयंसहाय्यता गट सक्षमपणे आर्थिक सबलीकरणाकडे वाटचाल करीत आहेत. त्यामुळे कौटुंबिक पातळीवरील ताण-तणाव कमी होऊन कौटुंबिक हिंसा याबाबत घट होतांना आढळून आलेली आहे. कौटूंबिक व सामाजिक शांतता निर्माण करण्याचे माध्यम ठरत आहे.[५६]

२९) महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक, ओरिसा, तामिळनाडू, उत्तर प्रदेश सहा राज्यातील २४ जिल्ह्यात व्यष्टी अध्ययन (एनसीएइआरटी – २००८) च्या माध्यमातून करुन स्वयंसहाय्यता गटांची बँक जोडणी कार्यक्रमाचे परिणाम आणि आर्थिक वृद्धी या संकल्पनेचे अंतर्गत भिन्न बाबींचे बँक जोडणी पुर्वी व नंतर अशा संदर्भात अध्ययन करण्यात आले. स्वयंसहाय्यता गटात सहभागी झालेल्या महिला वैयक्तीक उत्पन्न निर्माण करुन देणाऱ्या व्यवहारांचा अधिक उपयोग करुन घेत आहेत. काही गट हे गटाचे एकूण उत्पन्न वाढविण्यासाठी सहाय्यक असणाऱ्या व्यवसाय व व्यवहारांना यशस्वीपणे प्राधान्य देत आहेत. स्वयंसहाय्यता गट हे व्यक्तीमत्त्व विकासासाठी, वित्तीय कौशल्य व सुसंवाद क्षमता यामध्ये वाढ घडवून

आणण्यासाठी प्रेरक ठरत आहेत. मात्र सामान्यपणे तांत्रिक कौशल्य, विक्रय कला प्रदान करण्यात फारसे यशस्वी ठरलेले नाहीत.[५७]

३०) मोरे जे. बी. (२००८) यांनी ''स्वयंसहाय्यता गट भारतासारख्या खेड्यांच्या देशात दारिद्र्य निर्मुलनाचा एक मार्ग'' या विषयावर मांडलेल्या लेखात विचार मांडले. भारत हा एक खेड्यांचा देश असून महासत्ता होण्याची क्षमता ठेवून आहे. तरीसुद्धा २५% लोकसंख्या दारिद्र्यात आहे. प्रामुख्याने दारिद्र्यामुळे स्त्रियां अधिक प्रभावीत होत आहेत. यातून मार्ग काढण्यासाठी स्वयंसहाय्यता गट स्थापनेच्या माध्यमातून दारिद्र्य निर्मूलन होणे शक्य आहे.[५८]

३१) सिंग गुरमित (२००९) ''सुक्ष्मवित्त : ग्रामीण भागातील नवीन पतपध्दती'' या विषयावर अध्ययन केले. त्यांच्या मते २००१ पर्यंत दक्षिणेकडील आंध्र, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू या राज्यांमध्ये एकूण गटस्थापनेपैकी ७१% गट होते. त्यात अलीकडे ४४ टक्के पर्यंत घट झाली. तर उत्तरप्रदेश बिहार सारख्या राज्यांमध्ये स्वयंसहाय्यता गट स्थापनेबाबत उदासिनता दिसून येते. यावर उपाय म्हणून शासनाने सुक्ष्मवित्त पुरवठा संस्थांनी व सेवाभावी संस्थांनी आढावा घेण्याची आवश्यकता आहे.[५९]

३२) दिव्य, कौल निनाद (२००९) यांनी महिला स्वयंसहाय्यता गट आणि सुक्ष्मवित्त या विषयावर अध्ययन करुन स्वयंसहाय्यता गटांचे मुख्य कार्य पत नियोजनाचे असते. आदिवासी महिलांच्या कुटूंबांच्या गरजा भागविण्यासाठी पत निर्मिती व पत व्यवस्थापन महत्त्वाचे असते असे मत मांडले. तसेच स्वयंसहाय्यता गटांनी महिलांना शासन किंवा इतरांवर अवलंबून राहण्यापेक्षा आत्मनिर्भर होणे व स्वत:च्या जबाबदाऱ्या स्वत: पार पाडणे विषयक शिक्षण दिले पाहिजे.[६०]

३३) फुआ इटल (२००९) स्वयंसहाय्यता गटातील दोन किंवा तीन सभासद सक्रीय असतात तर इतर सदस्य अपेक्षित सक्रीय नसतात. तसेच गटातील महिलांच्या आधारे कुटूंबातील पुरूष मिळणाऱ्या 'पत' चा वापर करीत असतात. गटांच्या व्यवसायासाठी घरातील मुलांचा प्रामुख्याने मुलींचा वापर वाढलेला आढळून येतो. म्हणजे मुलींवरील कामाचा ताण वाढलेला दिसुन येतो. शिवाय गटातील ६0% पेक्षा अधिक महिलांचे (ब्युरा– २००४) उत्पन्न व खर्चावर पुर्ण नियंत्रण नसून पती किंवा घरातील पुरूषांचे नियंत्रण असल्याचे मत आहे.[६१]

३४) आयआयपीओ गट (२०१०) ने ''स्वयंसहाय्यता गट : महिला सबलीकरणाचे माध्यम'' या विषयावरील अध्ययनाद्वारे निष्कर्ष मांडलेले आहेत. स्वयंसहाय्यता गटाच्या प्रगतीमुळे सभासदांचा आर्थिक स्तर व राहणीमान उंचावुन सामाजिक शक्ती निर्माण होईल. एक चांगला देश निर्माण करण्यासाठी महिलांचे सशक्तीकरण आवश्यक आहे. महिला सबलीकरणामुळे कुटूंबाचे विचार मुल्यांचे संवर्धन आहे. महिला सबलीकरणामुळे कुटूंबाचे विचार मुल्यांचे सावर्धन होऊन एक चांगला समाज करण्यात येईल. मात्र सबलीकरणासाठी घटनेने दिलेले अधिकार व कायदे किंवा सरकारी योजना परिणामकारक ठरलेल्या नाहीत.[६२]

३५) आमोद (२०१०) भारतात १९९२ च्या दरम्यान बचतगटांची सुरुवात झाली आणि त्याद्वारे महिलांच्या आर्थिक उन्नतीची, सुरक्षिततेची कवाडे उघडली गेली. सावकारी कर्जाचे दृष्टचक्र, मोडीत निघुन, बँकांनी पारंपारिक व्यवसायाला बगल देऊन बचत गटांना सहाय्य केले. त्याद्वारे महिलांच्या आर्थिक सबलीकरणास सुरुवात झाली आहे आणि गटांची वाटचाल योग्य दिशेने सुरु आहे.[६३]

३६) बालानारायण एस. आणि कालीचंद्रन के. (२०११) यांचा तामिळनाडूतील स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून महिला सबलीकरण एक व्यष्टी अध्ययन करुन तयार केलेला पेपर इंटरनॅशनल जर्नरल ऑफ बिझनेस इकॉनॉमिक्स ॲण्ड मॅनेजमेंट रिसर्चमध्ये प्रसिद्ध झालेला आहे. या पेपरमध्ये तामिळनाडूतील अरियालूर जिल्ह्याच्या आनंदवाडी खेड्यातील महिला सबलीकरण व महिला उपक्रमशिलता आणि आर्थिक विकासात स्वयंसहाय्यता गटांच्या भूमिकेचे अध्ययन मांडण्यात आलेले आहे. शेती क्षेत्राशी संबंधीत महिलांचे गट निवडून अनुसूचीच्या आधारे तथ्य संकलीत करुन स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून महिलांचे उत्पन्न वाढून कौटुंबिक खर्चात सहभाग वाढलेला आहे. तसेच स्वातंत्र्य वृद्धींगत होवून लिंगभेद कमी झालेला आहे. असा मुख्य निष्कर्ष मांडलेला आहे.[६४]

३७) वाले व्ही. एस. आणि देशमुख अे. एम. (२०११) यांनी (आयएसआरजे) जर्नलमध्ये ''स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून महिला सबलीकरण' या विषयावर अध्ययन करुन निष्कर्ष मांडले. त्यांच्या मते महिलांचे सबलीकरणाचे यश आणि व्युहरचना ही गटाच्या सभासदांची शैक्षणिक पात्रता, कठीण परिश्रम, कुटूंबाचा आकार, सामाजिक वातावरण, योजनेची अंमलबजावणी यंत्रणा या सारख्या घटकांवर अवलंबून असते.[६५]

३८) गणपत्ये श्रुती (२०११) यांनी 'बचतगट चळवळीपुढे आव्हानांचे डोंगर' या शिर्षकांतर्गत दिव्यमराठी दैनिकात मांडलेली मते– महाराष्ट्र राज्यासह संपुर्ण भारतात अत्यंत गरिब परिस्थितीतून येऊन बचत गटांच्या माध्यमातून स्वत:च्या पायावर उभ्या राहिलेल्या महिलांच्या यशस्वी कहाण्या वाचायला मिळतात. मात्र अल्प कर्जपुरवठादार संस्थांचे कर्जाचे अव्वाच्या सव्वा दर आणि राजकीय पक्षांकडून गटाचा होणारा राजकीय वापर अशा कारणांमुळे

महिला बचत गटांच्या चळवळीला घरघर लागल्याचे दिसते. आंध्र प्रदेशात ४० ते ५० टक्के व्याज दरामुळे कर्जफेड करता न आल्याने (अखिल भारतीय जनवादी संघटना) १०० पेक्षा अधिक महिलांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत.[६६]

### ३.२.४ ग्रामीण व शहरी भागातील अध्ययनांचा परामर्श

१) बोकिल मिलिंद (२००३) यांनी महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील ज्या महिला गटात कार्यरत आहे अशा १५० महिलांचे तुलनात्मक अध्ययन करून, शहरी भागात २१% महिलांनी व ग्रामीण भागात १०% महिलांनी स्वत:च्या उत्पन्नातुन घरे बांधलेली आहेत. उर्वरीत महिला कौटुंबिक मालकीच्या घरात रहातात. कारण परंपरागत व्यवसाय करून शहरी भागातील ७५.४% व ग्रामीण भागात ६२% कुटूंबाचे मासिक उत्पन्न ३००० रू पेक्षा कमी आहे. शहरी भागातील ६०% व ग्रामीण भागातील ७०% महिला अधिक काम व ताण यामुळे आरोग्य तक्रारींनी ग्रस्त आहेत. म्हणुन दोन्ही विभागातील महिलांना अधिक वित्त सहाय्याची गरज आहे.[६७]

२) बोकिल मिलिंद (२००५) भारतातील ग्रामीण व शहरी भागात कौटुंबिक हिंसा ही एक मोठी समस्या आहे. कौटुंबिक हिंसा नष्ट करण्यासाठी स्वयंसहाय्यता गटांची मदत होईल का? याबाबत महाराष्ट्रातील महानगर, शहर,निमशहर व ग्रामीण विभागातील स्वयंसहाय्यता गटांच्या महिला सभासदांकडून माहिती मिळवुन निष्कर्ष मांडण्यात आले, कौटुंबिक हिंसाचारात प्रामुख्याने तरूण महिलांचा अधिक समावेश असतो. तसेच समाजातील सर्व स्तरात व सर्व विभागात हिंसाचार आढळुन येतो. मात्र मुस्लीम महिलांच्या बाबत हे प्रमाण अधिक आहे.[६८]

३) वीणापानी (२००९) यांनी ग्रामीण आणि शहरी महिला स्वयंसहाय्यता गटाचे तुलनात्मक अध्ययन करुन महिला सबलीकरणात सुक्ष्म वित्त व्यवहारांचे माध्यम कितपत यशस्वी ठरत आहे. याबाबत संशोधनपर निष्कर्ष मांडलेले आहे. त्यासाठी त्यांनी आंध्र प्रदेशातील (तेलंगाना विभागातील) रंगारेड्डी जिल्ह्याच्या ग्रामीण ५० व शहरी ५० स्वयंसहाय्यता गटांची निवड करुन तुलनात्मक अध्ययन मांडले.

- शहरी व ग्रामीण अशा दोन्ही भागातील स्वयंसहाय्यता गटात सहभागी झालेल्या महिलांपैकी ८२ टक्के महिला दारिद्र्य रेषेच्या वरती आलेल्या आहेत.
- शहरी भागातील स्वयंसहाय्यता गट हे ग्रामीण स्वयंसहाय्यता गटांपेक्षा महिलांना अधिक उत्पन्न मिळवून देत आहेत.
- शहरी भागातील सहभागी महिला मिळणाऱ्या उत्पन्नापैकी ४४% उत्पन्न मुलांच्या शिक्षण व आरोग्य गरज भागविण्यासाठी खर्च करतात. ग्रामीण भागात हे प्रमाण फक्त ४% इतके आहे.
- स्वतंत्र जीवन, आत्मविश्वास व निर्णय प्रक्रियेतील सहभाग याबाबत शहरी गटातील महिला अधिक प्रभावी ठरत आहेत. मात्र ग्रामीण गटातील महिला सामुहिक कार्यक्रमात अधिक सहभागी होतात.
- महिला सबलीकरणाबाबत ग्रामीण व शहरी स्वयंसहाय्यता गट हे प्रभावी माध्यम ठरत आहे. त्यात शहरी गट हे अधिक सक्षम असल्याचे आढळून येते.
- सामाजिक सबलीकरण हे गटाच्या आर्युमान व परिपक्वतेवर आधारित आहे. तर आर्थिक सबलीकरण हे योग्य व्यवसाय निवड व त्याबाबत मिळणाऱ्या प्रशिक्षणावर अवलंबून आहे.[६९]

४) तालेकर. एस. डी. (२०१०) यांनी ग्रामीण भागातील ३० स्वयंसहाय्यता गट व शहरी भागातील ३० स्वयंसहाय्यता गटाच्या महिलांचे तुलनात्मक

अध्ययन करुन निष्कर्ष मांडले. ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागातील महिला प्रामुख्याने उत्पन्न मिळवून देणाऱ्या क्रिया आणि मालमत्ता निर्मितीचा प्रयत्न करीत आहेत. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागातील महिला अधिक प्रमाणात व सातत्य ठेवून बचत करतात. शहरी भागातील गट महिला सभासदांना ३००० रु. पेक्षा अधिक कर्ज देतात. तर ग्रामीण भागातील गट सभासदांना सरासरी १०००-२००० रु. पर्यंत कर्ज देतात. दोन्ही भागातील गट हे 'कृती आणि बदलासाठी' हे तत्व आत्मसात करुन आहेत.[७०]

५) नागभुषण राव आणि गितांजली (२००९) यांनी आंध्रप्रदेशातील श्रीकाकुलम् जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येकी ७५ महिला स्वयंसहाय्यता गटांचे अध्ययन करून, बालआरोग्य, बालविवाह, कुटूंबनियोजन, आत्मविश्वास, निर्णय प्रक्रियेतील सहभाग, खर्चात रचनात्मक बदल इत्यादी बाबत स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून सभासदांमध्ये सकारात्मक परिवर्तन होत आहे. मात्र जुनाट व खोलवर रूजलेल्या परंपरागत विचारांमुळे कौटूंबिक हिंसा व हुंडा पद्धती याबाबत मात्र दोन्ही विभागात परिणाम झालेला आढळून आला नाही.[७१]

### ३.२.५ महाराष्ट्र राज्यातील पुर्व अध्ययनांचा परामर्श

१) महाराष्ट्र राज्याच्या सातारा जिल्ह्यातील सर्वेक्षणाच्या आधारे बचत गटातील महिलांमध्ये झालेल्या विकासात्मक बदलांचा तुलनात्मक अभ्यास (प्रभा कदम) करण्यात आला. बचत गटांच्या माध्यमातून महिलांच्या बँक व्यवहारात सकारात्मक वाढ झाली, स्त्री उद्योजकतेत वाढ झाली, सरकारी योजनांबाबत जागृतता निर्माण झाली, गतिशिलतेत वाढ झाली. शिवाय सामाजिक कार्यात सहभाग वाढला. फलटण येथील गटांनी वृक्षारोपण कार्यक्रम व पुसेगाव येथील गटांनी शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा सत्कार

केला. १५ ऑगस्ट व २६ जानेवारीला महाबळेश्वर गुरेधर येथील महिला ध्वजास मानवंदना देण्यास उपस्थित राहतात.[७२]

२) महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्ह्यातील महिला बचत गटांचे अध्ययन (डॉ. बारबोले) करुन, सरकारने महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्यासाठी वित्तीय तरतूद केली असली तरी बचत गटांच्या ज्या तांत्रिक व सर्वसामान्य समस्या आहेत. त्या जाणीवपुर्वक सोडविण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामुळे लघुवित्त पुरविण्याच्या संकल्पनेचे अधिक चालना मिळेल. शिवाय त्या त्या जिल्ह्यातील महिला बचत गट अधिक प्रभावशाली व स्वावलंबी होतील.[७३]

३) महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागातील औरंगाबाद, जालना, उस्मानाबाद, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर आणि बीड या जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागात होणाऱ्या मायक्रो फायनान्स व्यवहारांबाबत सभासदांमध्ये असणारी जागृतता (डॉ. सुबलक गायकवाड आणि भेवाले) वाढलेली आहे. बचत, कर्ज, व्याजदर, कर्ज परत फेड इ. वित्तीय सेवांच्या बाबत माहिती व महत्त्व वृद्धींगत झालेले आढळून आले.[७४]

४) मनिषा पिंगळे (२००७) पुणे जिल्ह्यात तिकोणा किल्ल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या तिकोणा पेठ या गावात जीवन संस्थेच्या माध्यमातून बचत गटांना सुक्ष्मवित्त सुविधांचे माध्यम पुरविण्यात आले. त्यामुळे गावातील ३० बचत गटांनी विकसित केलेल्या मावळ सम्राट हा तांदुळाची देशभरात विक्री केली जात आहे. शांताबाई या अल्पशिक्षित महिलेच्या प्रेरणेने 'महिलांना संधी मिळाल्यास त्या औद्योगिक केंद्र चालवू शकतात' सिद्ध करुन

दाखविले आहे. परिणामी महिलांना रोजगार, प्रतिष्ठा, सुरक्षितता व सन्मान मिळालेला आहे.[७५]

५) वाणिज्य विद्या (२०१२) महिलांची मानसिकता बदलून त्यांच्या आर्थिक सबलीकरणासाठी श्रीमती नीलिमा मिश्रा यांनी बचत गटांच्या माध्यमातून प्रयत्न केले. बचत गटांच्या महिलांनी शिवलेल्या 'गोधड्या' ॲना गॉडफेच्या माध्यमातून विदेशी बाजारात पेठेत निर्यात करण्यात येत आहे. त्यामुळे श्रीमती मिश्रा यांना रोमन मॅगेसेस पुरस्कार देवून गौरविण्यात आले आहे.[७६]

**३.२.६ शहरी भागातील पुर्व अध्ययनांचा परामर्श**

१) वाडीनियाले सरोज (२००४) यांनी 'झोपडपट्टीतील महिलांचे बचत-कर्ज कार्यक्रमाद्वारे सबलीकरण' या विषयावर अध्ययन करून सादर केलेल्या अहवालानुसार, बडोदा शहरातील नमुना निवड झालेल्या १७५ महिलांपैकी ७०% महिला २०-४५ वयोगटातील व ८४% महीला अनुसूचित जमातीच्या होत्या. बचत-कर्ज कार्यक्रमामध्ये सहभागी झाल्यामुळे महिलांनी घराची कायमस्वरूपी रचना बदलली, घराची सजावट बाबत जागृतता वाढली, मिळणाऱ्या अन्नाबाबत संख्यात्मक व गुणात्मक वाढ झाली. ९७% महिलांचे बँकेत वैयक्तिक खाते असुन ३% महिलांचे संयुक्त खाते आहे. मात्र बालविवाह व महिला योजनांबाबत जागृतता निर्माण झालेली आढळून आली नाही.[७७]

२) आयशा खान (२००६) यांनी हैद्राबाद शहरातील २२५ महिला स्वयंसहाय्यता गटांचे अध्ययन करून निष्कर्ष मांडले. आज या स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून संथगतीने का असेना परंतु झोपडपट्टीतील वातावरण बदलत

आहे. सुक्ष्मवित्तामुळे लहान – लहान प्रमाणात व्यवसाय सुरु होऊन उत्पन्न निमिर्तचे झरे निर्माण होत आहेत.[७८]

३) गुप्ता (२००६) यांनी महिलांच्या आर्थिक सबलीकरणाचे अध्ययन करण्यासाठी 'चंदीगड' शहरात पंजाब इंजिनिअरिंग कॉलेजच्या माध्यमातून एक प्रकल्प हाती घेण्यात आला. त्या अंतर्गत ३ स्वयंसहाय्यता गट स्थापन करण्यात आले. या गटांच्या सुक्ष्मवित्त व्यवहारांचे अध्ययन करुन मिळालेले निष्कर्ष - स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून सहभागी महिलांच्या उत्पन्नात वाढ झाली त्यामुळे कर्जबाजारी असणाऱ्या महिला जुने कर्ज फेडण्यास व नवीन भांडवल उभारणीस पात्र ठरत आहेत. तसेच उद्योजकीय कौशल्यात वाढ होऊन गटांचा व्यवसाय व्यवस्थितपणे सांभाळत आहेत. परिणामी आर्थिक सबलीकरण घडून आलेले आहे.[७९]

४) पलानीचीमी (२००८) यांनी पॉन्डेचरी शहराच्या समुद्र किनाऱ्याजवळ राहणाऱ्या मच्छिमार महिला प्रामुख्याने २००४ च्या त्सुनामी मुळे प्रभावित झालेल्या महिलांच्या सबलीकरणात सुक्ष्मवित्ताची भूमिका या विषयावर अध्ययन करुन मांडलेले निष्कर्ष – पॉन्डेचरी च्या किनाऱ्यालगत असणाऱ्या महिलांच्या सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता गट सहाय्यक ठरत असल्याचे सिद्ध झालेले आहे. त्यामुळे भारतातील अनेक ठिकाणी मासेमारी किंवा तत्सम व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या दारिद्र्य निर्मुलनात व सबलीकरणात सुक्ष्म वित्त महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहेत. हे या अध्ययनावरुन पुन्हा सिद्ध होते. तसेच अध्ययन कर्त्या महिलांना अनेक प्रश्न अनेकविध प्रश्न विचारले.[८०]

५) रमादेवी (२००९) यांनी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या माध्यमातून स्थापन करण्यात येणारे महिला बचत गट शहरी भागात

महिलांचा आर्थिक स्तर उंचावण्यास कितपत यशस्वी ठरतात. याबाबत हैद्राबाद शहरात अध्ययन करण्यात आले. हैद्राबाद शहरातील महिला बचत गट हे महिलांना आर्थिक स्थर उंचावण्यास सहाय्यक ठरत आहेत. यात शंका नाही. मात्र आर्थिक स्तर उच्च होऊन दारिद्र्य निर्मुलन घडवून आणण्यासाठी गटांना सातत्यपुर्ण व वाढीव आर्थिक सहाय्याची म्हणजे सुक्ष्मवित्ताची गरज आहे.[८१]

६) बैरागी (२००९)यांनी महाराष्ट्र राज्याच्या पुणे शहरातील झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांच्या दारिद्र्य निर्मुलना संदर्भात स्वयंसहाय्यता गटांचे विश्लेषणात्मक अध्ययन मांडण्यात आले आहे. पुणे शहराच्या झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांचे दारिद्र्य निमुर्लन घडवून स्वयंसहाय्यता गट हे शहरी झोपडपट्टीत राहणाऱ्या गरिब व्यक्तींच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्याचा एक महत्त्वाचा स्त्रोत ठरत आहे.[८२]

७) डॉ. अझरूद्दीन यांनी महाराष्ट्रात राज्याच्या बीड जिल्ह्यात ‘अंबेजोगाई’ येथे मानवलोक ही स्वयंसेवी संस्था १९८२ मध्ये स्थापन झाली. ग्रामीण भागातील गरिबांच्या आर्थिक आणि सामाजिक उत्थानासाठी स्थापन झालेल्या या संस्थेने बीड जिल्ह्यातील १५० खेड्यांमध्ये मायक्रो फायनान्स च्या आधाराने मनस्विनी महिला प्रकल्प (महिला कल्याण) साखर शाळा (श्रमिकांच्या मुलांसाठी) कृषक पंचायत (बीयाणे, खते, पुरवठा) बळीराजा ग्राहक सहकारी सोसायटी, श्रावण बाळ (जेष्ठ नागरिकांना कपडे, औषधेसाठी ५००० रु.) मोलकरीण संघटना, आरोग्य कार्यक्रम इ. सारखे, कायर्क्रम राबवितांना स्वयंसहाय्यता गटांचे माध्यम वापरले. त्यामुळे बीड जिल्ह्यात समाजातील दुर्बल घटकांचे साधन सामुग्रीच्या योग्य वापरासाठी योगदान मिळत असून त्याद्वारे दुर्बल घटकांच्या आर्थिक व सामा. कल्याणात भर पडत आहे.[८३]

८) तलवारे जितेंद्र डी. (२०११) यांनी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचे आर्थिक व सामाजिक मुल्यमापनः खान्देश एक अभ्यास या विषयावर अध्ययन करुन मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक 'अर्थसंवाद' मध्ये लेख मांडलेला आहे. प्रस्तुत लेखात जळगाव जिल्ह्यातील जळगाव, अमळनेर व पारोळा आणि धुळे जिल्ह्यातील धुळे शहर व नंदुरबार जिल्ह्यातील नंदुरबार शहर अशा एकूण पाच शहरातील १२० शहरी स्वयंसहाय्यता गटांचे अध्ययन केलेले आहे. प्रस्तुत अध्ययनाद्वारे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेमुळे महिलांचे सबलीकरण होण्यास मदत झाली आहे. सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेमुळे महिलांमध्ये बचतगटांचे प्रमाण वाढले आहे. ही गृहीतकृत्ये सिद्ध झाल्याचे व नागरी रोजगार योजनांमुळे लाभार्थींच्या राहणीमानाचा दर्जा सुधारला आहे हे गृहितकृत्ये असत्य असल्याचे सिद्ध झालेले आहे.[८४]

### ३.२.७ विद्यावाचस्पती पदवी संशोधन

१) **नवीन कुमार** यांनी ''बिगर कृषी क्षेत्राच्या विकास प्रक्रियेतील स्वयंसहाय्यता गटांच्या भूमिकेचे अध्ययन'' या विषयांतर्गत पीएच. डी. प्रबंध पुणे विद्यापीठ पुणे यांना २००० मध्ये सादर केलेला आहे.[८५] प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे.

१. स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बिगर कृषि क्षेत्राच्या विकासात स्वयंसहाय्यता प्रोत्साहन संस्थांनी विकसीत केलेल्या मार्गाची आणि प्रणालीची माहिती करुन घेणे.

२. स्वयंसहाय्यता गटांची उभारणी, कार्य आणि बँक जोडणी प्रक्रियेची सभासदांना असलेल्या माहितीची तपासणी करणे.

३. बिगर शेती क्षेत्रातील समस्या सामुहिक प्रयत्नातून व एकमेकाच्या कौशल्याच्या वापरातून सोडविता शक्य आहे काय? याचे मुल्यमापन करणे.

४. वित्तीय व बिगरवित्तीय गरजांमधील कमतरता भरुन काढण्यासाठी उपाय योजना सूचविणे.

वरील उद्दिष्टांसाठी अध्ययन करण्यासाठी अहमदाबाद, गुजरात येथील सेवा, पुणे, महाराष्ट्र येथील चैतन्य, हैद्राबाद, आंध्रप्रदेश येथील बासिक्स, अहमदाबाद, गुजरात येथील फ्रेंडस ऑफ वूमेन्स वर्ड बँकींग, बिदर, कर्नाटक येथील बिदर डिस्ट्रीक्ट को– ऑपरेटीव्ह बँक या पाच स्वयंसहाय्यता प्रोत्साहन संस्थांतर्गत स्थापन झालेल्या स्वयंसहाय्यता गटांचे व्यष्टी अध्ययन आणि आणि आंतर व्यष्टी अध्ययन करण्यात आले आहे.

२) **श्रीमती दिवसे स्मिता** यांनी २००२ मध्ये पुणे विद्यापीठास ''हस्तोद्योग क्षेत्रातील महिलांचे सबलीकरण : सहभागी दृष्टिकोनातून अध्ययन'' या शिर्षकांतर्गत विद्यावाचस्पती करण्यासाठी प्रबंध सादर केला आहे.[८६] सदर अध्ययन हे हस्तोद्योग क्षेत्रातील महिलांच्या आर्थिक सबलीकरणाशी संबंधीत आहे.

३) **डॉ. घनश्याम शिवशंकर** यांनी २००५ मध्ये स्वामी रामनंद तिर्थ विद्यापीठ नांदेडमध्ये ''स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून महिला सबलीकरण'' या शीर्षकांतर्गत पीएच.डी. प्रबंध सादर केला आहे.[८७] या संशोधनाची उद्दिष्ट्ये (१) स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून होणाऱ्या बचत व पत या दोन्ही घटकांचा प्रभाव तपासणे. (२) स्वयंसहाय्यता गटातील महिलांच्या सहभागाची प्रक्रिया जाणून घेणे. (३) स्वयंसहाय्यता गटातील सहभागी महिलांची आर्थिक व सामाजिक स्थिती जाणून घेणे.

४) **श्री. मुलाणी एम. यु.** यांनी २००७ मध्ये अर्थशास्त्र विषयात पीएच. डी. प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे येथे सादर केलेला आहे. पुणे जिल्ह्यातील इंदापुर आणि बारामती तालुक्यातील महिलांच्या सामाजिक आर्थिक सबलीकरणात स्वयंसहाय्यता गटांच्या योगदानाचे अध्ययन' या विषयावर संशोधन केलेले आहे.[८८] सदरचे संशोधन दोन ग्रामीण तालुक्यातील महिलांच्या सबलीकरणाशी निगडीत आहे.

५) **श्री. जगताप किशोर निवृत्ती** यांनी २००७ मध्ये ''पुणे जिल्ह्यातील सुवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेअंतर्गत दारिद्र्य निमुर्लनावरील प्रभावाचे चिकीत्सक अध्ययन'' या शिर्षकांतर्गत पीएच. डी. प्रबंध पुणे विद्यापीठ पुणे मध्ये सादर केलेला आहे.[८९] ग्रामीण भागातील सुवर्णजयंती योजनेंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या महिला बचत गटांच्या माध्यमातुन पुणे जिल्ह्यातील दारिद्र्य निमुर्लनावर होणाऱ्या परिणामांच्या चिकीत्सक अध्ययनाशी प्रस्तुत संशोधन संबंधीत आहे.

६) **श्रीमती पुरंदरे संगीता महेश** यांनी २००९ मध्ये ''ग्रामीण भागातील विशेषत: शिरूर तालुक्यातील महिला स्वयंसहाय्यता गटांचा विश्लेषणात्मक अभ्यास' या विषयावर पुणे विद्यापीठात पीएच. डी. प्रबंध सादर केलेला आहे.[९०] प्रस्तुत संशोधनातुन ग्रामीण महिलांच्या आर्थिक व सामाजिक बदलावर प्रकाश टाकलेला आहे.

७) **श्री. शिंदे आर. वाय.** यांनी २००९ मध्ये पुणे विद्यापीठास पीएच. डी प्रबंध सादर केलेला आहे. महाराष्ट्र राज्यातील ''अहमदनगर जिल्ह्यातील सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेचा लाभार्थीवरील आर्थिक प्रभाव'' याविषयी संशोधन केलेले आहे.[९१] अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामीण दरिद्री

व्यक्तीच्या  आर्थिक स्तरावर चांगले प्रभाव पडत असुन समाजातील अवहेरलेले मुख्य प्रवाहापासुन बाजुला फेकले गेलेले लोक स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातुन मुख्य प्रवाहात सामिल होत आहेत.

८) **श्री. नागवा बारीकर अब्दुल्ला** यांनी ''कौटुंबिक पातळीवरील दारिद्र्य निर्मुलनावर सुदान  मधील महिला बचत व सुक्ष्मकर्ज संघाच्या प्रभावाचे अध्ययन'' याविषयावर  २००९ मध्ये साऊथ आफ्रिका विद्यापीठात प्रबंध सादर केला आहे.[१२] सुदान मधील महिलांच्या दारिद्र्य निर्मुलन व सबलीकरणावरील काय परिणाम होत आहे. या बाबत संशोधन केलेले आहे. सुदानी महिलांचे दारिद्र्य निर्मुलन व सबलीकरण वरील चांगले वाईट परिणाम हे प्रामुख्याने लघु व्यवसाय करणाऱ्या महिलांना राष्ट्रीय व राज्य पातळी वरून पुरविण्यात येणारी वित्तीय संसाधने व प्रकल्प राबविणाऱ्या व्यवस्थापकीय  वर्गाच्या क्षमतेवर आणि महिलांमधील जागृततेवर अवलंबून आहेत. तसेच अधिक सबलीकरण म्हणजे केवळ घेतलेले कर्ज नियमितपणे हप्त्याने फेडणे नव्हे तर घेलेल्या कर्जाचा पुर्णक्षमतेने उत्पादकता व उत्पन्न वाढीसाठी वापर करणे. तसेच सामाजिक  सबलीकरणात  मिळविलेल्या उत्पन्नाचा खर्च करतांना मुलांचा सांभाळ करणे, मुलांचे शिक्षण आरोग्य, पोषण आहार, यावर उत्पन्न विचारपुर्वक खर्च करणे, कुटूंबांच्या कल्याणात सहभाग नोंदविणे अपेक्षित आहे. मात्र सामाजिक दृष्टीने विचार करता स्थानिक पातळीवर महिलांमधील गतिमानता पुर्णपणे वाढण्यात अनेक अडथळे निर्माण झालेले आहे. आर्थिक  व सामाजिक दृष्ट्या पुर्णपणे सकारात्मक प्रभाव आढळून आला नाही.

९) **सिबुसीसो डूमीसानी म्हलोंगा** (२०१०) यांनी ''परितक्ता महिलांसाठी महिला स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून सबलीकरण प्रक्रिया'' या शीर्षकांतर्गत पीएच.डी. प्रबंध झुलुलँड विद्यापीठात सादर केला आहे.

स्वयंसहाय्यता गटातील सभासद महिलांच्या सबलीकरणातील मानसशास्त्रीय सहभाग जाणून घेणेच्या प्रमुख उद्देशातून हे संशोधन करण्यात आले.[१३] स्वयंसहाय्यता गट हे परितक्त्या महिलांच्या सबलीकरणासाठी 'आशेचा किरण' ठरु पाहत आहे. स्वत:चे जीवन जगण्यासाठी प्रोत्साहन मिळत आहे. तसेच स्वयंसहाय्यता गटातील महिलांना सामाजिक पाठबळ मिळत आहे. हा स्वयंसहाय्यता गटांचा सर्वात मोठा लाभ आहे.

१०) **सोनवणे आशालता** यांनी स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील महिलांचे सबलीकरण : नाशिक जिल्ह्याचे व्यष्टी अध्ययन या शिर्षकांतर्गत पीएच.डी. प्रबंध पुणे विद्यापीठ पुणे यांना २०११ मध्ये सादर केला आहे.[१४] नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा, बागलाण, दिंडोरी या आदिवासी आणि मालेगाव, चांदवड, नांदगाव, येवला, निफाड, सिन्नर बिगर आदिवासी अशा १० तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण महिलांच्या स्वयंसहाय्यता गटांचे अध्ययन मांडण्यात आले आहे. स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून होणाऱ्या फक्त आर्थिक सबलीकरणाचे अध्ययन मांडण्यात आलेले आहे.

प्रस्तुत अध्ययनाची उद्दिष्ट्ये –

२. महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी स्वयंसहाय्यता गटांचे योगदान तपासणे.
३. स्वयंसहाय्यता गटांच्या सहभागामुळे महिला सभासदांच्या सामाजिक विकासाचे निरिक्षण करुन मांडणी करणे.
४. स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून प्राप्त होणाऱ्या आत्मनिर्भरतेच्या स्तरांचे अध्ययन करणे.
५. स्वयंसहाय्यता गटातील सहभागामुळे महिलांच्या निर्णय प्रक्रियेतील सहभाग क्षमता वृद्धीचे अवलोकन करुन मांडणी करणे.

६. स्वयंसहाय्यता गटातील सहभागाद्वारे महिलांचा आत्मविश्वास स्तराचे अध्ययन करणे.

स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून होणाऱ्या सुक्ष्म वित्त व्यवहारांच्या आधारे महिलांचे व सामाजिक सबलीकरण घडवून आणण्याचे प्रभावी माध्यम म्हणून मायक्रो फायनान्स महत्त्व प्राप्त झालेले आहे. याबाबत अनेक संशोधकांनी वेगवेगळ्या देशात व भारतातील वेगवेगळ्या राज्यातील, जसे– आंध्र प्रदेश, कर्नाटक, ओरिसा, उत्तर प्रदेश, आसाम, पॉण्डेचेरी, तामिळनाडू, महाराष्ट्र तसेच वेगवेगळ्या भागातील जसे ग्रामीण, शहरी, सागरीय आणि ग्रामीण– शहरी महिलांच्या सबलीकरणाबाबत अध्ययन करुन निष्कर्ष मांडलेले आहे.

मात्र सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत स्थापन करण्यात येणारे स्वयंसहाय्यता गट हे महिला सबलीकरणाचे प्रभावी माध्यम असतांना दोन शहरातील महिलांच्या सबलीकरणाचे एकत्र अध्ययन झालेले नाही. प्रामुख्याने दोन भिन्न सामाजिक व आर्थिक पार्श्वभुमी असणाऱ्या शहरातील महिलांची सुद्धा भिन्न सामाजिक व आर्थिक परिस्थिती भिन्न असते. असे असतांना सुद्धा दोन शहरातील महिलांच्या सबलीकरणाचे तुलनात्मक अध्ययन झालेले नाही म्हणून महिला सबलीकरणाच्या क्षेत्रात नवीन ज्ञानाची भर टाकण्याच्या हेतुने संशोधनाची पुढची पायरी म्हणून सदर विषयाची निवड केलेली आहे.

## संदर्भ


[1] Profilling Domestic Violence- A Multy Country Study, Domestic Violence and Women Empowerment P.No. 53.

[2] नियोजन मंडळ, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, योजना, ऑगस्ट २०००, पृ.क्र. २५.

[3] Sigma sreenivason foundation, women's information and resource center, Banglore (2001) SSF-KWIKC- P.No. 163.

[4] Gupta, 2003, Gender ineqality in the work environment of institutes of higher learning in science & technology in India. IIT, Kanpur Dept of Humanaties and social sciences P.No. 20.

[5] National commission for women, New Delhi (2004), National Consulatation on Gender Budgeting : Procedings, out come and follow up. New Delhi New Report. P.No. 112

[6] PDF Adobe Acrobat, Research Report on Women empowerment - 1998 to 2008, pp. 107-108.

[7] Lazard Daniyel, 2009, "Micro Finance: performance Evaluation and Enterprise Development, Allied Publishers Pvt. Ltd, Puducherry, P.No. 04.

[8] Jha S.K. (2010) Women Empowerment in Globalised 21st Century, Satyam Publishing House, New Delhi, P. No. 19.

[9] Indian Journal or Finance, SHG Bank Linkage Programme, by Panigrahi, 2010, Vol.IX, P.No. 50

[10] Ibid, 08, P.No. 22

[11] Ibid, 06, P. No. 130

[12] पाटील शरद, २००७. ''बँकर टु द पुअर'', सुविधा प्रकाशन, उत्तर कसबा, सोलापूर, पृ. क्र. १३१-१३२.

[13] गोडबोले गोविंद, २००९, ''गरिबीमुक्त विश्वाची निर्मिती'', साकेत प्रकाशन, पुणे, पृ.क्र. ६८, ६९.

[14] Rath Binayak, 2010, Investing into Microfinance investment funds... Elizabeth Dunn. Microfinance worth, P.No. 271 to 283.

[15] गीते टी.जी., २०१०, ''जागतिक शांततेत, डॉ. मोहंमद युनुस यांचे योगदान'' रिसर्च लिंक, अंक १२, फेब्रुवारी २०११, पृ.क्र. १३७.

[16] Buckley. G (1997) Micro Finance in Africa : Is it either the problem or the solution? world Development 25(7): 1081-1081-1093

[17] Bhatt H and Tang S (1998) "The problem of transaction costs in group basses Microlending : An Institutions prespetive" world Development 26(4) 625-637.

[18] Mitchal (1999) "From Surviver to enterperneur : Gender Dinemsions of Microenterprise development in peru. "Environment and planning A 31 (2): 251-271.

[19] http://Depts washington edu/mchprog/PDF% Files/ Abstracts/ 2005.

[20] Shaw (2004) Microenterprise occupation and poverty reduction in Microfiance Programs : Evidence from shrilanka world Deveopment 32 (7) 1247-1267.

[21] Ibid, 08, P.No. 102-105.

[22] Ibid, 14, P. No. 271-283.

[23] Dr. Gautam (2011) "Micro Fiance- Global Scenario" vital publication, Jaipur, P. No. 58-59.

[24] Ibid, 23, P. No. 380-381.

[25] Hussian M (2011) "Islamic Banking & Finance. Deep & Deep Publication, New Delhi, P. No. 142-149.

[26] Lalitha N (2008) Readings in Microfinance, Domiant Publishers and Distributors, New Delhi- 02, P. No. 26-27.

[27] Ibid, 23, P. No. 8.

[28] कुंदन (२००७) महिला बचत गटाच्या माध्यमातून देशात समाज परिवर्तन, संपदा मासिक, जुलै २००७. पृष्ठ क्र. ३०-३१

[29] Ganesh Murthy (2007) India: Economic Empowerment of Women, New Century Publications, New Delhi, P. No. 17-27.

[30] Karmarkar K.G., (1999) Rural Credit and Self help Groups, Microfiance need and concepts in India, Sage Publication, New Delhi, P. No. 104.

[31] Puhazhendhi, V. and Satyasai, K., (2000) Micro Fiance for Rural People: An Import Evaluation, NABARD, Mumbai.

[32] PDF, 14 Chapter, Adobe Acrobat, Document Karnataka Human Development Report- 2005, P. No. 09-10.

[33] Organising SHG : A Resource Book : Indira Mahila Published by Ministry of HRD, Gov. of India, New Delhi- 2000, P. No. 30.

[34] Sundari, S and Geetha, N., "Poverty Credit & Micro Credit" Kurukshetra, Nov. 2000, Vol. 49, Issue 2, P.No. 26 to 32.

[35] Laxmi R. Kulshreshtra, "Micro Finance : The New Development Paradigm for Rural Women" Kurukshetra, Vol 49, Issue No. 2, Nov. 2000, P.No. 22 to 25

[36] Dadhich C.L, "Microfinance a Panacea for Poverty Alleviations, "Indian Jurnal or Agricultural Economics. Vol 56, Issue No. 3, July - Sept 2001, P.No. 420-425.

[37] Malcom Harper (2002) Promotion of SHG under the Bank linkage programme in India, Paper presented in the seminor at New Delhi Nov. 2002.

[38] Kerala Research Programme on Local Level Development Center for Development Studies. Thiruvananthpuram. Discussion Paper No. 38, 2002.

[39] World Bank, New Delhi (2003) India Rural Women's Development and Empowerment Project: Cr. 29240- 31 Jan. 2003.

[40] Ritu J.R.K. Kushawaha & Srivastava "Socio- Economic Impact Through Self Help Groups", Yojana Vol. 47, Issue No. 7, July 2003, P.No. 11, 12

[41] Das Sabyasachi "Self Help Groups and Micro Credit : Synergy Intergration" Kurushetra, Aug 2003, P.No. 23, 30.

[42] Independent Commission for peoples right and Development (2003), Demand Servey for Micro finance in Central Eastern India, New Delhi.

[43] Sahay S (1998) Women and Empowermen : Approaches and Strategies, Discovery Publishing House, New Delhi, P. No. 32-42.

[44] Sinha Archara, "Micro Finance for Women empowerment -A Prespective", Kurushetra, Vol. 52, No. 6, April 2004, P.No. 31- 38

[45] http://www.connectjournals.com

[46] Lokhande (2010) Micro Finance for Socio Economic Development Educational, Publisher & Distrbuters, Aurangabad, P. No. 177.

[47] Ibid, 46, P. No. 12.

[48] Ibid, 46, P. No. 39-40.

[49] Ibid, 6, P. No. 32-37.

[50] Dr. Jayaraman R. (2005), Final Report submitted to NABARD, Performance Analysis of Fisherwoen SHGs in Tamilnadu, Adobe Reade- Fish... 5 to 7

[51] Nair Manohar & Girija, Micro Finance: The New Development paradigrm for poverty Eradication and Women Empowerment, Kurukshetra, Vol. 53, No. 6, April-2005, P.No. 18-19.

[52] Dr. Rath B. (2006), Post Evaluation Study of the Scheme of Micro Credit help to women SHGs in KBK, of Orissa, Report Submited to Govt. of Orissa.

[53] Singh S.K. Study conducted by BL Center for Development research and action, Lucknow, and submitted to planning commission Govt. of India, www. Microfiance.lu

[54] Saunderpandian, "Micro Finance for Rural Enterprises', Issue and Strategies," Kurukshetra, September- 2006, P.No. 14 to 16.

[55] Fernandez Alysius (2007) The third in a series of discussion paper produced by the asian and pacific Division (IFAD)

[56] Siwal B.R. (2008) "Gender framework analysis of empowerment of women A case study of kudambshree programme, New Delhi : NIPCCD, P. No. 68.

[57] Independent Commission for peopless Right and Development (2003) Demand Servey for Micro finance in Central Estern India, A Proposal New Delhi.

[58] More J.B., "SHG- The way to Eradication at poverty, Indian Journal of Commence, Vol. 61, No. 4, Oct. 2008, P.No. 09

[59] Singh Gurumeet, "Microfinance : A Innovation of Rural Credit" Kurukshetra, Feb 2009, P.No. 3 to 6

[60] Koul Divya Ninad, "Women's Self Help Groups and Micro Finance," Kurukshetra, Feb- 2009, P.No. 13- 15.

[61] Indian Journal of Finance, The Growth and Impact of NABARD SHG, Bank Linkage, Vol 5, Issue No. 12, Dec. 2011, P. No. 1-5.

[62] Azharuddin, 2010, "Micro Finance for Socio Economic Development," Educational Publisher Aurangabad, P. No. 119-122.

[63] आमोद (२०१०), महिला बचतगट, महिलांसाठी विकास योजना आणि उद्योग व्यवसाय, आमोद प्रकाशन, मुंबई, पृष्ठ क्र. ४१.

[64] International Journal of Business Economic and Management Research Year 2011, Vo. 2, Issue II, P. no. 2-4.

[65] Wale & Deshmukh, Women Empowerment through self help groups, Indian Streams Research Journal, Vol. I, Issue IV, May. 2011, P. No. 32.

[66] दैनिक दिव्य मराठी, 'रसिक' वेध बहुरंगी जीवनाचा, दिनांक १३ नोव्हेंबर २०११, पृ.क्र. ०१.

[67] Bokil Milind (2003), Micro enterprises and gender division of labour:on empirical study of self employed women in Maharashtra Pune, Development support team report, P. No. 10.

[68] Bolik Milind (2005), Ending domestic violence: Self Help Groups can help Pune: Development support team report, P. No. 10-11.

[69] Ibid, 7, P. No. 317-324.

[70] Southern Economics (2011), artical statues Micro Credit Management by Women's SHG by S.D. Talekar.

[71] Southern Economics (2010) SHG's and women Empowerment : A case study by E. Nagabhushan Rao Vol. 49, July- 15, 2010.

[72] मराठी अर्थशास्त्र परिषद– स्त्री सक्षमीकरणात महिला बचत गटाचे योगदान, लेख्र प्रा.सौ. कदम प्रभा, पृ. क्र. १२०-१३१.

[73] मराठी अर्थशास्त्र परिषद, उस्मानाबाद जिल्ह्यातील महिला बचत गट अध्ययन डॉ. बारबोले टी.एल., पृ. क्र. १३२-१४०.

[74] Ibid 46, P. No. 111.

[75] लोकराज्य, ऑगस्ट २००७, मावळ सम्राज्ञींचा 'तांदुळ सम्राट' लेख्र मनिषा पिंगळे, सहाय्यक संचालक (माहिती) पुणे, पृ. क्र. २८-२९.

[76] वाणिज्य विद्या (त्रैमासिक) वाणिज्य विभाग, पुणे विद्यापीठ पुणे, मार्च– मे, २०११ अंक१

[77] Wddiniale (2004) Slum Women Empowered by saving credit programme, Social Welfare Report 51 (5), P. No. 17.

[78] Indian Journal of Finance December 2011, SHG- Bank linkage programme in india by pinky Datta, Vol. 5, No. 12.

[79] Gupta M.L. & Gupta N. 2006, Economic Empowerment of Women through SHGs, Kurukhetra, Vol. 54, No. 4

[80] Deo Malvika, 2009, Micro Fiance : Performance & Evaluation, Allied Publisher, Chennai.

[81] Ibid, 7, P. No. 288-291.

[82] Ibid, 7, P. No. 111.

[83] Ibid 46, P. No. 148.

[84] तलवारे जितेंद्र, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक, 'अर्थसंवाद', जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, २०११, खंड : २५, अंक २, पृ.क्र. ५९, ६०

[85] नवीन कुमार, ''बिगर कृषि क्षेत्राच्या विकास प्रक्रियेतील स्वयंसहाय्यता गटांच्या भूमिकेचे अध्ययन'', पीएच.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ- २००१.

[86] श्रीमती दिवसे स्मिता, ''हस्तोद्योग क्षेत्रातील महिलांचे सबलीकरण : सहभागी दृष्टीकोनातून अध्ययन'', पीएच.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ– २०००

[87] Faculty Profile Dr. Dhansham Shivshankar yelne Chrome HTML Document.

[88] Mulani M.U., "The Role of self Help Groups in the Socio- Economic Empowerment of Women with Reference to Indapur and Baramati Talukas of Pune District" Ph.D. Thesis submitted to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune- 2007.

[89] श्री. जगताप किशोर एन., ''पुणे जिल्ह्यातील सुवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेंतर्गत दारिद्र्य निर्मुलनावरील प्रभावाचे चिकित्सक अध्ययन'' पीएच.डी. प्रबंध सादर पुणे विद्यापीठ– २००७.

[90] पुरंदरे संगिता– ''शिरुर तालुक्यातील महिला स्वयंसहाय्यता गटांचा विश्लेषणात्मक अभ्यास'' पीएच.डी. प्रबंध पुणे विद्यापीठ पुणे– २००९.

[91] शिंदे आर.वाय.– ''अहमदनगर जिल्ह्यातील सुवर्ण जयंती स्वयंरोजगार योजनेचा लाभार्थी महिलांवरील आर्थिक प्रभाव'', पीएच.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे– २००९.

[92] Nagwa Barikar Abdulla, "The impact of Sudanese General Women Union Saving & Credit Projects on Poverty Alleviation at the Household level", Ph.D Thesis Submitted of University of South Africa, March- 2009, P.No. 408, 409.

[93] PDF. Process of empowerment through a self help, Adobe Acrobat.
[94] सोनवणे आशालता, ''स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील महिलांचे सबलीकरण: नासिक जिल्ह्याचे व्यष्टीअध्ययन'', पीएच.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ– २०११

**प्रकरण ४**

# नाशिक जिल्ह्याचे आर्थिक व सामाजिक अध्ययन

## ४.१ प्रस्तावना

भारत हे एक प्रजासत्ताक व जगातील सर्वात मोठे लोकशाही प्रधान राष्ट्र आहे. तसेच भारत हा भिन्न जाती–धर्म, वंश, भाषा, चालीरीती, रूढी परंपरांनी नटलेला देश आहे. असे असुनही भारतीय राज्यघटनेनुसार भारतातील प्रत्येक नागरीकास समानतेचा हक्क बहाल करण्यात आलेला आहे. प्रत्येक स्त्री–पुरूष कायद्यापुढे समान असुन स्वतंत्र आहे. १९५१ पासुन नियोजनाच्या माध्यमातून समाजवादी समाजरचना निर्माण करण्यासाठी सातत्यपुर्ण प्रयत्न करण्यात आलेले असुन दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी असंख्य विकास योजना राबवण्यात आलेल्या आहेत.

भारताचा भौगोलिक विस्तार विशाल असुन प्राकृतिक भिन्नता मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे भारतात संघराज्य व्यवस्थेचा स्विकार करण्यात आलेला आहे. भारतीय संघराज्यात २८ घटक राज्ये व ७ केंद्रशासित प्रदेश आहेत.


महाराष्ट्र राज्य हे भारतातील एक प्रमुख प्रगतिशिल व पुरोगामी राज्य आहे. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अशा सर्वच क्षेत्रात महाराष्ट्र राज्य हे देशात अग्रणी असणारे दिशादर्शक राज्य राहिलेले आहे. भौगोलिक दृष्ट्या उत्तर भारत व दक्षिण भारतास एकत्रित आणणारी राज्यस्थान व मध्यप्रदेश नंतर तिसऱ्या क्रमांकाची भुमी महाराष्ट्र राज्यास लाभलेली आहे. प्रशासकीय दृष्ट्या महाराष्ट्राची विभागणी कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर अशा सहा विभागात केली आहे. या विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यात २००१ च्या जनगणनेनुसार एकूण ३५ जिल्हे आहेत. त्यापैकी 'नाशिक' जिल्हा प्रस्तूत अध्ययनाचे अध्ययन क्षेत्र आहे.

'मंत्रभूमी ते यंत्रभूमी' अशा स्थित्यंतराचा साक्षीदार असणारा नाशिक जिल्हा हा महाराष्ट्र राज्यातील सर्वात जलद औद्योगिक प्रगतीसह अनेक वैशिष्ट्यांनी युक्त असणारा जिल्हा आहे.[१] प्रभु रामचंद्राच्या वास्तव्यामुळे आणि

'कुंभमेळा' पर्वणीच्या महत्त्वामुळे नाशिक जिल्ह्यास धार्मिक दृष्ट्या 'तीर्थक्षेत्र' मानले जाते. स्वातंत्र्य संग्रामातील प्रसिद्ध सेनानी तात्या टोपे, हुतात्मा अनंत कान्हेरे आणि स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर आदी नररत्नांची जन्मभुमी असलेला जिल्हा आहे. जगातील सर्वात मोठे मातीचा भराव असलेले गंगापुर धरण नाशिक जिल्ह्यातच आहे. भारतीय सिनेसृष्टीचे जनक कै. दादासाहेब फाळके, ज्ञानपीठ या सर्वोच्च साहित्य पुरस्काराने सन्मानित झालेले कुसुमाग्रज, संगीत व कला क्षेत्रातील दिग्गज पंडित विष्णू दिगंबर पलुसकर यासारख्या व्यक्तीच्या कार्यकर्तृत्वाचा वारसा जपणारा नाशिक जिल्हा आहे. बारा ज्योर्तिलिंगापैकी एक असणारे त्र्यंबकेश्वर, साडेतीन पीठापैकी अर्धपीठ असलेला सप्तश्रृंगी गड, इगतपुरी येथील धम्मगिरी विपश्यना केंद्र, भंडारदरा व कळसुबाई शिखर यासारखी पर्यटन स्थळे असलेला नाशिक जिल्हा पर्यटकांचे आकर्षण स्थळ बनलेला आहे. कांदा, द्राक्षे, भाजीपाला, साखर आणि 'वाईन' निर्याती द्वारे जगाच्या पटलावर लौकीक असणारा नाशिक जिल्हा आहे. सार्वजनिक उपक्रमांसह मालेगावचा यंत्रमाग उद्योग, येवल्याची पैठणी, रावळगावची टॉफी (चॉकलेट), इगतपुरीचा कागद उद्योग सिन्नर, सिडको, सातपुर, माळेगांव औद्योगिक वसाहतीतील शेकडो उद्योगामुळे औद्योगिक दृष्ट्या सर्वात प्रगतीशील जिल्हा असुन आय टी पार्क व (टायर–२ मेट्रो) संबोधन लाभलेले नाशिक शहर हे जिल्ह्याचे मुख्यालय आहे.

नाशिक आणि मालेगाव ही शहरे जिल्ह्याच्या समाज व अर्थ कारणांच्या केंद्रस्थानी असलेली शहरे आहेत. या दोन्ही शहरांमध्ये जलद आर्थिक विकास घडुन येत आहे. मात्र मालेगाव शहरास हिंदु–मुस्लीम जातीय दंगलीची आणि नाशिक शहरात 'माफीया' व अवैध व्यवसायांची काळी किनार सुद्धा आहे. या दोन्ही शहरात दारिद्र्य, झोपडपट्टी, व्यसनाधिनता यांचे प्रमाण अधिक असुन महिलांची स्थिती अत्यंत दयनीय स्वरूपाची आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात नाशिक जिल्ह्याची भौगोलिक, सामाजिक व आर्थिक स्थिीचे विश्लेषण मांडण्यात आलेले आहे.

**नकाशा १ : संशोधन क्षेत्र**



## ४.२ नाशिक जिल्हा– भौगोलिक स्थान व क्षेत्रफळ

नाशिक जिल्ह्याचा अक्षांश विस्तार उत्तर अक्षवृत्त १८.३३' – २०.५३' उत्तर अक्षवृत्तावर असून रेखांश विस्तार ७३.१६' – ७५.१६' पुर्व रेखावृत्त आहे. नासिक जिल्ह्याच्या सीमेवर महाराष्ट्रातील पाच तर गुजरात राज्यातील दोन जिल्हे आहेत. उत्तर सिमेवर धुळे जिल्हा, पुर्व व ईशान्य सिमेवर जळगांव जिल्हा, अग्नेय सीमेवर औरंगाबाद जिल्हा, दक्षिणेस अहमदनगर जिल्हा तर पश्चिम व नैऋत्य सीमेवर ठाणे जिल्हा असुन वायव्य सीमेलगत डांग व सुरत हे गुजरात राज्यातील जिल्हे आहेत. नाशिक जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १५५३०चौ. कि.मी. असून पुर्व- पश्चिम लांबी २०० चौ.मी. तर उत्तर- दक्षिण लांबी १२० चौ.मी. इतकी आहे. भौगोलिक क्षेत्रफळ उपलब्धतेबाबत महाराष्ट्र राज्यात नाशिक जिल्ह्याचा मुंबई, पुणे नंतर तिसरा क्रमांक आहे. महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ५.०४% इतके हे क्षेत्र आहे. नाशिक जिल्हा हा उत्तर महाराष्ट्र प्रादेशिक विभागात आहे.[२]

**सारणी १७ : नाशिक जिल्ह्याचे स्थान व क्षेत्रफळ**

| अ. नं. | तपशिल भौगोलिक स्थान | नासिक जिल्हा | नासिक शहर | मालेगाव शहर |
|---|---|---|---|---|
| १ | उत्तर अक्षवृत्त | १८°.३३‘ ते २०°.५३‘ | १९°.३३‘ ते २०°.५३‘ | २०°.३२‘ ते २०°.२६‘ |
| | पुर्व रेखावृत्त | ७३°.१६‘ ते ७५°.१६‘ | ७४°.१४‘ ते ७५°.१६‘ | ७४°.२९‘ ते ७४°.३५‘ |
| २ | भौगोलिक क्षेत्रफळ | १५५३० | २५९.१३ | १२.९५ |

**स्त्रोत :** http://en.wikipedia.org/wiki/file/maharashtranashik.png
http://en.wikipedia.org/wiki/file/malegaon.jpg

पश्चिम घाटावरील गोदावरी नदीच्या काठावर वसलेल्या नाशिक शहराचे महाराष्ट्रातील स्थान उत्तर-पश्चिमेकडे असुन अक्षवृत्तीय स्थान १९.३३' – २०.५३' उत्तर तर रेखावृत्तीय स्थान ७३.१६'– ७५.९६' पुर्व असे आहे. नाशिक शहराची समुद्रसपाटीपासूनची उंची ५६५ मी (१८५४ फुट) आहे. नाशिक शहराचे क्षेत्रफळ २५९.१३ कि.मी.इतके आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने नाशिक शहर महाराष्ट्रात मुंबई नंतरचे दुसऱ्या क्रमांकाचे शहर आहे.[३]

नाशिक जिल्ह्यातील एक उद्यमशिल शहर म्हणून मालेगाव संपुर्ण महाराष्ट्राला परिचित आहे. २०.३२'–२०.३६' अंश उत्तर अक्षांश आणि ७४.२९'–७४.३५' पश्चिम रेखांशावर मालेगावचे स्थान आहे. समुद्र सपाटीपासून ४७३.४४ मीटर उंचीवर असणाऱ्या मालेगाव शहराचे क्षेत्रफळ १२.९५ कि.मी. आहे. मोक्षगंगा (मोसम) व गिरणा नदीच्या संगमावर वसलेल्या मालेगाव शहराचे नाशिक पासूनचे अंतर ११० कि.मी. व मुंबई शहरापासूनचे अंतर ३०० कि.मी. इतके आहे.[४]

## ४.३ नाशिक जिल्हा : प्रशासकीय रचना

प्रशासनासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेचे स्वरूप हिंदुस्थानात नविन नाही. इ.स.पुर्व तिसऱ्या शतकात कौटिल्याने 'अर्थशास्त्र' या ग्रंथात राजाने प्रजेला राजसत्तेत सामावून घेण्याची अवश्यकता प्रतिपादन केली. इतकेच नव्हे तर गावातील हुशार व वयस्क व्यक्तींचा समावेश करून ग्राम सभेची निर्मिती आणि मर्यादित स्वरूपात करवसुली व न्यायदानाचे अधिकार देण्याचे नमुद केले. ही नगरपालिकेची ढोबळ निर्मिती होती. नगरपालिका, महानगरपालिका ह्या शहरी भागाच्या प्रशासकिय यंत्रणेची पहिली पायरी असतात. शहरी भागातील प्रश्न, समस्या  सोडवूण विकास घडवून आणण्याच्या दृष्टिने अत्यंत उपयुक्त पडतात.

नाशिक जिल्हा १९८१ पुर्वी मुंबई प्रशासकीय विभागाचा एक महसुल विभाग होता. परंतु फेब्रुवारी १९८१ पासून नाशिक वेगळा महसुली विभाग स्थापन करण्यात आला. त्यात पुर्वीच्या मुंबई विभागातील नाशिक, जळगांव, धुळे, नगर व नंदुरबार अशा पाच जिल्ह्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच नाशिक जिल्ह्यात नाशिक, मालेगाव, निफाड व कळवण हे चार महसुली उपविभाग आहेत.

**सारणी १८ : नाशिक जिल्हा प्रशासकीय रचना**

| अ. नं. | तपशिल | नाशिक | महाराष्ट्र |
|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय रचना | | |
| | अ) तालुके | १५ | ३५८ |
| | ब) शहरे | १८ | ३७८ |
| | क) खेडे | १९३१ | ४३७११ |
| | ड) निर्जन गावे | १० | २६१६ |
| २ | स्थानिक स्वराज्य संस्था | | |
| | अ) महानगरपालिका | २ | २२ |
| | ब) नगरपालिका | ८ | २२५ |
| | क) कटक मंडळे | १ | ७ |
| | ड) पंचायत समित्या | १५ | ३५१ |
| | इ) ग्रामपंचायत | १३७३ | २७९२० |

**स्त्रोत :** जिल्हा सामा. व आर्थिक समालोचन, नाशिक जिल्हा– मार्च २००९

नाशिक जिल्ह्यात असणाऱ्या एकूण १९३१ खेड्यांपैकी सुरगाणा तालुक्यात सर्वात कमी (५०) खेडी आहेत. नासिक तालुक्यात सर्वाधिक चार शहरे, मालेगांव तालुक्यात ३ शहरे आहेत. मात्र दिंडोरी, चांदवड, देवळा, कळवण, पेठ तालुक्यात शहरे नाहीत.

नाशिक जिल्ह्यात असणाऱ्या एकूण १८ शहरांमध्ये नाशिक शहरासाठी 'अ' वर्ग महानगरपालिका, मालेगाव शहरासाठी 'ब' वर्ग असणारी महानगरपालिका अस्तित्व आहेत. मनमाड, येवला, सटाणा, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, सिन्नर, नांदगांव, भगुर या ८ शहरांसाठी 'क' वर्ग नगरपालिका प्रशासन आहे. इतर सुरगाणा, ओझर, लासलगांव, घोटी, द्याने इत्यादी गणना शहरे असून तेथे नगरपरिषद प्रशासन कार्यरत आहे.

नाशिक शहरासाठी प्रशासकीय निकड लक्षात घेऊन १ मे १८६४ रोजी नाशिक नगरपालिकेची स्थापना करण्यात आली. शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन पुढे साठे कमिशनच्या शिफारशीवरून ७ नोव्हेंबर १९८२ रोजी नाशिक, नाशिक रोड, देवळाली व सातपुर नगरपालिका आणि २३ खेडी मिळुन महानगरपालिका संस्थापित करण्यात आली. महानगरपालिकेचा पहिला अर्थ संकल्प ५.३७ कोटी रूपयांचा होता. त्यात २००६–०७ मध्ये ५४७.४३ कोटी पर्यंत


वाढ झाली. यामाध्यमातून शहरात अनेक सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. मात्र गरिबांपर्यंत लाभ पोहचविणे प्रशासनास शक्य झालेले नाही.

मालेगाव शहराची प्रशासकीय व्यवस्था सांभाळण्यासाठी १८६३ मध्ये मालेगाव नगरपालिकेची स्थापना करण्यात आली. त्यामुळे शहराच्या विकासाला चालना मिळाली. मालेगाव शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या गरजा पुर्ण करण्याच्या उद्देशाने १७ डिसेंबर २००१ मध्ये मालेगाव महानगरपालीकेची स्थापना झाली. शहराच्या प्रशासनात प्रतिनिधीत्व मिळण्याच्य हेतुने ७२ वार्ड तयार करण्यात आलेले असुन ७२ नगरसेवक निवडले जातात. शहरात मुस्लीम समाजाचे अधिक्य असल्यामुळे निवडुन जाणाऱ्या नगरसेवकात मुस्लीमांचे प्रमाण अधिक असते. पर्यायाने नगरपालिका ते महानगरपालिके पर्यंत सातत्यपुर्ण वर्चस्व असल्याचे आढळून येते.[५]

## ४.४ नाशिक जिल्हा : लोकसंख्या

कोणत्याही राज्यात किंवा जिल्ह्यात उपलब्ध असणारी लोकसंख्या ही 'मानवी साधन संपदा' असते. या दृष्टिने २००१ च्या जनगणनेनुसार उत्तर महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येत ३१.६२% लोकसंख्या नाशिक जिल्ह्याची होती. उत्तर महाराष्ट्रात सर्वात अधिक लोकसंख्या नाशिक जिल्ह्यात होती आणि महाराष्ट्रात मुंबई, ठाणे, पुणे नंतर चौथ्या क्रमांकाची लोकसंख्या नाशिक जिल्ह्यात आहे. संस्थागत लोकसंख्या सहभागाबाबत पुणे नंतर नाशिकचा क्रमांक लागतो.

**आलेख २ : नाशिक जिल्हयाची लोकसंख्या (संदर्भ वर्ष १९६१–२०११)**




**स्त्रोत :** नाशिक जिल्हा लोकसंख्या (संकेतस्थळ)

आलेख क्रमांक २ मध्ये दर्शविल्या प्रमाणे, १९६१ मध्ये नासिक जिल्ह्याची लोकसंख्या १८,५५,०००, १९७१ मध्ये २३,६९,५६९, १९८१ मध्ये २९,९१,००० व १९९१ मध्ये ३८,५१,०००, २००१ मध्ये ४९,९३,७९६, आणि २०११ मध्ये ६१,०९,०५२ पर्यंत वाढलेली दिसून येते.

१९६१ ते २००१ या कालावधीत नाशिक जिल्ह्यातील लोकसंख्येची वाढ १८.५५ लक्ष वरून ४९.९३ लक्ष पर्यंत आहे. १९६१ ते १९८१ या कालावधीत नाशिक जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा वृद्धीदर २९.७२ वरून २६.३० पर्यंत कमी झाल्यामुळे लोकसंख्या वाढीचे प्रमाण कमी होते. मात्र १९८१ ते २००१ पर्यंतच्या कालावधीत लोकसंख्या वाढीचा वृद्धीदर २६.३० वरून २९.६८पर्यंत वाढल्याने जिल्ह्याची लोकसंख्या वाढही २९.९१ लक्ष वरून ४९.९३ लक्ष पर्यंत जलद वाढल्याचे निर्दशनास येते. जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण ४७.९८ टक्के तर पुरूषांचे प्रमाण ५२.०२ टक्के इतके आहे.

१९७१ पर्यंत नाशिक शहराची लोकसंख्या वाढ महाराष्ट्रातील (४०.५४ टक्के) वाढीच्या सरासरीपेक्षा कमी होती (३६.६८टक्के) मात्र १९८१ नंतर नाशिक शहरातील लोकसंख्येची वाढ महाराष्ट्रातील कोणत्याही शहरातील लोकसंख्येच्या वाढीपेक्षा अधिक आहे. (महाराष्ट्राची सरासरी वाढ १९८१मध्ये ३९.९९टक्के आणि २००१ मध्ये ४२.४० टक्के आहेत तर नाशिक शहरातील ही वाढ अनुक्रमे ५७.४ टक्के आणि ६३.९८ टक्के इतकी अधिक आहे) नाशिक शहरात इतर भागातील स्थलांतरीत होणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे २०११ मध्ये १४८६९७३ पर्यंत लोकसंख्येचे आकारमान जलद वाढलेले आहे.[६]

मालेगाव शहरातील लोकसंख्या आकारमान १९६१ ते २००१ या चार दशकात साडेतीन पटीने वाढलेले दिसून येते. या कालावधीत सरासरी शेकडा वाढ ३६.९४ टक्के इतकी अधिक आहे. १९७१ पर्यंत मालेगांव शहरात औद्योगिक वाढ व गुजरात दंगल व उत्तर भारतातील दुष्काळ यामुळे मोठ्या प्रमाणात मुस्लीम लोक मालेगावात स्थलांतरीत झाले. त्यामुळे लोकसंख्या वाढीचा वार्षिक दर व शेकडा वाढ अधिक असल्याचे आढळून आले. १९८१ च्या दशकात १९७४, १९७५, १९७६ च्या जातीय दंगलीमुळे मालेगाव शहरात हिंदू लोकांचे शहराबाहेर सोयगांव व इतर भागात झालेल्या स्थलांतरामुळे वार्षिक वाढ व शेकडा वाढ कमी झाल्याचे आढळून आले. १९९१ च्या दशकात शहरात शांतता असल्यामुळे लोकसंख्या वाढली. तर १९९२ व २००० च्या दंगलीमुळे २००१ मध्ये लोकसंख्या वाढ कमी झाली. मालेगाव शहरात दारिद्र्याचे प्रमाण, अज्ञानाचे अधिक प्रमाण व मुस्लीमांमधील धार्मिकता यामुळे शहरातील लोकसंख्या वाढीचा वार्षिक दर व शेकडा वाढ फार मोठी असल्याचे आढळून येते.[७]

### ४.४.१ नाशिक जिल्हा : ग्रामीण शहरी लोकसंख्या व वृध्दीदर

नाशिक जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येत ग्रामीण व शहरी लोकसंख्या आणि लोकसंख्या वाढीचा वृध्दीदर.

**सारणी १९ : ग्रामीण – शहरी लोकसंख्या व वृध्दीदर**

| जनगणना वर्ष | ग्रामीण लोकसंख्या | | शहरी लोकसंख्या | |
|---|---|---|---|---|
| | लोकसंख्या (000) | वृध्दीदर | लोकसंख्या (000) | वृध्दीदर |
| १९६१ | १३८० | ३२.६९ | ४७५ | २८.३८ |
| १९७१ | १६९१ | २२.५४ | ६७८ | ४२.७४ |
| १९८१ | २०६३ | २२.०६ | ९२८ | ३६.८४ |
| १९९१ | २४८२ | २०.२५ | १३६९ | ४७.५२ |
| २००१ | ३०५६ | २३.१३ | १९३८ | ४१.५६ |
| २०११ | ३५१० | - | २५९८ | - |

**स्त्रोत :** नाशिक जिल्हा लोकसंख्या (संकेतस्थळे)

नाशिक जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्यात ग्रामीण व शहरी लोकसंख्या वाढत आहे. मात्र ग्रामीण लोकसंख्या वाढीचा वृद्धीदर १९९१ पर्यंत कमी असल्यामुळे ग्रामीण लोकसंख्येची वाढ कमी असल्याचे दिसून येते. तर नागरी लोकसंख्यावाढीचा वृद्धीदर कमीअधिक होत असला तरी ग्रामीण भागापेक्षा अधिक आहे म्हणजे नाशिक जिल्ह्यात शहरीकरणाचा वेग वाढलेला आहे. शहरीकरणाचा वेग वाढणे हे विकासाचे लक्षण मानले जाते. मात्र शहरीकरणाबरोबर शहरीकरणाच्या समस्यांचे प्रमाणही प्रचंड प्रमाणात वाढत असते. नाशिक जिल्ह्यात नाशिक व मालेगाव शहरात शहरीकरणाच्या समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण झालेल्या आहेत. लोकसंख्या वाढीमुळे प्रामुख्याने दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांना संरचनात्मक सुविधांची कमतरता भासत आहे.

### ४.४.२ नाशिक जिल्हा : स्त्री– पुरुष प्रमाण


स्त्रियांना समाजात पुरूषांच्या बरोबरीने स्थान मिळते की नाही ते स्त्री–पुरूष प्रमाणावरून समजते दर हजार पुरूषांमागे असणारे स्त्रियांचे प्रमाण म्हणजे स्त्री–पुरूष प्रमाण होय. नाशिक जिल्हा हा रामायण काळापासून धार्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या उन्नत असलेला जिल्हा मानला जातो. अशा पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यातील स्त्री– पुरुष प्रमाण पुढीलप्रमाणे.

## सारणी २० : स्त्री– पुरुष प्रमाण (१९६१–२०११)

| जनगणना वर्ष | नाशिक जिल्हा स्त्री प्रमाण | नाशिक शहर स्त्री प्रमाण | मालेगाव शहर स्त्री प्रमाण |
|---|---|---|---|
| १९६१ | ९४६ | ९२७ | ९३६ |
| १९७१ | ९४० | ९२५ | ९३० |
| १९८१ | ९३७ | ९२२ | ९४७ |
| १९९१ | ९४० | ९२७ | ९६१ |
| २००१ | ९२७ | ८७० | ९५८ |
| २०११ | ९३१ | ८९४ | ९६९ |

**स्त्रोत** : जिल्हा जनगणना पुस्तिका, नाशिक, २००१, पृ. क्र. २८ आणि नाशिक जिल्हा लोकसंख्या जनगणना, २०११.

## आलेख ३ : स्त्री– पुरुष प्रमाण (१९६१–२०११)




**स्त्रोत** : जिल्हा जनगणना पुस्तिका, नाशिक, २००१, पृ. क्र. २८ आणि नाशिक जिल्हा लोकसंख्या जनगणना, २०११.

२०११ च्या जनगणनेनुसार नाशिक जिल्ह्यातील सरासरी स्त्री–पुरूष प्रमाण ९३१ इतके आहे. महाराष्ट्र राज्यातील सरासरी प्रमाणापेक्षा (९४०) कमी आहे. मात्र ग्रामीण व शहरी भागातील स्त्री–पुरूष प्रमाण अनुक्रमे ९४६ व ९१६ इतके आहे आणि त्यात १९६१ नंतर २००१ पर्यंत सतत घट झालेली आहे. स्त्रीयांची संख्या

पुरूषांच्या तुलनेत कमी आहे. याचा अर्थ समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन दुय्यम आहे.

नाशिक जिल्ह्याच्या शहरी भागात सुरगाण्यात स्त्री–पुरूष प्रमाण जिल्ह्यात सर्वाधिक कमी (८६४) असून त्यानंतर नाशिक शहराचे प्रमाण ८९४ पर्यंत कमी आहे. धार्मिक अधिष्ठान लाभलेल्या, जलद प्रगती करणाऱ्या शहरात स्त्री–पुरूष प्रमाण कमी असणे हे स्त्रियांचा दर्जा खालावत असल्याचे द्योतक आहे.

सन १९६१ मध्ये दर हजाार पुरूषांमागे स्त्रीयांचे प्रमाण कमी होऊन ते ९३६ इतके झाले. त्यानंतर सन १९७१ व १९८१ मध्ये दर हजार पुरूषांमागे स्त्रीयांचे प्रमाण अनुक्रमे ९३० व ९४७ असे झाले व १९९१ मध्ये हे प्रमाण ९६१ असे होते. आणि २००१ मध्ये झालेल्या जनगणनेनुसार मालेगाव शहरातील दर हजारी स्त्रीयांचे प्रमाण ९६९ असून नाशिक जिल्ह्यात तुलनेते सर्वात अधिक व भारतातील शहरी सरासरी पेक्षा अधिक आहे. असे असले तरी स्त्रीयांची संख्या कमीच आहे. त्यामुळे स्त्रीयांचा समाजातील दुय्यम दर्जा ठळकपणे दिसून येतो.

### ४.४.३ नाशिक जिल्हा : साक्षरता प्रमाण

''साक्षर म्हणजे लिहिता व वाचता येण्याची क्षमता होय.'' (संयुक्त राष्ट्रसंघ) तर भारतीय जनगणनेनुसार ''ज्या व्यक्तीस कोणत्याही भाषेत समजून वाचणे व लिहिणे हे दोन्ही जमते त्या व्यक्तीस साक्षर म्हणावे.''[८] अशा प्रकारे साक्षरतेच्या व्याख्या वेगवेगळ्या केल्या जात असल्या. साक्षरतेची आंतरराष्ट्रीय तुलना करता येणे अवघड असते. साक्षरता हा सामाजिक आणि आर्थिक प्रगतीचा निर्देशांक समजला जातो. सामाजिक विकास, संक्रमण, आधुनिकीकरणाची वाटचाल, नवविचार प्रवाह यांचा साक्षरता व शिक्षणाशी जवळचा संबंध असतो. साक्षरतेचा परिणाम जन्मदर, मृत्यूदर, स्थलांतर, विवाह वय यावरही होतो. सर्वसाधारणपणे विकसित देशात साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे व विकसनशील देशात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. स्त्रियांमध्ये पुरुषांपेक्षा साक्षरतेचे प्रमाण कमी आढळते. कारण स्त्रियांना समाजात दिला जाणारा दुय्यम दर्जा, काही धर्मातील


स्त्रियांना शिक्षण घेण्याविषयी विरोध, स्त्रियांचा आर्थिक व्यवसायात नसलेला सहभाग, मुलींच्या दुय्यम स्थानामुळे मुलांना शिक्षणाच्या संधी दिल्या जातात. शहरी लोकसंख्येपेक्षा ग्रामीण लोकसंख्येत साक्षरतेचे प्रमाण कमी असते. कारण ग्रामीण भागातील शिक्षणाच्या अपुऱ्या सुविधा, शिक्षणावर खर्च करण्यास अपुरी आर्थिक स्थिती, शिक्षणाचे महत्त्व समजलेले नसते आणि जास्त अंतरावर असणाऱ्या शैक्षणिक सुविधा स्त्रियांना किंवा मुलींना दिल्या जात नाहीत. साक्षरता व व्यवसाय प्रकार यांचा संबंध असतो. विकसित देशात अविकसित देशांच्या तुलनेने साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. लोकांचा समाजातील दर्जा, आर्थिक दर्जा व साक्षरता यांचा परस्पर संबंध असाते. धर्म, जाती, जमाती आणि साक्षरता यांचा संबंध आढळतो.

**सारणी २१ : नाशिक जिल्हा : साक्षरता प्रमाण (२००१)**

| तपशिल | स्त्री | पुरूष | एकूण |
|---|---|---|---|
| नाशिक जिल्हा | ६६.५० | ८४.५६ | ७५.५३ |
| नाशिक शहर | ६६.०० | ८०.०० | ७४.०० |
| मालेगाव शहर | ७४.१४ | ८५.४४ | ७९.७९ |

**स्त्रोत :** आर्थिक व सामाजिक समालोचन, नाशिक जिल्हा– मार्च २०११, पृ. क्र. २२.

**आलेख ४ : नाशिक जिल्हा : साक्षरता प्रमाण (२००१)**




**स्त्रोत :** आर्थिक व सामाजिक समालोचन, नाशिक जिल्हा– मार्च २०११, पृ. क्र. २२

वर दर्शविल्याप्रमाणे, नाशिक जिल्ह्यात साक्षरतेचे एकूण सरासरी प्रमाण ७५.५३ टक्के असून स्त्री साक्षरतेचे प्रमाण ६६.५० टक्के इतके कमी आहे. आधुनिकता व उद्यमशिलतेची कास धरणाऱ्या नाशिक शहरात पुरूष साक्षरतेचे प्रमाण ८०.०० टक्के तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ६६.०० टक्के इतके आहे. मात्र मालेगाव शहरात साक्षरतेचे प्रमाण ७९.७९ टक्के असून नाशिक जिल्ह्याच्या सरासरी पेक्षा अधिक आहे. पुरूष साक्षरतेचे प्रमाण ८५.४४ टक्के असून मुस्लिम धर्मात स्त्री शिक्षणाबाबत उदासिनता आहे असे मानले जात असतांना सुद्धा मालेगाव शहरात महिला साक्षरतेचे प्रमाण ७४.१४ टक्के इतके आहे.

नाशिक शहरात महिला साक्षरतेचे प्रमाण कमी असण्याची कारणे विचारात घेतली असता नाशिक शहरात रोजगाराच्या शोधासाठी ग्रामीण भागातून स्थलांतरीत झालेल्या लोकांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील महिला साक्षरतेची उदासिनता नाशिक शहराच्या साक्षरतेत परावर्तीत होते. तसेच भटक्या जमातींमध्ये शिक्षण सुविधांची एकाच ठिकाणी उपलब्धा होणे शक्य नसते शिवाय दारिद्र्य रेषेखालील अधिक संख्येने महिला धूणी–भांडी व मजूरीसाठी जातांना मुलींना सोबत घेऊन जाणे, लहान वयातच स्वत:बरोबर कामाला लावणे यामुळे साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. मालेगाव शहरात स्त्री साक्षरतेचे प्रमाण नाशिक शहरापेक्षा व नाशिक जिल्ह्यातील शहरी साक्षरतेपेक्षा तुलनेने अधिक आहे. मालेगाव शहरात इतर राज्यातून, इतर शहरांमधून मुस्लिम समुदायाचे सतत वाढत जाणारे वास्तव्य, वैचारिक उदारता, कुटूंबाचा मोठा आकार असल्यामुळे लहान मुले सुद्धा घराबाहेर कामाला जातात. तर लहान मुलींना घराबाहेर इतरत्र पाठविण्यापेक्षा शाळेत पाठविणे सोयीचे मानले जाते. त्यामुळे साक्षरता प्रमाण अधिक आहे. २०११ च्या जनगणनेनुसार नाशिक जिल्ह्यातील साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झाली असून नाशिक जिल्हा - ८०.९६ टक्के व नाशिक शहर - ९०.९६ टक्के आणि मालेगाव शहर - ८६.६६ टक्के. नाशिक शहरातील वाढ ही नाशिक जिल्ह्याच्या सरासरीपेक्षा व मालेगाव शहरापेक्षा अधिक आहे. असे असले तरी नाशिक जिल्ह्यासह नाशिक व मालेगाव शहरातील महिला साक्षरतेचा विचार केल्यास

महिलांमध्ये असलेली साक्षरता पुरूषांच्या तुलनेत कमी आहे. हे स्त्रियांच्या दुय्यम स्थानाचे प्रतिक आहे.

### ४.४.४ नाशिक जिल्हा : सामाजिक रचना

नाशिक जिल्ह्यात हिंदू, मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख या धर्माचे लोक राहतात. पुरातन काळापासुन नाशिक जिल्ह्यास धार्मिक वारसा लाभलेला आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्यात हिंदु धर्मियांची संख्या सर्वाधिक आहे. मुस्लिम धर्मियांची संख्या शहरी भागात अधिक असल्यामुळे दुसऱ्या क्रमांकाची लोक संख्या त्यांची आहे तर शीख धर्मियांचे प्रमाण सर्वाधिक कमी आहे. ग्रामीण भागात व्यवसायावरून पडलेल्या बलुतेदारी पध्दतीमुळे हिंदु मध्ये अनेक जाती–पोटजाती आहेत या व्यतिरिक्त रूढी, परंपरा, कुळाचार, व्यवसाय अशा अनेक कारणांनी निर्माण झालेल्या असंख्य जाती–पोटजाती जिल्ह्यात आढळून येतात.

**सारणी २२ : नाशिक जिल्ह्यातील सामाजिक रचना**

| तपशिल | नाशिक जिल्हा शेकडा प्रमाण | नाशिक शहर शेकडा प्रमाण | मालेगाव शहर शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| हिंदू | ८६.५३ | ७१.१५ | १८.०० |
| मुस्लीम | १०.१७ | १३.२० | ७०.०० |
| बौध्द | १.९० | ८.०२ | ७.०० |
| ख्रिश्चन | ०.४१ | १.६० | ०.५१ |
| जैन | ०.७१ | १.७८ | १.०१ |
| शीख | ०.१४ | ०.६० | ०.०२ |
| इतर | ०.१४ | २.६५ | २.४४ |
| **एकूण** | **१००.००** | **१००.००** | **१००.००** |

**स्त्रोत :** जिल्हा सामाजिक–आर्थिक समालोचन–नाशिक जिल्हा,२००१–०२, पृ. क्र. १७

सारणी क्रमांक २२ नुसार, नाशिक जिल्हा हा हिंदू बहुल लोकसंख्येचा असल्यामुळे हिंदु धर्मियांचे प्रमाण सर्वाधिक ८६.५३ टक्के मुस्लीम धर्मियांचे प्रमाण १०.१७ टक्के असुन दुसऱ्या क्रमांकाचे आहे. शीख धर्मियांचे प्रमाण एकूण लोकसंख्येत ०.१४ टक्के असुन सर्वात अल्पसंख्यांक आहे.

नाशिक शहरात रामायण काळापासुन हिंदू धर्माचे प्राबल्य असल्यामुळे हिंदू धर्मिय लोकांचे प्रमाण ७१.१५ टक्के असुन सर्वाधीक आहे. १५ व्या शतकात मुघल

राजवटीच्या प्रभावामुळे (१४८७ पासुन नाशिक शहराचे गुलशनाबाद नामकरण झाले होते.)[९] आणि जलद औद्योगिकीकरणामुळे मुस्लीम धर्मिय लोकसंख्येचे प्रमाण १३.२० टक्के पर्यंत वाढून दुसऱ्या क्रमांकाचे आहे. बौद्ध धर्माच्या लोकांचे प्रमाण सुद्धा अधिक आहे. व्यापार उद्दीमाच्या निमित्ताने स्थायिक झालेल्या शीख लोकसंख्येचे प्रमाण सर्वात कमी आहे.

नाशिक शहर हे रामायण काळापासून हिंदू धर्मपिठ[१०] म्हणून प्रसिद्ध असल्यामुळे हिंदु–बहुल शहर आहे. असे असले तरी नाशिक शहराचे तीन विभाग करता येतात. गोदावरी नदीच्या डाव्या किनाऱ्यावर पुर्वेकडे पंचवटी परिसर जुने नाशिक म्हणून ओळखला जातो. या परिसरात हिंदू लोकांचे प्रमाण अधिक आहे. तर गोदावरी नदीच्या डाव्या किनाऱ्यावर आणि पंचवटीच्या दक्षिणेकडे असणारा परिसर हा मध्य नाशिक म्हणून ओळखला जातो या भागात मुस्लिमांची वास्तव्य अधिक प्रमाणात असून हा परिसर पुर्वी गुलशनाबाद किंवा गुलाबाचे शहर म्हणून ओळखला जात होता तसेच गोदावरी नदीच्या उजव्या किनाऱ्यावर उत्तरेकडे नविन किंवा मॉर्डन नाशिक किंवा मराठा नाशिक म्हणून ओळखले जाते.[११]

'माहुलीग्राम' म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या हिंदू धर्मियांच्या ग्राम मध्ये १७४० च्या सुमारास 'नारोशंकर' यांनी 'भूईकोट किल्ल्याच्या रक्षणासाठी सहाशे अरबी मुस्लीमांची नेमणुक केली'[१२] तेव्हा पासुन प्रामुख्याने १८५७ च्या उठावानंतर अनेक राज्यातून मुस्लीम धर्मीय लोकांचे स्थलांतर मालेगाव शहरात सतत होत राहिले शिवाय हातमाग व नंतर यंत्रमागाच्या सहाय्याने होत आहे. त्यामुळे मालेगाव शहर महाराष्ट्रातील मुंबई, ठाणे, औरंगाबाद नंतर चौथ्या क्रमांकाचे आणि नाशिक जिल्ह्यातील प्रथम क्रमांकाचे मुस्लीम बहुल लोकसंख्या असणारे शहर आहे. मुस्लीम समुदायाबरोबर हिंदू धर्मिय लोकसंख्येचे प्रमाण शहरात दुसऱ्या क्रमांकाचे आहे. शहरात इतरही धर्माच्या लोकांचे प्रमाण असुन शीख धर्मियांचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

मालेगाव शहरातील हिंदु –मुस्लिम धर्मिय लोकांची साामजिक सौदार्हता १९७० च्या दशकापासून हळू–हळू नष्ट होऊन जातीय दंगे व धार्मिक तेढ निर्माण

झाली. त्यामुळे 'मोसम' नदीच्या पुर्वेला पुर्ण मुस्लीम वस्ती व पश्चिमेला हिंदू वस्ती आहे. तसेच पारतंत्र्याच्या काळात इंग्रजांची छावणी असणाऱ्या भागास आज 'कॅम्प' म्हणुन ओळखले जाते. या भागात मालेगाव व परिसरात नोकरी करणाऱ्या लोकांची वस्ती तयार झाली आहे.

## ४.५ नाशिक जिल्हा : सामाजिक व सांस्कृतिक

नाशिक जिल्हा हा महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तन आणि सांस्कृतिक चळवळ यांचे कें द्र असलेला जिल्हा आहे. संत– महंत, समाजसुधारक, क्रांतीकारक, साहित्यिक आणि कलाकार यांची कर्मभूमी म्हणुन नाशिक जिल्हयाची ओळख आहे.

भारताच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या आणि सर्वस्व वेचणाऱ्या अनेक सेनानींची नाशिक जिल्हा ही जन्मभुमी आहे. इ.स. १८५७ च्या स्वातंत्र्यलढयातील तात्या टोपे या आद्य स्वातंत्र्यसेनानीची 'येवला'ही जन्मभूमी आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर, अनंत कान्हेर यांच्या बलिदानाचा आदर्शवत वारसा या जिल्ह्याच्या भूमीला लाभलेला आहे.

स्वातंत्र्य चळवळीतील योगदाना प्रमाणेच समाज सुधारक आणि समाज प्रवर्तकांचा जिल्हा म्हणुनही नाशिकची ओळख आहे. न्या. रानडे, रेव्ह. टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊसाहेब हिरे, लोककवी वामनदादा कर्डक अशा थोर कृतीशिल विचारवंताचा सहवास लाभलेला हा जिल्हा आहे. डॉ. आंबेडकरांचा काळाराम मंदिर सत्याग्रह, येवल्याची धर्मांतराची ऐतिहासिक घोषणा आणि कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी केलेला 'कुळकायदा' या घटना सामाजिक परिवर्तनाच्या नांदी ठरलेल्या आहेत.

प्राचीन काळापासून धार्मिक परंपरा असलेल्या नाशिकला तीर्थक्षेत्र म्हणून मानाचे स्थान आहे. भारतात दर बारा वर्षांनी होणाऱ्या सिंहस्थ पर्वणीचे नाशिक हे एक पवित्र स्थळ आहे. 'नारायण नागबली' या धार्मिक विधीसाठी प्रसिद्ध असणारे नाशिक हे भारतातील एकमेव ठिकाण आहे. भारतातील बारा ज्योर्तिलिंगापैकी

त्रंबकेश्वर प्रख्यात ज्योर्तिलिंग नाशिकच्या धार्मिक परंपरेचा शिरपेच आहे. श्रीरामाची तपोभुमी, पंचवटी येथील काळाराम मंदिर, पांडव लेणी, चांभार लेणी, चांदवडची रेणूका देवी, वणीची सप्तश्रृंगी देवी, सिन्नरचे गोधेश्वर मंदिर, इगतपुरी जवळचे कपिलधारा तीर्थ व विपश्यना केंद्र ही जिल्ह्यातील धार्मिक व प्रेक्षणिय दृष्ट्या महत्वाची स्थळे आहेत.

नाशिकला साहित्यभूमी म्हणूनही ओळखले जाते. ज्ञानपीठ पुरस्काराने गौरविलेले मराठी साहित्याचे नटसम्राट तात्यासाहेब तथा वि.वा. शिरवाडकर हे नाशिकच्या साहित्य क्षेत्रातील आदरणीय नाव आहे. चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके, नाटककार वसंत कानेटकर यांचा सार्थ वारसा जिल्ह्यास लाभला आहे. असार सिद्धीकी, अल्ताफ झिया आझाद गझल सम्राट आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवून आहेत. एकूणच नाशिकला अभिमानास्पद साहित्य आणि वाङ्मय परंपरा लाभली आहे. मालेगावच्या मॉलीवूडची दखल तर आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली गेली आहे. कल्पतरू रचणारा –कृष्ण याज्ञवल्की, कवी रंगनाथ, मध्यमूनी व त्याचा शिष्य अमृतराय हे नाशिकचे होते.[१३]

समाजप्रबोधन आणि मनोरंजनाच्या क्षेत्रात नाशिक जिल्हा स्वातंत्र पुर्वकाळापासून अग्रेसर राहीलेला आहे. ऐतिहासिक महत्व लाभलेले महाकवी कालीदास नाट्यगृह आणि इतर तीन नाट्यगृहे, सीनेमॅक्स सारखी ९ मल्टीफ्लेक्स मनोरंजन सेंटर, ९ परंपरागत चित्रपट गृहे, ३ एफ एम रेडीओ स्टेशन प्रेक्षकांचे मनोरंजन घडवून आहेत. तसचे २००२ नंतर नाशिक शहरात बीग बझार आणि इतर १३ मॉल्स ग्राहकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरलेले आहेत. नाशिक पाठोपाठ मालेगाव शहरात सुद्धा काकाणी वाचनालय, श्रध्देय वाचनालये वाचकांची बौद्धीक भुक भागवित आहे. मोरया मॉल्सच्या माध्यमातून मॉल संस्कृती मालेगाव शहरात रूजलेली आहे. मालेगाव शहराचे खास वैशिष्टये म्हणजे मल्टी प्लेक्सच्या युगातही १४ परंपरागत चित्रपट गृहांमध्ये प्रेक्षकांची गर्दी सतत असते. त्यामुळे आजही चित्रपट गृहांचा व्यवसाय टिकून आहे. तसेच शहरात मालेगांव का शोले, मालेगाव का सुपरमॅन या सारख्या अनेक चित्रपटांची निर्मिती स्थानिक कलाकरांना घेऊन

केली जात आहे. त्यामुळे हॉलीवुड बरोबर मॉलीवूड आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध झालेले आहे.[१४]

**४.५.१ नाशिक जिल्हा : शिक्षण व तंत्रज्ञान**

देशातील मनुष्यबळ हे देशाची साधन संपत्ती असते. शिक्षणामुळे मानवी साधन संपत्तीची गुणवत्ता व कार्यक्षमता वाढते. शिक्षणामुळेच सर्व समाज सक्षम आणि सबळ होतो. त्यातून वैयक्तिक, सामाजिक प्रगती होते. मात्र त्यासाठी पुरेशा प्रमाणात शिक्षणसोयींची उपलब्धता असणे आवश्यक असते. यादृष्टिने नाशिक जिल्ह्यातील शिक्षणसोयींची स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

नाशिक जिल्ह्यातील नाशिक शहरात १८६१ मध्ये सुपीरियर ॲग्लो व्हर्नेकुलर स्कुल नावाने पहिली प्राथमिक शाळा नाशिक शहरात स्थापन झाली. १८७१ मध्ये याच शाळेने माध्यमिक शाळा सुरू केली. २०००-२००१ मध्ये नाशिक जिल्ह्यात ३३२२ प्राथमिक शाळा, ६४८ माध्यमिक शाळा शैक्षणिक सुविधा पुरवित असुन १०.६५ लक्ष विद्यार्थी प्राथमिक शिक्षण घेत आहेत. एकूण विद्यार्थ्यांमध्ये ९.८३ टक्के अनुसूचित जाती व २०.६७ टक्के विद्यार्थी हे अनुसूचित जमातीचे आहेत. तसेच जिल्ह्यात ३२ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालये, ८ इंजिनियअरींग, ९ पॉलिटक्निक, एक मेडीकल, १४ बीएड, १६ डीएड, १८ आय.टी.आय., २ लॉ, ३ आयुर्वेदिक शिवाय मॅनेजमेंट, डेंटल, फार्मसी, संगणक, केटरींग इ. सारख्या महाविद्यालयांची स्थापना झालेली आहे.[१५]

मालेगाव शहरात मुस्लिम लोकसंख्येचे प्रमाण अधिक असल्यामुळे उर्दु भाषा व उर्दुशी साम्य असलेली मादरी भाषा अधिक प्रमाणात व्यवहारात वापरली जाते. त्यामुळे उर्दुतून शिक्षण देणाऱ्या ५८ व मराठी माध्यमातून शिक्षण देणाऱ्या महानगरपालिकेच्या १६ शाळा, ३८ माध्यमिक विद्यालय, ७ महाविद्यालये, ४ औद्योगिक प्रशिक्षण संस्था, २ फार्मसी महाविद्यालये आणि ८ मदरशांच्या माध्यमातून धार्मिक शिक्षण देण्यात येत आहे. शिवाय जामिया मोहंमदीया मन्सुरा (अरेबिक युनिर्व्हसिटी) विद्यापीठ आहे.

प्रतिहजार लोकसंख्ये मागे जिल्ह्यातील प्राथमिक सोयींची सरासरी २.८३ असतांना नाशिक शहरात ३.३८ व मालेगाव शहरात ४.२० इतकी आहे. मात्र माध्यमिक शिक्षण सोयींची सरासरी जिल्ह्यात ०.९६ असून नाशिक शहरात ०.९० तर मालेगाव शहरात ०.२९ आहे. उच्च शिक्षण सोयींची सरासरी ०.३९ असतांना नाशिक शहरात ०.३३ तर मालेगाव शहरात ०.२६ इतकी अल्प आहे. थोडक्यात माध्यमिक व उच्च शिक्षण सोयींची कमतरता आहे.[१६]

**४.५.२ नाशिक जिल्हा : आरोग्य**

आरोग्य हे प्रत्येक व्यक्तीच्या दृष्टीने संपत्ती समान असते. त्यामुळे त्यास आरोग्य संपदा म्हटले जाते. यादृष्टिने प्रत्येक व्यक्तीचे आरोग्य सुदृढ असणे अत्यावश्यक असते. आरोग्य संवर्धनासाठी प्रत्येक व्यक्तीस आरोग्य सुविधांची उपलब्धता होणे हा त्यांचा हक्क असतो.

नाशिक शहरात आरोग्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना झालेली असून शेकडो प्राथमिक आरोग्याची सुविधा पुरविणारे दवाखाने व सार्वजनिक रूग्णालये कार्यरत आहे. होकहार्ट, आरोग्य संपदा यासारख्या सर्व सोयी सुविधांनी युक्त असणारे खाजगी दवाखाने सेवा देत आहेत. मालेगाव शहरात ग्रामीण आरोग्य रूग्णालयास तीन सार्वजनिक रूग्णालये, ४ सरकारी दवाखाने, ४९ खाजगी दवाखाने, १० नर्सिंग होम, ३५० खाजगी प्राथमिक उपचार केंद्रे, ४० केंद्रे लॅब सेवा देत आहेत.

नाशिक जिल्ह्यात आरोग्य सुविधांच्या उपलब्धतेची सरासरी दर १००० लोकसंख्येमागे १.७३ रूग्ण खाटांची संख्या असून नाशिक शहरात हे प्रमाण ०.९८ आणि मालेगाव शहरात ०.१९ इतके अल्प आहे. म्हणजे नाशिक व मालेगाव शहरात लोकसंख्येची घनता व झोपडपट्टीत रहाणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण अधिक असतांना आरोग्य सुविधांची कमतरता अधिक प्रकर्षाने जाणवते. त्यामुळे शहरात स्वाईन फ्लू व पोलिओचे रूग्ण आढळून येतात.[१७]

### ४.५.३ नाशिक जिल्हा : बालमृत्यू

जन्माला येणाऱ्या अर्भकांना योग्य वातावरण आणि आरोग्य सुविधांची उपलब्धता न होणे म्हणजे मानवी जन्म नाकारण्यासारखे आहे. २१ व्या शतकातील विज्ञान युगात बालमृत्यूचे प्रमाण अधिक असणे हे समाज व्यवस्थेसाठी लांच्छनास्पद आहे.

नाशिक जिल्ह्यात बालमृत्यूचे प्रमाण ग्रामीण व शहरी भागात अधिक आहे. ग्रामीण भागात दरहजारी अर्भक मृत्यूचे प्रमाण १८० असुन शहरी भागात ११०१ इतके अधिक आहे. नाशिक जिल्ह्यात एकूण, अर्भक मृत्यूप्रमाण १२८१ इतके आहे. नाशिक व मालेगाव तालुक्याने बालमृत्यूचे प्रमाण अनुक्रमे पहिल्या ५८४ दुसऱ्या ५५५ असुन जिल्ह्यात सर्वाधीक आहे. नाशिक जिल्ह्यातील शहरी भागातील बालमृत्यूचे प्रमाण सुद्धा नाशिक शहरात ५६९ व मालेगाव शहरात ५२९ इतके अधिक आहे.

**सारणी २३ : नाशिक जिल्ह्यातील बालमृत्यू प्रमाण**

| तहसिल | ग्रामीण | नागरी | एकूण बालमृत्यू |
|---|---|---|---|
| १. सुरगाणा | २० | ० | २० |
| २. कळवण | १७ | ० | १७ |
| ३. देवळा | ५ | ० | ५ |
| ४. बागलाण | २३ | ० | २३ |
| ५. मालेगाव | २६ | ५२९ | ५५५ |
| ६. नांदगांव | ० | ० | ० |
| ७. चांदवड | ५ | ० | ५ |
| ८. दिंडोरी | ९ | ० | ९ |
| ९. पेठ | १० | ० | १० |
| १०. त्रंबकेश्वर | १४ | १ | १५ |
| ११. नाशिक | १५ | ५६९ | ५८४ |
| १२. इगतपूरी | ६ | १ | ०७ |
| १३. सिन्नर | १३ | ० | १३ |
| १४. निफाड | १३ | १ | १४ |
| १५. येवला | ४ | ० | ४ |
| **एकूण** | **१८०** | **११०१** | **१२८१** |

**स्त्रोत :** आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे , पृ. क्र. १२२.

स्वातंत्र्योत्तर  काळात, आरोग्य सुविधांच्या प्रचार व प्रसारामुळे बालमृत्यूचे प्रमाण ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात मालेगाव व नाशिक शहर वगळता कमी झालेले दिसून येते. नाशिक व मालेगाव या दोन्ही शहरात वाढती झोपडपट्टी व

झोपडपट्टीतील बेरोजगारी, दारिद्र्य इ. मुळे बालमृत्यूचे प्रमाण खुप अधिक आहे. नागरी भागातील एकूण बालमृत्यूपैकी नाशिक शहरात ५१.५८% व मालेगाव शहरात ४८.०४% म्हणजे फक्त दोन्ही शहरात ९९.७२% बालमृत्यूचे प्रमाण आहे.

## ४.६ नाशिक जिल्हा : आर्थिक वाटचाल व स्थिती

नाशिक जिल्हा प्रामुख्याने 'शेती प्रधान' व उद्योगप्रधान म्हणुन ओळखला जातो. ग्रामीण भागात शेती प्रधान अर्थव्यवस्था व नागरी भागात उद्योगप्रधान अर्थव्यवस्था अस्तित्वात आहे.

### ४.६.१ नाशिक जिल्हा : शेती

शेती क्षेत्र हा नाशिक जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेचा आधार आहे. उद्योग आणि सेवा होणाऱ्या प्रगतीमुळे जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला भक्कम जोड मिळत आहे. नगदी पिकांबरोबरच पशुपालन, दुग्धव्यवसाय, सहकारी, सरकारी उपक्रम, खाजगी व्यवसाय या माध्यमातून विदेशी चलन मिळवुन देणारा जिल्हा म्हणुन नाशिक ची खास ओळख आहे.

जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रांपैकी १५६३४०० हेक्टर क्षेत्र शेती योग्य आहे. यापैकी ९४२७०० हेक्टर क्षेत्र लागवड योग्य आहे. सिंचनाखालील क्षेत्र १,७१२०० हेक्टर असुन लागवड योग्य क्षेत्राशी हे प्रमाण १८.१६ टक्के आहे. परंपरागत तृणधान्ये व कडधान्ये उत्पादन घेतांना नगदी पिकांकडे कल वाढत आहे.[१८] साखर कारखाने व वाईन प्रकल्पांमुळे जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेत ऊस व द्राक्षे या नगदी पिकांचे महत्व वाढलेले आहे. तसेच दुध फळे, भाजीपाला यांचा मोठ्या प्रमाणात मुंबई शहरात पुरवठा या जिल्ह्यातुन केला जातो. कमी पावसाच्या कसमादे पट्यातुन डाळींब व कांद्याचे उत्पादन घेतले जाते. हरित गृहांच्या माध्यमातुन फुलणारी फुलशेती, फळशेती या माध्यमातुन स्ट्रॉबेरी डाळींब, द्राक्षे, कांदा, फुले, वाईन यांची निर्यात करणारा जिल्हा म्हणुन नाशिकची ओळख जागतिक स्तरावर निर्माण झालेली आहे. जिल्हयात अलिकडे सेंद्रीय शेतीला महत्व

दिले जात असुन आधुनिकता, प्रयोगशिलता आणि व्यापारी दृष्टिकोन ही शेती आणि शेतकऱ्यांचे पर्यायाने ग्रामीण भागाचे महत्त्वपुर्ण वैशिष्टये ठरू पाहत आहेत.

### ४.६.२ नाशिक जिल्हा : उद्योग

नाशिक जिल्ह्यात ७४ मोठे उद्योग प्रकल्प, २०० मध्यम आणि १०७८६ लघु उद्योग कार्यरत आहेत. सिन्नर येथील औद्योगिक वसाहतीला पंचतारांकित दर्जा मिळाल्यापासुन जिल्ह्यातील औद्योगिकीकरणाला गती मिळाली आहे.

मुंबई, ठाणे, पुणे या शहरांच्या औद्योगिकरणास मर्यादा पडल्यामुळे १९६० नंतर नाशिक जिल्ह्यात औद्योगिक विकासास सुरुवात झाली. नाशिक जिल्ह्यातील नाशिक, अंबड, सातपूर, सिन्नर, येवला व मालेगाव ह्या शहरांमध्ये उद्योग विकास घडून येत आहे.

नाशिकरोड येथील प्रतिभूती मुद्रणालय व शासकीय प्रेस, एकलहरे येथील औष्णिक विद्युत केंद्र, मायको इंडस्ट्रीज, इंडियन टुल्स, एशियन पेन्टस्, सी–एट टायर्स, गरवारे नायलॉन, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा जीप कारखाना, व्ही.आय.पी. ग्लॅक्सो, तापरीया टूल्स्, सी.पी. टूल्स्, क्रॉम्पटन ग्रिव्हज इ. सारखे नामवंत मोठे कारखाने व प्रकल्प उभे राहिलेले आहेत. तसेच जिल्ह्यात सुभाषनगर, विंचूर येथील वाईन पार्कची निर्मिती, येवल्याची पैठणी, सुरगाण्याची कारपेट्स, एकलहरेचे थर्मल पॉवर स्टेशन, साखर कारखाने, नांदगावची ज्योती लॅबोरिटिज्, मनमाडचे एफसीआय गोडाऊन, लासलगावची कांदा बाजारपेठ, नाफेड केंद्र, शिवाय मालेगाव शहरातील यंत्रमाग सफेद व रंगीत कापड व साडी उद्योग इत्यादी ही नाशिक जिल्ह्याची आर्थिक बलस्थाने आहेत.[१९]

## सारणी २४ : नाशिक जिल्ह्यातील उद्योग स्थिती

| तपशिल | कृषी व बिगरकृषी उद्योग संख्या | | |
|---|---|---|---|
| | ग्रामीण | शहरी | एकूण |
| **उद्योगांची संख्या** | | | |
| • स्वकार्यरत उद्योग | ४१६०५ | ५७५७५ | ९९१८० |
| • आस्थापना | २३९७८ | ३६१७९ | ५९९७७ |
| **एकूण** | **६५४०३** | **९३७५४** | **१५९१५७** |
| **मालकीच्या प्रकारानुसार उद्योग** | | | |
| • सहकारी | १०३९ | ७८८ | १८२७ |
| • सार्वजनिक | १०२५७ | ३४२२ | १३६५ |
| • खाजगी | ५४१२७ | ८९५४४ | १४३६७१ |
| **मालकाचा विशेष सामाजिक गट (एकूण संस्थांशी टक्केवारी)** | | | |
| • अनुसूचित जाती | ५.३३ | ६.४९ | ६.०१ |
| • अनुसूचित जमाती | ८.९० | ४.२२ | ६.१४ |
| **सर्वसाधारणपणे काम करणाऱ्या कामगारांची संख्या** | | | |
| • एकूण कामगार | १५०६८३ | २८२६८७ | ४३३३७० |
| • वेतनावर काम | ८८२३१ | १७९६३० | २६७८६१ |
| • वेतनावरील कामगारांची संख्या | ५८.५५ | ६३.५४ | ६१.८१ |

**टिप :** * पगारावर एकही कर्मचारी नसलेले उद्योग
** ज्या उद्योगात कमीत कमी एकतरी व्यक्ती पगारावर आहे असे उद्योग

**स्त्रोत :** अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, आर्थिक गणना, २००५

औद्योगिक क्षेत्रातील उद्योग व्यवसायांच्या/ संस्थांच्या संख्यात्मक स्थितीवर सदर भागातील लोकांची रोजगार, उत्पन्न व आर्थिक दर्जा अवलंबून असतो. नाशिक जिल्ह्यात एकूण १५९१५७ उद्योग स्थापन झालेले असून मालकीच्या प्रकारानुसार खासगी उद्योजकांची संख्या सर्वाधिक आहे. सहकारी क्षेत्राची व सरकारी क्षेत्रातील उद्योगांची वाढ झालेली आहे. एकूण उद्योगांच्या मालकी हक्कामध्ये ६.१ टक्के मालक अनुसूचित जाती व ६.१४ टक्के मालक हे अनुसूचित जमातीच्या काम करणाऱ्या एकूण कामगारांपैकी ६१.८१ टक्के कामगार वेतनावर व उर्वरित ३८.१९ टक्के मजूर अनिश्चित स्वरूपाच्या वेतनावर काम करीत आहेत.

नाशिक शहराला प्राचीन काळापासुन उद्योग व्यवसायाचा वारसा लाभलेला आहे. तांबे-पितळाचे भांडे, मंदिरासाठी पितळी घंटे, पितळ व चांदीच्या मुर्ती, तांब्याचे देवपुजेचे भांडे, कुलूप पैठणी व सिल्क साडी इत्यादी सारखे लघु व

गृहोद्योगात हजारो कारागीर गुंतलेले होते. इ.स. १९०० मद्ये नाशिक जवळ श्री. बालाजी वाजे यांनी 'सिन्नर बीडी कारखाना काढुन उद्योगाची खऱ्या अर्थाने मुहूर्तमेड रोवली. १९२४ मध्ये 'दि नाशिक पिपल्स को. ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना केली. नोव्हे १९१८ मध्ये भारत सरकारने नॅशनल ट्रेझरी प्रिंटींग प्रेसची स्थापना केली ही प्रेस नाशिक शहरातील औद्योगिक विकासाची मुहूर्तमेढ ठरली. सुवर्ण नियंत्रण कायद्याला विरोध म्हणून सराफी व्यावसायिकांनी १३ दिवस आंदोलन केले. त्यातुन नाशिक शहरात १९३५ मध्ये सराफी असोसिएशनची स्थापना झाली. आज नाशिक शहरात ३००० पेक्षा अधिक सराफी पेढ्या कार्यरत आहेत. १९३६ मध्ये पहिला साबण कारखाना आणि १९४३ मध्ये सिमेंट स्टाईल निर्मिती कारखाना सुरू झाला. ३१ ऑक्टोबर १९५५ रोजी भारत सरकारने करन्सी नोट प्रेस सुरू केली.

१९६२ च्या औद्योगिक धोरणानुसार १९६२ मध्ये ६३६.९८ हेक्टर क्षेत्रफळ असणाऱ्या सातपुर औद्योगिक वसाहतीची घोषणा झाली. तसेच १९६२ मध्येच पद्मश्री बाबुराव राठी व श्री. दादासाहेब पोतणीस यांच्या पुढाकाराने नासिक इंडस्ट्रीयल को–ऑपरेटिव्ह इस्टेट (एनआयसीई) ची स्थापना झाली. १९६७ मध्ये सिकॉमने नाशिकचे अल्हाददायक वातावरण औद्योगिक विकासाला पोषक असल्याचे मान्य करून औद्योगिक विकासाचे केंद्र म्हणुन निवडले. त्यामुळे टेल्को, टिस्को, टाटा पावर, रेमांडस्, ग्रासीम, रिलायन्स कापड उद्योग, गुजरात, नर्मदा फर्टीलायझर्स, महिंद्रा अ‍ॅण्ड महिंद्रा, व्ही.आय.पी. सीएट, एटलास, सॅमसोनिट,क्रॉम्प्टन ग्रीव्हज, कोकाकोला, किर्लोस्कर एबीबी, अशोका, बिल्डकॉन, लार्सन अ‍ॅण्ड टुर्बो, जिन्दाल स्टिल इत्यादी मायको, ग्लॅक्सो, कापड, अभियांत्रिकी, वाहन, इलेक्ट्रॉनिक्स, स्टील, या क्षेत्रातील प्रमुख उद्योगांची स्थापना १९७० च्या दशकात नाशिक मध्ये झाली. याच कालावधीत १९६४ मध्ये भारत सरकारने नाशिक जवळील ओझर येथे 'हिंदुस्थान एअरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) चा 'मीग' विमान बनविण्याचा प्रकल्प सुरू केला. त्यामुळे नाशिकच्या प्रगतीला अधिक वेग आला.

१९८० च्या दशकात १९८० मध्ये ५१९.५५ हेक्टर क्षेत्रावर 'अबंड' या दुसऱ्या औद्योगिक वसाहतीची स्थापना करण्यात आली. १९८२ मध्ये नाशिक जवळ सिन्नर येथे मालेगाव को. ऑप. एरियाची व १९८८ मध्ये सिन्नर औद्योगिक वसाहतीची स्थापना करण्यात आली. तर १९९२ मध्ये दिंडोरी व इगतपुरी या लघु औद्योगिक वसाहतींची स्थापना झाली. औद्योगीक क्षेत्रातील उद्योगांच्या शेअर्सची खरेदी विक्रीसाठी १९९२ मध्ये 'अभिनव शेअर्स बाजार' या संकल्पनेचा नाशिक मध्ये उदय झाला. त्यामुळे शहरात शेकडो शेअर्स दलाल व शेअर्स खरेदी विक्रीचे 'बोल्ट' स्थापन झालेले आहेत. गुंतवणुकीत पर्याय म्हणुन नाशिक येथे ४ एप्रिल १९९२ ला गुढीपाडव्याच्या मुर्हूतावर म्युच्युअल फंडाचे पहिले कार्यालय सुरू करण्यात आले. आज शहरात २५ वेगवेगळ्या म्युच्युआल फंडाचे कार्यालये कार्यरत असुन ३५० कोटी रूपयाची मालमत्ता गुंतवण्यात आलेली आहे.[२०]

नाशिक शहराच्या परीसरात दरवर्षी २५ लाख लिटर द्राक्षापासून वाईन तयार होऊन अनेक देशात सुला आणि झम्पा सारखे वाईन ब्रॅन्ड निर्यात केले जातात. त्यामुळे नाशिकला 'वाईन कॅपीटल ऑफ इंडिया' म्हणुन ओळखले जाते.

केंद्रशासनाच्या माहिती व तंत्रज्ञान खात्याने २००२ मध्ये अंबड औद्योगिक वसाहतीत सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने आयटी पार्क विकसीत करण्याचे धोरण स्विकारलेले आहे. बीपीओ/आयटी कंपन्यांच्या स्थापनेसाठी तसेच डिजीटल मार्केटींग आणि इंटरनेट जर्नलीजम च्या विकासासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

औद्योगिक क्षेत्राच्या वरील प्रमाणे दर्शविलेल्या वाटचालीतुन आज नाशिक शहर हे भारतातील सर्वात अधिक वेगाने विकसीत होणारे शहर ठरलेले असुन ''टायर–२ मेट्रो'' म्हणून ओळखले जात आहे.[२१]

आजचे मालेगाव शहर हे पुर्वीचे 'माळवाडी' म्हणजे बहुसंख्येने माळी लोकांची वस्ती असलेले लहानसे खेडे होते. मात्र १७ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून व प्रामुख्याने १७४० नंतर अरबी विणकरांच्या वाढीमुळे हातमाग कापड व्यवसायास सुरूवात झाली. १८१८ मध्ये ब्रिटीशांच्या आगमणानंतर शहरात

टपाल, तारखाते, दवाखाना, शाळा इ. सुविधांच्या पुरवठ्यामुळे नागरी करण्यास सुरूवात झाली. १९१२ मध्ये विणकांमाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यासाठी 'दि गॅरेन्टेड हॅन्डलुम विव्हींग' स्कूलची स्थापना करण्यात आली. १९३५ मध्ये अब्दुल रज्जाक फकिर मोहंमद यांनी मालेगाव शहरात स्टार 'विव्हींग मिल' नावाने पहिला पावरलुम कारखाना सुरू करून कापड उद्योगाची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर १९३६ मध्ये दी अमलगमेटेड इलेक्ट्रीक कंपनी के विजपुरवठा केल्यामुळे विजेवरील यंत्रमाग धडधडू लागले. १९५१ पासुन शहरात रंगीत साडी उत्पादनास सुरूवात झाली. १९७२ पासुन रंगीत साडी बरोबर ग्रे कापड निर्मितीवर भर देण्यात आला. १९८५ मध्ये ४२९९५ यंत्रमाग शहरात होते.[२२] २००१ अखेरीस शहरात नोंदणीकृत ९०,००० व बिगर नोंदणी असलेले सुमारे ६०,०००यंत्रमाग मिळुन एकूण १५०००० यंत्रमागाच्या सहाय्याने दररोज ६० ते ७० लक्ष मीटर केले जात असून १० कोटी रूपये पेक्षा अधिक किंमतीचे व्यवहार होतात. तसेच शहरातील २.५ लक्ष लोकांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून आहे. त्यामुळे शहराची अर्थव्यवस्था प्रामुख्याने यंत्रमाग व्यवसायावर आधारीत आहे.

यंत्रमागाच्या जोडीला १९९५ नंतर प्लास्टीक पासुन बनविण्यात येणारे काळे पाईप तयार करण्याचा व्यवसाय तेजीत आलेला आहे. शहरात १८० पाईप बनविणारे, २०० गट्टी तयार करणारे, २० ट्युबिंग युनिटस् कार्यरत असून या व्यवसायावर ७० हजार लोकांचा उदरनिर्वाह चालतो. त्यामुळे मालेगाव हे आशिया खंडातील सर्वात मोठे 'रिप्रोसेसिंग सेंटर' म्हणून प्रचलित झालेले आहे.[२३] शिवाय ट्रान्सपोर्ट व्यवसायाचे प्रमाण मोठे असल्यामुळे गॅरेज व्यवसाय मालेगाव शहर २४ तास गजबजलेले असते त्यामुळे रात्रंदिवस चहा टपरी व हॉटेल्स व्यवसाय सुरू असतात म्हणून हॉटेल व्यवसायाचे प्रमाण अधिक आहे.

### ४.६.३ नाशिक जिल्हा : रोजगार

बेरोजगारीचा प्रश्न हा दारिद्र्याशी निगडीत असतो. किंबहुना त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दारिद्र्य समस्या निर्माण होते कारण व्यक्तीला पुरेशा

प्रमाणात रोजगार समिती उपलब्ध होत नाहीत. श्रम करण्याची शारिरीक व बौद्धीक क्षमता असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस काम मिळणे आवश्यक असते. मिळणाऱ्या श्रमातुन किंवा रोजगारातुन व्यक्तीस आर्थिक दृष्ट्या स्वावलंबन प्राप्त होते. २००१ च्या जनगणेने नुसार भारतातल्या ग्रामीण भागात ३०.९ टक्के व शहरी भागात ११.५५ टक्के स्त्रियांनाच रोजगार मिळतो. आणि मिळणाऱ्या रोजगारात ८१ टक्के रोजगार प्राथमिक क्षेत्रातुन असतो.

नाशिक जिल्ह्यातील शहरी भागात २५.८ टक्के श्रमिकांना नियमित रोजगार मिळतो. नाशिक शहरात हे प्रमाण ३९.८ असुन मालेगाव शहरात ६.१५ टक्के इतके अल्प आहे. त्यापैकी ०.४६ टक्के सीमांत श्रमिक व ९३.३९ टक्के श्रमिक हे अनियमित स्वरूपाचे आहेत.[२४]

नाशिक शहरात कंत्राटी स्वरूपाच्या श्रमाचे प्रमाण अधिक असुन मिळणारे काम अनिश्चित व विशिष्ठ कालावधीसाठीच असते. मालेगाव शहरात मिळणारा रोजगार प्रामुख्याने यंत्रमाग व पाईप व्यवसायातुन असतो. श्रमाचे तास अधिक असुन मिळणारी मजुरी कमी असते. तसेच यंत्रमाग व्यवसायातील तेजी–मंदीवर काम अवलंबुन असते. महिलांना मिळणारा रोजगार अत्यंत कमी प्रमाणात असतो. स्त्रियांना रोजगार देणे, तुलनात्मक दृष्ट्या 'अधिक खर्च' व कार्यक्षमतेच्या दृष्टिने तुलनेत निकृष्ठ असते असा सर्वसामान्य समज असल्यामुळे महिलांच्या रोजगाराचे प्रमाण कमी असते. परिणामी उत्पन्न कमी होऊन दारिद्र्याची तिव्रता अधिक जाणवते.

### ४.६.४ नाशिक जिल्हा : बँका

सामाजिक आणि आर्थिक विकासात, तसेच सामाजिक सबलीकरणात बँकांची भूमिका अत्यंत महत्त्वपुर्ण असते. नाशिक जिल्ह्यात खाजगी क्षेत्रातील देशी–विदेशी बँका, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, सहकारी बँका असे बँकिंगचे जाळे कार्यरत आहे. जिल्ह्याची अग्रणी बँक म्हणून बँक ऑफ महाराष्ट्र ग्रामीण भागात नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक विशेष कामगिरी पार पाडत आहेत.

नाशिक जिल्ह्यात २००० अखेर राष्ट्रीय व बिगर राष्ट्रीयकृत अशा एकूण ८८ बँकांच्या २३४ बँक शाखा कार्यरत होत्या. बँक ऑफ महाराष्ट्र ही जिल्ह्याची अग्रणी बँक असल्यामुळे जिल्ह्यात या बँकेच्या ६७ शाखा आहेत. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ३६ शाखा, युनियन बँकेच्या ११ शाखा, सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या ०८, पंजाब नॅशनल बँकेच्या व सिंडीकेट बँकेच्या प्रत्येकी ६ शाखा व इतर सर्व राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखा जिल्ह्यात सेवा पुरवित आहेत. ग्रामीण आणि शहरी विभागातील सर्वप्रकारच्या ग्राहकांना व सभासदांना बँकिंगच्या सुविधा सुलभतेने उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने १९५५ मध्ये स्थापन झालेला नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २१३ शाखा कार्यरत असून सर्वाधिक शाखा या नाशिक व मालेगाव तालुक्यात आहेत. १९ ऑगस्ट १९५९ मध्ये 'नाशिक मर्चंट को ऑप. बँकेची स्थापना झाली. तसेच १९६१ ला कर्मवीर भाऊसाहेब हिरे, श्री.गो. पुराणीक यांच्या पुढाकाराने अग्रणी बँक म्हणुन 'नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेची स्थापना करण्यात आली. १९७९ मध्ये माधवराव पाटील यांनी 'जनलक्ष्मी बँकेची' स्थापना केली.[२५] मात्र तारणाचा आभाव असणाऱ्या दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना परंपरागत बँका पत पुरवठा करण्यात नाखुश असतात. प्रामुख्याने शहरातील 'मुस्लिम सोसायटी' या संस्थेचा अपवाद वगळता इतर कोणत्याही संस्था मुस्लिम समुदायास विना व्याज पतपुरवठा करण्यासाठी तयार नाहीत. दारिद्र्य रेषे खालील ज्या मुस्लिम व्यक्ती व्याजावर कर्ज घेण्यासाठी उत्सुक असतात अशा व्यक्तींकडे तारणाचा अभाव असतो त्यामुळे मुस्मिल समाजातील मोठा वर्ग कर्ज सुविधेपासुन वंचित असतो.

### ४.६.५ नाशिक जिल्हा : वाहतूक

कोणत्याही शहराच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात 'वहातुक' या घटकास असाधारण महत्त्व असते. नाशिक जिल्ह्यातून दोन राष्ट्रीय महामार्ग जातात मुबंई - आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक तीन हा जिल्ह्यातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग होय. नाशिक आणि मालेगाव ही या मार्गावरील प्रमुख शहरे आहेत.

यामार्गावर नाशिक शहराची मुंबई पर्यंतचे अंतर २०० कि.मी. असून मालेगाव शहराचे अंतर ३०० कि.मी. इतके आहे. दुसरा नाशिक पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० हा नाशिक संगमेश्वर मार्गे पुणे असा असून नाशिक पासून पुणे शहराचे अंतर २०० कि.मी.आहे.त्यामुळे मुंबई–नाशिक–पुणे हा 'सुवर्ण त्रिकोण' निर्माण झालेला आहे.

रेल्वे वाहतुक हा वहातुकीचा महत्त्वाचा प्रकार असतो या दृष्टीने नाशिक शहरासाठी नाशिक रोड येथे १८६२ मध्ये रेल्वे स्टेशनची उभारणी करण्यात आली. मुंबई-मनमाड-भुसावळ या मार्गावरील 'नाशिक जंक्शन' हे भारतीय रेल्वेचे विद्युतीकरण झालेले भारतातील पहिले स्टेशन निर्माण करण्यात आलेले आहे. नाशिक शहराच्या रेल्वे स्टेशनवरून दररोज ५५ पेक्षा अधिक ट्रेन ये-जा करीत असतात. त्यात पंचवटी एक्सप्रेस व गोदावरी एक्सप्रेस ह्या ट्रेन दैनंदिन मुंबई शहराशी जोडणी करण्यात आलेल्या आहेत. मुंबई, दिल्ली, औरंगाबाद, हैद्राबाद,भोपाळ, आग्रा, ग्वाल्हेर, नागपुर, कोलकोत्ता, जमशेदपुर, जम्मु, भडगाव, मंगलोर इ. शहराशी नाशिक रेल्वे स्टेशन जोडलेली आहे.[२६]

नाशिक शहरापासुन २४ कि.मी. अंतरावर ओझर येथे विमान मार्गाची हवाई वहातुक सेवा उपलब्ध आहे. किंगफिशर एअरलाईन्सची दररोज सकाळी नाशिक हे मुंबई फ्लाईट असते. दोन वर्षापासुन डेक्कन एअरवेअजची सेवा सुरू झालेली आहे. नाशिक येथुन हैद्राबाद, चेन्नई, मुंबई येथील विमानतळाशी जोडणी झालेली आहे. मालेगाव शहरास रेल्वे व विमान सेवेने जोडण्याची आवश्यकता असूनही हे शहर या वाहतूक प्रकाराच्या लाभापासून वंचित आहे. त्यामुळे मालेगाव शहराच्या विकासाला मर्यादा पडलेल्या आहेत.

### ४.६.६ नाशिक जिल्हा : दारिद्र्य प्रमाण

भारतात ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागात दारिद्रय मोठ्या प्रमाणात आहे. ''ज्या व्यक्तीला किमान जीवनावश्यक गरजा भागविण्या इतके उत्पन्न मिळत नाही त्याच्या स्थितीस दारिद्र्य असे म्हटले जाते. नाशिक जिल्ह्याच्या ग्रामीण

भागात ६१५६११ कुटूंबे असुन २४९८४५ कुटूंबे दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहेत. मालेगाव तालुक्याच्या ग्रामीण भागात ७८८१६ कुटूंबे तर निफाड तालुक्यात ७८१२० कुटूंबे दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांची संख्या सर्वाधीक कमी (२०२७८ कुटूंबे)

नाशिक जिल्ह्याच्या शहरी भागात नाशिक व मालेगाव शहरात दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या कुटूंबाचे प्रमाण जिल्ह्यात सर्वाधीक आहे. भगूर शहरात दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांची संख्या ४४९ व व्यक्तींची संख्या २०३१ इतकी सर्वाधीक कमी आहे.

जलद औद्योगिक विकास, धार्मिक वारसा असल्यामुळे धार्मिक विधी व पर्यटन व्यवसायात वाढ, शासकीय उपक्रमांमधील रोजगार व उत्पन्न उपलब्धता, शेती व शेतमाल प्रक्रिया व्यवसायात वाढ सेवा क्षेत्रातील बँकींग, विमा, हॉटेल्स, बांधकाम क्षेत्राची भरभराट इ. मुळे नाशिक शहराचा औद्योगिक व आर्थिक विकास घडुन येत आहे. त्यामुळे एका बाजुला आर्थिक सुबत्तेत व जीवनमानात वाढ व सुधारणा होतांना दिसुन येते. मात्र दुसऱ्या बाजुला अत्यंत निकृष्ठ जिवनमान असणाऱ्या लोकांच्या प्रमाणात सुद्धा वाढ झालेली दिसुन येते. शहरात झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांचे प्रमाण अधिक असुन त्यात वाढ झालेली आहे.

मालेगाव शहरात वास्तव्य करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण अधिक असुन परराज्यात स्थलांतरीतांचे येणारे लोंढे यामुळे झोपडपट्टीचे प्रमाण वाढत आहे. १९४० मध्ये कमालपूरा नावाने पहिली अधिकृत झोपडपट्टी घोषित करण्यात आली. आजही मालेगाव शहरातील सर्वात मोठी झोपडपट्टी आहे. २००४ च्या सर्वेक्षणानुसार शहरात १२९ झोपडपट्ट्यांमध्ये २५०९६४ व्यक्ती दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहेत त्यात ७० टक्के स्त्रियांचे प्रमाण आहे. हे प्रमाण नाशिक जिल्ह्यात सर्वाधीक असुन महाराष्ट्रात मुंबई, पुणे नंतर तिसऱ्या क्रमांकाचे आहे.[२७]

## संदर्भ


[1] देशपांडे श्रीधर, ''मंत्रभूमी बनली यंत्रभूमी'' दैनिक लोकमत नाशिक आवृत्ती, दशकपूर्ती विशेष, २० एप्रिल २००६, पृ.क्र. ५३ व ५४.

[2] http://en.wikipedia.org

[3] http://toolserver.org

[4] गांगुर्डे किशोर, २००७, मालेगावचा इतिहास, मालेगाव बिझनेस अल्बम, पृ.क्र. २३५.

[५] मालेगाव महानगरपालिका, सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना विभाग अहवाल २०१०.

[6] PDF Adobe Acrobat Document, profile of Nashik City, p. no. 21

[7] PDF Adobe Acrobat Document, profile of Malegaon City, p. no. 05

[8] http://en.wakipedia.org/wiki/literacy#cite.note

[9] Nashik District Gazeteer, p. no. 969.

[10] कुलकर्णी म.बा., ''भक्तीचे प्रदर्शन'', दैनिक लोकमत, नाशिक आवृत्ती, वेध नाशिकच्या अर्धशतकी वाटचालीचा, दशकपूर्ती विशेष, २० एप्रिल २००६, पृ.क्र. १०.

[11] http://www.nashikmunicipalcorporation.com

[12] शेख्र महेमूद, २००८, ''पेशवाईतील एक प्रमुख्र हिरा'', सिटीझन वेल्फेअर सोसायटी, ख्रुशामदपुरा, मालेगाव. पृ.क्र. १५ ते १९.

[13] शिरसाठ आर.एम., ''महाराष्ट्रातील आदिवासी जमातीच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात सहकारी संस्थांच्या योगदानाचे चिकित्सक अध्ययन'', पीएच.डी. प्रबंध २०१०.

[14] http://www.wikipedia.org

[15] PDF Adobe Acrobat Profile of Nashik District, 12 Chapter, p. no. 192 & 193 & Nashik_Com Education.htm

[16] Bhatia J. K., "Census of India", 2001, Nashik District Census Handbook, p. no. 24.

[17] Ibid 7, p. no. 27

[18] PDF Adobe Acrobat Document, Socio Economic Development of Nashik District

[19] पाटील एन.पी., ''मंत्रभूमीतील विज्ञानाचे शहर'', लोकमत, नाशिक, दशकपूर्ती विशेष, २० एप्रिल २००६, पृ.क. ७० व ७१.

[20] पुराणीक प्रमोद, 'भांडीबाजार ते भांडवल बाजार', दशकपूर्ती विशेष, २० एप्रिल २००६, पृ.क. ४९, ५०.

[21] पुर्वोक्त, पाटील एन.पी., 'तीर्थक्षेत्राच्या वेदघोषात तंत्रज्ञानाचा ऋचा' पृ.क'. ७१.

[22] Dolle, B.M., "A study of Socio-Economic Problems of Powerloom Industry in Malegaon", Ph.D. thesis 1988, P.No. 7

[23] http://www.wikipedia.org

[24] mhtml://I:\Directorate of Economics and Statistics Mht.

[25] डागा शिवदास, 'सहकाराची पतपणाला,' दैनिक लोकमत, नाशिक आवृत्ती, वेध- नाशिकच्या अर्धशतकी वाटचालीचा दशकपूर्ती विशेष, २० एप्रील २००६, पृ.क. ५६ व ५७.

[26] PDF Nashik City.

[27] PDF Slum population in Million plus cities.

प्रकरण ५

# महिला स्वयंसहाय्यता गट आणि महिला सबलीकरण

## ५.१ प्रस्तावना

मानवी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कोणत्याही समाजातील महिलांचे घराच्या उंबरठ्याच्या आत आणि बाहेर असणारे स्थान व भूमिका अत्यंत महत्वपूर्ण असते. वैदिक काळात महिलांना पुरूषांच्या बरोबरीने समान स्थान होते. मात्र इ.स.पुर्व ५०० वर्षापासुन महिलांच्या असणाऱ्या स्थानात व भुमिकेत घसरण होण्यास सुरूवात झाली. इ.स.पुर्व ४ थ्या शतकात अपस्तंभ सुत्रात महिलांचे सुख हे पुरूषाची सेवा करण्यात आहे. असा उल्लेख आढळून येतो. त्यानंतर स्मृती, मुघल राजवट आणि ख्रिश्चन प्रभावामुळे महिलांचे स्वातंत्र्य आणि हक्क यात कमालीची घट झाली. बालविवाह, सती, विधवा जीवनपद्धती देवदासी प्रथा, जोहार पद्धती, मुस्लीम समाजातील पडदा पद्धती या सारख्या प्रथांमुळे महिलांना एक भोगवस्तू म्हणून स्थान प्राप्त झाले.

ब्रिटीश राजवटीत व स्वातंत्र्योत्तर काळात महिलांचे सबलीकरण करण्यासाठी समाजसुधारक समाजसेवी संस्था, शासन पातळीवर प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे काही प्रमाणात महिलांच्या सबलीकरणास सहाय्य मिळाले तरीसुद्धा आज अर्थव्यवस्थेत व समाजव्यवस्थेत महिलांना दुय्यम स्थान आहे. भारतातील सर्वच समाजातील, सर्व स्तरातील महिला या संधी, अर्थ, सत्ता, प्रतिष्ठा यापासुन वंचित आहेत.

महिला समस्यांचे मुळ आर्थिक असल्याने आर्थिक सुबत्ता आली तर महिलांना दर्जा व स्थान प्राप्त होईल. समाजात महिला हा घटक उपेक्षित असुन त्यांच्या कष्टाची गुणांची दखल घेतली जात नाही. आयुष्यभर लहान मोठ्यांची काळजी घेण्यात आयुष्य खर्च होते. याचे मुळ कारण आर्थिक आहे. म्हणुन महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी स्वयंसहाय्यता गट सुक्ष्मवित्ताचे माध्यम म्हणुन उपयुक्त ठरत आहे. समाजातील दुर्बल घटकांसाठी

प्रामुख्याने दुर्बल महिलांसाठी सुक्ष्मवित्त 'आशेचा किरण' ठरत आहे. कृषी गुंतवणुक कमी, उत्पन्न कमी व गुंतवणुक कमी या दुष्टचक्राचा नाश करून गरिब कुटूंबांना, दारिद्र्य रेषेच्यावर आणता येते. दुर्बलांचे आर्थिक सबलीकरण घडवुन आणता येते हे बांग्लादेशासह सर्वत्र अनुभवजन्य पुराव्यावरून सिद्ध झालेले आहे. तसेच स्वयंसहाय्यता गटामुळे महिलांमध्ये परिवर्तन होत असल्यामुळे समाजपरिवर्तन होत आहे. त्यासाठी नवा विचार, नवी व्यवस्था नवी मानसिकता घडवुन सामाजिक सबलीकरणात स्वयंसहाय्यता गट महत्त्वपुर्ण भुमिका बजावत आहेत. प्रस्तुत प्रकरणात स्वयंसहाय्यता गट आणि महिला सबलीकरण आणि सबलीकरणाचे साधन म्हणुन सुक्ष्मवित्त या विषयीच्या बाबींचा उहापोह केलेला आहे.

## ५.२ महिला स्वयंसहाय्यता गट व महिला सबलीकरण


स्वयंसहाय्यता गट अशी संस्थात्मक व्यवस्था आहे कि तिच्या माध्यमातून (व्ही. पुहाझेन्टी, सत्यसाई –२००२) ग्रामीण भागातील गरीबांच्या सामाजिक व आर्थिक सबलीकरणात सकारात्मक योगदान देत आहे. स्वयंसहाय्यता गटातील सहभागामुळे महिलांचे कौटूंबिक पातळीवर (नाबार्ड –२००२) सबलीकरणात वाढ होऊन १६ टक्के पर्यंत कौटूंबिक हिंसा कमी झालेली आहे. ९५ टक्के सभासद बँक खात्यावरील व्यवहारात (मायराडा) सहभागी होऊन आर्थिक दृष्ट्या सजग बनलेली आहे. सभासद महिलांचा सामाजिक पातळीवर दबाव गट (प्रतिमा पाटील–२००४) निर्माण होऊन दारू व जुगार बंदी घडवून आणत आहे. सभासद महिलेच्या आईवर झालेल्या अत्याचाराविरूद्ध गटाच्या सर्व सभासद महिलांनी तक्रार नोंदवून गुन्हेगारास शिक्षा करण्यासाठी पोलिस अधिकाऱ्यावर (संगीता पुराणिक –२००४) दबाव आणला. जिल्हाधिकाऱ्याच्या शेजारी पत्नीस बसलेले पाहून (टि. एस. कुमार –२००४) पत्नी बद्दल आदर भाव निर्माण होण्यास मदत झाली. अशा अनेक उदाहरणावरून स्वयंसहाय्यता महिलांच्या सबलीकरणाचे उत्तम माध्यम असल्याचे सिद्ध होत आहे.[१]

### ५.२.१सबलीकरण/ सक्षमीकरण संज्ञा

पॉवर या मुळ शब्दापासुन एमपॉवर हा शब्द बनलेला आहे. पॉवर या शब्दाचा मराठीतील प्रतिशब्द शक्ती, बळ, पात्रता, क्षमता असा होतो. तर एमपॉवर या शब्दापासुन मराठीत आलेला प्रतिशब्द शक्तीशाली, बलशाली, सशक्त म्हणजे सबल, सक्षम असा आहे. (आपटे– १९९५)

वेबस्टरच्या नवीन शब्दकोषानुसार (१९८२) पॉवर चा अर्थ ॲबिलीटी टू ॲक्ट असा असुन पॉवर या शब्दाला 'एम' जोडल्यास नामाचे रूपांतर क्रियापदात होऊन एमपॉवर हा शब्द तयार होतो. त्याचा अर्थ 'टू गिव्ह पॉवर और ॲथोरिटी, गिव्ह ॲबिलिटी टू'असा होतो. (स्टॉपल– १९९०) दी सोशल वर्क डिक्शनरी (बरकर– १९९१) नुसार पॉवर– एमपॉवर– एमपॉवरमेंट अशी शब्द निर्मिती आहे. 'एमपॉवरमेंट' म्हणजे सबलीकरण किंवा सक्षमीकरण होय.[२]

सबलीकरणाच्या दोन मुख्य संज्ञा प्रचलित आहेत.




#### १) चल / गतिज सबलीकरण

सबलीकरणाच्या गतिज संज्ञेच्या अंतर्गत, स्त्रीया ह्या जन्मत:च कमजोर असतात आणि त्यांना आपल्या स्वत:च्या आयुष्यासंबंधीचे निर्णय देखील घेता येत नाहीत. ही भावना काढुन टाकून त्यांच्यात अंतर्गत आत्मउद्धाराची, आत्मसन्मानाची भावना वाढीस लागणे अपेक्षीत असते. स्त्रीयांना स्वत:च्या क्षमतांची ओळख होऊन त्याचा वापर करण्याची क्षमता विकसीत होणे म्हणजे चल/ गतिज सबलीकरण होय.[३]

२) **अचल / स्थैतिज सबलीकरण**

व्यक्तीच्या अथवा स्त्रीयांच्या सबलीकरणासाठी आवश्यक असलेली परिस्थिती निर्माण करणे. स्त्रीयांचे सबलीकरण घडुन येण्यासाठी, सबलीकरणात वाढ होण्यासाठी कौटुंबिक, सामाजिक व शासकीय पातळीवरून प्रयत्न होणे अपेक्षित असते. स्त्रीयांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय सबलीकरणासाठी बाह्य घटकांकडून पोषक वातावरण बनविणे म्हणजे अचल सबलीकरण होय.[४]

**५.२.२ महिला सबलीकरण – व्याख्या**

सबलीकरण ही एक बहुविध पैलू असलेली बहुस्तरीय आणि प्रवाही संकल्पना आहे. (पिल्लई १९९५) त्यामुळे सबलीकरणाबाबत एकचएक मत अथवा विधान करता येत नाही. यास्तव एकच व्याख्या करता येत नाही.

१) दि सोशल वर्क डिक्शनरी (बारकेल १९९१) नुसार ''सक्षमीकरण म्हणजे वैयक्तिक, गट आणि सामाजिक पातळीवरील व्यक्तींची क्षमता व पात्रता उभारणी करण्याची प्रक्रिया होय.''[५]

२) ''सक्षमीकरण म्हणजे हक्क विषयक जागृतता, वित्त उभारणीची क्षमता, निर्णय प्रक्रियेतील सहभाग यात वाढ होण्याची प्रक्रिया होय.''[६]

३) ''व्यक्तींना किंवा गटांना आपली पसंती ठरविण्याची व ही पसंती इष्ट कृतीमध्ये आणि फलप्राप्तीमध्ये उतरविण्याची क्षमता वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे सबलीकरण होय''[७]

४) ''महिला सबलीकरण म्हणजे स्त्रीच्या अंगी निर्णय घेण्याची, नियंत्रण करण्याची संघटीत करण्याची, मतप्रदर्शन करण्याची, कृतीशील कार्यक्रमांचे आयोजन, लोकसंपर्क, आर्थिक व्यवहार करण्याची क्षमता व आवड निर्माण होणे यास महिला सबलीकरण म्हणतात.''[८]

५) ''स्त्रीने स्वत:च्या क्षमतांची ओळख करुन घेऊन त्या क्षमतांचा विकास घडवून आणण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे महिला सबलीकरण.''[९]

६) ''आत्मविश्वासात वाढ, क्षमतावृध्दी, सामाजिक जाणीव– जागृती, कार्यात्मक साक्षरता, लिंगसमभाव सचेतन, आरोग्य विषयक जाणीव स्वत: सन्मानाने जगणे, आत्मनिर्भर, वित्तीय संस्थांबरोबर जोडणी म्हणजे सबलीकरण/ सक्षमीकरण.''[१०]

७) "Empowerment means control / over material assets, intellectual resources and ideology." [११]

८) "The process of challenging existing power relations and gaining greater control over the sources of power means empowerment." [१२]


९) "Empowerment therefore is a process aimed at changing the nature and direction of systemic forces which marginalize women and other disadvantaged sections in a given a context." [१३]

वरील व्याख्यांवरून महिला सबलीकरण म्हणजे.....

- महिलांचा सहभाग व त्यांचे ज्ञान यांची नोंद घेणे.
- महिलांमध्ये असलेली कमीपणाची भिती व भावना घालविण्यास मदत
- महिलांमध्ये स्वयं आदर व अस्तित्वाची जाणीव होणे.
- महिलांनी स्वत:च्या शरिराचे नियंत्रण करणे.
- महिलांनी आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र व स्वयंपूर्ण होणे.
- महिलांनी उत्पादन संसाधनांवर नियंत्रण मिळविणे.
- महिलांवरील गृहकामाचा ताण कमी होणे.
- महिलांनी संघटन व गट निर्माण करून महिला शक्ती निर्माण करणे.
- महिलांचा सामाजिक सहभाग वाढणे.

### ५.२.३ महिला सबलीकरणाच्या पायऱ्या / टप्पे

कार्ल (१९९५) ने स्त्रियांच्या सबलीकरणा बाबत पुढील पायऱ्या नमुद केलेल्या आहेत. कार्लच्या मते सबलीकरण ही एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेच्या सहा पायऱ्या/टप्पे आहेत.




१) **जागृतता :** पहिल्या टप्प्यात महिलासंबंधी होणाऱ्या भेदभावाच्या क्रियांचा समावेश होतो. ज्यात त्यांच्या आवडी-निवडींनादुर्लक्षीत केले जाते. अशा काही सामाजिक व सांस्कृतिक परंपरा असतात की त्या स्त्रियांमध्ये दुय्यमपणाच्या अस्तित्वास खाद्य पुरवितात. ह्याच परंपरा त्यांच्या अंतर्गत सबलीकरणाच्या मार्गातील अडथळे ठरतात. मात्र योजनाकर्त्यांचे नेहमीच याकडे दुर्लक्ष झाले होते. मात्र ही सबलीकरणातील सर्वात महत्वाची पायरी आहे. म्हणून स्त्रीयांच्या दुय्यमपणावर शिक्कामोर्तब करणाऱ्या परंपरा यांना फाटा देऊन स्त्रियांमध्ये याबाबत जागृतता निर्माण करणे.

२) **कौशल्य व क्षमतांचे मुल्यमापन :** दुसऱ्या टप्प्यात महिलांमध्ये असणाऱ्या क्षमता व कौशल्याचे मुल्यमापन करणे अभिप्रेत असते. महिलांमध्ये जागृतता निर्माण होऊन त्यांच्यात असलेल्या कौशल्य व क्षमतांचा विचार करून मोजमाप करणे.

३) **क्षमता व कौशल्य विकास :** महिलांमध्ये असलेल्या विविध क्षमता व कौशल्यांच्या मापनाद्वारे निदर्शनास आलेल्या क्षमता व कौशल्यांचा विकास घडवुन आणणेसाठी प्रयत्न करणे अंतर्भुत आहे. क्षमतांच्या विकासात योजना आखणे, त्यांची मांडणी करणे, परस्पर सहकार्य प्रस्तापित करणे, उपलब्ध साधन सामुग्रीचे योग्य व्यवस्थापन करणे इ. चा समावेश होतो.

४) **निर्णय प्रक्रियेतील सहभाग व नियंत्रण :** कौशल्य आणि क्षमतांचा विकास झाल्यानंतर निर्णय प्रक्रियेतील महिलांचा सहभाग वाढवुन त्यांच्या व्यक्तीगत आणि सामाजिक जिवनात नियंत्रण होणे गरजेचे असते. हे त्यांच्या तडजोडीच्या क्षमतेचा विकास साध्य करण्यासाठी आवश्यक असते.

५) **बदलाप्रती कृती :** सबलीकरणाच्या या पायरीत संबंधीत लोकांनी ठरवुन केलेल्या कृतीचा समावेश होतो. ज्या आधारे व्यक्तीच्या व्यक्तीगत जीवनात अपेक्षीत असलेले बदल घडवून आणता येतात. तसेच त्यांना भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करता येऊ शकते.

६) **क्षमता आणि कौशल्यांचे मुल्यमापन :** सबलीकरण ही एखादी कृती नसुन सतत चालणारी प्रक्रिया आहे. निरंतन मुल्यमापन व पाठपुरावा हे एखाद्या प्रक्रियेचे यश किंवा अपयश ठरविण्यास मदत करीत असते. त्यामुळे क्षमता व कौशल्यांच्या विकासासाठी दिशा ठरवता येऊ शकते.[१४]

### ५.२.४ महिला सबलीकरणाचे निर्देशक

१९९५ मध्ये बिर्जींग येथे झालेल्या चौथ्या जागतीक महिला परिषदेत महिला सबलीकरणाबाबत ठरविण्यात आलेले.........

### अ) महिला सबलीकरणाचे गुणात्मक निर्देशक

१) महिलांची वैयक्तीक व सामुहिकरित्या साहस आणि आत्म प्रेरणा यात वाढ होणे.

२) स्वत:च्या संवर्धनासाठी आणि मुलांच्या संगोपनासाठी अधिक वेळ मिळणे.

३) महिलांच्या कामाचा भार कमी होऊन शारीरिक व मानसिक ताण कमी होणे.

४) शरिर स्वास्थ्य, पोषण आहार, पुनरूत्पादन हक्क, कायदेशीर हक्क व साक्षरता इ. बाबत जागृतता निर्माण करणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन करणे.

५) कौटुंबिक व सामाजिक स्तरावरील भुमिकेत व जबाबदारीत सकारात्मक बदल होणे.

६) महिला व मुलींवर होणाऱ्या कौटुंबिक स्तरावरील आणि समाज स्तरावरील आत्याचारात घट होणे.

७) बालविवाह प्रथा, हुंडा पद्धती, विधवा महिलांबाबत भेदभाव इ. सारख्या सामाजिक प्रथांमध्ये बदल घडुन येणे.

८) दैनंदिन जीवनातुन महिलांच्या सभा, बैठका, प्रशिक्षण कार्यक्रम इत्यादी स्वरूपाचा सहभाग वाढणे.

९) कौटुंबिक व सामाजिक पातळीवर महिलांच्या व्यवहारातील तडजोड व चर्चेत सहभाग या क्षमतांमध्ये वाढ होणे.

१०) उत्पन्न निर्मितीच्या वित्तीय संसाधनाची मालकी मिळविण्यासाठी माहिती आणि ज्ञान मिळविण्याच्या क्षमतेत वाढ होणे.

११) ग्राम, शहर, जिल्हा, राज्य पातळीवर महिला बचत गटाची स्थापना होणे.

१२) मुलगी आणि महिला यांच्याबाबत सामाजिक स्तरावर वैचारिक दृष्ट्या सकारात्मक बदल होणे.

१३) कुटूंबांच्या बाहेर महिलांच्या आर्थिक सहभागाबाबत जागृतता व मान्यता प्राप्त होणे.

१४) कुटूंबातील इतर घटकांसारखे महिला सुद्धा उत्पन्न मिळवू शकते, खर्च करून उपभोग घेऊ शकते. वैचारिक प्रक्रियेत आपली मते परखडपणे मांडू शकते अशा प्रकारची धारणा कौटूंबिक व समाजिक स्तरावरील घटकांची होणे.

**ब) महिला सबलीकरणाचे संख्यात्मक निर्देशक**

१) लोकसंख्या विषयक प्रवृत्तीत बदल घडुन येणे. (अ) जनन दरात व मृत्यूदरात घट होणे, बाल्यावस्थेतील मुलींचे मृत्यूप्रमाण व बाळंतपणातील महिलांचे मृत्यू कमी होणे. (ब) स्त्री-पुरूष प्रमाण यात समानता निर्माण होऊन सामाजिक समतोलासाठी एकूण लोकसंख्येतील महिलांचे प्रमाण वाढणे. (क) स्त्रियांच्या सरासरी आर्युमानात वाढ होणे. (ड) मुलींचे लग्नाचे सरासरी वय वाढणे.

२) वेगवेगळ्या विकास कार्यक्रमात महिलांचा सक्रीय सहभाग वाढणे.

३) सामाजिक संसाधने तसेच शासकीय योजना व सेवांद्वारे उपलब्ध होणाऱ्या संधीत सहभाग वाढणे.

४) वित्तीय सुविधा यांच्यावर अधिक प्रमाणात महिलांना वाटा व नियंत्रण असणे.

५) पोषण आणि आरोग्य सेवांमध्ये वाढ होऊन शारीरिक आरोग्य संवर्धनात वाढ होणे.

६) प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक व तांत्रिक व्यावसायिक शिक्षणाबाबत महिलांमध्ये साक्षरता व प्रमाण वाढणे.

७) स्थानिक पातळीवरील राजकारणात महिलांचा अधिक सहभाग वाढणे.[१५]

### ५.२.५ सबलीकरणाचे घटक

महिला सबलीकरण अनेक घटकांनी अपेक्षित असले तरी सबलीकरणाचे मुख्य घटक खालीलप्रमाणे :

सबलीकरण घटक

अ) व्यक्तीविकास (स्वत:भिमुख)

१. सदृढ आरोग्य

२. शिक्षण

३. आर्थिक स्वावलंबन

ब) व्यक्ती विकास (समाजाभिमुख)

१. जाणीव जागृती

अ) कर्तव्याची जाणीव

ब) अधिकाराची जाणीव

क) कायद्याची जाणीव

२. नेतृत्व विकास

अ) निर्णय क्षमता वृद्धी

ब) समानता वृद्धी

क) संपत्ती वृद्धी

३. संघटक

अ) संघटन कौशल्य

ब) संघटीत करण्याची वृत्ती

कोणत्याही व्यक्तीचे प्रामुख्याने महिलांचे सबलीकरण घडवून आणतांना त्यांचा स्वभिमुख व समाजभिमुख विकास होणे आवश्यक असते. त्यासाठी वरील प्रकारच्या घटकांची गरज असते.

### ५.२.६ सबलीकरणाचे प्रकार

महिला सबलीकरणाचे प्रमुख्र तीन प्रकारात वर्गीकरण केले जाते.

**१. आर्थिक सबलीकरण**

समाजातील बहुसंख्य स्त्री– पुरुष स्वत:च्या आर्थिक गरजा स्वत: पुर्ण करु शकत नाही. म्हणजे गरजांच्या पुर्ततेसाठी दुसऱ्यावर अवलंबून असतात. प्रामुख्याने स्त्रीया ह्या आपल्या गरजांच्या पुर्ततेसाठी पुरुषावर अवलंबून असतात. कारण अशा स्त्री– पुरुषांकडे संधी, संपत्ती, रोजगार, उत्पन्न यांचा अभाव असतो. त्यामुळे गरजांच्या पुर्ततेसाठी आर्थिक सामर्थ्य नसते. परिणामी बेरोजगारी, दारिद्र्य व राहणीमानाचा निकृष्ट दर्जा या बाबींचा प्रादुर्भाव होत असतो. भारतात बेरोजगारी व दारिद्र्य या समस्या सोडवितांना स्त्रियांचा व मुलांचाविचार कधीच गंभीरपणे केलेला नाही. फक्त पुरुषांचाच विचार करणाऱ्या योजनामुळे स्त्रिया परावलंबी व अगतिक होतात. 'आर्थिकदृष्ट्या दुर्बल, परावलंबी असणाऱ्या व्यक्तींना अधिक सामर्थ्य प्राप्त होणे म्हणजे आर्थिक सबलीकरण होय.'

'स्वत:च्या गरजा स्वत ओळखून गरजा पुर्ण करण्याची आर्थिक क्षमता निर्माण होणे म्हणजे आर्थिक सबलीकरण होय.'

'व्यक्तीला आपल्या क्षमतांची जाणीव होऊन स्वत:मध्ये असलेल्या क्षमता व कौशल्याच्या वापरातून आर्थिक स्वावलंबन प्राप्त होणे म्हणजे आर्थिक सबलीकरण होय.'

व्यक्तीच्या प्रामुख्याने स्त्रियांच्या कामाला केंद्रीभूत मानून जेव्हा त्यांच्या कामाचा व त्यागाचा विचार केला जातो तेव्हा सबलीकरणास सुरुवात होते. समाजातील निराश्रीत, विधवा, अपंग, दारिद्री स्त्रियांना आत्मविश्वास, धाडस, निर्णय क्षमते अभावी स्वत: स्वतंत्र व्यवसाय सुरु करणे जोखमीचे वाटते. परंतु स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून सामुहिकपणे व्यवसाय सुरु करण्याची प्रेरणा मिळते. गटाच्या माध्यमातून हक्काची जाणीव व जागृती होऊन निर्णय क्षमता, कार्यक्षमता, व्यवसाय

कौशल्य पुरविली जातात. तसेच बचतीच्या क्षमतेत वाढ होते. अंतर्गत कर्ज व्यवहार घडून येतात, व्यवसायासाठी प्रशिक्षण व कर्ज प्राप्त होते. रोजगार उपलब्ध होतो. उत्पन्न प्राप्त होते, व्यवसायातून नफा प्राप्त होतो व सामुहिक शक्तीद्वारे दरमहा मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ होवून आर्थिक गरजांची पुर्तता होते. आर्थिक स्वावलंबन प्राप्त होते आणि शेवटी आर्थिक सबलीकरण प्राप्त होत असते. थोडक्यात स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून आर्थिक सहभाग व आर्थिक संधी यात वाढ होवून आर्थिकदृष्ट्या स्वयंपुर्णत: प्राप्त होते.

## २. सामाजिक सबलीकरण

आर्थिकदृष्ट्या परावलंबी असलेल्या स्त्री– पुरुषांना कौटुंबिक व सामाजिक पातळीवर दुय्यम, निकृष्ट दर्जाची वागणूक दिली जाते. गरिबी किंवा दारिद्र्यत असणाऱ्या व्यक्तीकडे समाजात तुच्छतेने पाहिले जाते. तसेच पुरुषप्रधान समाज व्यवस्थेत स्त्रियांना कुटूंबात व समाजात वावरतांना दुय्यम वागणूक दिली जाते. त्यांची पिळवणूक व छळवणूक होत असते. कारण त्या आर्थिकदृष्ट्या परावलंबी किंवा पुरुषांवर अवलंबून असतात. तसेच त्यांना आपल्या 'स्व'ची किंवा स्वत:च्या हक्काची जाणीव नसते.

'व्यक्तीला स्वत:च्या हक्कांची जाणीव होऊन हक्क प्राप्तीचा विश्वास व क्षमता प्राप्त होणे म्हणजे सामाजिक सबलीकरण होय.'

स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून व्यक्तीचे प्रामुख्याने स्त्रियांचे सामाजिक सबलीकरण घडून आणता येते. जसे औपचारिकपणे १० किंवा १० पेक्षा अधिक महिला एकत्र येवून सर्वप्रथम आपल्या वैयक्तीक व कौटुंबिक समस्यांवर चर्चा करतात. त्यामुळे समस्यांची जाणीव होवून समस्या सोडविण्यासाठी सहा महिनेनंतर बचतगट स्थापन करतात त्याद्वारे बँकेत वेळोवेळी जाणे. प्रत्येक सभेला हजर राहणे यामुळे महिलांमध्ये स्व ची

जाणीव निर्माण होऊन आत्मविश्वास वाढतो. वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेणे, गटाच्या वेगवेगळ्या उपक्रमांमध्ये भाग घेणे, स्वयंरोजगारी गट स्थापन केल्यामुळे खरेदी– विक्रीसाठी सामाजिक वावर वाढतो. त्याद्वारे महिलांची कौटुंबिक व सामाजिक पातळीवर सजगता वाढते. सामा. अत्याचार, हुंडाबळी, दारुबंदी इ. सारख्या कामात दबावगट निर्माण करुन मोर्चा, आंदोलन या माध्यमातून सामाजिक गतिमानता वाढते. तसेच कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढतो. निर्णय प्रक्रियेत आत्मनिर्भरता प्राप्त होते.

### ५.२.७ महिला सबलीकरणाचे प्रयत्न

भारतासह जगभरात सर्वच देशात कमी–अधिक प्रमाणात महिला सबलीकरणासाठी विविध पातळीवर प्रयत्न करण्यात आलेले आहेत. त्यापैकी ठळक बाबींचा उल्लेख पुढील प्रमाणे ......

**अ) जागतिक पातळीवरील प्रयत्न :–** जागतिक स्तरावर महिला सबलीकरणासाठी झालेल्या मुख्य घटनांचा आढावा :

*** युनायटेड नेशन चार्टर**

स्त्री पुरुष समानता आणि महिला सबलीकरण हे दोन महत्त्वपुर्ण घटक 'सर्वांगीण प्रगतीसाठी' आवश्यक असल्याचे जगभरात सर्वमान्य झाले असले तरी १९४३ मधील पहिल्या आंतरराष्ट्रीय करारात युनायटेड नेशनच्या चार्टरमध्ये 'लिंगभाव समानता' हा न्यायीक हक्क मानणण्यात आलेला होता.

*** पहिली जागतिक महिला परिषद : मेक्सिको १९७५**

१९७५ मध्ये झालेल्या या परिषदेत १९७५ हे 'जागतिक महिला वर्ष' म्हणून आणि १९७६ ते १९८५ हे संयुक्त राष्ट्रसंघाने 'महिला दशक' म्हणून

घोषीत केले. स्त्री-पुरूष समानता, महिला विकास आणि शांतता या विषयांवर या परिषदत लक्ष केंद्रीत करण्यात आले. या परिषदेमुळे १९७९ मध्ये संयुक्तराष्ट्र संघाने स्त्री-पुरूष विषमतेशी निगडीत असणाऱ्या सर्व घटकांबाबत विचार करून समता प्रस्थापित करण्याचे धोरण स्विकारले. तसेच १९८१ मध्ये महिला हक्कांबाबत आंतरराष्ट्रीय विधेयक आणले. महिलांचे कार्य, महिला शक्ती आणि स्त्री-पुरूष समानतेच्या दृष्टीने पहिले पाऊल ठरले.

*** दुसरी जागतिक महिला परिषद : कोपनहेगन, १९८०**

महिला विकासासाठी महिला समानतेचे महत्त्व, महिलांची जबाबदारी आणि महिलांना संधी उपलब्ध करून देणे, त्यासाठी कृती आराखडा तयार करणे, महिलांना वित्तीय संसाधने पुरविणेसाठी स्त्रोत वाढविणे. या सारख्या बाबींवर या परिषदेत लक्ष केंद्रित करण्यात आले.

*** तिसरी जागतिक महिला परिषद : नैरोबी – १९८५**

महिलांचे सबलीकरण आणि आधुनिकीकरण घडवुन आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, आणि स्थानिक पातळीवर लक्ष केंद्रीत करण्यात आले.

*** चौथी जागतिक महिला परिषद : बिर्जींग – १९९०**

समानता विकास आणि शांतता' या अजेंडातर्गत दारिद्र्य, आरोग्य, शिक्षण, हिंसाचार, मानवी हक्क अशा १२ विशेष विषयांवर कृती करण्याचे धोरण ठरविण्यात आले.[१६]

**ब) भारतातील महिला सबलीकरणाचे प्रयत्न :** स्वातंत्र्योत्तर काळात भारतात राष्ट्रीय पातळीवरून महिला सबलीकरणासाठी अनेकविध प्रकारचे प्रयत्न करण्यात आलेले आहे.

### १. पंचवार्षिक योजना आणि महिला विकास

भारतात १९५१ पासुन नियोजन काळात पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून 'महिला विकास' साठी राबविण्यात आलेले कार्यक्रम व महिलांबाबत असलेले दृष्टीकोन.[१७]

| पंचवार्षिक योजना | राबविण्यात आलेले कार्यक्रम | दृष्टीकोन |
|---|---|---|
| १) पहिली योजना | केंद्र / राज्य समाज कल्याण बोर्डची स्थापना समाज विकास कार्यक्रम | कल्याण विषयक दृष्टीकोन |
| २) दुसरी योजना | महिलांच्या श्रमिक म्हणून भूमिकेची स्थान निश्चिती. समान श्रमासाठी समान वेतन धोरण. | |
| ३) तिसरी योजना | महिला शिक्षण व महिला आरोग्य व पोषण आहार. | |
| ४) चौथी योजना | महिला शिक्षण व कुटूंब नियोजन | |
| ५) पाचवी योजना | कृतीसाठी राष्ट्रीय योजना. महिला कल्याण आणि विकास ब्युरो. उत्पन्न निर्मितीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम | सहभाग दृष्टीकोन |
| ६) सहावी योजना | महिला रोजगारावर भर. महिला रोजगारासाठी श्रमिक गट विषयक अधिकार | विकास दृष्टीकोन |
| ७) सातवी योजना | महिला विकास कार्पोरेशनची स्थापना. महिला हक्क विषयक जागृतता | |
| ८) आठवी योजना | केंद्रीय / राज्य संवेदना कमिशनची स्थापना. पंचायत राज स्तरावर वाढता सहभाग. | समानता दृष्टीकोन |
| ९) नववी योजना | महिला सबलीकरणासाठी राष्ट्रीय धोरण. महिलांना राजकारणात राखीव जागा | सबलीकरण दृष्टीकोन |

**Source :** Diwase Smita, 2002, Ph. D. Thesis titled "Empowerment of Women in the Handicraft Sector" A study on participatory approach … thesis submitted to Pune University, p. 13.

भारतात १९८० या दशकाच्या मध्यापासून सबलीकरण हा शब्द अधिक प्रचलित झाला. प्रामुख्याने स्त्रियांच्या सबलीकरणा संदर्भात नवव्या पंचवार्षिक योजनेत विशेष लक्ष देण्याचे ठरविण्यात आले. विकासातील सहभाग व सामाजिक

बदल या दृष्टीने महिला सबलीकरण महत्त्वपुर्ण मानण्यात येवून २00१ मध्ये 'महिला सबलीकरण विषयक राष्ट्रीय धोरण' स्वीकारण्यात आले.

**२. वैधानिक व्यवस्था**

भारतीय स्त्रियांना समान हक्क मिळावेत, लिंगभेदाची भावना कमी व्हावी पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात समानता मिळावी यासाठी भारतीय राज्यघटनेत तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.[१८]

१) घटनेच्या १४ व्या कलमान्वये प्रत्येक स्त्री– पुरुष कायद्यापुढे समान आहेत.

२) कलम १५ (३) नुसार प्रत्येक घटकराज्यांनी महिलांना सक्षम बनविण्यासाठी विशेष तरतूद करावयाची आहे.

३) कलम १६ (२) नुसार कोणत्याही स्त्री– पुरुषात कामाच्या ठिकाणी भेदभाव करु नये.

४) १९९२ च्या ७३ व्या घटना दुरुस्ती नुसार (कलम २४३ डी) कोणत्याही ग्रामपंचायतीमध्ये अनुसूचीत जाती व जमातीच्या व्यक्तींसाठी १/३ पेक्षा जास्त कमी नसाव्यात.

५) १९९२ च्या ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार (कलम २४३ टी) प्रत्येक नगरपालिकेत १/३ जागा ह्या महिलांसाठी राखीव ठेवण्यात याव्यात अशी तरतूद करण्यात आली.

६) २000 च्या भारतातील शेतीविषयक राष्ट्रीय धोरणाच्या अनुषंगाने २00१ मध्ये महिला सबलीकरण विषयक राष्ट्रीय धोरण स्विकारण्यात आले. या धोरणाच्या अंतर्गत शेती धोरणांतर्गत शेतकरी म्हणून महिलांचे स्थान महत्त्वाचे मानण्यात आले.

## ३. महिलांसाठी राखीव जागा

१) १९९१ मध्ये ग्रामपंचायत प्रशासनात ३३ टक्के राखीव जागा महिलांसाठी असण्याची तरतूद करण्यात आले.

२) १९९२ मध्ये महिला सुरक्षा आणि महिलांच्या हक्कांसाठी राष्ट्रीय महिला आयोगाची रचना करण्यात आली. ८ मार्च १९९६ ला महिलांच्या दर्जात वाढ घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या स्टॅण्डींग कमिटीची स्थापना करण्याचा कायदा संसदेत पास केला. एप्रिल १९९७ मध्ये 'महिला सबलीकरण समिती' च्या नेमणूकीस वैधानिक आधार प्रदान करण्यात आला.

३) २००६ च्या नवीन कायद्यानुसार कॅन्टॉनमेन्ट बोर्ड मध्ये महिलांसाठी राखीव जागा निर्माण केलेल्या आहेत.

४) नगरपरिषदा, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात महिलांना ५० टक्के जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

५) शासनाने महिला कल्याण कार्यक्रमाच्या व्याप्तीसाठी लिंगभाव अंदाजपत्रक सादर करण्याची पध्दत रुढ केलेली आहे. महिलांसाठी खास तरतूद असलेली अंदाजपत्रकीय रक्कम १०० टक्के राखीव असेल.

६) शासकीय पातळीवरील प्रत्येक कार्यक्रमाच्या लाभार्थीमध्ये ३३ टक्के लाभार्थी ह्या महिला व मुले असतील असे १० व्या पंचवार्षिक योजनेत स्पष्टपणे नमूद केलेले आहे.

७) २०१० च्या महिला राखीव जागा बील नुसार राज्यघटना कलम १०८ मध्ये घटनादुरुस्ती करुन राज्यसभा आणि घटक राज्यांच्या विधानसभा सभागृहात ३३ टक्के जागा राखीव ठेवण्याचा प्रस्ताव आहे.[१९]

## ४. महिला कल्याण कायदे

राज्य घटनेनुसार स्त्री– पुरुषांना समान हक्क असले तरीही समाजातील चालीरिती व प्रथेमुळे स्त्रीची अवहेलना होते म्हणून स्त्रियांचे मनोबल वाढावे व त्यांनाही सन्मानाने जगता यावे यासाठी महिला कल्याण कायदे करण्यात आलेले आहेत.[२०]

- हिंदू विवाह कायदा – १९५५
- हिंदू वारसा हक्क कायदा– १९५६
- हुंडा प्रतिबंध कायदा– १९६१
- प्रसुती सुविधा अधिनियम – १९६१
- समान परिश्रमिक कायदा – १९७६
- सती प्रतिबंधक कायदा – १९७६
- बालविवाह प्रतिबंधक कायदा – १९७६
- कौटुंबिक न्यायालय कायदा – १९८४
- वेश्यावृत्ती निवारण कायदा– १९८७
- प्रसुतीपुर्व लिंगनिदान प्रतिबंधक कायदा – १९९४
- कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा – २००६

## ५. महिला विकास व सशक्तीकरण योजना

महिलांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी महिलांचे सबलीकरण गरजेचे आहे असे गृहीत धरुन अनेक योजना राबविण्यात येत आहेत.[२१]

- महिला प्रशिक्षण योजना – १९८९
- माता व बालस्वास्थ्य योजना – १९९२
- राष्ट्रीय महिला कोष – १९९३
- इंदिरा महिला योजना – १९९५
- राष्ट्रीय मातृत्व योजना – १९९५

- ग्रामीण महिला विकास योजना – १९९६
- राज राजेश्वरी विमा योजना – १९९७
- बालिका समृध्दी योजना – १९९७
- डाकवा योजना – १९९७
- महिला समृध्दी योजना – २००१
- स्वयंसिध्दा योजना – २००१
- राष्ट्रीय महिला आयोग – १९९२

### ६. महिलांसाठी उत्सव

महिलांच्या कार्याची आठवण करुन देण्यासाठी आणि महिलांना प्रेरणा देण्यासाठी[२२]....

- महिला दिवस – ८ मार्च
- महिला सप्ताह – १ ते ८ मार्च
- कौटुंबिक हिंसा प्रतिबंधक दिवस– २५ नोव्हेंबर
- महिला वर्ष – १९७५
- महिला दशक – १९७६ ते १९८५
- महिला समकक्षता व समदक्षता वर्ष– २००१

## ५.२.८ महिला सशक्तीकरण प्रयत्नांचा प्रभाव

महिलांच्या सशक्तीकरणासाठी शासकीय, सहकारी, संस्थात्मक व खासगी पातळीवरुन झालेल्या विविध प्रयत्नांचा प्रभाव दिसून येत आहे.

**सारणी २५ : महिला सबलीकरण प्रयत्नांचा प्रभाव**

| तपशिल (क्षेत्र) | १९५१ | २००१ |
|---|---|---|
| १. महिलांचे आयुर्मान (सरासरी वर्ष) | ३१.६ | ६६.० |
| २. महिलांचे विवाहाचे वय (वर्ष) | १५.६ | १८.५ |
| ३. जनन दर (दर हजारी) | ३९.९ | २७.० |
| ४. मृत्यूदर (दर हजारी) | २९.३४ | ०९.१ |
| ५. बालमृत्यू दर (दर हजारी) | १३१.० | ७०.० |
| ६. साक्षरता दर (शेकडा) | ०८.८६ | ५४.१६ |
| ७. मुलींची शाळेत नाव नोंदणी (कोटी) | ०.५४ | ०५.३६ |
| ८. महिलांचा सहभाग दर (शेकडा) | १४.२२ | २३.५ |
| ९. संसदेतील प्रतिनिधीत्व (शेकडा) | ०७.३१ | ०९.५ |

**स्त्रोत :** गुप्ता कमलेशकुमार, महिला सबलीकरण, पृ. क्र. १०

सारणी क्र. २५ वरून स्वातंत्र्योत्तर कालीन ५० वर्षात महिला सबलीकरणाच्या प्रयत्नांना यश मिळाल्याचे व त्यामुळे महिलांच्या जीवनात आमुलाग्र बदल झाल्याचे निदर्शनास येते. महिला सबलीकरणाच्या प्रयत्नाद्वारे समाजाच्या सर्व क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढला. भारताच्या राष्ट्रपती प्रतिभादेवीसिंग पाटिल, लोकसभेच्या अध्यक्षा मिराकुमारी, वर्तमान केंद्र शासनाच्या अध्यक्षा सोनिया गांधी, उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री मायावती तसेच अनेक कंपन्यांच्या सीईओ असणाऱ्या महिला, अभियांत्रिकी, वैद्यकीय, शैक्षणिक, वाहतुक, दळणवळण, आंतराळ यासारख्या विविध क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढलेला आहे. मात्र महिलांच्या जीवनात जेवढे बदल झाले ते वरवरचे बदल आहेत. मात्र महिलांच्या जीवनाचा 'गाभा' अजूनही बदललेला नाही. कारण मुळात स्त्री– पुरुषांच्या मानसिकतेत पुरेसे अमुलाग्र बदल झालेले नाहीत.

### ५.२.९ महिला सबलीकरणाची आवश्यकता

आजच्या आधुनिक, सुसंस्कृत, पुरोगामी समजल्या जाणाऱ्या भारतीय समाजात महिलांची आर्थिक, सामाजिक व राजकीय स्थिती फारशी आशादायक नाही.

## * आर्थिक स्थिती

आजच्या आधुनिक काळात जगातील सर्वच देशांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल समुहामध्ये कुटूंबाच्या मुलभूत गरजा भागविण्याची जबाबदारी प्रामुख्याने स्त्रियांकडे असते. कौटुंबिक जबाबदारी प्रामुख्याने स्त्रियांकडे असते. कौटुंबिक जबाबदारी पार पाडतांना पैसा कमी पडला की, पहिली कुऱ्हाड कोसळते ती मुलगी व स्त्रीवर बहुसंख्य स्त्रिया चुल आणि मुल या पर्यंतच मर्यादीत असतात. नोकरी आणि तीही चांगली नोकरी अप्राप्त असते. त्यामुळे २००१ च्या जनगननेनुसार ग्रामीण भागातील ३०.९ टक्के व शहरी भागातील ११.५५ टक्के स्त्रियांनाच रोजगार मिळतो आणि मिळणाऱ्या रोजगारात ८१ टक्के रोजगार हा प्राथमिक क्षेत्राचा असतो. या क्षेत्रातील काम कष्टाचे, अनिश्चित स्वरूपाचे, कमी उत्पन्नाचे, निकृष्ठ दर्जाचे असते. असे असूनही महिलांचे वेतन पुरुषांपेक्षा ३/४ ने कमी असते.[२३]

जगात १३० को दारिद्रय रेषेखालील व्यक्तींपैकी ७० टक्के स्त्रिया आहेत. कारण ५५ देशातील आंतर राष्ट्रीय श्रम संघटनेच्या सर्वेनुसार पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची मजुरी ३/४ पेक्षा कमी असते. भारताच्या एकूण लोकसंख्येत ५० टक्के असणाऱ्या महिलांचा एकूण उत्पन्नात १० टक्के व एकूण संपत्तीत केवळ १ टक्के पेक्षाही कमी हिस्सा असतो.[२४] त्यामुळे महिलांचा शिक्षण, आरोग्य व राहणीमानाचा दर्जा यांच्यावर विपरित परिणाम होतात. याचा अर्थ भारतातील महिलांची आर्थिक स्थिती अत्यंत न्युन आहे.[२५]

महिलांकडून होणारे अर्थाजन अल्प असते किंवा नसतेच त्यामुळे देशाची अर्धी 'बेटर हाफ' असणारी लोकसंख्या आर्थिकदृष्ट्या परावलंबी किंवा आर्थिक निर्णयात परतंत्र आहे.

## * सामाजिक स्थिती

कोणत्याही देशाच्या सामाजिक व सर्वांगीण उन्नतीसाठी समाजातील महिलांचे स्थान पुरुषांबरोबर समानतेचे असणे आवश्यक असते. मात्र भारतातील पुरुष प्रधान संस्कृतीत महिलांचे स्थान दुय्यम राहिलेले आहे. समाजातील संस्कार, रुढी, परंपरा यामुळे स्त्रीला मुलगी, पत्नी, माता या जबाबदाऱ्या आयुष्यभर पार पाडाव्या लागतात. त्यामुळे आयुष्यभर आक्षेपांचे ओझे वाहणारी एक गुलाम बनुन रहाते. सामाजिक जडण– घडणीत, कौटुंबिक निर्णयाला पात्र असूनही निर्णय प्रक्रियेत क्षमता असूनही तिच्याकडे अबला म्हणून पाहिले जाते किंबहुना तिच्या जन्माचा उत्सव व मृत्यूचा शोक केला जात नाही.

- युनिसेफच्या २००१ अहवालानुसार भारतात दरवर्षी १ कोटी मुलींचा जन्म होतो. त्यापैकी १/३ मुली पहिल्याच वर्षी मृत्यू पावतात.
- प्रतिवर्षी एक लाखापेक्षा अधिक माता कुपोषणामुळे गर्भधारणेच्या काळातच मृत्यू पावतात.
- जगात सरासरी स्त्री– पुरुष प्रमाण १000: १0५0 असतांना भारतात मात्र २००१ च्या जनगणनेनुसार हे प्रमाण १000: ९३३ इतके कमी आहे.
- मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या महिला व बालविकास विभागाच्या अहवालानुसार (२००५) भारतात प्रत्येक २६ मिनिटात एका महिलेशी गैरप्रकार, ५१ मिनिटात एक विनयभंग, दर ५४ मिनिटात एक बलात्कार आणि १०२ मिनिटात एक महिला 'हुंडाबळी' होते.[२६]
- कुटूंबामध्ये स्त्रियांना नेहमीच दुय्यम वागणूक दिली जाते. एका अभ्यासानुसार ४0 टक्के विवाहीत महिला 'कौटुंबिक हिंसाचारास बळी' पडतात.[२७]

थोडक्यात आर्थिक व सामाजिक बाबतीत महिलांची स्थिती अत्यंत खालावलेली आहे. उत्पादन संसाधने आणि उत्पन्न कमतरता महिलांच्या आर्थिक व सामजिक सबलीकरणातील प्रमुख अडथळे आहेत.

**५.२.१० महिला सबलीकरण दृष्टीकोन**

जागतिक स्तरावर महिला सबलीकरण विषयक भिन्न दृष्टीकोन स्विकारण्यात आलेले आहेत. दक्षिण आशियाई देशात तीन प्रकारचे प्रमुख दृष्टीकोन स्विकारलेले आहेत. एकात्मिक विकास, आर्थिक सबलीकरण आणि जागृतता वृद्धी हे तीन प्रकारचे दृष्टीकोन असून संकल्पनात्मक पातळीवर त्यात भिन्नता आहे. प्रामुख्याने संघटनात्मक कार्यपध्दतीच्या बाबत पातळीवर म्हणजे महिलांचे गट/ समूहाची स्थापना व गट उभारणीबाबत तीन्ही दृष्टीकोनात समानता आढळून येते.

**१) एकात्मीक विकास दृष्टीकोन**

एकात्मीक विकास दृष्टीकोनाची व्युहरचना ही कुटूंब व समाज पातळीवर लाभदायक ठरणारी आहे. म्हणून ही व्युहरचना दारिद्र्य निर्मूलनासाठी आवश्यक गरजांची पुर्तता, लिंगभाव विषमता कमी करणे आणि 'स्व' क्षमताची ओळख आणि वृद्धीसाठी सहाय्य अशा प्रकारचे पॅकेज पुरविते. महिलांची शक्ती समुहाद्वारे एकत्रित करुन त्यांना विकासाच्या कृतीमध्ये/ कार्यामध्ये गुंतविणे आणि त्यांच्यापुढे असणाऱ्या सामाजिक समस्या (हुंडा, अल्पवयीन विवाह, पुरुष व्यसनाधिनता) सोडविणे अपेक्षित असते. बांगलादेशातील प्रोशिका आणि भारताच्या राजस्थानातील संस्था सामाजिक समस्या सोडवित आहेत. समुहात महिलांचा समावेश होतो. रोजगार उपयुक्त ठराविक कृती, आरोग्य कार्यक्रम घेण्याचे डावपेच आखून महिलांना गटात सामील करुन गट/ समुह गतिमान करणेचा दृष्टीकोन स्विकारण्यात आलेला आहे.

## २) आर्थिक सबलीकरण दृष्टीकोन

आर्थिक सबलीकरण दृष्टीकोनात महिलांच्या आर्थिक शक्तीच्या कमरतेला मध्यवर्ती मानून भौतिक संसाधनावरील मालकी हक्कात वाढ होणे व आर्थिक सुरक्षितता निर्माण करण्यावर भर देण्यात आलेला आहे. आर्थिक सबलीकरणासाठी दोन प्रमुख प्रकारच्या गटांची स्थापना केली जाते. बचत व पत, उत्पन्नवृद्धी आणि कौशल्य निर्मितीसाठी प्रशिक्षणाचे माध्यम असणारे गट (बांग्लादेशातील ग्रामीण बँक आणि नेपाळ मधील ग्रामीण महिलांसाठी पत पुरवठा कार्यक्रम). उद्योग– व्यवसाय स्थापनेच्या माध्यमातून सबलीकरण घडवून आणणारे गट (भारतातील सेवा, बांगलादेशातील प्रोशिका स्थापन केले जाणारे गट. या प्रकारचे गट हे विशिष्ट भागात कार्य करतांना बचत व पत, बाजार व तंत्रज्ञान विषयक नवीन प्रशिक्षण व कौशल्य विकास आणि बालसंगोपन, आरोग्य सेवा, साक्षरता कार्यक्रम, शिक्षण साहित्य पुरविण्याचे कार्य करीत असतात.

## ३) जागृतता वृद्धी दृष्टीकोन

महिला सबलीकरण हे महिलांमधील जागृततेवर आधारित असण्याशी निगडीत असणारा हा दृष्टीकोन आहे. नवी जागृती, क्षमता वृद्धी, लिंगभाव विश्लेषण, माहिती आणि कौशल्य निर्मितीचे शिक्षण हे एक प्रमुख साधन आहे. शिक्षणाच्या प्रक्रियेद्वारे महिलांमध्ये जाणीव– जागृतता निर्माण होऊन सबलीकरणास मदत होते. या दृष्टीकोनात समुह स्वत:च्या गरजांची प्राथमिकता ठरवितो, महिलांच्या ज्ञानाचा उत्पादन व पुर्नरुत्पादन शारिरीक व मानसिक क्षमता वाढविण्यावर भर देण्यात आलेला आहे. भारतातील आस्था, डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटी आणि बांगलादेशातील निगरा कोरी या संस्थांनी हा दृष्टीकोन स्विकारलेला आहे.[२८]

**५.२.११ झिरपण्याचा विकास दृष्टीकोन विरुद्ध उर्ध्वगामी विकास दृष्टीकोन**

देश अविकसित असतो कारण अशा देशाची अर्थव्यवस्था ही दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकलेली असते. नर्क्स यांच्या मते पुरवठा बाजुने व मागणी बाजुने कमतरता असल्यामुळे दारिद्र्य निर्माण होते व टिकून असते. प्रामुख्याने दरडोई उत्पन्न अल्प असणे हे पुरवठा कमी असण्याचे व औद्योगिक वाढीचा वेग अत्यल्प असणे हे मागणी कमी असण्याचे कारण असते. म्हणून दरडोई उत्पन्नात वाढ घडवून आणणे आणि औद्योगिक वाढीचा वेग वाढविण्यासाठी आर्थिक विकासाचा दर वाढविणे आणि त्या माध्यमातून दारिद्र्य निर्मुलन घडवून आणण्याचा विकास दृष्टीकोन मांडण्यात आला.

आर्थिक विकासातून दारिद्र्य निर्मुलन घडवून आणण्यासाठी मार्गदर्शक म्हणून आर्थिक विकासाचे सिध्दांत मांडण्यात आले. डॉ. रोझनस्टीन रोडान, प्रा. हार्वे लिबनस्टीन व रॅग्नर नर्क्स यांनी समतोल विकास सिध्दांत मांडले. अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्न दरडोई उत्पन्न वाढून आर्थिक विकासाच दर वाढविण्यासाठी सर्व क्षेत्रात अधिक गुंतवणूक करून सर्व क्षेत्राचा विकास घडवून आणणे अपेक्षित आहे. मात्र प्रा. हर्षमन यांनी असंतुलित विकास सिध्दांत मांडून सर्वच क्षेत्रात गुंतवणूक करण्याची अर्थव्यवस्थेमध्ये क्षमता नसल्यामुळे प्राधान्यक्रम ठरवून निकडीच्या क्षेत्रात आधी गुंतवणूक करावी व इतर क्षेत्रांमध्ये नंतर गुंतवणूक करावी. गुंतवणूक केलेली क्षेत्रे विकसीत होऊन त्याचे लाभ इतर क्षेत्रांना मिळून त्यांचाही विकास होईल अशी अपेक्षा व्यक्त केली.

विकासाच्या सर्व सिध्दांतात आर्थिक वाढीवर लक्ष केंद्रीत करण्याचे समर्थन करण्यात आले. विल रॉजर यांनी खाली झिरपण्याचा विकासात्मक दृष्टीकोन मांडला. या दृष्टीकोनाद्वारे आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी उत्पादन वाढीवर भर देण्यात यावा, उत्पादन वाढीस उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे म्हणून कर सवलती (कर कपात) प्रदान करण्यात येणे, शासनाने संरचनात्मक क्षेत्रात गुंतवणूक करून उद्योगांसाठी सोयी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यामुळे उद्योग व्यवसायांची प्रामुख्याने मोठ्या उद्योगांची निर्मिती होईल. उत्पादन व उत्पन्न

वाढून आर्थिक वाढीचा वेग उंचावेल. त्याद्वारे लघुउद्योग निर्माण होतील, रोजगार निर्माण होतील, वेतन वाढून तळातील लोकांचे उत्पन्न वाढेल व दारिद्र्य निर्मुलन घडून येईल. म्हणजे अर्थव्यवस्थेच्या वरच्या स्तरातून खालच्या, तळाच्या वर्गास आपोआप, अप्रत्यक्षपणे लाभ मिळतील, आर्थिक वाढीचे लाभ गरिबांपर्यंत पोहोचतील व दारिद्र्य कमी होईल.[२१]

भारतात नियोजन काळात सुरूवातील कृषीक्षेत्र, उद्योग क्षेत्र यांना असंतुलीत विकास दृष्टीकोनातून प्राधान्य देण्यात आले. नंतरच्या, प्रामुख्याने तिसऱ्या योजनेनंतर समतोल विकासास प्राधान्य देण्यात आले. नियोजन काळात आर्थिक वाढीसाठी सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार करण्यात आला. मोठ्या उद्योगांना कर व इतर सवलती प्रदान करण्यात आल्या. बँकांचे राष्ट्रीयीकरण करून कर्ज उपलब्धता करून देण्यात आली. रोजगार निर्मिती योजना व अनुदाने देण्यात आली. त्यामुळे देशाच्या आर्थिक वाढीचा दर ७ ते ८ टक्क्यांपर्यंत वाढला. दारिद्र्याचे प्रमाण टक्केवारीच्या स्वरूपात कमी झाले. मात्र खाली झिरपण्याच्या दृष्टीकोनात पुरूषांबरोबर महिलांनाही समान लाभ मिळतील ही धारणा चुकीची ठरली. कारण ९ व्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यात महिला ह्या प्रत्येक क्षेत्रात पुरूषांच्या तुलनेत खूप मागे आहेत. १९९० नंतर असंघटीत क्षेत्रामधील महिलांची स्थिती खालावत गेली. कौटुंबिक पातळीवरील त्यांचे आर्थिक योगदान अत्यल्प असून त्यांना संसाधनांची (वित्ताची) कमतरता ही समस्या प्रकर्षाने भेडसावत आहे. त्यामुळे दारिद्र्याची तिव्रता महिलांमध्ये अधिक आहे. म्हणून सुक्ष्म वित्त हे साधन उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

आर्थिक विकासाचे लाभ गरिबांपर्यंत पोहोचून दारिद्र्य निर्मुलन होईल हा विकासाचे लाभ वरून खाली झिरपण्याचा विकासात्मक दृष्टीकोन अपुरा ठरल्यामुळे नविन विकासात्मक व्युहरचनेची गरज निर्माण झाली. ग्लेन लिट आणि मिल्ड्रेड रॉबिन्स लिट यांनी उर्ध्वगामी विकास दृष्टीकोन मांडला. आफ्रिका खंडातील अत्यंत गरीब असणाऱ्या डोमिनिका या देशात गरीब लोकांना स्वत:चा निधी प्रत्यक्षपणे (थेट) देऊन त्यांना व्यवसाय मार्गदर्शन केले. त्यामुळे अशा

गरीबांनी निर्माण केलेल्या लहान व्यवसायांमुळे त्यांचे उत्पन्न व राहणीमान उंचावले आहे. याद्वारे ग्लेन लिट यांनी ''समाजातील तळाच्या लोकांना थेट संसाधनाची उपलब्धता करून दिली तर त्यांच्यामध्ये असलेल्या क्षमतांचा उपयोग व्यवसाय, नवनिर्मितीसाठी होतो, रोजगार निर्मिती होते, उत्पन्नात वाढ होते, मोठ्या उद्योगांना पुरक आदाने उपलब्ध होतात. त्यामुळे उत्पादन वाढते. तसेच गरिबांचे उत्पन्न वाढले की बाजारातून मागणी वाढण्यास मदत होते. त्याचा लाभ देशाची आर्थिक वाढ घडून येण्यासाठी होतो. म्हणजे तळातील घटकांच्या दारिद्रय निर्मुलनातून देशाचा आर्थिक विकास होणे.''[३०]

उर्ध्वगामी विकासाचा दृष्टीकोन १९७६ नंतर प्रो. मोहंमद युनुस यांनी बांग्लादेशात व्यापक स्वरूपात राबविला आहे. ग्रामीण बँकेने गरिबांना सुक्ष्म वित्ताचे लाभ थेट मिळवून देऊन महिलांना सुक्ष्म वित्ताचे साधन पुरविताना स्वयंसहाय्यता गट हे माध्यम वापरले आहे. त्याद्वारे लाखो महिलांमध्ये दीर्घकालीन उत्पन्न वृध्दी होऊन दारिद्रय निर्मुलन झालेले आहे. त्याद्वारे महिलांचे आर्थिक व सामाजिक सबलीकरण घडवून आणलेले आहे. याचा परिणाम म्हणून बांग्लादेशात साक्षरतेच्या प्रमाणात वाढ, आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा, अन्न उपलब्धतेत सुधारणा, दळणवळण क्षेत्रात सुधारणा, गृहबांधणी क्षेत्रात वाढ, मानव विकास निर्देशांकात वाढ होऊन देशाच्या विकासात भर पडलेली आहे. सध्या जगातील सर्वच विकसनशील देशात हा दृष्टीकोन गरिबी निर्मुलनासाठी आणि गरिबांच्या सक्षमीकरणासाठी अंगीकारलेला आहे. दारिद्र्य निर्मुलनाच्या कार्यक्रमात सुक्ष्मवित्त हे गरिबाच्या उन्नयनाचे आणि सक्षमीकरणाचे साधन म्हणून जगभरात अत्यंत उपयुक्त ठरत असल्याची असंख्य उदाहरणे आहेत.

## ५.३ महिला सबलीकरण व सुक्ष्म वित्त

बचत गट किंवा कर्ज गट हे सुक्ष्मवित्त व्यवहाराचे माध्यम म्हणुन शेकडो वर्षापासुन वेगवेगळ्या देशात, वेगवेगळ्या भागात, वेगवेगळ्या नावाने प्रचलित होते. जसे भारतात चिट फंडस्, भिस्सी, घाना या देशात सुसुस, मेक्सीको या

देशात तांडास, इंडोनेशिया या देशात अरिसन, श्रीलंकेत चिटू, पश्चिम अफ्रिकेत टोन्टीनेस आणि बोलेव्हीया मध्ये पासानाकु जगभरात सुक्ष्म वित्ताचे व्यवहार करीत होते.[३१] मात्र सर्वप्रथम डॉ. मोहमंद युनुस यांनी गरिबीचा प्रश्न सोडवून गरिबास आत्मनिर्भर बनविण्यासाठी प्रामुख्याने गरिब महिलांचे प्रश्न सोडवून त्यांचे सबलीकरण घडवून आणण्यासाठी सुक्ष्मवित्त अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडू शकते हे सिद्ध करून दाखविले मायक्रो फायनान्सचे प्रणेते डॉ. मोहंमद युनुस यांच्या मते 'जो सर्वात गरिब तो कर्ज फेडण्यास व कर्ज घेण्यास सर्वात लायक असतो' ज्या– ज्या संस्थांनी हे तत्व स्विकारुन कर्ज दिले. त्या संस्थांच्या कर्जाची वसुली तर झालीच गरिबांच्या आयुष्यात हसू फुटत आहे. हे हसू फुलविण्याचे कार्य जगभर हजारो बँका व स्वयंसेवी संस्था आणि लाखो स्वयंसहाय्यता गट करीत आहेत.[३२]

### ५.३.१ सुक्ष्मवित्त संकल्पना

बांग्लादेशातील 'ग्रामीण बँकेने' १९७६ मध्ये 'मायक्रो फायनान्स' ही संकल्पना सर्वप्रथम राबविली. मायक्रो फायनान्स ही व्यष्टी स्तरावरील संकल्पना आहे. त्यामुळे ग्रामीण बँकेने लघुवित्त ची सांगड गरिबांच्या लहान– किरकोळ व्यवहारांशी घातली. प्रामुख्याने महिलांच्या लहान आणि किरकोळ गरजा भागविण्यासाठी छोट्या रक्कमेचे व्यवहार उपयुक्त ठरतात म्हणून ''लहान– लहान गरजा भागविणारे छोट्या रक्कमेचे वित्त व्यवहार म्हणजे सुक्ष्म वित्त होय.

मायक्रो फायनान्स आणि मायक्रो केडीट ह्या दोन नविन संकल्पना १९७० च्या दशकात विकासाच्या संदर्भात वापरण्यात सुरुवात झाली. मायक्रो फायनान्स म्हणजे सुक्ष्म/ लघुवित्त ही संकल्पना लहान प्रमाणातील बचत, लहान रक्कमेची कर्ज, वित्त प्रणालीशी संबंधीत आहे. तर मायक्रो क्रेडिट म्हणजे सुक्ष्म कर्ज हे लहान आकाराच्या कर्जाशी संबंधीत आहे. मायक्रो फायनान्स ही संकल्पना मायक्रो क्रेडीट संकल्पनेपेक्षा व्यापक असुन, मायक्रो क्रेडीट हा मायक्रो फायनान्सचा एक भाग आहे.

**※ सुक्ष्मवित्त व्याख्या**

१. ''गरिबी निर्मुलनासाठी आर्थिक प्रणालीची उभारणी म्हणजे सुक्ष्म वित्त पुरवठा होय.''[३३]

२. ''गरिबांच्या उत्पन्नात वाढ करुन त्यांचे जीवनमान सुधारणेसाठी त्यांनी केलेली काटकसर, बचत, त्यांना केलेला पत पुरवठा व इतर वित्तीय सेवा म्हणजे लघुवित्त होय.''[३४]

३. ''व्यक्तीच्या लहान– लहान गरजा भागविण्यासाठीच्या सहाय्यक छोट्या रक्कमांचे आर्थिक व्यवहार व आर्थिक सेवा यास सुक्ष्म किंवा लघुवित्त असे म्हणतात.''[३५]

४. "Micro Finance, according to the United Nations refers to loans, savings, insurance, transfer services and other financial products targeted at low income clients".[३६]

५. ''उत्पन्न निर्मितीच्या कार्यासाठी व किरकोळ गरजा भागविण्याच्या उद्देशाने प्राधान्यक्रमाने पुरविण्यात येणाऱ्या लहान प्रमाणातील आर्थिक सेवा म्हणजे सुक्ष्म वित्त होय''[३७]

## ५.३.२ सुक्ष्म वित्त वैशिष्ट्ये

सुक्ष्म वित्त ही अलीकडील काळात जगभरातून मान्यता मिळविलेली 'वलयांकीत' संकल्पना आहे. कारण सुक्ष्म वित्ताचे अनेक वैशिष्ट्ये सांगितली जातात. त्यापैकी प्रमुख वैशिष्ट्ये.....

१. 'जो सर्वात गरिब तो सर्वात लायक' असे मानुन सुक्ष्म वित्त पुरवठा केला जातो. त्यामुळे सुक्ष्म वित्त हे दरिद्री व्यक्तीच्या आर्थिक सबलीकरणाचे साधन असते.

२. सुक्ष्म वित्त प्रणालीत व्यक्तीचे व गटाचे वर्तन हीच त्याची 'पत' असते. त्यामुळे सुक्ष्मवित्त पुरवठा करतांना तारणाचा आग्रह नसतो. विनातारण अगदी महिला व भिकाऱ्यांनाही लहान रक्कमेचा कर्ज पुरवठा केला जातो.

३. प्रत्येक व्यक्तीत उद्योजकतेची बीजे असतात' असा विश्वास ठेवून सुक्ष्म कर्ज पुरवठा केला जातो. त्यामुळे सुक्ष्म वित्त हे स्वयंरोजगारासाठी प्रेरक ठरणारा घटक असतो.

४. सुक्ष्म वित्त हे परिस्थिती व गरजेवर आधारित असल्यामुळे या व्यवहारात लवचिकता अधिक असते.

५. सुक्ष्म वित्त पुरवठा हे एक 'विशेष क्षेत्र' असून ते बँका व सामाजिक उद्दिष्ट्ये यांना एकत्रित बांधण्याचे कार्य करते.

६. सुक्ष्मवित्त फक्त वित्तीय प्रणाली नसुन महिलांच्या सामाजिक स्थित्यंतराचे साधनसुद्धा आहे.

### ५.३.३ सुक्ष्मवित्त - दृष्टिकोन

सुक्ष्म वित्त हे गरिबांच्या सक्षमीकरणाचे साधन म्हणुन जगभरात वेगवेगळ्या दृष्टीकोनातुन प्रचलित झालले आहे.

**सुक्ष्मवित्त दृष्टीकोन**

| दृष्टीकोन | उत्पादन | देश | लाभार्थी |
|---|---|---|---|
| वैयक्तिक पातळीवरील पतपुरवठा | वैयक्तिक पातळीवरील ऐच्छिक बचतीच्या आधारे सुक्ष्म वित्त संस्था ६ महिने ते ५ वर्ष मुदतीसाठी, १०० ते ३००० पर्यंत वित्त पुरवठा करीत असतात. | डोमीनिकन रिपब्लीक (अडेमी), पेरू (काजा), इंडोनेशिया (बँक रकैत), भारत (सेवा), इजिप्त, बेनीन आणि कोलंबिया | शहरी भागातील अल्प उत्पन्न गटातील लघु उद्योजक शेतकरी महिला व पुरूष |
| ग्रामीण बँकेच्या धर्तीवरील गट पत पुरवठा | गट पातळीवर, बचत सक्तीची मानून ६ महिने ते १ वर्ष मुदतीसाठी १०० ते ३०० पर्यंत वित्तपुरवठा. | बांग्लादेश (बाक), फिलीपाईन्स आणि व्हिएतनाम | अल्प उत्पन्न गटातील ग्रामीण व शहरी महिला |
| लॅटीन अमेरिकन गट पातळीवरील पतपुरवठा | आवश्यक गरजा पुर्ततेसाठी गटास १०० ते २०० पर्यंत कर्ज विमा व बचत आवश्यक असून व्याजदर अधिक प्रक्रिया फी आकारली जाते. | कोलंबिया (ॲक्सन), ग्वाटेमाला (प्रोसेम) | अल्प ते मध्यम उत्पन्न गटातील शहरी पुरूष व महिला |

| दृष्टीकोन | उत्पादन | देश | लाभार्थी |
|---|---|---|---|
| ग्रामीण बँकींग | बचतीच्या आधारावर नवीन कर्ज पुरवठा करताना बचतीवर व्याज दिले जात नाही. व्याजदर १२ ते ३६% इतका असतो. | मेक्सीको (फिविया), कोस्टारिका, ग्वाटेमाला, थायलंड, माली, घाना, बेनीन, बोलेव्हीया, इ. | बचतीची क्षमता असणाऱ्या ग्रामीण भागातील कमी उत्पन्न गटातील महिला |

**संदर्भ :** डॉ. जयरामा, २००५, ''परफॉर्मन्स ॲनॅलिसिस ऑफ वुमेन रिपोर्ट सबमिटेड टू कर्नाटका, पीडीएफ फाईल, फिशरवुमन सिग-स्टडी, पृ. क्र. ५९.

### ५.३.४ सुक्ष्मवित्त आवश्यकता

भारतात स्वातंत्रोत्तर कालखंडात समाजवादी समाजरचने अंतर्गत सामाजिक व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी अनुदानाच्या स्वरुपात अनेक योजना राबविण्यात आलेल्या आहेत. मात्र गरजू व्यक्ती पर्यंत योजना न पोहोचणे, योजनांचे सर्वच दुर्बल घटकांना लाभ न मिळणे, योजनेत वशिलेबाजी, दप्तर दिरंगाई इत्यादी सारखे दोष निर्माण झाले. याचबरोबर आर्थिक दृष्ट्या दुर्बलांनी एकत्र येवून सहकारी क्षेत्रात सहभाग घेतला मात्र कमालीचा भ्रष्टाचार, गलिच्छ राजकारण, वाढता तोटा यामुळे सहकारी क्षेत्र लाभदायक ठरले नाही म्हणून दुर्बल व्यक्ती बँकेकडे मोठ्या आशेने पाहू लागल्या परंतु तारणाचा आग्रह धरणाऱ्या बँका अल्प प्रमाणात कर्ज देऊ शकल्या नाही. कारण अशा प्रकारच्या कर्जव्यवहारांचा 'व्यवहार खर्च' अधिक असतो. त्यामुळे भारतातील फक्त ३४ टक्के लोकसंख्येला बँकेकडून सहाय्य होते. उर्वरित ६६ टक्के म्हणजे ६७.५ को लोकांना बँकेच्या कर्जा पासून वंचित रहावे लागते.[३८]

एकूणच बँक व्यवसाय दारिद्र्यात खितपत पडलेल्या सर्वसामान्य व्यक्तीला सोयीचा नाही. त्यातही देशातील महिलांना कसलेही आर्थिक व्यवहाराचे अधिकार नसल्यामुळे त्यांची 'पत' शुन्य असते म्हणून बँकांचे दरवाजे बंद असतात. दुसऱ्या बाजुला सावकारी शोषण आणि तिसऱ्या बाजूला सरकारी मदत श्रीमंतांच्या घरी पाणी भरत असते. अशा त्रिकोणी अडचणीत सापडलेल्या महिला आर्थिक व सामाजिक दृष्ट्या दुर्बल ठरतात. अशा दुर्बल महिलांनी आपल्या सबलीकरणासाठी

१९७० च्या दशकापासून काढलेला नवीन मार्ग म्हणजे स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून केला जाणारा सुक्ष्मवित्त पुरवठा हा होय.

'सुक्ष्मवित्त' हे महिला सबलीकरणाचे एक प्रभावी साधन आहे हे सर्वमान्य झाल्यानंतर सुक्ष्मवित्त व्यवहारासाठी स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून बँकाशी जोडणी उपकारक ठरत आहे.

### ५.३.५ सुक्ष्मवित्त संस्था

#### अ) सुक्ष्मवित्त संस्थांची नोंदणी

सूक्ष्मवित्त संस्थांची नोंदणी तीन पध्दतीने करता येते.

१. पब्लीक ट्रस्ट ॲक्ट १९८२ आणि सेक्शन २५ कंपनी ॲक्ट १९५६ नुसार सुक्ष्म वित्तची स्थापना केली जाते. नफा विरहीत म्हणून नोंदणी केली जाते. रजिस्टर्ड अंडर सोसायटीज रजिस्टर्ड ॲक्ट १८६० याप्रमाणे राज्यांचे  कायदे प्रमाणे नोंदणी केली जाते.

२. म्युच्युअल बेनिफीट मायक्रो फायनान्स इन्स्टिटयुट को– ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट १९८४. म्युच्युअल ट्रस्ट और निधी अंडर सेक्शन ६२० ऑफ द कंपनीज ॲक्ट १९५६ नुसार नोंदणी करता येते.

३. नॉन बँकींग फायनान्स कंपनी रजिस्टर्ड अंडर कंपनी ॲक्ट १९५६. नुसार नोंदणी करता येते. तसेच भारतीय भागीदारी कायदा १९३२ मधील तरतुदीनुसार सूक्ष्म वित्तसंस्थांची नोंदणी करता येते.

#### ब) सुक्ष्मवित्त संस्थांची उद्दिष्टे

१. **ठेवीचे संरक्षण :** सूक्ष्म वित्तसंस्था वित्तव्यवहार करतांना ठेवीदारांचे संरक्षण करणे, गरीब लोक बचतीच्या स्वरुपात ठेवी ठेवतात त्या ठेवींचे संरक्षण करणे अशी जबाबदारी या संस्थांची आहे. या ठेवी स्वयंसेवी संस्था आणि स्वयंसहाय्यता गट संकलन करतात.

२. **बचतीच्या सेवा :** सूक्ष्म वित्तसंस्था स्वयंसहाय्यता गटांना बचतीच्या सवयी लावण्याकरिता प्रबोधन करणे, तसेच बचतीबाबत सतत जागृत राहणे कारण बचतीवर गुंतवणूक केली जाते. म्हणून बचतीचे व्यवस्थापक म्हणून जबाबदारी पार पाडतात.

३. **निधीची सुरक्षितता :** सूक्ष्म वित्तसंस्था स्वयंसाहाय्यता बचत गटाचा निधी सांभाळण्याची जबाबदारी पार पाडतात. या संस्था निधी मागताक्षणी परत करतात.

४. **पुर्ववित्त :** सूक्ष्म वित्तसंस्था कमीत कमी खर्चात पुर्ववित्त करण्याचे कार्य करतात. भारतात अनेक सूक्ष्म वित्तसंस्था स्वयंसहाय्यता बचत गटांना पूर्नवित्त करीत असतात.

५. **क्षमता बांधणी :** सूक्ष्म वित्तसंस्था स्वयंसेवी संस्थांमार्फत स्वयंसहाय्यता बचत गटाच्या व्यवस्थापनातील उणीवा संरचनात्मक बांधणी, व्यावसायिक आणि वित्तीय क्षमता बांधणी करतात. त्यामुळे गटाचे सबलीकरण होते

६. **सरकारी हस्तक्षेपास अटकाव :** सूक्ष्म वित्तसंस्थांच्या कार्यात सरकारी हस्तक्षेपास अटकाव करतात. या संस्था वित्तीय क्षेत्रात स्वयंचलित कार्यपध्दती अवलंबतात. सरकार फक्त धोरण व आराखडा तयार करुन देते. प्रत्यक्ष व्यवहारात हस्तक्षेप करत नाही.

७. **स्वयंसहाय्यता गटबांधणी :** सूक्ष्म वित्तसंस्था ग्रामीण भागात महिलांचे व पुरुषांचे स्वयंसहाय्यता बचत गट बांधणी करतात. त्या गटाद्वारे वित्तसहाय्य करतात.

८. **विशेष सेवांची पूर्तता :** सूक्ष्म वित्तसंस्था दारिद्र्य निर्मुलन करतांना गटांच्या कामकाजात शिक्षण, आरोग्य विमा या सेवांच्या बरोबर बचत, विपणन मदत, उत्पदान प्रशिक्षण, गटाविषयी इतर सेवा पुरवितात.

९. **बहुविध सेवांना प्राधान्य :** सूक्ष्म वित्तसंस्था आर्थिक क्षेत्राप्रमाणे समाजविकास दृष्टिकोनातून बहुविध सेवा पुरवितात. या सामाजिक सेवांमध्ये शिक्षण, आरोग्य, वातावरण निर्मिती, महिलांना हक्क व कर्तव्याबाबत सेवा, गटाचे प्रदर्शन, मेळावे, सांस्कृतिक कार्यक्रम अशा सेवांना प्राधान्य देत असतात.

१०. **दारिद्र्य निर्मूलन :** सूक्ष्म वित्तसंस्थांचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे ग्रामीण भागातील विशेषतः महिलांमधील दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी स्वयंसहाय्यता महिला बचत गटामार्फत सूक्ष्म वित्त पुरवठा विविध व्यवसायांना करुन उत्पन्न साधन प्राप्त करुन देतात. त्यामुळे दारिद्र्य निर्मूलनास मदत झाली आहे.

## क) सुक्ष्मवित्त संस्थांची कार्ये

१. दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी गरीब कुटुंबांना विनातारण कर्जपुरवठा करणे.

२. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची उत्पन्नपातळी वाढविण्यासाठी आणि त्यांच्या राहणीमानाच्या दर्जात सुधारणा होण्यासाठी काटकसर, विपणनसेवा, वित्तीय सेवा पुरविणे.

३. वित्तीय सेवांबरोबर सामाजिक सेवांची पूर्तता करणे.

४. उत्पादन, बचत आणि सुरक्षितता यांना प्राधान्य देणे.

५. विपणन, उत्पादक, पॅकिंग, उद्योजक इ. बाबत प्रशिक्षण देणे.

६. समाजात स्त्री– पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी महिलांना सामाजिक व वित्तीय सेवा पुरविणे. त्याद्वारे महिलांचे सबलीकरण करणे.

७. महिलांचे स्वयंसहाय्यता बचत गट स्थापन करुन गटांच्या विकासासाठी मार्गदर्शन व प्रोत्साहन देणे.

८. स्वयंसहाय्यता बचत गटातील महिलांचे मेळावे व गटांच्या उत्पादित वस्तूंचे प्रदर्शन  आयोजित करणे.

९. कमीत कमी खर्चात गटांची देखरेख, नियंत्रण करुन कर्ज वसुली करणे.

१०. महिलांना उद्योजकीय विकास सेवा देऊन त्यांच्या कौशल्यवृद्धीला महत्त्व देणे.

११. स्वयंसहाय्यता महिला बचत गटांना अनुत्पादन व पुर्नवित्त कर्जपुरवठा करणे.

१२. सूक्ष्म वित्त परिकल्पनेची धनको व ऋणको या दोहोंना माहिती देऊन त्यांच्यात सूक्ष्म वित्ताची प्रेरणा देण्यासाठी हस्तक्षेप करणे.

१३. प्रतिकूल निवड व नैतिक अध:पतन या समस्येची माहिती देऊन त्यांच्या परिणामांची कल्पना देणे.

१४. सूक्ष्म विनिमयन करतांना ग्राहक व संस्था कृतिशिल निर्णय, निर्बंधात्मक निर्णय विनिमयन– व्यवहार किंवा देवाण– घेवाण या गुणाबाबत निष्णात करणे.

१५. धनकोच्या निधीची कर्जफेड क्षमतेची जाण ऋणकोला करुन देण्याचा कार्य करते.

**ड) सुक्ष्मवित्त वाढीची कारणे**

१. **दारिद्र्य निर्मूलनाची हमी :** निम्न उत्पन्न गटातील कुटुंबांना उत्पन्नवृद्धी करण्यासाठी, उद्योजकता निर्माण करण्यासाठी सूक्ष्म वित्तचे सहकार्य, मार्गदर्शन मिळते, त्यातून व्यवसाय व रोजगारनिर्मिती होते. उत्पन्नाचे साधन प्राप्त होते. त्यामुळे हमखास दारिद्र्य निर्मूलन होते.

२. **वित्तीय आधाराची हमी :** सूक्ष्म वित्त वित्तीय व्यवहाराची वचनपूर्ती करतात. तसेच वित्तीय सुबत्ता, स्वयंक्षमता, अनुदान व्याजदर इ.

स्थानिक पातळीवर तडजोड करतात. तसेच वित्तीय बाबीबाबत सल्लामसलत करुन योग्य मार्ग काढतात. त्यामुळे विश्वासार्हता प्राप्त होते.

३. **परंपरागत पध्दतीची संभाव्य बांधणी :** सूक्ष्म वित्तसंस्थांचे व्यवहार विश्वासावर असतात. बचत व कर्ज परिक्रमणे विश्वासावर होतात. शिवाय बदलते नियम, सूक्ष्म व परंपरागत उद्योजकाची बांधणी, जास्तीत जास्त सवलती, परंपरागत वस्तूंचे उत्पादन व व्यवसाय याची बांधणी करण्यास मदत करतात. त्यामुळे व्यावसायिक खर्च कमी राहतो. या कारणामुळे सूक्ष्म वित्त वाढलेले आहे.

४. **नवप्रवर्तक आणि वित्तीय निकालाची उपलब्धता :** सूक्ष्म वित्त हे नवप्रवर्तन असल्याने वित्तीय पूर्तता करुन दाखविली आहे. शिवाय नवप्रवर्तनाच्या समस्या सोडविण्याचे, उणीवा दूर करण्याचे सामर्थ्य, कर्जसमस्या निर्मूलन, कर्जपरतफेडीची वारंवारता, सामाजिक दबाव, क्षमता वृध्दी या गोष्टी सिध्द केल्या आहेत. त्यांचा निकाल जनतेला प्राप्त झाला आहे. या कारणांनी सूक्ष्म वित्त वाढलेले आहे.

५. **सबलीकरणाची सत्यता :** सूक्ष्म वित्त महिलांचे समाजातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, आरोग्य विषयक, शैक्षणिक विषयक, सांस्कृतिक इत्यादीबाबत सबलीकरण दाखवून दिले आहे. त्यामुळे महिलांनी आत्मनिर्भरता व स्वाभिमान आणि धाडसीपणा सिध्द केला आहे. महिलांना समाजात मानाचे स्थान प्राप्त करुन दिले आहे.

६. **लोकशाही कार्यप्रणाली :** सूक्ष्म वित्तसंस्थांनी स्वयंसहाय्यता गटांना लोकशाही तत्वे, कौशल्याचे मूल्यमापन, सामुदायिक निर्णय, समान हक्क, अंत:प्रेरणा उर्मी, व्यावहारिक कार्यपध्दती, फिरता निधी, फिरते नेतृत्व काटकसर, सहकार्य, समानता अशी लोकशाहीची तत्वप्रणाली घालून दिलेली आहे.

७. **स्वयंसहाय्यता गटांची वाढती संख्या :** सूक्ष्म वित्ताच्या मदतीमुळे जागतिक पातळीवर महिला बचत गटांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातून आर्थिक विकासाची प्रचालना प्राप्त झाली आहे. त्यांची विश्वासार्हता वाढली आहे. त्यामुळे सूक्ष्म वित्तसंस्था वाढलेल्या आहेत.

८. **स्वयंसेवी संस्थांची विश्वासार्हता :** स्वयंसेवी संस्थांनी स्वयंसहाय्यता बचत गट स्थापन, क्षमता बांधणी, प्रशिक्षण, समान संधी, विपणन व्यवस्था, प्रदर्शन, मेळावे या गोष्टी खात्रीपुर्वक करुन वित्तपुरवठा मार्गदर्शन व उपलब्दता या बाबींची पूर्तता केल्यामुळे समाजात अशा स्वयंसेवी संस्थांची विश्वासार्हता वाढलेली आहे. त्यामुळे सूक्ष्म वित्ताचा विस्तार झाला आहे.

९. **वाढत्या यशोगाथा :** भारतामध्ये ग्रामीण भागात सूक्ष्म वित्तच्या यशोगाथा सतत वाढत आहेत. कारण सूक्ष्म वित्ताच्या सहाय्याने अनेक स्वयंसहाय्यता समूहाद्वारे महिलांचे व्यवसाय निर्माण होऊन महिला सबलीकरण होत आहे. यांची यशोगाथा सतत वाढत आहे.

१०. **अर्थव्यवस्थेची पुर्नबांधणी :** सूक्ष्म वित्ताच्या सहाय्याने ग्रामीण व शहरी भागात स्वयंसहाय्यता बचत गट प्रगतीपथावर आहेत. ग्रामीण व शहरी भागातील समग्र बचतीमुळे भांडवल निर्मितीचा वेग वाढला आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेची वित्तीय गरज पूर्ण होत आहे. त्यामुळे सूक्ष्म वित्तेचे महत्त्व वाढलेले आहे.

## इ) शहरी सुक्ष्मवित्त संस्था

भारतातील एकूण दारिद्र्यत ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात दारिद्र्यचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे वेगवेगळ्या अध्ययन अहवालानुसार शहरी भागात प्रतिवर्षी ९००० कोटी रुपये ते १५००० कोटी रुपये वित्त पुरवठ्याची (वाडीनाले सरोज, महाजन आणि नागाश्री) गरज

आहे. शहरी कर्जाची गरज लक्षत घेऊन राष्ट्रीयकृत व्यापारी बँका बरोबर शहरी सरकारी बँका व सरकारी पतपुरवठा संस्था व सुक्ष्मवित्त पुरवठा संस्था आणि स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत. १९९६–९७ मध्ये शहरी भागात १४०० शहरी सहकारी बँक आणि ३४०० शहरी पतपुरवठा सहकारी संस्था पतपुरवठा करीत आहेत.[३९]

१९९० च्या दशकांपासून शहरी भागात अनेक सुक्ष्मवित्त संस्था सुक्ष्मपत पुरवठा करीत आहेत. १९९७ पासून स्वयंसहाय्यता गटांना माध्यम शेकडो सुक्ष्मवित्त पुरवठा संस्थांशी जोडणी करण्यात आलेली आहे. त्यापैकी प्रमुख संस्थांचा आढावा....

यु. एस. बिझनेस मॅगेझिनने ५० जागतिक स्तरावरील लघुवित्त पुरवठादार संस्थांची यादी जाहीर केली असून त्यात बंगलोर येथील बंधन ही दुसऱ्या क्रमांकावर, मायक्रोक्रेडीट फाऊंडेशन ऑफ इंडिया १३ व्या क्रमांकावर आणि साधना ही पंधराव्या क्रमांकावर आहे.

**स्पंदन सुक्ष्मवित्त संस्था :** आंध्रप्रदेशाच्या गुंटूर शहरात १९९८ मध्ये या संस्थेची स्थापना झाली. ६ ते १० महिलांचा एक गट असुन केंद्रस्थानी २५ ते ४५ महिलांचा गट अशी रचना असते. मार्च २००८ अखेर १.२ दशलक्ष गटांना वित्तसेवा प्रदान केल्या आहेत.

**एस.के.एस. इंडिया मायक्रो फायनान्स लि :** १९९८ मध्ये या संस्थेची स्थापना झाली. भारतासह जगभरातील अनेक देशात बिगरव्याजी कर्ज आणि जीवन विमा सुविधा पुरविणारी ही अग्रणी संस्था आहे. भारतात १९ राज्यात 'अल्ट्रा पुअर प्रोग्राम' राबवित आहेत. महाराष्ट्र राज्याच्या पुणे व नागपुर शहरांसह ८६ शाखांच्या सहाय्याने २४३ कोटी रुपयांचे कर्ज पुरविले जाते.

**दार क्रेडीट ॲण्ड कॅपिटल लिमिटेड :** १९९४ पासून राजस्थान मधील शहरी निमशहरी भागात गरिब ते अतिगरीब व्यक्तींसाठी सुक्ष्मवित्तासह शिक्षण, आरोग्य व विवाह विषयक प्रबोधन करीत आहे.

**साधना :** २००१ पासून ही संस्था 'ना नफा' या तत्वावर शहरी व ग्रामीण भागात गरिब महिलांना आत्मनिर्भर बनविणेसाठी सुक्ष्मवित्त सहाय्य करीत आहे.

**श्रीमहिला ग्रामोद्योग :** ग्रामीण भागासह शहरी भागात ६३ शाखांसह भारतभर ३२000 महिलांना 'लिज्जत पापड' उद्योगसमुह प्रतिकिलो २ रु. बँकेत बचत करण्याची वित्तीय सेवा पुरवित आहे.

**महिला अतिवृद्धी सोसायटी :** आंध्र प्रदेशातील या संस्थेने शहरी भागातील गरिबांसाठी हा कार्यक्रम राबवुन १.५ लाख शहरी स्वयंसाह्यता गटांना वित्तपुरवठा व क्षमता वृद्धीसाठी प्रशिक्षण पुरवून योगदान देत आहे. आंध्र प्रदेशातील ३ शहरातील १०६ झोपडपट्टीत हा कार्यक्रम राबविला जातो.[४०]

### ५.३.६ सुक्ष्मवित्त व्यवहार प्रतिमान

#### १) स्वयंसहाय्यता गट बँक जोडणी प्रतिमान

भारतात १९८९ मध्ये ॲक्शन रिसर्च प्रोजेक्टच्या माध्यमातून स्वयंसहाय्यता गट बँक जोडणी प्रतिमान राबविण्यास सुरुवात झाली. भारतात स्वयंसहाय्यता गट स्थापनेच्या शासकीय कार्यक्रमामुळे हे प्रतिमान खुप प्रसिद्ध झाले आहे म्हणून या प्रतिमानास 'सुक्ष्म– वित्ताचे भारतीय प्रतिमान' म्हणून ओळखले जाते.

स्वयंसहाय्यता गट बँक जोडणी प्रतिमानाची वैशिष्ट्ये –

१. स्वयंसहाय्यता गट प्रतिमान हे स्वयंसेवी संस्थांनी विकसित केले असून समुहाची क्षमता उभारणी हा प्रतिमानाचा मुख्य आधार आहे
२. आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या एकजिनसी असणाऱ्या १० ते २० व्यक्तींचा लहान व अनौपचारिक गट असतो.
३. स्वयंसहाय्यता गट हे पुरुषांचे किंवा महिलांचे किंवा संमिश्र स्वरुपाचे असतात. भारतात ९० टक्के गट हे महिलांचे आहेत.

४. स्वयंसहाय्यता गट ही स्वत: तयार केलेल्या नियमावलीच्या आधारे वित्तीय सेवा पुरविणारी एक शाश्वत संस्था असते.

५. गटातील सभासद बचत, पत आणि विकासाच्या बाबींवर चर्चा घडवून आणण्यासाठी सर्वानुमते ठरलेल्या वेळी व ठिकाणी एकत्र येवून बैठकांचे आयोजन करीत असतात.

६. गट हे बचत रक्कमेच्या माध्यमातून गरजेवर आधारित पतपुरवठा करण्यासाठी समुह निधी निर्माण करीत असतात.

७. गटातील सर्व सभासदांनी मिळून गटाची आचारसंहिता व नियम तयार केलेले असतात. त्यात स्वयंसेवी संस्था हस्तक्षेप करीत नाहीत.

८. स्वयंसहाय्यता गट स्थापनेनंतर गट वित्तीय संघटनात्मक आणि शाश्वतदृष्ट्या कार्यरत झाल्यानंतर स्वयंसेवी संस्था गटाचा पाठिंबा काढून घेतात.

९. गरिबांचे सामाजिक व आर्थिक सबलीकरण घडवून आणणे हा गटाच्या स्थापनेचा प्रमुख उद्देश असतो.

स्वयंसहाय्यता गट प्रतिमानाची भारतात तीन प्रकारात अंमलबजावणी केली जात आहे.

- **प्रतिमान – १ :-** बँकांच्या माध्यमातून स्थापना व कर्ज पुरवठा होणारे स्वयंसहाय्यता गट
- **प्रतिमान – २ :–** बँकांशिवाय इतर औपचारिक संस्थांनी स्थापन केलेले परंतु बँकांकडून थेट कर्ज पुरवठा होणारे स्वयंसहाय्यता गट
- **प्रतिमान – ३ :–** स्वयंसेवी संस्थांच्या मध्यस्थी द्वारे स्थापन केले जाणारे व कर्ज पुरवठा होणारे स्वयंसहाय्यता गट

## २) ग्रामीण प्रतिमान

बांगलादेशातील ग्रामीण बँकेचे संस्थापक चेअरमन डॉ. मोहंमद युनूस यांनी 'ग्रामीण बँक प्रतिमान' विकसित केलेले आहे. दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रमांतर्गत गरिबांना बँकींग सुविधा पुरविण्यात हे प्रतिमान खुप यशस्वी ठरलेले आहे. बांगलादेशासह अनेक देशात हे प्रतिमान सामुहिक दायित्वाचा आधार असणाऱ्या गटांच्या माध्यमातून प्रचलित झालेले आहे. भारतात असोसिएशन फॉर सर्व सेवा फार्मस ॲक्टीव्हीटीज फॉर सोशल अल्टरनेटीव्ह, श्री मायक्रो फायनान्स लिमिटेड, कॅशप्रोर आणि इतर फायनान्स आणि टेक्नीकल सर्व्हिसेस लिमिटेड या बिगर बँकींग संस्थांच्या माध्यमातून हे प्रतिमान राबविले जात आहे.

ग्रामीण प्रतिमानाची वैशिष्ट्ये –

१. ग्रामीण भागातील एकच पार्श्वभूमीतील पाच सभासदांचा मिळून 'गट' स्थापन केला जातो.

२. ग्रामीण बँकेच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून, प्रोत्साहनातून गटाची निर्मिती केली जाते.

३. गटाच्या प्रत्येक लढ्यास ७ दिवसाचे प्रशिक्षण घेणे सक्तीचे असते. प्रशिक्षणानंतर देणे बंधनकारक असते.

४. जीआरटी चाचणीत पास होणाऱ्या गटास एकरक्कमी सभासद फी ग्रामीण बँकेस द्यावी लागते.

५. एकूण आठ गटांचे सामुहिक दायित्वाच्या तत्वावर एकत्रीकरण करुन एक गटांचे केंद्र निर्माण करण्यात येते. या गटांच्या केंद्रात प्रत्येक आठवड्यास सभा घेण्यात येतात. सभेस गटाच्या सभासदांना हजर रहावे लागते.

६. गटातील प्रत्येक सभासदास दर आठवड्यास १० टक्का रक्कम बँकेत जमा करणे बंधनकारक असते.

७. गटातील सभासदास वैयक्तीक गरजा भागविण्यासाठी व उत्पन्न निर्मितीच्या उपक्रमात सहभागी होण्यासाठी बँकेकडून कर्ज देण्यात येते. मात्र कर्जाचा आणि गटाच्या बचतीचा संबंध जोडण्यात येत नाही.

८. कर्ज परतफेड ५२ आठवड्यात समान हप्त्याने करावयाची असते. कर्जाचे हप्ते गट प्रमुखाने गोळा करुन बँकेत भरणा करावयाचे असतात. सामुहिक दबाव हे कर्जफेडीचे प्रमुख कारण मानले जाते.

### ३) सहकार प्रतिमान

हे प्रतिमान को–ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट फोरम हैद्राबादच्या वतीने प्रचलित करण्यात आलेले आहे. न्यु जनरेशन को–ऑपरेटिव्ह ॲक्ट १९९५ अंतर्गत या प्रतिमानातील गट स्थापन केले जातात. या प्रतिमानांतर्गत वुमेन थ्रिफ्ट ग्रुप्स आणि मेन्स थ्रिफ्ट ग्रुप्स स्थापन करण्यात येत आहेत.

सहकार प्रतिमानाची वैशिष्ट्ये –

१. सी. डी. एफ. च्या माध्यमातून सामान्यत: एकाच खेड्यातील ३०० सभासद असलेल्या स्त्री– पुरुष सभासदांची मायक्रो फायनान्स को–ऑपरेटिव्ह निर्माण केली जाते.

२. मायक्रो फायनान्स को. ऑपरेटिव्हज मधून १० ते १५ सभासद असलेले आणि निर्माण केले जातात. या गटांना कारभाराची पुर्णत: स्वयत्तता असते.

३. गट पातळीवर एक सभासद गटाचा अध्यक्ष म्हणून सर्व संमतीने नियुक्त केला जातो. तर गटांच्या एकत्रीकरणातून निर्माण होणाऱ्या असोसिएशनसाठी एक एमडी नियुक्त केला जातो.

४. असोसिएशनच्या माध्यमातून गटांना आवश्यकतेनुसार प्रशिक्षण, व्यावसायिक कौशल्य आणि सुक्ष्मवित्त पुरवठा केला जातो. तसेच प्रशासकीय लेखापरिक्षण विषयक सहाय्य केले जाते.

### ४) भागीदारी प्रतिमान

हे प्रतिमान आयसीआयसीआय बँकेच्या माध्यमातून प्रस्तुत करण्यात आलेले आहे. २००२ मध्ये आयसीआयसीआय बँकेने सुक्ष्म कर्ज पुरवठ्याच्या धोरणाचे अंतर्गत मुल्यमापन केले. त्यावरुन कर्ज आणि साधनांची मागणी लक्षात घेऊन प्रामुख्याने ग्रामीण भागासाठी स्वयंसहाय्यता गट– बँक जोडणी प्रतिमान आहे. दुर्बल घटकांना प्रामुख्याने ग्रामीण दुर्बलांना सुक्ष्मवित्त सुविधा पुरविण्यासाठी बँकेच्या शाखा अपुऱ्या आहेत म्हणून आयसीआयसीआय बँकेने भागीदारी प्रतिमान विकसीत केलेले आहे. भारतातील ३० सुक्ष्मवित्त संस्थांशी भागीदारी करुन सुमारे १५० दशलक्ष अमेरिकन डॉलर्सचे कर्ज उपलब्ध करुन दिलेले आहे.

भागीदारी प्रतिमानाची वैशिष्ट्ये –

१. सुक्ष्मवित्ताच्या गरजा भागविण्यासाठी स्थानिक सुक्ष्मवित्त संस्थांशी भागीदारी करणे.

२. सुक्ष्मपत पुरवठा करतांना थेट कर्जदार व्यक्तींशी करार करणे.

३. सुक्ष्मपत पुरवठा करतांना सुक्ष्म वित्त संस्थेच्या ताळेबंदाशी संबंध न जोडणे.

४. सुक्ष्म पतपुरवठा करणाऱ्या संस्थांना ओव्हर ड्राफ्ट सेवा पुरविणे.

५. सुक्ष्म पतदाराला गंभीर आजार, अपघात, मृत्यू, नापीकी अशा आपत्तीत संरक्षण देण्यासाठी विमा उतरविण्याची सोय उपलब्ध करुन देणे.

वरील भिन्न प्रतिमानाद्वारे स्वयंसहाय्यता गटांशी सुक्ष्मवित्त व्यवहाराची जोडणी केली जाते.

## ५.४ स्वयंसहाय्यता गट

स्वयं–साहाय्य गट ''सेल्फ हेल्प ग्रुप' बोली भाषेत यालाच 'महिलांचे बचतगट' असेही संबोधले जाते. मात्र बचत गट ही सीमित संकल्पना आहे. यात

एकत्र येऊन पैसे गोळा करणे व त्याच्या एकमेकांच्या मदतीसाठी विनियोग करणे एवढाच सीमित अर्थ नसून स्वयंसहाय्यता गट म्हणजे स्वत:च स्वत:ला मदत करण्यासाठी उभारलेला गट ही अधिक विस्तृत संकल्पना आहे. केवळ बचत व कर्ज याभोवती पिंगा न घालता स्वयंसहाय्यता ही स्वावलंबनाच्या तत्वाशी निगडीत करून गट सदस्यांचा जेव्हा आत्मविश्वास, आत्मसन्मान आणि आर्थिक व सामाजिक स्वावलंबन वाढते. तेव्हा गटास स्वयंसहाय्यता गट म्हणता येते. समान आर्थिक व सामाजिक पार्श्वभुमी असणारे किमान १० सदस्य एकत्र येवुन बचतीच्या राजमार्गावरून चालण्यासाठी, स्वावलंबनासाठी कटीबद्ध असतात. अशा गटाला स्वयंसहाय्यता गट म्हणतात.

**५.४.१ स्वयंसहाय्यता गट : व्याख्या**

स्वयंसहाय्यता गटाकडून वेगवेगळ्या अपेक्षा असल्यामुळे काटेकोरपणे व्याख्या करणे कठीण आहे.

१. ''समान समस्या असलेल्या व्यक्तींनी त्या समस्या वैयक्तीक पातळीवर सोडविता येत नाही म्हणुन समस्यांचे निराकरण करण्यासाठी एकत्र येऊन स्थापन केलेला गट म्हणजे स्वयंसहाय्यता गट होय.''[४१]

२. ''सर्वार्थान साधर्म्य असणाऱ्या सभासदांनी वाजवी संख्येने व स्वेच्छेने एकत्र येऊन सर्वांगीण उन्नतीसाठी बनविलेले व चालविलेले समुह''.[४२]

३. ''परावलंबनाकडून स्वावलंबनाकडे व स्वावलंबनाकडून परस्परावलंबनाकडे जाण्यासाठी स्वच्छेने, संमतीने सामुहिकरित्या बचतीच्या माध्यमातुन केलेली वाटचाल म्हणजे स्वयंसहाय्यता गट''[४३]

४. निर्धन सुद्धा ऋणधारी असू शकतात याचा साक्षात्कार घडविणारा समुह म्हणजे स्वयंसहाय्यता गट होय.[४४]

५. ''जीवनातील नव–नव्या आव्हानांना व जबाबदाऱ्यांना पेलण्याची क्षमता विकसित करणारा सुसज्य संच''.[४५]

६. ''ज्या समुहात किमान १० सदस्य एकत्र येऊन नियमित बचतीच्या माध्यमातुन परस्परांच्या आर्थिक गरजा भागवितात''.[४६]

७. कर्जाच्या माध्यमातुन स्वयंव्यवसाय सुरू करतात, सर्वानुमते निर्णय घेवुन संघटन, सहकार्य, नेतृत्व व कर्तव्यशक्ती वाढवितात अशा गटाला स्वयंसहाय्यता गट म्हणतात.''[४७]

८. "A Self Help Group is a voluntary association to homogenous set of people either working together or living in the neighbourhood engaged in similar activity of working with or without registration for the common good the members."[४८]

## ५.४.२ स्वयंसहाय्यता गट : उद्देश

१. दारिद्र्य रेषेखालील व्यक्तीचा व त्यांच्या कुटूंबाचा आर्थिक स्तर उंचावणे.

२. गटातील व्यक्तीचे आर्थिक व सामाजिक सशक्तीकरण घडवुन आणणे.

३. कुटूंबाच्या जीवनमानात वाढ घडवुन आणण्यासाठी स्त्रियांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविणे.

४. कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग वाढीस लावणे.

५. काटकरीच्या माध्यमातुन बचतीच्या सवयी वाढीस लावणे.

६. समुहाच्या बचत निधीतुन तातडीच्या गरजा भागविणे.

७. महिलांमध्ये स्वयंप्रयत्न व आत्मविश्वास वाढीस लावणे.

८. आर्थिक व सामाजिक जागृतता निर्माण करणे.

९. वित्तीय सेवांचा विस्तार व गहणीकरण करणे.

१०. गरिबांना विकासाच्या प्रवाहात समील करून घेणे.

११. धनव्यवहारा बरोबर मनव्यवहार वाढीस लावणे.

१२. सभासदांमध्ये उद्योजकीय कौशल्य रूजविणे.

१३. नागरी वस्तीत सामाजिक सोयी व सुविधा निर्माण करणे.

### ५.४.३ स्वयंसहाय्यता गटांची वैशिष्टये

समान विचारांच्या समान परिस्थितीतील व समान उद्दिष्टांचे सदस्य एकत्र येऊन स्वयंसहाय्यता गटाची निर्मिती करतात अशा गटांची ठळक वैशिष्टये–

१. **समान गरजा :** समान गरजा असणारे सदस्य एकत्र येऊन गटाद्वारे गरजांची पुर्तता करतात.

२. **समान परिस्थिती :** एकाच गल्ली किंवा मोहल्यातील व्यक्ती एकत्र येऊन गटस्थापन करतात या सभासदांची आर्थिक व सामाजिक स्थिती समान असते.

३. **लोकशाही प्रणाली :** गटाचा कारभार हा सर्वानुमते चालतो. सर्वानुमते निर्णय घेतले जातात. प्रत्येकाचा आदर राखला जातो. त्यामुळे खरी लोकशाही मुल्ये गटात जपली जातात.

४. **ऐच्छिक सभासदत्व :** सहकाराच्या तत्वाप्रमाणे गटात सहभागी होण्यासाठी ऐच्छिक सभासदत्व असते. कोणतीही जबरदस्ती नसते.

५. **आर्थिक देवाण – घेवाण :** सर्व सभासद दरमहा नियमितपणे ५०,१००,१५०,२०० रू. याप्रमाणे बचत करीत असतात. या निधीचा सभासदांच्या लहान–लहान गरजा भागविण्यासाठी उपयोग केला जातो.

६. **रोख व्यवहार :** गटातील सभासदांमध्ये बचत व कर्जाच्या देवाण–घेवाणीचे व्यवहार पुर्णतः रोखीने केले जातात. उधारीचे व परस्पर फेडीचे व्यवहार केले जात नाही. त्यामुळे व्यवहारात पारदर्शकता निर्माण होते.

७. **समानता :** गटातील सर्व महिला सभासद सामान्यतः भाषा, अडचणी, सुख–दुखे, इ. बाबतीत समान पातळीवरील असतात. त्यामुळे परस्परांमध्ये भेदभाव होत नाहीत.

८. **सहकार शिक्षण :** 'एकमेका सहाय्य करू....''एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक चे शिक्षण/धडे दिले जातात. सहकारी तत्वाला चालना मिळते.

९. **उद्योजकता कौशल्य :** स्वयंसहाय्यता गटाला सामुहिक रित्या व वैयक्तिक रित्या स्वत:चा व्यवसाय करता येतो. त्यासाठी शासनाकडून गटाला कर्ज, प्रशिक्षण व बाजारपेठ सुविधा पुरविल्या जातात.

१०. **काटकसर वृत्ती :** आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या व्यक्तींचे उत्पन्न कमी असते. त्यामुळे बचत करण्यासाठी काटकसर करावी लागते. सवयीने ही वृत्ती व्यवहारात सर्व ठिकाणी उपयुक्त पडते.

११. **एकतेची भावना :** 'जवळीक असणाऱ्या व जवळीक नसणाऱ्या एकाच वस्तीतील महिला एकत्र येवुन काम करतात. एकमेकींचा आदर राखतात. त्यामुळे परस्परात एकतेची भावना निर्माण होते.

१२. **धन व्यवहाराबरोबर मन व्यवहार :** बचत व कर्जव्यवहाराबरोबर कौटुंबिक, सामाजिक समस्या सोडविण्यासाठी सामुहिक व वैयक्तिक प्रयत्न केले जातात.

१३. **अधिकृत नोंदणी :** गटांना सहकार व बँक नियमाप्रमाणे अधिकृत नोंदणी करण्याची गरज नसते. फक्त बँकेत गटाच्या नावाने खाते उघडले जाते. मात्र गटातील व्यवहारांच्या नोंदी ठेवल्या जातात.

१४. **लवचिक पद्धती :** गटासाठी शासकीय नियमावलीसारखी नियमावली नसते. स्वनिर्मित नियमावली असते आणि परिस्थितीनुसार त्यात बदल केले जातात.

१५. **सभासद निवड व संख्या :** गटाचे सभासद निवडतांना समान आर्थिक व सामाजिक परिस्थिती, परस्पर आपुलकी, जिव्हाळा असणाऱ्यांना प्राधान्य दिले जाते. गटात किमान १० व कमला २० सभासद संख्या असु शकते.

१६. **हक्काचे व्यासपीठ :** गटातील सभासदांना आचार–विचार, कार्य, कौशल्य यास वाव मिळवुन देणारे स्वयंसहाय्यता गट हे एक हक्काचे व्यासपीठ असते.

१७. **विश्वासाचे प्रतीक :** गटातील सामील सर्व सभासदांचे व्यवहार परस्पर विश्वासावर आधारीत असतात. येथे फसवणुकीस वाव नसतो.

१८. **सबलीकरणाचे माध्यम :** स्वयंसहाय्यता गट हे गटातील घटकांच्या आर्थिक, सामाजिक, मानसिक, राजकीय विकासाचे माध्यम म्हणुन कार्य करते. दुर्बल, कमकुवत घटकांच्या सबलीकरण/ सशक्तीकरणाचे एक साधन असते.

### ५.४.४ स्वयंसहाय्यता गटांची कार्ये

स्वयंसहाय्यता गटांकडून अपेक्षित असलेली प्रमुख कार्य पुढीलप्रमाणे.

१. समाजातील असक्षम व्यक्तींना आत्मनिर्भर बनविणे. गटाच्या माध्यमातून सर्व सभासदांना स्वत:च्या पायावर उभे करणे.

२. सभासदांना त्यांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांवर विचारविनिमय/ चर्चा करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे.

३. सामाजिक स्तरावर सभासदांचा (सभासद महिलांचा) दर्जा उंचावण्यासाठी मदत करणे.

४. सभासदांना त्यांच्या विचारांची देवाण घेवाण घेण्याची संधी उपलब्ध करुन देणे.

५. सभासदांची प्रामुख्याने महिलांनी निर्णय क्षमता वाढविण्याची मदत करणे.

६. सभासदांमध्ये एकमेकांना मदत करण्याची व परस्परांमध्ये सहकार्याची भावना वाढीस लावण्याचे कार्य करणे.

७. गटाच्या माध्यमातून सभासदांमध्ये समस्या सोडविण्यासाठीची क्षमता व आत्मविश्वास वाढीस लागणे.

८. सभासदांमध्ये संघटनात्मक व संस्थात्मक कौशल्य रुजविणेसाठी प्रयत्न करणे.

९. गटाच्या सभासदांमध्ये व्यवहार साक्षरता आणि सामान्य ज्ञान वृद्धींगत करणे.

१०. गरिब व दुर्बल असणाऱ्या सभासदांना वित्तीय व्यवहारांची ओळख करुन देणे तसेच आवश्यक साधनांची उपलब्धता करुन देणे.

**५.४.५ स्वयंसहाय्यता गटांचे वर्गीकरण**

'स्वयंसहाय्यता गट' हा नव्या युगाचा नवा मंत्र बनलेला आहे. स्वयंसहाय्यता गटांकडून वेगवेगळ्या घटकांच्या वेगवेगळ्या अपेक्षा असल्यामुळे स्वयंसहाय्यता गटांचे प्रकारही वेगवेगळे निर्माण झालेले आहे.

**अ) लिंग निहाय स्वयंसहाय्यता गटांचे वर्गीकरण –** समान उद्देशाने, विशिष्ट संख्येने व्यक्ती एकत्र येवून स्वयंसहाय्यता गट स्थापन करीत असतात. अशा गटांचे फक्त पुरूष, फक्त महिला आणि महिला व पुरूष यांच्या सहभागातील तीन प्रकारात वर्गीकरण केले जाते.

१) **पुरूष स्वयंसहाय्यता गट :** समान पातळीवरील, विशिष्ट हेतूने, विशिष्ट संख्येने पुरूषांनी एकत्र येवून स्थापन केलेले गट म्हणजे पुरूष स्वयंसहाय्यता गट होय.

२) **महिला स्वयंसहाय्यता गट :** समना परिस्थितीतील फक्त महिलांनी विशिष्ट संख्येने एकत्र येवून स्थापन केलेले गट म्हणजे महिला स्वयंसहाय्यता गट होय. जगात सर्वत्र सर्वात अधिक संख्येने महिला स्वयंसहाय्यता गट स्थापन झालेले आहेत.

३) **मिश्र स्वयंसहाय्यता गट :** समान परिस्थितीत, समान हेतून आणि विशिष्ट संख्येने महिला व पुरूषांनी एकत्र येवून स्थापन केलेले गट म्हणजे मिश्र स्वयंसहाय्यता गट होय.

**ब) स्थान निहाय स्वयंसहाय्यता गटांचे वर्गीकरण –** ग्रामीण व शहरी भागातील दुर्बलांच्या सबलीकरणासाठी स्वयंसहाय्यता गट स्थापन केले जातात. त्याचे वर्गीकरण–

१) **ग्रामीण स्वयंसहाय्यता गट :** ग्रामीण भागात सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेअंर्तगत स्थापन होणाऱ्या गटांचे वर्गीकरण (अ) फक्त महिला स्वयंसहाय्यता गट (एकूण गटांमध्ये ५0टक्के) (ब) फक्त पुरूष स्वयंसहाय्यता गट (क) मिश्र स्वयंसहाय्यता गट (ड) अपंग स्वयंसहाय्यता गट (एकूण गटांमध्ये ३ टक्के)

२) **शहरी स्वयंसहाय्यता गट :** सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत शहरी भागातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपरिषदा अंतर्गत स्थापन होणाऱ्या गटांचा समावेश होतो. शहरी भागात फक्त दारिद्र्य रेषेखालील महिलांचेच गट स्थापन केले जातात.

### ५.४.६ स्वयंसहाय्यता गट – बँक जोडणी प्रतिमान

समाजातील बहुसंख्य दुर्बल घटकांना आवश्यकता असतांना सुद्धा सबल, सक्षम होता येत नाही. कारण परंपरागत दृष्टिकोनातून त्यांच्याकडे तारणाची क्षमता नसते, त्यांना व्यवसायाचा अनुभव नसतो, त्यांचा पुर्व इतिहास नसतो आणि ते कर्ज फेडण्यास लायक नसतात. त्यामुळे वित्त व्यवहारांपासून वंचित राहतात. या परंपरागत वैचारिकतेला छेद देऊन समाजातील दुर्बल, गरीबच सुक्ष्म वित्त व्यवहारासाठी अधिक लायक असतात. त्यांच्यातील क्षमता ओळखून विश्वासाच्या आधारावर थेट वित्तीय प्रणालीची जोड दिल्यास त्यांच्या आयुष्यात हसु फुलण्यास मदत होते आणि गरिबांच्या सबलीकरणास मदत होते. ही वैचारिक

नाविन्यता जगापुढे सर्वप्रथम डॉ. मोहम्मद युनूस यांनी मांडली. वैचारिक पातळीवर जेथे मर्यादा पडतात तेथे समुह पातळीवरील सबलीकरण उपयुक्त ठरते.

महिलांमधील एकत्रीकरण आणि काटकसर वृत्ती हे नैसर्गिक गुणधर्म असल्यामुळे 'महिलांचे समूह' हे सक्षमीकरणात अधिक यशस्वी ठरतात. हे डॉ. युनूस यांनी बांग्लादेशात लाखो महिलांना दारिद्र्य मुक्त करून सर्व जगासमोर मांडले.

''वैचारिक प्रबोधनातून साकारलेल्या गटास सामूहिक दायित्वाच्या तत्त्वावर सुक्ष्मवित्त प्रणालीची जोड मिळाल्यास समूह पर्यायाने वैयक्तिक पातळीवरील दारिद्र्य निमुर्लन होऊन आर्थिक सबलीकरण घडून येते'' आणि ''समूहाच्या सुक्ष्म वित्त प्रणालीस वैचारिक प्रबोधनाद्वारे स्वहक्काच्या जाणिवेची जोड मिळाल्यास सामाजिक सबलीकरण घडून येते.'' डॉ. युनूस यांनी मांडलेला हा अनुभवसिद्ध उर्ध्वगामी विकास दृष्टीकोन जागतिक पातळीवर दारिद्र्य निर्मुलन आणि सबलीकरणाचे प्रतिमान सर्वत्र मान्य करण्यात आलेले आहेत.[४९] त्याची अंमल बजावणी वेगवेगळ्या माध्यमातून केली जात आहे. गट निर्मितीच्या प्रारंभिक अवस्थेत 'शुंम्पीटर' यांचे नवप्रवर्तन आणि प्रवर्तकाचे कार्य महत्वाचे असते आणि दुसऱ्या अवस्थेत गटाच्या बांधणी आणि संवर्धनासाठी ड्युसेनबेरी यांनी मांडलेला प्रदर्शन परिणाम सहाय्यक मानला जातो.

संपूर्ण भारतात दारिद्र्य निमुर्लन व सबलीकरणासाठी मायक्रोफायनान्स चे माध्यम म्हणुन भिन्न प्रकारचे स्वयंसहाय्यता गट स्थापन केले जात आहेत. त्यासाठी प्रमुख तीन प्रकारचे प्रतिमान प्रचलित आहेत.[५०]


**प्रतिमान – १**

**१) बँकांच्या माध्यमातुन स्वयंसहाय्यता गट स्थापना व कर्जपुरवठा**

या प्रकारच्या प्रतिमानात बँका स्वत: पुढाकार घेऊन स्वयंसहाय्यता गट स्थापनेसाठी व विकासासाठी कार्य करतात. 'शुम्पीटर' यांचा आथिर्क विकासातील नव प्रवर्तन हा घटक स्वयंसहाय्यता गटांच्या निर्मितीसाठी प्रेरक असतो.

समाजातील दुर्बल घटकांना गटातील सहभाग हा नविन्यपूर्ण असतो. गटाच्या माध्यमातून नविन काहीतरी करून दाखविण्याची उत्सुकता असते सुक्ष्मवित्त व्यवहारांशी आणि व्यवसायाशी संबंध येऊन आत्म उद्धाराची प्रेरणा निर्माण होते. गटातील सहभागासाठी प्रवृत्त होतात. या नवप्रवर्तनात प्रवर्तकाची भुमिका अत्यंत महत्वपूर्ण असते. प्रवर्तकाला गटाच्या निर्मितीपूर्वीव गट निर्मितीनंतर सतत प्रबोधन करावे लागते. या प्रतिमानात बँका प्रवर्तकाचे कार्य पाडत असतात.


गटाची दुसरी अवस्था समग्र अर्थशास्त्रातील 'डयुसेनबेरी' या अर्थशास्त्रज्ञाच्या ''प्रदर्शन परिणामावर आधारित असते.'' आपले शेजारी, गल्लीतील, गावातील दुर्बल व्यक्ती स्वयंसहाय्यता गटात सामिल होऊन प्रगती घडवून आणतांना पाहून गटात सामील न झालेल्या व्यक्तींना स्वंयसहाय्यता गट स्थापन करावासा वाटणे, सामिल झालेल्या सभासदास इतर सभासदांसारखे वर्तन करावेसे वाटणे आणि इतर गटांसारखी प्रगती करावी असे वाटणे यास प्रदर्शन परिणाम म्हटले जाते. प्रदर्शन परिणामाच्या प्रभावामुळे अंगभुत उर्मी जोमदार होते. त्यामुळे गट यशस्वी होऊन दिर्घकाळ टिकातात. याप्रकारात बँका संवर्धकाचे कार्य सुद्धा करित असतात. गट स्थापनेनंतर बँकेत गटाच्या नावे खाते उघडून गटातील सभासदांना बचत करण्यास प्रवृत्त केले जाते आणि गटातील सामुहिक बचतीच्या आधारावर गटास सामुहिक व वैयक्तिक रित्या कर्ज पुरवठा करीत असतात. भारतातील एकूण स्वयंसहाय्यता गटात या प्रतिमानाच्या गटांचे प्रमाण २० टक्के इतके आहे.



प्रतिमान– २

**१) बँकांशिवाय इतर औपचारीक संस्थांनी स्थापन केलेले परंतु बँकांकडून थेट कर्ज पुरवठा होणारे स्वयंसहाय्यता गट**


स्वयंसेवी संस्था, संघ किंवा शासकीय संस्था इ. च्या माध्यमातुन स्वयंसहाय्यता गट स्थापन केले जातात. स्वयंसेवी संस्थांकडून गटांची बांधणी व मार्गदर्शन करून वित्त पुरवठ्यासाठी मध्यस्थी केली जाते. प्रवर्तकाची भूमिका या संस्था पार पाडित असतात. गटाच्या नावाने बँकेत बचत खाते उघडले जाते आणि बचत खात्यातील बचतीच्या आधारे स्वयंसहाय्यता गटाला कर्जपुरवठा केला जातो. गटांना व्यवसायासाठी कर्ज पुरवठा, स्वयंसहाय्यता गटांचा संघ, स्वयंसेवी संस्था यांच्या मध्यस्थीवरुन केला जातो. एकूण स्वयंसहाय्यता गटात या प्रतिमाना अंतर्गत स्थापन झालेल्या गटांचे प्रमाण ७४% आहे.




प्रतिमान – ३

**१) स्वयंसेवी संस्थांच्या मध्यस्थीद्वारे स्थापन केले जाणारे व कर्ज पुरवठा होणारे स्वयंसहाय्यता गट**

स्वयंसेवी संस्था किंवा स्वयंसहाय्यता गटचा संघ यांच्या पुढाकाराने गटाचे संघटन करुन स्थापना केली जाते. मध्यस्थी संस्थांच्या माध्यमातून गटांना कर्ज पुरवठा केला जात असतो. स्वयंसहाय्यता गट बँकेत खाते उघडून बचत करीत असतात. बँकेकडून गटांना थेट कर्ज पुरवठा न होता मध्यस्थी संस्थांना घाऊक कर्ज पुरविले जाते. आवश्यकतेनुसार गटांना कर्ज पुरवठा केला जातो एकूण स्वयंसहाय्यता गटात या प्रकारचे गट फक्त ६% इतके आहेत.




**संदर्भ :** नाबार्ड रिपोर्ट अंडर द एसएचजी बँक लिंकेज प्रोग्राम ॲण्ड टू मायक्रो फायनान्स इन्स्टिट्युशन्स ड्युरींग २००६-०७, पृ. क्र. ८९.

वरील तीन प्रकारच्या प्रतिमानाच्या आधारे भारतात स्वयंसहाय्यता गट स्थापन होत आहेत. त्यात दुसऱ्या प्रकारच्या प्रतिमाना द्वारे महिला सबलीकरणात सर्वाधिक योगदान दिले जात आहे. सदर संशोधनासाठी निवडण्यात आलेले स्वयंसहाय्यता गट हे दुसऱ्या प्रतिमाना अंतर्गत आहेत.

### ५.४.७ स्वयंसहाय्यता गट स्थापनेच्या योजना

भारतासह जगभरात दुर्बलांच्या सबलीकरणासाठी 'स्वयंसहाय्यता गट' हे प्रतिमान यशस्वी होत आहे. त्यामुळे भारतात पुढील योजना व कार्यक्रमांतर्गत स्वयंसहाय्यता गटांची स्थापना करण्यात येते आहे.[५१]

१. इंदिरा महिला योजना

२. स्वशक्ती प्रकल्प

३. राष्ट्रीय महिला कोष

४. उत्तर प्रदेश सेल्फ लॅन्ड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन

५. सुर्वण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना

६. महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा योजना

७. जल जागृती अभियान

८. महिला स्वास्थ्य संघ

९. जागतिक कृषी विकास निधी

१०. जागतिक संघटन विकास कार्यक्रम

११. राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक

१२. समुह कृती संगम

१३. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम

१४. सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना

### ५.४.८ सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना

नागरी भागातील दारिद्र्य रेषेखालील जनतेच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी. त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने केंद्र व राज्य शासनाने संयुक्तपणे १ डिसेंबर १९९७ पासुन सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना सुरू केली. दारिद्र्य निमुर्लनाच्या योजनांचे एकत्रिकरण करून ही योजना सुरू करण्यात आली. राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा व नगर पंचायती मध्ये ही योजना राबविण्यात येत आहे. ज्यांचे दरमहा दरडोई उत्पन्न रू. ५९१.७५ पर्यंत आहे. त्यांना या योजनेचा लाभ घेता येतो.[५२]

#### अ) सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना– कार्यक्रम रचना

सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना ही सामुहिक सबलीकरणातुन दारिद्र्यनिमुर्लनावर भर देणारी योजना आहे. त्यामुळे प्रमुख तीन कार्यक्रमांचा अंर्तभाव होतो.

कार्यक्रम रचना

| १) सामाजिक संरचना | २) स्वयंरोजगार कार्यक्रम | ३) नागरी मजुरी रोजगार |
| --- | --- | --- |
| * समाज विकास संस्था | * **बचत व काटकसर गट**(धनव्यवहार) | * लाभार्थींना मंजुरी |
| * शेजार समुह समिती (NHC) | * **महिला व बालके विकास गट** | मजुरी घटकातुन |
| * निवासी वस्ती स्वयंसेविका | | * सार्वजनिक मालमत्ता |
| * **स्वयंसहाय्यता गट** | * प्रशिक्षण(वैयक्तीक स्वयंरोजगारी) | निर्मिती |
| (मनव्यवहार) | * मुलभूत सोयी – सुविधा | |

## १) सामाजिक संरचना

शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाना सामाजिक संरचनेच्या माध्यमातून संघटीत करणे, दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांना सदर योजनेची माहिती देणे, योजनेच्या अंमलबजावणी विषयी नियोजन तयार करणे. योजनेत सहभागी होणे योग्य लाभार्थ्यांची यादी तयार करणे, योजनेच्या प्रगतीचा आढावा घेणे इत्यादी कार्य सामाजिक संरचने अंतर्गत केले जातात.

## २) स्वयंरोजगार कार्यक्रम

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत असणाऱ्या कार्यक्रमापैकी स्वयंरोजगार कार्यक्रम हा सामुहिक सबलीकरणात केंद्रस्थानी असतो. सामुहिक सबलीकरणातुन महिलांचे सबलीकरण व महिला उद्योगातुन दारिद्र्य निर्मुलन हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश असतो. महिला बचत गट आणि महिला व बालके विकास गट हे महिलांच्या दारिद्र्य निर्मुलनासाठी व सबलीकरणाशी संबंधीत कार्यक्रम राबविले जातात. तसेच वैयक्तीक पातळीवर स्वयंरोजगार करु इच्छिणाऱ्या व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण व कर्ज विषयक मध्यस्थीच्या सुविधा पुरविल्या जातात.

### ३) नागरी मजुरी रोजगार कार्यक्रम

नागरी भागातील कमी उत्पन्न असणाऱ्या व्यक्तींना किंवा बेरोजगार असणाऱ्या व्यक्तींना आणि दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे, रोजगाराच्या माध्यमातून त्यांच्या उत्पन्नात वाढ घडवून आणणे ही प्रमुख उद्दिष्ट्ये या कार्यक्रमाची आहेत. तसेच नागरी भागात रोजगार पुरविण्याच्या उद्देशाने होणाऱ्या कामांद्वारे सार्वजनिक मालमत्ता निर्माण करणे हे सुद्धा अनुषंगिक उद्दिष्ट्ये आहेत.

### स्वयसहाय्यता गट स्थापना व कार्यपध्दती

सामाजिक संरचने अंर्तगत समाज विकास संस्था ह्या स्वयंसेवी संस्था म्हणून कार्य करीत असतात. दारिद्र्य रेषेखालील जास्तीत–जास्त दोन हजार कुटूंबांची मिळुन किंवा एका वस्तीमध्ये एक समाज विकास संस्था बनविण्यात येते. या संस्थेचे नियंत्रण वस्तीतील लाभार्थीच करीत असतात. या संस्था धर्मदाय आयुक्तांकडून रजिस्टर करून घेतल्या जातात या संस्थांना शासनातर्फे पहिल्यावर्षी प्रतिसभासद १00रू. आणि पुढील वर्षी रू. ७५ प्रमाणे अनुदान देण्यात येते.

समाज विकास संस्थेतर्फे लाभार्थी निवडुन त्यांचे अर्ज भरून घेतले जातात. लाभार्थींना योजनेसंबंधी विविध घटकांची माहिती देण्यात येते. तसेच इतर शासकीय योजनांची माहिती सुद्धा करून दिली जाते. शिवाय लाभार्थींना वैयक्तिक आरोग्य, शिक्षण, सामाजिक न्याय, कायदेविषयक माहिती, प्रौढ साक्षरता, रोजगार इत्यादी संबंधी प्रबोधनपर कार्यक्रम आयोजीत केले जातात. महिलांसाठी विविध सामाजिक कार्यक्रम राबविले जातात. वस्तीतील स्थानिक साधने आणि गरजा यांचा तपशिल नोंदवुन त्याची रोजगार कार्यक्रमाशी सांगड घातली जाते त्यासाठी समाज विकास संस्थेसाठी समुह संघटकाची निवड केली जाते.

समाज विकास संस्थेअंतर्गत साधारणत: २०० कुटूंबांसाठी एक याप्रमाणे शेजार समुह समिती स्थापन केली जाते. एक समाज विकास संस्थेअंतर्गत ८ ते १० शेजार समुह समित्या कार्यरत असतात. प्रत्येक शेजार समुह समिती एकमेकांशी

संपर्क ठेवुन समाज विकास संस्थेअंतर्गत असणाऱ्या योजनेत, कार्यक्रमात एकत्रीतपणे सहकार्य करून भाग घेत असतात. समुह संघटीकांच्या मार्गदर्शनातून एकाच परिस्थितीतील व एकाच पातळीवरील आणि एकाच गल्ली किंवा मोहल्ल्यातील महिलांना विशिष्ट संख्येने एकत्र करुन स्वयंसहाय्यता गटांची निर्मिती केली जाते.

**स्वयंसहाय्यता गट –टप्पे**

सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेतंर्गत स्थापन होणाऱ्या स्वयंसहाय्यता गटांची वाटचाल पुढील तीन टप्प्यांतून होत असते.

१) **स्वयंसहाय्यता गट**

स्वयंसहाय्यता गटांची स्थापना हा पहिला टप्पा असतो. एका वस्तीत राहणाऱ्या कमीत कमी १०  ते २० महिलांचा एक गट तयार करण्यात येतो (दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील प्रत्येकी १ या प्रमाणे) हा गट अनौपचारिक असुन त्याची नोंदणी करण्याची आवश्यकता नसते. गट तयार झाला की त्याची फक्त नोंद शहरातील दारिद्रय निर्मुलन कक्षाकडे केली जाते.

स्वयंसहाय्यता गटातील महिलांना नियोजित दिवशी, नियोजित वेळी, नियोजित ठिकाणी एकत्र केले जाते. बैठकीच्या वेळी वैयक्तीक पातळीवरील समस्या, कौटूंबिक पातळीवरील समस्या, वस्ती पातळीवरील समस्या आणि योजनेची रूपरेषा या विषयांवर चर्चा केली जाते. महिन्यातून एकदा बैठक होणे अनिवार्य असते. अशा बैठकांच्या सहाय्याने सभासद महिलांची केवळ मने जुळणे, परस्परातील  हेवेदावे विसरणे, महिलांमध्ये स्वयंप्रेरणा निर्माण करणे यावरच भर दिला जातो. म्हणजे हा गट सबलीकरणाची पहिली पायरी म्हणून मानला जातो. गटांतर्गत धनव्यवहार न करता केवळ 'मनव्यवहार' केले जातात. गटातील सदस्यांची मानसिक उभारणी केली जाते या गटाचा कालावधी सहा महिने असतो.

## २) बचत व काटकसर गट

जेव्हा किमान सहा महिने पर्यंत स्वयंसहाय्यता गटातील सदस्य महिला ‘मनव्यवहार’ करतात. तेव्हा सहा महिन्यानंतर असा गट ‘धनव्यवहार’ करण्यासाठी पात्र मानला जातो. अशा गटास बचत व काटकसर गट असे म्हणतात. गटात किमान १० किंवा १० पेक्षा अधिक सदस्य असतात. त्यापैकी एक महिला सदस्याची अध्यक्ष म्हणून व एक महिला सदस्याची सचिव म्हणून निवड केली जाते. गटासाठी सर्वानुमते एक नाव दिले जाते. आणि गटाच्या नावाने बँकेत बचत खाते उघडले जाते. सभासद महिलांनी काटकसर करून प्रत्येकी किमान ५० रू, १०० रू, १५० रू, २०० रू. या प्रमाणे रक्कम एकत्र करून बँकेच्या खात्यांवर जमा केली जाते. या गटामुळे सभासद घटकास काटकसर करून नियमितपणे बचत करण्याची सवय लागते. म्हणून या अवस्थेतील गटास बचत किंवा काटकसर गट म्हटले जाते. गटाच्या बचत खात्याच्या माध्यमातून गटाची बँकेशी जोडणी होत असते.

ज्या गटाने नियमितपणे ६ ते १२ महिने काटकसर करून बचत केली. अशा गटांना प्रतिसदस्य रूपये १००० या प्रमाणे फिरता निधी शासनाकडून दिला जातो. अशा गटास अल्प पत गट म्हणुन संबोधले जाते. फिरत्या निधीचा व केलेल्या बचतीचा वापर सभासदांच्या लहान– लहान गरजा भागविण्यासाठी केला जातो. गरजा भागविण्यासाठी देण्यात येणारी रक्कम १०० रू पासुन असु शकते. देण्यात येणाऱ्या अशा सुक्ष्म कर्जावर अल्पप्रमाणात व्याज आकारण्याची मुभा असते. हा गट भांडवल उभारणीचा एक टप्पा मानला जातो.

या गटामुळे सभासद महिलांना बचतीचा भरणा करणे व कर्जासाठी खात्यातुन रक्कम काढणे या बँक क्रियांमुळे बँक व्यवहारांची माहिती होते. बचत व कर्ज देवाण– घेवाणींच्या सवयी वृद्धींगत होतात. छोटे व्यवसाय सुरू करता येतात. किरकोळ गरजा भागविता येतात.

### ३) महिला व बालके विकास गट

सभासदांच्या अर्थाजनाचा एक महत्वाचा तिसरा टप्पा म्हणुन या गटांकडे पाहिले जाते. या गटास स्वयंरोजगारी गट म्हणूनही संबोधीले जाते. ज्या स्वयंसहाय्यता गटांची वाटचाल बचतीद्वारे 'मनव्यवहार व धनव्यवहार' सापेक्ष असते. म्हणजे बचत व फिरत्या निधीचा वापर व्यवस्थीत करतात आणि त्यांच्या व्यवहाराची सक्षमता अधिक असते. अशा गटाला सामुहिकपणे व्यवसाय निवडण्याची स्थापनेच्या दीड वर्षानंतर (स्थानिक गरजांवर आधारीत) संधी दिली जाते. सर्वानुमते ज्या एका व्यवसायातुन गटाला अर्थाजन होऊ शकेल असा व्यवसाय निवडला जातो. त्यानुसार बँकेकडे अर्ज करावा लागतो. बँकेचे अधिकारी गटाची पत लक्षात घेता व व्यवसायाची गरज लक्षात घेवुन कर्ज मंजुर करीत असतात.

प्रस्तावित व्यवसायाच्या एकूण गुंतवणूकीपैकी ५ टक्के गटाचे बीज भांडवल असते. एका गटाला कमाल रूपये २५०००० पर्यंत कर्ज मिळते. त्यापैकी ५० टक्के रक्कम अनुदान स्वरूपात असते. गटाला मिळणाऱ्या नफ्यातुन कर्जाची व्याजासह फेड केली जाते. अर्थात पहिल्या दोन टप्प्यात सुरू असणारी मनव्यवहार व धनव्यवहार ही प्रक्रिया संपलेली नसते. तसेच कालांतराने गटाने एकाच व्यवसायावर अवलंबून न राहता एकापेक्षा अधिक व्यवसाय करावयाचे असतात. गटाचे व पर्यायाने सभासदांचे वैयक्तीक उत्पन्न वाढावे व त्याद्वारे दारिद्र्य रेषेच्या वर येवुन सामुहिकरित्या दारिद्र्य निमुर्लन घडवुन आणावे. आर्थिक सबलीकरण घडवुन आणणे अपेक्षित असते. संक्षिप्तपणे परांवलंबनातून परस्परावलंबन आणि शेवटी स्वावलंबन प्राप्त करण्याचा टप्पा म्हणजे स्वयंरोजगारी गट किंवा स्वयंसहाय्यता गट होय.

### अ) कार्यपध्दती

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत स्थापन होणाऱ्या गटाची व्यवहार विषयक कार्यपध्दती पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहे.

## १) नियमित बैठक

स्वयंसहाय्यता गट स्थापन होण्यापुर्वी समुह संघटीका एकाच गल्ली, मोहल्लातील महिलांना बैठकांच्या मध्यातून एकत्र करुन त्यांच्या कुटुंब व समाजातील असणाऱ्या स्थितीची जाणीव करुन देतात. स्वयंसहाय्यता गट स्थापनेनंतर गटातील सभासद महिला नियोजीत ठिकाणी व नियोजित वेळेवर एकत्र येऊन बैठकीचे आयोजन करीत असतात. दर महिन्याच्या ठराविक तारखेला किमान एक किंवा दोन बैठकांचे नियमितपणे आयोजन केले जाते. या बैठकांच्या माध्यमातून सभासद महिला एकमेकांच्या समस्यांवर चर्चा करतात, गरजेच्या आधारावर सभासद महिलांना कर्ज देण्याविषयी ठराव करतात. गटाच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांविषयी रुपरेषा ठरविली जाते. गटाच्या उद्योगातील स्थिती विषयी व भविष्यातील योजनांवर विचारविनिमय केला जातो. नियमित बैठकांच्यामुळे सभासद महिलांना स्व हक्काची जाणीव होते. महिलांना विचार स्वातंत्र्य जोपासना येते. त्यांच्या मताला वाव मिळतो.

## २) सक्तीची बचत

साधन सामुग्री, संपत्ती आणि उत्पन्न यांचा अभाव हे महिला सबलीकरणातील अडथळे असतात. स्वयंसहाय्यता गटांमुळे महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी काटकसर व बचत करण्याची सवय लागते. प्रत्येक स्वयंसहाय्यता गटातील महिला आर्थिक परिस्थिती लक्षात घेवुन सर्वानुमते दरमहा प्रति सदस्य रु. ५०, रु. १००, रु. १५०, रु. २००, रु. २५० अशा रक्कमेची बचत करण्याचा ठराव करतात. ठराव करुन निश्चित केलेल्या रक्कमेची दरमहा बचत करणे सक्तीचे केले जाते. प्रति सदस्य बचत केलेली रक्कम एकत्र करुन गटाच्या नावाने बँकेत बचत खाते उघडून जमा केली जाते. बचत रक्कम बँकेत खाते उघडून जमा करण्याच्या माध्यमातून स्वयंसहाय्यता गटांची बँकेशी जोडणी केली जात असते.

### ३) पत व्यवस्थापन

नियमितपणे गटाच्या खात्यात एकत्र जमा होणारी बचत रक्कम आणि गटातील प्रत्येक सदस्यास मिळणारा फिरता निधी या दोहोंच्या माध्यमातून एकत्र होणारा निधी बँक खात्यावर असतो. या निधीचे व्यवस्थापन गटाची अध्यक्ष किंवा गटाची सचिव किंवा अध्यक्ष आणि सचिव एकत्रितपणे सांभाळत असतात. या निधीची रक्कम ज्या सदस्य महिला नियमितपणे बचत करतात. त्यांच्या गरजा पुर्ण करण्यासाठी कर्ज स्वरुपात पुरविले जाते. कर्जासाठी अल्प प्रमाणात व्याज आकारणी केली जाते. विशिष्ट समान हप्त्यात, कर्जाची परतफेड करण्याचे बंधन असते. नियमितपणे कर्जफेड न करणाऱ्या महिलांकडून दंड वसुल केला जातो.

### ४) व्यवहार नोंदी

बँक खात्यावर जमा होणारी रक्कम आणि खात्यातुन कर्ज देण्यासाठी आणि व्यवहारासाठी लागणारी रक्कम काढण्याच्या नोंदी बँक पासबुकवर असतात. मात्र बँक पासबुकवर गटाच्या एकूण जमा व खर्चाच्या नोंदी असतात. परंतु गटाच्या आर्थिक व्यवहाराची पारदर्शकता दर्शविण्यासाठी विशिष्ट नमुन्यात असलेले व्यवहार नोंद वहीत सभासद निहाय येणे व देणे दर्शविण्यात येते. सहामाही व वार्षिक बैठकीत व्यवहार नोंदीचे वाचन केले जाते. तसेच प्रत्येक सभासदास व्यवहाराच्या नोंदी तपासून पहाता येतात. व्यवहार नोंदी ठेवण्याचे कार्य अध्यक्ष किंवा सचिव यांच्याकडून केले जाते.

### ५) समुह निधीची उभारणी

गट पातळीवरील बचत रक्कम, प्राप्त होणारा फिरता निधी, अंतर्गत कर्जावरील व्याज, दंड रक्कम इत्यादी मिळून समुह निधी तयार होतो. या निधीच्या आधारे व्यवसाय स्थापनेसाठी बँकेकडून कर्जाची प्राप्ती होते. व्यवसायाच्या माध्यमातून गटास खर्च वजा जाता नफा मिळतो. नफ्यातील

ठराविक रक्कम गटाच्या आकस्मित गरजा व दीर्घकालीन नियोजनासाठी समुह निधी म्हणुन बाजुला काढला जातो. समुहाची पर्यायाने सभासद महिलांच्या मालकीची संपत्ती निर्माण होत असते.

### ६) समुह कृती कार्यक्रम

कुटुंबाचा आणि समाजाचा महिलांकडे पहाण्याचा दृष्टीकोन सकारात्मक होण्यासाठी गटाने समाजोपयोगी कार्यक्रम राबविणे आवश्यक असते. हळदी– कुंकू, दिपावली– ईदचे सामाजिक सौदार्य वाढविणारे कार्यक्रम, स्वच्छता अभियान राबविणे, साक्षरता वर्ग चालविणे, दारु दुकान बंद करणे, पोषण– आहार, रेशन दुकान वाटपात पारदर्शकता निर्माण होण्यासाठी दबाव निर्माण करणे, महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी समिती स्थापन करणे इत्यादी सारखे समुह कृती कार्यक्रम राबविण्यात येतात.

### ७) जागृतता आणि प्रशिक्षण

जाणीव– जागृततेचा अभाव हा महिला सबलीकरणातील एक प्रमुख अडथळा असतो. स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून सभासद महिलांमध्ये 'स्व'ची जाणीव निर्माण करण्याचे कार्य केले जाते. गटाच्या नियमित बैठकांमध्ये महिलांच्या हक्कांची चर्चा केली जाते. त्यामुळे सभासद महिलांमध्ये स्वत:च्या हक्कांबाबत जागृतता निर्माण होते.

स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून उत्पन्न निर्मितीचा व्यवसाय सुरु करावयाचा असतो किंवा व्यवसाय सुरु केलेला आहे. अशा व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या व्यावसायिक प्रशिक्षणाची सोय केली जाते.

### ८) निर्णय प्रक्रियेतील सहभाग

स्वयंसहाय्यता गटातील सहभागामुळे सभासद महिलांमधील निर्णय प्रक्रियेत वाढ होण्यास यात होते. गटाच्या बैठकांमध्ये शेजार समुहाचे,

गटाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात व व्यवसायाच्या निमित्ताने ग्राहकांशी सुसंवाद साधला जातो. महिलांच्या आत्मविश्वासात वाढ होते. त्यामुळे कौटुंबिक व सामाजिक पातळीवर असणाऱ्या वेगवेगळ्या समस्या व व्यवहारांमध्ये महिलांचा सहभाग वाढीस लागतो. महिलांच्या मताचा आदर राखला जातो.

## ९) स्थानिक राजकारणात सहभाग

स्वयंसहाय्यता गट सहभागामुळे महिला सदस्यांच्या स्थानिक राजकारणातील सहभागात पोषक वातावरण निर्माण होते. समुहातील सहभागामुळे महिला सदस्यांमध्ये आत्मविश्वास वाढीस लागतो. मी काहीही करु शकते असा विश्वास बळावून महिला नगरपरिषदा, नगरपालिका व महानगरपालिकेच्या स्थानिक राजकारणात सहभागी होणेस मदत होते.

## ब) प्रशासकीय रचना

सुवर्ण जयंती योजनेची राज्यांमध्ये शीघ्रगतीने व परिणामकारक अंमलबजावणी व्हावी म्हणून केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये पुढील प्रमाणे प्रशासकीय रचना ठरविण्यात आली आहे.

### राज्यस्तर

योजनेचे संनियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नागरी विकास यंत्रणा स्थापन करण्यात आलेली आहे. यंत्रणेचे म्हणजेच राज्य सरकारचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली कामकाज चालते. या योजनेच्या सनियंत्रणाचे अधिकार तसेच सदस्य म्हणून संचालक नगर परिषद प्रशासन यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

### विभागीय स्तर

विभागीय महसुल आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली प्रादेशिक नागरी विकास यंत्रणा स्थापन करण्यात आलेली आहे. विभागातील सर्व जिल्ह्यातील कामकाजाचा आढावा घेणे हे या समितीचे प्रमुख कार्य आहे.

### जिल्हास्तर

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नागरी विकास यंत्रणा स्थापन करण्यात आलेली आहे. जिल्हा पातळीवर योजनेचे नियोजन, अंमलबजावणी व सनियंत्रणाची संपुर्ण जबाबदारी वर आहे.

- सर्व नगरपरिषदांना उद्दिष्टानुसार निधी वितरण करणे.
- योजेनचा मासिक प्रगती अहवाल पाठवणे.
- समुह संघटनांना मार्गदर्शन करणे.
- प्रत्यक्ष भेटी देणे.
- बँक प्रबंधकांना योजनेविषयी माहिती देवून त्यांच्याशी समन्वय साधणे.
- विविध विभागाच्या योजनामार्फत लाभार्थ्यांना पोहचविणे.

ही सर्व कामे करण्याकरिता जिल्हा स्तरावर जिल्हा प्रकल्प अधिकारी यांची नेमणूक केलेली आहे.

### शहरपातळी/ नगरपरिषद पातळी

नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शहरामध्ये दारिद्र्य निर्मुलन कक्ष स्थापन करण्यात आलेले आहे. प्रकल्प अधिकारी हे या कक्षचे सचिव असतात. या कक्षाची सर्व कामकाज पाहण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी यांची असते. शहर पातळीवरील दारिद्र्य निर्मुलन कक्षाची प्रमुख जबाबदारी–

- शहर पातळीवर योजनेची यशस्वी अंमलबजावणी करणे.

- दारिद्र्य निर्मूलनाचा शहराचा वार्षिक कृती आराखडा तयार करणे.
- सामाजिक संरचना निर्माण करणेसाठी समुह संघटकांचे कार्यक्षेत्र निश्चित करणे, त्यांना मार्गदर्शन करुन व कामावर नियंत्रण ठेवून योजनेच्या प्रगतीचा आढावा घेणे.
- सर्व / शेजार समुह समिती, बँक स्थानिक नागरी संस्था यात समन्वय घडवून आणणे.
- सर्व लाभार्थींचे प्रस्ताव छाननी करुन बँकांना पाठवणे व त्यांचा पाठपुरावा इत्यादी.

## संदर्भ

[1] PDF-SHF-Maharashtra, Adobe Acrobat Document. Chapter - 2, P. No. 9-11.
[2] Sahay, 1998, "Women and Empowerment Approaches and Strategies", New Delhi, Discovery Publishing House, P. No. 23-24.
[3] Diwase, 2002, "Empowerment of Women in the Handicraft Sector", A study on participatory approach, Ph. D. Thesis submitted to Pune University, P. No. 40-42
[4] Ibid 2, P. No. 25.
[5] Ibid 2, P. No. 22.
[6] अर्थवेध, २००६, मराठी अर्थशास्त्र परिषद, ३० वे राष्ट्रीय अधिवेशन, पृ. क्र. १०४.
[7] पुर्वोक्त ६, पृ. क्र. १०४
[8] पुर्वोक्त ६, पृ. क्र. १०४
[9] मुलाणी, एम. यू., २००६, ''महिला स्वयंसहाय्यता गट, पुणे'', डायमंड पब्लिकेशन्स, पृ. क्र. ५८.
[10] Ibid 2, P. No. 9.
[11] Ibid 2, P. No. 22.
[12] Ibid 2, P. No. 22.
[13] Ibid 3, P. No. 42.
[14] Ibid 2, P. No. 64-66.
[15] IBid 3, P. No. 5-6.
[16] Ibid 3, P. No. 13.
[17] गुप्ता, कमलेशकुमार, २००५, ''सामाजिक व्यवस्था मे महिलाओंकी स्थिती'', जयपुर बुक एनक्लेव्ह, पृ. क्र. ३.
[18] Sharma Arpita, "Women Empowerment : Milestone and Challenges", Kurukshetra, Vol. 59, Issue-11, Sept. 2011, P. No. 11-12.
[19] Ganeshmurthy, 2007 "Women Empowerment through SHG", India : Economic Development and Empowerment of Womens, New Delhi, New Century Publication, P. No. 36-38.
[20] पुर्वोक्त १७, पृ. क्र. १०.
[21] पुर्वोक्त १७, पृ. क्र. १०.
[22] अर्थसंवाद, एप्रिल-जून २००३, ''स्त्रियांचा रोजगारातील वाटा'', पृ. क्र. ८५.
[23] PDF, Women-and-Empowerment Adobe Acrobat Document, P. No. 1.
[24] Ibid 19, P. No. 55.
[25] पुर्वोक्त १७, पृ. क्र. १६.
[26] स्टडी सर्कल, पृ. क्र. ५६.
[27] Ibid 2, P. No. 55
[28] http://www.globalenvision.org. "Getting to the Bottom of" Bottom-up approaches.
[29] http://www.Trickle-downeconomics-wikipedia, the encyclopedia.
[30] http://www.Trickle-up effect-wikipedia, the encyclopedia.
[31] साप्ताहिक सकाळ, पुर्वोक्त, पृ. क्र. १५.
[32] पुर्वोक्त ६, पृ. क्र. ११८.
[33] योजना, डिसेंबर २००७, ''सुक्ष्म पतपुरवठा - गरिबांची जीवनरेषा'', पृ. क्र. ३१.
[34] पुर्वोक्त ३२, पृ. क्र. ३२.
[35] Journal of Commerce and Management, April 2008, P. No. 170.
[36] पुर्वोक्त ३२, ''माणसाला पत द्या'', पृ. क्र. २.
[37] www.dhanax.com. Journal - 200, P. No. 170.
[38] Commerce and Management through Vol. 1, Jan. 2010, P. No. 40-46.
[39] Commerce and Management through Vol. 1, Jan. 2010, P. No. 40-46 and Pdf. Adobe Reader; Ghodoliya M. K., P. No. 5.
[40] http://www.urbanview.com and http://indiamicrofinance.com/x/m/
[41] संवाद पत्रिका, जुन २००७, ''स्वयंसहाय्यता गटांसंदर्भात शैक्षणिक वाटचाल'', मुक्त विद्यापीठ, नाशिक, पृ. क्र. २६.

[42] मुलाणी, एम. यू., २००६, ''महिला स्वयंसहाय्यता बचत गट'', डायमंड पब्लिकेशन, पुणे, पृ. क्र. १९.

[43] महिला आर्थिक विकास महामंडळ, २००३, ''स्वयंसहाय्यता बचत गट प्रशिक्षण कृती आराखडा'', पृ. क्र. १९.

[44] साप्ताहिक सकाळ, डिसेंबर २००७, ''... आणि लाखो गरीब बायका ...'', पृ. क्र. १४.

[45] पुर्वोक्त ४०, पृ. क्र. १९.

[46] पुर्वोक्त ६, २००६, ''भारतातील स्वयंसहाय्यता गट'', मराठी अर्थशास्त्र परिषद - ३० वे राष्ट्रीय अधिवेशन, पृ. क्र. १०४.

[47] पुर्वोक्त ४४, पृ. क्र. १०६.

[48] Ibid 19, P. No. 18.

[49] NABARD Report, Under the SHG - Bank Linkage PRogramme and to Micro Finance Institutions (MFI's) during 2005-06, P. No. 8-9.

[50] Trickle -up effect -wikipedia, the free encyclopedia.

[51] पुर्वोक्त ६, पृ. क्र. १०५.

[52] सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना रूपरेषा व माहिती, मार्गदर्शक पुस्तिका, महाराष्ट्र राज्य नागरी विकास यंत्रणा, महाराष्ट्र शासन, पृ. क्र. ३.

## प्रकरण ६

# नाशिक जिल्ह्यातील शहरी महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणाचे तुलनात्मक अध्ययन

## ६.१ प्रस्तावना

कोणत्याही समाज व्यवस्थेत आर्थिक दृष्टिकोनतून आहे रे आणि नाही रे असे दोन वर्ग कमी अधिक प्रमाणात असल्याचे आढळून येते. त्यामुळे समाजातील ठराविक वर्गाकडे उत्पादनाचे स्त्रोत, उत्पन्न व संपत्तीचे केंद्रीकरण होऊन सर्व गोष्टींची उपलब्धता असते तर समाजतील बहुसंख्येने असणारे वर्गाकडे उत्पादनाचे स्त्रोत, उत्पन्न व संपत्तीची कमतरता असते किंवा नसते त्यामुळे जीवनावश्यक गरजांची पुर्तता सुद्धा होत नाही. असा वर्ग दारिद्र्याच्या दृष्टचक्रात अडकून पडतो. दारिद्र्याची तीव्रता महिलांच्या बाबतीत अधिक असते. या दुर्बल वर्गाच्या सबलीकरणासाठी विविध योजना व चळवळी फोफावत आहे.


दुर्बल व्यक्ती अथवा महिला या घटकांना स्थायी स्वरूपात शाश्वत आर्थिक स्त्रोत उपलब्ध झाल्यास त्यांचे सबलीकरण होऊ शकते. त्या विचार प्रणालीतून गेल्या दहा ते पंधरा वर्षात स्वयंसहाय्यता बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे विविध स्थरावर सबलीकरण घडून आणण्याचे प्रयत्न होत आहेत. त्यासाठी विविध माध्यमातून स्थापन करण्यात आलेल्या सर्व स्वयंसहाय्यता गटांद्वारे समान सबलीकरण घडून येण्याची खात्री नसते. कारण प्रत्येक स्वयंसहाय्यता गटाची आर्थिक व सामाजिक परिस्थिती वेगवेगळी असते या दृष्टिकोनातून नाशिक जिल्ह्यातील शहरी महिला स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक आणि सामाजिक सबलीकरण कितपत घडून येत आहे. महिला सबलीकरणाबाबत नाशिक व मालेगाव शहरातील स्थिती आणि सबलीकरणावर प्रभाव पाडणाऱ्या घटकांचे अध्ययन प्रस्तूत प्रकरणात मांडण्यात आलेले आहे.

## ६.२ नाशिक व मालेगाव शहरातील महिला स्वयंसहाय्यता गट संख्यात्मक प्रगतीचा तुलनात्मक आढावा

पंचवार्षिक योजनेच्या काळात सुरुवातीला ग्रामीण भागातील दारिद्र्य निवारण कार्यक्रम आखून त्यांची अंमलबजावणी करण्यात आली. मात्र नागरीकरणाच्या वाढत्या प्रमाणानुसार नागरी भागातील दारिद्र्य वाढत असल्याचे मान्य करण्यात आले. दारिद्र्य हे निसर्गत दीर्घकालीन आहे. त्यामुळे विकासाच्या नेहमीच्या प्रवाहातून त्याचे निवारण होणार नाही म्हणून नागरी दारिद्र्य निवारण्यासाठी सातव्या पंचवार्षिक योजनेत निश्चयी प्रयत्न करण्यास सुरुवात झाली. त्याअंतर्गत अनेक योजना राबविण्यास सुरुवात झाली. मात्र राष्ट्रीय नागरीकरण आयोगानुसार हे कार्यक्रम अपेक्षित बदल वा सुधारणा प्राप्त करु शकले नाहीत. ७४ व्या घटना दुरुस्ती मधील १२ व्या कलमानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थातील कार्यक्रमात दारिद्र्य निवारण्याचा अंतर्भाव करुन धोरणात्मक चौकटीची निकड निर्माण झाली म्हणून नवव्या योजनेच्या काळात सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना सुरु करण्यात आली. या योजनेच्या अंतर्गत महिला स्वयंसहाय्यता गटांची नाशिक व मालेगाव शहरात स्थापना करण्यात येत आहे.

नाशिक व मालेगाव शहरातील महिला स्वयंसहाय्यता गटांची संख्यात्मक वाढ आलेख क्र. ५ मध्ये दर्शविलेली आहे.

**आलेख ५ : नाशिक आणि मालेगाव शहर स्वयंसहाय्यता गट – प्रगती**




वरील आलेखावरुन

१) नाशिक शहरात स्वयंसहाय्यता गटांच्या स्थापनेस २०००–०१ पासून सुरुवात झाली तर मालेगाव शहरात २००१–०२ पासुन सुरुवात झाली.

२) नाशिक शहरात स्वयंसहाय्यता गटाच्या वाढीस २००१–०२ पासून सुरुवात झाली तर मालेगाव शहरात २००४–०५ पासून चालना मिळाली. म्हणजे नाशिक शहरापेक्षा मालेगाव शहरात गटांच्या स्थापनेस उशीरा चालना मिळाली.

३) नाशिक आणि मालेगाव या दोन्ही शहरात स्वयंसहाय्यता गटाची संख्यात्मक प्रगती २००७–०८ चा पासून अधिक असून प्रगतीचा आलेख चढत्या स्वरुपात आहे.

४) नाशिक शहरातील एकूण १०२५ स्वयंसहाय्यता गटात २००७–०८ नंतर स्थापन झालेल्या (२००९–१० पर्यंत) गटांचे प्रमाण ५४.३४ टक्के

आहे. तर मालेगाव शहरात एकूण ४७९ गटांना हे प्रमाण ७०.९८ टक्के इतके अधिक आहे.

५) नाशिक शहरात स्वयंसहाय्यता गटांच्या स्थापनेत अधिक चढउतार दिसून येतात. मालेगाव शहरात २००६–०७ चा अपवाद वगळता गट स्थापनेचा आलेख सतत संथ परंतु वाढता असल्याचे दिसून येते.

६) नाशिक शहरातील गटांचे आर्युमान अधिक असून मालेगाव शहरातील गटांचे आर्युमान तुलनेने कमी आहे.

७) नाशिक शहरात ३८७३८ दारिद्र्य रेषेखालील कुटूंबापैकी ११४४८ कुटूंबातील महिलांना स्वयंसहाय्यता गट–बँक जोडणीच्या प्रक्रियेत १०२५ गटांच्या माध्यमातून सामावून घेण्यात आलेले आहे. एकूण दारिद्र्य रेषेखालील कुटूंबापैकी साधारणत: ३० टक्के पर्यंत वाढलेले आहे. तर मालेगाव शहरात ३५८५२ कुटूंबापैकी ५२६६ कुटूंबाना सामावुन घेण्यात आलेले आहे. एकूण दारिद्र्य रेषेखालील कुटूंबापैकी साधारणत: १५ टक्के कुटूंबांना बँक व्यवहाराच्या कक्षेत आणता आलेले आहे.

## ६.३ नाशिक जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता गटांची माहिती

नाशिक जिल्ह्याच्या नाशिक व मालेगाव शहरातील महिला स्वयंसहाय्यता गटांपैकी ज्या २२६ गटांची नमूना म्हणून निवड करण्यात आलेली आहे. त्या गटांविषयी आणि गटांच्या अध्यक्षा विषयी सर्वेक्षणावरून मिळालेली माहिती पाहणे आवश्यक ठरते.

### ६.३.१ महिला स्वयंसहाय्यता गटांचे सामाजिक वर्गीकरण

भारत हा विविध धर्म, जाती, पोटजाती, पंथ इ. नी नटलेला देश आहे. त्यामुळे सामाजिक रचना ही धर्मावर आधारित असलेली आढळून येते. नाशिक जिल्ह्यात हिंदु, मुस्लीम, ख्रिश्चन व मिश्र समाजाच्या महिलांचे स्वयंसहाय्यता गट

स्थापन झालेले आहे. त्यांचे सामाजिक वर्गीकरण पुढील सारणीत दर्शविल्याप्रमाणे आहे.

**सारणी २६ : स्वयंसहाय्यता गटांचे सामाजिक वर्गीकरण**

| समाज प्रकार | एकूण गट | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १. हिंदु | १०९ | ४८.२३ | १०१ | ६५.५९ | ८ | ११.११ |
| २. मुस्लीम | ७० | ३०.९७ | १८ | ११.६८ | ५२ | ७२.२२ |
| ३. बौध्द | २८ | १२.३९ | २१ | १३.६३ | ७ | ९.७२ |
| ४. ख्रिश्चन | ४ | १.७७ | ३ | १.९५ | १ | १.३९ |
| ५. मिश्र | १५ | ६.६४ | ११ | ७.१५ | ४ | ५.५६ |
| **एकूण** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

१) नाशिक जिल्ह्यात हिंदु ची संख्या अधिक असल्यामुळे शहरी भागात सुद्धा हिंदू महिलांचे स्वयंसहाय्यता गटांचे प्रमाण सुद्धा एकूण गटात ४८.२३ टक्के इतके अधिक आहेत. हिंदू सभासद महिलांमध्ये हिंदू -मराठा, कुणबी, माळी, सुतार, चांभार, हरिजन, भिल्ल आदि जातींच्या महिलांचा समावेश अधिक आहे.

२) नाशिक जिल्ह्यातील मालेगाव शहरात मुस्लीम समाजाच्या लोकांचे प्रमाण अधिक असल्यामुळे एकूण गटांमध्ये मुस्लीम महिलांच्या गटांचे प्रमाण ३०.९७ टक्के इतके आहे.

३) नाशिक जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित समाजासाठी लढा उभा करून धर्मांतराची ऐतिहासिक घोषणा केली. त्यामुळे बौध्द अनुयायांचे प्रमाण तिसऱ्या क्रमांकाचे आहे. नाशिक शहरातील प्रमाण १३.६३ टक्के इतके आहे.

४) नाशिक जिल्ह्यात ख्रिश्चन हा समाज अत्यंत अल्पसंख्य आहे. त्यामुळे ख्रिश्चन महिलांचे गट फक्त १.७७ टक्के इतके आहे.

५) हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख इ. समाजाच्या महिलांनी एकत्र येऊन ६.६४ टक्के गट स्थापन करण्यात आलेले आहे.

६) नाशिक आणि मालेगाव शहरातील महिला गटांची तुलनात्मक स्थिती विचारात घेतली असता. नाशिक शहरात फक्त हिंदू महिलांचे ६५.३२ टक्के गट असुन मालेगाव शहरात फक्त मुस्लीम महिलांचे ७२.२२ टक्के गट स्थापन झालेले आहेत. नाशिक शहरातील हिंदू व मालेगाव शहरातील मुस्लीम समाजाच्या महिलांचे रितीरिवाज, विचारसरणी, भिन्न असल्यामुळे नाशिक व मालेगाव शहराची तुलना करतांना आपोआप हिंदू व मुस्लीम महिलांच्या सबलीकरणाची तुलना करता येणे शक्य आहे.

### ६.३.२ गटांचे आर्युमान

स्वयंसहाय्यता गट स्थापनेनंतर गटाचे आर्युमान वाढत जाते. तसेच गटातील मन व्यवहार व धन व्यवहार यामध्ये वाढ होऊन महिला सबलीकरणावर वाढता प्रभाव पडत असतो.

**सारणी २७ : गटाचे आर्युमान (मार्च २०१० अखेर)**

| गटाचे आयुर्मान (वर्ष) | एकूण सदस्य | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १) एक ते दोन | ७३ | ३२.३० | ५५ | ३५.७१ | १८ | २५.०० |
| २) तीन ते चार | ७९ | ३४.९५ | ४९ | ३१.८२ | ३० | ४१.६६ |
| ३) पाच ते सहा | ५३ | २३.४५ | ३० | १९.४८ | २३ | ३१.९५ |
| ४) सात ते आठ | १६ | ७.०९ | १५ | ९.७४ | १ | १.३९ |
| ५) नऊ ते दहा | ५ | २.२१ | ५ | ३.२५ | - | - |
| **एकूण** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

नाशिक जिल्ह्यातील शहरी स्वयंसहाय्यता गटांच्या स्थापनेस प्रामुख्याने २०००–२००१ नंतर खऱ्या अर्थाने चालना मिळाली. त्यामुळे जिल्ह्यातील गटांचे आर्युमान कमाल १० वर्ष आहे. असे असले तरी गटाच्या आर्युमानाचे वर्गीकरण करता येते.

१) अध्ययनासाठी निवडण्यात आलेल्या ९०.७० टक्के गटांचे आर्युमान सहा वर्षाच्या आत आहे.

२) एकूण गटात ९.३० टक्के गटाचे आर्युमान हे ७ ते १० वर्षाच्या दरम्यानचे आहे. प्रामुख्याने नाशिक शहरातील गटांचे प्रमाण अधिक आहे.

३) तीन ते सहा वर्ष आर्युमान असलेल्या गटांचे प्रमाण ५८.४० टक्के इतके आहे. नाशिक शहरात या कालावधीत ५१.३० टक्के व मालेगाव शहरात ७३.६१ टक्के गट स्थापन झालेले आहेत.

४) नाशिक शहरात १ ते ६ वर्ष आर्युमान असणाऱ्या गटांचे ८७.०१ टक्के आहे. तर मालेगाव शहरात हे प्रमाण ९८.६१ टक्के इतके आहे. म्हणजे मालेगाव शहरापेक्षा नाशिक शहरातील गटांचे आर्युमान अधिक आहे. कारण ६ वर्षापेक्षा आर्युमान अधिक असणाऱ्या गटांचे प्रमाण १२.९९ टक्के आहे. मालेगाव शहरात हे प्रमाण फक्त १.३९ टक्के इतकेच आहे. मालेगाव शहरात गटांचे आर्युमान १ ते ६ वर्ष व नाशिक शहरात आर्युमान १ ते १० वर्ष इतके आहे.

### ६.३.३ गटातील सभासद संख्या

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत स्थापन होणाऱ्या स्वयंसहाय्यता गटासाठी किमान सभासद मर्यादा १० बंधनकारक केलेली आहे. १० किंवा १० पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येऊन गटाची स्थापना करु शकतात. नाशिक जिल्ह्यातील शहरी गटामध्ये सहभागी झालेल्या सभासदांच्या संख्येनुसार वर्गीकरण....

**सारणी २८ : महिला सभासद संख्येनुसार गटांचे वर्गीकरण**

| सभासद संख्या | एकूण | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १) ० ते १० | १०८ | ४७.७९ | ६९ | ४४.८१ | ३९ | ५४.१७ |
| २) ११ ते १३ | ९१ | ४०.२७ | ६६ | ४२.८६ | २५ | ३४.७२ |
| ३) १४ ते १६ | २४ | १०.६२ | १८ | ११.६९ | ६ | ८.३३ |
| ४) १७ ते २० | ३ | १.३२ | १ | ०.६४ | २ | २.७८ |
| **एकूण** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

स्वयंसहाय्यता गटात सहभागी झालेल्या महिला सदस्यांच्या संख्येवरुन गटांचे वरील चार प्रकारे वर्गीकरण सारणी क्रमांक.. २८ मध्ये दर्शविलेली आहे.

१) एकूण गटांपैकी ज्या गटांमध्ये १० महिला सदस्यांच्या लहान गटांचे प्रमाण ४७.७९ टक्के इतके असून मालेगाव शहरातील गटांचे प्रमाण नाशिक शहरापेक्षा अधिक आहे.

२) एकूण गटांमध्ये ११ ते १३ महिला सदस्य असणाऱ्या मध्यम आकाराच्या गटांचे प्रमाण ४०.२७ टक्के इतके असून नाशिक शहरातील गटांचे प्रमाण मालेगाव शहरापेक्षा अधिक आहे.

३) एकूण गटांमध्ये १४ ते १६ आणि १७ ते २० चा मोठ्या आकाराच्या गटांचे प्रमाण एकत्रित ११.९४ टक्के इतके असून नाशिक व मालेगाव शहरात या प्रकारच्या गटांचे प्रमाण साधारणत: सारखे आहे.

### ६.३.४ स्वयंसहाय्यता गट अध्यक्ष - शैक्षणिक पात्रता

शिक्षण हा व्यक्तीच्या सबलीकरणावर प्रभाव पाडणारा अत्यंत प्रभावी घटक असतो. गटांच्या अध्यक्षांकडून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे अनुसूची भरून घेण्यात आली. अशा पद्धतीने २२६ सभासदांचे सर्वेक्षण करून शैक्षणिक पात्रतेविषयीची आढळुन आलेली स्थिती पुढील सारणीत दर्शविलेली आहे.

**सारणी २९ :स्वयंसहाय्यता गट अध्यक्षांची शैक्षणिक पात्रता**

| शैक्षणिक पात्रता | एकूण | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १) निरक्षर | ३९ | १७.२६ | २९ | १८.८३ | १० | १३.८९ |
| २) प्राथमिक | ८४ | ३७.१७ | ६० | ३८.९६ | २४ | ३३.३३ |
| ३) माध्यमिक | ८४ | ३७.१७ | ५२ | ३३.७६ | ३२ | ४४.४४ |
| ४) उच्च माध्यमिक | १५ | ६.६४ | ११ | ७.१५ | ४ | ५.५६ |
| ५) पदवी | ३ | १.३२ | १ | ०.६५ | २ | २.७८ |
| ६) पदव्युत्तर | १ | ०.४४ | १ | ०.६५ | - | - |
| **एकूण** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

१) अध्ययनासाठी निवड करण्यात आलेल्या एकूण अध्यक्षांपैकी १७.२६ टक्के अध्यक्षा ह्या निरक्षर आहेत. त्यामुळे अध्यक्षांच्या वतीने इतर सभासद व्यवहार पहात असतात. प्रामुख्याने वयाने अधिक असणाऱ्या अध्यक्षा ह्या नामधारी अध्यक्ष असतात.

२) लिहिणे व वाचणे या माध्यमातून अक्षराची ओळख करुन घेतलेल्या म्हणजे प्राथमिक शिक्षण घेतलेल्या अध्यक्षांचे प्रमाण ३७.१७ टक्के इतके आहे.

३) एकूण सदस्यांमध्ये माध्यमिक (पाचवी ते दहावी इयत्ता) शिक्षणासाठी माध्यमिक शाळेचा उंबरठा चढलेल्या सदस्यांचे प्रमाण ३७.१७ टक्के इतके आहे.

४) प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतलेल्या अध्यक्षांचे एकूण प्रमाण ७४.३४ टक्के इतके आहे म्हणजे साधारण ७४ टक्के महिला ह्या प्राथमिक व माध्यमिक शैक्षणिक पात्रता धारक आहेत.

५) उच्च माध्यमिक पदवी आणि पदवीधर शिक्षण घेतलेल्या अध्यक्षांचे प्रमाण अनुक्रमे ६.६३ + १.३२ + ०.४४ टक्के – ०८.३९ टक्के इतके आहे.

६) नाशिक आणि मालेगाव शहरातील स्वयंसहयता गट अध्यक्षांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत भिन्नता आहे. नाशिक शहरातील गटांच्या बाबत ३८.९६ टक्के अध्यक्षा प्राथमिक शिक्षण घेतलेल्या आहेत. तर ३३.७६ टक्के अध्यक्षा ह्या माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आहेत. मात्र मालेगाव शहरात माध्यमिक शिक्षण घेतलेल्या अध्यक्षांचे प्रमाण ४४.४४ टक्के इतके अधिक आहे.

७) मालेगाव शहरातील गटांच्या अध्यक्षांची शैक्षणिक पात्रता नाशिक शहरातील गटांच्या अध्यक्षांपेक्षा अधिक आहे. कारण मालेगाव शहरात माध्यमिक शिक्षण घेतलेल्या अध्यक्ष प्रमाण नाशिकपेक्षा १०.६८ टक्केने अधिक आहे.

८) मालेगाव शहरात दारिद्र्य रेषेखालील कुटूंबात प्रामुख्याने मुस्लीम कुटूंबात अर्थाजानासाठी मुलांना शाळेऐवजी कामावर पाठविले जाते. मात्र मुलींना घराबाहेर कामाला पाठविले न जाता शाळेत पाठविले जाते. त्यामुळे माध्यमिक पर्यंत शिक्षणाचे प्रमाण अधिक आहे.

### ६.३.५ सभासदांचे (अध्यक्षा) आर्युमान

कोणत्याही कार्यात व्यक्तीची कार्यक्षमता व गतिमानता ही साधारणत: त्याच्या आर्युमानावर अवलंबून असते. स्वयंसहाय्यता गट चळवळीत सहभागी होणाऱ्या सभासद महिलांच्या आर्युमानावर गटाची आर्थिक व सामाजिक प्रगती आधारित असते. या दृष्टीने नाशिक जिल्ह्यातील शहरी स्वयंसहाय्यता गट सभासदांचे सरासरी आर्युमान दर्शविणारी स्थिती.

**सारणी ३० : सभासद महिलांचे सरासरी आर्युमान**

| सरासरी वय वर्ष | एकूण | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १) १८ ते ४५ | १८२ | ८०.५३ | १२१ | ७८.५७ | ६१ | ८४.७२ |
| २) ४६ ते ६० | ३३ | १४.६० | २५ | १६.२३ | ८ | ११.११ |
| ३) ६० पेक्षा अधिक | ११ | ४.८७ | ८ | ५.२० | ३ | ४.१७ |
| **एकूण** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्र. ३० नुसार

१) कोणत्याही व्यक्तीच्या आयुष्यात १८ ते ४५ वर्ष हा उमेदीचा व उत्कर्षासाठी सहाय्यक असा काळ असतो असे मानले तर नाशिक जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता गट चळवळीच्या बाबत एक चांगला संकेत आहे की, एकूण गटांपैकी ८०.५३ टक्के गटाचा कारभार सांभाळणाऱ्या अध्यक्षा ह्या १८ ते ४५ वर्ष या वयोगटातील आहे. म्हणजे एकूण सभासदांपैकी साधारणत: ४/५ सभासद ह्या तरुण पिढीच्या प्रतिनिधीत्व करणाऱ्या आहेत.

२) एकूण सभासद महिलांमध्ये १४.६० टक्के अध्यक्षा ह्या ४६ ते ६० या प्रौढ वयोगटातील आहेत.

३) तर एकूण सभासदांहपैकी ४.८७ टक्के अध्यक्षा ह्या ६० पेक्षा अधिक वयोगटातील आहे. मात्र आर्युमान अधिक असूनही जेष्ठतेच्या नात्याने गटांचा कारभार सांभाळत आहेत. नाशिक शहरात वयानुसार जेष्ठता अधिक प्रमाणात जोपासली जाते.

४) नाशिक व मालेगाव शहरातील गट अध्यक्षांच्या आर्युमानाची तुलनात्मक स्थिती लक्षात घेता  नाशिक शहरापेक्षा मालेगाव शहरातील गटांच्या अध्यक्षा ह्या अधिक संख्येने तरुण आहेत. कारण नाशिक शहरात ७८.५७ टक्के तर मालेगाव शहरात ८४.७२ टक्के अध्यक्षा ह्या १८ ते ४५ वयोगटातील आहेत. नाशिक शहरापेक्षा मालेगाव शहराचे प्रमाण ६.१५ टक्केने अधिक आहे. मालेगाव शहरात कुटूंबाचा आकार मोठा असल्यामुळे जेष्ठ महिला घराचा कारभार सांभाळत असतात.

### ६.३.६ सभासद महिलांच्या कुटुंबांचे आकारमान

भारतात कुटुंब संस्था ही समाज व्यवस्थेचे एक अविभाज्य अंग आहे. कुटुंबात असणाऱ्या सदस्य संख्येवरुन कुटुंबाची आर्थिक स्थिती निश्चीत होत असते. साधारणत: अधिक संख्या असणाऱ्या कुटुंबात गरजा भागविण्याबाबत उत्पन्न अपुरे  ठरत असते. गरजांची पुर्तता होत नाही. म्हणून कुटुंबातील व्यक्तींची संख्या कमी असावी असे मानले जाते. या दृष्टीने नाशिक जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता गटात सहभागी झालेल्या महिला ज्या कुटुंबातून आहेत त्या कुटूंबातील व्यक्तीची संख्या किती आहे. या बाबतीत अध्ययन उपयुक्त ठरणारे आहे.

**सारणी ३१ : कुटुंबातील व्यक्तींची संख्या**

| प्रति कुटुंब व्यक्ती संख्या | एकूण सदस्य | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १) १ ते ४ | ४१ | १८.१४ | ३० | १९.४८ | ११ | १५.२८ |
| २) ५ ते ८ | १३७ | ६०.६२ | १०५ | ६८.१८ | ३२ | ४४.४४ |
| ३) ९ ते ११ | ३५ | १५.४९ | १७ | ११.०४ | १८ | २५.०० |
| ४) ११ पेक्षा अधिक | १३ | ५.७५ | २ | १.३० | ११ | १५.२८ |
| **एकूण** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्त्रोत :** अनुसूची - २०  फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

अध्ययनासाठी निवडलेल्या २२६ सदस्यांच्या कुटुंबातील सदस्यांची संख्यात्मक स्थिती वरुन काढलेले निष्कर्ष

१) एकूण स्वयंसहाय्यता गटांपैकी फक्त १८.१४ टक्के गटाच्या अध्यक्षांच्या कुटुंबाचा आकार 'हम दो– हमारे दो' मुळे लहान कुटुंब– सुखी कुटुंब या संकल्पनेत बसणारा आहे.

२) एकूण कुटुंबांपैकी ६०.६२ टक्के कुटुंबाचा आकार ५ ते ८ सदस्य म्हणजे मध्यम स्वरुपाचा आहे. मध्यम आकाराच्या कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

३) एकूण सदस्यांमध्ये १५.४९ टक्के सदस्यांच्या कुटुंबाचा आकार हा मोठा तर ५.७५ टक्के कुटुंबाचा आकार अत्यंत मोठा असल्याचे आढळून येते.

४) नाशिक व मालेगाव शहरातील कुटुंबाचा तुलनात्मक आकार लक्षात घेता नाशिक शहरात ८७.६६ कुटुंबाचा आकार लहान ते मध्यम स्वरुपाचा आहे. कारण हिंदू समाजाच्या महिलांचे प्रमाण अधिक आहे. हिंदू व ख्रिश्चन समाजामध्ये विभक्त कुटुंब पध्दतीचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले. उलट मालेगाव शहरात ८५.७२ टक्के सदस्य कुटुंबाचा आकार हा मध्यम ते मोठ्या स्वरुपाचा आहे. कारण मालेगाव शहरात मुस्लीम समाजाच्या महिलांचे प्रमाण अधिक आहे.या समाजामध्ये संयुक्त कुटुंब पध्दतीचे प्रमाण अधिक आहे.

५) नाशिक व मालेगाव शहरातील हिंदु कुटुंबामध्ये दारिद्र्य निर्मुलन कुटुंबातील अधिक सदस्यांचे सहाय्य होईल. या समजुतीतून मोठे कुटूंब अस्तित्वात आहेत. तर मुस्लीम समाज बहुपत्नीत्वास प्राधान्य व कुटुंब नियोजनाबाबत दुर्लक्ष यामुळे कुटुंबाचा आकार मोठा असल्याचे आढळून आले.

### ६.३.७ सभासदांचे (अध्यक्ष) उत्पन्न साधन

मानवी जीवनात असंख्य गरजा असतात. अशा गरजा भागविण्यासाठी मिळणारे उत्पन्न मर्यादीत असते आणि अनेक मार्गांनी किंवा साधनांच्या

माध्यमातून उत्पन्न मिळत असते. या दृष्टीने नाशिक जिल्ह्यातील शहरी स्वयंसहाय्यता गटांच्या सभासदांना मिळणाऱ्या उत्पन्नाची साधने कोणती याबाबत आढळून आर्थिक स्थिती पुढील सारणीत मांडलेली आहे.

**सारणी ३२ : सभासदांची उत्पन्न साधने**

| उत्पन्न साधने | एकूण | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १) शेती | १० | ४.४२ | ९ | ५.८४ | १ | १.३९ |
| २) स्वयंरोजगार | १६३ | ७२.१३ | १११ | ७२.०८ | ५२ | ७२.२२ |
| ३) नोकरी | १२ | ५.३१ | ८ | ५.२० | ४ | ५.५६ |
| ४) मजुरी | २९ | १२.८३ | १६ | १०.३९ | १३ | १८.०५ |
| ५) इतर | १२ | ५.३१ | १० | ६.४९ | २ | २.७८ |
| **एकूण** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्र.३२ मध्ये दर्शविल्यानुसार

१) स्वयंसहाय्यता गटात सहभागी झालेल्या एकूण महिला सदस्यांमध्ये ४.४२ टक्के सदस्य ह्या गटाच्या मुख्य व्यवसायापासून मिळणाऱ्या उत्पन्नाबरोबर शेती व्यवसायापासून सुद्धा मिळवित आहेत. प्रामुख्याने नाशिक शहरातील गटाच्या महिला शेतीपासून उत्पन्न मिळवित आहेत.

२) स्वयंरोजगार हे उत्पन्न मिळविण्याचे प्रमुख साधन आहे. कारण एकूण सदस्यांमध्ये ७१.१३ टक्के सदस्य ह्या गटाचा व्यवसाय सांभाळून आहेत. (नाशिक शहरापेक्षा मालेगाव शहरातील महिला अधिक संख्येने स्वयंरोजगार करीत आहेत. भंगार गोळा करणे, कागद रद्दी गोळा करणे, भाजीपाला फळे, खजूर विक्री, चहा, नाश्ता स्टॉल, शैक्षणिक साहित्य विक्री इ. सारखे लहान– लहान वैयक्तीक व्यवसाय करुन उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न होत आहे.

३) एकूण सभासदात ५.३१ टक्के सभासद महिला दवाखान्यात परिचारिका, कारखान्यात, कंपनीत कामगार, महानगरपालिकेत सफाई (कंत्राटी)

कामगार म्हणून नोकरी करुन उत्पन्न मिळवित आहेत. नशिक व मालेगाव शहरात प्रमाण सारखेच आहे.

४) गटांचा स्वयंव्यवसाय सांभाळून मजुरी करुन १२.८३ टक्के महिला उत्पन्न मिळवित आहे. स्वयंसहाय्यता गटात सहभागी होण्यामुळे स्वयं व्यवसायानंतर मजुरी हा उत्पन्नाचा प्रमुख मार्ग बनलेला आहे. धुणी– भांडी, साफ–सफाई, प्लॉस्टिक व पाईप कारखाने, यंत्रमाग व्यवसाय, शेती, बांधकाम इ. सारख्या असंघटीत क्षेत्रात कमी मजुरीवर काम करीत आहेत. नाशिक व मालेगाव शहरात हे प्रमाण साधारणत: समान आहे.

५) कागद, प्लास्टिक वेचणे, डिलेव्हरी प्रसंगी 'दाई' म्हणून काम सारखे अनिश्चितता असलेले काम करुन ५.३१ टक्के महिला उत्पन्न मिळवित आहेत. नाशिक शहरात या मार्गाने उत्पन्न मिळविण्याचे प्रमाण अधिक आहे.

### ६.३.८ गटात सहभागी होण्यामागील उद्देश

स्वयंसहाय्यता गटात सहभागी होण्याच्या पाठीमागे भिन्न उद्देश असणे शक्य आहे म्हणून सहभागी महिलांचे सर्वेक्षण करतांना आढळून आलेल्या उद्देशांची वर्गवारी पुढील सारणीत दर्शविलेली आहे.

**सारणी ३३ : गटात सहभागी होण्याचे उद्देश**

| तपशिल | एकूण | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १) मुलभूत गरजांची पूर्तता | ६१ | २६.९९ | ३९ | २५.३२ | २२ | ३०.५६ |
| २) आत्मनिर्भर होणे | ४५ | १९.९१ | ३२ | २०.७८ | १३ | १८.०५ |
| ३) 'पत' उपलब्धता | ६७ | २९.६५ | ४२ | २७.२७ | २५ | ३४.७२ |
| ४) अनुदान लाभ | ४४ | १९.४७ | ३५ | २२.७३ | ९ | १२.५० |
| ५) माहिती नाही | ९ | ३.९८ | ६ | ३.९० | ३ | ४.१७ |
| **एकूण** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्र. ३३ वरुन स्वयंसहाय्यता गटात सहभागी झालेल्या महिला सदस्यांचे गटातील सहभागाबद्दल भिन्न स्वरुपाचे उद्देश असल्याचे आढळून आले.

१) स्वयंसहाय्यता गट हे सुक्ष्म पत उपलब्धतेचे माध्यम म्हणून पुढे आलेले आहेत. नाशिक जिल्ह्यात सुद्धा २९.३५ टक्के सभासद महिला पत/ कर्ज उपलब्ध करुन घेण्याच्या प्रमुख उद्देशाने गटांमध्ये सहभागी झालेले आहेत.

२) पत उपलब्धता हेतुने नाशिक व मालेगाव शहरात गटात सहभागी होण्याचे प्रमाण सर्वाधीक आहे. मात्र नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे कर्ज घेणे आणि प्रामुख्याने व्याजाने कर्जाची देवान घेवाण निशिद्ध असते. तरी सुद्धा योग्य–अयोग्य (निशिद्ध) च्या फेऱ्यात न पडता मालेगाव शहरातील ३४.७२ टक्के गटांच्या सदस्यांपैकी ८० टक्के मुस्लीम महिला कर्ज मिळविणाऱ्या उद्देशाने गटात सहभागी झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. कारण कर्ज उपलब्धतेचे इतर मार्ग नाहीत.

३) मुलभूत गरजांची पुर्तता करण्याच्या उद्देशाने नाशिक जिल्ह्यातील २६.९९ टक्के महिला सदस्या गटात सहभागी झालेल्या आहेत. मुलभूत गरजांच्या पुर्ततेचे उद्देश डोळ्यासमोर ठेवून मालेगाव शहरात अधिक महिला (३०.५६ टक्के) गटात सहभागी झालेल्या आहेत. तर नाशिक शहरात या उद्देशाने गटात सहभागी झालेल्या महिलांचे प्रमाण २५.३२ टक्के कमी आहे. मालेगाव शहरात सभासद महिलांच्या कुटूंबांचा आकार मोठा असल्यामुळे गरजांची पुर्तता होणे अवघड असते म्हणून गटातील सहभागातील गरजांची पुर्तता करण्याचा उद्देश असतो.

४) सहभागी व्यक्तीस आत्मनिर्भर होण्यास सहाय्य करणे हा स्वयंसहाय्यता चळवळीचा प्रमुख उद्देश आहे. नासिक जिल्ह्यात १९.९१ टक्के सदस्य महिला ह्या आत्मनिर्भर, स्वयंपुर्णतः प्राप्त होण्याच्या उद्देशाने गटाते सामील झालेल्या आहेत. मालेगाव शहरापेक्षा नाशिक शहरात आत्मनिर्भर बनण्याच्या उद्देशाने अधिक प्रमाणात महिला सहभागी झालेल्या आढळून आलेल्या आहेत.

५) अनुदान लाटण्याच्या हेतुने योजनांमध्ये सहभागी होण्याची भारतात जुनी परंपरा आहे. मात्र स्वयंसहाय्यता चळवळीत अनुदान प्राप्तीचा उद्देश गौण असतो. तरीसुद्धा नाशिक जिल्ह्यात १९.४७ टक्के महिलांचा गटात सहभागी होण्याचा उद्देश हा अनुदान लाभ मिळविण्याचा असल्याचे सारणीवरुन निदर्शनास येते. हा उद्देश स्वयंसहाय्यता गटांच्या दीर्घकालीन वाटचालीसाठी घातक ठरणारा आहे. मालेगाव शहरापेक्षा नाशिक शहरात या उद्देशाने गटात सहभागी झालेल्या महिला सदस्यांचे प्रमाण तब्बल १०.२३ टक्केने अधिक आहे. कारण मालेगाव शहरातील मुस्लीम सदस्य महिला अनुदान हे कष्टाशिवाय म्हणून 'हराम का पैसा' व्याज फेडीसाठी असे आढळून आले. तर नाशिक शहरात मुळातच कर्ज प्रमाण कमी त्यात अनुदान रक्कम कमी म्हणून आपापसात वाटून घेतात. तसेच सर्व योजनांमध्ये व सर्व ठिकाणी संधीचा फायदा घेतात म्हणून आपणही अनुदान मिळविले तर बिघडले कुठे अशी मानसिकता आहे. म्हणून फक्त अनुदान प्राप्तीसाठी कर्ज मिळविले जाण्याचे प्रमाण अधिक आहे.

६) एकूण पैकी ३.९८ टक्के गटातील महिलांचा गटात सहभागी होण्यामागे निश्चीत उद्देश नाही. नाशिक आणि मालेगाव शहरातील गटांचे प्रमाण साधारणत: समान आहे.

## ६.४ नाशिक जिल्ह्यातील महिलांच्या आर्थिक सबलीकरणाचे अध्ययन

महिलांच्या समस्या ह्या आर्थिक दुर्बलतेशी निगडीत असतात म्हणून महिलांशी संबंधीत असणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी त्यांना आर्थिक दृष्ट्या सबल बनविण्याची उपाय योजना स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून केली जात आहे. नाशिक जिल्ह्याच्या नाशिक व मालेगाव शहरातील महिलांच्या कामाचा दर्जा व परिस्थिती आणि पर्यायाने आर्थिक परिस्थिती अत्यंत निकृष्ठ आहे. मात्र महिलांच्या कामाला केंद्रीभूत मानून त्यांच्या कामाचा व दर्जाचा विचार समोर ठेवून आर्थिक सबलीकरणास सुरूवात झालेली आहे. सुक्ष्मवित्त व्यवहारांतर्गत

बचतीचा संबंध सामूहिक दायित्वाच्या आधारावर 'सुक्ष्मपत' शी जोडण्यात येऊन आर्थिक सबलीकरणासाठी स्वयंसहाय्यता गट पुढील प्रमाणे नमूद केलेल्या आर्थिक व्यवहारात योगदान देत आहेत.

### ६.४.१ बचत प्रमाण


स्वयंसहाय्यता गट चळवळीत काटकसरीवर आधारित बचत हा सुक्ष्म वित्त व्यवहाराचा पाया आहे. त्यामुळे प्रतिसदस्य दरमहा बचतीचे प्रमाण अधिक असेल तर सहाजिकच कर्ज अधिक प्रमाणात मिळू शकते. या दृष्टीने नाशिक जिल्ह्यातील शहरी स्वयंसहाय्यता गटांच्या सदस्यांचे बचत प्रमाण दर्शक सारणी....

**सारणी ३४ : दरमहा प्रतिसदस्य बचत स्थिती**

| दरमहा बचत रक्कम (प्रति सदस्य) | एकूण संख्या | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सदस्य | शेकडा प्रमाण | सदस्य | शेकडा प्रमाण | सदस्य | शेकडा प्रमाण |
| १) रू. ५० | १४७ | ६५.०५ | ११० | ७२.७२ | ३७ | ५१.३९ |
| २) रू. १०० | ६४ | २८.३२ | ३६ | २२.०८ | २८ | ३८.८९ |
| ३) रू. १५० | १५ | ६.६३ | ८ | ५.२० | ७ | ९.७२ |
| **एकूण** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

**आलेख ६ : दरमहा प्रतिसदस्य बचत स्थिती (शेकडा प्रमाण)**




**स्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

नाशिक जिल्ह्यातील गटांच्या सदस्यांची दरमहा प्रतिसदस्य बचत रक्कम स्थिती लक्षात घेतली असता.

१) काटकसर हा महिलांचा एक गुणधर्म असतो. त्यामुळे दारिद्र्य रेषेखाली असूनही शहरी बचत गटाच्या एकूण सदस्यांपैकी ६५.०५ टक्के महिला दरमहा र. ५० बचत करीत आहेत. नाशिक शहरात हे प्रमाण ७२.७२ टक्के असून मालेगाव शहरात हे प्रमाण ५१.३९ टक्के इतके आहे.

२) ज्या महिलांची काटकसर करण्याची क्षमता अधिक आहे अशा एकूणा पैकी २८.३२ टक्के महिलांनी दरमहा रु. १०० रु. बचत करण्याचे प्रमाण ठेवलेले आहे. मालेगाव शहरात हे प्रमाण ३८.८९ टक्के असून नाशिक शहरात हे प्रमाण २२.०८ टक्के इतके आहे.

३) एकूण सदस्यांपैकी ज्या महिलांची उत्पन्न क्षमता (नोकरी व स्वयं व्यवसाय करणाऱ्या सदस्यांपैकी) अधिक असल्यामुळे बचत क्षमता अधिक आहे. अशा ६.६३ टक्के महिला दरमहा रु. १५० बचत करीत आहेत. मालेगाव शहरात हे प्रमाण ९.७२ टक्के व नाशिक शहरात हे प्रमाण ५.२० टक्के इतके आहे.

४) नाशिक शहर व मालेगाव शहरातील शहरी स्वयंसहाय्यता गटशंच्या बचतीचे प्रतिसदस्य प्रमाण विचारात घेतल्यास नाशिक शहरात दरमहा रु. ५० बचत करणाऱ्या सदस्यांचे प्रमाण मालेगाव शहरापेक्षा २१.३३ ने अधिक आहे. तर दरमहा रु. १०० आणि रु. १५० बचत करणाऱ्या सदस्यांचे प्रमाण एकत्रित विचारात घेतल्यास मालेगाव शहरात नाशिक शहरापेक्षा २१.३३ टक्के ने अधिक आहे.

५) मालेगाव शहरातील शहरी महिलांची दरमहा प्रतिसदस्य बचत रक्कम अधिक आहे. त्यामुळे कर्ज अधिक मिळविण्यास पात्र ठरतात.

### ६.४.२ बचतीचे स्वरुप


स्वयंसहाय्यता गटांची यशस्वी वाटचाल व प्रगतीसाठी गटाच्या बचतीचे स्वरुप नियमित असणे अत्यंत महत्त्वाचे असते. कारण बचत हा सर्व सदस्यांच्या आर्थिक हितसंबंध बांधून ठेवणारा घटक असतो.

## सारणी ३५ : बचतीचे स्वरुप

| बचतीचे स्वरूप (दरमहा) | एकूण | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सदस्य | शेकडा प्रमाण | सदस्य | शेकडा प्रमाण | सदस्य | शेकडा प्रमाण |
| १) नियमित | १६७ | ७३.९० | १०९ | ७०.७७ | ५८ | ८०.५५ |
| २) अनियमित | ४३ | १९.०२ | ३३ | २१.४४ | १० | १३.८९ |
| ३) बंद | १६ | ७.०८ | १२ | ७.७९ | ४ | ५.५६ |
| **एकूण** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

## आलेख ७ : बचतीचे स्वरूप (शेकडा प्रमाण)




**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

अध्ययनासाठी निवड करण्यात आलेल्या एकूण स्वयंसहाय्यता गटांचे सर्वेक्षण केले असता ७३.९० टक्के गटातील महिला सदस्य दरमहा नियमितपणे काटकसर करुन बचत करीत आहेत. या गटांची आर्थिक वाटचाल अत्यंत सक्षम व समाधानकारक आहे. १९.०२ टक्के गटांच्या महिलांकडून केली जाणारी बचत ही अनियमित स्वरुपाची आहे. त्यामुळे या गटांच्या आर्थिक प्रगतीत अडथळे येवून प्रगती असमाधानकारक स्वरुपाची असल्याचे आढळून येते आणि उर्वरित ७.०८

टक्के गटांनी तर बचत करणे बंद केलेले आहे. या गटांचे सुक्ष्मवित्त व्यवहार ठप्प झालेले आहेत.

नाशिक आणि मालेगाव शहरातील गटांच्या महिलांचे बचत स्वरुप लक्षात घेतल्यास नाशिक शहरात नियमित बचतीचे प्रमाण ७०.७७ टक्के असून मालेगाव शहरात हे प्रमाण ८०.५५ टक्के पर्यंत म्हणजे ९.७८ टक्केने अधिक आहे. थोडक्यात मालेगाव शहरात नाशिक शहरापेक्षा बचतीचे स्वरुप अधिक नियमित असल्यामुळे गटाचे सुक्ष्मवित्त व्यवहार सुद्धा अधिक नियमित असल्याचे आढळून आले.

### ६.४.३ बचत सवयीत वाढ व बदल

संसारात रममाण होऊन चुल व मुल निमुटपणे सांभाळणाऱ्या, निरक्षरता व दारिद्र्याच्या ओझ्याखाली दबुन गेलेल्या महिलांना बचत करता येईल का? केलेली बचत सांभाळून ठेवता येईल का? बचतीतून स्वयंरोजगाराची साधने निर्माण करता येतील का? अशा अनेक शंका स्वयंसहाय्यता चळवळीच्या प्रारंभी जाणकारांनी देखील व्यक्त केल्या होत्या. तथापि काळाच्या कसोटीला महिला बचत गटाची चळवळ घासून पुसून लख्ख स्वरुपात सामोरी गेली व कार्य निष्ठेतून महिलांनी आपल्याविषयी असणाऱ्या शंकाकुशंकांना सडेतोड उत्तर दिलेले आहे.

**सारणी ३६ : महिलांच्या बचत सवयीतील वाढ व बदल**

| तपशिल | एकूण | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | स्था. पुर्वी | स्था. नंतर | स्था. पुर्वी | स्था. नंतर | स्था. पुर्वी | स्था. नंतर |
| १) बचत न करणारे सदस्य | २०६ (९१.१५) | १६ (७.०८) | १३९ (९०.२५) | १२ (७.८०) | ६७ (९३.०५) | ४ (५.०६) |
| २) बचत करणारे सदस्य | २० (८.८४) | २१० (९२.९२) | १५ (९.७५) | १४२ (९२.२०) | ५ (६.९४) | ६८ (९४.९४) |
| • भिशी | १७ (८५.००) | ७ (३.३३) | १३ (८६.६६) | ५ (३.०२) | ४ (८०.००) | २ (२.९४) |
| • बँक | १ (५.००) | २०१ (९५.७१) | १ (६.६७) | १३७ (९६.९८) | - - | ६४ (९४.१२) |
| • पोष्ट | २ (१०.००) | २ (०.९६) | १ (६.६७) | - - | १ (२०.००) | २ (२.९४) |
| **एकूण** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**टिप :** कंसातील संख्या शेकडा प्रमाण दर्शवितात.

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्र. ३६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे गट स्थापनेपुर्वी फक्त ८.८४ टक्के महिला काटकसर करुन जमा होणारी अल्पशी रक्कम बचत करीत होत्या आणि एकूण बचतीपैकी ८५.०० टक्के बचत ही फक्त पारंपारिक भिशी या प्रकारात टाकली जात होती. भिशी हा प्रामुख्याने अलिखित व विश्वासावर आधारित बचत प्रकार असल्यामुळे बचतीचा पैसा बुडण्याची शक्यता अधिक असते परंतु भिशीला भक्कम पर्याय उपलब्ध नव्हता त्यामुळे माहिती असूनही महिला भिशी याच प्रकारात प्राधान्य देऊन होत्या. मात्र बचत गट स्थापन केल्यानंतर बचत करणाऱ्या महिलांचे प्रमाण ९२.९२ टक्के पर्यंत वाढलेले आढळून येते. भिशी या पारंपारिक प्रकाराला बँक खात्यातील बचत हा सक्षम पर्याय उपलब्ध झाल्यामुळे काटकसर करुन बचत करण्याच्या सवयीत वाढ झाली. तसेच भिशी या प्रकारामध्ये बचत करण्याचे प्रमाण उल्लेखनीय प्रमाणात ८५ टक्के वरुन ३.०९ टक्के पर्यंत कमी झाले. थोडक्यात बचत गटाच्या माध्यमातून लहान– लहान प्रमाणावरील बचती विकासाच्या मुख्य प्रवाहात सामिल झालेल्या आहेत. कारण एकूण बचत करणाऱ्या सदस्यांपैकी ९५.७१ टक्के सदस्य हे बँक खात्यात बचत करतात.

नाशिक व मालेगाव शहरातील बचत गटाच्या महिलांच्या बचत सवयीतील वाढ व बदलाचा तुलनात्मक आढावा घेतला असता नाशिक शहरात गट स्थापनेपुर्वी ते गट स्थापनेनंतर बचत सवयीत वाढ ७.८० टक्के वरुन ९२.२० टक्के म्हणजे ८४.४ टक्के वाढ झालेली आहे. तर मालेगाव शहरात हे प्रमाण ५.०६ टक्के वरुन ९४.९४ टक्के पर्यंत म्हणजे ८९.८८ टक्के वाढ झालेले आहे. थोडक्यात नाशिक शहरापेक्षा मालेगाव शहरातील बचत सवयीतील वाढ ५.४८ टक्केने अधिक असल्याचे आढळून येते. तसेच भिशी या पारंपारिक प्रकारातील बचतीचे प्रमाण नाशिक व मालेगाव शहरात अनुक्रमे ८६.६६ वरुन ३.०२ टक्के व ८०.० टक्के वरुन २.९४ टक्केपर्यंत कमी होऊन बँक ठेवीचे प्रमाण ९६.९८ टक्के व ९४.१२ टक्के पर्यंत वाढलेले आढळून येते. बँकेतील बचतीचे प्रमाण नाशिक शहरात निव्वळ (स्थापनेपुर्वी ते स्थापनेनंतर) वाढ ९०.३१ टक्के आण मालेगाव शहरात ९४.१२ टक्के असल्याचे आढळून येते. म्हणजे नाशिक व मालेगाव शहरातील गटाच्या

सदस्यांच्या बचत सवयीत सकारात्मक बदल घडून येत आहे. मालेगाव शहर याबाबत अधिक अग्रेसर आहे.

### ६.४.४ गटांतर्गत  कर्ज व्यवहार

गरिबीमुळे ज्या  कुटुंबाची आर्थिक स्थिती हलाखीची असते. त्या कुटुंबात गरजांच्या त्यागाची पहिली कुऱ्हाड कोसळते ती मुलगी व महिलांच्या गरजांवर आणि त्यातूनही समजा गरजा भागविण्याचे ठरविले तर सावकारी कर्जाचा आधार घ्यावा लागतो. त्यामुळे सावकारी कर्जाच्या जाचक अटींना व पिळवणूकीस सामोरे जावे लागते. यावर उत्तम उपाय म्हणून स्वयंसहाय्यता गट महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहेत.

स्वयंसहाय्यता गटातील महिला दरमहा ठराविक रक्कम जमा करुन बँकेच्या खात्यावर जमा करतात. त्यामुळे अशा एकत्रित बचतीतून उपलब्ध होणारी रक्कम तसेच शासनाकडून प्रतिसदस्य रु. १,०००/– फिरता निधी नावाने गटाच्या बँक खात्यावर एकत्रितपणे जमा केले जाते. या फिरत्या निधीची रक्कम गटाच्या सदस्यांच्या लहान– लहान विविध गरजा भागविण्यासाठी लघुकर्ज स्वरुपात दिली जातात. या गटांतर्गत लघू कर्ज व्यवहारात अत्यल्प दराने व्याज आकारणी केली जाते. तसेच इंट्रेस फ्री या इस्लामीक फायनान्स तत्वाला अनुसरुन कर्जाची देवाण– घेवाण केली जाते. मात्र कर्ज देवाण घेवाणीत फी, आणि कर्ज फेडीत उशीर झाल्यास दंड आकारला जातो. नाशिक जिल्ह्यातील शहरी गटांच्या माध्यमातून कर्ज व्यवहार केले जात आहेत. त्याबाबत अध्ययनावरुन आढळून आलेली तथ्ये पुढील सारणीत दर्शविलेले आहेत.

**सारणी ३७ : गटांतर्गत कर्ज व्यवहार**

| तपशिल | एकूण गट | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १. कर्ज व्यवहार न करणारे गट | ५९ | २६.१० | ४५ | २९.२२ | १४ | १९.४५ |
| २. कर्ज व्यवहार करणारे गट | १६७ | ७३.९० | १०९ | ७०.७८ | ५८ | ८०.५५ |
| • घरखर्च | १२४ | ७४.२५ | ७८ | ७१.५५ | ४६ | ७९.३१ |
| • शिक्षण | ११५ | ६८.८६ | ७३ | ६६.९७ | ४२ | ७२.४१ |
| • आजार | ७१ | ४२.५१ | ५५ | ५०.४५ | २१ | ३६.२० |
| • सण / समारंभ | ११५ | ६८.८६ | ७८ | ७१.५५ | ३६ | ६३.७९ |
| • स्वयंरोजगार सहाय्य | १०४ | ६२.२७ | ६२ | ५६.८८ | ४२ | ७२.४१ |
| • प्रवास | १७ | १०.१७ | १० | ९.१७ | ७ | १२.०६ |
| **एकूण** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

वर दर्शविल्याप्रमाणे शहरी स्वयंसहाय्यता गटाच्या अंतर्गत कर्ज व्यवहार उल्लेखनीय स्वरुपाचे आहेत.

१. नाशिक जिल्ह्यातील अध्ययनासाठी निवडलेल्या एकूण शहरी गटांपैकी ७३.९० टक्के गटातील महिला लहान– लहान कौटुंबिक पातळीवरील आर्थिक गरजा भागविण्यासाठी गटांतर्गत कर्जाची व्यवहार करीत आहेत. उर्वरित २६.१० टक्के गटांच्या महिलांकडून गटांतर्गत कर्ज व्यवहार केले जात नाहीत.

२. गटांतर्गत कर्ज व्यवहार करणाऱ्या एकूण १.६७ गटांपैकी ७४.२५ टक्के गटातील महिला गटाकडून मिळणाऱ्या कर्जाचा वापर अडचणीच्या काळात दैनंदिन घरखर्च भागविण्यासाठी करीत आहेत. तर ६८.८६ टक्के महिला मुलांच्या वह्या– पुस्तके, ड्रेस, फी, प्रवास पास इ. सारख्या शैक्षणिक गरजा भागविण्यासाठी कर्जाचा वापर करीत असल्याचे आढळून आले. तर ६८.८६ टक्के गटातील महिला रमजान ईद, मोहरम, दीपावली, नाताळ, आंबेडकर जयंती इ. सारख्या सण, उत्सवासाठी गटांतर्गत कर्जाचा वापर करतात आणि ६२.२७ गटातील महिला लहान– लहान स्वरुपाचे व्यवसाय करण्यासाठी, ४२.५१ टक्के गटातील महिला कुटूंबातील सदस्यांच्या किरकोळ आजारपणासाठी कर्जाचा वापर करीत आहेत.

३. नाशिक शहरातील ७०.७७ टक्के गट हे गटांतर्गत कर्ज व्यवहार (१ ते २ टक्के व्याजदराने) करतात. मात्र २९.२३ टक्के गट हे गटांतर्गत कर्ज व्यवहार करीत नाही. कारण या गटांमधील महिलांचा एकमेकांवर विश्वास नाही त्यामुळे दीपावली किंवा ईद या सणांच्या वेळी जमा रक्कमेचे आपापसात वाटप करुन घेतात. मालेगाव शहरातील ८०.५५ टक्के गट हे गटांतर्गत कर्ज व्यवहार करतात. कर्ज व्यवहार करणाऱ्या मुस्लीम समाजाच्या गटापैकी अधिक संख्येने गट हे 'रिबा' म्हणजे व्याज निशिद्ध मानतात. त्यामुळे इंट्रेस फ्री तत्वाचा अवलंब करुन बिनाव्याज रक्कमेचा व्यवहार करतात. मात्र उर्वरित १९.४५ टक्के गट हे वयस्क महिला अध्यक्ष असणाऱ्या गटांमध्ये विश्वासाअभावी, भेदभावाच्या कर्ज व्यवहार करीत नाहीत.

४. कर्ज मिळाल्यानंतर कर्ज वापर करण्याबाबत नाशिक शहरातील महिला गट सण–समारंभ, आजारपण इ. गरजा भागविण्यात आघाडीवर आहेत. तर मालेगाव शहरातील गट हे घरखर्च, मुलांचे शिक्षण, प्रवास, स्वयंरोजगार इ. बाबत आघाडीवर आहेत.

### ६.४.५ व्यवसाय उपक्रमात विविधता

स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून व्यवसाय उपक्रमाचे प्रमाण वाढलेले दिसून येते आणि त्याच बरोबर व्यवसायात विविधता असल्याचेही आढळून येते.

**सारणी ३८ : व्यवसाय उपक्रमाचे वर्गीकरण**

| तपशिल | एकूण गट | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १) शिलाई मशिन व एम्ब्रॉयडरी | २९ | १२.८३ | २२ | १४.२८ | ७ | ९.७२ |
| २) ठेला गाडी | १० | ४.४२ | ६ | ३.९० | ४ | ५.५५ |
| ३) धान्य विक्री | २० | ८.८५ | १३ | ८.४४ | ७ | ९.७२ |
| ४) किराणा व जनरल स्टोअर्स | २१ | ९.२९ | १६ | १०.३९ | ५ | ६.९५ |
| ५) कापड / कपडे | २२ | ९.७३ | १३ | ८.४४ | ९ | १२.५० |
| ६) पोषण आहार | १४ | ६.१९ | ११ | ७.१४ | ३ | ४.१७ |
| ७) भांडे विक्री / भाडे | १० | ४.४२ | ७ | ४.५४ | ३ | ४.१७ |
| ८) गिरणी, कांडप | १० | ४.४२ | ६ | ३.९० | ४ | ५.५५ |
| ९) नर्सरी | ७ | ३.१० | ६ | ९.९० | १ | १.३९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १०) फळे, भाजीपाला | ७ | ३.१० | ३ | १.९५ | ४ | ५.५५ |
| ११) पादत्राणे निर्मिती, विक्री | ७ | ३.१० | ५ | ३.२५ | २ | २.७८ |
| १२) पशुपालन | ७ | ३.१० | ५ | ३.२५ | २ | २.७८ |
| १३) काजू प्रक्रिया, विक्री | ६ | २.६५ | ३ | १.९५ | ३ | ४.१७ |
| १४) दुध व दुधाचे पदार्थ | ६ | २.६५ | ५ | ३.२४ | १ | १.३९ |
| १५) झाडू, टोपली, दोरखंड | ७ | ३.१० | ४ | २.६० | ३ | ४.१७ |
| १६) खाणावळ, फरसाण, वडापाव | ७ | ३.१० | ५ | ३.२४ | २ | २.७८ |
| १७) मेणबत्ती, फिनाईल | ५ | २.२२ | ५ | ३.२४ | - | - |
| १८) भंगार विक्री | ४ | १.७७ | २ | १.३० | २ | २.७८ |
| १९) लेदर / चामडे वस्तू | ३ | १.३२ | ३ | १.९५ | - | - |
| २०) रिक्षा / ॲपे / वाहन | ४ | १.७७ | १ | ०.६५ | ३ | ४.१७ |
| २१) गिफ्ट आर्टिकल्स/सौंदर्य प्रसाधने | ४ | १.७७ | ३ | १.९५ | १ | १.३९ |
| २२) मंडप डेकोरेटर्स | ४ | १.७७ | २ | १.३० | २ | २.७८ |
| २३) इतर | १२ | ५.३१ | ८ | ५.१९ | ४ | ५.५५ |
| **एकूण** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्र. ३८ वरुन नाशिक जिल्ह्यातील शहरी गटांच्या व्यवसायाची वर्गवारी केली असता.

१) अध्ययनासाठी निवडलेल्या एकूण व्यवसाय उपक्रमात शिलाई मशिन व एम्ब्रायडरी, ढेला गाडी, धान्य विक्री, किराणा व भुसार, कापड व रेडीमेड कपडे, पोषण आहार या व्यवसाय उपक्रमाचे प्रमाण ५१.३३ टक्के इतके आहे. नाशिक आणि मालेगाव शहरात ह्या उपक्रमाचे प्रमाण साधारणत: सारखे आहे. मात्र नाशिक शहरात शिलाई मशिन व एम्ब्रॉडरी व ढेलागाडी या उपक्रमाचे प्रमाण १८.१८ टक्के आहे. तर मालेगाव शहरात हे प्रमाण १५.२७ टक्के आहे.

२) धान्य विक्री, किराणा व भुसार, कापड व कपडे विक्री व पोषण आहार या व्यवसायाचे नाशिक जिल्ह्यातील शहरी भागात ३४.०६ टक्के असून नाशिक व मालेगाव शहरात हे प्रमाण अनुक्रमे ३४.४१ टक्के व ३३.३४ टक्के असे आहे.

३) सारणी क्र. ३८ मध्ये दर्शविलेल्या अ.क्र. ७ ते २३ या १७ व्यवसायांचे प्रमाण ४८.६७ टक्के इतके आहे. नाशिक शहरात हे प्रमाण अधिक आहे.

४) नाशिक आणि मालेगाव शहरात धान्यविक्री, किराणा व भुसार कापड व कपडे विक्री व पोषण आहार या व्यवसायाचे प्रमाण अनुक्रमे ३१.८१ टक्के व ३४.७१ टक्के असे आहे. ४७.४१ टक्के व ५१.३९ टक्के असे आहे.

५) नाशिक शहरात शिलाई व एम्ब्रॉडरी काम, किराणा, पोषण आहार, लेदर वस्तू, नर्सरी, पशुपालन, मेणबत्ती, फिनाईल, खानावळ व वडापाव या व्यवसायांचे प्रमाण अधिक आहे. तर मालेगाव शहरात ढेला गाडी, धान्यविक्री, कापड व कपडे विक्री, गिरणी व कांडप, फळे भाजीपाला, काजू प्रक्रिया व विक्री, भंगार विक्री, भाडोत्री वाहन, मंडप डेकोरेशन इ. व्यवसायांचे प्रमाण अधिक आहे.

### ६.४.६ गटांची भांडवल विषयक स्थिती

महिला स्वयंसहाय्यता गट हे लहान– लहान व्यवसायांचे, उपक्रमांचे निर्मिती केंद्र म्हणून साकारत आहेत. महिला स्वयंसहायता गटांकडे भांडवल उभारणीची क्षमता किती आहे. यास महत्त्व प्राप्त होते.

**सारणी ३९ : गटांची भांडवल स्थिती (मार्च २०१०)**

| तपशिल | एकूण | नाशिक शहर | मालेगाव शहर |
|---|---|---|---|
| १) स्वनिधी | ८८३३४२८ | ५७५१८९२ | ३०८१५३६ |
| २) फिरता निधी | २४०८८८० | १६५०८८० | ७५८००० |
| ३) बाह्य कर्ज | २१८६०५०० | ११९५०४०० | ९९१०१०० |
| **एकूण रक्कम रू.** | **३३१०२८०८** | **१९३५३१७२** | **१३७४९६३६** |

**स्त्रोत :** अनुसूची : २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

वरील सारणी क्र.३९ मध्ये दर्शविल्यावरुन

१) पुरुषप्रधान समाजरचनेत महिलांकडे संपत्तीची मालकी नसते. मात्र परंपरागत समाजरचनेस छेद देऊन स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून काटकसर करुन केलेल्या बचतीमुळे रु. ८८.३३ लाखाची संपत्ती स्व: मालकीची आहे. नाशिक शहरातील स्वयंसहाय्यता गटांच्या महिलांच्या

मालकीची संपत्ती रु. ५७.५१ लाख तर मालेगाव शहरात रु. ३०.८१ लाख पर्यंत आहे.

२) स्वयं सहाय्यता गट स्थापनेनंतर गटातील महिला मन व्यवहारात सक्षम झाल्यानंतर धन व्यवहारासाठी प्रतिसदस्य रु. १००० अंतर्गत व्यवहारासाठी शासनाकडून पुरविले जातात. नाशिक जिल्ह्यातील गटांना एकूण रु. २४.०८ लाख रु. उपलब्ध झालेले आहे. नाशिक व मालेगाव शहरात हे प्रमाण अनुक्रमे रु. १६.५० व इ. ७.५८ लाख इतके आहे.

३) स्वयंसहाय्यता गटातील महिलांची बचत क्षमता वाढल्यामुळे व्यवसायासाठी कर्ज मिळविण्याची 'पत' वाढीस लागली. त्यामुळे गटांना एकूण रु. २.१८ कोटीचे कर्ज उपलब्ध झालेले आहे. नाशिक शहर व मालेगाव शहरातील कर्जाची उपलब्धता अनुक्रमे रु. १.१९ कोटी व रु. ०.९९ कोटीची आहे.

४) स्वनिधी, फिरता निधी व बाह्य कर्ज या तिन्ही बाबीं मिळून अध्ययनासाठी निवडलेल्या एकूण २२६ गटांकडे एकूण भांडवलाची उपलब्धता रु. ३,३१,०२,८०८ ची आहे. म्हणजे समाजात शुन्य पत असणाऱ्या, फाटके आयुष्य जगणाऱ्या महिला रु. ३.३१ कोटीचे भांडवल उभारणी करण्यात सक्षम ठरलेल्या आहेत. नाशिक शहरातील महिलांमध्ये रु. १.९३ कोटी व मालेगाव शहरात रु. १.३७ कोटीचे भांडवल उभारणी करण्यात व त्याचा वापर व्यवसायात करण्यात व्यस्त आहेत.

थोडक्यात– स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून गरिब, दारिद्री महिलांना स्वत:च्या मालकीची संपत्ती उभारण्याचा अधिकार प्राप्त होऊन स्वत:च्या कुवतीवर आधारित भांडवल उभारणी करण्याचा मार्ग प्रशस्त झालेला आहे.

### ६.४.७ बाह्य कर्ज व अनुदान प्राप्ती

महिला स्वयंसहाय्यता गटांना स्वयंरोजगारासाठी व्यवसाय स्थापन करण्यासाठी बँकेकडून अनुदान स्वरुपात कर्ज मिळविता येते. नाशिक जिल्ह्यातील

नाशिक शहरात मार्च २०१० अखेर १०२५ गटांना ६,६५,५२,५१४ रुपयांचे कर्ज व ३,३२,७६,२५७ रुपयांच्या अनुदानाचा लाभ मिळालेला आहे. तर मालेगाव शहरातील एकूण ४७९ गटांना ४१३५१४१० रुपयांनी कर्ज मिळालेले असून २०६७५७०५ रुपये अनुदानाचा लाभ मिळालेला आहे. दोन्ही शहरात एकूण १५०४ गटांना एकूण १०,७९,०३,९२४ रु. कर्ज मिळालेले असून ५५,३९,५१,९५२ रुपये अनुदानांचा लाभ मिळालेला आहे. एकूण १५०४ गटांपैकी अध्ययनासाठी निवडलेल्या २२६ गटांना बँकेकडून मिळालेले कर्ज व अनुदान लाभ स्थिती

**सारणी ४० : बाह्य कर्ज व अनुदान उपलब्धता स्थिती (मार्च २०१० अखेर)**

| तपशिल | एकूण रक्कम रू. | नाशिक शहर | मालेगाव शहर |
|---|---|---|---|
| १) कर्ज | २१८६०५०० | ११९५०४०० | ९९१०१०० |
| २) सरासरी कर्ज (प्रति गट) | ९६७२७.८७ | ७७६०० | १३७६४०.२८ |
| ३) अनुदान | १०९३०२५० | ५९७५२०० | ४९५५०५० |
| ४) सरासरी अनुदान (प्रति गट) | ४८३६३.९३ | ३८८०० | ६८८२०.१३ |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्र. ४० बँकांच्या लेखी ज्या महिलांची 'पत' शुन्य होती अशा महिलांनी सामुहिकरित्या गटाच्या माध्यमातून पत निर्माण करुन एकूण २.१८ कोटी रुपयांचे कर्ज व १.०९ कोटी रुपयाचे अनुदान प्राप्त करुन घेतलेले आहे. साधारणत: प्रतिगटास सरासरी ९६७२७ रुपयांचे कर्ज व ४८३६३ रुपयांचे अनुदान प्राप्त झालेले आहे.

नाशिक व मालेगाव शहरातील गटांना मिळालेले सरासरी अनुदान याबाबत मालेगाव शहरातील गटात नाशिक शहरापेक्षा फार पुढे आहेत. नाशिक शहरात प्रतिगट सरासरी कर्ज उपलब्धता ७७६०० रू. तर मालेगाव शहरात १,३७६४०.२८ रू. कर्ज उपलब्धता झालेली आहे. प्रति सदस्य सरासरी कर्ज उपलब्धतेत सुद्धा मालेगाव शहरातील गट आघाडीवर आहे.

### ६.४.८ बाह्य कर्जाचे वर्गीकरण


स्वयंसहाय्यता गटाला गटाच्या माध्यमातून सामुहिक किंवा गटाच्या सर्व सदस्यांचा वैयक्तीक व्यवसाय सुरु करण्यासाठी बँकेकडून कर्ज उपलब्ध होत असते. गटांना व्यवसायाच्या गरजे इतके कर्ज मिळणे गरजेचे असते. या दृष्टीकोनातून नाशिक जिल्ह्यातील शहरी स्वयंसहायता गटांना मिळणारे कर्ज प्रमाण विचारात घेऊन कर्जाचे केलेले वर्गीकरण पुढीलप्रमाणे

**सारणी ४१ : गटांना मिळणाऱ्या कर्जाची वर्गीकरण**

| कर्ज प्रमाण | एकूण गट | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १. रू. १०,००० ते रू. ५०,००० | ५७ | २५.२२ | ४८ | ३१.१६ | ९ | १२.५३ |
| २. रू. ५०,००१ ते रू. १,००,००० | ८८ | ३८.९४ | ६६ | ४२.८६ | २२ | ३०.५५ |
| ३. रू. १,००,००१ ते रू. १,५०,००० | २४ | १०.६२ | १३ | ८.४४ | ११ | १५.२७ |
| ४. रू. १,५०,००१ ते रू. २,००,००० | ३० | १३.२७ | २० | १२.९९ | १० | १३.८८ |
| ५. रू. २,००,००१ ते रू. २,५०,००० | २७ | ११.९५ | ७ | ४.५५ | २० | २७.७७ |
| **एकूण** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

**आलेख ८ : गटांना मिळणाऱ्या कर्जाची वर्गीकरण (शेकडा प्रमाण)**




**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

स्वयंसहाय्यता गटांच्या अध्यक्षांच्या सर्व्हेक्षणानुसार मिळालेल्या माहितीच्या आधारे,

१. नाशिक जिल्ह्यातील शहरी स्वयंसहाय्यता गटांच्या २५.२२ टक्के व्यवसायांना रू. ५०,००० पर्यंत कर्ज पुरवठा केला जात आहे. प्रामुख्याने नाशिक शहरातील ३१.१६ टक्के गटांना रू. २५,०००, रू. ३०,००० सरासरी कर्ज पुरवठा करण्यात आलेला आहे. मालेगाव शहरात प्रमाण फक्त १२.५ टक्के आहे.

२. नाशिक जिल्ह्यात प्रामुख्याने ३८.९४ टक्के गटांना सर्वाधिक कर्ज पुरवठा रू.५०,००१ ते रू. १,००,००० पर्यंत केला जात आहे. नाशिक शहरात ४२.८६ टक्के गटांना व मालेगाव शहरात ३०.५५ टक्के गटांना रू. ५०,००१ ते रू.१,००,००० पर्यंत कर्ज पुरवठा केला जात आहे.

३. रू. १,००,००१ ते रू.२,५०,००० या दरम्यान ३५.८४ टक्के गटांना कर्ज पुरवठा केला जातो. यापैकी नाशिक शहरात २५.९८ टक्के गटांना आणि मालेगाव शहरात ५६.९२ गटांना कर्ज पुरवठा केला जात आहे. म्हणजे मालेगाव शहरातील गटांना व्यवसायासाठी अधिक कर्जपुरवठा करण्यात येत आहे.

४. अध्ययनासाठी निवडलेल्या एकूण गटांपैकी ६४.१६ टक्के गटांना रू.१,००,००० पेक्षा कमी रक्कमेचा कर्जपुरवठा केला जात आहे. कारण नाशिक शहरातील ७४.०२ टक्के गटांना एक लाखपेक्षा कमी रक्कमेचे कर्ज देण्यात आलेले आहे. केवळ अधिकाधिक गटांना खुष करण्याच्या हेतुने तसेच राजकीय हस्तक्षेपामुळे लहान-लहान रक्कमेची सरासरीने कर्ज देण्यात आलेली आहेत.

५. एकूण कर्जपुरवठ्यापैकी ९८(४३.३६टक्के) गटाच्या सदस्यांचा मते मिळालेले कर्ज पुरेसे नाही. नाशिक शहरात ७९(५१.३०टक्के) गटांना व मालेगाव शहरात १९(२६.३४टक्के) गटांना मिळालेले कर्ज पुरेसे नाही.

६. नाशिक शहरात साधारणत: ३०% गटांना व मालेगाव शहरात २०% गटांना मिळालेले कर्ज अत्यंत अपुरे आहे.

### ६.४.९ कर्ज उपलब्धता स्वरूप

महिला स्वयंसहाय्यता गटांना व्यवसाय करण्यासाठी मिळणारे कर्ज हे व्यवसायाची गरज लक्षात घेऊन उपलब्ध झाले पाहिजे तसेच ज्यावेळी कर्ज उपलब्ध होणे गरजेचे असते त्यावेळी दीरंगाई शिवाय कर्ज उपलब्ध झाले पाहीजे. म्हणुन भारतीय रिझर्व बँकेने व्यापारी बँका, ग्रामीण बँका, सहकारी बँका, यांना वेळोवेळी आदेश निर्गमीत केलेले आहे.

**सारणी ४२ : कर्ज उपलब्धतेचे स्वरूप**

| कर्ज स्वरूप | एकूण गट | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १. आवश्यकतेनुसार कर्ज | १४१ | ६२.३९ | ८६ | ५५.८५ | ५५ | ७६.३९ |
| २. आवश्यकतेपेक्षा कमी कर्ज | ८५ | ३७.६१ | ६८ | ४४.१५ | १७ | २३.६१ |
| **एकूण (१+२)** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |
| ३. वेळेनुसार कर्ज उपलब्धता | १५८ | ६९.९१ | ११० | ७१.४३ | ४८ | ६६.६६ |
| ४. दिरंगाईने कर्ज उपलब्धता | ६८ | ३०.०९ | ४४ | २८.५७ | २४ | ३३.३४ |
| **एकूण (३+४)** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्रमांक ४२ मध्ये दर्शविल्यावरून नाशिक जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता गटांना व्यवसायासाठी कर्जाची उपलब्धता स्थिती पाहून पुढील निष्कर्ष काढता येतात.

१. अध्ययनासाठी निवड केलेल्या एकूण गटांपैकी ६२.३९ टक्के गटांना व्यवसायाच्या आवश्यकतेनुसार मागणी इतके कर्ज उपलब्ध झालेले आहे. मात्र ३७.६१ टक्के गटांच्या व्यवसायांना आवश्यकते इतके मागणी नुसार कर्ज मिळालेले नाही. म्हणजे एकूण गटांपैकी साधारणत: १/३ गटांना पुरेसे कर्ज मिळालेले नाही. अपुर्ण कर्ज उपलब्धतेचे बँक अधिकाऱ्यांना मुलाखती द्वारे कारणे विचारली असता. (१) व्यवसायासाठी कर्ज मंजुरी करतांना कोटेशनची मागणी केली असता अधिक रक्कमेचे कोटेशन सादर केले जाते.

(२) व्यवसाय प्रस्ताव हा फायदेशीर ठरेल असे निदर्शनास येत नाही. (३) कर्ज मागणाऱ्या महिलांचा कर्जाचा पुर्व इतिहास नसतो. त्यामुळे कर्ज फेडीच्या क्षमतेबाबत संभ्रम असतो. (४) कर्ज मागणाऱ्या गटाच्या काही अध्यक्षा ह्या निरक्षर असल्यामुळे व्यवसाय प्रस्तावाबाबत स्पष्ट मते नसतात. तर व्यवसायासाठी अपुर्ण कर्ज उपलब्ध झालेल्या सदस्यांच्या मते बँक अधिकारी हे व्यवसायाच्या प्रस्ताव काळजीपुर्वक न पहाता फक्त उद्दिष्ट्ये पुर्ण करण्यासाठी अधिक गटांना थोडे-थोडे कर्ज वाटप करतात. त्यामुळे आमच्या व्यवसायाच्या क्षमतेवर व नफा मिळण्याच्या प्रमाणावर विपरीत परिणाम होत आहेत.

३) नाशिक शहरात आवश्यकतेनुसार कर्जाचे उपलब्धता प्रमाण फक्त ५५.८५% असुन ४४.१५% गटांना आवश्यकते पेक्षा कमी प्रमाणात कर्ज उपलब्ध झालेले आहे. कारणे – अ) बँकांकडून कर्जाची काटछाट केली जाते तसेच बँकेकडून पक्षपात केला जातो. असे सदस्यांचे मत आहे. ब) गटाच्या सदस्यांकडून राजकीय दबाव निर्माण करून व्यवसायासाठी बँकेकडे कर्जाचे प्रस्ताव अधिक संख्येने पाठविण्यासाठी सक्ती केली जाते. असे सुवर्णजयंती कक्षाच्या अधिकऱ्यांचे मत आहे.

मालेगाव शहरात ७६.३९टक्के गटांना आवश्यकतेप्रमाणे उपलब्धता झालेली आहे. नाशिक शहरांपेक्षा हे प्रमाण २०.५४ टक्के अधिक आहे. असे असले तरी मालेगाव शहरात २३.६१ टक्के गटांना मिळालेले कर्ज आवश्यकतेपेक्षा कमी आहे.

४) अध्ययनासाठी निवडलेल्या एकूण गटांपैकी ६९.९१ टक्के गटांना वेळेवर कर्ज मिळालेले आहे. उर्वरीत ३०.०९ टक्के गटांना कर्ज मिळतांना दीरंगाई झालेली आढळुन येते. उपलब्धतेमधील दिरंगाईची कारणे संबंधितांना विचारली असता अ) आम्ही महिला व्यवसाय करू शकतो यावर बँकेच्या लोकांचा विश्वास बसत नाही ब) बँक अधिकारी कर्ज देतांना उपकार केल्याचा अविर्भाव दर्शवितात क) कर्ज मागणाऱ्या महिलांना इतर ग्राहकांपेक्षा दुय्यम

स्थान दिले जाते. दिवस-दिवसभर बँकेत बसवुन ठेवतात. पुढच्या आठवड्यात, पुढच्या महिन्यात या असे सांगुन जाणून-बुजून उशीर केला जातो. इ) बँकेच्या प्रतिनिधीच्या मते कर्ज प्रस्तावात अनेक त्रूटी असतात फ) आपल्याकडे स्टाफ कमी असतो त्यामुळे नियमीत व्यवहारातूनच गटाच्या प्रकरणांची छाननी करावी लागते.

### ६.४.१० कर्ज परतफेड


महिला स्वयंसहाय्यता गट चळवळीच्या सुरूवातीला कर्ज परतफेडीच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह लावले जात होते. गरीब हे कर्ज फेडीसाठी लायक असत नाही असे मानले जात होते. भारतात वेगवेगळ्या माध्यमातुन स्थापन करण्यात येत असलेल्या स्वयंसहाय्यता गटांच्या कर्जफेडीचे प्रमाण साधारणत: ९६ ते ९८ टक्के इतके अधिक आहे. यादृष्टीने नाशिक जिल्ह्यातील शहरी महिला स्वयंसहाय्यता गटांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड स्थिती विचारात घेणे आवश्यक आहे.

**सारणी ४३ : कर्ज परतफेड स्थिती**

| कर्ज प्रमाण | एकूण गट | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १) नियमित कर्जफेड | १६५ | ७३.०१ | १०९ | ७०.७७ | ५६ | ७७.७७ |
| २) अनियमित कर्जफेड | ४२ | १८.५८ | ३१ | २०.१३ | ११ | १५.२८ |
| ३) कर्जफेड बंद | १९ | ८.४१ | १४ | ९.१० | ५ | ६.९५ |
| **एकूण** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

**आलेख ९ : कर्ज परतफेड स्थिती (शेकडा प्रमाण)**




**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी आणि आलेखातील संख्यांवरून

१) अध्ययनासाठी निवड केलेल्या गटांपैकी ७३.०१ टक्के गटांकडून घेतलेल्या कर्जाची नियमितपणे परतफेड होत आहे.

२) एकूण गटांपैकी १८.५८ टक्के गटांकडून कर्जाची नियमितपणे परतफेड करीत नाही.

३) एकूण गटांपैकी नियमितपणे तसेच अनियमितपणे कर्जफेड करणाऱ्या गटांचे प्रमाण ९१.५९ टक्के आहे. तर कर्जफेड पुर्णपणे न करणाऱ्या गटांचे प्रमाण ८.४१ टक्के इतके आहे.

४) नाशिक शहरातील एकूण गटांपैकी ७०.७७ टक्के गट नियमितपणे कर्जफेड करीत आहेत तर २०.१३ टक्के गट अनियमितपणे कर्जफेड करतात, एकूण ९०.९० टक्के गट हे कजफेड करतात तर ९.१० टक्के गट हे कर्जफेड करीत नाहीत.

मालेगाव शहरातील ७७.७७ टक्के गट हे नियमितपणे व १५.२८ टक्के गट अनियमितपणे कर्ज फेड करीत आहेत म्हणजे मालेगाव शहरात ९३.०५ टक्के गट हे कर्जफेड करतात तर उर्वरीत ६.९५ टक्के गट हे कर्जफेड करीत नाहीत. नाशिक शहरापेक्षा मालेगाव शहरातील गटांकडून अधिक प्रमाणात कर्जपरतफेड केली जात आहे.

५) नाशिक जिल्ह्यातील शहरी गटांनी घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीचे प्रमाण (नियमित व अनियमित) ९१.५९ टक्के इतके असण्याच्या कारणांचा शोध घेतला असता.

- एकूण गटांपैकी ७३.०१ टक्के गट हे मिळणाऱ्या नफ्यातून कर्जाची नियमितपणे कर्जाची परतफेड करीत आहेत.
- कर्ज फेडण्यासाठी नफा प्रमाण कमी पडते तेव्हा गटाच्या खात्यावर बचतीच्या माध्यमातून असणाऱ्या शिल्लकीतून आवश्यक तेवढी रक्कम वर्ग केली जाते.

- एकूण गटांपैकी १५.५८ टक्के गट हे नफा प्रमाण कमी असल्यामुळे किंवा नफा मिळत नसल्यामुळे कर्जाची नियमितपणे कर्जफेड करु शकत नाही. परंतु घेतलेल्या कर्जापैकी आवश्यक असणाऱ्या कर्जाची फेड झाल्याशिवाय अनुदानाचा लाभ मिळत नाही म्हणून अनुदानाचा लाभ मिळविण्यासाठी बचत रकमेचा वापर केला जातो. तसेच काही गटातील महिला कर्ज फेडीसाठी ठराविक कालावधीनंतर बचत रक्कमेव्यतिरिक्त प्रत्येकी ठराविक रक्कम जमा करुन कर्जफेड करीत आहेत.
- एकूण गटांपैकी ८.४१ टक्के गटांनी घेतलेले कर्ज फेडणे बंद केलेले आहे. कारण अ) गटांना नफा मिळत नसल्याने कर्ज फेडीची क्षमता नाही. ब) काही गटातील महिलांचा उद्देश फक्त कर्ज मिळविणे हाच होता. क) गटातील महिलांमध्ये मतभेद असल्यामुळे कर्जफेड होत नाही. ड) गटांचे व्यवहार पुर्णपणे बंद असल्यामुळे कर्जफेडीची जबाबदारी कुणीही स्विकारण्यास तयार नाही. इ) नाशिक शहरापेक्षा मालेगाव शहरात कर्जफेड बंद असल्याचे प्रमाण तुलनेने कमी आहे. कारण इस्लाममध्ये कर्जाचे ओझे असणे किंवा कर्जफेड न करणे निश्चिद्ध मानलेले आहे. म्हणून कर्ज फेडीचे प्रमाण अधिक आहे.

### ६.४.११ विक्री व्यवस्थेचे स्वरुप

युद्धाची फलश्रृती जशी तहाच्या अटीवर अवलंबून असते. तशीच उत्पादन व व्यवसायाची फलश्रृती ही विक्री व्यवस्थेवर अवलंबून असते. शिवाय अलीकडील आधुनिक काळातील स्पर्धेच्या स्थितीत विक्री व्यवस्था उत्तम असणे आवश्यक असते. नाशिक जिल्ह्यातील शहरी स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून विविध प्रकारचे व्यवसाय उपक्रम सुरु आहेत.

### सारणी ४४ : विक्री व्यवस्थेचे स्वरुप

| तपशिल | एकूण गट | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १. भाडे तत्त्व | ३९ | १७.२५ | २९ | १८.८३ | १० | १३.८८ |
| २. किरकोळ विक्री | १७० | ७५.२२ | ११२ | ७२.७२ | ५८ | ८०.५६ |
| ३. घरगुती वापर | १७ | ७.५३ | १३ | ८.४५ | ४ | ५.५६ |
| **एकूण (१ ते ३)** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |
| ४. फक्त शहरात विक्री | १११ | ४९.११ | ७९ | ५१.३० | ३२ | ४४.४४ |
| ५. स्थानिक विक्री | ९३ | ४१.१५ | ६३ | ४०.९० | ३० | ४१.६६ |
| ६. प्रादेशिक विक्री | १७ | ७.५२ | १० | ६.५० | ७ | ९.७३ |
| ७. राष्ट्रीय विक्री | ५ | २.२२ | २ | १.३० | ३ | ४.१७ |
| **एकूण (४ + ७)** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी ४४ मध्ये दर्शविल्यानुसार १) नाशिक जिल्ह्यातील शहरी गटांपैकी ७५.२२ स्वयंरोजगारी गट हे किरकोळ विक्री वर भर देतात. प्रामुख्याने दुध, किराणा, चप्पल, कटलरी, बांगडी, एम्ब्राईडरी, झाडू टोपली, भंगार, फळे, भाजीपाला इ. सारख्या व्यवसायातील वस्तुंची किरकोळ विक्री केली जात आहे. २) एकूण व्यवसायांपैकी १७.२५ टक्के व्यवसायातील वस्तू ह्या भाडे तत्वावर वापरासाठी दिला जातो. जसे ढेलागाडी, शिलाई मशीन, लग्न समारंभासाठी मंडप डेकोरेशन, व्हॅन, ॲपे, गिफ्ट आर्टिकल्स (कट्यार, फेटे, शाळांसाठी फॅन्सी ड्रेस) इ. सारखा व्यवसायातील वस्तु भाड्याने दिल्या जातात. ३) तसेच एकूण व्यवसायापैकी शिलाई मशिन, एम्ब्रायडरी या व्यवसायातील ७.५३ टक्के सदस्य प्रामुख्याने घरातील व्यक्तींची कपडे मोबदला घेऊन शिवणकाम करीत असतात. ४) नाशिक आणि मालेगाव शहरातील गटांच्या व्यवसायातील विक्री व्यवस्थेचा विचार केला असता नाशिक शहरात किरकोळ विक्रीचे प्रमाण ७२.७२ टक्के असून भाडेतत्व व घरगुती वापर प्रमाण २७.२८ टक्के आहे. तर मालेगाव शहरात हे किरकोळ विक्रीचे प्रमाण ८०.५ टक्के असून भाडे तत्वावर वस्तु देणे व वस्तुचा घरगुती वापर यांचे एकत्रित प्रमाण १९.४४ टक्के इतके आहे. म्हणजे नाशिक पेक्षा

मालेगाव शहरात गटाच्या व्यवसायातील वस्तुंचा विना मोबदला घरगुती वापर कमी मोबदल्यात भाडे तत्वावर वस्तूंचा वापर कमी आहे.

### ६.४.१२ गटांना मिळणारा नफा


कोणत्याही व्यावसायिकांचे व्यवसाय चालवितांना आर्थिक व आर्थिकेतर ध्येय असतात. आर्थिक ध्येयात महत्तम नफा हे प्रमुख ध्येय असते. स्वयंसहाय्यता गट हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांच्या धन व्यवहारांचे प्रमुख केंद्र म्हणून साकारत असतांना नफा हे प्रमुख ध्येय असते. नाशिक व मालेगाव शहरात अध्ययनासाठी निवडलेल्या स्वयंरोजगारी गटांना मिळणारा नफा दर्शविणारी सारणी....

**सारणी ४५ : स्वयंसहाय्यता गट सदस्यांना मिळणारा दरमहा नफा**

| प्रतिसदस्य नफा रक्कम | एकूण सदस्य | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १. नफा नाही | १६ | ७.०५ | १२ | ७.७९ | ४ | ५.५६ |
| २. रू. १०० ते रू. ६०० | ४६ | २०.३५ | ३६ | २३.३७ | १० | १३.८९ |
| ३. रू. ६०१ ते रू. १००० | १२० | ५३.१० | ८७ | ५६.५० | ३३ | ४५.८३ |
| ४. रू. १००१ ते रू. २००० | ४४ | १९.५० | १९ | १२.३४ | २५ | ३४.७२ |
| **एकूण** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

**आलेख १० : स्वयंसहाय्यता गट सदस्यांना मिळणारा दरमहा नफा (% प्रमाण)**




**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

नाशिक जिल्ह्यातील नाशिक व मालेगाव शहरातील शहरी स्वयंसहाय्यता गटांच्या प्रतिसदस्यांना प्रतिमहिना किती नफा मिळतो याचे बाबतीत आढळून आलेली स्थिती...

१. स्वयंसहाय्यता गटांनी सुरु केलेल्या एकूण व्यवसायांपैकी ५३.१० टक्के व्यवसायापासून सहभागी प्रत्येक सदस्यांना प्रतिमहिना रुपये ५०१ ते १००० नफा मिळत आहे. दुधविक्री, धान्यविक्री, चप्पल विक्री, पिठाची गिरणी, किराणा व भुसार, गिफ्ट आर्टिकल्स, दोरखंड बनविणे इत्यादी सारख्या व्यवसायापासून नफा मिळत आहे.

२. एकूण व्यवसायांपैकी/ उपक्रमांपैकी १९.५० टक्के व्यवसायापासून प्रतिसदस्य, प्रतिमहिना रुपये १००१ ते २००० दरम्यान नफा मिळत आहे. म्हैसपालन, कुकुटपालन, पोषण आहार, काजू प्रक्रिया, खानवळ, सफाई ठेका, कापड, रेडिमेड कपडे विक्री, नर्सरी, फळ, भाजीपाला विक्री, लग्नमंडप, वाहन, वीटभट्टी इत्यादी सारख्या व्यवसायांपासून प्रामुख्याने अधिक नफा मिळत आहे.

३. एकूण व्यवसायांपैकी २०.३५ टक्के व्यवसायापासून प्रतिसदस्य, प्रतिमहिना रुपये १०० ते ६०० नफा मिळत आहे. ढेलागाडी, एम्ब्राडरी, भांडे विक्री, भंगार विक्री, झाडू– टोपली बनविणे इत्यादी सारख्या व्यवसायापासून कमी नफा मिळतो.

४. एकूण व्यवसायपैकी ७.०५ टक्के व्यवसायापासून प्रतिसदस्य,प्रतिमासह कुठल्याही प्रकारचा नफा मिळत नाही. कारण हे व्यवसाय परवडत नसल्यामुळे बंद आहे. प्रामुख्याने शिलाई मशिन, भांडे. इत्यादी सारख्या व्यवसायापासून नफा मिळत नाही. कारणे...

- विना प्रशिक्षण एकाच गल्ली, मोहल्ल्यात गटातील सर्वच सदस्यांना शिलाई मशिन पुरविण्यात आल्यामुळे स्पर्धा वाढून कुणाचाच व्यवसाय चालत नाही. घरातील जुने कपडे शिवण्यासाठीच मशिन बहुतांशी वापरले जात आहे.

- काही गटांनी अनुदान मिळविण्यासाठीच व्यवसाय सुरु केले. कोटेशन कर्ज मिळवून घेतले आणि अनुदान वाटप आपापसात करुन घेतले. त्यामुळे व्यवसाय सुरुवात व शेवट एकच झाला.
- व्यवसायासाठी घेतलेले भांडे घरगुती वापरासाठी किंवा नातेवाईकांना देण्यासाठी वापरले जात असल्याचे आढळून आले. कारण भांड्यांना भाडे मिळत नाही, भाडे मिळाले तरी अत्याल्प असते, त्यातुन भांड्यांची स्वच्छता यावरून सदस्यांमध्ये मतभेद होत असल्याचे आढळून आले.
- व्यवसाय सुरूवातीच्या काळात विक्रीतून मिळालेल्या पैस्यांचा अपहार होतो. असा सदस्य महिला एकमेकांवर संशय घेतात. आणि त्यातून एकमेकांमध्ये वाद निर्माण झालेला आढळून आला.
- व्यवसायासाठी दुकानात कुणी काय काम करावे, शिक्षित अशिक्षित असा वाद निर्माण झालेला आहे. त्यामुळे नुकसान झाले तर सर्वांचे होईल या निर्णयाप्रत सदस्य येऊन दुर्लक्ष होते. त्यामुळे नफा मिळत नाही.

५. एकूण व्यवसायांपैकी रुपये ६०१ ते २००० नफा मिळविणारे ७२.६० टक्के गटांचे व्यवसाय हे सदस्यांच्या आर्थिक सबलीकरणाद्वारे दारिद्र्य निर्मुलनास सहाव्य ठरलेले आहे. उर्वरित नफा न मिळणारे व रुपये १०० ते ६०० नफा मिळणारे २०. ३५ टक्के गटाचे व्यवसाय सदस्यांचे आर्थिक सबलीकरणाद्वारे दारिद्र्य निर्मूलन घडवून आणण्यात सहाव्यक ठरलेले नाही.

६. नाशिक आणि मालेगाव शहरातील गटांच्या व्यवसायापासून मिळणाऱ्या नफ्याचा तुलनात्मक आढावा घेतला असता अ) नाशिक शहरातील ५६.५० टक्के गटांना प्रतिसदस्य रुपये ६०१ ते १००० प्रतिमाह नफा मिळतो आणि १२.३४ टक्के गटांच्या व्यवसायातील सदस्यांना रु. १००१ ते २००० नफा मिळतो. नाशिक शहरात एकूण गटांपैकी ६८.८४ टक्के गटांना रुपये ६०१ ते २००० पर्यंत नफा मिळतो. तर मालेगाव शहरातील एकूण गटांपैकी ४५.८३

टक्के गटांच्या व्यवसायातील सदस्यांना रु. ६०१ ते १००० पर्यंत व ३४.३२ टक्के गटांच्या व्यवसायातील सदस्यांना १००१ ते २००० पर्यंत नफा मिळतो. म्हणजे एकूण गटांच्या व्यवसायांपैकी ८०.५५ टक्के गटांच्या सदस्यांना रुपये ६०१ ते २००० पर्यंत प्रतिमाह नफा मिळतो. नाशिक शहराच्या तुलनेत मालेगाव शहराचे प्रमाण ११.७१ टक्के अधिक आहे. ब) नाशिक शहराच्या तुलनेत मालेगाव शहरात रु. १००१ ते २००० पर्यंत नफा मिळविणाऱ्या गटांचे प्रमाण तुलनेने २१.८८ टक्केने अधिक आहे. क) नाशिक शहरातील ६८.८४ टक्के गट महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाद्वारे दारिद्र्य निर्मुलनात सहाय्यक ठरलेले आहेत. तर मालेगाव शहरातील ८०.५५ टक्के गट कुटूंबाचा आकार मोठा असूनही नफा प्रमाण अधिक असल्यामुळे आर्थिक सबलीकरणाद्वारे सदस्यांच्या दारिद्र्य निर्मुलनात सहाय्यक ठरलेले आहेत. ड) नाशिक शहरातील नफा न मिळणारे व कमी नफा मिळणारे असे एकूण ३१.१६ टक्के गट व मालेगाव शहरातील १९.४५ टक्के गट हे आर्थिक सक्षमीकरणात अपयशी ठरलेले आहे. ई) मालेगाव शहरातील गट नाशिक शहराच्या तुलनेत नफ्याचे प्रमाण अधिक ठेवून उत्पन्न मिळवून देण्यात अधिक पुढे असल्याचे आढळून येते.

७. नाशिक शहरात अधिक गटांना थोडे– थोडे कर्ज देवून खुष करण्याचा प्रयत्न झालेला आहे. व्यवसायाचे स्वरुप अत्यंत लहान म्हणून नफा प्रमाण कमी आहे. तर मालेगाव शहरात अधिक प्रमाणात व्यवसाय गरज लक्षात घेऊन कर्ज रक्कम देण्यात आली. त्यामुळे व्यवसायाचे स्वरुप वाजवी होऊन नफ्याचे प्रमाणही अधिक आहे. म्हणजे कर्ज रक्कम हा व्यवसाय व नफ्यावर प्रभाव पाडणारा महत्त्वपुर्ण घटक ठरलेला आहे.

### ६.४.१३ गटांची व्यवहार विषयक स्थिती

स्वयंसहाय्यता गट हे महिला सबलीकरणाचे साधन म्हणून सर्वदूर प्रचलित झालेले आहे. परंतु सबलीकरण तेव्हाच शक्य आहे जेव्हा गटांच्या माध्यमातून

होणारे मन व्यवहार व धनव्यवहार योग्य पध्दतीने होत असतील. जोपर्यंत गटाच्या माध्यमातून होणारे मनव्यवहार व धनव्यवहार उत्तम स्थितीत असतात तोपर्यंत गटांची स्थिती समाधानकारक मानली जाते. मात्र गटांचे मनव्यवहार व धनव्यवहार हे योग्य पध्दतीने होत नाहीत तेव्हा गटांची स्थिती असमाधानकारक मानली जाते. गटांच्या माध्यमातून मनव्यवहार व धनव्यवहार ठप्प असतील तेव्हा गटाची स्थिती बंद स्वरुपाची मानली जाते. गटांच्या माध्यमातून होणारे व्यवहार अधिक संख्येने समाधानकारक असणे स्वयंसहाय्यता गट चळवळीस व त्या चळवळीपासून घडून येणाऱ्या महिला सबलीकरणासाठी उपकारक ठरणारे असते. या दृष्टीने नाशिक जिल्ह्याच्या शहरी स्वयंसहाय्यता गटांची स्थितीचे अध्ययन पुढील सारणीत दर्शविल्याप्रमाणे आहे.

**सारणी ४६ : स्वयंसहाय्यता गटांची व्यवहार स्थिती**

| व्यवसाय स्थिती | एकूण गट | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १. उत्कृष्ट | १६७ | ७३.९० | १०९ | ७०.७७ | ५८ | ८०.५५ |
| २. सर्वसाधारण | ४३ | १९.०२ | ३३ | २१.४४ | १० | १३.८९ |
| ३. निकृष्ट | १६ | ७.०८ | १२ | ७.७९ | ४ | ५.५६ |
| **एकूण** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

महिला स्वयंसहाय्यता गटांनी अप्रगतीकडून प्रगतीकडे आणि प्रगती कडून स्वावलंबनाकडे वाटचाल करणे अपेक्षित असते. नाशिक जिल्ह्यात स्थापन झालेल्या गटांची व्यवहार स्थिती दर्शविणाऱ्या सारणीवरुन पुढील निष्कर्ष काढता येतात.


१. एकूण महिला स्वयंसहाय्यता गटांपैकी ७३.९० टक्के गटांचे व्यवहार अत्यंत उत्कृष्ट (समाधानकारक) स्थितीत आहेत. हे गट महिलांच्या सबलीकरणात महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहेत.


२. एकूण स्वयंसहाय्यता गटांपैकी १९.०२ टक्के गटांचे व्यवहार हे संथगतीने, अनियमित व अयोग्य पद्धतीने व्यवहार सुरू आहे. फिरता निधी आपापसात वाटून घेणे, फक्त अनुदान मिळविण्यासाठीच कर्ज घेणे,

विश्वासाची कमतरता असणे इ. सारखे व्यवहार गटात होतांना आढळून आले. त्यामुळे हे गट महिला सबलीकरणाबाबत पुर्णपणे योगदान देत नाहीत. अशा गटांची स्थिती प्रबोधनाद्वारे सुधारता येण्यासारखी आहे.

३. एकूण गटांपैकी ७.०८ टक्के गटांचे व्यवहार पुर्णतः ठप्प झालेले आहे. गटात सहभागी झालेल्या महिलांनी मनव्यवहारासाठी दरमहा बैठका घेऊन एकमेकींच्या गरजा समजून घेणे अपेक्षित असते. मात्र दरमहा बैठका घेणे बंद केलेले आहे. तसेच धन व्यवहारांतर्गत फरक करून दरमहा बचत करणे सुद्धा बंद केलेले आहे. परिणामी व्यवहारात नफा मिळणे, कर्जफेड नियमतीपणे होणे याबाबत समस्या निर्माण झालेल्या आहेत.

**आलेख ११ : स्वयंसहाय्यता गटांची व्यवहार स्थिती (शेकडा प्रमाण)**




**स्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

४. नाशिक व मालेगाव शहरातील गटांच्या व्यवहार स्थितीचा तुलनात्मक आढावा घेतला असता मालेगाव शहरातील गटांची स्थिती अधिक प्रमाणात उत्कृष्ट स्वरुपाची आहे. कारण नाशिक शहरातील ७०.७७ टक्के तर मालेगाव शहरातील ८०.५५ टक्के गट हे समाधानकारक पातळीवर आहेत. म्हणजे नाशिक शहर हे सरासरीपेक्षा मागे तर मालेगाव शहर सरासरीपेक्षा पुढे आहे. नाशिक शहरातील २१.४४ टक्के गटांचे व्यवहार असमाधानकारक व ७.७९ टक्के गटांचे व्यवहार बंद असे एकूण २९.२३ टक्के गटांचे व्यवहार असमाधानकारक स्थितीत आहेत. तर मालेगाव शहरात हे प्रमाण १३.८९ टक्के व ५.५६ टक्के इतके एकूण १९.४५ टक्के इतके आहे. मालेगाव शहरातील

असमाधानकारक व्यवहार करणाऱ्या गटांचे प्रमाण तुलनेने कमी आहे. मात्र असमाधानकारक गटांचे प्रमाण कमी– अधिक असणे हे तुलनेसाठी योग्य असले तरी कोणत्याही परिस्थितीत असमाधानकारक गटांचे अस्तित्व असणे हे स्वयंसहाय्यता गट चळवळीच्या सर्वांगीण व निकोप प्रगतीसाठी स्विकाहार्य ठरणारे नसावे.

५. स्वयंसहाय्यता गटांच्या असमाधानकारक व्यवहारांमागे असणाऱ्या कारणांचा शोध घेतला असता आढळून आलेली तथ्ये– फिरत्या निधीचा वापर गटांतर्गत कर्ज देवाण– घेवाणीसाठी वेळोवेळी होणे हा हेतु सदस्यांना माहिती नाही, समुह संघटीकडून पुरेसे, वेळोवेळी नियमितपणे मार्गदनर्शन मिळत नाही, गटात सहभागी होण्याबाबतची पुर्ण माहिती सभासद महिलांना नाही, कर्ज मिळण्याचे प्रमाण अत्यंत अपुरे असणे उद्योगातील नफ्याचा अभाव, सदस्यांमध्ये एकतेचा व विश्वासाचा अभाव इ. सारख्या कारणांमुळे व्यवहारात अडथळे निर्माण झालेले आढळूनआलेले आहेत.

६. नाशिक शहरात बंद असणाऱ्या गटांमध्ये ५0 टक्के गटांचे आर्युमान सात वर्षापेक्षा अधिक आहे. म्हणजे गटांचे आर्युमान वाढतांना गटांच्या व्यवहारात संख्यात्मक व गुणात्मक वाढ होणे अपेक्षित असते. मात्र अमंल बजावणीच्या पातळीवर त्रुटी असल्यामुळे नाशिक शहरात वाढते आर्युमान हे गटांच्या व्यवहारांवर विपरीत परिणाम घडवून आणीत आहे.

### ६.४.१४ व्यवसाय प्रशिक्षण उपलब्धता

व्यवसाय प्रशिक्षण हे व्यावसायिकमध्ये यांत्रिक व तांत्रिक कौशल्य निर्मिती व गतिमानता वृद्धींगत होणेसाठी सहाय्यक ठरणारे असते. म्हणून स्वयंसहाय्यता गट सदस्यांना महानगरपालिकेच्या माध्यमातून शासनाकडून व्यवसाय प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.

**सारणी ४७ : व्यावसायिक महिलांना प्रशिक्षण उपलब्धता**

| तपशिल | एकूण गट | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १. प्रशिक्षण आवश्यक नाही | ३३ | १४.६० | २१ | १३.६४ | १२ | १६.६६ |
| २. प्रशिक्षण उपलब्ध नाही | ११६ | ५१.३२ | ७८ | ५०.६५ | ३८ | ५२.७८ |
| ३. प्रशिक्षण उपलब्धता | ७७ | ३४.०८ | ५५ | ३५.७१ | २२ | ३०.५६ |
| • प्रशिक्षण उपयुक्त | ४८ | ६२.३४ | ३४ | ६१.८२ | १४ | ६३.६३ |
| • प्रशिक्षण अनुपयुक्त | २९ | ३७.६६ | २१ | ३८.१८ | ८ | ३६.३७ |
| • प्रशिक्षण कालावधी पुरेसा | ५३ | ६८.८३ | ३७ | ६७.२७ | १६ | ७२.७२ |
| • प्रशिक्षण कालावधी अपुरा | २४ | ३१.१७ | १८ | ३२.३३ | ६ | २७.२७ |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्र. ४७ वरुन

१. एकूण व्यावसायिक गटांपैकी ठेला गाडी, विटभट्टी, गुरेपालन, सफाई ठेका, झाडू– टोपली बनविणे इ. १४.६० टक्के गटातील सदस्यांच्या मते आम्हाला व्यवसायासाठी प्रशिक्षणाची गरज नाही. याचे कारण विचारले असता ठेला गाडी भाड्याने देणे किंवा स्वत: ढकलण्यासाठी व ठेला गाडी ढकलून लहान व्यवसाय करण्यासाठी प्रशिक्षण गरजेचे नाही तसेच परंपरागत व्यवसाय कौशल्य असल्यामुळे विटभट्टीचा व्यवसाय, पशु पालन, साफसफाई, झाडू – टोपली या व्यवसायात प्रशिक्षणाची गरज नाही.

२. एकूण व्यावसायिक गटांपैकी शिलाई व एम्ब्रॉडरी, काजू प्रक्रिया, मेणबत्ती, फिनाईल, साबन, गिफ्ट आर्टिकल्स, दुग्ध व्यवसाय नर्सरी, वाहन चालविणे, रेडीमेड कापड तयार करणे व विक्री इ. सारख्या ३४.०८ टक्के गटांतील सभासद महिलांना प्रशिक्षणाचा लाभ मिळालेला आहे. म्हणजे प्रशिक्षण संधीची उपलब्धता फक्त १/३ गटांना झालेली आहे.

३. एकूण व्यावसायिक गटांपैकी ५१.३२ टक्के गटांना आवश्यक असतांना ही प्रशिक्षण सोपीची उपलब्धता झालेली नाही. त्यामुळे व्यवसायाच्या व्यावहारिक, लाभ क्षमतेवर परिणाम झालेले दिसून येतात. इतर

व्यवसायासाठी प्रशिक्षण उपलब्धता नसणे ठरवून दिलेला कार्यक्रम राबविण्याबाबत लवचिकता नसणे हे दोष आहेत.

४. एकूण व्यावसायिक गटांपैकी फक्त ३४.०८ टक्के गटांना प्रशिक्षण सुविधा उपलब्ध झालेली असतांना या गट सदस्यांपैकी फक्त ६२.३४ टक्के सदस्यांनाच मिळालेले प्रशिक्षण उपयुक्त वाटते. उर्वरित ३७.६६ टक्के सदस्यांना प्रशिक्षण उपयुक्त वाटत नाही. तसेच प्रशिक्षण सुविधा उपलब्ध झालेल्या सदस्यांपैकी ६८.८३ टक्के सदस्यांच्या मते प्रशिक्षण कालावधी पुरेसा होता तर ३२.१३ टक्के गटांच्या सदस्यांच्या मते मिळालेल्या प्रशिक्षणाचा कालावधी अपुरा होता.

५. नाशिक आणि मालेगाव शहरातील व्यावसायिक गटांच्या सदस्यांना मिळालेल्या प्रशिक्षण सुविधेची उपलब्धता तुलनात्मक दृष्टीने विचारात घेतली असता नाशिक शहरापेक्षा मालेगाव शहरात परंपरागत व्यवसाय करणाऱ्या सदस्यांचे प्रमाण ०३.०२ टक्के अधिक असल्यामुळे प्रशिक्षणाची गरज नसणाऱ्या गटांचे प्रमाण अधिक आहे. तर नाशिक शहरात मालेगाव शहरापेक्षा ५.१५ टक्के गटांना प्रशिक्षण सुविधा अधिक प्रमाणात उपलब्ध आहेत. मात्र मालेगाव शहरात प्रशिक्षण उपयुक्तता व प्रशिक्षण कालावधी पुरेसा आहे. याबाबत प्रमाण थोडे अधिक आढळून येते. थोडक्यात प्रशिक्षण उपलब्धता दोन्ही शहरात प्रमाण फारच कमी असून कमी अधिक प्रमाणात संमिश्र वातावरण आढळून येते.

६. ज्या व्यावसायिक गटांना प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. अशा सर्व गटांना प्रशिक्षण सुविधांची उपलब्धता होणे, मिळणारे प्रशिक्षण उपयुक्त असणे, प्रशिक्षणाचा कालावधी पुरेश असणेची अपेक्षा लाभार्थीकडून व्यक्त करण्यात आलेली आहे.

### ६.४.१५ रोजगार निर्मिती

बेरोजगारी आणि दारिद्र्य यांचा अत्यंत जवळचा संबंध असतो म्हणून भारतात स्वातंत्र्योत्तर काळात दारिद्र्य निर्मुलनसाठी अनेक रोजगार निर्मितीच्या योजना राबविण्यात आलेल्या आहेत. परंतु राबविण्यात आलेल्या योजनांना अपेक्षित यश मिळाले नाही. २००१ च्या जनगणनेनुसार शहरी भागातील फक्त ११.५५ टक्के महिलांनाच रोजगार मिळतो. तात्पुरत्या रोजगार निर्मितीच्या माध्यमातून शाश्वत उत्पन्न निर्मिती न होता दारिद्र्य निर्मुलन घडवून आणता आले नाही म्हणून स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून चालविले जाणाऱ्या स्वयंव्यवसायाचा कडून कायम स्वरुपाची रोजगार निर्मिती होऊन शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल व दारिद्र्य निर्मुलनात सहाय्य मिळणे अपेक्षित आहे. या दृष्टीने नाशिक जिल्ह्यातील शहरी स्वयंसहाय्यता गटांच्या रोजगार निर्मितीचा आढावा उपयुक्त ठरणारा आहे.

**सारणी ४८ : रोजगार निर्मिती स्वरुप**

| रोजगार स्वरूप | एकूण गट | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १. वैयक्तीक रोजगार | ५७ | २५.२२ | ३७ | २४.०३ | २० | २७.७८ |
| २. सामुहिक रोजगार | १६९ | ७४.७८ | ११७ | ७५.९७ | ५२ | ७२.२२ |
| **एकूण (१ + २)** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |
| ३. अर्धवेळ रोजगार | ६७ | २९.६५ | ५० | ३२.४७ | १७ | २३.६१ |
| ४. पूर्णवेळ रोजगार | १५९ | ७०.३५ | १०४ | ६७.५३ | ५५ | ७६.३९ |
| **एकूण (३ + ४)** | **२२६** | **१००.००** | **१५४** | **१००.००** | **७२** | **१००.००** |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्र. ४८ वरुन

१. एकूण स्वयंरोजगारी गटापैकी शिलाई मशिन, एम्ब्रॉडरी ढेला गाडी, फळे व भाजीपाला विक्री, झाडू, टोपली बनविणे इ. सारखे २५.२२ टक्के गट प्रत्येक सदस्यांना वैयक्तीक व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य देत आहे. गटाने सामुहिक जबाबदारीच्या आधारावर प्रत्येक सदस्यात शिलाई मशिन, एम्ब्रॉडरी मशिन, ढेला गाडी, फळे व भाजीपाला विक्रीचे साहित्य, झाडू –

टोपली साहित्य खरेदीसाठी व भांडवल म्हणून समान रक्कम बँकेकडून उपलब्ध करुन दिलेली आहे.

२. एकूण स्वयंरोजगारी गटांपैकी ७४.७८ टक्के गट हे सर्व सदस्यांना एकाच व्यवसायाद्वारे सामुहिक रोजगार पुरवित आहेत.

३. स्वयंरोजगारी गट हे अत्यंत कमी ते कमी गुंतवणूकीच्या आधारे अर्ध व पुर्ण रोजगार स्वरुपाच्या रोजगार संधीची उपलब्धता होत असते. नाशिक जिल्ह्यातील एकूण स्वयंरोजगारी गटांपैकी २९.६५ टक्के गट हे अर्धवेळ व प्रामुख्याने ७०.३५ टक्के गट हे पुर्णवेळ रोजगार पुरवित आहेत. म्हणजे ७०.३५ टक्के महिलांना पुर्णवेळ रोजगार पुरवून बेरोजगारी कमी करण्यात गट हे अत्यंत महत्त्वपुर्ण भूमिका बजावत आहेत.

४. नाशिक आणि मालेगाव शहरातील रोजगार निर्मितीच्या बाबत असणारी तुलनात्मक स्थिती विचारात घेतली असता. नाशिक शहरातील ७५.९७ टक्के व मालेगाव शहरातील ७२.२२ टक्के गट हे सामुहिकपणे रोजगार पुरवठा करीत आहेत. तर मालेगाव शहरात २७.७८ टक्के गट व नाशिक शहरात २४.०३ टक्के गट हे वैयक्तीक रोजगार पुरवित आहेत.

५. नाशिक आणि मालेगाव शहरातील एकूण गटांपैकी नाशिक व मालेगाव या दोन्ही शहरांमध्ये पुर्णवेळ रोजगार उपलब्ध करुन देणाऱ्या गटांचे प्रमाण अधिक आहे. मात्र नाशिक शहरापेक्षा (६७.५३ टक्के) मालेगाव शहरात (७६.३९ टक्के) पुर्णवेळ रोजगार पुरविणाऱ्या गटांचे प्रमाण उल्लेखनीय प्रमाणात ८.८६ टक्के इतके जास्त आहे. नाशिक शहरात अर्धवेळ रोजगार उपलब्ध करुन देणाऱ्या गटांचे प्रमाण अधिक असून मालेगाव शहरात हे प्रमाण कमी आहे.

६. अर्धवेळ रोजगार पुरविणाऱ्या गटांमध्ये शिलाई, एम्ब्रॉडरी, ठेला गाडी यासारख्या वैयक्तीक स्वरुपाच्या व्यवसायात व मंडप डेकोरेटर्स, कापड विक्री, भांडे विक्री, ॲपे रिक्षा, वाहन, पादत्राणे विक्री इत्यादी सारख्या सामुहिक व्यवसायांचा प्रामुख्याने समावेश आढळून येतो. अर्धवेळ रोजगार

उपलब्ध करुन देणाऱ्या व्यवसायांचे पुर्णवेळ रोजगार निर्मिती व्यवसायात रुपांतर घडवून आणणे आवश्यक आहे. त्यासाठी वैयक्तीक व्यावसायिकांना जोड व्यवसायासाठी कर्ज फेड झाल्यानंतर त्वरित दुसऱ्या व्यवसायासाठी कर्ज मिळणे आवश्यक आहे. सामुहिक व्यावसायिकांना, सर्व सदस्यांना व्यवसायात सामावून घेणे अवघड असते म्हणून एका गटास दोन किंवा तीन व्यवसायासाठी विभागून कर्ज मिळणे गरजेचे आहे.

### ६.४.१६ आर्थिक गरजांची पुर्तता


आर्थिक सबलीकरणाद्वारे दारिद्र्य निर्मूलन हा स्वयंसहाय्यता गट स्थापनेचा प्रमुख उद्देश असतो. स्वयंसहाय्यता गटाच्या सहाय्याने होणाऱ्या सुक्ष्म वित्त व्यवसहारामुळे आर्थिक गरजांची पुर्तता होऊन आर्थिक सबलीकरण होणे अपेक्षित असते.

**सारणी ४९ : आर्थिक गरजांच्या पुर्ततेची स्थिती**

| तपशिल | एकूण गट | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १. घरखर्च | १६० | ७०.८० | १०४ | ६७.५३ | ५५ | ७७.७७ |
| २. वैयक्तीक व्यवसाय | १२७ | ५६.१९ | ८० | ५१.९५ | ४७ | ६५.२८ |
| ३. मुलांचे शिक्षण | १४३ | ६३.२७ | ९४ | ६१.०४ | ४९ | ६८.०६ |
| ४. आरोग्य | ६१ | २६.९९ | ४५ | २९.२२ | १६ | २२.२२ |
| ५. सण - समारंभ | १३० | ५७.५२ | ९० | ५८.४४ | ४० | ५५.५५ |
| ६. प्रवास | १५ | ६.६३ | ९ | ५.८४ | ६ | ८.३३ |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

### आलेख १२ : आर्थिक गरजांच्या पुर्ततेची स्थिती




**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्र.४९ वरुन

१. नाशिक जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता गटाच्या सदस्यांनी कुटूंबाच्या दैनंदिन गरजा म्हणजे घरखर्च भागविण्यासाठी प्राधान्य दिलेले आहे. अध्ययनासाठी निवडण्यात आलेल्या एकूण महिलांपैकी ७०.८० टक्के महिला सदस्यांचा मिळणाऱ्या उत्पन्नातून घरखर्च भागविला जातो.

आर्थिक गरजांच्या पुर्ततेबाबत नाशिक व मालेगाव शहरातील महिला गटांचे प्रयत्न सकारात्मक आहेत. नाशिक शहरात कुटुंबांतील इतर सदस्यांच्या जोडीला गटातील महिलेची उत्पन्न साथ मिळाल्यामुळे ६७.५३

टक्के घरखर्च भागविला जात आहे. मालेगाव शहरात मुस्लीम महिलांचे कुटुंब मोठे असुनही प्रत्येक लहान मोठा सदस्य लहान मोठी कामे करुन उत्पन्न मिळवित असतात. अशा स्थितीत गटातील महिलेचा उत्पन्न आधार मिळाल्यामुळे ७७.७७ टक्के महिलांच्या कुटुंबाच्या घरखर्च भागविला जात आहे.

२. घरखर्चानंतर मुलांच्या शिक्षणावर खर्च केला जातो. एकूण सदस्यांपैकी ६३.२७ टक्के महिलांच्या मुलांच्या शिक्षणाचा खर्च मिळणाऱ्या उत्पन्नातून भागविला जातो. गटात समाविष्ट झाल्यानंतर शिक्षणाचे महत्त्व कळून आले तसेच स्वत:ला अधिक शिक्षण घेणे शक्य झाले नाही म्हणून मुलांनी शिक्षण घेऊन नोकरी, व्यवसायात नाव कमवावे या विचार धारणेतून शिक्षणावर खर्च केला जातो. नाशिक शहरात ६१.०४ टक्के व मालेगाव शहरात ६८.०६ टक्के सदस्यांचा (मुलींच्या) शिक्षणावरील खर्चाची पुर्तता होते.

३. स्वयसंहाय्यता गटामध्ये कार्यरत असणाऱ्या महिलांच्या कुटूंबाचे वैयक्तीक मालकीचे लहान– लहान व्यवसाय आहेत. अशा व्यवसायासाठी लागणारे भांडवल गटाच्या माध्यमातून होणाऱ्या सुक्ष्म वित्त व्यवहारातुन पुरविले जाते. एकूण सदस्यांपैकी ५६.१९ टक्के सदस्यांनी गटाच्या सामुहिक व्यवसायात काम करता– करता कुटुंबांचा छोटा व्यवसाय सांभाळला किंवा नव्याने सुरु केलेला आहे. नाशिक शहरात रद्दी, प्लास्टीक विक्री, फळे, भाजीपाला, वडापाव, चहा – कॉफी विक्री, स्टेशनरी, झेरॉक्स इ. सारख्या वैयक्तीक व्यवसायाला भांडवल पुरवठा होत असल्यामुळे ५१.९५ टक्के सदस्यांच्या गरजा पुर्ण होत आहेत. मालेगाव शहरात कापड, पाईप, प्लास्टीक व्यवसायाचे प्राबल्य असल्यामुळे भंगार, प्लास्टीक, रद्दी गोळा करुन विक्री करणे, सुत विणाई, सुत कताई, किराणा, चप्पल, खजूर, फळे, भाजीपाला यासारख्या लहान किंवा किरकोळ विक्रीच्या व्यवसायासाठी वित्त उभारणी करणे शक्य होत आहे. त्यामुळे अशा ६५.२८ टक्के व्यवसायांच्या आर्थिक गरजांची पुर्तता करणे शक्य झालेले आहे.

४. आरोग्य सर्वार्थ साधनम् मानले जाते. त्यामुळे कुटुंबाच्या सदस्यांच्या आरोग्यावर होणारा खर्च २६.९९ टक्के सदस्यांकडून भागविला जातो. मालेगाव शहरापेक्षा नाशिक शहरात आरोग्य विषयक खर्चाची पुर्तता अधिक प्रमाणात होत असते. मालेगाव शहरात मुळात आरोग्य विषयक जागृतता कमी आहे. त्यामुळे आरोग्य विषयक खर्च प्रमाण कमी आहे.

५. नाशिक व मालेगाव शहरात प्रामुख्याने हिंदु व मुस्लिम महिलांचे गट असल्यामुळे दीपावली व ईद सारख्या सणांसाठी खर्च करावा लागतो. ५७.५२ टक्के महिलांचा सण, समारंभावरील खर्चाची पुर्तता होत आहे. नाशिक शहरात हिंदू महिलांचे गट अधिक संख्येने असल्याने आणि हिंदूंचे सण अधिक संख्येने असल्यामुळे व उत्सव प्रियता असल्यामुळे ५८.४४ टक्के गटांच्या सदस्यांकडून सण, समारंभावर खर्च केला जातो. मालेगाव शहरात मुस्लीम महिलांचे गट अधिक असल्यामुळे आणि रमजान ईद, मोहरम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, नाताळ असे संख्येने कमी सण व उत्सव असल्यामुळे ५५.५५ टक्के खर्च सण समारंभावर होत आहे.

६. आर्थिक गरजांच्या पुर्ततेत प्रवास खर्चाची पुर्तता होण्यासाठी सुद्धा स्वयंसहाय्यता गटाचा आधार मिळत आहे. एकूण गट सदस्यांपैकी ६.६३ टक्के सदस्यांच्या प्रवास खर्चाची पुर्तता होत आहे. नाशिक शहरात ५.८४ टक्के तर मालेगाव शहरात ८.३३ टक्के सदस्यांची ही गरज पुर्ण होत आहे.

थोडक्यात नाशिक जिल्ह्यातील नाशिक आणि मालेगाव शहरातील महिला स्वयंसहाय्यता गट सदस्यांच्या आर्थिक गरजापुर्तीमध्ये महत्त्वाचे योगदान देत आहेत. त्यामुळे ७०.८० टक्के स्वयंसहाय्यता गट सदस्यांच्या आर्थिक सबलीकरणास सहाय्यक ठरल्यामुळे ७०.८० टक्के सदस्य दारिद्र्यरेषेच्या वरती आलेले आहेत.

नाशिक शहरातील आरोग्य व सण/ समारंभ विषयक गरजांचा अपवाद वगळता इतर सर्व गरजांच्या पुर्ततेबाबत मालेगाव शहरातील गट आर्थिक सबलीकरणात साधारणत: १० टक्केने पुढे असुन अधिक सक्षम आहेत.

### ६.४.१७ बिगर आर्थिक घटकांची पुर्तता

दारिद्र्य रेषेखालील व्यक्तीला प्रामुख्याने महिलांना निवास, पाणी, शौचालय, रोजगार, मुलांचे शिक्षण, भ्रमणध्वनी इ. सारख्या बिगर आर्थिक घटकांची उपलब्धता नसते किंवा उपलब्धता स्थिती अत्यंत दयनीय असते. स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून अशा घटकांची उपलब्धता होणे अपेक्षित असते. स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून उत्पन्नवाढ, जागृतेत वाढ व दबाव गट निर्माण करुन बिगर आर्थिक घटकांची पुर्तता करुन घेणे शक्य होते. शहरी स्वयंसहाय्यता गटांच्या महिला सदस्यांना बिगर आर्थिक घटकांची झालेली उपलब्धता स्थिती खालील सारणीत दर्शविल्याप्रमाणे.

**सारणी ५० : बिगर आर्थिक घटकांची पुर्तता स्थिती (२०१०)**

| घटक तपशिल | नाशिक जिल्हा गट सहभाग | | नाशिक शहर गट सहभाग | | मालेगाव शहर गट सहभाग | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पूर्वी | नंतर | पूर्वी | नंतर | पूर्वी | नंतर |
| **१) निवास** | | | | | | |
| • झोपडी / पाल | १३४ (५९.२९) | १०१ (४४.७०) | ९२ (५९.७४) | ७० (४५.४५) | ४२ (५८.३३) | ३१ (४३.०६) |
| • बांबू / फळ्यांचे निवास | ५८ (२५.६६) | ७९ (३४.९५) | ४० (२५.९७) | ५१ (३३.१२) | १८ (२५.००) | २८ (३८.८९) |
| • कौलारू निवास | २९ (१२.८३) | ३९ (१७.२५) | १९ (१२.३४) | २८ (१८.१८) | १० (१३.८९) | ११ (१५.२७) |
| • सिमेंटचे निवास | ५ (२.२२) | ७ (३.१०) | ३ (१.९५) | ५ (२.२५) | २ (२.७८) | २ (२.७८) |
| **एकूण** | २२६ १०० | २२६ १०० | १५४ १०० | १५४ १०० | ७२ १०० | ७२ १०० |
| **२) पाणी** | | | | | | |
| • ५०० यार्ड पर्यंत नाही | ५२ (२३.००) | ४१ (१८.१४) | ३७ (२४.००) | ३१ (२०.१३) | १५ (२०.८३) | १० (१३.८९) |
| • हातपंप | ९७ (४२.९२) | ८२ (३६.२९) | ६९ (४४.८१) | ६० (३८.९६) | २८ (३८.८९) | २२ (३०.५५) |
| • सार्वजनिक नळ | ५३ (२३.४५) | ४० (१७.७०) | ३२ (२०.७८) | २१ (१३.६४) | २१ (२९.१७) | १९ (२६.३९) |
| • खासगी नळ | २४ (१०.६३) | ६३ (२७.८७) | १६ (१०.३८) | ४२ (२७.२७) | ८ (११.११) | २१ (२९.१७) |
| **एकूण** | २२६ १०० | २२६ १०० | १५४ १०० | १५४ १०० | ७२ १०० | ७२ १०० |

| घटक तपशिल | नाशिक जिल्हा गट सहभाग | | नाशिक शहर गट सहभाग | | मालेगाव शहर गट सहभाग | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पूर्वी | नंतर | पूर्वी | नंतर | पूर्वी | नंतर |
| **३) शौचालय** | | | | | | |
| • खुली (अडोसा) जागा | ८९ (३९.३८) | ६५ (२८.७६) | ६४ (४१.५६) | ४९ (३१.८१) | २५ (३४.७२) | १६ (२२.२२) |
| • सार्वजनिक शौचालय | १०८ (४७.७९) | ९० (३९.८२) | ७२ (४६.५६) | ६२ (४०.२६) | ३६ (५०.००) | २८ (३८.८९) |
| • खासगी शौचालय | २९ (१२.८३) | ७१ (३१.४२) | १८ (११.६९) | ४३ (२७.९२) | ११ (१५.२८) | २८ (३८.८९) |
| **एकूण** | २२६ १०० | २२६ १०० | १५४ १०० | १५४ १०० | ७२ १०० | ७२ १०० |
| **४) रोजगार** | | | | | | |
| • बेरोजगार | ११० (४८.६७) | १६ (७.०७) | ७५ (४८.७०) | १२ (७.७९) | ३५ (४८.६१) | ४ (५.५६) |
| • अकुशल | ८५ (३७.६१) | १४ (६.२०) | ५८ (३७.६६) | ८ (५.१९) | २७ (३७.५०) | ६ (८.३३) |
| • कुशल | ३१ (१३.७२) | १९६ (८६.७३) | २१ (१३.६४) | १३४ (८७.२) | १० (१३.८९) | ६२ (८६.११) |
| **एकूण** | २२६ १०० | २२६ १०० | १५४ १०० | १५४ १०० | ७२ १०० | ७२ १०० |
| **५) मुलांचे शिक्षण** | | | | | | |
| • शिक्षण सोडून काम | ५५ (२४.३३) | १९ (८.४१) | ३४ (२२.०७) | १२ (७.७९) | २१ (२९.३०) | ७ (९.७२) |
| • शिक्षण घेताना काम | १०१ (४४.७०) | ५३ (२३.४५) | ६७ (४३.५१) | ३७ (२४.०३) | ३४ (४७.२२) | १६ (२२.२२) |
| • शिक्षण घेताना काम नाही | ७२ (३०.९७) | १५४ (६८.१४) | ५३ (३४.४२) | १०५ (६८.१८) | १७ (२३.६१) | ४९ (६८.०६) |
| **एकूण** | २२६ १०० | २२६ १०० | १५४ १०० | १५४ १०० | ७२ १०० | ७२ १०० |
| **६) दूरदर्शन** | | | | | | |
| • उपलब्ध नाही | ७९ (९४.९६) | ३० (१३.२७) | ५४ (३५.०७) | १६ (१०.३९) | २५ (३४.७२) | १४ (१९.५४) |
| • कृष्णधवल | ६० (२६.५५) | २८ (१२.३९) | ३३ (२१.४२) | १८ (११.६९) | २७ (३७.५०) | १० (१३.८९) |
| • रंगीत | ८७ (३८.४९) | १६८ (७४.३४) | ६७ (४३.५१) | १२० (७७.७२) | २० (२७.७८) | ४८ (६६.६७) |
| **एकूण** | २२६ १०० | २२६ १०० | १५४ १०० | १५४ १०० | ७२ १०० | ७२ १०० |

| घटक तपशिल | नाशिक जिल्हा गट सहभाग | | नाशिक शहर गट सहभाग | | मालेगाव शहर गट सहभाग | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पूर्वी | नंतर | पूर्वी | नंतर | पूर्वी | नंतर |
| **७) भ्रमणध्वनी** | | | | | | |
| • नाही | १९८ (८७.६१) | १५४ (६८.१४) | १३६ (८८.३१) | ११० (७१.४३) | ६२ (८६.११) | ४४ (६१.११) |
| • होय | २८ (१२.३९) | ७२ (३१.८६) | १८ (११.६९) | ४४ (२८.५७) | १० (१३.८९) | २८ (३८.३९) |
| **एकूण** | २२६ १०० | २२६ १०० | १५४ १०० | १५४ १०० | ७२ १०० | ७२ १०० |

**टिप :** कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात.

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्र. ५० वरून

१. पाऊस, ऊन, वारा, थंडी यापासुन संरक्षण तसेच कुटूंब व्यवस्थेचे अस्तित्व आणि स्थैर्य निर्माण होण्याच्या हेतुने घर किंवा निवास मुलभुत गरज ठरते. निवास व्यवस्थेच्या उपलब्धतेवर व्यक्तीचे जीवनमान अवलंबून असते. या दृष्टीने

- स्वयंसहाय्यता गटात सहभागी होण्यापुर्वी गवत, प्लास्टीक, ताडपत्रीचे छप्पर असणाऱ्या झोपडी, पाल, तंबु या प्रकारच्या निवासात रहाणाऱ्या महिलांचे प्रमाण सर्वाधीक ५९.२९ टक्के इतके अधिक होते. मात्र गट सहभागानंतर निवास व्यवस्थेत सुधारणा होऊन झोपडीत रहाणाऱ्या महिलांचे प्रमाण ४४.७० टक्के पर्यंत कमी झाले.
- बांबू, लाकडी फळया, काड्या-गवत या पासुन भिंती असलेल्या घरामध्ये रहाणाऱ्या महिलांचे प्रमाण गट सहभागापुर्वी २५.६६ टक्के होते. त्यात गट सहभागानंतर ३४.९५ टक्के पर्यंत वाढले.
- मातीच्या भिंती आणि कौलारू छप्पर असणाऱ्या घरांमध्ये रहाणाऱ्या महिलांचे प्रमाण १२.८३ टक्के वरून १७.२५ टक्के पर्यंत वाढले. तर सिमेंटचे छप्पर असणाऱ्या घरांमध्ये रहाणाऱ्या महिलांचे प्रमाण २.२२ टक्के वरून ३.१० टक्के इतके अत्यल्प वाढले.

- झोपडीत निवास असणाऱ्या महिलांचे प्रमाण कमी होऊन लाकडी, कौल व सिमेंटच्या निवासात रहाणाऱ्या एकूण महिलांचे प्रमाण कमी होऊन लाकडी, कौल व सिमेंटच्या निवासात रहाणाऱ्या एकूण महिलांचे प्रमाण १४.५९ टक्के ने वाढले. म्हणजे १४.५९ टक्के महिलांच्या निवास व्यवस्थेत सुधारणा झालेली आहे.

२. पाणी उपलब्धता करून देणाऱ्या सोयींचा प्रभाव जीवनमानावर पडतो. गट सहभागापुर्वी २३.००% गटांना ५०० यार्ड पर्यंत पाणी उपलब्धता नव्हती तसेच हातपंप व सार्वजनिक नळ हे पाणी उपलब्धतेचे स्त्रोत होते. मात्र गट सहभागानंतर वैयक्तिक मालकीच्या खाजगी नळ जोडणीच्या माध्यमातुन पाणी उपलब्धता असणाऱ्या महिलांचे प्रमाण १०.६३% वरून २७.२७% पर्यंत वाढली, म्हणजे १७.२४% पाणी उपलब्धता सोयींमध्ये सुधारणा झाली. महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात जावून नळ कनेक्शन मिळविण्यासाठी दबाव आणत आहेत.

३. महिलांच्या संदर्भात शौचालय उपलब्धता हा लज्जारक्षण व स्वाभिमानाशी निगडीत घटक असतो. गट सहभागापुर्वी ओपन लॅटरीन, सार्वजनिक शौचालय यांचा वापर करणाऱ्या महिलांचे प्रमाण अधिक होते. मात्र गट सहभागानंतर प्रबोधन व आर्थिक उपलब्धता इ. मुळे खाजगी शौचालयांची उपलब्धता व वापर करणाऱ्या महिलांचे प्रमाण १२.८३% ते ३१.४२% पर्यंत वाढले. म्हणजे १८.५९ टक्के महिलांनी शौचालय सोयींमध्ये वाढ घडवुन आलेली आहे.

४. बेरोजगारी ऐवजी रोजगार उपलब्धता हा मानवी भांडवलाच्या वापराशी निगडीत असणाऱ्या घटक असतो. गट सहभागापुर्वी ४८.६७% महिलांच्या श्रम शक्ती, कौशल्यांचा अपव्यय होत होता. मात्र गट सहभागानंतर ७.०७% महिलांचा अपवाद वगळता ९२.९३% महिलांच्या श्रमशक्तीचा उपयोग होत आहे. हे श्रम अर्थाजनासाठी उपयोगी पडत आहेत. स्वयंसहाय्यता गटांची ही एक महत्वाची 'उपलब्धी' आहे.

५. कौटुंबिक पातळीवरील अर्थाजनाची कमतरता ही मुलांच्या प्रामुख्याने मुलींच्या शिक्षणावर विपरीत परिणाम घडवुन आणीत असते. या दृष्टीने गट सहभागापुर्वी जागृततेचा अभाव, पैसा मिळविण्याची अपरिहार्यता यामुळे २४.३८% मुलांना शिक्षण सोडुन कामावर पाठविले जात होते. तसेच ४४.७०% मुलांना शिक्षण घेतांना बुहतांशी वेळ शाळेला गैरहजर राहून कामावर जाणे भाग पडत होते. मात्र गट सहभागामुळे होणाऱ्या प्रबोधनाद्वारे व अर्थाजनामुळे ६८.१४ टक्के महिला आपल्या पाल्यांना काम न करू देता फक्त शिक्षण करू देत आहे. म्हणजे गट सहभागानंतर ३७.१७% 'बालमजुरी' चे प्रमाण करून होऊन शिक्षण घेणाऱ्या मुलांचे प्रमाण वाढलेले आहे. भविष्यात साक्षर व समृद्ध पिढी निर्माण होण्यात स्वयंसहाय्यता गटांचा वाटा महत्वाचा असतो.

६. कौटुंबिक पातळीवर वैचारिक प्रबोधन प्रामुख्याने दारिद्र्य रेषेखालील कुटूंबात मनोरंजनासाठी दुरदर्शन हे महत्वाचे साधन असते. या संदर्भात गट सहभागापुर्वी ३४.९६ टक्के महिलांच्या कुटूंबाकडे दुरदर्शनची उपलब्धता नव्हती. गट सहभागानंतर हे प्रमाण १३.२७% पर्यंत कमी होऊन दुरदर्शन उपलब्धता प्रमाण ८६.६३% पर्यंत आहे. म्हणजे मनोरंजन सोयींमध्ये वाढ झाली

७. भ्रमणध्वनी हे दळणवळणाचे साधन म्हणून प्रचलीत असतांना गटातील महिला सुद्धा भ्रमणध्वनीचा वापर करू लागलेल्या आहेत. उंबरठ्याच्या बाहेर पाऊल ठेवल्यानंतर कुटूंबाच्या संपर्कात रहाण्याच्या हेतुने भ्रमणध्वनी जवळ बाळगण्याचे व वापराचे प्रमाण १२.३९% वरून ३१.८६% पर्यंत वळलेले आहे.

८. थोडक्यात, जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बिगर आर्थिक घटकांमध्ये सकारात्मक वाढ होत आहे. निवास, पाणी, शौचालय याबाबतची वाढ कमी आहे तर रोजगार, मुलांचे शिक्षण वाढ, बालमजुरी कमी, दुरदर्शन व भ्रमणध्वनी इत्यादी मधील वाढ अधिक आहे.

नाशिक आणि मालेगाव शहराच्या बिगर आर्थिक घटकांच्या उपलब्धतेची तुलनात्मक स्थिती १) नाशिक व मालेगाव शहरात झोपडीत रहाणाऱ्या महिलांचे प्रमाण साधारणत: सारख्याच प्रमाणात कमी झालेले आहे. मात्र मालेगाव शहरात बांबु व फळ्यांच्या लाकडी घरात व नाशिक शहरात कौलारू घरात रहाणाऱ्या महिलांचे प्रमाण वाढलेले आहे. २) पाणी उपलब्धतेबाबत नाशिक शहरात गट सहभागानंतर खाजगी पातळीवरील नळ जोडणीचे प्रमाण १०.३८टक्के वरून २७.२७% पर्यंत वाढले तर मालेगाव शहरात हे प्रमाण ११.११% वरून २९.१७% पर्यंत वाढलेले आहे. ३) ओपन लॅटरीनचे प्रमाण नाशिक शहरापेक्षा मालेगाव शहरात प्रमाण अधिक प्रमाणात घटलेले असुन खाजगी शौचालय प्रमाण नाशिक शहरात ११.३९% वरून २७.९२% पर्यंत वाढलेले आहे तर मालेगाव शहरात हे प्रमाण १५.२८% वरून ३८.८९टक्के पर्यंत अधिक प्रमाणात वाढलेले आहे. ४) नाशिक आणि मालेगाव शहरात साधारणत: समान प्रमाणात गट सहभागानंतर बेरोजगारीचे प्रमाण अत्यल्प होऊन रोजगार निर्मितीचे प्रमाण वाढलेले आहे. ५) शिक्षण सोडुन काम करणाऱ्या मुलांचे प्रमाण गट सहभागानंतर दोन्ही शहरात कमी झालेले आहे. काम न करता फक्त शिक्षण घेण्याचे प्रमाण गट सहभागानंतर नाशिक शहरात ३४.४२% वरून ६८.१८ टक्के पर्यंत तर मालेगाव शहरात हे प्रमाण २३.६१ वरून ६८.०६ टक्के पर्यंत वाढलेले आहे. म्हणजे मुलांच्या शिक्षणविषयक सहभागात अधिक वाढ झालेली आहे. ६) दुरदर्शन सुविधेच्या उपलब्धतेबाबत नाशिक शहरातील महिला अधिक पुढे आहेत. मालेगाव शहरात प्रामुख्याने मुस्लीम कुटूंबात वैचारिक संकर टाळण्याच्या हेतुने दुरदर्शनची उपलब्धता काही प्रमाणात कमी आहे. ७) भ्रमणध्वनी वापरण्याचे प्रमाण नाशिक व मालेगाव शहरात प्रामुख्याने इनकमिंगकॉल साठी वापर वाढलेला आहे. नाशिक शहरापेक्षा मालेगाव शहरात भ्रमणध्वनी उपलब्धतेचे प्रमाण गट सहभागानंतर वाढलेले आहे. ८) नाशिक व मालेगाव शहरात बिगर आर्थिक घटकांच्या उपलब्धतेत वाढ झालेली आढळुन येते.

## ६.५ नाशिक जिल्ह्यातील महिलांच्या सामाजिक सबलीकरणाचे अध्ययन

महिलांचे कौटूंबिक व सामाजिक पातळीवर स्थान व भूमिका यावरून महिलांचा दर्जा निश्चित होतो. आर्थिक व सामाजिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या वर्गातील महिला ह्या उच्च व मध्यम वर्गातील महिलांपेक्षा अधिक मुक्त असतात. मात्र पुर्णत: स्वतंत्र व मुक्त नसतात तर पुरूषांच्या अधिनच असतात अशा महिलांचे कौटूंबिक व सामाजिक दृष्ट्या सबलीकरण होणे अत्यंत आवश्यक असते. नाशिक जिल्ह्यात महिला स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून महिलांचे सामाजिक सबलीकरण घडून आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यासाठी स्वयंसहाय्यता गट पुढील प्रमाणे योगदान देत आहेत.

### ६.५.१ गतिमानतेत वाढ

दारिद्र्याचे दृष्टचक्र भेदण्यासाठी व्यक्तीमध्ये असणाऱ्या अंगभूत गतिमानतेत वाढ होणे अत्यावश्यक असते. ग्रामीण व शहरी भागातील महिलांचे माहेर आणि सासर या दरम्यान विश्व मर्यादीत असते. घराबाहेर पडून मिटींगमध्ये जाणे, स्वत:ची मते मांडणे, बँकेत जाऊन बँक व्यवहार करणे आयुष्यभर शक्य होत नाही. आयुष्य स्थितीशील असते. स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून होणाऱ्या सुक्ष्म वित्त व्यवहारातून या सर्व उणीवांवर मात करता येते. स्थितीतील अवस्थेतून गतिशील अवस्था प्राप्त करून घेता येते.

**सारणी ५१ : महिला सदस्य गतिमानता**

| तपशिल | एकूण गट | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १. गट प्रणालीची माहिती | १८२ | ८०.५३ | १२४ | ८०.५१ | ५८ | ८०.५५ |
| २. मिटींगमध्ये उपस्थिती | १६७ | ७३.९० | ११६ | ७५.३२ | ५१ | ७०.८३ |
| ३. मिटींगमध्ये मतप्रदर्शन | १५२ | ६७.२५ | १०० | ६४.९३ | ५२ | ७२.२२ |
| ४. बँक व्यवहारांची माहिती | | | | | | |
| • अध्यक्ष | १९० | ८४.०८ | १३१ | ८५.०६ | ५९ | ८१.९४ |
| • अध्यक्ष व सचिव | १६५ | ७३.०० | ११५ | ७४.६७ | ५० | ६९.४४ |
| • सर्व सदस्य | १३२ | ५८.४० | ८५ | ५५.२० | ४७ | ६५.२७ |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्र. ५१ नुसार

१. स्वयसहाय्यता गटात सहभागी झालेल्या महिलांपैकी ८०.५३ टक्के महिलांना गटाच्या प्रणालीची माहिती आहे. मन व्यवहार, धन व्यवहार, स्वत:चे हक्क, स्वयंपुर्णता, काटकसर, बचत, अंतर्गत व्यवहार, कर्ज, व्यवसाय स्थापना, नफा, उत्पन्न, गरजांची पुर्तता, सबलीकरण इ. संबंधीची माहिती आहे.

२. स्वयंसहाय्यता गटांद्वारे धन व्यवहारांबरोबरच मन व्यवहार वाढीसाठी प्रयत्न केले जातात. मन व्यवहाराच्या वाढीतून गट एकजीव होतो. गटाचे संघटन मजबूत होते. यासाठी दर महिन्याला गटाच्या सर्व महिलांसाठी सभा आयोजित केली जाते. एकूण सदस्यांपैकी ७३.९० टक्के सदस्य मिटींगसाठी नियमितपणे उपस्थित असतात. नियमित बैठकांना उपस्थित असणाऱ्या सदस्यांना समाजातील घडामोडींविषयी, स्वहक्क, कर्तव्य इ. बाबतीत माहिती मिळते. त्यांच्या ज्ञानाचे क्षितीज उंचावण्यास मदत होते. नाशिक शहरातील गटांच्या ७५.३२ टक्के महिला सदस्य व मालेगाव शहरात ७०.८३ टक्के महिला सदस्य उपस्थित असतात.

३. गटाच्या मिटींगमध्ये उपस्थित असणाऱ्या महिला सभासदांना आपले अभिव्यक्ती स्वातंत्र्य जोपासता येते. गटाच्या वाटचालीविषयी आपले विचार मांडता येतात. ६७.२५ टक्के महिला सभासद आपले विचार मुक्तपणे मिटींगमध्ये मांडतात उपस्थित सभासदांमध्ये नाशिक शहरात ६४.९३ टक्के आणि मालेगाव शहरात ७२.२२ टक्के सभासद आपले मत मांडत असतात.

४. मन व्यवहारा बरोबर धन व्यवहार करण्यासाठी गटांची बँकेशी जोडणी केली जाते. त्यासाठी बँक व्यवहाराची पुर्ण माहिती सर्व सभासदांना असावी हा हेतु असतो. एकूण अध्यक्षांपैकी ८४.०८ टक्के, एकूण अध्यक्ष व सचिवांपैकी ७३.० टक्के, एकूण सदस्यांपैकी ५८.४० टक्के सदस्यांना बँक व्यवहारांची माहिती असल्याचे दिसून येते. नाशिक शहरातील गटांच्या अध्यक्ष व सचिव यांना बँक व्यवहारा माहितीचे प्रमाण अधिक आढळून

येते. मात्र मालेगाव शहरात गटाच्या सभासदांना अधिक माहिती असल्याचे आढळून येते.

### ६.५.२ कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत सहभाग


नाशिक जिल्ह्यातील नाशिक व मालेगाव शहरातील कुटूंब व्यवस्था ही प्रामुख्याने 'पितृप्रधान' आहे. त्यामुळे कुटुंब पातळीवरील बहुतेक सर्व निर्णय पुरुषांकडून घेतले जातात. निर्णय प्रक्रियेत महिलांना स्थान नसते किंवा दुय्यम स्थान दिले जाते. महिलांच्या मतांना महत्त्व दिले जात नाही. मात्र स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून महिलांच्या कौटुंबिक निर्णय प्रक्रियेतील सहभागास चालना मिळत असते आणि कौटुंबिक निर्णयात सहभाग वाढीस लागणे स्त्री– पुरुष समानतेच्या दृष्टीने सकारात्मक संकेत मानला जातो.

**सारणी ५२ : कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत सहभाग**

| तपशिल | एकूण गट | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १. मुलांचे शिक्षण | १७० | ७५.२२ | १११ | ७२.०७ | ५९ | ८१.९४ |
| २. मुलांचे विवाह | १३३ | ५८.८४ | १०० | ६७.९३ | ३३ | ४५.८३ |
| ३. आर्थिक व्यवहार | १५१ | ६६.८१ | १०२ | ६६.२३ | ४९ | ६८.८३ |
| ४. खरेदी स्वातंत्र्य | १६४ | ७२.५६ | १०८ | ७०.१२ | ५६ | ७७.७७ |
| ५. अपत्य जन्म | ८२ | ३६.२८ | ६५ | ४२.२० | १७ | २३.६१ |
| ६. भोजन | १६७ | ७३.८९ | १०७ | ६९.४८ | ६० | ८३.३३ |
| ७. वावर स्वातंत्र्य | १६० | ७०.७९ | १०४ | ६७.५३ | ५६ | ७७.७७ |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

**आलेख १३ : कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत सहभाग**




**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्रमांक ५२ नुसार महिलांचा कौटुंबिक पातळीवर निर्णय प्रक्रियेत सहभाग संमिश्र स्वरुपाचा आढळून आला.

१) कौटुंबिक पातळीवर एकूण निर्णय प्रक्रियेत आपणास सहभागी करुन घेतले जाते का? असा प्रश्न गटाच्या सदस्यांना विचारला असता, आम्ही आता कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी उत्पन्नाचा हातभार लावत आहोत म्हणून आम्ही सुद्धा आमचे निर्णय घेत असतो असे साधारणत: ७० टक्के महिलांनी सांगितले.

२) मुलांच्या शिक्षणाबाबत महिला सदस्य अधिक सजग असल्याचे निदर्शनास येते. आम्हाला मुलगी असल्यामुळे, दारिद्र्यमुळे फारसे शिकता आले नाही म्हणून आम्ही आमच्या मुलांना शाळेत पाठवित आहोत. त्यांच्या शिक्षणावरील खर्चाची गरज भागविते. त्यामुळे ७५.२२ टक्के महिला कुटुंब

पातळीवर मुलांच्या प्रामुख्याने मुलींच्या शिक्षणाबाबत आग्रही असल्याचे आढळून आले.

नाशिक शहरात दारिद्र्यमुळे मुलींना शाळेएवजी धुणे-भांडी साठी पाठविले जात होते. आणि मालेगाव शहरात मुलांना गॅरेज, हॉटेल्समध्ये काम करण्यास पाठविले जात होते. मात्र मुलांऐवजी महिला सदस्य उत्पन्न मिळवित असल्यामुळे मुलांना शाळेत पाठविण्याचे प्रमाण वाढले. या निर्णयात नाशिक शहरात ७२.७७ टक्के व मालेगाव शहरात ८१.९४ टक्के महिलांचा सहभाग असल्याचे दिसुन आले.

३) मुलांचे विवाह हा कुटूंबस्तरावरील महत्वाचा निर्णय असतो. या निर्णयात ५८.८४ टक्के महिला सहभागी असतात. नाशिक शहरात हे प्रमाण ६४.९३ टक्के तर मालेगाव शहरात हे प्रमाण ४५.८३ टक्के असल्याचे आढळून आले. मालेगाव शहरातील महिलांना विवाह निर्णयात सहभाग अधिक का नसतो? असे विचारले असता. आपापसात प्रामुख्याने मोहल्ला किंवा शहरातच विवाह होतात त्यामुळे विवाहबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता भासत नाही असे सांगण्यात आले.

४) आर्थिक स्वयंपुर्णतेमुळे कुटूंबाच्या आर्थिक निर्णयात ६६.८१ टक्के महिलांचा सहभाग आढळून आला. मालेगाव शहरापेक्षा नाशिक शहरातील महिलांचा सहभाग अधिक आहे.

५) स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या व्यवसायापासून मिळणारे उत्पन्न, कर्ज यामुळे कुटूंबासाठी आवश्यक असणाऱ्या साधनांची खरेदी करतांना ७२.५६ टक्के सदस्यांना स्वत:च्या मताप्रमाणे खर्च करण्याचे स्वातंत्र्य मिळते. मालेगाव शहरामध्ये सदस्यांना नाशिक शहरापेक्षा ५.६५ टक्क्याने अधिक स्वातंत्र मिळत आहे.

६) कुटूंबातील अपत्य संख्या किती असावी? मुलगा की मुलगी? या बाबत पुरूषप्रधान संस्कृतीचा पगडा प्रभावी ठरतो. आर्थिक दृष्ट्या सक्षम होऊन फक्त ३६.२८ टक्के महिलांना अपत्य जन्माबाबत सामुहिक निर्णय घेता येतो

उर्वरीत ६३.७२ टक्के महिलांना सहभागी करून घेतले जात नाही. मालेगांव शहरात या निर्णयातील सहभाग नाशिक शहरापेक्षा खुप कमी आहे. कारण अज्ञानामुळे संततीनियमन केले जात नाही. मुलींच्या विवाहाबाबत हुंडा पद्धती किंवा वरसंशोधन त्रासदायक नसल्यामुळे मुलींचा जन्म नाकारला जात नाही. त्यामुळे अपत्य जन्माबाबत निर्णय घेण्याची फारशी गरज नाही असे सांगितले जाते.

७) भोजन जीवनाचा आणि कुटूंबातील सदस्यांमध्ये भावनिक एकात्मता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असतो. मात्र स्त्रियांना दुय्यम स्थान असल्यामुळे भोजनातील पक्वान्न आणि पुरूषांच्या बरोबरीने भोजन करणे इ. बाबत निर्णयाचा अधिकार नसतो. मात्र स्वयंसहाय्यता गटातील सहभागामुळे भोजन पक्वान्न निर्णय व पुरूषांबरोबर सहचर्य भोजन करण्याचे प्रमाण ७३.८९ टक्के पर्यंत वाढलेले आहे.

नाशिक शहरात पुरूषांचे लांब अंतरावरचे काम व महिलांमधील अंध:श्रध्दा इ. मुळे सहभोजनाचे प्रमाण ६९.४८ टक्के आहे. मात्र मालेगाव शहरात कमी अंतरावरील काम व मुस्लीम कुटूंब सदस्यांमध्ये एकाचवेळी एकाच परातीत भोजन करण्याची व्यवस्थेमुळे ८३.३३ टक्के महिला सहभागी असतात. इतकेच नाही तर प्रथा मोडून साधारणत: १८ टक्के महिला पुरूषांच्या आधीच भोजन करून व्यवसायासाठी बाहेर जातात.

८) स्त्री-पुरूष ही संसार रूपी रथाची दोन चाके असतात. त्यामुळे कुटूंबामध्ये आत्मीयता वाढीसाठी सर्व सदस्यांना कुटूंब आपले वाटले पाहीजे. त्यासाठी स्त्री-पुरूषांना घरात वावरण्याचे पुर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे. स्वयंसहाय्यता गटात सहभागानंतर ७०.७९ टक्के सदस्यांचा कुटूंबांत वावर वृध्दींगत झालेली आहे. नाशिक व मालेगाव शहरात हे प्रमाण अनुक्रमे ६७.५३ टक्के व ७७.७७ टक्के आहे.

थोडक्यात स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातुन महिलांमध्ये उत्पन्न व स्वहक्कांची जाणीव वाढल्यामुळे कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढला आहे.

नासिक शहराच्या तुलनेत मालेगाव शहरात धार्मिक कट्टरवाद व पडदा पध्दतीचा प्रभाव असला तरी गटात सहभागी महिलांच्या बाबतीत कौटुंबिक निर्णयता प्रभाव अधिक आढळून येतो.

### ६.५.३ सामाजिक पातळीवर सहभाग

समुहात रहाणे व आपली अभिव्यक्ती सामाजिक स्तरावर व्यक्त करणे नैसर्गिक असते. मात्र वर्षानुवर्ष स्त्रियांना आपल्या भावना, विचार दाबून ठेवून घराच्या उंबरठ्याच्या आत जीवन जगावे लागत आहे. सामाजिक पातळीवर सहभागी होणे. आपले अभिव्यक्ती स्वातंत्र्य जोपासणे शक्य झालेले नाही. परंतु स्वयंसहाय्यता गटात सहभागी झालेल्या महिलांना सामाजिक पातळीवर सहभागी होऊन आपले अभिव्यक्ती स्वातंत्र्य जोपासणे सहज सुलभ झालेले आहे. नाशिक जिल्ह्यातील नाशिक व मालेगाव शहरातील गटाच्या सदस्यांचा सामाजिक सहभाग विषयक स्थिती..


**सारणी ५३ : स्वयंसहाय्यता गट सदस्यांचा सामाजिक सहभाग**

| तपशिल | एकूण संख्या | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सहभागा पूर्वी | सहभागा नंतर | सहभागा पूर्वी | सहभागा नंतर | सहभागा पूर्वी | सहभागा नंतर |
| १. गट संचलित कार्यक्रम | - | १६६ | - | १०९ | - | ५७ |
| | - | (७३.४५) | - | (७०.७७) | - | (७९.१६) |
| २. विवाह सोहळा | १५२ | १६५ | १११ | १२१ | ४१ | ४४ |
| | (६७.२५) | (७३.००) | (७२.०७) | (७८.५७) | (५६.९५) | (६१.११) |
| ३. घराबाहेर वावर | ७८ | ११२ | ५४ | ७५ | २४ | ३७ |
| | (३४.५१) | (४९.५५) | (३५.०६) | (४८.७०) | (३३.३३) | (५२.७७) |
| ४. एकटीने शहराबाहेर प्रवास | ७० | १५२ | ४९ | १०८ | २१ | ४४ |
| | (३०.९७) | (६७.२३) | (३१.८१) | (७०.१२) | (२९.१६) | (६१.१०) |
| ५. मतदानविषयक निर्णय | ७८ | ११३ | ४८ | ६८ | ३० | ४५ |
| | (३४.५१) | (५०.००) | (३१.१६) | (४४.१५) | (४१.६७) | (६२.५०) |
| ६. राजकीय क्षेत्रात उमेदवारी | ५ | १९ | ३ | १४ | २ | ५ |
| | (२.२१) | (८.४०) | (१.३२) | (९.१०) | (२.७८) | (६.९५) |

**टिप :** कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात.

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

### आलेख १४ :स्वयंसहाय्यता गट सदस्यांचा सामाजिक सहभाग




**स्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्र. ५३ वरुन महिलांच्या सामाजिक सबलीकरणात महिलांच्या सामाजिक सहभागामुळे वाढ झालेली आहे.

१) महिलांच्या सामाजिक सहभाग वाढीसाठी स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. हळदी – कुंकू, रमजान– दीपावली– सद्‌भाव कार्यक्रम, चित्रकला, रांगोळी स्पर्धा, महिला दिन इत्यादी सारख्या कार्यक्रमात ७३.४५ टक्के महिला सक्रीय सहभाग घेत असतात. नाशिक शहरात सहभागाचे प्रमाण ७०.७७ टक्के तर मालेगाव शहरात ७९.१६ टक्के आहे.

२) विवाह हा कुटुंब व्यवस्थेचा पाया असुन समाज मान्यतेचा आवश्यक घटक म्हणून सर्वच समाजात मानला जातो. विवाह हा सामाजिक सोहळा असतो म्हणून विवाह सोहळ्यास हजर रहाणे, सहभागी होणे गरजेचे असते. गटात सहभागी होण्यापूर्वी ६७.२५ टक्के व गटात सहभागी होण्यानंतर ७३.0 टक्के महिला विवाह सोहळ्यात सहभागी होतांना आढळून येतात. ६.२५ टक्केने सहभाग वाढलेला आहे. विवाह सोहळ्यात सहभागाबाबत स्वयंसहाय्यता गटाचा फारसा प्रभाव जाणवत नाही. नाशिक शहरात विवाह सोहळ्यात

सहभागी होण्याचे प्रमाण गट सहभागापूर्वी व नंतर अशा दोन्ही स्थितीत मालेगाव शहरातील महिलांपेक्षा फार अधिक आहे. यामागे असणारी कारणे....

अ) नाशिक शहरात हिंदू महिलांचे प्रमाण अधिक असल्यामुळे विवाह सोहळ्यात महिलांचा सहभाग अधिक असतो. तसेच बाहेरगावी विवाहात सहभागी होण्यासाठी जाण्यामुळे पुरुषांची रोजंदारी बुडते म्हणून महिलांचा सहभाग अधिक असतो.

ब) मालेगाव शहरात मुस्लिम महिलांचे प्रमाण अधिक असल्यामुळे फक्त कुटुंबात किंवा मोहल्ल्यात विवाह असेल तर महिला सहभागी होण्याचा रिवाज आहे. प्रामुख्याने शुक्रवार हा सुट्टीचा व अल्लाहचा दिवस मानुन या दिवशी विवाह पार पाडले जातात. त्यामुळे पुरुषांच्या सहभागाचे प्रमाण अधिक असते.

३) स्त्रियांना घराचा उंबरठा ओलांडण्याचे स्वातंत्र्य कमी असते. घराबाहेर पडायचे असेल तर पुरुषांची परवानगी घ्यावी लागते. मात्र गटात सहभाग झाल्यानंतर गटाच्या कामासाठी म्हणजे मिटींग, सांस्कृतिक कार्यक्रम, बँक व्यवसाय मालाची खरेदी– विक्री, बील भरणा इ. साठी घराबाहेर वारंवार जावे लागते. त्यासाठी आज ४९.५५ टक्के महिलांना पुरुषांच्या परवानगीची गरज भासत नाही किंवा परवानगी घ्यावी लागत नाही. हे प्रमाण पूर्वीपेक्षा १५.०४ टक्केने वाढने हे स्त्री स्वातंत्र्याकडे एक पुढचे पाऊल ठरलेले आहे. नाशिक शहरापेक्षा मालेगाव शहरातील गटांच्या महिलांचे प्रमाण तुलनेने अधिक वाढलेले आहे. कारण नाशिक शहरात गटसहभागापूर्वीपेक्षा सहभागानंतरच्या प्रमाणातील वाढ १३.६४ टक्के असून मालेगाव शहरातील ही वाढ १९.४४ टक्के आहे, म्हणजे मालेगाव शहरातील गटात सहभागी झालेली महिला बीपीएल महिला धार्मिकता बाजुला सारुन अधिक मुक्त हात आहे.

४) स्वयंसहाय्यता गटाच्या सदस्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन, सांस्कृतिक कार्यक्रम, मेळावे, सभा, प्रदर्शने इ. साठी शहराबाहेर दुसऱ्या शहरात किंवा जिल्हा पातळीवर अध्यक्ष, सचिव किंवा सदस्यांना सहभागी हाण्यासाठी जावे लागते. त्यामुळे ६७.२५ महिलां एकटीने शहराबाहेर प्रवास करीत असल्याचे आढळून आले. म्हणजे गटाच्या महिलांमध्ये धिटपणा वाढीस लागलेला आहे.

नाशिक शहरातील गटांच्या सहभागी महिलांचे शहराबाहेर प्रवास करण्याचे प्रमाण ७०.१२ टक्के असून मालेगाव शहरातील गटांचे प्रमाण ६१.१० टक्के असल्यामुळे ९.०२ टक्केने अधिक आहे. कारण नाशिक शहरातील गटांच्या महिलांना बाहेरगावी जाण्यास परवानगी अधिक प्रमाणात दिली जाते. मात्र मालेगाव शहरातील महिलांना शहराबाहेर प्रवास करण्यास अडथळे आहेत.

५) लोकशाही प्रधान देशात प्रत्येक गरीब व श्रीमंत व्यक्तीस मतदानाचा हक्क प्राप्त झालेला असतो. कोणत्या उमेदवारास व कोणत्या पक्षास मतदान करावयाचे याबाबतचे निर्णय शक्यतो पुरुषांवर अवलंबून असतात. मात्र गटात सहभागी झालेल्या महिलांमध्ये मतदान विषयक स्वतंत्र निर्णय होण्याची क्षमता ३४.५१ टक्के वरुन ५०.० टक्के पर्यंत वाढलेली आहे. मालेगाव शहरातील महिलांचे मतदान विषयक स्वतंत्र निर्णय प्रमाण ४१.६७ टक्केवरुन ६२.५ टक्के पर्यंत वाढलेले आहे. म्हणजे मालेगाव शहरात मतदान स्वातंत्र्य अधिक प्रमाणात वाढलेले आहे.

६) राजकीय क्षेत्रात उमेदवारी करण्याबाबत गटांच्या महिलांचा सहभाग फक्त २.२१ टक्के वरुन ८.४० टक्के पर्यंत वाढलेला आहे. नाशिक शहरात उमेदवारी करण्याबाबत महिलांचा सहभाग १.३२ टक्के वरुन ९.१० टक्के पर्यंत वाढला. हा सहभाग मालेगाव शहरातील महिलांच्या सहभागापेक्षा (२.७८ वरुदन ६.९५ टक्के वाढ) अधिक आहे.

### ६.५.४ कौटुंबिक व सामाजिक पातळीवरील बदल


स्त्रियांना कौटुंबिक व सामाजिक पातळीवर वावरतांना एक माणूस म्हणून वागणूक मिळवून देणे हा स्वयंसहाय्यता गटातील सहभागाचा अंतिम हेतु असतो. या दृष्टीने नाशिक जिल्ह्यातील नाशिक आणि मालेगाव शहरातील स्वयंसहाय्यता गटातील महिलांच्या बाबतीत कौटुंबिक व सामाजिक पातळीवर सकारात्मक बदल होतांना दिसून येत आहेत.

**सारणी ५४ : कौटुंबिक व सामाजिक बदलाची स्थिती**

| तपशिल | एकूण गट | | नाशिक शहर | | मालेगाव शहर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १. कुटुंबातील पुरूषांचे दडपण | ८८ | ३८.९३ | ६५ | ४२.२० | २३ | ३१.५० |
| २. पतीचे गैरवर्तन (मारहाण) | ४९ | २१.६८ | ३७ | २४.०२ | १२ | १६.६६ |
| ३. समाजातील पुरूषांकडून त्रास | ६० | २६.५४ | ४४ | २८.५७ | १६ | २२.२२ |
| ४. समाजाचा सकारात्मक दृष्टीकोन | १५३ | ६७.६९ | १०४ | ६७.५३ | ४९ | ६८.०५ |
| ५. सामाजिक पातळीवर दबाव गट | ७२ | ३१.८५ | ३२ | २०.७७ | ४० | ५५.५५ |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

**आलेख १५ : कौटुंबिक व सामाजिक बदलाची स्थिती**




**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्र. ५४ वरुन

१) स्वयंसहाय्यता गटात सहभागी होण्यापूर्वी अर्थाजन करीत नसल्यामुळे स्त्रियांना पुरुषांच्या उत्पन्नावर अवलंबून रहावे लागत होते. पुरुषांचे दडपण अधिक होते. तसेच लहान– लहान बाबींवरुन मारहाण केली जात होती. गटात सहभागी झाल्यानंतर महिलांकडून अर्थाजन होऊ लागले. कुटुंबाच्या गरजा भागविण्यात त्यांचा सहभाग वाढला. त्यामुळे फक्त ३८.९३ टक्के महिलांना पुरुषांच्या दडपणाचा जाच व २१.६८ टक्के महिला सदस्यांना पुरुषांकडून मारहाण केली जात आहे. कौटूंबिक हिंसा प्रतिबंधक कायदा होऊनही गटात सहभागी न होणाऱ्या समाजातील किमान ३० टक्के महिलांना कौटुंबिक हिंसेला सामोरे जावे लागते. या दृष्टीने विचार केला असता. कौटुंबिक हिंसेचे प्रमाण गटात सहभागी झालेल्या महिलांच्या बाबत कमी झालेले आहे.

नाशिक शहरात कुटुंबातील पुरुषांचे प्रमाण ४२.२० टक्के व पुरुषांकडून मारहाणीचे प्रमाण २४.०२ टक्के असून मालेगाव शहरात हे प्रमाण अनुक्रमे ३१.५० टक्के व १६.६६ टक्के इतके कमी आहे. याची आढळून आलेली कारणे....

- नाशिक शहरात गटाच्या एकूण सदस्यांमध्ये ब्राह्मण, कुणबी, माळी, लोहार, हरिजन, बौद्ध इ. जातीच्या व हिंदू धर्माच्या सदस्यांचे प्रमाण अधिक असून दारिद्र्य, नैराश्य व यातून व्यसनाधिनतेचे अधिक प्रमाण यामुळे पुरुषांचे दडपण असून पुरुषांकडून मारहाण केली जाते.
- मालेगाव शहरात मोमीन, खाटीक, बौद्ध, जातीच्या व मुस्लिम धर्मांच्या सदस्यांचे प्रमाण अधिक असून दारिद्र्यामुळे काटकसरीने जीवन जगण्याची पध्दत, व्यसनाधिनतेने प्रमाण कमी, गरज कमी ठेवणे इ. मुळे दडपण व मारहाणीचे प्रमाण कमी असल्याचे सांगण्यात आले.

२) सामाजिक पातळीवर गटाच्या माध्यमातून महिला सदस्य गटाने एकत्र वारतात त्यामुळे इतर पुरुषांकडून त्रास देण्याचे प्रमाण कमी (२६ टक्के) आहे. नाशिक शहरात वेगवेगळ्या भागातून, प्रदेशातून, एकत्र येऊन स्थायिक झालेले आहे. त्यामुळे हे प्रमाण २८.५७ इतके आहे. मालेगाव शहरात सामाजिक दंगली, खून, लुटमार इ. सारखे प्रकार होत असतांनाही महिलांबाबत गैरवर्तन, बलात्कार, छेडछाड इ. सारखे प्रकार होतांना दिसून येत नाही. 'अपनी बिरादरी' मुळे महिलांना त्रास देण्याचे प्रमाण २२.२२ टक्के पर्यंत कमी आहे.

३) महिला स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून महिलांनी आपल्या कार्य कर्तृत्वाचा ठसा व्यवसाय उभारणी, आत्मनिर्भरता, सांस्कृतिक कार्यक्रम, साफ सफाई, बियरबार इत्यादी क्षेत्रात उमटविला आहे. त्यामुळे समाजाच्या पहाण्याचा दृष्टीकोन ६७.८९ टक्के पर्यंत सकारात्मक झालेला आहे. नाशिक व मालेगाव शहरात हा दृष्टीकोन साधारणत: समान आहे.

४) सामाजिक स्तरावर स्त्री हा नाकारलेला घटक होता. परंतु गटाच्या माध्यमातून महिलांमध्ये आपले हक्क, अधिकार इ. बाबतीत जागृतता निर्माण होऊन संघटीतपणे दबावगट निर्माण करण्यात यशस्वी होतांना आढळून येत आहेत. एकूण सदस्यांपैकी ३१.८५ टक्के सदस्यांनी पोषण आहार ठेका देतांना नगरसेवकांचा अवास्तव हस्तक्षेप कमी करुन पारदर्शकता आणण्याबाबत, निवासी वस्तीतील बियरबार बंद करणे, गल्ली, मोहल्ला, गटार स्वच्छता वाढविणे. रेशन व रॉकेल दुकाने चालविण्यास घेणे, शहरातील स्वच्छता ठेके मिळविणे, गाळे बांधणे, सामान्य रुग्णालयातील व सफाई कामगार भरती इत्यादी सारख्या अनेक बाबतीत दबावगट निर्माण केलेला आहे. दबावगट निर्माण करण्यात नाशिक पेक्षा मालेगाव शहरातील गट आघाडीवर आहेत. मालेगाव शहरातील महिला नाशिक शहरापेक्षा २४.२२ टक्केने आघाडीवर आहेत.

थोडक्यात नाशिक जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या बाबत कौटुंबिक व सामाजिक पातळीवर स्थिती अनुकूल होऊन 'एक माणूस' म्हणून दृष्टीकोन तयार होण्याकडे वाटचाल सुरु आहे. मात्र ही प्रक्रिया दीर्घकालीन स्वरुपाची असणार आहे.

## ६.६ महिला सबलीकरणावर प्रभाव पाडणारे घटक

'सबलीकरण' हे परतंत्र चल असून ते स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून होणाऱ्या धनव्यवहार व मनव्यवहारावर अवलंबून असल्याचे प्रस्तुत संशोधना दरम्यान आढळून आलेले आहे. धनव्यवहार आणि मनव्यवहारांना प्रभावीत करणारे घटक आहेत काय? याचा शोध घेतला असता स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून होणाऱ्या व्यवहारांवर व पर्यायाने महिला सबलीकरणावर प्रभाव टाकणारे घटक पुढीलप्रमाणे–

### ६.६.१ शिक्षण आणि सबलीकरण

शिक्षण हा महिला सबलीकरणावर प्रभाव टाकणारा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याचे आढळून आलेले आहे. स्वयंसहाय्यता गटाचे नेतृत्व करणाऱ्या अध्यक्ष ह्या शिक्षित असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. गटाचे संचलन करतांना कोणत्याही बाबीवर सर्वानुमते निर्णय घडवून आणणे, सर्व सभासद महिलांशी सुसंवाद ठेऊन गट एकत्रित ठेवणे, गटातील मतभेद दूर करणे, सांस्कृतिक कार्यक्रम घडवून आणणे, बँक व्यवहाराच्या नोंदी तपासणे, गटांतर्गत कर्ज व्यवहारांच्या नोंदी ठेवणे, वेळोवेळी अर्थ व्यवहारांची सभासद महिलांना माहिती देऊन व्यवहारातील पारदर्शकता सिद्ध करणे यासारख्या अनेक बाबींसाठी शिक्षित अध्यक्ष असणे आवश्यक असते. हे नाशिक जिल्ह्यातील सदर संशोधनावरुन सिद्ध झालेले आहे.

## सारणी ५५ : शिक्षण आणि स्वयंसहाय्यता गटांची व्यवहार स्थिती

| शिक्षण तपशील | व्यवहार स्थिती | | |
|---|---|---|---|
| | उत्कृष्ट | सर्वसामान्य | निकृष्ट |
| १) निरक्षर | ११ (६.६९) | १९ (४४.०८) | ९ (१६.२५) |
| २) प्राथमिक | ७० (४१.९१) | १० (२३.२६) | ४ (२५.००) |
| ३) माध्य. व उच्च माध्यमिक | ८५ (५०.९०) | १२ (२७.९१) | २ (१२.५०) |
| ४) पदवी व पदवीधर | १ (०.६०) | २ (४.६५) | १ (६.२५) |

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्र. ५५ वरुन

१) एकूण २२६ गटांपैकी १६७ गटांची धनव्यवहार व मन व्यवहार विषयक स्थिती उत्कृष्ट दर्जाची आहे. या एकूण १६७ गटांमध्ये १५६ गटांच्या अध्यक्षा ह्या शिक्षित असून हे प्रमाण ९३.४१ टक्के इतके आहे. तर निरक्षर असणाऱ्या महिलांचे प्रमाण फक्त ६.६९ टक्के इतके आहे. म्हणजे स्वयंसहाय्यता गटाच्या उत्कृष्ट व्यवहार विषयक स्थितीत शिक्षणाचा प्रभाव आढळून येतो.

२) एकूण गटांपैकी ४३ गटांची धनव्यवहार व मनव्यवहार विषयक स्थिती ही सर्वसाधारण दर्जाची आहे. या एकूण ४३ गटांपैकी २४ (५५.८२ टक्के) महिला अध्यक्षा ह्या शिक्षित असून २९ (४४.१८ टक्के) महिला ह्या निरक्षर आहेत.

३) एकूण गटांपैकी १६ गटांची व्यवहार विषयक स्थिती निकृष्ट स्वरुपाची आहे. या एकूण १६ गटांमध्ये ०९ (५६.२५ टक्के) गट हे निरक्षर महिला अध्यक्षांचे आहेत. म्हणजे निकृष्ट गटांमध्ये निरक्षर अध्यक्ष असणाऱ्या गटांचे प्रमाण अधिक आहे.

४) गटाच्या अध्यक्षांचे शिक्षण हा गटाच्या व्यवहारविषयक स्थितीवर पर्यायाने गटातील महिलांच्या सबलीकरणावर प्रभाव पाडत आहेत.

### ६.६.२ अध्यक्षांचे आर्युमान आणि सबलीकरण

गटाचे नेतृत्व करणाऱ्या अध्यक्षाचे आयुर्मान हा गटाच्या व्यवहार विषयक स्थितीवर पर्यायाने गटातील महिला सभासदांच्या सबलीकरणावर प्रभाव पाडणारा घटक असतो. व्यक्तीची कार्यक्षमता ही वयावर अवलंबून असते. १८ ते ६० वर्ष वयात प्रामुख्याने १८ ते ४५ वर्ष वय हा कर्तृत्वसिद्ध करण्याचा, काहीतरी करुन दाखविण्याच्या, स्वप्नपूर्तीचा कालखंड असतो म्हणून आर्युमानाचा सबलीकरणावर प्रभाव पडत असतो.

**सारणी ५६ : अध्यक्षांचे आर्युमान आणि गट व्यवहारस्थिती**

| आयुर्मान (वर्ष) | व्यवहार स्थिती | | |
|---|---|---|---|
| | उत्कृष्ट | सर्वसामान्य | निकृष्ट |
| १) १८ ते ४५ | १४९ (९.२२) | २९ (७७.४४) | ४ (२५.००) |
| २) ४६ ते ६० | १६ (९.५८) | १० (२९.२६) | ७ (४३.७५) |
| ३) ६० पेक्षा अधिक | २ (१.२०) | ४ (९.३०) | ५ (३१.२५) |
| **एकूण** | **१६७ (१००.००)** | **४३ (१००.००)** | **१६ (१००.००)** |

**टिप :** कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात.
**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्र. ५६ वरुन

१) व्यवहार स्थिती उत्कृष्ट असणाऱ्या एकूण १६७ गटांपैकी १४९ (८९.२२ टक्के) गट हे १८ ते २५ या वयोगटातील आहेत. तर उर्वरित गट हे ४६ ते ६० आणि ६० पेक्षा अधिक वयोगटातील आहेत. म्हणजे उत्कृष्ट व्यवहारस्थिती ही १८ ते ४५ या वयोगटावर अवलंबून असल्याचे दिसून आले.

२) सर्वसाधारण आर्थिक स्थिती असणाऱ्या एकूण ४३ गटांपैकी २९ (६७.४४ टक्के) गट हे १८ ते ४५ वयोगटातील अध्यक्षांच्या नेतृत्वाखालील गट आहेत. २९.२६ टक्के गट हे ४६ ते ६० ह्या वयोगटातील व ९.३० टक्के गट हे ६० पेक्षा अधिक वयोगटातील अध्यक्षांचे आहेत.

३) व्यवहार स्थिती निकृष्ट स्वरुपाची असणाऱ्या एकूण १६ गटांमध्ये २५ टक्के गट हे १८ ते ४५ वयोगटातील अध्यक्षांचे असून उर्वरित ७५ टक्के गट हे ४६ ते ६० पेक्षा अधिक वयोगटातील अध्यक्षांच्या नेतृत्वाखालील आहेत.

४) थोडक्यात तरुण वयोगटातील अध्यक्षांच्या नेतृत्वाखालील ..... उत्कृष्ट व्यवहार स्थिती असणाऱ्या गटांचे प्रमाण सर्वाधिक असून प्रौढ किंवा वयस्व अध्यक्ष असणाऱ्या महिला गटांची निकृष्ट व्यवहार स्थिती असणाऱ्या गटांचे प्रमाण सर्वाधिक आहेत.

### ६.६.३ गट आर्युमान आणि सबलीकरण

सबलीकरण ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे. त्यासाठी स्वयंसहाय्यता गट हे माध्यम आहे. गट स्थापनेनंतर गटाचे आर्युमान वाढत जाते. त्यानुसार गटाची परिपक्वता वाढत जाणे व गटात सहभागी महिलेचे सक्षमीकरण घडून येणे अपेक्षित असते. त्यामुळे गटाचे आर्युमान हा घटक सुद्धा सबलीकरणावर प्रभाव टाकणारा एक महत्त्वाचा घटक आहे.

**सारणी ५७ : गटाचे आर्युमान आणि गट व्यवहारस्थिती**

| गटाचे आयुर्मान | व्यवहार स्थिती | | |
|---|---|---|---|
| | उत्कृष्ट | सर्वसामान्य | निकृष्ट |
| १) १ ते २ वर्ष | ५७ (३४.१३) | १५ (३४.८८) | १ (६.२५) |
| २) ३ ते ६ वर्ष | १०५ (७२.८७) | २१ (४८.८४) | ६ (३७.५०) |
| ३) ७ ते १० वर्ष | ५ (३.००) | ७ (१६.२८) | ९ (५६.२५) |
| **एकूण** | **१६७ (१००.००)** | **४३ (१००.००)** | **१६ (१००.००)** |

**टिप :** कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात.
**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्र. ५७ वरुन

१) स्वयंसहाय्यता गटांनी बँकाकडून कर्ज मिळवून व्यवसाय स्थापन केल्यानंतर १ ते २ वर्ष पुर्ण झालेल्या गटांची उत्कृष्ट व्यवहारस्थिती असणाऱ्या एकूण गटांमध्ये ३४.१३ टक्के वाटा आहे. उत्कृष्ट व्यवहार स्थिती असणाऱ्या एकूण गटांमध्ये ३ ते ६ वर्ष आर्युमान असणाऱ्या गटांचे प्रमाण ७२.८७ टक्के इतके अधिक आहे. तर ७ वर्षापेक्षा अधिकचे आर्युमान असणाऱ्या गटांचे प्रमाण फक्त १.२० टक्के इतकेच आहे. थोडक्यात ३, ४, ५, ६ वर्ष हे गटाचे वय असेपर्यंत गटाचे व्यवहार उत्कृष्ट स्थितीत असतात. मात्र नंतरच्या काळात व्यवहार स्थितीचे स्वरुप घसरत जाते.

२) सर्वसाधारण व्यवहार स्थिती असणाऱ्या एकूण गटांपैकी ३४.८८ टक्के गटांचे आर्युमान १ ते २ वर्ष आहे. ४८.८४ टक्के गटांचे आर्युमान ३ ते ६ वर्ष व १६.२८ टक्के गटांचे आर्युमान ७ ते १० वर्ष असे आहे.

३) निकृष्ट व्यवहार स्थिती असणाऱ्या एकूण गटात ३ ते ६ वर्ष आर्युमान असणाऱ्या गटांचे प्रमाण ३७.५० टक्के तर ७ ते १० वर्ष आर्युमान असणाऱ्या गटांचे प्रमाण ५६.२५ टक्के इतके आहे. म्हणजे गटाचे आर्युमान साधारणत: पाच ते सहा वर्षानंतर वाढत गेल्यास व्यवहार स्थिती खालावत जाते. हे दीर्घकालीन महिला सबलीकरणासाठी घातक ठरणारे आहे.

### ६.६.४ गटाचे आकारमान आणि सबलीकरण

स्वयंसहाय्यता गटामध्ये समान पार्श्वभूमीवरील समान विचाराच्या व्यक्तींचा समावेश असतो. पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तीचे एकत्रिकरण गटात अपेक्षित असते. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत महिलांचे स्वयंसहाय्यता गट स्थापन करतांना गटातील महिलांची सभासद संख्या १० ते २० पर्यंत असणे आवश्यक आहे. गटात सहभागी झालेल्या सभासद संख्येवरुन गटाचा आकार ठरत असतो. गटाच्या आकारमानाचा गटाच्या व्यवहार स्थितीवर व पर्यायाने गटातील सभासद महिलांच्या सबलीकरणावर प्रभाव पडतो का? याचे अध्ययन केले असता, गटाच्या आकारमानाचा प्रभाव पडत असल्याचे आढळून आलेले आहे.

**सारणी ५८ : गटाचे आकारमान आणि व्यवहार विषयक स्थिती**

| गटातील सभासद संख्या | व्यवहार स्थिती | | |
|---|---|---|---|
| | उत्कृष्ट | सर्वसामान्य | निकृष्ट |
| १) ० ते १० | ९७ (५८.०८) | ९ (२०.९३) | २ (१२.५०) |
| २) ११ ते १३ | ६६ (३९.५२) | २० (४६.५१) | ५ (३१.२५) |
| ३) १४ ते १६ | ४ (२.४०) | १३ (३०.२३) | ७ (४३.७५) |
| ४) १७ ते २० | - | १ (३.३३) | २ (१२.५०) |
| **एकूण** | **१६७ (१००.००)** | **४३ (१००.००)** | **१६ (१००.००)** |

**टिप :** कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात.

**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्र. ५८ वरुन

१) उत्कृष्ट व्यवहार स्थिती असणाऱ्या एकूण गटांमध्ये १० महिलांचा गट असणाऱ्या गटांचे प्रमाण सर्वाधिक ५८.०८ टक्के इतके आहे. म्हणजे लहान आकाराचा गट व्यवहार स्थिती उत्कृष्ट असण्यावर व पर्यायाने सबलीकरणावर अधिक प्रभाव पाडत असतो.

२) सर्वसाधारण व्यवहार स्थिती असणाऱ्या एकूण गटांमध्ये ११ ते १३ या मध्यम आकाराच्या गटांचे प्रमाण ४६.५१ टक्के इतके अधिक आहे.

३) निकृष्ट व्यवहार स्थिती असणाऱ्या एकूण गटांमध्ये १४ ते १६ सभासद संख्या असणाऱ्या मोठ्या आकाराच्या गटांचे प्रमाण ४३.७५ टक्के इतके सर्वाधिक आहे.

४) गटातील सभासद महिलांची संख्याकमी असेल तर सबलीकरण अधिक प्रभावीपणे होते. मात्र सभासद संख्या वाढून गटाचे आकारमान मोठे होत जाते तसे सबलीकरणावरील प्रभाव कमी होत जातो, हे प्रकर्षाने निदर्शनास येते.

- गट लहान असेल तर सभासदांमध्ये सुसंवाद अधिक असतो. मात्र गटाचा आकार मोठा असेल तर गोंधळाची स्थिती निर्माण होऊन एकमेकांमध्ये विसंवाद वाढत जातो.
- गट लहान असेल तर गरजा पुर्ततेचे प्रमाण अधिक असणे. गटाचा आकार मोठा असेल तर गरजांची पुर्तता घडवून आणताना अडचणी निर्माण होतात.
- मोठ्या गटातील सर्व सभासदांच्या गरजा भागविण्या इतका व्यवसायचा आकार मोठा असत नाही कारण कर्ज पुरेसे मिळत नाही. त्यामुळे नफा प्रमाण अधिक नसते. लाभाचे प्रमाण कमी असेल तर आपोआप गटाकडे दुर्लक्ष होते.
- गटाचा आकार मोठा असेल तर सभासद महिलांमध्ये गटबाजी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

### ६.६.५ गटाचे स्वरुप आणि सबलीकरण (गट सभासदांचे धार्मिक स्वरुप)

मार्क्सच्या मते 'धर्म' ही अफुची गोळी असते. प्रत्येक धर्माचा पगडा व्यक्तीच्या मनावर आणि दैनंदिन कार्यावर असतो असा एक समज आहे. यादृष्टीने स्वयंसहाय्यता गटात समाविष्ट असणाऱ्या महिला सभासदांच्या धर्माचा व्यवहार स्थितीवर व पर्यायाने महिला सबलीकरणावर असणारा प्रभाव अधोरेखीत करता येण्यासारखा आहे.

**सारणी ५९ : गटाचे स्वरुप आणि व्यवहार स्थिती**

| गटाचे स्वरूप | व्यवहार स्थिती | | | |
|---|---|---|---|---|
| | उत्कृष्ट | सर्वसामान्य | निकृष्ट | एकूण |
| १) हिंदू | ८१ (७४.३१) | २१ (१९.२७) | ७ (६.४२) | १०९ (१००.००) |
| २) मुस्लिम | ५८ (८२.८६) | ९ (१२.८६) | ३ (४.२८) | ७० (१००.००) |
| ३) बौध्द | २१ (७५.००) | ४ (१४.१९) | ३ (१०.७१) | २८ (१००.००) |
| ४) ख्रिश्चन | २ (५०.००) | २ (५०.००) | ० (0.00) | ४ (१००.००) |
| ५) मिश्र | ५ (३३.३३) | ७ (४६.६७) | ३ (२०.००) | १५ (१००.००) |
| **एकूण** | **१६७** | **४३** | **१६** | **२२६** |

**टिप :** कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात.
**स्त्रोत :** अनुसूची - २० फेब्रुवारी ते १० एप्रिल २०११

सारणी क्र. ५९ मध्ये दर्शविल्या प्रमाणे.

१) निव्वळ हिंदू महिलांचे सर्व सभासद असणारे एकूण १०९ गट, निव्वळ मुस्लीम महिला सभासद असलेले एकूण ७० गट, फक्त बौद्ध महिला सभासद असलेले एकूण २८ गट निव्वळ ख्रिश्चन महिला सभासद असलेले ४ गट आणि हिंदु, मुस्लीम, बौद्ध, ख्रिश्चन या धर्मांच्या महिला सभासद असलेले एकूण मिश्र गट १५ आहेत.

२) मुस्लीम धर्मात व्याजाच्या मोबदल्यात कर्ज घेणे निशिद्ध मानलेले आहे. मात्र या धार्मिक शिकवणीचा गरिब कुटूंबातील महिला अंतर्गत कर्जाचे देवाण-घेवाण व्यवहार अवलंब करतांना आढळून येतात. अंतर्गत कर्जाचे देवाण-घेवाण व्यवहार व्याजमुक्त करतात. बाह्य कर्जासाठी अपरिहार्यता म्हणून मिळणाऱ्या नफ्यातून व्याज देतात. कर्ज बुडविणे निशिद्ध म्हणून कर्जाची नियमितपणे परतफेड करतात. म्हणजे धार्मिकता हा घटक गट

व्यवहारात अडथळा ठरत नाही. त्यामुळे मुस्लीम धर्मातील महिलांच्या ८२.८६ टक्के गटाचे व्यवहार हे उत्कृष्ठ स्वरूपाचे असल्याचे निदर्शनास येते.

३) हिंदु धर्माच्या महिला सभासद असलेले ७४.३१ टक्के गटांचे व्यवहार हे उत्कृष्ठ स्वरूपाचे आहेत. कर्जफेडीच्या दृष्टीने विचार केल्यास हिंदु स्त्रिया ह्या पापभिरू असल्यामुळे कर्जफेड प्रमाण वाढण्यास ही धार्मिकता सहाय्यक ठरते.

४) बौद्ध धर्माच्या महिला सभासद असलेले ७५ टक्के गटांचे व्यवहार उत्कृष्ठ स्वरूपाचे आहे. कारण या धर्मातील महिलांमध्ये कुटूंबाची जबाबदारी महिला अधिक प्रमाणात सांभाळतात.

५) ख्रिश्चन धर्माच्या महिला सभासद असलेल्या गटांमध्ये निकृष्ठ व्यवहार स्थिती असल्याचे प्रमाण आढळून येत नाही. कारण समाजातील अल्पसंख्यांक असणे हा घटक अधिक प्रभावी ठरतो. एकमेकांना मदत करण्याची सांभाळून घेण्याची वृत्ती सहाय्यक ठरते.

६) एकूण गटांमध्ये धर्म निहाय व्यवहार स्थिती अधिक चांगली आढळून येते. मात्र शहरी भागात भिन्न धर्माच्या प्रामुख्याने हिंदु-मुस्लिम धर्मीय महिलांच्या मिश्र गटाची आर्थिक व्यवहार स्थिती अधिक निकृष्ठ असल्याचे आढळून येते. कारण अंतर्गत कर्जाची देवाण-घेवाण करतांना व्याज आकारणीवरून मतभेद, सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यावरून मतभेद, धार्मिक वर्चस्व वाद यामुळे गटाची व्यवहार स्थिती खालवण्याचे प्रमाण वाढलेले आढळून येते.

## ६.७ सारांश

प्रस्तुत प्रकरणात अध्ययन विषयाशी संबंधीत नाशिक जिल्ह्यातील नाशिक व मालेगाव शहरातील महिला स्वयंसहाय्यता गटांचे सर्वेक्षण करून मिळालेल्या तथ्यांचे विश्लेषण मांडण्यात आलेले आहेत. नाशिक जिल्ह्यातील शहरी

स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सबलीकरणाचे तुलनात्मक अध्ययन करण्यात आलेले आहेत. नाशिक व मालेगाव शहरातील महिला स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून होणाऱ्या सुक्ष्म वित्त व्यवहारांची स्थिती, सुक्ष्म वित्त व्यवहारांमुळे महिलांचे घडून येणारे आर्थिक व सामाजिक सबलीकरण विषयक स्थिती सारणीच्या व आलेखांच्या सहाय्याने दर्शविण्यात आलेली आहे. सारणीचे व आलेखांचे विश्लेषण आवश्यक त्या स्वरूपात मांडण्यात आलेले आहेत. तसेच महिला सबलीकरणावर प्रभाव टाकणाऱ्या घटकांचे सुद्धा विश्लेषण मांडण्यात आलेले आहे.

नाशिक जिल्ह्यातील महिला स्वयंसहाय्यता गट हे महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. नाशिक शहरापेक्षा मालेगाव शहरातील गट आर्थिक सबलीकरणाबाबत अधिक सक्षम आहेत. नाशिक शहरातील गट सामाजिक सबलीकरणाबाबत सामाजिक स्तरावर व मालेगाव शहरातील गट कौटूंबिक स्तरावर अधिक सक्षम आहेत.

## प्रकरण ७

# निष्कर्ष व शिफारशी

### ७.१ प्रस्तावना

समाजाच्या पर्यायाने देशाच्या सर्वांगीण विकासात स्त्री–पुरूष यांची भूमिका समान असणे अत्यंत आवश्यक असते. मात्र पितृप्रधान समाज व्यवस्थेत स्त्रियांच्या भूमिकेला व पर्यायाने स्त्रियांना दुय्यम स्थान प्राप्त झाले. समाज व्यवस्थेत स्त्रियांना दुर्बल, अबला, असक्षम मानण्यात येऊन त्यांच्या माणूस म्हणून असणाऱ्या स्थानात कमालीची घट होत गेली. यावर उपाय म्हणून अनेक पातळीवर व अनेक माध्यमातून प्रयत्न करण्यात आले. शासकीय माध्यमातून भारतात महिला कल्याण, महिला विकास, महिला समानता दृष्टिकोनातून प्रयत्न करण्यात आले मात्र त्यास फारसे यश न मिळाल्याने नवव्या पंचवार्षिक योजनेपासून महिला सबलीकरण दृष्टिकोन स्विकारण्यात आला.

महिला आणि दारिद्र्य यांचा जवळचा संबंध असतो. त्यामुळे दारिद्र्य निर्मुलन करून महिला सबलीकरणासाठी बांगलादेशातील ग्रामीण बँकेच्या धरतीवर महिला आणि सुक्ष्म वित्त यांची सांगड घालण्यात आली. सुक्ष्म वित्त माध्यम म्हणून स्वयंसहाय्यता गटांच्या स्थापनेस प्रोत्साहन देण्याचे धोरण स्विकारण्यात आले. शहरी भागातील महिलांचे दारिद्र्य निर्मुलन आणि सबलीकरणासाठी सुर्वण जयंती शहरी रोजगार योजनेच्या माध्यमातून महिला स्वयंसहाय्यता गट माध्यम म्हणून वापरण्यात येत आहे. नाशिक जिल्ह्यातील नाशिक व मालेगाव शहरात स्थापन झालेल्या महिला स्वयंसहाय्यता गटांचे अध्ययन करण्यात येऊन अध्ययनाअंती काढण्यात आलेले निष्कर्ष व शिफारशी यांची मांडणी प्रस्तूत प्रकरणात करण्यात आलेली आहे.

## ७.२ संशोधन परिकल्पनांची पडताळणी

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रमुख तीन परिकल्पनांची मांडणी केलेली होती.

१) स्वयंसहाय्यातून स्वत:चे व गटाचे उत्पन्न वाढविता येते.

२) स्वयंसहाय्यता गटातील सहभागामुळे हक्क प्राप्तीची क्षमता वाढते.

३) स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातुन महिलांचे आर्थिक व सामाजिक सबलीकरण घडुन येते.

प्रस्तुत संशोधनामध्ये तथ्य संकलन स्त्रोतांद्वारे प्राप्त केलेल्या माहितीचे वस्तूनिष्ठ पद्धतीने विश्लेषण केल्यानंतर परिकल्पनांची पडताळणी करण्यात आलेली आहे.

**परिकल्पना १ : ''स्वयंसहाय्यातुन स्वत:चे व गटाचे उत्पन्न वाढविता येते.''**

समाजातील बहुसंख्य महिला स्वत:च्या गरजा भागविण्यासाठी परावलंबी असतात. अशा महिलांना स्वत:च्या क्षमतांची जाणीव झाल्यास त्या स्वत:च्या गरजा स्वत:च पुर्ण करण्यात यशस्वी होऊ शकतात. तसेच वैयक्तीक पातळीवरील स्वयंसहाय्यता प्राप्त करू इच्छिणाऱ्या महिलेस इतर महिलांची जोड मिळाल्यास स्वयंसहाय्यता गट तयार होतात. गटाच्या माध्यमातून स्वत:ची आर्थिक परिस्थिती जाणून ती सुधारण्यासाठी परावलंबनाकडून स्वावलंबनाकडे जाण्यासाठी स्वत:च बीजभांडवल तयार करणे सुकर होते. गटाच्या सुक्ष्म वित्त प्रणालीच्या माध्यमातून महिलांच्या काटकसर या वृत्तीत वाढ होऊन बचतीच्या क्षमतेत वाढ होते. नाशिक जिल्ह्यातील शहरी स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून बचत करणाऱ्या महिलांचे प्रमाण ८.८४ टक्के वरून ९२.९२ टक्के पर्यंत वाढले. (सारणी क्र. ३६) तसेच एकूण बचत करणाऱ्या महिलांमध्ये नियमितपणे बचत करणाऱ्या महिलांचे प्रमाण ७३.९० टक्के आहे.(सारणी क्र.३५) गट स्थापनेच्या एक वर्षानंतर प्रतिसदस्य व १००० प्रमाणे 'फिरता निधी' प्राप्त झाल्यानंतर बचत, फिरता निधी मिळून – गटांतर्गत कर्ज वाटप योग्य निधी तयार होतो या दरम्यान गटात सहभागी महिलांचा

दृष्टीकोन मी ते आम्ही असा होऊन गटाच्या एकूण निधीचा सदस्य महिलांच्या लहान लहान कौटुंबिक गरजा पुर्ण करण्यासाठी वापर केला जातो. नाशिक जिल्ह्यातील शहरी महिला स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून स्वावलंबनाकडे जाण्यासाठी एकूण बचत निधी रूपये ८८३३४२८, फिरता निधी रूपये २४०८८८०, एकूण गटांतर्गत कर्ज वाटप योग्य निधी रूपये ३३१०२८०८ निर्माण झालेला असुन या निधीचा वापर गरजा पुर्ण करण्यासाठी केला जात आहे. (सारणी क्र. ३९) कौटुंबिक पातळीवर आर्थिक व्यवहार क्षमता वाढत असतांना बँकेशी संबंध येवुन बँकेकडे गटाची 'पत' क्षमता वाढलेली आहे. त्या आधारावर व्यवसायासाठी प्रतिगट सरासरी रूपये ९६७२७.८७ कर्जप्राप्ती झालेली आहे (सारणी क्र. ४०). व्यवसायाच्या माध्यमातुन खर्च वजा जाता प्रतिसदस्य प्रतिमाह नफा रूपये ६०१ ते रूपये २००० मिळण्याचे प्रमाण ७२.६० टक्के इतके आहे. म्हणजे प्रतिसदस्य वार्षिक नफा माध्यमातून मिळणारे किमान उत्पन्न रूपये ७२१२ पर्यंत वाढले याचा अर्थ वार्षिक नफा उत्पन्न वाढीच्या प्रक्रियेतुन ७२.६०टक्के महिला केवळ उत्पन्नाच्या आधारे दारिद्र्य रेषेच्या वर संक्रमीत झालेल्या  आहेत. त्यामुळे पहिली परिकल्पना सिध्द झालेली आहे.

नाशिक आणि मालेगाव शहरातील स्वयंसहाय्यता गटांची तुलनात्मक स्थिती-नाशिक शहरात बचत करणाऱ्या सदस्यांच्या प्रमाणात ९.७५ टक्के ते ९२.२० टक्के तर मालेगाव शहरात ६.९४ टक्के वरून ९४.९४ टक्के पर्यंत वाढ झालेली आहे. (सारणी क्र. ३६) नाशिक शहरात दरमहा रूपये १०० ते १५०बचत करणाऱ्या सदस्यांचे प्रमाण २७.२८ टक्के असुन मालेगाव शहरात हे प्रमाण ४८.६१ टक्के इतके अधिक आहे. (सारणी क्र. ३४) नाशिक शहरात नियमित बचत करणाऱ्या सदस्यांचे प्रमाण ७०.७७ टक्के असुन मालेगाव शहरात हे प्रमाण ८०.५५ टक्के इतके अधिक आहे.नाशिक शहरात बाह्य कर्ज उपलब्धता प्रतिगट सरासरी रूपये ७७६०० तर मालेगाव शहरात प्रतिगट सरासरी रूपये १३७६४०.२८ इतके आहे. (सारणी क्र. ४०) नाशिक शहरात प्रतिसदस्य प्रतिमाह (रूपये ६०१ ते रूपये २०००) नफा उत्पन्न मिळविण्याचे प्रमाण ६८.८४ टक्के तर मालेगाव शहरात हे प्रमाण ८०.५५ टक्के

इतके आहे. नाशिक व मालेगाव शहरात उत्पन्न वाढ झालेली आहे. मात्र मालेगाव शहरातील स्वयंसहाय्यता गटांच्या महिलांची उत्पन्न वाढ अधिक आहे.

**परिकल्पना २ : ''स्वयंसहाय्यता गटातील सहभागामुळे हक्क प्राप्तीची क्षमता वाढते''**

भारतीय राज्यघटनेनुसार स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने समानतेचा हक्क मिळालेला आहे. प्रत्यक्षात समाजजिवनाच्या वर्तमान परिस्थितीत पुरूषांपेक्षा स्त्रियांना दुय्यम वागणुक मिळते. त्यांच्या हक्कांची पायमल्ली होते. मात्र स्वयंसहय्यता गटात सहभागी होणाऱ्या महिलांना सुरूवातीच्या काळात मनव्यवहारातून स्व ची जाणीव करून दिली जाते. हक्क व कर्तव्याविषयी जागृतता निर्माण करण्यावर भर दिला जातो. स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून दरमहिन्याला किमान एक ते दोन बैठकांचे आयोजन केले जाते. नाशिक जिल्ह्यातील शहरी स्वयंसहाय्यता गटांच्या एकूण महिला सदस्यांपैकी ७३.९० टक्के सदस्या बैठकींना उपस्थित असतात. महिलांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी त्यांना बैठकांमध्ये मते मांडण्याचे स्वातंत्र असते. गटाच्या एकूण सदस्यांपैकी ६७.२५ टक्के सदस्या ह्या बैठकांमध्ये निर्भिडपणे मतप्रदर्शन करीत आहेत. गटाच्या माध्यमातून महिला सदस्यांना बँक व्यवहाराची ओळख करून दिली जाते. गटाच्या एकूण अध्यक्षांपैकी ८४.०८ टक्के अध्यक्षांना बँक व्यवहाराची माहिती झाली. एकूण गटांपैकी ७३.० टक्के गटातील अध्यक्ष व सचिव या दोहोंना बँक व्यवहाराची माहिती आहे. तर एकूण सदस्यांपैकी ५८.४० टक्के महिला सदस्यांना बँका व्यवहाराची माहिती आहे. (सारणी क्र. ५१). कौटुंबिक पातळीवर स्त्री-पुरूष समानेच्या दृष्टीने ६४.९१ टक्के महिला सदस्यांचा निर्णय प्रकीयेत सरासरी सहभाग वाढलेला आहे. सामाजिक पातळीवर ५३.६० टक्के पर्यंत महिलांचा सहभाग वाढलेला आहे. स्त्रीला एक माणूस म्हणुन जगण्याचा नैसर्गिक हक्क आहे. या हक्काच्या प्राप्तीसाठी एक पाऊल पुढे पडत आहे (सारणी क्रमांक. ५२ व ५३). कुटूंबातील पुरूषांचे स्त्रीयांवर असणारे दडपण ३८.९३ टक्के पर्यंत कमी झाले. पुरूषांकडून

महिलांचा होणारा शारीरीक छळ/ मारहाण प्रमाण २१.६८ टक्के पर्यंत कमी झाले. सामाजिक पातळीवर वावरतांना पुरूषांकडुन होणारा त्रास (हिणवणे, टिंगल-टवाळी करणे)२६.५४ टक्के पर्यंत कमी झाला आहे. गटाच्या माध्यमातुन समाजोपयोगी, विधायक कामे केल्यामुळे ६७.६९ टक्के महिलांना समाजाचा दृष्टीकोन सकारात्मक होत असल्याचे आढळून येत आहे. तसेच एकूण गटांपैकी ३१.८५ टक्के गटातील महिलांनी आपले हक्क मिळविण्यासाठी व अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी सामाजिक पातळीवर दबावगट निर्माण केलेला आहे. (सारणी क्र. ५४) थोडक्यात नाशिक जिल्ह्यातील शहरी महिला स्वयंसहाय्यता गटाच्या महिलांची हक्क प्राप्तीची क्षमता वाढलेली आहे.

नाशिक आणि मालेगाव शहरातील महिला गटांच्या सदस्यांची हक्क प्राप्ती क्षमतेची तुलनात्मक स्थिती – नाशिक शहरातील गटाच्या एकूण महिलांपैकी ७५.३२ टक्के महिला बैठकांसाठी उपस्थित राहतात. मालेगाव शहरात हे प्रमाण ७०.८३ टक्के पर्यंत आहे. नाशिक शहरातील ६४.९३ टक्के महिला बैठकांमध्ये मतप्रदर्शन करतात तर मालेगाव शहरात हे प्रमाण ७२.२२ टक्के पर्यंत अधिक आहे. नाशिक शहरात बँक व्यवहाराची माहिती असणाऱ्या सदस्य महिलांचे प्रमाण अध्यक्ष ८५.0६ टक्के, अध्यक्ष व सचिव ७४.६७ टक्के व सर्व सदस्य ५५.२0 टक्के आहे. तर मालेगाव शहरात हे प्रमाण अनुक्रमे ८१.९४ टक्के, ६९.४४ टक्के व ६५.२७ टक्के असे आहे. कौटुंबिक निर्णय प्रक्रियेतील नाशिक शहरातील हिंदू महिलांचा सहभाग वाढलेला असला तरी मालेगाव (सारणी क्र. ५२) शहरातील महिलांच्या सहभाग वाढीपेक्षा कमी आहे. मात्र सामाजिक पातळीवरील सहभाग व वावर याबाबत नाशिक शहरातील महिला सदस्यांचे प्रमाण मालेगाव शहरातील महिलांपेक्षा अधिक आहे. (सारणी क्र. ५३) नाशिक व मालेगाव शहरातील गटांकडे समााजाचा पहाण्याचा दृष्टीकोन समान प्रमाणात व सकारात्मक झालेला आहे. नाशिक शहरातील गटांच्या महिलांपेक्षा मालेगाव शहरातील महिलांवर दडपण, पतीची मारहाण, समाजातील पुरूषांकडून त्रास देण्याचेप्रमाण कमी आहे. राजकीय क्षेत्रात उमेदवारी करण्यात नाशिक शहरातील महिला पुढे आहेत. म्हणजे मालेगाव

शहरातील मुस्लीम स्त्रीया ह्या स्त्री-पुरूष समानतेचा बाबत  कौटूंबिक पातळीवर व नाशिक शहरातील महिला सामाजिक पातळीवर अधिक पुढे आहेत. तसेच हक्क प्राप्ती व अन्याय विरूद्ध दबावगट निर्माण करण्यात मालेगाव शहरातील ५५.५५ टक्के गटातील महिला यशस्वी झालेल्या आहेत.

थोडक्यात नाशिक जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून हक्क प्राप्तीची क्षमता वाढलेली आहे. त्यामुळे दुसरी परिकल्पना सुद्धा सिद्ध झालेली आहे.

**परिकल्पना ३ : ''स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक व सामाजिक सबलीकरण घडुन येते''**

परावलंबनाकडुन स्वावलंबनाकडे जाण्यासाठी आवश्यक असणाऱ्या आर्थिक क्षमतांची निर्मिती व वाढ होणे आर्थिक सबलीकरणात अपेक्षीत असते. नाशिक जिल्ह्याच्या शहरी स्वयंसहाय्यता गटातील महिलांची काटकसर करून बचत करण्याच्या सवयीत वाढ झाली बचत सवयीत बदल होऊन बँकेच्या माध्यमातुन लहान-लहान बचती मुख्य प्रवाहात सामील झालेल्या आहेत. बचतीच्या सवयीत नियमितपणा आलेला आहे. गटांतर्गत कर्जाच्या देवाण घेवाणीतुन लहान लहान गरजा भागविण्याचे प्रमाण वाढलेले आहे. बँकेकडील पत वाढल्यामुळे कर्ज प्राप्तीचे प्रमाण वाढले. कर्जाची नियमीत परतफेड होत आहे. खर्च वजा जाता नफा प्रमाण वाढुन उत्पन्न वाढ झालेली आहे. परिकल्पना एकवर परिकल्पना तीन मधील आर्थिक सबलीकरण आधारीत आहे. गटातील महिलांचे उत्पन्न वाढलेले आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील महिला स्वयंसहाय्यता गटांमधील ७०.८० टक्के महिलांचा घरखर्च भागविला जातो. ५६.१९ टक्के महिलांनी वैयक्तीक पातळीवर लहान व्यवसाय सुरू केलेले आहेत. त्या व्यवसायासाठीच्या किरकोळ गरजांची पुर्तता होते. ६३.२७ टक्के महिलां मुलांच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षणावरील खर्च भागवित आहेत. दीपावली ईद, नाताळ असे सण व इतर घरगुती समस्यांवर होणाऱ्या खर्चाची पुर्तता ५७.५२ टक्के महिलांकडून होत आहे.

तर २६.९९ टक्के महिलांचा आरोग्य खर्च व ६.६३ टक्के महिलांच्या प्रवास खर्चाची पुर्तता होत आहे. (सारणी क्र. ४९) गटात सहभागी झालेल्या महिलांपैकी २९.६५ टक्के महिलांना अर्धवेळ व ७०.३५ टक्के महिलांना गटांच्या माध्यमातून हक्काचा पुर्णवेळ रोजगार उपलब्ध होत आहे. नाशिक शहरात व मालेगाव शहरात महिलांचे आर्थिक सबलीकरण घडुन येत आहे. मालेगाव शहरातील महिलांच्या आर्थिक सबलीकरणाचे प्रमाण अधिक आहे.

स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातुन महिलांचे सामाजिक सबलीकरण घडून येते.

परिकल्पना क्रमांक तीन मधील सामाजिक सबलीकरण ही परिकल्पना क्रमांक दोनशी निगडीत आहे. स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून होणाऱ्या मनव्यवहाराद्वारे स्व हक्क प्राप्तीची क्षमता वाढते. त्यामुळे कौटुंबिक पातळीवरील निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढण्यास मदत होते. नाशिक जिल्ह्यातील शहरी स्वयंसहाय्यता गटांच्या महिलांचा कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढलेला आहे. मुलांच्या शिक्षण विषयक निर्णयात ७५.२२ टक्के, मुलांच्या विवाह विषयक निर्णयात ५८.८४ टक्के, आर्थिक व्यवहारात ६६.८१टक्के, खरेदी व्यवहारात ७२.५६ टक्के, अपत्य जन्म विषयक निर्णयात ३६.२८ टक्के, भोजन विषयक निर्णयात ७३.८९ टक्के महिलांचा सहभाग आहे. म्हणजे कौटुंबिक पातळीवर महिलांच्या मताला किंमत प्राप्त झालेली आहे. (सारणी क्र. ५२) तसेच कौटूंबिक पातळीवर ७०.७९ टक्के महिलांना वावर स्वातंत्र आहे. तसेच सामाजिक पातळीवर महिलांचा सहभाग वाढलेला आहे. स्वयंसहाय्यता गट संचलित कार्यक्रमात ७३.४५ टक्के महिला सहभागी होत आहेत. विवाह सोहळ्यांमध्ये सहभागी होण्याचे प्रमाण ६७.२५ टक्के वरून ७३.0 टक्के पर्यंत वाढले. सर्वसाधारण कार्यासाठी घराबाहेर जाण्या येण्याचे प्रमाण ३४.५१ टक्के वरून ४९.५५ टक्के पर्यंत वाढलेले आहे. गटाच्या व इतर कार्यक्रमांसाठी एकटीने शहराबाहेर जाण्याचे प्रमाण ३०.९७ टक्के वरून ६७.२३ टक्केपर्यंत प्रमाण वाढले. मतदान विषयक निर्णयाचे स्वातंत्र ३४.५१ वरून ५0.0 पर्यंत वाढले राजकीय क्षेत्रातील उमेदवारीचे प्रमाण २.२१ टक्के वरून ८.४0 टक्के

पर्यंत वाढले. (सारणी क्र. ५३) ''एकव्यक्ती'' म्हणून कौटुंबिक व सामाजिक पातळीवर पहाण्याच्या दृष्टीकोनात बदल होत आहे. महिलांबाबत पुरूषांचे दडपण व गैरवर्तन प्रमाण कमी होण्यास मदत झालेली आहे. सामाजिक पातळीवर दबावगट निर्माण करून अस्तित्व दाखवून देण्यात सक्षम होण्याचे प्रमाण वाढलेले आहे. (सारणी क्र. ५४)

नाशिक आणि मालेगाव शहरातील सामाजिक सबलीकरण विषयक स्थिती- नाशिक व मालेगाव शहरातील गटांच्या महिलांचा कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत सहभाग व वावर, स्वातंत्र, सामाजिक पातळी वरील सहभाग व वावर स्वातंत्र, महिलांकडे पहाण्याचा कौटुंबिक वरील सहभाग व वावर स्वातंत्र, महिलांकडे पहाण्याचा कौटुंबिक व सामाजिक पातळीवरील सकारात्मक दृष्टीकोन इ. बाबतीत वाढ झालेली आहे. मात्र दोन्ही शहरात काही बाबत भिन्नता आढळून येते कौटुंबिक पातळीवरील निर्णय प्रक्रीयेतील महिलांच्या सहभागाबाबत नाशिक शहरातील महिला मुलांचे विवाह, अपत्य जन्म इत्यादी बाबतीतील निर्णय प्रक्रीयेत अधिक सहभागी आहेत. तर मालेगाव शहरातील महिला मुलांचे शिक्षण, खरेदी स्वातंत्र, भोजन इ. बाबतीत निर्णय प्रकियेत अधिक सहभागी होतात. तसेच कौटुंबिक पातळीवरील वावर स्वातंत्रबाबत मालेगाव शहरातील मुस्लीम महिला अधिक मुक्त आहेत. (सारणी क्र. ५२) सामाजिक पातळीवरील सहभागाबाबत नाशिक शहरातील महिला विवाह सोहळ्यात सहभाग, एकटीने शहराबाहेर प्रवास, राजकीय क्षेत्रात उमेदवारी बाबत अधिक प्रमाणात सहभागी आहेत तर मालेगाव शहरातील महिला गटसंचलीत कार्यक्रम, घराबाहेर गल्ली, मोहल्यातील वावर, मतदान निर्णय इ. बाबत अधिक प्रमाणात सहभागी आहे. म्हणजे नाशिक शहरातील महिला सामाजिक पातळीवर अधिक प्रमाणात सहभागी होत आहेत. (सारणी क्र. ५३) तसेच नाशिक व मालेगाव शहरातील महिला स्वयंसहाय्यता गट हे कौटुंबिक व सामाजिक पातळीवर समाजाच्या दृष्टीकोनात बदल घडवुन आणण्यात अधिक प्रमाणात यशस्वी झालेले आहेत.

थोडक्यात, नाशिक जिल्ह्यातील महिला स्वयंसहव्यता गटांच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक व सामाजिक सबलीकरण घडून येत आहे.

## ७.३ निष्कर्ष

वस्तूनिष्ठ पद्धतीने संशोधन करतांना संशोधकाने प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांच्या माध्यमातून उपलब्ध झालेली माहिती व आकडेवारीचा उपयोग करून घेतलेला आहे. प्रस्तूत विषयावर संशोधन करतांना उपलब्ध झालेल्या माहितीचे व आकडेवारीचे विश्लेषण केले असता पुढील प्रमाणे निष्कर्ष प्राप्त झालेले आहेत.

१) काटकसर हा महिलांचा गुणधर्म असतो. स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून काटकसर या गुणधर्मास 'बचत' संधीची जोड मिळाली. त्यामुळे महिलांच्या बचत सवयीत वाढ झालेली आहे.

२) दुर्लक्षीत महिला वर्गाच्या बचतीस सुरक्षितता प्राप्त होऊन या बचती आर्थिक विकासाच्या मुख्य प्रवाहात आलेल्या आहेत. नाशिक शहरातील महिलांच्या बचत सवयीत भिश्शी ऐवजी बँकठेवीत अधिक वाढ झालेली आहे. मालेगाव शहरात पोस्टातील ठेवी ऐवजी बँक सवयीत अधिक वाढ झालेली आहे.

३) स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातुन सुक्ष्म वित्ताची उपलब्धता होत असून पुरूष आणि सावकार यांच्यावरील अवलंबित्व कमी झालेले आहे. कौटूंबिक पातळीवरील लहान गरजा भागविण्याबाबत महिला स्वयंपूर्ण होत आहेत. मालेगाव शहरात सुक्ष्मवित्ताचा लहान गरजा पुर्ण करण्यासाठी अधिक प्रमाणात वापर होत आहे.

४) पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत महिलांकडे १ टक्के संपत्तीची सुद्धा मालकी नसते. या परंपरागत समाजव्यवस्थेस छेद देत स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून महिलांकडे रू. ३.३१ कोटीच्या संपत्तीची स्व मालकी आहे.

५) समाज आणि पर्यायाने बँकांच्या लेखी 'शुन्य पत' असणाऱ्या महिलांनी सामुहिकपणे गटाच्या माध्यमातुन 'पत' निर्माण करून सरासरी प्रतिगट एकूण रू. २.१८ कोटी कर्ज प्राप्त करून घेतलेले आहे.

६) गरिब व्यक्तीच खऱ्या अर्थाने कर्ज फेडीस लायक असतात हे डॉ. युनुस यांचे मत खरे ठरवत ९१.५९ टक्के गटाच्या महिला बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करीत आहेत. हे प्रमाण परंपरागत बँक व्यवसायापेक्षा फार अधिक आहे.

७) शहरी भागात महिलांसाठी रोजगार प्राप्ती ही मोठी समस्या असते. स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून महिलांना रोजगार उपलब्ध होत आहे.

८) स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून बालमजूरीचे प्रमाण कमी होऊन शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे. काम करुन शिक्षण घेणाऱ्या आणि शाळा सोडून काम करणाऱ्या मुलांचे प्रमाण कमी झालेले आहे.

९) लाभप्रदता हे कोणत्याही व्यवसायाचे प्रमुख ध्येय असते. स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातुन ९२.९५ टक्के गटांच्या महिलांना व्यवसायापासून नफा मिळत आहे.

१०) कर्ज उपलब्धतेचे प्रमाण हा व्यवसाय व व्यवसायातील नफ्यावर प्रभाव पाडणारा महत्वपुर्ण घटक आहे.

११) नाशिक जिल्हयातील शहरी गटांपैकी ७३.९० टक्के गटांची मनव्यवहार व धनव्यवहार विषयक स्थिती व वाटचाल योग्य असल्याचे आढळून आलेले आहे.

१२) आर्थिक गरजांच्या पुर्ततेद्वारे दारिद्र्य निमुर्लन घडवुन आणणे हा स्वयंसहाय्यता गटांच्या स्थापनेमागील प्रमुख उद्देश असतो. ७०.८० टक्के महिलांच्या कौटुंबिक गरजांची पुर्तता होऊन या महिलांचे आर्थिक सबलीकरण घडुन येण्यास मदत झालेली आहे.

१३) मायक्रो फायनान्सच्या माध्यमातून गरजा पूर्ण करण्याच्या प्राधान्य क्रम भिन्न स्वरूपाचा आहे. नाशिक शहरात घरखर्च सण-समारंभ, शिक्षण, स्वयंरोजगार, आजारपण तर मालेगाव शहरात घरखर्च, शिक्षण, स्वयंरोजगार, सण समारंभ असा प्राधान्य क्रम आहे.

१४) मोल मजुरी करणाऱ्या दरिद्री कुटूंबातील महिलांना आत्मउद्धाराचा मार्ग सापडला आहे. कुटूंबातील महिलांच्या लहान लहान गरजा भागविण्यासाठी स्वयंसहाय्यता गट उपयुक्त ठरत आहे.

१५) स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून सभासद महिलांमध्ये गतिमानता निर्माण होत आहे. गटांच्या नियमित बैठकांमधील विविध विषयांवर होणाऱ्या चर्चेत सभासद महिला मतप्रदर्शन करून विचार स्वातंत्र जोपासत आहेत. महिलांना बँक व्यवहाराची माहिती झालेली आहे.

१६) 'पुरूषप्रधान' कुटूंब व्यवस्थेच्या निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढलेला आहे. ७५.२२ टक्के महिला आपल्या मुलांच्या शिक्षण निर्णयाबाबत अधिक सजग झालेल्या आहेत. ७३.८९ टक्के महिलांचा भोजन विषयक निर्णय प्रक्रियेत सहभाग आहे. कुटूंबामध्ये वावरतांना ७०.७९ टक्के महिलांना स्वातंत्र असल्याचे आढळून आले. ६६.८१ टक्के महिलांना त्यांनी मिळविलेल्या पैशाचा विनीयोग करण्याचे स्वतंत्र आहे. तसेच ५८.८४ टक्के महिला मुलांचे विवाह विषयक निर्णयात भाग घेत आहेत.

१७) स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातुन सहभागी महिलांना सामाजिक पातळीवर सहभागी होऊन आपले अभिव्यक्ती स्वतंत्र्य जोपासणे शक्य होत आहे. जसे ७३.४५ टक्के महिला गट संचलीत सांस्कृती कार्यक्रमात हिरीरीने भाग घेत आहे. ७३.0 टक्के महिला विवाह सोहळ्यात सहभागी होत आहेत. ६७.२३ महिला सोबतीशिवाय शहराबाहेर प्रवास करीत आहेत. ४९.५५ टक्के महिलांचा घराबाहेर

वावर आहे. ५०.० टक्के महिला मतदान विषयक निर्णय स्वतंत्रपणे घेत आहेत.

१८) समुह शक्तीच्या आधारावर गटांच्या महिलांनी सामाजिक स्तरावर दबावगट निर्माण करून 'पोषण आहार' च्या बाबत नगरसेवकांची शिफारस व अवाजवी हस्तक्षेप बंद करून पोषण आहारासाठी निवड प्रक्रियेत पारदर्शकता आणली. रेशन दुकाने चालविण्यासाठी मिळविणे, गाळे निर्मितीत गटांना गाळे प्रमाण ठरविणे, खाजगी नळ कनेक्शन मिळविणे, निवारा साहित्य मिळविणे, वस्तीतील दारू बंदी, जुगार बंदीसाठी पोलीस स्टेशनवर मोर्चा काढणे. नगरपालिकेकडून सफाई ठेके मिळविणे, नगरपालीकेतील कर्मचारी भरतीत गटांतील महिलांच्या पाल्यांना राखीव कोटा असण्याबाबत निवेदन देणे इत्यादी सारख्या बाबतीत दबावगट निर्माण करून महिला शक्तीचे दर्शन घडवित आहेत.

१९) कौटुंबिक पातळीवर निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढलेला असला तरी 'अपत्यजन्म' व 'अपत्य संख्या' या विषयावरील महत्त्वपुर्ण निर्णयात सर्वंच समाजातील महिलांना सहभागी करून घेण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. प्रामुख्याने मुस्लीम समाजात महिलांचा सहभाग कमी आहे.

२०) महिलांना कौटुंबिक व सामाजिक पातळीवर वावरतांना एक माणूस म्हणून वागणूक मिळवुन देण्यात स्वयंसहाय्यता गट यशस्वी होत आहेत. कुटूंबातील पुरूषांचे दडपण, कौटुंबीक हिंसाचारा अंतर्गत पतीकडुन होणारी मारहाण, सामाजिक पातळीवर वावरतांना पुरूषांकडून त्रास दिला जाण्याचे प्रमाण कमी झालेले आहे.

२१) महिला सबलीकरणावर गटाच्या अध्यक्षांचे शिक्षण अध्यक्षाचे आर्युमान,गटाचे आर्युमान, गटाचे आकारमान ह्या घटकांचा प्रभाव आहे.

२२) महिला स्वयंसहाय्यता गट बँक जोडणीच्या संख्यात्मक वाढीत मुस्लीम धर्माची शिकवण 'रिबा' (व्याज ) निशिद्ध मानने अडसर ठरणारी आहे. ज्या दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांना निकृष्ट जीवनमान जगण्याइतके उत्पन्न मिळते असे कुटूंबे महिलांना स्वयंसहाय्यता गट चळवळीपासून दूर ठेवतात. तेव्हा धर्म हा घटक सबलीकरणात अडथळा ठरतो. मालेगाव शहरात महिला स्वयंसहाय्यता गटांची संख्यात्मक वाढ कमी असण्यास 'धर्म' हा घटक अडथळा ठरलेला आहे.

मात्र स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून होणाऱ्या सुक्ष्मवित्त व्यवहारात आणि त्यामुळे होणाऱ्या गुणात्मक सबलीकरणात धर्म हा घटक सहाय्यक सुद्धा ठरत आहे. कारण घेतलेले कर्ज बुडविणे निषिद्ध मानले जाते. त्यामुळे कर्ज घेऊन चालविण्यात येणाऱ्या स्वयंव्यवसायाच्या उत्पन्नातून कर्जाची परतफेड करण्याचा प्रयत्न मालेगाव व नासिक शहरातील मुस्लिम महिलांच्या स्वयंसहाय्यता गटांकडून अधिक होतांना आढळून येतो. अधिक उत्पन्न मिळविणे, कर्जाची नियमित परतफेड करणे, याबाबत मुस्लिम महिला आघाडीवर आहेत. नफा भागिदारी तत्व कळत– नकळत अंमलात आणले जाते.

२३) स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातुन शहरीभागातील मानवी भांडवलाचा विकास होण्यास मदत होत आहे. 'चुल आणि मुल' या सिमीत परिघात काम करणाऱ्या महिलांना संधीची उपलब्धता होऊन त्यांच्यातील क्षमतांचा विकास होण्यास मदत होत आहे.

२४) आत्मसन्मान मिळविण्यासाठी आर्थिक स्वावलंबनाच्या वाटेवरून जावं लागतं, हे भान तळागाळातल्या महिलांना स्वयंसहाय्यता गटांमुळे आलं! गगनचुंबी इमारतीच्या पायथ्याशी, शहराबाहेर झोपडपट्टींमध्ये रहाणाऱ्या अशिक्षित व अल्पशिक्षित महिलांना

आम्हीही एक माणूस आहोत ही ओळख स्वयंसहाय्यता गटांनीच दिली.

२५) शहरीभागाच्या झोपडपट्टीत अलिप्तपणे जीवन जगणाऱ्या 'अल्पसंख्यांक' म्हणून ओळख असलेल्या समाजातील महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच काम सावकाश परंतू निश्चितपणाने होतांना दिसुन येते.

२६) स्वयंसहाय्यता गट हे महिलांनी महिलांकडून व महिलांसाठी चालविलेला गट असतो. अशा गटांमुळे महिलांमध्ये लोकशाहीचे वातावरण निर्माण होणे हे लोकशाहीसाठी पोषक ठरणारे आहे.

२७) आर्थिक सबलीकरण होऊनही कौटुंबिक व प्रामुख्याने सामाजिक पातळीवरील सबलीकरण होतेच असे नाही. कारण सामाजिक सबलीकरण हे फक्त आर्थिक घटकांवर अवलंबुन नाही तर स्वत: स्त्रीयांची मानसीकता व पुरूषांची परंपरागत मनोवृत्ती यासारख्या घटकांवर अवलंबुन असते.

२८) जीवन जगतांना धार्मिक नियमाचा सोईस्करपणे उपयोग करून घेतला जातो. मुस्लीम महिला कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी व्याजरहित कर्ज या तत्त्वाचा वापर करतात. तर व्यवसायासाठी बँकेकडून घेतलेल्या कर्जासाठी व्याजसहित कर्ज या तत्त्वाचा नाईलाजास्तव अंगीकार करतात.

२९) कौटुंबिक पातळीवरील सबलीकरण आणि सामाजिक पातळीवरील सबलीकरण यात ढोबळमानाने सहसंबंध असल्याचा आभास निर्माण होतो. मात्र सर्वेक्षणाद्वारे मिळालेले तथ्य वेगळे आहेत. नाशिक शहरातील प्रामुख्याने हिंदु महिला कौटुंबिक पातळी पेक्षा सामाजिक पातळीवर अधिक सक्षम आहेत. तर मालेगाव शहरातील प्रामुख्याने मुस्लीम महिला सामाजिक पातळीपेक्षा कौटुंबिक पातळीवर अधिक सबल आहेत.

३०) हिंदु महिलांपेक्षा मुस्लीम महिला गटांमध्ये समुह भावना अधिक घट्ट रूजलेली आहे. मालेगाव शहरात मुस्लीम महिलांमध्ये सामुहिक एकतेची भावना अधिक घट्ट आहे. तर नाशिक शहरातील बहुजातीय हिंदू महिलांमध्ये सामुहिक एकतेची भावना मात्र घट्ट नाही.

३१) स्वयंसहाव्यता गटाच्या माध्यामातुन आत्मउद्धार ही कोणत्याही जाती धर्माची मक्तेदारी नाही. मात्र बहुपत्नीत्व, असुरक्षिततेची भावना, कायदेशीर संरक्षणाचा अभाव इत्यादी बाबींमुळे मुस्लिम महिलांमध्ये आत्मउद्धाराची भावना अधिक तीव्र असते. यातुनच बांग्लादेशाप्रमाणे मालेगाव शहरात स्वयंसहाव्यता गट सबलीकरणात अधिक पुढे आहे.

३२) स्वयंसहाव्यता गट चळवळ ही शहरातील सर्व गरजुंच्या दारापर्यंत पोहोचलेली नाही. गरज असणाऱ्या सर्वांना सामावुन घेण्याची आवश्यकता आहे.

३३) प्रभावी व सातत्यपूर्ण प्रबोधनाचा अभाव हा मनव्यवहाराच्या माध्यमातून सामाजिक सबलीकरण घडवुन आणण्यातील एक प्रमुख अडथळा आहे.

३४) निरक्षरता हा वैचारिक प्रगल्भता व धार्मिक उदारता यातील एक प्रमुख अडथळा आहे. निरक्षरतेमुळे वैचारिक मतभेद निर्माण होऊन गटातील समुह व एकतेची भावना कमी होते तसेच धार्मिक कट्टरता टिकून असते.

३५) शहरीकरणाच्या माध्यमातून उद्योग व्यवसायाची संख्या वाढल्यामुळे रोजगार संधी उपलब्ध होतात. मात्र या रोजगार संधीत दारिद्र्यरेषेखालील अल्पशिक्षित महिलांना मिळणारा वाटा अत्यंत नगन्य असतो. त्यात लोकसंख्या वाढीमुळे सतत घट होत जाते. प्रामुख्याने मालेगाव शहरापेक्षा नाशिक ह्या तुलनेने मोठ्या शहरात ही स्थिती प्रकर्षाने जाणवते.

३६) हिंदू व मुस्लिम महिलांचे संमिश्रगट सबलीकरणाबाबत फारसे प्रभावी ठरतांना आढळून आलेले नाहीत.

३७) स्वयंसहव्यता गटांच्या गुणात्त्मक वाढीशी निगडित असणारी यंत्रणा अत्यंत अपुर्ण असून पुरेशी कार्यक्षम नाही. तसेच गटांच्या मुल्यांकनाशी निगडीत यंत्रणा कार्यरत नाही.

## ७.४ अडचणी

नाशिक जिल्ह्यातील शहरांमध्ये धर्म, जात, रूढी, परंपरा यांना फाटा देत स्वयंसहाय्यता गटांनी आत्मउद्धाराची नवी परंपरा सुरू केलेली आहे. महिलांच्या निष्क्रीय असंघटीत शक्तीला सक्रीय व संघटीत करण्याचे प्रयत्न केलेले आहेत. मात्र या प्रयत्नात त्यांना अनेक अडचणी, समस्यांना सामारे जावे लागत आहेत. संशोधन कार्य करीत असतांना शहरीभागातील स्वयंसहाय्यता गट चळवळीत पुढील प्रमाणे समस्या निदर्शनास आलेल्या आहेत.

१) मनव्यवहाराच्या माध्यमातुन धनव्यवहार घडुन येण्याची प्रक्रिया असते. मात्र एकुण स्वयंसहाय्यता गटांपैकी १५.४९ टक्के गट हे वैचारिक दृष्ट्या एकजीव झालेले नाहीत. धनव्यवहारासाठी एकत्र आलेले सदस्य मनव्यवहार एकमताने करीत नाहीत. त्यामुळे अध्यक्षा व सदस्य, तसेच सदस्यांमध्ये मतभेद निर्माण होऊन गटाच्या वाटचालीत समस्या निर्माण झालेल्या आहेत.

२) स्वयंसहव्यता गट अस्तित्वात येण्यापासुन ते गट पुर्णपणे सक्षम होईपर्यंत समुह संघटीका व योजना समन्वयक यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळणे गरजेचे असते. मिळणाऱ्या मार्गदर्शनातुन गटातील सदस्यांमध्ये सातत्यपुर्ण जागृतता व जोश टिकून रहातो. परंतु १७.२६ टक्के गटांना वेळोवेळी योग्यप्रकारे मार्गदर्शन मिळत नाही.

३) स्वयंसहाय्यता गटात सहभागी झालेल्या महिलांमध्ये आर्थिक व्यवहाराच्या बाबत संपुर्ण माहिती अभाव आढळुन येतो. फिरता

निधी म्हणुन प्रतिसदस्य मिळणाऱ्या रक्कमांचा वापर अंतर्गत कर्ज देवाण घेवाणीसाठी करतात याची माहिती नसल्यामुळे २६ टक्के गटातील महिला हा निधी आपापसात वाटुन घेतात. त्यामुळे गटाची भांडवल विषयक स्थिती कमजोर होऊन गटांतर्गत व्यवहारांवर मर्यादा पडत आहेत.

४) प्रत्येक व्यक्तीत उद्योजकतेची बीजे असतात. हा स्वयंसहाय्यता गटाचा विचार आहे. मात्र परंपरागत व्यवसाय करणाऱ्या बँकाचा यावर विश्वास बसत नाही. म्हणुन ३०.०९ टक्के गटांना व्यवसायासाठी वेळेवर कर्जाची उपलब्धता होत नाही. तसेच ३७.६१ टक्के गटांना मागणीनुसार आवश्यकते इतके कर्ज मिळालेले नाही. वेळनिघुन गेल्यानंतर व अपुऱ्या प्रमाणात मिळणाऱ्या कर्जामुळे व्यवसायाच्या विस्तारावर व नफा क्षमतेवर परिणाम होत असल्याचे आढळून आले.

५) महिलांच्या क्षमतांवर अविश्वास असल्यामुळे प्रतिगट २.५० लाख रूपये कर्ज उपलब्धतेची मर्यादा असतांना सुद्धा एकूण गटांपैकी ६३.१६ टक्के गटांना प्रतिगट १ लाखपेक्षा कमी कर्ज उपलब्धता झालेली आहे. गटांना कर्ज देतांना टार्गेट पुर्ण करण्यासाठी फक्त गटसंख्या लक्षात घेतली जाते. त्यासाठी गटांना रूपये २५०००, ५००००, ६०००० अशा लहान रक्कमांची कर्ज दिली जातात.

६) स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून मिळालेल्या कर्ज परत फेडीचे प्रमाण इतरत्र सरासरी प्रमाण ९७ ते ९८ टकके असतांना नाशिक जिल्ह्याच्या शहरी गटांमध्ये ८.१४ टक्के गटांनी कर्जफेड बंद केलेली आहे. तर १८.५८ टक्के गटांकडून होणारी कर्ज फेड हि अनियमित स्वरूपाची आहे.

७) आय.सी.आय.सी.आय., आय.डी.बी.आय., ॲक्सीस या बँका स्वंयसहाय्यता गटांशी व्यवहार करण्यास तयार नाहीत गटांची बचत

खाते उघडुन घेण्यासाठीही मालेगाव शहरात या बँका तयार नाहीत. कर्ज पुरवठा हा लांबचा विषय आहे. त्यामुळे या बँकांच्या परिसरात गटांना व्यवसाय सुरू करण्यास अडचणी येत आहेत.

८) गटांना कर्ज मिळाल्यानंतर बँकातील बचतीची प्रक्रिया सभासदांकडून बंद करण्यात येत असल्याचे आढळून आले. त्यामुळे दीर्घकालीन प्रक्रिया खंडीत होते.

९) राष्ट्रीयकृत बँकांच्या अधिकाऱ्यांच्या सतत बदल्या होत असल्यामुळे कर्ज मंजुरीची प्रकिया विस्कळीत होते. त्यामुळे कर्ज मंजुरीचा कालावधी अधिक असतो.

१०) स्वयंरोजगारी गटांच्या माध्यमातुन व्यावसायिक 'लाभता' नफ्यांच्या स्वरूपात वाढ होणे अपेक्षित असते. मात्र एकूण गटांपैकी ७.०५ टक्के गटांच्या व्यवसायांना नफा मिळत नाही. तर २०.३५ टक्के गटांच्या व्यवसायांना दरमहा प्रतिसदस्य रूपये १०० ते ६०० नफा मिळत आहे. म्हणजे एकूण २७.४०टक्के गटांना दारिद्र्य निमुर्लना इतकी 'लाभता प्राप्त' करून घेता आलेली नाही.

११) स्वयंसहाय्यता गटांच्या आर्थिक व्यवहारांचे दर वर्षाला लेखापरिक्षण होत नाही. त्यामुळे गटांच्या व्यवहारांना निकष लावुन दर्जा ठरविता येत नाही.

१२) व्यवसायाच्या भरभराटीसाठी व्यवसाय कौशल्य प्रदान करणाऱ्या व्यावसायिक प्रशिक्षणाची आवश्यकता असतांना ५१.३२ टक्के गटांनी महिलांना प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत.

१३) स्वयंसहाय्यता गटाची सर्वसदस्य मिळुन ठरविलेली आचारसंहिता असते. त्यात अंतर्भूत असलेल्या नियमांचे पालन करून व्यवहार होणे आवश्यक असते. मात्र एकूण गटांपैकी १२.२ टक्के गटांची व्यवहार स्थिती असमाधानकारक असुन ०७.०८टक्के गटांचे व्यवहार

सद्यस्थितीत बंद आहेत. म्हणजे १९.१० टक्के व्यवहार हे असमाधानकारक स्थितीत आहेत.

१४) गटाच्या माध्यमातुन व्यवसाय निवडतांना स्थानिक गरजा लक्षात घेवुन निवड करावी असे लवचिक धोरण असते मात्र व्यवसाय निवडीत शिलाई व एम्ब्रॉडरी, ठेला गाडी, धान्य, किराणा व भुसार माल विक्री, कापड व कपडे विक्री, पोषण आहार या सारख्या व्यवसायांनाच प्राधान्य दिले जात आहे. इतर लाभदायक व्यवसाय निवडीबाबत नाविण्यता आढळून येत नाही.

१५) स्वयंसहाय्यता गटामध्ये किमान १० सदस्य असतात. अशा अधिक संख्येने असणाऱ्या सदस्यांसाठी किराणा, कापड, भांडे, मंडप डेकोरेटर्स, वाहन, गिरणी इत्यादी सारखे व्यवसाय पुर्णवेळ असले तरी व्यवस्थापनासाठी दोन ते चार सदस्यांची गरज असते. इतर सदस्यांना काही करण्यासारखे नसते. त्यामुळे अशा सदस्यांच्या क्षमतांचा अपव्यय होत असतो. शिवाय आळीपाळीने सर्व सदस्यांनी जरी आठवड्याचे वार ठरवुन लक्ष दिले तरी त्यात एकसंघता असत नाही. थोडक्यात गटाचा आकार मोठा असणे हीच समस्या ठरते.

१६) शिक्षण हे वैचारिकता वाढविण्याचे साधन असते. मात्र बचतगटांच्या एकूण सदस्यांपैकी ६२.३८ टक्के सदस्या ह्या निरक्षर आहेत. उर्वरीत ३७.६३ टक्के सदस्या ह्या साक्षर आहेत. या साक्षर महिलांपैकीच ८९.८३ टक्के सदस्या या गटाच्या अध्यक्षा आहेत. साक्षर अध्यक्षा व सचिव आणि निरक्षर सदस्या यांच्यामध्ये वैचारिक मतभेद, विश्वासामधील कमतरता, आदराचा अभाव आढळून येतो.

१७) गट स्थापन करतांना एकाच कुटूंबातील एकापेक्षा अधिक महिलांना एकापेक्षा अधिक गटांमध्ये समाविष्ठ करून घेणे, व्यवसायसुरू करण्यासाठीच्या मंजुरीसाठी, गटांना ठेके देतांना काम देतांना राजकीय हस्तेक्षेप होत असल्याचे सुवर्णजयंती कक्षातील व बँकेतील

अधिकाऱ्यांचे मत आहे. हस्तक्षेपामुळे पक्षपात होऊन शेजार गट, गट समुहात जेव्हा गट एकत्र येतात त्यावेळी एकतेची सहकार्याची भावना गटांमध्ये असत नाही. प्रामुख्याने नाशिक शहरात गटांस कर्ज मिळवुन देण्यासाठी अधिक हस्तक्षेप होत असल्याचे आढळुन आले. मालेगाव शहरात हिंदु महिलांच्या गटांपेक्षा मुस्लीम महिलांच्या गटांना प्रशासनाकडून अधिक उदार धोरण राबविले जाते असे आढळून आले.

१८) स्वयंसहाय्यता गट चळवळीचे आर्युमान वाढत जाते त्याप्रमाणे गटांमध्ये गतिमानता व प्रगल्पता येऊन स्वावंलबन प्राप्त होणे अपेक्षीत असते. मात्र अध्ययनावरून असे आढळुन आले की गटाचे आर्युमान वाढत जाते तशी गटातील सदस्यांची वीण सैल होऊन गट हे मोडकळीस येतात. प्रामुख्याने नाशिक शहरात ७ वर्षांपेक्षा अधिक आर्युमान असणाऱ्या गटांपैकी ५0 टक्के गटांचे व्यवहार पुर्णपणे बंद आहेत. कारण तात्पुर्ता व त्वरीत लाभ मिळणाऱ्या उद्देशाने गटात सहभागी होणाऱ्या सदस्या, दिर्घकालीन उदीष्टांचा अभाव, नाविण्यतेचा अभाव इ. कारणांमुळे समस्या निर्माण झालेली आहे.

१९) गटांतर्गत कर्ज देवाण घेवाणीच्या माध्यमातून कौटूंबिक गरजांची पुर्तता करणे हा गटातील सहभागाचा मुख्य उद्देश असतो. मात्र १५.४९ टक्के महिलांना वैचारीक मतभेद व एकमेकांवरील अविश्वासामुळे गरजा भागविता येत नाही. नाशिक शहरातील गटांच्या बाबत ही समस्या प्रकर्षाने आढळून येते.

२०) मिश्र गटांमध्ये प्रामुख्याने मालेगाव शहरातील हिंदू -मुस्लीम महिलांच्या मिश्र गटात अंतर्गत कर्जावरील 'व्याज' आकारणीवरून मतभेद निर्माण होऊन अंतर्गत कर्जाची-देवाण घेवाण स्थगीत केली जाते. वयस्क व निरक्षर मुस्लीम महिलांचा धार्मिक कट्टरतेमुळे 'व्याज' देण्यास विरोध असतो.

२१) स्वयंसहाय्यता गटांचा व्होट बँक म्हणुन राजकारणात वापर करून घेण्यासाठी राजकीय व्यक्तींमध्ये स्पर्धा आहे. उमेदवारी करणाऱ्या वार्डामधील १० महिलांची नावे व फोटो जमा करून गट स्थापनेची शिफारस करायची अशा गटांना फिरता निधी व कर्ज मिळवुन देण्यासाठी पुन्हा पुन्हा संबंधीत यंत्रणेवर प्रभाव टाकणे. यामुळे गटांना मन व धन व्यवहाराच्या प्रक्रियेतून न जाता निधी व कर्ज मिळते. मात्र त्याचा उपयोग योग्य प्रकारे होतांना आढळून येत नाही, नाशिक व मालेगाव या दोन्ही शहरात ही समस्या मुलाखती दरम्यान आढळुन आली.

२२) गटांच्या आर्थिक व्यवहारांच्या दैनंदिन व मासिक नोंदीमध्ये एकसुत्रता आढळून येत नाही. नोंदीमध्ये एकजिनसीपणा आढळून येत नाही. १०० किंवा २०० पानांच्या वहीमध्ये केलेल्या नोंदीमध्ये सातत्य व एकसुत्रता आढळुन येत नाही. त्यामुळे व्यवहारातील पारदर्शकता सदस्यांच्या लक्षात येत नाही.

२३) स्वयंसहाय्यता गटांना कर्ज मिळण्यापर्यंत प्रशासकीय यंत्रणेचा संपर्क असतो. मात्र कर्ज मिळाल्यानंतर बँक व गटाचाच संपर्क असतो. प्रशासकीय नियंत्रण व मार्गदर्शन होत नाही. गटांतर्गत समस्या निर्माण झाल्यास त्रयस्थ पक्ष म्हणुन उपाय योजले जात नाही. त्यामुळे गटाचे व्यवहार असमाधानकार किंवा बंद स्थितीत पोहोचतात.

२४) महिला स्वयंसहय्यता गट चळवळीचे आर्युमान वाढण्याबरोबर प्रशासकीय यंत्रणेतील कर्मचाऱ्यांमध्ये उदासिनतेची भावना वाढीस लागलेली आढळून आलेली आहे.

२५) बचत गटांनी निर्माण केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठीची व्यवस्था उपलब्ध नाही. विक्रीसाठी जागेचा व विक्री कौशल्याचा अभाव प्रकर्षाने आढळून आलेला आहे.

## ७.५ शिफारशी

सबलीकरण घडवुन आणण्याचे माध्यम असणाऱ्या स्वयंसहाय्यता गट चळवळीत अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. समस्यांचे निराकरण होऊन स्वयंसहाय्यता गट चळवळीच्या निकोप वाटचालीसाठी उपाय योजना सुचविण्याच्या दृष्टीने संशोधकाने शिफारशी केलेल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे

### अ) आर्थिक दृष्टीकोनातुन शिफारशी

स्वयंसहय्यता गटांच्या माध्यमातुन महिलांचे आर्थिक सबलीकरण प्रभावीपणे घडवुन आणणेसाठी शिफारशी

१) स्त्री-पुरूषांचे एकत्रीपणे गट स्थापन करण्यास अधिक प्रमाणात प्राधान्य देण्यात यावे. प्रामुख्याने एकाच कुटूंबातील स्त्री-पुरूष घेऊन ३ ते ४ कुटूंबासाठी संमिश्र गट स्थापन करण्यात यावे. त्यामुळे कुटूंबाच्या उत्पन्नात अधिक प्रमाणात वाढ होईल आणि पुरूषांचा स्त्रीयाबाबतचा दृष्टीकोन अधिक सकारात्मक होण्यास मदत होईल.

१) गटातील सदस्यांची संख्या किमान ५ पर्यंत कमी करण्याबरोबर ज्या महिलांमध्ये वैचारिक साम्य असेल अशाच भिन्न जातीच्या महिलांचे संमिश्र गट बनविण्यात यावे.

२) आकारमानाच्या दृष्टीने मोठे असलेल्या गटांना सामुहिक दायित्वाच्या आधारावर दोन किंवा तीन व्यवसायासाठी एकाचवेळी कर्ज पुरवठा करण्यात यावा. त्यामुळे गटातील सदस्य महिलांच्या क्षमतेचा अपव्यय टाळता येईल.

४) असमाधानकारक स्थितीत असणाऱ्या गटातील सदस्यांच्या प्रबोधना द्वारे गटाची वैचारीक पुर्नबांधणी प्राधान्य तत्त्वावर करण्यात यावे.

५) आर्थिक व्यवहार पुर्णपणे बंद असणाऱ्या गटाच्या सदस्यांना एकत्र आणुन गटाचे व्यवहार पुन्हा सुरू करण्यासाठी समुह संघटीकांनी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

६) गटांची संख्यात्मक वाढ घडवुन आणण्याबरोबर गुणात्मक वाढीकडे अधिक लक्ष पुरविण्यात यावे. धनव्यवहार अधिक सक्षम होण्यासाठी मनव्यवहाराच्या सक्षमतेकडे अधिक लक्ष पुरविण्याची गरज आहे.

७) स्वयंसहाय्यता गटांनी अतिरिक्त स्पर्धेपासुन बचाव करण्याच्या हेतुने शिलाई-एम्ब्रॉडरी, कापड, धान्य, किराणामाल इत्यादी व्यवसायांऐवजी डीजिटल बोर्ड, पेन्टींग, मोबाईल, इन्व्हेटर, संगणक, विक्री व दुरूस्ती, फुल शेती, शेळीपालन, यंत्रमागाशी संबंधीत व्यवसाय सुरू करण्यात प्रोत्साहन देण्यात यावे.

८) स्वयंसहाय्यता गटांना केरोसीन, रेशन विक्री बरोबर कोर्ट फी स्टॅम्प, शेतकी खाद्य विक्री, वीज व फोन बील बनविणे, भरणा केंद्र चालविणे, रेशन कार्ड बनविणे, शासकीय माहितीचे संकलन करणे, शासकीय स्टेशनरी तयार करणे इ. सारखे काम करण्यास परवानगी देण्यात यावी.

९) शिलाई-एब्रॉडरी, प्लंबींग व टाईपींग इत्यादी सारखे परंपरागत व्यवसाय प्रशिक्षण देण्याबरोबर मोबाईल, संगणक, इन्व्हेटर, यंत्रमाग, मसाले कांडप, फ्लोरीकल्चर, रंगकाम, पेन्टींग, संगीत, गायन, सेंद्रीय खते निर्मिती, ब्युटीपार्लर इत्यादी सारख्या व्यवसायांचे पुर्णवेळी प्रशिक्षण देण्यात यावे.

१०) स्वयंसहाय्यता गटांना बँकांकडून वार्षिक ६ टक्के व्याजदराने कर्ज पुरवठा करण्यात येईल या घोषणेची त्वरीत अंमलबजावणी होणेसाठी परिपत्रक जारी करण्यात यावे.

११) मुस्लीम महिला स्वयंसहाय्यता गट बँक जोडणीची संख्यात्मक वाढ घडवून आणण्यासाठी 'नफा–तोटा भागीदारी' या इस्लामीक बँकींगच्या तत्वानुसार व्यवहार करणाऱ्या इस्लामीक फायनान्शीयल इन्टिट्युटना स्वयंसहाय्यता गट बँक जोडणी प्रक्रियेत सामिल करुन घेण्यात यावे.

१२) गरिबातील गरिब मुस्लिम महिलांना परंपरागत बँक व्यवहाराच्या माध्यमातून अर्थ व्यवहाराच्या प्रवाहात आणण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणेने त्यांच्यापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. तसेच बँकांनी त्यांच्यावर विश्वास दर्शवून त्यांना लघुवित्त सुविधा पुरविणे.

१३) विक्री व्यवस्थेच्या समस्येवर मात करण्यासाठी महानगरपालिकेने योग्य ठिकाणी जागा उपलब्ध करून द्यावे. तसेच भीमथडी सारखी व्यवस्था निर्माण करण्यात यावी. विक्रीसाठी गाळे वाटप करतांना गटांच्या व्यवसायांसाठी कोटा राखुन ठेवणे. आणि 'लकी ड्रॉ' पद्धतीने गटांना भाडेतत्त्वावर गाळे उपलब्ध करून द्यावे.

१४) विक्री व्यवस्थेची बाजू सांभाळण्यासाठी ज्या महिलांकडे संभाषण व विक्री कौशल्य आहे. अशा १०-१० महिलांचे विक्री संघ निर्माण करून या महिलांना दरमहा मानधन देण्यात यावे. आणि संख्यात्मक विक्रीचे उद्दिष्टये ठरवुन देण्यात यावे.

१५) गटात सहभागी असणाऱ्या सर्व महिलांनी व त्यांच्या कुटूंबातील सर्व सदस्यांनी गटांच्या वस्तुंचाच उपभोग घेण्याचे बंधन घालुन घ्यावे. त्यामुळे नाशिक शहरात १०२५ कुटूंबाची व मालेगाव शहरात ४७९ कुटूंबाची हक्काची बाजारपेठ निर्माण होऊ शकते. दुध, दुधाचे पदार्थ, फळे, भाजीपाला, कपडे, किराणा, मंडप, वाहन, वीट, इत्यादी सारख्या व्यवसायांच्या मालाची विक्री वाढुन खर्चही कमी होईल.

१६) महाविद्यालयीन स्तरावर, शहरात रहाणाऱ्या विद्यार्थिनींसाठी गट स्थापन करण्यात यावे. या विद्यार्थिनींच्या माध्यमातुन 'वस्तु भांडार' नावाने व्यवसाय सुरू करून स्टेशनरी, झेरॉक्स, शाळांसाठी रेडीमेड कपडे, स्कुल शुज, पोषण आहार, ट्युशन्स, फिनॉईल, बॅडेज, प्लांस्टर साहित्य, टिस्को टेप, झाडू इत्यादी वस्तु निर्मिती करून पोहोच व्यवस्था सुरू करण्यात यावी. महानगरपालिकेच्या परिसरात चालविण्यात येणाऱ्या शाळा व महाविद्यालय, दवाखाने व स्वत:

महानगर पालिकेने गटांच्या वस्तुंची सक्तीने खरेदी करण्याचे बंधन घालण्यात यावे.

१७) गटाच्या माध्यमातुन होणाऱ्या आर्थिक व्यवहारांचे दरवर्षात नियमीतपणे लेखापरिक्षण करून घेणे सक्तीचे करण्यात यावे.

१८) आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या महिलांच्या गटात आर्थिक दृष्ट्या सबल असलेल्या महिला असु नयेत याची दक्षता घेण्यात यावी.

## ब) सामाजिक दृष्टीकोनातून शिफारशी

स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातुन महिलांचे प्रभावीपणे सामाजिक सबलीकरण घडुन येण्यासाठी शिफारशी.

१) महिला सबलीकरणासाठी सर्वात प्रथम गटातील सहभागी महिला सजग होणे आवश्यक आहे. महिलांना स्त्री-पुरूष भेद व समानता, स्वत:चे हक्क व कर्तव्य, स्वत:च्या क्षमतांची जाणीव व जागृती निर्माण होणेसाठी मनव्यवहारांवर अधिक भर देण्यात यावा.

२) कौटुंबिक पातळीवर महिलांचा निर्भिडपणे वावर वाढणे आवश्यक आहे. त्यासाठी कुटूंबातील इतर महिलांचा दृष्टीकोन सकारात्मक बनविण्यात यावा. कुटूंबातील महिलांना सुद्धा सुरूवातीच्या 'मनव्यवहार' घडविण्याच्या काळात सभा, बैठका, कार्यक्रमात सहभागी करून घेण्यात यावे.

३) गटात सहभागी झालेल्या महिलांमध्ये आत्मविश्वासाची निर्मीती होणेसाठी शहरातील यशस्वी गटांना व इतर शहरातील गटांना भेटी देऊन त्यांचे अनुभव जाणुन घेण्यासाठी व्यावसायिक सहलींचे आयोजन करण्यात यावे.

४) समाजपातळीवर गटांची सामाजिक उपयुक्तता सिद्ध करण्यासाठी दारूबंदी, व्यसनमुक्ती कामाबरोबर स्वच्छता, सर्वशिक्षा, लसीकरण

इत्यादी सारख्या अभियानांमध्ये सक्रीय सहभाग वाढीवर भर देण्यात यावा.

५) साक्षरता, सार्वजनिक आरोग्य, कुटूंबनियोजन, स्त्री-पुरूष समानता, जातीय सलोखा, इत्यादी सारख्या विषयांवर जागृतता निर्माण करण्याच्या हेतुने नियमीतपणे पती-पत्नी, कुटूंबातील व्यक्तींना सहभागी करून घेण्यात यावे.

६) ज्या गटांमध्ये शिक्षीत सदस्यांचे एकापेक्षा अधिक असेल अशा महिला गटांच्या अध्यक्ष, सचिव व खजिनदार दोन-तीन वर्षानंतर बदलण्याची तरतुद करण्यात यावी. त्यामुळे सर्व सदस्यांना व्यवस्थापनाचे धडे मिळू शकतात.

७) गटात प्रत्येक सदस्याची भूमिका महत्वाची असते. तरीसुध्दा गटप्रमुख हा गटाचा 'गाभा' असतो. गटासाठी बुस्टर डोस असतो. त्यामुळे गटाच्या अध्यक्षाला व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्याची सोय शासनाने महानगरपालिका क्षेत्रात उपलब्ध करून देणे.

८) प्रत्येक समाज विकास संस्थेअंतर्गत आवश्यक त्या संख्येने निरक्षर महिलांसाठी साक्षरतेचे वर्ग चालविण्यात यावेत.

९) दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील कोणत्याही एका महिला सदस्यास गटात सामिल करून घेण्यापेक्षा जी महिला शिक्षीत असेल, तरूण वयातील असेल अशा सदस्यांना प्राधान्य देण्यात यावे.

## क) राजकीय दृष्टीकोनातून शिफारशी

स्वयंसहाय्यता गट चळवळ ही स्थानिक राजकारणापासुन अलिप्त असणेसाठी शिफारशी.

१) दारिद्र्य रेषेच्या यादीत प्रस्थापिताची घुसखोरी टाळणेसाठी आणि पक्षीय राजकारणाचा हस्तक्षेप टाळण्यासाठी आवश्यक संख्येत

गटातील शिक्षीत महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांच्यावतीने तटस्थपणे सर्वक्षण करून घेणे.

२) राजकीय हस्तक्षेपाला बळी न पडता महिला गटांची परिपक्वता व व्यवसाय क्षमता लक्षात घेवुन व्यवसायासाठी शिफारस व कर्ज प्रक्रिया पार पाडण्यात यावी.

३) अंगणवाडीसाठी पोषण आहाराचे कॉन्ट्रक्ट देतांना पक्षपाती धोरण ठेवुन राजकीय हस्तक्षेप करण्यात येतो. त्यासाठी शिक्षण विभाग व सुवर्णजयंती कक्ष यांच्या समन्वयाचे सक्षम गटांना कॉन्ट्रक्ट देण्याची व्यवस्था रूढ व्हावी.

४) महानगरपालीकेच्या निवडणुकीत गटाच्या माध्यमातुन उमेदवारी करणे, निवडुन आलेल्या प्रतिनिधीकडून गटांच्या समस्यांवर मात करणेसाठी प्रयत्न करण्यात यावे.

**ड) प्रशासकीय शिफारशी**

प्रशासकीय कार्यपद्धतीत सुधारणा घडुन येण्याच्या दृष्टीने शिफारशी

१) समुह संघटीकांनी गटाची वैचारिक बांधणी करतांना गटातील प्रत्येक महिलेस स्वत:चे हक्क, स्त्री-पुरूष समानता, आत्म सन्मान, आत्मनिर्भरता, आर्थिक स्वयंपुर्णता, स्वत:मध्ये असलेल्या क्षमता इत्यादी बाबी आत्मसात करण्यासाठी स्वयंसहाय्यता गट हे माध्यम आहे. याबाबत वैचारीक प्रबोधन करणे.

२) समुह संघटीकांनी प्रत्येक गटाची पाक्षीक व मासिक बैठक बोलवुन प्रत्येक महिलेस आपली मते अनुभव स्वरूपात मांडण्यास प्रोत्साहन द्यावे. भिन्न विषयावर चर्चा घडवुन आणावी. चर्चेत परंपरागत समजुती, रूढी, समाज पद्धती कशा चुकीच्या आहेत यावर खुलासा करणे.

३) गटांना वैचारिक व आर्थिक व्यवहाराच्या दृष्टीने सक्षम ठेवण्यासाठी समुह संघटीकांना सर्वप्रथम प्रशिक्षण देऊन सक्षम बनविणे.

४) स्वयंसहाय्यता गटाच्या वाटचालीत धनव्यवहारांतर्गत केवळ अनुदानावर डोळा ठेवुन गटात सहभागी झालेले सदस्य कर्ज व अनुदान प्राप्त झाल्यानंतर गट सोडतात म्हणून अशा गटाशी संपर्क ठेवला पाहिजे.

५) तसेच गटाच्या वाटचालीत साधारणतः पाच वर्षानंतरचा काळ हा अत्यंत खडतर असतो. कारण गटाच्या स्थापनेची नाविण्यता संपलेली असते. अल्पकाळात मोठ्याप्रमाणात लाभमिळण्याची अपेक्षा ठेवुन सहभागी झालेल्या सदस्यांचा भ्रमनिरास होऊन वैचारिक मतभेद वाढुन गटाचे व्यवहार बंद होतात म्हणुन प्रशासनाने दीर्घकालीन उद्दिष्ट्येच्या पुर्ततेसाठी गटाची सक्रीयता गरजेची आहे या दृष्टीने गटाची पुर्नबांधणी करणे.

६) स्वयंसहाय्यता गटांच्या वाटचालीत काही सदस्यांमुळे गट मोडकळीस आल्यास सदस्यांच्या मतपरिवर्तनाचे शेवटपर्यंत प्रयत्न करूनही मतपरिवर्तन होत नसेल तर या सदस्यांशिवाय गटाचे आकारमान १० सदस्यांवरून किमान पाच सदस्य करून त्या गटाचे पुनरूज्जीवरन करण्याची लवचिकता असावी.

७) जिल्हा प्रकल्प अधिकारी, प्रकल्प अधिकारी, समुह संघटीका यांनी स्वयंसहाय्यता गट चळवळ चालवितांना जाती-धर्म बाजुला ठेवुन क्षमता व गुणवत्तेवर निष्ठा ठेऊन भेदभावरहीत वर्तन ठेवावे.

८) गट स्थापन करतांना गटातील एकूण सदस्यांमध्ये जातीचा प्रकारानुसार कोटा ठरविण्याची अट काढून टाकावी. एका गल्लीत, मोहल्यात राहणाऱ्या, महिलांची निकड लक्षात घेऊन गट स्थापन करण्यात यावे.

९) मोठ्या प्रमाणात नाशिक शहरात व काही प्रमाणात मालेगाव शहरातील गटाच्या महिला ईद व दीपावली सणाच्या वेळी फिरत्या निधीचे वाटप करून घेतात. निधीचे आपासात वाटप करून घेणाऱ्या सदस्यांना पुन्हा हा निधी खात्यावर जमा करण्याची सक्ती करण्यात यावी.

१०) सुवर्णजयंती कक्षाकडून सर्व गटांच्या व्यवहार नोंदीत सारखेपणा येणाऱ्या दृष्टीने एकाच प्रकारची स्टेशनरी उपलब्ध करून देण्यात यावी.

११) गटांचा दर्जा ठरवुन समूह संघटीकांना वार्षिक वेतनवाढ देण्याची पद्धत रूढ करण्यात यावी.

१२) पद्धतीचा अवलंब करण्यात यावा. दर्जा नुसार सवलती देणेची पद्धत रूढ करावी.

१३) सुवर्णजयंती कक्षात असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सतत होणाऱ्या बदल्यांमुळे नाशिक शहरातील गटांच्या प्रगतीचे रेकॉर्ड विशिष्ठ नमुन्यात जतन करून ठेवलेले नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने प्रत्येक शहरातील गटांची विशिष्ट नमुन्यात माहिती संग्रहीत करून जतन करण्याची शासनाकडे पाठविण्याची सक्ती करण्यात यावी.

१४) माहिती तंत्रज्ञानाच्या युगात शहरातील सर्व गटांच्या माहितीचे संगणीकरण करण्यात यावे. संगणीकृत केलेली माहिती स्वतंत्र वेबसाईट वर टाकण्यात यावी.

१५) स्वयंसहाय्यता गटाला कर्ज मिळाल्यानंतर व्यवसायाच्या प्रगतीचे संख्यात्मक व गुणात्मक मुल्यमापन करून ग्रेडेशन करण्यासाठी पाचवी मुल्यांकन यंत्रणा' उभारण्यास प्राधान्य क्रम देण्यात यावा.

१६) गटाची निर्मिती व मार्गदर्शन यंत्रणा अधिक सक्षम बनविणेसाठी दरहजारी दारिद्र्य रेषेवरील कुटूंबासाठी एक याप्रमाणे समुह संघटीकेचे प्रमाण असावे. तसेच प्रकल्प अधिकाऱ्यांवरील ताण कमी

करणेसाठी नाशिक शहरात देवळाली, सिडको, सातपुर, आंबेडकर नगर, पंचवटी  या भागासाठी प्रत्येकी एक याप्रमाणे सहाय्यक प्रकल्प अधिकारी, मालेगाव शहरात मालेगाव व कॅम्प यासाठी प्रत्येकी एक याप्रमाणे सहाय्यक प्रकल्प अधिकारी नियुक्त करण्यात यावेत.

१७) नाशिक शहरासाठी तात्काळ प्रभारी प्रकल्प अधिकारी ऐवजी कार्यक्षम प्रकल्प अधिकारी नियुक्त करण्यात यावा.

१८) स्वयंसहाय्यता गटांनी  गुणात्मक वाढीसाठी पाच सुत्रांचा वापर करावा १) नियमीत बचत २) नियमीत बैठका ३) जमा खर्च नोंदीमध्ये नियमीतता ४) नियमीत कर्जफेड ५) गटाच्या आचार संहितेचे सर्व सभासदांकडून पालन इत्यादी.

१९) गट संचलन करतांना काही तत्वांचा सातत्याने पाठपुरावा करणे जसे १) नियमीत बैठका घेऊन सर्वानुमते निर्णय घेणे २) बचतीबाबत एकमत असावे. ३) अंतर्गत कर्ज देतांना सर्वानुमते पसंतीक्रम ठरवुन कर्ज द्यावे. ४) कर्जफेडीसाठी सर्व सभासदांची मानसिकता तयार करणे. ५) सामाजिक जाहिरनामा तयार करून अंमलबजावणी करणे.

२०) व्यवसाय कौशल्य प्रदान करण्यासाठी देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणात स्थानिक पातळीवरील व्यवसायांची गरज विचारात घेवून प्रशिक्षण देण्यात यावे. प्रशिक्षणाचा कालावधी हा सर्वसामान्य क्षमतेच्या महिला केंद्रस्थानी मानून ठरविण्यात यावा.

**इ) प्रोत्साहनपर शिफारशी**

१) स्वयंसहाय्यता गटांच्या प्रगतीत विधायक स्पर्धा निर्माण होणेसाठी सर्वोत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या पहिल्या तीन गटांना रोख बक्षिसे दरवर्षी देण्यात यावीत.

२) स्वयंसहाय्यता गटांचा दर्जा विशिष्ठ करण्यासाठी ग्रेड पद्धतीचा अवलंब करण्यात येऊन 'ए ग्रेड 'प्राप्त गटांना अवार्ड व प्रमाणपत्र प्रदान करण्याची व्यवस्था करण्यात यावी.

३) उत्तम दर्जा असणाऱ्या गटांना व्याजदरात सवलत देण्यात यावी.

वरील शिफारशींची अंमलबजावणी झाल्यास स्वयंसहाय्यता गट चळवळीत संख्यात्मक वाढीबरोबर गुणात्मक वाढीस पाठबळ मिळेल. अशी संशोधकास खात्री आहे.

## ७.६ भावी संशोधनासाठी दिशा

नाशिक जिल्ह्यातील शहरी भागात दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या महिलांचे आर्थिक व सामाजिक दृष्टीकोनातून घडून येणाऱ्या सबलीकरणाचे वस्तुनिष्ठ पद्धतीने तुलनात्मक विश्लेषण करून निष्कर्ष काढलेले आहेत. तसचे संशोधना दरम्यान निदर्शनास आलेल्या समस्या निर्देशीत करून स्वयंसहाय्यता गट चळवळीच्या प्रभावी अंमलबजावणी व वाटचालीसाठी उपाययोजना स्वरूपात शिफारशीसाठी केलेल्या आहेत. त्यामुळे प्रस्तुत संशोधनातुन भविष्यकाळात खाली नमुद केलेल्या विषयांवर संशोधन करू इच्छीणाऱ्या संशोधकास दिशा मिळू शकते असा विश्वास आहे.

१) नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी महिलांच्या सबलीकरणाचे तुलनात्मक अध्ययन.

२) नाशिक जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता गटांच्या प्रगतीचे विश्लेषणात्मक अध्ययन.

३) नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण स्वयंसहाय्यता गटांच्या भुमिकेचे चिकीत्सक अध्ययन.

## ७.७ समारोप

सुक्ष्म वित्त व्यवहारांचे माध्यम म्हणुन बांगलादेशात रूजलेल्या महिला स्वयंसहाय्यता गटांचे लोण जगभरासह भारतात महिला सबलीकरणाचे माध्यम म्हणून प्रचलित झाले. नाशिक जिल्ह्यातील शहरी स्वयंसहाय्यता गट चळवळीस १९९७ पासून सुरूवात होऊन २००१ पासून चालना मिळाली.

नाशिक जिल्ह्यातील शहरी महिला स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून होणाऱ्या महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सबलीकरणाचे तुलनात्मक अध्ययन अत्यंत वस्तुनिष्ठ पद्धतीने मांडलेले आहे. संशोधनाद्वारे संशोधनकर्त्यास मिळालेले निष्कर्ष, आढळून आलेल्या समस्या आणि शिफारशी, भावी संशोधनासाठीची दिशा प्रस्तूत प्रकरणात मांडलेली आहे. समस्या सोडविण्यासाठी उपाय योजना सूचविण्याच्या दृष्टिने केलेल्या शिफारशी या प्रथमदर्शी उपलब्ध माहितीच्या विश्लेषणातून केलेले आहेत. हे संशोधकाचे वैयक्तीक मत आहे. यातून शहरी महिला स्वयंसहाय्यता गटाबाबत धोरण तयार करणाऱ्या धोरणकर्त्यांना व इतर संशोधकांना उपयुक्त व प्रेरक ठरेल अशी संशोधकाची अपेक्षा आहे.

# संदर्भ सूची

## १) संदर्भ ग्रंथ


१. आगलावे प्रदिप, २०००, संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.

२. आमोद, २०१०, महिला बचतगट : महिलांसाठी विकास योजना आणि उद्योग व्यवसाय, अमोद प्रकाशन, मुंबई– ६६.

३. बर्ड व्ही.यु. २००७, सहकार, नरेंद्र प्रकाशन, पुणे– २.

४. बोरुडे आर.आर. २००५, संशोधन पध्दतीशास्त्र, पुणे विद्यापीठ गृह : प्रकाशन पुणे.

५. कुलकर्णी अनिल, २००९, व्यावसायिक संशोधन पध्दती, सक्सेस प्रकाशन, पुणे.

६. गुप्ता कमलेशकुमार, २००५ 'महिला सशक्तीकरण' बुक एनक्लेव्ह, जयपूर.

७. गोडबोले गोविंद, २००९, बचत गटाच्या माध्यमातून गरिबीमुक्त विश्वाची निर्मिती, साकेत प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, पुणे– ०२.

८. घाटोळे रा.ना. २००८, समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर– १०.

९. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, १९५६, मराठी विश्वकोष, खंड– ४, मुंबई.

१०. जोशी प्रभाकर रघुनाथ, २००२, भारताचा आर्थिक ताळेबंद : नव्या शतकातील आव्हाने, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई – २८.

११. पाटील शोभा, २००७, स्त्रीवादी– विचार आणि समिक्षांचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे– ०२.

१२. महिला आर्थिक विकास महामंडळ लिमिटेड, महाराष्ट्र शासन, स्वयंसहाय्यता बचतगट: प्रशिक्षण कृती आराखडा, कला मुद्रण, मुंबई– २२.

१३. मुलाणी एम.यु. २००६, महिला स्वयंसहाय्यता बचतगट, डायमंड प्रकाशन, पुणे– ३०.

१४. मुलाणी एम.यु. २००८, अल्पबचत नियोजन (बचतगट) डायमंड प्रकाशन, पुणे– ३०.

१५. रसाळ राजेंद्र, २०१०, भारतीय अर्थव्यवस्था, सक्सेस प्रकाशन, पुणे– ४१.

१६. रानडे पुष्पा, २०१०, अर्थशास्त्रीय गणिती संशोधन पध्दती, डायमंड पब्लीकेशन पुणे– ३०.

१७. सवदी ए.बी. २००६, द मेगा स्टेट महाराष्ट्र, निराली प्रकाशन, पुणे– २.

## २) अहवाल

१. मालेगाव महानगरपालिका, मालेगाव सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना विभाग, महिला व बालके विकास गट, अहवाल २०००–०१ ते २००९–१०.

२. नाशिक महानगरपालिका, नाशिक सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना विभाग, महिला व बालके विकास गट, अहवाल २०००–०१ ते २००९–१०.

## ३) माहिती पुस्तिका

१. देशमुख रा.नी. २०१०, आपला नाशिक जिल्हा, कल्पना प्रकाशन, नांदेड– ०२.

२. नागरी दारिद्र्य निवारणासाठी कार्यक्रम : एक मार्गदर्शक पुस्तिका, विभागीय नागरी व पर्यावरण संशोधन केंद्र, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई, 'सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना.

३. महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, पुणे, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा– २००५, मार्गदर्शक पुस्तिका, महिला व बालविकास आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, पुणे-०१.

४. स्वयंसहाय्यता बचत गट - प्रशिक्षण कृती आराखडा, महाराष्ट्र आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई - ५१.

५. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना : रुपरेषा व माहिती पुस्तिका, भारत सरकार, नवी दिल्ली.

## ४) नियतकालिके

१. असोसिएशन ऑफ इकॉनॉमिस्ट, २००८, 'अर्थवाहिनी', जामखेड महाविद्यालय, जामखेड.

२. अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा नाशिक– २००९–१०

३. अर्थसंवाद, २००७, (त्रैमासिक) जुलै ते सप्टेंबर, खंड ३१, अंक २

४. वाणिज्य विद्या, २०११ (त्रैमासिक), मार्च ते मे, अंक १

५. नियोजन मंडळ, भारत सरकारच्या वतीने माहिती व प्रसारण मंत्रालयाकडून प्रकाशित योजना मासिक, ऑगस्ट २०००.

६. योजना अंक – ३, ऑक्टोबर– २००३.

७. योजना अंक – ४, नोव्हें. २००४.

८. योजना अंक – ८, मार्च २००८.

९. लोकराज्य, नोव्हें. २००७.

१०. संपदा, जुलै २००७.

११. दास्ताने संतोष, महाराष्ट्र (वार्षिक) २०००. दास्ताने प्रकाशन, पुणे.

१२. दैनिक दिव्य मराठी, नाशिक आवृत्ती, रसिक– वेध बहुरंगी जीवनाचा, 'बचतगट चळवळीपुढे आव्हानांचे डोंगर! नोव्हेंबर २०११.

१३. दैनिक लोकमत, नाशिक मराठी आवृत्ती, नाशिक दशकपुर्ती विशेष. २००६.

१४. दैनिक लोकमत, नाशिक आवृत्ती, अल्पसंख्यांक आयोगाचा इस्लामी बॅकींगला पाठिंबा, ५ जुन २०१२.

१५. दैनिक सकाळ, नाशिक आवृत्ती, 'भारतीय बचतगटाच्या प्रगतीला सलाम', १८ नोव्हें. २००७.

## 5) English Reference Books

१. Biyani Pramod, 2000, Research Methodology, Sharp Publication, Pune-02

२. Folkman Joe, 2006, Employee Surveys, Jaico Publishing House, Mumbai.

३. Ganeshmurthy V.S. 2007, India : Economic Empowerment of Women, New Century Publications, New Delhi- 05.

४. Gideon Sjoberg, 2002, A Research Methdology, Nirali Prakashan, Pune- 02.

५. Hussain Mohammed Galib, 2011, Islamic Banking and Finance : Status and Issues, Deep and Deep Publications Pvt. Ltd, New Delhi- 27.

६. India- 2009, Published by the Additional Director General, Ministry of Information & Broadcasting, Govt. of India, New Delhi- 03.

७. Jha S.K., 2010, Women Empowerment in Globalised 21st Century, Satyam Publishing House, New Delhi.

८. Kanani Goutam, 2011, Microfinance Global Seeario, Vital Publications, Jaipur, India.

९. Lalitha N, 2008, Readings in Microfinances, Dominant Publicatins and Distributiors, New Delhi- 02.

१०. Lalitha N, 2008, SHGs and Microfinance : Research Compendium, Dominant Publications and Distributors, New Delhi- 02.

११. Lalitha N. 2009, Microfiance intervention and Empowerment of Women, Dominant Publisher, New Delhi.

१२. Lazar Daniel, 2009, Micro Finance : Performance Evaluation and Enterprise Development, Allied Publishers Pvt. Ltd., Channai- 02.

१३. Lokhande, 2010, Micro Finance for Socio Economic Development, (Proceeding of the National Conference in Micro Finance), Educational Publisher & Distributors, Aurangabad- 04.

१४. Menon Latika, 2008, Women Empowerment and Challenge of Change, Kanishka Publishers & Distributors, New Delhi-02.

१५. Maharashtra State Bureau of Textbook Production and Curricular Research, Pune, 2009.

१६. Puhazhendhi V., 2000, Microfinance for Rural People : A Impact Evaluation NABARD. Mumbai.

१७. Philips M, 1993, How To Get Ph.D, USB Publishers Distributors Ltd, Delhi.

१८. Sahay Sushma, 1998, Women and Empowerment; Approaches and Strategies, Discovery Publishing House, New Delhi- 02.

१९. Shrinivasan Girija, 2000, Finance to Socio Capital Role of Banks : New Delhi, Tata McGraw- Hill Publishing Company Ltd.

२०. Yadav K.P., 2006, Gender Equality and Economic Development, Surup & Sons, New Delhi- 02.

## 6) Articles, Reports

१. Bhatia, G.S. Director of Census operations, Maharashtra Census of India, 1991 District Census Hand Book, Nashik.

२. Census of India, 2001, Registrar General of India.

३. Government of Maharashtra, "Nashik Gazetteer," 1975.

४. Micro Finance World, Jan - Mar 2010, The Indian Express Limited, Mumbai.

५. Ministry of Finance & Dept of Economic Affairs Govt. of India, Economic Survey 2009-10, Oxford University Press.

६. Journal of Commerce & Management, July 2010.

७. Singh Krishna Bir, Research Analysis & Evaluation, July 2010, Vol- I Issue- 10.

८. Research Link, Kala, Samajvignyan Awam Vanijjya, Indore - 18, Aug 2010, Vol- IX, Issue- 77.

## 7) Websites


१. http://www.apmas.org

२. http://www.aptsource.in/admin

३. http://www.articlesbuse.com

४. http://www.censuindia.net

५. http://www.dhanax.com

६. http://www.docstoc.com

७. http://www.indiaclub.com

८. http://www.ideas.repec.org

९. http://www.maharashtra.gov.in.

१०. http://www.mendeley.com

११. http://www.microfiance.lu

१२. http://www.nabard.com

१३. http://www.nabard.org.

१४. http://www.nashik.nic.in

१५. http://www.nipccd.nic.in

१६. http://www.nashikonline.com

१७. http://www.nashiklive.com

१८. http://www.nashikmunciple corporation.com

१९. http://www.oppaers.com

२०. http://www.rediff.com

२१. http://www.rural.nic.in

२२. http://www.srtmun.ac.in

## परिशिष्टे

## अनुसूची

अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी संशोधन

# ''नाशिक जिल्ह्यातील शहरी महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणाचे अध्ययन''

(विशेष संदर्भ– मालेगांव व नाशिक शहरातील स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून होणाऱ्या महिला सबलीकरणाचे तुलनात्मक अध्ययन)

संशोधक – **श्री. सोनवणे डी.एन.,** मसगा महाविद्यालय, मालेगांव- कॅम्प

मार्गदर्शक – **डॉ. गिते टी.जी.,** अध्यक्ष, व्यापारी अर्थशास्त्र अभ्यास मंडळ पुणे विद्यापीठ

**मालेगांव/ नाशिक** शहरातील महिला स्वयंसहाय्यता गटांच्या सर्वेक्षणाची अनुसूची

**१. महिला स्वयंसहाय्यता गट अध्यक्ष – वैयक्तीक माहिती–**

* नाव : ____________________
* पत्ता : ____________________
* वय : ____________________
* शिक्षण : ____________________
* जात : ____________________
* कुटुंबातील व्यक्तींची संख्या – पुरूष.....स्त्रीया......मुले..... एकूण
* गटात सहभागी होण्यापुर्वीचे उत्पन्न साधन- घरकाम/मजुरी/ स्वयंरोजगार/शेती/इतर.
* गटात सहभागी झाल्यानंतर उत्पन्न साधन-मजुरी/स्वयंरोजगार/घरकाम/शेती/ इतर.
* गटात सहभागी होण्यापुर्वी बचतीचा प्रकार-भिस्सी/रिकरिंग/पोष्ट/विमा/गल्ला/ नाही.
* गटात सहभागी झाल्यानंतर बचतीचा प्रकार – भिस्सी/ रिकरिंग/ पोष्ट/विमा/ गल्ला/नाही.

**२. स्वयंसहाय्यता (बचत) गटाविषयी माहिती–**

* स्वंयसहाय्यता गटाचे नाव : ____________________
* गटाचा स्थापना दिनांक व वर्ष: ____________________
* गटाचा प्रकार : **हिंदू / मुस्लिम / ख्रिश्चन/ मिस्त्र**

* गटातील सहभागी सभासद संख्या : ____________________
* शिक्षित सदस्य संख्या : ____________________
* गटाचे खाते असलेल्या बँकेचे नाव : ____________________
* दरमहा बचत रक्कम : ५०/१००/१५०/२००/२५० रू.
* ठेवीचे स्वरूप : नियमित/ अनियमित
* फिरल्या निधीची उपलब्धता : होय/ नाही
* फिरत्या निधीचा वापर कसा केला जातो? आपापसात वाटप/ अंतर्गत कर्ज देणे-घेणे.
* गटाकडे असणारी एकूण ठेव (२००९–१० अखेर) - रू. ..........
* गटांतर्गत कर्जाची देवाण-घेवाण केली जाते का? होय/ नाही

  उत्तर नाही असल्यास कारण काय? ____________________
* कर्जाचा वापर कोणत्या कारणांसाठी/ उपयोगासाठी केला जातो?

  उदरनिर्वाह/ मुलांचे शिक्षण/ स्वयं व्यवसाय/ आरोग्य/ प्रवास/ लग्न/सण/इतर

३. **स्वयं रोजगार गटाची माहिती** (स्वयंसहाय्यता गटाचे स्वयंरोजगारी गटात रुपांतर)

* स्वयंव्यवसायाचे नाव : ____________________
* स्थापना दिनांक : ____________________
* रोजगार मिळालेल्या व्यक्तींची संख्या : ____________________
* व्यवसायाचे स्वरूप : वैयक्तीक / सामुहिक (सर्व सभासद)
* उत्पादनाचे स्वरूप : कच्चामाल/ प्रक्रिया व्यवसाय/ सेवा व्यवसाय

  (व्यवसाय– ____________________ )
* स्वयंव्यवसाय स्थापन करतांना आलेल्या अडचणी : ____________________
* व्यवसायासाठी प्रशिक्षण घेतले काय? होय/ नाही

  प्रशिक्षण घेतले नसल्यास कारण कोणते? ____________________
* प्रशिक्षणाचे ठिकाण व कालावधी : ठिकाण......./ कालावधी........
* व्यवसायासाठी किती कर्ज घेतले ? : रू...............
* कोणत्या बँकेकडून कर्ज घेतले? : ____________________

* मिळालेले कर्ज पुरेसे आहे काय? : होय/ नाही

* कर्जावरील व्याजदर किती आहे ? :

* कर्ज मिळवितांना आलेल्या अडचणी कोणत्या? ____________________

* एकूण भांडवल स्थिती – (२००९–१० अखेर)

| अ.नं. | भांडवल तपशिल | रक्कम रू. |
|---|---|---|
| १ | स्वनिधी (ठेवी+ व्याज) | |
| २ | फिरता निधी | |
| ३ | बँक कर्ज | |
| | एकूण | |

* खेळते भांडवल उभारणी(२००९–२०१०) होय / नाही

| अ.नं. | खेळते भांडवल तपशिल | रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | बचत निधी | |
| २ | गटाचा नफा | |
| ३ | बँक कर्ज | |
| ४ | स्थानिक पतसंस्था | |
| ५ | कुंटूंबातील व्यक्ती | |
| ६ | इतर | |

* कर्जाची नियमितपणे परतफेड होते काय? होय/नाही

  उत्तर नाही असल्यास कारणे कोणती ? ____________________

* बुडीत कर्ज निधी उभारला आहे काय? होय/नाही

* व्यवसायाचा विमा उतरविण्यात आला आहे. काय? होय/नाही

* विक्री व्यवस्थेचे स्वरूप : स्थानिक/ प्रादेशिक/राष्ट्रीय

* विक्री व्यवस्थेतील अडचणी कोणत्या ? ____________________

* व्यवसायापासुन नफा मिळतो काय ? होय/नाही

* प्रति सदस्य दरमहा किती नफा मिळतो? : रु. …………

* कुटूंबाच्या आर्थिक गरजांची पुर्तता होते काय?

| | |
|---|---|
| घरखर्च/उदरनिर्वाह | होय/नाही |
| आरोग्य | होय/नाही |
| मुलांचे शिक्षण | होय/नाही |
| सण/समारंभ | होय/नाही |
| प्रवास | होय/नाही |
| वैयक्तीक व्यवसाय | होय/नाही |

* बिगर आर्थिक घटकांची पुर्तता होते काय?

निवास – सहभागापुर्वी – झोपडी, पाल/ बांबु, फळ्या/ कैलारु, सिमेंट

– सहभागानंतर – झोपडी, पाल/ बांबु, फळ्या/ कैलारु, सिमेंट

पाणी – सहभापुर्वी – नाही/ हातपंप/ सार्वजनिक नळ/ खासगी नळ

– सहभागानंतर – नाही/ हातपंप/ सार्वजनिक नळ/ खासगी नळ

शौचालय – सहभापुर्वी – खुली जागा/ सार्वजनिक/ खासगी

– सहभागानंतर – खुली जागा/ सार्वजनिक/ खासगी

रोजगार – सहभागापूर्वी – बेरोजगार/ अकुशल / कुशल

– सहभागानंतर – बेरोजगार/ अकुशल / कुशल

मुलांचे शिक्षण – सहभागापूर्वी – फक्त काम/ शिक्षण व काम/ फक्त शिक्षण

– सहभागानंतर – फक्त काम/ शिक्षण व काम/ फक्त शिक्षण

दूरदर्शन उपलब्धता – सहभागापूर्वी – होय/ नाही/ कृष्णधवल/ रंगीत

– सहभागानंतर – होय/ नाही/ कृष्णधवल/ रंगीत

भ्रमणध्वनी – सहभागापूर्वी –होय/ नाही सहभागानंतर – होय/ नाही

* गटाच्या सदस्यांमध्ये गतिमानता वाढली काय?

| | |
|---|---|
| मिटींग मध्ये सर्व सदस्य उपस्थित असतात. | होय/नाही |
| मिटींगमध्ये सर्व सदस्य मते मांडतात | होय/नाही |
| बँक व्यवहाराची सर्व सदस्यांना माहिती | होय/नाही |
| स्वयंसहाय्यता गट प्रणालीची संपुर्ण माहिती | होय/नाही |

* कौटूंबिक निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढला काय?

| **तपशिल** | **सहभागापुर्वी** | **सहभागानंतर** |
|---|---|---|
| मुलांचे शिक्षण | होय/नाही | होय/नाही |
| मुलांचे विवाह | होय/नाही | होय/नाही |
| आर्थिक व्यवहार | होय/नाही | होय/नाही |
| खरेदी स्वातंत्र | होय/नाही | होय/नाही |
| अपत्य विषयक निर्णय | होय/नाही | होय/नाही |
| भोजन विषयक निर्णय | होय/नाही | होय/नाही |
| घरातील वावर स्वातंत्र | होय/नाही | होय/नाही |

* सामाजिक सहभाग वाढला काय?

| **अ.नं.** | **तपशिल** | **सहभागापुर्वी** | **सहभागानंतर** |
|---|---|---|---|
| १ | गटाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग | होय/नाही | होय/नाही |
| २ | सामाजिक लग्न समारंभात सहभाग | होय/नाही | होय/नाही |
| ३ | बाहेर प्रवास करणे (एकटीने) | होय/नाही | होय/नाही |
| ४ | पुरुषांच्या परवानगीने घरा बाहेर जाणे– येणे | होय/नाही | होय/नाही |
| ५ | मतदान विषयक स्वतंत्र निर्णय | होय/नाही | होय/नाही |
| ६ | राजकीय क्षेत्रात उमेदवारी | होय/नाही | होय/नाही |

* कौटुंबिक व सामाजिक पातळीवर सकारात्मक बदल होत आहेत काय?

पुरुषांचे दडपण असणे होय/नाही

पुरुषांकडून मारहाण होणे होय/नाही

समाजाचा पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन होय/नाही

समाजातील पुरुषांकडून त्रास दिला जाणे होय/नाही

सामाजिक पातळीवर दबाव गट निर्माण होणे होय/ नाही

* स्वयंसहाय्यता गटात सहभागी होऊन समाधानी आहात काय? होय/नाही

* स्वयंसहाय्यता गट चळवळीत सुधारणा होणे गरजेचे आहे काय? होय/नाही

उत्तर होय असल्यास कोणत्या सुधारणा? ____________________

* प्रशासकीय यंत्रणेकडून पुर्ण सहकार्य मिळते काय? होय/नाही

* शासनाकडून तुमच्या काय अपेक्षा आहेत? ____________________

## अध्ययनासाठी निवड केलेल्या स्वयंसहाय्यता गटांची यादी

## नाशिक शहर

| अ. नं. | स्वयंसहाय्यता गटांचे नांव | व्यवसाय प्रकार | व्यवसायाचे स्थान |
|---|---|---|---|
| १ | समता महिला बचत गट | पिठाची गिरणी | सपना नगर, गंजमाळ, नाशिक |
| २ | उन्नती | मसाले कांडप | मोरवाडी, सिडको |
| ३ | आम्रपाली | रेग्झीन बॅग्स | पेठरोड, पंचवटी |
| ४ | नुतन | शिवणकाम | न्युरजा नगर अंबड |
| ५ | मण्यौला | फरसान विक्री | ग.नं. ७, द्वारका |
| ६ | श्री गौरी | शिवणकाम | संजय नगर, पंचवटी |
| ७ | विश्वकर्मा | झाडू बनविणे | क्षिरसागर कॉलनी, पंचवटी |
| ८ | कुलस्वामिनी | सकस आहार | महाराष्ट-ा हौसिंग सोसा. सातपूर |
| ९ | रमाबाई | साडी ड-ेस मटेरियल | भगतसिंगनगर झोपडपट्टी, सिडको |
| १० | लोण्यादेवी | कॉस्मेटिक | रोहिदास चौक, सातपूर |
| ११ | शितलादेवी | किराणा दुकान | शिवाजीवाडी, पाथर्डीरोड, |
| १२ | गौरी | शिलाईकाम | दसकगाव, जेलरोड, |
| १३ | गौतमी | उद्यान, देखभाल | नांदुरनाका, औ.रोड, |
| १४ | विघ्नहर्ता | एम्ब्रायडरी | विष्णुनगर, नासिकरोड |
| १५ | नंदिनी | साड्याविक्री | इंदिरा गांधी, झोपडपट्टी |
| १६ | श्री गृहलक्ष्मी | सकस आहार, | संजय नगर, पंचवटी |
| १७ | कपालेश्वर | किराणा दुकान | नवनाथ नगर, पेठरोड |
| १८ | यशोधरा | धान्य विक्री | आडगाव नाका, नाशिक |
| १९ | नुरजहा | किराणा दुकान | इंदिरा नगर, नासिक |
| २० | सर्वज्ञ | बागकाम | दिंडोरी नाका, नाशिक |

| अ. नं. | स्वयंसहाय्यता गटांचे नांव | व्यवसाय प्रकार | व्यवसायाचे स्थान |
|---|---|---|---|
| २१ | साई | पापड बनविणे | रविवार कारंजा, नाशिक |
| २२ | संकेत | साडी विक्री | आंबेडकर नगर, नाशिक |
| २३ | जनार्दन स्वामी | भांडी विक्री | जेलरोड, नाशिक. |
| २४ | कुलस्वामिनी | भांडी विक्री | लेदर पर्स शनिचौक, पंचवटी |
| २५ | गुरुदेव | धान्य विक्री | अवधूतवाडी, दिंडोरी रोड |
| २६ | शांती | किराणा माल विक्री | फुलेनगर, पेठरोड |
| २७ | सलौनी | पादत्राणे विक्री, | खडकाळी, नाशिक |
| २८ | राजश्री | शिलाई काम | पाथरवट लेन, नाशिक |
| २९ | शिवलिंग | खाद्यपदार्थ विक्री | सहवास नगर, गडकरी चौक |
| ३० | सौभाग्य | कापडविक्री | स्वारबाबा नगर, सातपूर |
| ३१ | अफरीन | भांडे विक्री | पंचवटी बसस्टॉप शेजारी |
| ३२ | ओमशांती | धान्य विक्री | औरंगबाद रोड, द्वारका |
| ३३ | बिरोबा | शिवणकाम | सौभाग्य नगर |
| ३४ | यश | पेपरडिश | निगळगल्ली, शिवाजी चौक |
| ३५ | जागृती | किराणा व भुसार माल विक्री | भिमवाडा, सहकार नगर |
| ३६ | महेक | रेडीमेड कापड | घ.नं. १३४४, खडकाळी |
| ३७ | जयलक्ष्मी | शेळीपालन | जयप्रकाश नगर, रामनगर |
| ३८ | साईकृपा | संगणक स्टेशनरी | ध्रुवनगर, लिंकरोड |
| ३९ | गुलशन | खानावळ | कमालपुरा, ग.नं. ३ |
| ४० | सुजाता | झाडू– खराटे | महादेव वाडी, प्रा. शाळेजवळ |
| ४१ | मेहेंदी | भांडे विक्री | रमाबाई आंबेडकर नगर |
| ४२ | श्रद्धा | शिलाई काम | पंचशील नगर, गंजमाळ |

| अ. नं. | स्वयंसहाय्यता गटांचे नांव | व्यवसाय प्रकार | व्यवसायाचे स्थान |
|---|---|---|---|
| ४३ | बुद्धभुषण | शिलाईकाम | पंचशील नगर, नाशिक |
| ४४ | आम्रपाली | धान्य विक्री | राहुल साडी, पेठरोड |
| ४५ | सुयोग | किराणा दुकान, | चेहेडी बु नासिक |
| ४६ | जय श्रीराम | गुरे पालन | सुतार गल्ली, वडनेर उमाला |
| ४७ | गंगामाई | दुग्धालय | गंगापूर– सातपूर रोड |
| ४८ | सिद्धी विनायक | भांडे विक्री | गायकवाड मळा, मुक्तीधामरोड |
| ४९ | योगेश्वर | ढेला गाडी | एरंडवाडी, पेठनाका |
| ५० | धनरेखा | सकस आहार | शांतीनगर, एमआयडीसी |
| ५१ | गोरोबा काका | वीटभट्टी | सौभाग्य नगर |
| ५२ | हरिश्चंद्र | सोनारकाम | कामगार नगर, शिवाजी चौक |
| ५३ | उदधार | ढेलागाडी | त्रिमुर्ती नगर, हिरावाडीरोड |
| ५४ | हाजी अली | फळ विक्री | गुलजार वाडी, नाशिक |
| ५५ | गोदावरी | किराणा दुकान | जयप्रकाश नगर, सायनगाव रोड |
| ५६ | मेहंदी | भांडे विक्री | आम्रपाली झोपडपट्टी, उपनगर |
| ५७ | पुर्वा | दोरखंड बनविणे | अवधूतवाडी, दिंडोरी राड |
| ५८ | सिद्धार्थ | ढेलागाडी | विजयममता शेजारी |
| ५९ | रोशनी | शिलाई काम | दोंदचाळ, देवळाली, नाशिक |
| ६० | संचय | विटभट्टी | म्हसोबा वाडी, शिंगाडा तलाव |
| ६१ | श्री दुर्गामाता | किराणा दुकान | मोरेमळा, हनुमानवाडी, पंचवटी |
| ६२ | धनवर्धिनी | फळे विक्री | वावरे लेन, शिवाजीरोड |
| ६३ | संगम | किराणा दुकान | दिलदार मंझील, शिवाजी नगर |
| ६४ | श्रेया | सकस आहार | मनपा शाळा क्र. १००/२८ अंबड |
| ६५ | संघर्ष | फिनाईल | ख्रिश्चनवाडी, चर्चमागे |

| अ. नं. | स्वयंसहाय्यता गटांचे नांव | व्यवसाय प्रकार | व्यवसायाचे स्थान |
|---|---|---|---|
| ६६ | सादीकपिया | स्कुलबॅग | पंचशील नगर |
| ६७ | अहिल्यादेवी | पुरीभाजी सेंटर | अहिल्यामाता नगर, देवळाली |
| ६८ | सखी | शिलाई काम | रविवार कारंजा, नाशिक |
| ६९ | भक्ती | किराणा व भुसार माल | महात्मा फुले नगर, दिंडोरी रोड |
| ७० | हाजीमलंग | धान्यविक्री | गुलजारवाडी, सुभाषरोड |
| ७१ | अन्नपुर्णा | झाडू, खराटे बनविणारे | म.फुलेनगर, पेठरोड |
| ७२ | आकांशा | मासे विक्री | सिद्धार्थ नगर, नाशिक |
| ७३ | जनसेवा | किराणा माल विक्री | गुलजारवाडी, सुभाषरोड |
| ७४ | इच्छामणी | चहा सेंटर | सौभाग्यनगर |
| ७५ | अजिंक्य | एम्ब्रॉडरी | गंजमाळ, नाशिक |
| ७६ | सायली | धान्यविक्री | सप्तश्रृंगी नगर, नांदुरगाव |
| ७७ | समता | फिनॉईल बनविणे | सिद्धार्थ नगर, नाशिक |
| ७८ | सुवासिनी | धान्य विक्री | वडाळागाव, म्यु.शाळे जवळ |
| ७९ | भगवान | भांडे विक्री | भगतसिंग नगर झोपडपट्टी, सिडको |
| ८० | श्री गुरुदत्त | ढेलागाडी | दत्तनगर, पेठरोड |
| ८१ | हिंदमाता | पोषण आहार | दिंडोरी रोड, म्हसरुळ |
| ८२ | धम्मदिप | मंडप डेकोरेशन | स्वारबाबा नगर, सातपूर |
| ८३ | श्री धनलक्ष्मी | एसटीडी | पंचवटी बसस्टॉप मागे, नाशिक |
| ८४ | दुर्गा | एम्ब्रॉडरी | महादेव वाडी, सातपूर |
| ८५ | सिद्धार्थधन | काजू प्रक्रिया | राजीवनगर, झोपडपट्टी, सिडको |
| ८६ | लक्ष्मी | शिलाईकाम | स्वारबाबा नगर, सातपूर |
| ८७ | श्री वैष्णवी माता | पोषण आहार | नवीन आडगांव नाका, त्रिमुर्तीनगर |
| ८८ | सौदामिनी | ढेलागाडी | दत्तकोठ, नवदरवाजा |

| अ. नं. | स्वयंसहाय्यता गटांचे नांव | व्यवसाय प्रकार | व्यवसायाचे स्थान |
|---|---|---|---|
| ८९ | प्रज्ञा | धान्यविक्री | इंदिरा गांधी वसाहत, जुने सिडको |
| ९० | गैबन शहॉ | कॉस्मेटिक, गिफ्ट आर्टीकल्स | खडकाळी, नाशिक. |
| ९१ | अमन | काजू प्रक्रिया | गुजलारवाडी |
| ९२ | सलाज | ॲपे वहान | दिलदार मंजील |
| ९३ | पंचशिल | शिलाई काम | आम्रपाली झोपडपट्टी |
| ९४ | अम्मा भगवान | मंडप डेकोरेशन | महादेव नगर, सातपूर |
| ९५ | नवाझ | कटलरी/ रेडिमेड | न्यु रजा नगर, अंबड |
| ९६ | रमाबाई आंबेडकर | धान्यविक्री | राजीवनगर वसाहत, सिडको |
| ९७ | सप्तश्रृंगी | ढेलागाडी | चंदनवाडी, नाशिकरोड |
| ९८ | समुश | खिचडी बनविणे | टाकसाळ लेन, भद्रकाली |
| ९९ | गुलशन | काजू प्रक्रिया | दिपमाला सोसायटी शेजारी |
| १०० | श्रीराम | शिलाईकाम | पाथरकर लेन, नाशिक |
| १०१ | अन्नपुर्णा | वडापाव सेंटर | भद्रकाली पो.स्टेशन मागे |
| १०२ | हिना | गार्डन मेटेनन्स | १३४४, खडकाळी |
| १०३ | जय संतोषी माता | शिवणकाम | सौभाग्य नगर, नाशिक |
| १०४ | गणेश | रेडीमेड गारमें टस | घोलपचाळ, दुर्गा चौक |
| १०५ | शिल्पा | खराटा बनविणे | महादेव वाडी, सातपूर |
| १०६ | सैय्यद अली | भंगारविक्री | लेखानगर, इंदिरागांधी वसाहत |
| १०७ | गुलशन | पोषण आहार | कमालपुरा, नाशिक |
| १०८ | जयबजरंग | दुग्ध व पदार्थ विक्री | हांडोरे मळा, वडनेर कमान |
| १०९ | साधना | गिफ्ट आर्टिकल्स | पंचशील नगर, गंजमाळ |
| ११० | मानशी | एम्बॉडरी वर्ग | नांदुरगाव, मांडसांगवी |

| अ. नं. | स्वयंसहाय्यता गटांचे नांव | व्यवसाय प्रकार | व्यवसायाचे स्थान |
|---|---|---|---|
| १११ | साई | किराणादुकान | गणेशनगर, वडाळागाव |
| ११२ | जय हनुमान | शेळीपालन | जयप्रकाश नगर |
| ११३ | जयभिम | पादत्राण | भिमवाडी, नाशिकरोड |
| ११४ | सप्तश्रृंगी | धान्यविक्री | भालेराव मळा, नाशिकरोड |
| ११५ | एकता | वीटभट्टी | कुंभारवाडा, देहगाव |
| ११६ | मदरतेरेसा | मॅचिंग सेंटर | गोदावरी पुल, पंचवट |
| ११७ | श्रम साफल्य | मेणबत्ती, फिनाईल | रमाबाई, आंबेडकर नगर |
| ११८ | संत आदिमा | पिठ गिरणी | कॅनडा कॉर्नर, नाशिक |
| ११९ | संजीवनी | रेडीमेड कपडे विक्री | कांबळेवाडी, स्वारबाबा नगर |
| १२० | दिक्षाभूमी | साडी विक्री | भिमनगर, सहकार नगर |
| १२१ | अंबिका | शिलाईकाम | पवनगर, नाशिक |
| १२२ | शेवंती | भंगार विक्री | आडगाव नाका |
| १२३ | वैष्णवी | सावग, फिनॉईल | कोळीवाडा, पिंपळगाव बघुल |
| १२४ | सपना | पिठाची गिरणी | गंजमाळ, नाशिक. |
| १२५ | दुर्गा | धान्यविक्री | श्रमजीवी नगर, पेठरोड |
| १२६ | श्री साईबाबा | लाडू, चिक्की बनविणे | घोडपंचाळ, नवनाथ नगर |
| १२७ | सहेली | खिचडी बनविणे | ख्वाजा नवाब नगर |
| १२८ | श्री भाग्यश्री | दोरा बनविणे | श्रमगिरी नगर, पेठरोड |
| १२९ | नवनाथ | नर्सरी | फुलेनगर, उपनगर |
| १३० | चाँद | फळे विक्री | चाँद हाजीमल, यशवंत मंडई देवळाली |
| १३१ | धनलक्ष्मी | रेडीमेड कपडे विक्री | कामटवाडा |
| १३२ | प्रतिमा | शेळीपालन | जतवन नगर, नाशिकरोड |

| अ. नं. | स्वयंसहाय्यता गटांचे नांव | व्यवसाय प्रकार | व्यवसायाचे स्थान |
|---|---|---|---|
| १३३ | भवानी | एम्ब्रॉडरी वर्क | गुलजारवाडी, नाशिक |
| १३४ | संचय | चप्पल बुट विक्री | म्हसोबा वाडी, शिंगाडातलाव |
| १३४५ | रसिका | धान्यविक्री | रासबिहारी पाठीमागे |
| १३६ | शिवपार्वती | किराणा माल विक्री | नाशिकरोड, नाशिक |
| १३७ | रमाबाई | खानावळ | रमाबाई आंबेडकर नगर, |
| १३८ | शिवराज | दुधविक्री | वडनेर दुमाला, आर्टलरी सेंटर |
| १३९ | पुष्पक | पादत्राणे | १३४४, खडकाळी |
| १४० | गरिब नवाज | शिलाई काम | गोदावरी नदी, पश्चिम नाशिक |
| १४१ | जय जनार्दन | पोषण आहार | पंचकगाव, जेलरोड |
| १४२ | फ्रान्सी | नर्सरी | गों डवस्ती, पंचवटी |
| १४३ | भिमाशंकर | म्हैसपालन | गवळीवाडा, सुंदरनगर, देगाव |
| १४४ | इच्छामणी | धान्यविक्री | पंडीतनगर, झोपडपट्टी, सिडको |
| १४५ | दक्षता | चादर, बेडशीट विक्री | |
| १४६ | साक्षी | किराणा दुकान | श्रमिक नगर, अंबड |
| १४७ | संघमित्रा | शिलाई मशिन | दसक राजवाडा, जेलरोड |
| १४८ | गंगा गोदावरी | किराणा दुकान | महाराणा प्रताप नगर |
| १४९ | सावित्री फुले | पिठाची गिरणी, | तलाठी ऑफीस, वडाळा नाका |
| १५० | तैय्यबा | साबण निर्मिती | द्वारका हॉटेलच्या पाठीमागे |
| १५१ | दुर्गा | किराणा दुकान | मौलाना आझाद रोड, दे.गाव |
| १५२ | भगवती | एम्ब्रॉडरी | बजरंगवाडी, नासिक–पुनारोड |
| १५३ | संकल्प | गार्डन मेटेनन्स | जिजामाता कॉलनी, शिवाजी |
| १५४ | तक्षशिला | भांडे विक्री | सातपूर राजवाडा |

**मालेगाव शहर**

| अ. नं. | स्वयंसहाय्यता गटांचे नांव | व्यवसाय प्रकार | व्यवसायाचे स्थान |
|---|---|---|---|
| १ | नौशिन महिला बचत गट | शिलाई मशिन | अन्सार गंज, मालेगाव |
| २ | मरहबी | कचरा गाडी | बादशाहखान नगर, मालेगाव |
| ३ | गगन | वीट भट्टी | सानेगुरूजी नगर, मालेगाव |
| ४ | मुस्कान | फिरती चक्की | कुंभार वाडा, मालेगाव |
| ५ | नायाब | ढेलागाडी | मुन्शी साबान नगर, मालेगाव |
| ६ | फैज | ॲपे गाडी | अब्दुल खलील नगर, मालेगाव |
| ७ | ऑचल | किराणा दुकान | मुन्शी साबान नगर, मालेगाव |
| ८ | सिता | म्हैस पालन | सानेगुरूजी नगर, मालेगाव |
| ९ | आशियाना | गहु-तांदुळ विक्री | इस्लामपुरा, मालेगाव |
| १० | निशांत | धान्यविक्री | कमलापुरा, मालेगाव |
| ११ | मेहर | ढेला गाडी | गुलशेर नगर, मालेगाव |
| १२ | शाहिना | मसाले कांडप | गल्ली नं. ११, मालेगाव |
| १३ | भाग्यलक्ष्मी | झाडू-टोपली | पवननगर संगमेश्वर, मालेगाव |
| १४ | मदिना | दूध व दुधाचे पदार्थ | नागछाप वस्ती, मालेगाव |
| १५ | गुलशन | काजू प्रक्रिया | मर्चंट नगर, मालेगाव |
| १६ | नवबहार | किराणा | रविवार वार्ड, मालेगाव |
| १७ | सरगम | ढेला गाडी | गुलशेर नगर, मालेगाव |
| १८ | बहार | किराणा व धान्य विक्री | सलामताबाद, मालेगाव |
| १९ | संगम | कापड विकी | अब्दुल खलील नगर, मालेगाव |
| २० | गोल्डन | धान्य विक्री | गोल्डन नगर, मालेगाव |
| २१ | अनमोल | रेडीमेड कापड | अब्दुल खलील नगर, मालेगाव |
| २२ | निदा | खानवळ | रमजान पुरा, मालेगाव |

| अ. नं. | स्वयंसहाय्यता गटांचे नांव | व्यवसाय प्रकार | व्यवसायाचे स्थान |
|---|---|---|---|
| २३ | गुरूदत्त | मसाला,डाळ गिरणी | सानेगुरूजी नगर, मालेगाव |
| २४ | मिलन | पोषण आहार | मर्चंट नगर, मालेगाव |
| २५ | रजा | धान्य विक्री | मर्चंटनगर, मालेगाव |
| २६ | साकीब | सुपारी कटाई, विक्री | म्हाडा प्लॉट, मालेगाव |
| २७ | शबनम | भरतकाम, एम्ब्रॉडरी | मुस्लीम नगर, मालेगाव |
| २८ | मानवता | पादत्राणे निर्मिती | पंचशील नगर, मालेगाव |
| २९ | बजरंग | पोषण आहार | पवननगर, मालेगाव |
| ३० | स्नेहा | स्वयंपाक भांडे(भाडोत्री) | आदीवासी वस्ती, मालेगाव |
| ३१ | दर्पण | शिलाई काम | जाफर नगर, मालेगाव |
| ३२ | आदर्श | बांगडी विक्री | पारकी नगर, मालेगाव |
| ३३ | अशरफी | शिलाई काम | मुन्शी नगर, मालेगाव |
| ३४ | सागर | धान्य दुकान | गोल्डन नगर, मालेगाव |
| ३५ | कमर | पिठाची गिरणी | देवीचा मळा, मालेगाव |
| ३६ | उपहार | दुध व मिठाई विक्री | खलील नगर, मालेगाव |
| ३७ | दीप | लग्नकार्य भांडे | रामसेतू पुल, मालेगाव |
| ३८ | सहारा | बेडशीट,चादर विक्री | नवी कॉलनी, मदनी, मालेगाव |
| ३९ | सितारा | रेडीमेड कपडे विक्री | कमालपुरा, मालेगाव |
| ४० | अरफान | स्टील भांडे विक्री | शकीमाबाद, मालेगाव |
| ४१ | नौशिन | फळे, भाजीपाला विक्री | अन्सार गंज, मालेगाव |
| ४२ | अंबिका | किराणा, भाजीपाला विक्री | शिवाजी नगर, कॅम्प, मालेगाव |
| ४३ | गुलशन | शिलाई काम | गुलशेर नगर, मालेगाव |
| ४४ | नुराणी | मंडप डेकोरेटर्स | यासिन मियाँका तकीया, मालेगाव |

| अ. नं. | स्वयंसहाय्यता गटांचे नांव | व्यवसाय प्रकार | व्यवसायाचे स्थान |
|---|---|---|---|
| ४५ | जयहिंद | एम्ब्रॉडरी | मदनी बाजार, मालेगाव |
| ४६ | सलील | पापड बनविणे | देवीचा मळा, मालेगाव |
| ४७ | सागर | पादत्राणे विक्री | अब्दुल खालीक नगर, मालेगाव |
| ४८ | पलक | साडी विक्री | अनुशेठ मळा, मालेगाव |
| ४९ | अरबीया | धान्य विक्री | मुस्लीम नगर, मालेगाव |
| ५० | शिखा | सौंदर्य प्रसाधने | कमालपुरा, मालेगाव |
| ५१ | कायनात | काडप विक्री | जाफर नगर, मालेगाव |
| ५२ | इदलीस बाबा | मंडप डेकोरेटर्स | यासिन मियांका तकीया, मालेगाव |
| ५३ | ईसा | फुलभांडार | चर्चगेट, कॅम्प, मालेगाव |
| ५४ | साई | भाजीपाला विक्री | नदी किनारा, रामसेतु, मालेगाव |
| ५५ | गुलनार | धान्यविक्री | राजा नगर, मालेगाव |
| ५६ | चिराग | खानावळ | गुलशेर नगर, मालेगाव |
| ५७ | रजियाँ | सफाई ठेका | नवापुरा, मालेगाव |
| ५८ | शगुफा | शिलाई काम | देवीचा मळा, मालेगाव |
| ५९ | न्यु गुरूबेग | टेम्पो (गाडी) | गुलबेग, नगर, मालेगाव |
| ६० | अमन | भाजीपाल विक्री | गोल्डन नगर, मालेगाव |
| ६१ | रचना | दोरखंड बनविणे | गणेशवाडी कॅम्प, मालेगाव |
| ६२ | इतेहाद | किराणा दुकान | किल्ला झोन, मालेगाव |
| ६३ | अनुसया | काजु प्रक्रिया | मालेगाव कॅम्प, मालेगाव |
| ६४ | बाबा बुऱ्हान | भंगार विक्री | जमहुर नगर, मालेगाव |
| ६५ | नोसानी | फळे विक्री | रविवार वार्ड, मालेगाव |
| ६६ | मरहुमा | भाजीपाला विक्री | अब्बास नगर, मालेगाव |
| ६७ | नुर | रेडीमेड कपडे विक्री | सयीद हबीब कंपाऊंड, मालेगाव |

| अ. नं. | स्वयंसहाय्यता गटांचे नांव | व्यवसाय प्रकार | व्यवसायाचे स्थान |
|---|---|---|---|
| ६८ | फरहाझ | पत्राचे सामान | आयशा नगर, मालेगाव |
| ६९ | अफरिन | काजू विक्री | निहाल नगर, मालेगाव |
| ७० | धन धन सद्गुरू | काजू प्रक्रिया | श्रीराम नगर, मालेगाव |
| ७१ | निशा | कापड विक्री | करीम नगर, मालेगाव |
| ७२ | अनिका | ढेला गाडी | गालीब नगर, मालेगाव |



नाशिक येथील पंचवटी समाज विकास संस्थेच्या समुहसंघटीका
श्रीमती रूपवते यांची मुलाखत घेताना संशोधक



मालेगांव शहरात 'रमजान ईद' निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक
एकता कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित गटांच्या हिंदू आणि मुस्लिम महिला




'सामाजिक एकता' कार्यक्रमाप्रसंगी वैचारीक स्वातंत्र्य जोपासतांना
स्वयंसहाय्यता गटाची महिला



मालेगांव महानगरपालिकेच्या सुवर्ण जयंती रोजगार योजनेचे प्रकल्प अधिकारी
श्री. रोहित कन्नोर यांची मुलाखत घेताना संशोधक



महिला दिनाच्या प्रसंगी स्वयंसहाय्यता गटाच्या महिलांना
मार्गदर्शन करताना संशोधक




गुरूदत्त स्वयंसहाय्यता गटाच्या महिलांचे
गिरणी व्यवसायाच्या माध्यमातून सबलीकरण



प्रतिमा स्वयंसहाय्यता गटाच्या महिलांचे
शेळीपालनाच्या माध्यमातून सबलीकरण